# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र

बी. ए. भाग–३ इतिहास

सत्र–५ : पेपर–८ DSE-E62

# मध्ययुगीन भारताचा इतिहास

**(History of Medieval India 1206-1526 AD)**

सत्र–६ : पेपर–१३ DSE-E187

# मध्ययुगीन भारताचा इतिहास

**(History of Medieval India 1526-1707 AD)**

(शैक्षणिक वर्ष २०२१–२२ पासून)

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०२२
बी. ए. भाग - ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती : ५००**

■

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN- 978-93-92887-55-0

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

# दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## ■ सल्लागार समिती ■

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) आर. के. कामत**
प्रभारी अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एस. एस. महाजन**
प्रभारी अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्य (डॉ.) आर. जी. कुलकर्णी**
प्रभारी अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्राचार्या (डॉ.) श्रीमती एम. व्ही. गुळवणी**
प्रभारी अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. एन. शिंदे**
प्रभारी कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. जी. आर. पळसे**
प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. के. मोरे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूरशिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


■ **अभ्यासमंडळ : इतिहास** ■

अध्यक्ष – **डॉ. अवनिश पाटील**
इतिहास अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. श्रीमती एन. डी. पारेकर**
  इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. डी. बी. मासाळ**
  छत्रपती शिवाजी कॉलेज, सातारा
- **डॉ. श्रीमती संघमित्रा व्ही. सरवदे**
  आण्णासाहेब डांगे कॉलेज, हातकणंगले,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. दिपक शंकरराव जाधव**
  लाल बहाद्दूर शास्त्री कॉलेज, सातारा
- **डॉ. सुप्रिया चंद्रशेखर खोले**
  चंद्राबाई शांताप्पा शेंडूरे कॉलेज, हुपरी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. एम. व्ही. जाधव**
  यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. निवासराव अधिकराव वरेकर**
  आदर्श महाविद्यालय, विटा, ता. खानापूर,
  जि. सांगली
- **डॉ. सुरेश मारूती चव्हाण**
  आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, गडहिंग्लज,
  जि. कोल्हापूर
- **डॉ. राजश्री दिलीप निकम**
  कृष्णा महाविद्यालय, रेठरे बु।।, शिवनगर,
  ता. कराड, जि. सातारा
- **डॉ. श्रीमती मंजिरी कामत**
  इतिहास अधिविभाग, मुंबई विद्यापीठ, मुंबई.
- **डॉ. चंद्रकांत अभंग**
  सचिव, भारत इतिहास संशोधक मंडळ,
  इमिनंट स्कॉलर ऑफ मराठा हिस्ट्री.
- **डॉ. अरुण भोसले**
  निवृत्त प्राध्यापक, इतिहास अधिविभाग,
  शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
- **डॉ. भरतभूषण माळी**
  सचिव, शिवाजी विद्यापीठ इतिहास परिषद
- **डॉ. अमर आडके**
  सल्लागार, किल्ले जतन आणि संवर्धन, कोल्हापूर

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्यामार्फत जून २००७ पासून बहिःस्थ विद्यार्थ्यांची गरज ओळखून दूरशिक्षण योजनेचा उपक्रम हाती घेतला आहे. सन २०२०-२०२१ पासून बी. ए. ३ इतिहास विषयाचा अभ्यासक्रम बदललेला आहे. सत्रपद्धती राबविण्यात येत आहे. सदरच्या योजनेअंतर्गत बी.ए.भाग-३ इतिहास पेपर क्र. ८ व १३ (सत्र ५ व ६) या विषयाच्या विद्यार्थ्यांसाठी सत्र ५ साठी मध्ययुगीन भारताचा इतिहास (१२०६ ते १५२६) व सत्र ६ साठी मध्ययुगीन भारताचा इतिहास (१५२६ ते १७०७) या पेपरचे स्वयं अध्ययनासाठी हे पुस्तक लिहिले आहे. अभ्यासक्रमातील वेगवेगळ्या घटकांचे स्पष्टीकरण सुलभ भाषेतून केल्यामुळे विद्यार्थी वर्गाला विषयाची माहिती होण्यास अडचण राहणार नाही असे वाटते. प्रत्येक उपघटकाच्या शेवटी स्वयं अध्ययन प्रश्न व त्यांची उत्तरे घटकाच्या शेवटी दिलेली आहेत. तसेच घटकाच्या शेवटी सरावासाठी स्वाध्याय, पारिभाषिक शब्द, सारांश व अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथांची यादी दिलेली आहे.

या पुस्तकामध्ये मध्ययुगीन भारताचा इतिहास या पेपरची माहिती दिलेली आहे. या पेपरमध्ये सत्र ५ व ६ साठी प्रत्येकी ४ घटकांचा समावेश केलेला आहे. सत्र ५ मध्ये साधने, प्रमुख राज्यकर्ते, प्रशासन आणि अर्थव्यवस्था, धर्म, समाज आणि संस्कृती आणि सत्र ६ मध्ये साधने, प्रमुख राज्यकर्ते, प्रशासन आणि अर्थव्यवस्था, धर्म, समाज आणि संस्कृती इत्यादी घटकांचा समावेश केलेला आहे. मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचा बारकाईने अभ्यास करणे गरजेचे असल्याने सदर पुस्तकाचे लेखन केलेले आहे.

पुस्तकामध्ये विविध घटकांच्या अनुषंगाने विवेचनात अचूकता आणण्याचा प्रयत्न केलेला आहे. तरीही त्यामध्ये कांही उणिवा राहिल्यास प्राध्यापक व विद्यार्थी यांनी त्या निदर्शनास आणून द्याव्यात. पुढील आवृत्ती अधिकाधिक सुधारित अद्यावत करण्यासाठी याचा उपयोग होईल. हे पुस्तक पदवी व विविध स्पर्धा परीक्षांच्यासाठी महत्त्वाचे ठरेल असा आम्हाला विश्वास वाटतो. सदरच्या पुस्तकातील विविध घटक लेखनाची जबाबदारी संबंधीत घटक लेखकांवर आहे.

सदर पुस्तकाच्या लिखाणाचे काम शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रातील विविध मान्यवर प्राध्यापकांनी पूर्ण केल्याबद्दल संपादक मंडळ त्यांचे आभारी आहे. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी शिवाजी विद्यापीठ आणि दूरशिक्षण विभागातील प्रशासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या सहकार्याबद्दल संपादक मंडळ मनापासून आभार मानत आहे.

**■ संपादक ■**

**डॉ. कविता गगराणी**
न्यू कॉलेज, शिवाजी पेठ,
कोल्हापूर

**डॉ. सुरेश शिखरे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **डॉ. सुरेश शिखरे**<br>श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर | १ | १ |
| **डॉ. एम. व्ही. जाधव**<br>यशवंतराव चव्हाण महाविद्यालय, हलकर्णी,<br>ता. चंदगड, जि. कोल्हापूर | २ | – |
| **डॉ. संतोष जेठीथोर**<br>डी. आर. माने आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, कागल,<br>ता. कागल, जि. कोल्हापूर | ३ | – |
| **डॉ. राजेंद्र सातपुते**<br>आर्टस ॲण्ड कॉमर्स कॉलेज, शुक्रवारपेठ, सातारा | ४ | – |
| **प्रा. आप्पासाहेब नामदेव केंगार**<br>बाबासाहेब चितळे महाविद्यालय, भिलवडी<br>ता. पलूस, जि. सांगली | – | २ |
| **डॉ. संजीव बोडके**<br>शरदचंद्र पवार महाविद्यालय, लोणंद, ता. खंडाळा, जि. सातारा | – | ३ |
| **प्रा. कविता गगराणी**<br>न्यू कॉलेज, शिवाजी पेठ, कोल्हापूर | – | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. कविता गगराणी**
न्यू कॉलेज, शिवाजी पेठ,
कोल्हापूर

**डॉ. सुरेश शिखरे**
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय,
दसरा चौक, कोल्हापूर

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५ : पेपर–८** | |
| | **मध्ययुगीन भारताचा इतिहास (१२०६–१५२६०** | |
| १. | साधने | १ |
| २. | प्रमुख राज्यकर्ते | ३१ |
| ३. | प्रशासन आणि अर्थव्यवस्था | ६५ |
| ४. | धर्म, समाज आणि संस्कृती | ११२ |
| | **सेमिस्टर–६ : पेपर–१३** | |
| | **मध्ययुगीन भारताचा इतिहास (१५२६–१७०७)** | |
| १. | साधने | १५१ |
| २. | प्रमुख राज्यकर्ते | १७९ |
| ३. | प्रशासन आणि अर्थव्यवस्था | २१५ |
| ४. | धर्म, समाज आणि संस्कृती | २४५ |

## विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरे घटकाच्या शेवटी देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०२०-२१ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

## घटक – १

# साधने

**अनुक्रमणिका :**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ वाङ्मयीन साधने: तारीखे-ए-फिरोजशाही, अमुक्तमाल्यदा

१.२.२ पुरातत्वीय साधने:(स्मारके वगळून)

१.२.३ परकीय प्रवाशांची प्रवास वर्णने: इब्न बतूता, डोमिंगो पायीश/पेस

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठीची पुस्तके

## १.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील माहिती स्पष्ट करता येईल.

- सुलतानशाही कालखंडाच्या संदर्भ साधनांचे महत्व स्पष्ट करता येईल.
- संदर्भ साधनांचे वर्गीकरण करता येईल.
- इतिहासाच्या पुर्नलेखनासाठी संदर्भ साधनांचे महत्त्व काय असते ते स्पष्ट करता येईल.
- सुलतानशाही कालखंडातील प्रमुख संदर्भ साधनांची ओळख होईल.
- विजयनगरकालीन प्रमुख संदर्भ साधनांची माहिती सांगता येईल.
- पुरातत्वीय साधनांचे इतिहास लेखनातील महत्व सांगता येईल.
- परकीय प्रवाशांच्या प्रवास वर्णनांचे इतिहासलेखनातील महत्व स्पष्ट करता येईल.

## १.१ प्रस्तावना :

इतिहासलेखन प्रक्रियेत संदर्भ साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. संदर्भ साधनांच्या आधाराशिवाय लिहिलेल्या कोणत्याही इतिहास ग्रंथाला 'इतिहास' ही संज्ञा प्राप्त होऊ शकत नाही. कोणत्याही राष्ट्राचा अथवा कोणत्याही कालखंडाचा राजकीय, सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास लिहिण्यासाठी पुरावा म्हणून संदर्भ साधनांचा आधार द्यावा लागतो. इतिहास लेखनासाठी वापरलेल्या पुराव्यांना साधन, पुरावा अथवा संदर्भ असे म्हणतात. एखादा लेखक स्वतःच्या कल्पना शक्तीच्या जोरावर ललित लेखन करू शकतो. कारण तिथे सत्य घटनांचा प्रश्न नसतो. इतिहासलेखनास मात्र हा नियम लागू होत नाही कारण,'इतिहासलेखन म्हणजे मानवी जीवनात घडून गेलेल्या सत्य घटना असतात.' कल्पनाशक्तीच्या जोरावर त्या लिहिल्या जाऊ शकत नाहीत अथवा लिहिल्यास तो इतिहास होऊ शकत नाही. एखादी घटना जशी घडली तशीच लिहिण्यासाठी पुरावा द्यावा लागतो, म्हणून इतिहासलेखनात संदर्भ साधनांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. इतिहासलेखन संपूर्णतः भूतकालीन अवशेष व साधनांच्यावर आधारित असते, कारण इतिहास या वर्ण्य विषयाचा संबंध भूतकाळाशी असतो. संदर्भ साधनांच्यामधून आपणास भूतकालीन घडामोडीची सुसंगतवार माहिती मिळते. ऐतिहासिक संशोधनांचे मूल्य त्या संशोधकाने कोणत्या प्रकारची साधने वापरली आहेत त्याच्यावर अवलंबून असते. अस्सल/प्राथमिक साधने हीच इतिहासलेखनांची पायाभूत साधने असतात म्हणून इतिहासामध्ये "No Documents, No History' असे म्हटले जाते. संदर्भ साधनाशिवाय इतिहास म्हणजे एक प्रकारची कथा असे मानले जाते. प्रस्तुत प्रकरणात आपणास सुलतानशाही कालखंडातील भारताच्या इतिहास लेखनाच्या साधनांचा अभ्यास करावयाचा आहे.

सुलतानशाही व मुघल कालखंड आणि या दोन्ही सत्तांच्या दरम्यानच्या कालखंडात उदयास आलेले विजयनगरचे हिंदू साम्राज्य या घटना मध्यकालीन भारताच्या इतिहासाच्या दृष्टीकोणातून महत्त्वाच्या आहेत. इस्लामिक आक्रमणांच्या बरोबर भारतात इतिहासलेखनांची परंपराही आलेचे दिसून येते, यातून मध्यकालीन भारताचा इतिहास महत्वपूर्ण इतिहास पहावयास मिळतो. इस्लामिक राज्यकर्त्यांनी आपल्या दरबारातील घटनांच्या नोंदी ठेवण्यासाठी दरबारी लेखक नेमलेले दिसतात. या लेखकांनी दरबारातील छोट्या-मोठ्या घटनांच्या नोंदी घेतलेल्या असत त्याला तावरीखा असे म्हणत. मध्यकालीन भारतात लिखित साधनांच्या बरोबर भौतिक/ पुरातत्वीय साधनांचाही मोठ्या प्रमाणात विकास झालेला दिसतो, ही पुरातत्वीय साधने ज्या बाबतीत लिखित साधने उपलब्ध होत नाहीत अथवा अनेक घटनांना साधणारा दुवा म्हणून उपयोगात येतात.

## १.२ विषय विवेचन :

- **संदर्भ साधन अथवा पुरावा म्हणजे काय?**

ऐतिहासिक घटनांचा अन्वयार्थ ज्याच्या आधारे काढता येतो अथवा ज्यांच्यामधून इतिहासलेखनासाठी उपयुक्त सत्य माहिती मिळते अशा वस्तू अथवा वास्तू, लिखित अथवा अलिखित साधनांना सर्वसाधारणपणे इतिहासाचा पुरावा किंवा संदर्भ साधन असे म्हटले जाते. इतिहासलेखनशास्त्राच्या दृष्टीकोणातून ऐतिहासिक

लेखनास पुरावा किंवा संदर्भ देणे महत्त्वाचे असते. प्रो. मायकेल स्टॅनफोर्ड यांनी म्हटल्याप्रमाणे ऐतिहासिक घटिते पुरावा निर्माण करततात व हेच पुरावे ऐतिहासिक ज्ञानाचा आधार ठरतात. पुराव्याशिवाय लिहिलेला अथवा बोललेला इतिहास असत नाही. कोणत्याही इतिहासकालीन घटना किंवा गोष्टींचा पुरावा देणाऱ्या वस्तूला साधारणपणे इतिहासाचे साधन असे म्हणतात.

**● सुलतानशाही कालखंड (१२०६ ते १५२६) :**

सुलतानशाही कालखंडाची माहिती देणारी अनेक संदर्भ साधने विविध भाषामध्ये उपलब्ध आहेत. सुलतानशाही कालखंडातील अरबी व फार्सी भाषेतील साधनाशिवाय परकीय भाषेतील साधनेही उपलब्ध आहेत. या साधनांच्या अभ्यासासाठी सुलतानशाही, मुघल, विजयनगर, बहामनी, मराठा अशा कालखंडात ही साधने वर्गीकृत करण्यात येतात. प्रस्तुत प्रकरणात आपणास प्रामुख्याने सुलतानशाही व विजयनगरकालीन स्थानिक व परकीय साधनांचा अभ्यास करावयाचा आहे. सन १२०६ ते १५२६ हा सुलतानशाहीचा कालखंड आहे. या काळात दिल्लीच्या सत्तेवर गुलाम घराणे (१२०६ ते १२९०), खिलजी घराणे (१२९०-१३२०), तुघलक घराणे (१३२०-१४१४), सय्यद घराणे (१४१४-१४५१) व लोदी घराणे (१४५१-१५२६) होते. या कालखंडातील प्रमुख साधने खालीलप्रमाणे आहेत. सुलतानशाही कालखंडाच्या प्रारंभिक टप्प्यातील माहिती ग्रंथ म्हणून हसन निझामी लिखित ताजूल मासीरचा उल्लेख होतो. याशिवाय तबकात-ए-नासिरी(मिनहाज-उस-सिराज), फुतुहाने फिरोजशाही (फिरोज तुघलक), अमीर खुस्रोचे 'तारीख-इ-इलाहा', 'तुघलकनामा', 'मिफ्ताहुल फतूह', 'नूरसिफर','आशिक-इ-देवलरानी' आणि 'किरानुस सादैन' यांचा समावेश होतो. याशिवाय 'फुतुह-उस-सलातीन' (इसामी), 'तारीख ए-मुबारकशाही' (याह्या बीन अहमद), 'तारीख-ए-सलातीन-ए-अफगाणा' (पहिला अहमद यादगार), 'मखजन-ए-अफगाणा' (दुसरा नियामतुल्ला) इत्यादीचा समावेश होतो. आपणास प्रस्तुत प्रकरणात खालील प्रमुख साधनांचा अभ्यास करावयाचा आहे.

**अ) तारीख-ए-फिरोझशाही: झियाउद्दीन बर्नी (१२८५-१३५७) :**

सुलतानशाही कालखंडाच्या इतिहासालेखनासाठी अतिशय महत्वाचे साधन म्हणून झियाउद्दीन बर्नी लिखित 'तारीख-ए-फिरोजशाही' चा उल्लेख होतो. तारीख-ए-फिरोजशाही या नावाचे दोन ग्रंथ सुलतानशाही कालखंडात पाहावयास मिळतात. पहिला ग्रंथ झियाउद्दीन बर्नीने लिहिला असून दूसरा ग्रंथ शम्स-ए-सिराज अफीफ याने लिहिलेला आहे. अफीफ फिरोज तुघलकांचा दरबारी लेखक होता. झियाउद्दीन बर्नीच्या ग्रंथाचे नाव घेऊन अफीफने हा ग्रंथ लिहिलेला आहे. बर्नीचा ग्रंथ जेथे संपतो तेथून पुढच्या घटना अफीफच्या ग्रंथात येतात. फिरोज तुघलकांच्या संपूर्ण कारकीर्दीची माहिती यामध्ये नमूद केलेली आहे. आपणास या प्रकरणात झियाऊद्दीन बर्नी लिखित तारीख-ए-फिरोझशाही ग्रंथाचा अभ्यास करावयाचा आहे.

**१) झियाउद्दीन बर्नीचेपूर्व चरित्र :**

झियाउद्दीन बर्नी हा सुलतानशाही काळातील दरबारी इतिहासकार म्हणून परिचित होता. बर्नी हा मीरत या शहरातील रहिवासी होता. बर्नीचा जन्म सन १२८४ ते १२८५ च्या दरम्यान प्रसिद्ध व प्रतिष्ठीत अशा सय्यद

घराण्यामध्ये झाला. सुलतानशाही काळातील अनेक घराण्याशी त्याचा संबंध आला, विशेषत: बल्बन (सन १२६६-८७) आणि खिलजी काळात (सन १२९०-१३२०) त्याच्या घराण्यातील लोकांना दरबारी अधिकारपदे दिली गेली होती. बर्नीच्या वडिलांचे नाव मुअयिद-अल्-मुल्क असे होते ते जलालुद्दिन खिलजीचा मुलगा अर्कली खान याचे नायब होते. त्याचे मामा मलिक-अला-अल्-मुल्क हे दिल्लीचे कोतवाल होते. चुलते काझी-अला-ऊल-मुल्क हाअल्लाउद्दिन खिलजीचा सल्लागार व दिल्लीचा कोतवाल होता. बर्नीचे संपूर्ण बालपण राजधानीमध्ये मोठमोठ्या लोकांमध्ये गेलेले असल्याने त्याची अनेक उच्चपदस्थ पदाधिकाऱ्यांबरोबर उठबस होती. बर्नी स्वतः मुहंम्मद बिन तुघलकाकडे १७ वर्षे (सन १३२५-५१) नदीम अर्थात सहायक पदावर कार्यरत होता. मात्र, फिरोजशाह तुघलकाच्या काळात (सन १३५१-८८) सुलतानाची त्याच्यावर इतराजी झाल्याने त्याला हद्दपार व्हावे लागले, त्याचे उर्वरित आयुष्य फारच हालकीचे गेले. फार्सीमध्ये लिहिलेले त्याचे दोन ग्रंथ प्रसिद्ध आहेत, यामध्ये 'तारिख-इ-फिरोझशाही', 'फतवा-इ-जहानदारी', यांपैकी 'तारिख-इ-फिरोझशाही' या ग्रंथामध्ये मुस्लिम राज्यकर्त्यांना उद्देशून लिहिलेली राजनीती आणि इस्लामविषयक कर्तव्याची चर्चा आहे. बल्बन ते फिरोझशाह तुघलकाच्या ६ वर्षांच्या कारकीर्दी पर्यंतचा घटना या ग्रंथात त्याने हाताळल्या आहेत. 'फतवा-इ-जहानदारी' या ग्रंथात धार्मिक तत्वज्ञानाचे विवरण आहे. या ग्रंथातून बर्नीवरील सुफी विचारप्रणालीचा प्रभाव जाणवतो.

### २) तारीख-ए-फिरोझशाहीचे लिखाण (१३५७-१३५८) :

झियाउद्दीन बर्नी दरबारी इतिहासकार असल्यामुळे ऐतिहासिक साधन म्हणून त्याच्या तारिख-इ-फिरोझशाही या ग्रंथास अनन्यसाधारण महत्त्व आहे. सन १३५८ मध्ये त्याने हा ग्रंथ लिहून पूर्ण केला. इंग्रजी इतिहासकार इलियट आणि डाउसन यांनी या ग्रंथाचे इंग्रजीत भाषांतर केले आहे. मिनहाज-उस-सिराजच्या 'तबकात-ए-नासिरी' या ग्रंथातील घटना जिथे थांबतात तेथून पुढे बल्बनपासून मुहंम्मद बीन तुघलक व फिरोझ तुघलकांच्या कारकीर्दीतील पहिल्या सहा वर्षांपर्यंतचा इतिहास ग्रंथात दिला आहे. अल्लाउद्दीन खिलजी व मुहंम्मद तुघलकांच्या काळातील अनेक प्रशासकीय योजनांची चिकित्सा करून जमीन महसुलाची विस्तृत माहिती दिली आहे. अल्लाउद्दीन खिलजीच्या प्रशासकीय सुधारणा व मुहंम्मद तुघलकाच्या विविध योजनांची माहिती दिली आहे. इतिहासकाराने राज्यकर्त्यांची दुष्कृत्ये, अनाचार यांची दखल घ्यावी व निःपक्षपाती दृष्टिकोण स्वीकारावा अशी भूमिका त्याने घेतली आहे. बर्नी उच्च कुळातील असल्याने त्याच्या लिखाणामध्ये उच्च पदाबद्दल अभिमान दिसून येतो. मात्र, सर्वसामान्यांच्या जीवनापासून तो दूर असल्याने त्याच्या लिखाणामध्ये एकप्रकारची तुच्छता दिसून येते.

### ४) झियाउद्दीन बर्नीची इतिहास लिहिण्याची भूमिका :

बर्नीने तारिख-इ-फिरोझशाहीच्या लिखाणासाठी आपल्या पूर्वसूरीचे लिखाण,ग्रंथ वाचून इतिहासावर प्रकाश टाकलेला आहे. बर्नीने तारीख-ए-फिरोझशाहीचे लिखाण करताना एक भूमिका स्वीकारलेली दिसते आणि त्याचे इतिहासविषयक विचार स्पष्ट होते असे दिसते. तत्कालिन विद्वानांनी बर्नीला बल्बनबद्दल कोणतीही माहिती दिली नाही. त्याबद्दल त्याला खेद वाटत होता. इतिहास आपल्याला फायदेशीर असताना

आपण इतिहासाकडे का दुर्लक्ष करतो? असा प्रश्न तो उपस्थित करतो. सर्व सामान्य लोकांना इतिहास माहिती नसणे हे तो मान्य करतो मात्र, विद्वान लोक इतिहासावर लक्ष केन्द्रित करत नाहीत याविषयी तो चिंता व्यक्त करतो. उच्चपदस्थ लोकांनाच इतिहास समजू शकतो आणि तेच लोक इतिहासाचा वापर कल्याणासाठी करु शकतात असे बर्नीला वाटत होते. इतिहासामुळे लोकांना ईश्वरीय संदेश, पैगंबरांचे कार्य, राजाच्या कार्य-कर्तृत्वाची ओळख होते आणि इतिहास आपल्याला धोक्यापासून सावध करतो असे त्याचे प्रतिपादन होते.

**५) तारीख-ए-फिरोझशाहीचे संदर्भ साधन म्हणून महत्व काय आहे?**

झियाउद्दीन बर्नी हा अल्लाऊद्दिन खिलजी व मुहंम्मद तुघलकाच्या समकालीन असल्याने त्याने या काळाबाबत तपशिलवार माहिती दिलेली आहे. तारीख-ए-फिरोझशाही हा ग्रंथ खिलजी व तुघलकशाहीतील राजकीय, आर्थिक, धार्मिक व प्रशासकीय इतिहासाची माहिती देणारा महत्त्वाचा संदर्भ आहे. बर्नीला या काळातील राजकीय परिस्थिती व आव्हानांची उत्तम जाण होती असे दिसते. बर्नीने आपल्या ग्रंथात सुलतानांशाहीच्या साम्राज्य विस्तार बरोबर विविध सुलतानांच्या अंतर्गत, प्रशासकीय सुधारणा, तत्कालीन सुलतानांची वैचारिक बैठक, भूमिका, व्यक्तिमत्वाबद्दल माहिती देताना बर्नीने लेखक आणि सुलतान अशा काल्पनिक संवाद स्वरुपात लिखाण केलेले आहे.

**६) तारीख-ए-फिरोझशाहीमधील दोष काय आहेत?**

बर्नीकृत तारीख-ए-फिरोझशाहीचे इतिहासाचे एक संदर्भ साधन म्हणून जसे फायदे अथवा महत्व आहे, त्याचप्रमाणे त्याचे मूलभूत स्वरूपाचे दोष देखील आहेत. बर्नीचा जन्म उच्चकुळातील असल्याने तो सर्व सामान्यांत कधीच राहिला नव्हता. बर्नीकृत हा ग्रंथ शासक आणि अभिजन यांच्यासाठीच लिहिलेला आणि त्यांनाच महत्व देणारा आहे. ऐतिहासिक घटनाक्रम देताना त्याने भरपूर चूका केलेल्या असून राजकीय घटना देण्यापेक्षा सामाजिक आणि राजकीय भाष्य करण्यावर जास्त भर दिलेला आहे. बर्नीचे व्यक्तिमत्व व विचारांमध्ये व्यक्तिनिष्ठता आणि लिखाणामध्ये पूर्वग्रहदूषितपणा दिसून येतो. त्याकारणाने सर्व सामान्यांप्रती त्याच्या मनामध्ये एक प्रकारे घृणेची भावना होती असे दिसते. सर्वसामान्य, दरिद्री, कनिष्ठ लोकांबद्दल तुच्छतेची भावना होती, मग तो हिंदू अथवा मुसलमान असो त्यात तो फरक करत नाही. कनिष्ठ वर्गीय मुस्लिम (अफजल), धर्मांतरित मुस्लिम (अर्झल) यांना मोठ्या पदावर बढती देणे त्याला रुचणारे नव्हते. बर्नी सुन्नी पंथीय असल्याने त्याला बिगर सुन्नी मुस्लिमांबद्दल तिरस्कार होता. कोणतीही पदे त्यांना दिली जाऊ नयेत असे त्याचे म्हणणे होते. सर्वसामान्य लोकांचे काहीच अस्तित्व नसते यावर तो ठाम असल्याने त्याच्या लिखाणात पूर्वगृह दिसतो. पद आणि ज्ञान हे उच्च कुळातच राहिले पाहिजे असे तो प्रतिपादन करताना इल्ततमशचे कौतुक करतो आणि त्याने कनिष्ठ वर्गातील अधिकाऱ्यांना सेवेतून काढून टाकले याचे समर्थन करतो.

**७) तारीख-ए-फिरोझशाहीचे समालोचन :**

बर्नीकृत तारीख-ए-फिरोझशाहीचे वरील गुण-दोष असले तरीही अल्लाउद्दिन खिलजीपासून फिरोजशाह तुघलकाच्या प्रारंभिक वर्षापर्यंतचा सुलतानशाहीचा इतिहास अभ्यासण्यासाठीचे एक महत्त्वाचे साधन म्हणून या

ग्रंथाचे महत्व निश्चित आहे. बल्बन बद्दल तो लिहितो की, बल्बन हा ध्येयवादी असून, त्याने आपले राज्य उत्तम प्रशासनाने राखलेले होते. दैवी राज्यसत्तेच्या तत्वांचा त्याने पुरस्कार केला होता. राजा ईश्वराचा प्रतिनिधी असतो असे तो मनात असे. शासनामध्ये त्याने कोणत्याही स्वरूपाचा भेदभाव केला नाही. दिल्ली दरबाराचे वैभव निर्माण केले. बल्बनने राज्यातील सर्व बंडाळ्या मोडून काढल्याचा उल्लेख करून इतर अनेक छोट्या मोठ्या घटना बर्नीने बल्बन बद्दल नोंदवल्या आहेत. अल्लाउद्दिन खिलजीच्या राजपदाविषयक विचाराची माहिती बर्नीने दिली आहे. बल्बन प्रमाणे त्याचा अनियंत्रित सत्ता सिद्धांतावर विश्वास होता. राजकारण आणि धर्म यांमध्ये व्यवस्थित अंतर ठेवलेले होते असे बर्नी लिहितो. अल्लाउद्दिन खिलजीचा उच्च वर्गातील सरदारांच्या वरती असलेला वचक, दक्षिण भारतातील साम्राज्य विस्तार, महसूल सुधारणा आणि बाजार नियंत्रणाचे व रेशन वाटपाच्या धोरणासंदर्भात विशेष माहिती मिळते.

मुहंम्मद बिन तुघलकाच्या साहित्यिक गुणांचे आणि त्याच्या सुंदर हस्ताक्षराचे बर्नी भरभरुन कौतुक करतो. त्याच्या म्हणण्यानुसार, मुहंम्मद मध्ये एक सुलतान आणि धर्मगुरु या दोघांचा वास होता. मुहंम्मदाने शिक्षा देण्याच्या बाबत कधीही फारकत केली नाही. सामान्य असो अथवा विद्वान, मुस्लिम असो अथवा हिंदू त्याला क्रूर शिक्षा दिली जात असे. बर्नी नोंदवतो की राजधानीमध्ये सदैव रस्त्यावर प्रेतं पडलेली असत, रोज कुणाला ना कुणालातरी मृत्युदंडाची शिक्षा दिली जात असे. मुहंम्मद बिन तुघलकाच्या संदर्भातल्या अनेक घटना बर्नीने आपल्या ग्रंथात नोंदवलेल्या आहेत, यामध्ये त्याचा राजधानी दिल्ली बदलण्याचा निर्णय चुकीचा होता असे तो नमूद करतो. आपल्या राज्यामध्ये केलेल्या नवनवीन प्रयोगासंदर्भामध्ये तो टीकाटिप्पणी करताना दिसतो. मुहंम्मद बिन तुघलकाच्या धोरणासंदर्भात तो टीका करतो, घटनांचा आणि कारणांचा आधार घेऊन बर्नीने मुहंम्मद तुघलकाला वेडा म्हटले आहे.

थोडक्यात: बर्नीने आपल्या ग्रंथांमध्ये सुलतानशाही कालखंडातील विविध आर्थिक मुद्यांवर प्रकाश टाकलेला आहे. कापड उद्योग, धातू उद्योग, चर्मोद्योग, लाकूड उद्योग या संबंधी तो तपशिलाने माहिती देताना दिसतो. सुलतानशाही कालखंडातील जमीन व शेती व्यवसाय याविषयी त्याने अतिशय बारीक-सारीक गोष्टींची चर्चा केलेली आहे. बर्नी सुलतानशाही कालखंडातील सामाजिक परिस्थिती संदर्भात भाष्य करताना दिसतो. सुलतानशाही कालखंडातील हिंदू धर्म, येथील व्यक्ती, रूढी-परंपरा, आचार-विचार या विषयी आपली निरीक्षणे नोंदवलेली आहेत. मुहंम्मद तुघलकाने जात आणि धर्माचा विचार न करता सर्वांच्या विद्वत्तेची कौतुक केल्याचे नमूद करतो. बर्नीच्या लिखाणाच्या आधारे सुलतानशाही कालखंडातील स्त्री जीवन व स्त्रियांच्या अनेक प्रथा परंपरांच्या वरती प्रकाश पडतो.

**ब) अमुक्तमाल्यदा: (कृष्णदेवराया) :**

**१) राजा कृष्णदेवराया: (१४८९-१५२९)**

विजयनगरच्या तुळुव व इतर तीन घराण्यांतील सर्वांत थोर व प्रतापी राजांमध्ये सर्वश्रेष्ठ आणि उल्लेखनीय राजा म्हणून कृष्णदेवरायाचा उल्लेख होतो. विजयनगरचा त्याच्या काळात सर्व क्षेत्रात विकास झाला. कृष्णदेवराय जसा उत्तम राज्यकर्ता होता तसाच तो मोठा योद्धा होता. कृष्णदेवरायाचे व्यक्तिमत्व अत्यंत प्रभावी होते. नुनीज

या पोर्तुगीज प्रवाशाचे त्याच्या दरबारी राहून प्रत्यक्ष पाहिलेला वृत्तांत लिहून ठेवलेला आहे. प्रसिद्ध विद्वान अय्यप्पा दीक्षित कृष्णदेवरायाच्या पदरी होता. कृष्णदेवरायाचा काळ राजकारण, युद्ध, साहित्य आणि कला या क्षेत्रातील सुवर्णकाळ होता. सम्राट स्वत: एक विद्वान कवी असल्याने तेलगू साहित्यास त्याने उत्तेजन दिले. या काळात संस्कृतचे अनुवादन करण्याची प्रथा सोडून दिली गेली. संस्कृत महाकाव्याच्या पद्धतीनुसार पौराणिक अथवा कल्पित कथेवर स्वतंत्र काव्य निर्माण केले गेले. प्रजेच्या कल्याणासाठी त्याने मोठे प्रयत्न केले. प्रजेमध्ये तो आवडता राजा होता. स्वत: तो वैष्णव पंथीय असला तरी त्याने प्रजेला धार्मिक पूजेचे स्वातंत्र्य दिलेले होते, याशिवाय त्याने अनेक इतर मंदिरांचा जीर्णोद्धार केला. तो स्वतः विद्वान व विद्येचा परम भोक्ता असल्याने कित्येक विद्वान, कवी, संत, महंत, साधू इत्यादींना उदार राजाश्रय दिला. शूर योद्धा, मुत्सद्दी, न्यायप्रिय प्रशासक आणि विद्येचा भोक्ता म्हणून त्याची ख्याती होती. तेलुगू साहित्यातील प्रख्यात आठ कवी त्याच्या दरबारात होते ते 'अष्टदिग्गज' म्हणून ओळखले जात. तो स्वत: कन्नड भाषी असूनही तेलुगू व संस्कृत या भाषांवर त्याचे चांगले प्रभुत्व असल्याने त्याने ह्या भाषांमध्ये ग्रंथनिर्मिती केली आहे.

तेलगू भाषेतील पाच अभिजात कलाकृतीमधील एक महाकाव्य म्हणून 'अमुक्तमाल्यदा'चा उल्लेख केला जातो. अमुक्तमाल्यदा या महाकाव्याचा मुख्य विषय वैष्णव पंथाचा प्रसार आणि प्रचार करणे असा असला तरी, कृष्णदेवरायाने धार्मिक लिखाणाच्या माध्यमातून आपल्या राजपदाची संकल्पना, राजनीती, प्रशासकीय धोरण यासंबंधीच्या संकल्पनांची विस्तृत चर्चा केलेली आहे. कृष्णदेवराय एक महान राजा होता तसा तो एक संस्कृत आणि तेलगू भाषेचा पंडित असल्याने दरबारी लोक कृष्णदेवरायाला 'साहित्य-समरांगण-सार्वभौम' (रणभूमी आणि साहित्याच्या क्षेत्रातील सम्राट.) आणि 'काव्य-नाटक-अलंकार-मर्मज्ञ' म्हणून संबोधत असत. अमुक्तमाल्यदा हा एक काव्याचा एका प्रकार आहे. यामध्ये प्रामुख्याने पुराणे आणि महाकाव्यातील गोष्टी असल्या तरी यामधील कविता नव्याच आहेत.

**२) अमुक्तमाल्यदा ग्रंथाविषयी माहिती :**

कृष्णदेवराया आपल्या प्रबंध कृतीच्या कथानकासाठी दक्षिणेत तामिळनाडूकडील कथानक घेतलेले आहे. अमुक्तमाल्यदासाठी वैष्णव संप्रदायाच्या संत कवियित्री श्री आंडाल अथवा गोदा हे नायिकाप्रधान संतचरित्र निवडले आहे. आंडाल उर्फ गोदादेवी ही बारा अलवारांपैकी एकमेव संत कवयित्री आहे. वास्तविक पाहता समकालीन कवी प्रभूर्तींच्या काव्यरचना पुराणातील अथवा पौराणिक कथावस्तूंवर आधारित असताना कृष्णदेवरायांने गोदादेवीचे चरित्र निवडून आपले वेगळेपण दाखवून दिले आहे. वैष्णव भक्तांना अलवार म्हणत, त्याचा शब्दशः अर्थ आहे जे भगवंतात बुडालेले. विष्णुचित्त हे एक अलवार आहेत, त्यांना पेरियालवर म्हणूनही ओळखले जाते. विष्णुचित्त अत्यंत धार्मिक वृत्तीचे आणि श्रीकृष्णाचे परम भक्त होते. ते नि:संतान होते आणि देवकृपेने मंदिराजवळच्या तुळशी वृदावनाशेजारी त्यांना कन्यारत्न सापडले. त्याने तिचे नामाभिधान गोदा (पृथ्वीकडून उपहार) कोधई असे केले.

श्री आंडाल उर्फ गोदादेवी यांना 'अमुक्तमाल्यदा' असे संबोधले जाते. अमुक्तमाल्यदाचा शब्दशः अर्थ,

'अमुक्त' म्हणजे धारण करणारी, 'माल्य' म्हणजे धारण केलेला फुलांचा हार, 'दा' म्हणजे देणारी. 'आपल्या केसांत धारण केलेला फुलांचा हार देणारी ती अमुक्तमाल्यदा.'तामीळ भाषेतील चुडी कोडुत्ता नाच्चीयार' या तामीळ शीर्षकाचे अमुक्तमाल्यदा हे संस्कृत भाषांतर. पूर्वीच्या काळी दक्षिणेत केस एकत्र घेऊन वेणी न घालता ती पिळून फिरवले जात व घट्ट गाठ मारली जाई. स्त्रिया त्या सैलसर अंबाड्यात पुष्पलेण्यांचा साज माळत, श्री आंडाल देवीची मधुरा भक्ति विलक्षण होती. कृष्णांवरच्या आत्यंतिक प्रेमाने, भगवंताला अर्पण करण्यासाठी म्हणून तिच्या पालक पित्याने ओवलेला, पुष्पहार ती आधीच आपल्या सैलसर अंबाड्यात माळत असे आणि जवळच्या पुष्करिणीत आपली प्रतिमा न्याहाळून, काही वेळाने अलगदपणे काढून पुष्पहार परत परडीत ठेवत असे. पुष्पहार मंदिरात जाण्या अगोदर स्वतः परिधान करून सुखदायक असल्याची ती खात्री करून घ्यायची कारण तिचा प्रियकर असलेल्या कृष्णाला तो पुष्पहार संपूर्ण दिवस परिधान करावा लागायचा. गोदादेवीची मध्यवर्ती कथा शुध्द प्रेमाचे प्रतिक आहे म्हणून नायिका या नात्याने महाप्रबंधाचे शीर्षक 'अमुक्तमाल्यदा' असे दिले गेले आहे.

**३) अमुक्तमाल्यदाची रचना :**

कृष्णदेवरायाचा अमुक्तमाल्यदा अर्थात विष्णुचित्तीय तेलगूच्या पाच महाकाव्यांपैकी एक होय. हे काव्य तेलुगू साहित्यावरील वैष्णवाच्या प्रभावाची सुरूवात दर्शवते. यामध्ये आलवर विष्णुचित्त (पेरिलावार) यांचे जीवन, वैष्णव तत्वज्ञानाविषयी त्यांचे स्पष्टीकरण आणि त्यांची दत्तक मुलगी गोदा आणि भगवान रंगनाथ यांच्यातील प्रेमाचे वर्णन आहे. शैली खोल गुंतागुंतीची असून उपमा दूरदूरपासून रेखाटलेल्या आहेत. हे जरी खरे असले तरी महाकाव्याचा प्रभाव जबरदस्त आणि उत्कृष्ट आहे. तेलगू भाषेमध्ये असा कोणताही ग्रंथ नसावा की ज्यात भावनांच्या सतत प्रवाहाने भाषेत इतकी वेगवान अभिव्यक्ती शोधण्याचा प्रयत्न केलेले आहे. मानवी स्वभावाबद्दल लेखकाची तीक्ष्ण दृष्टी स्पष्टपणे लक्ष्यित केली आहे.

कृष्णदेवराया रचीत अमुक्तमाल्यदा हे काव्य आणि गद्य यांचा सुरेख संघम घालून लिहिलेला प्रबंध आहे. गद्य परिच्छेद काव्यमय स्वरूपाचे आहेत. काव्यसौंदर्याने नव्हेतर अद्वितीय धार्मिक आणि राजकीय विषयीच्या कथानकांमुळे ते एक उच्च कोटीचा प्रबंध आहे. या प्रबंधात मुख्य कथेबरोबर त्यावेळच्या साहित्यिक परंपरेनुसार कृष्णदेवरायांनी सुरेख नगर वर्णने, ग्रामीण जीवन, विविध ऋतुंतील निसर्ग वर्णने आणि खांडीक्य केशीध्वज, यामुनाचार्य आणि माला दासरी यांच्या कथा गुंफलेल्या आहेत. उपकथानकात तत्वज्ञानविषयक वादविवाद अंतर्भूत आहेत. विष्णुचित्ताचा वादविवाद, खांडीक्य केशीध्वज या चुलत भावांतील संवाद, यामुनाचार्यांचा वादविवाद, ब्रह्मराक्षस आणि माला दासरी यामधील संवाद अतिशय रोचक पध्दतीने विविध पौराणिक दाखल्यांच्या माध्यमातून मांडलेला आहे. या प्रबंधात एकूण ८७५ पद्ये (पद्यालु) आणि गद्य परिच्छेदांचा (वचनालु) समावेश आहे.

**४) अमुक्तमाल्यदा ग्रंथ का लिहिला? :**

कृष्णदेवरायांने एक साहित्यिक म्हणून संस्कृत भाषेतून विविध ग्रंथ लिहिल्याचा उल्लेख सुरूवातीलाच केलेला आहे, मात्र त्यातील एकही ग्रंथ आज उपलब्ध नाही. कृष्णदेवरायांनी लिहिलेल्या संस्कृत भाषेतल्या

ग्रंथाव्यतिरिक्त अमुक्तमाल्यदा हा एकमेव ग्रंथ त्यांनी तेलगू भाषेतून लिहिला आहे. कारण कृष्णदेवरायांची मातृभाषा तुळु होती. अमुक्तमाल्यदा महाकाव्यची गणना तेलुगु भाषेतल्या पंचमहाकाव्यात होते. अमुक्तमाल्यदा हे महाकाव्य लिहायला त्यांना मिळालेल्या प्रेरणास्रोताविषयी ग्रंथाच्या प्रस्तावनेत स्पष्ट प्रतिपादन केलेले आहे. कलिंगच्या मोहिमेवर असताना श्रीकाकुलम येथील साक्षात आंध्र महाविष्णू त्यांच्या स्वप्नात दृष्टांत देऊन हे महाकाव्य त्यांना तेलगू भाषेतून लिहायला सांगतात असा उल्लेख आहे. अमुक्तमाल्यदाच्या प्रास्ताविकेत लिहिल्याप्रमाणे श्री कृष्णदेवरायांच्या स्वप्नात साक्षात आंध्र महाविष्णू येऊन त्यांना श्रीरंगम येथील आंडाल उर्फ गोदाबरोबर झालेल्या त्यांच्या विवाहासंदर्भातील घटनेचे वर्णन करणारे काव्य लिहा असा आदेश दिल्यापासून ते थेट श्रीरंगम येथील विवाह सोहळ्याचे वर्णनापर्यंतचा हे महाकाव्य आहे.

तेलुगुदेलयन्ना, देशंबु तेलुगेनु
तेलुगु वल्लभुंडा तेलुगोकंडा
येल्ला नृपुलू गोलुव नेरूगवे बासाडी
देशभाषलंदु तेलुगु लेस्सा!

(अर्थ : तुम्ही म्हणाल, तेलुगु भाषेतून कशासाठी? हे तेलुगु राज्य आहे, मी तेलुगु लोकांचा राजा आहे, तेलुगु भाषा फार गोड आहे,तुमच्या सेवेतल्या राजांशी संभाषण करताना, देशांतील सर्व भाषांमध्ये तेलुगु सर्वोत्तम आहे हे तुमच्या लक्षात आले असेलच.)

**५) अमुक्तमाल्यदाचा मुख्यगाभा विषय :**

अमुक्तमाल्यदामध्ये एकूण चार कथा असून त्या एकमेकांशी संबंधित आहेत. मुख्य कथा पारंपरिक पुराणातून घेतलेल्या आहेत. पहिली कथा यमुनाचार्याच्या विष्णू भक्तीबद्दलची आहे. या कथेमध्ये गोदादेवी आणि श्रीरंगम येथील श्रीविष्णू यांच्यातील प्रेम आणि विवाहाचे श्रृंगारिक वर्णन करतो. पांड्य राज्यातील श्रीविल्लीपुत्तुर येथील विष्णुचित्त याची मुलगी गोदादेवीच्या विष्णूभक्तीचे वर्णन आहे.

श्रीविल्लीपुत्तर येथील विष्णूचित्त हा देवाच्या आज्ञेवरुन मदुरा येथे जावून तेथे वादविवादात भाग घेतो. तो वाद जिंकून वैष्णव पंथाचे श्रेष्ठत्व सिद्ध करतो. वाद घालताना तो विष्णूपुराणातील खंडिक्य आणि केसीध्वजाची कथा सांगतो अशी दुसरी कथा आहे.

तिसरी कथा यमुनाचार्याचीी असून तो कट्टर शिवभक्त पांड्य राजासमोर वादविवाद करतो आणि जिंकतो. राजा त्याला याबदल्यात आपले अर्धे राज्य व आपली बहिण विवाहासाठी देतो. यमुनाचार्या राजा झाल्यानंतर त्याचे सर्व ज्ञान विसरुन संसारात रममान होतो, मात्र पुढे राम मिश्रा नावाचा विष्णूभक्त यमुनाचार्याचे मन वळवतो आणि खरी संपत्ती श्रीविष्णूच्या चरणी असल्याचे पटवून देतो. यमुनाचार्याला श्री विष्णुचे दर्शन घडते आणि त्याला पश्चाताप होतो. आपले राज्य तो मुलाकडे सोपवतो. यमुनाचार्य आपल्या मुलाला राज्य सोपवताना राजनीतीविषयक उपदेश देतो. हे उपदेश म्हणजेच कृष्णदेवरायाचे विचार आहेत.

चौथी कथा ही माला दासरी या अस्पृश्य विष्णुभक्ताची आहे. दासरीची अपार विष्णुभक्ती आणि त्याने ब्रम्हराक्षसाला दिलेली मुक्ती हा विषय आहे.

**६) अमुक्तमाल्यदामधील राज्यकारभार विषयक विचार :**

कृष्णदेवरायाने अमुक्तमाल्यदामध्ये या मुनाचार्य राजत्याग करून आपल्या वारसाकडे राज्य सोपविताना सांगितलेल्या राजनीती सूत्राद्वारे कृष्णदेवरायांने राज्यशास्त्राच्या विविध पैलूंची मिमांसा केली आहे, राजाचे वर्तन कसे असावे, आपल्या अधिकाऱ्याची निवड कशी करावी, दोषी व्यक्तींना शासन कसे करावे, दोषी व्यक्तींना शासन करताना काय धोरण ठेवावे, धनसंपत्तीचा विनियोग कसा करावा, व्यापारउद्दिमाला कशी चालना द्यावी, परदेशी व्यापाऱ्यांना कसा आणि किती वाव द्यावा अशा विविध महत्त्वाच्या बाबींची चर्चा स्वानुभवावर केलेली आहे.

**१) राजाची कर्तव्य :**

राजाचे प्रमुख कर्तव्य लोककल्याण असले पाहिजे यावर तो भर देतो आणि लोककल्याणासाठी राजाला कितीही त्रास झाला तरी त्याने तो सहन केला पाहिजे याचा पुरस्कार करतो. गरीब व पीडित लोकांचे दुःख दूर करण्यासाठी राजाने सदैव प्रयत्नशील असले पाहिजे. लोकांची गा-हाणी केव्हाही व कुठेही ऐकून घेतली पाहिजेत. प्रशासकांमध्ये निकोप स्पर्धा निर्माण करण्यासाठी राजाने जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत. आपल्या राज्यातील सर्वठिकाणी लोकवस्ती कशी निर्माण करता येईल ते पहावे. ज्या ठिकाणी लोकवस्ती जास्त असेल तर ती दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित करून दुसऱ्या रिकाम्या जागेमध्ये हलवावी. राजाने खर्च करताना काळजीपूर्वक करावा. आपल्या खर्चाचे चार भाग करून एक भाग स्वत:साठी व दानधर्मासाठी, दोन भाग सैन्याच्या खर्चासाठी आणि चौथा भाग खजिन्यात ठेवावा.

**२) राजाने काय करावे, काय करू नये :**

अमुक्तमाल्यदामध्ये राज्यकारभारची चर्चा करताना राजाने काय करावे अथवा काय करु नये या संबंधी विस्तृत माहिती दिलेली आहे. राजाने प्राप्त झालेली माहिती प्रमाणित केल्याशिवाय त्यावर विश्वास ठेवू नये, कृतघ्न आणि विश्वासघातकी माणसांशी संगत करु नये, हितशत्रूंना दूर ठेवावे, शूद्र मनोवृत्तींच्या लोकांना दूर ठेवावे, पर स्त्री, जुगार आणि शिकार यापासून दूर रहावे. शिक्षा देताना पूर्ण विचारांती आणि सर्व पुरावे तपासून शिक्षा द्यावी. राजाने प्रजेला क्रूर शिक्षा देऊ नयेत. एखाद्या व्यक्तिला फाशीची शिक्षा द्यायची असेल तर त्याला दोनवेळा क्षमा करावी. राजाने कोणात्याही व्यक्तीला विनाकारण दुख:वू नये, कारण कोणाची गरज केव्हा पडेल याचा नेम नाही याचा विसर पडू देवू नये.

**३) सल्लागार आणि मंत्री यांची नेमणूक :**

राज्यकारभार व प्रशासनामध्ये सल्लागार व मंत्री महत्वाची भूमिका निभावतात, त्यामुळे राजाने सल्लागार आणि मंत्र्यांची नेमणूक करताना त्यांचा वयाचा विचार करावा. नेमलेल्या व्यक्तिला सत्तेचा लोभ नसावा. राजाने सल्ला घेताना एका वेळी फक्त एकाचाच सल्ला घेऊ नये, कारण अशाने एकाच व्यक्तीचे प्रशासनातील महत्त्व

वाढीस लागते आणि अशा व्यक्तीला लोक लाच देऊन आपली कामे करवून घेतात. प्रशासक नेमताना तो नेहमी लोकाभिमुख असला पाहिजेत याची दक्षता घ्यावी, तो अशिक्षीत, खोटारडा, लोकमतांची पर्वा न करणारा असू नये अथवा परदेशी व्यक्तींच्या नेमणूका करू नये. नव्याने नेमलेल्या अधिकाऱ्याला राजाने लगेच आपल्या जवळ करू नये. कारण राज्यातील गुप्त घडामोडी बाहेर जाण्याची शक्यता असते. कोणतीही व्यक्ती कितीही कर्तृत्ववान असली तरी लगेचच उच्च पदावर नेमू नये अथवा एकद्याची नेमूक केल्यानंतर तडकाफडकी त्याला काढू टाकू नये. राजाने व्यक्तींची पारख करून त्यांना टप्प्याटप्प्याने वरच्या पदावर नेमणूक द्यावी.

**४) जमीन, पाणीपुरवठा आणि महसूल :**

अमुक्तमाल्यदामध्ये जमीन, महसूल, पाणी पुरवठा, शेतकरी यासंबंधी विस्तृत चर्चा केलेली आहे. राज्याच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन जमीन महसूल असले तरी राजाने फार कमी जमीन महसूल लावावा. गरीब शेतकऱ्यांना जमीन महसुलात सूट द्यावी. शेतकरी काही कारणामुळे जर परागंदा झाला असेल तर त्याला परत बोलवावे व त्याच्या जमिनीचे पुनरूज्जीवन करावे. राजाने अधिकाधिक जमीन लागवडीखाली आणण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. शेतीसाठी पाणीपुरवठ्याची उत्तम सोय करावी म्हणजे जमीन महसूल मोठ्या प्रमाणावर सरकारला प्राप्त होईल. जसे की तलाव, कालवे इत्यादी जलसिंचनाच्या योजना आपल्या राज्यात राबविण्यात याव्यात. गरजूं शेतकऱ्यांना जमिनी भाडेतत्वावर द्याव्यात आणि त्यांच्याकडून उत्पन्नाचा अर्धा भाग महसूल म्हणून घ्यावा. महसूल जमा करणारे अधिकारी नियुक्त करताना एका व्यक्तीकडे एक जबाबदारी द्यावी. ज्यामुळे अफरातफर होणार नाही.

**५) सैन्य, संरक्षण आणि युद्ध :**

अमुक्तमाल्यदामध्ये राज्याच्या सैन्य आणि संरक्षणासंबंधी सविस्तर माहिती दिलेली आहे. राज्याचे संरक्षण हे राजाचे परम कर्तव्य आहे आणि राजाने राजधर्माप्रमाणे आचरण केलेच पाहिजे. शेतकरी ज्याप्रमाणे शेताला कुंपण घालून, तण काढून, शेतीचे रक्षण करतो त्याप्रमाणे राजाने आपल्या प्रजेचे रक्षण केले पाहिजे असे नमूद केले आहे. खर्चाची तमा न बाळगता राजाने उत्तम सैन्य बाळगलेच पाहिजे. उत्कृष्ट पायदळ, उत्तम घोडदळ, हत्तीदळ हवे, शस्त्रांस्त्रे इत्यादीची निर्मिती केली पाहिजे. राजाने हेरांचे उत्तम जाळे निर्माण करून त्यांना अनेक भाषांत परगांत करावे, त्यांना कुठेही राहण्याची, उपाशी राहण्याची सवय असावी. राजाने युद्धनीतीचे पालन करावे.

**६) अंतर्गत धोरण :**

अंतर्गत आणि बाह्य शत्रूवर सदैव लक्ष ठेवण्यासाठी राजाने सदैव जागरुक असले पाहिजे. ज्याप्रमाणे झाडावर झोपलेले अस्वल आपला एक डोळा बंद करते व दुसरा उघडा ठेवते त्याप्रमाणे राहावे. राजाने राजविलासात मग्न राहू नये. आपल्या अंतर्गत व बाह्य शत्रूवर राजाने सतत लक्ष ठेवले पाहिजे. पैशामुळेच सर्व प्रश्न सुटतात असे नाही, चांगली माणसं सोबत असणे गरजेचे असते. आपल्या संबंधितांना सदैव आनंदात ठेवावे कारण असमाधानी माणसं सापापेक्षा धोकादायक असतात.

**७) परराष्ट्र धोरण :**

अमुक्तमाल्यदामध्ये राज्याच्या परराष्ट्रधोरणा संदर्भात चर्चा केलेली आहे. राजाने परराष्ट्रीय धोरण मित्रत्वाचे ठेवावे, परकीय वकिलांना सन्मान द्यावा. सीमेवरील आदिवासी जमातींशी युद्ध न करता त्यांच्याशी मैत्रीपूर्ण संबंध ठेवावेत. ज्यावेळी राजाचे सैन्य युद्धात गुंतलेले असते त्यावेळी ते लुटालुट करुन स्वत:चा खर्च भागवतील. शत्रू जर संधीसाठी आला तर त्याचे व्यवस्थित ऐकून घ्यावे आणि मगच निर्णय घ्यावा.

**८) परकीय व्यापारी धोरण :**

राज्याचा व्यापार वाढ करण्यासाठी परकीय व्यापारी अथवा परकीय लोक महत्वाचे असतात, त्यामुळे परकियांना राज्यातून लगेच हाकलून देऊ नये. उलट त्यांचे स्वागत केले पाहिजे. उत्तम घोडदळासाठी परकीय व्यापाऱ्याना सदा खुश ठेवावे आणि घोड्यांच्या व्यापारावर आपली मक्तेदारी निर्माण करावी. परराज्यातील व परकीय व्यापाऱ्यांचे स्वागत करून त्यांना संरक्षण द्या, त्यांना घरे आणि व्यापारासाठी जागा दिल्या पाहिजेत.

**९) नैसर्गिक संपती :**

नैसर्गिक संपत्ती राज्याच्या समृद्धीसाठी महत्वाची असते असे अमुक्तमाल्यदामध्ये नमूद केले आहे. जसे की खाणी हे राज्याचे महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन असते. राजाने तज्ञांच्या सहाय्याने अशा खाणींचा सतत शोध घ्यावा. नैसर्गिक खाणीप्रमाणेच जंगले हेही एक महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन असते. राजाने त्यासाठी वृक्षलागवडीसाठी सदा प्रयत्नशील असावे. जंगले स्वच्छ राखली पाहिजेत आणि त्यांची सतत काळजी घेतली पाहिजे.

थोडक्यात: अमुक्तमाल्यदा हा ग्रंथ आपल्याला कृष्णदेवरायाच्या राजपद व राजनीतीच्या संकल्पना समजून घेण्यासाठी एक महत्वाचे साधन आहे. विजयनगरकालीन प्रशासन कसे चालत होते, मंत्री, सल्लागार यांच्या नेमणूका कशा केल्या जात, उत्पन्नाची साधने कोणकोणती होती, प्रजेसाठी राजाने कोणकोणत्या कल्याणकारी योजना राबवाव्यात इ. संबंधीची विस्तृत माहिती मिळते. सर्वात महत्वाचे म्हणजे एक उत्तम राजा, एक प्रशासक, सेनापती बरोबर एक उत्तम दर्जाचा साहित्यिक म्हणूनही कृष्णदेवरायाचे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर उभे राहते.

● **स्वय अध्ययन प्रश्न क्र. १**

**रिकाम्या जागा भरा.**

१) ऐतिहासिक घटिते पुरावा निर्माण करततात व हेच पुरावे ऐतिहासिक ज्ञानाचा आधार ठरतात असे ................. याने म्हंटले आहे.

२) तुघलक घराणे ............... कालखंडात सत्तेवर होते.

३) तारीख-ए-फिरोजशाहीचा लेखक ................ हा आहे.

४) बर्नीचा जन्म .............. घराण्यामध्ये झाला.

५) बर्नी मुहंम्मद बिन तुघलकाकडे ........... पदावर कार्यरत होता.

६) बर्नी ........... पंथीय होता.

७) कृष्णदेवरायाच्या काव्यग्रंथाचे नाव .............. आहे.

८) अमुक्तमाल्यदा हा काव्यग्रंथ ......... या भाषेत लिहिला आहे.

९) कृष्णदेवरायांची मातृभाषा .......... होती.

१०) अमुक्तमाल्यदाची कथा नायिका ......... आहे.

### १.२.२ पुरातत्वीय साधने (स्मारके वगळून) : (Archaeological sources) :

लिखित साधनांच्या बरोबर शिलालेख, ताम्रपट, स्तंभालेख, नाणी, मूर्ती, भांडी, चित्रे, इमारतीचे अवशेष व भिंतीचित्रे यासारखी भौतिक साधने इतिहासलेखनासाठी उपयुक्त ठरतात. वरील विविध साधनांच्यावरून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकता येतो. १८ व्या शतकात सर विल्यम जोन्स यांनी भारतात पुराणवस्तू संशोधनाची सुरुवात करून संशोधकांना इतिहासाचा अमूल्य ठेवा उपलब्ध करून दिला. सुलतानशाही कालखंडातील (इ.स. १२०६ ते १५२६) इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी वाङ्मयीन साधने (लिखित) उपलब्ध आहेत. अर्थात या लिखित साधनांच्या तुलनेने सुलतानशाही कालखंडातील पुरातत्त्वीय साधने कमी आढळतात. हे जरी खरे असले तरी ही साधने वाङ्मयीन साधनापेक्षाही विश्वासार्ह असतात आणि आहेत. या साधनांमधून प्राप्त झालेली माहिती वस्तुनिष्ठ असल्याने याच्या मदतीने इतिहासाचे विश्लेषण करणे सोपे जाते. या कालखंडातील शिलालेख, ताम्रपट, नाणी, राजवाडे व गढ्या, किल्ले, शस्त्रास्त्रे, वस्त्रे, अलंकार, चित्रे, नकाशे व काष्ठशिल्प इत्यादींचा प्रामुख्याने पुरातत्त्वीय साधनांमध्ये समावेश होतो.

इतिहासलेखनासाठी अलिखित म्हणजे पुरातत्वीय साधनांना पुरावा म्हणून विशेष महत्वाचे स्थान आहे. कारण लिखित साधनांच्यामध्ये फेरफार अथवा बदल केला जावू शकतो. मात्र पुरातत्वीय साधनांमध्ये ते शक्य नसते. लिखित साधनांच्या प्रमाणे ही साधने जरी बोलकी नसली तरी लिखित साधनांच्यामध्ये जी पोकळी किंवा उणीव राहीलेली असते ती भरून काढण्यासाठी अथवा ज्या काळातील अथवा घटनेशी संबंधीत लिखित साधने उपलब्ध होवू शकत नाहीत त्यावर प्रकाश टाकण्यासाठी पुरातत्वीय साधने विशेष महत्वाची असतात. समकालीन घटना व वाटचालीचा तो पुरावा असतो.

इतिहासपूर्व व प्रागैतिहासिक कालखंडाच्या संदर्भात पुरातत्वीय साधने महत्वाची ठरतात. या पुरातत्वीय साधनांना 'भौतिक' साधने असेही संबोधले जाते. पुरातत्वीय साधने प्रत्यक्ष घटना स्थळावर किंवा विविध ठिकाणच्या संग्रहालयामध्ये संवर्धीत केलेली पहावयास मिळतात. पुरातत्वीय साधने समकालीन असल्याने ती अधिक विश्वसनीय व उपयुक्त मानली जातात. उत्खननात सापडणारे अवशेष एखादी वस्ती, गाव, नगर, किल्ल्याचे अवशेष, मंदिराचे अवशेष इत्यादी स्वरुपातील असतात. पुरातत्वीय साधने म्हणजे पुरावे एकतर जमिनीवर उपलब्ध असतात अथवा जमिनीच्या खाली गाडलेल्या अवस्थेत असतात आणि ते उत्खनणात

सापडतात. याशिवाय नदीच्या पात्रात अथवा नदीच्या खोऱ्यात देखील पुरातत्वीय अवशेष सापडतात. अशा अवशेषांचा अभ्यास पुरातत्वशास्त्रात केला जातो

**१) पुरातत्व/ पुरातत्वशास्त्र म्हणजे काय :**

इतिहासपूर्व व प्रागैतिहासिक काळाच्या इतिहास लेखनासाठीची माहिती अथवा साधने यांच्या माध्यमातून प्राप्त होतात. अतिप्राचीन ते मध्ययुगीन काळातील काही माहिती लिखित स्वरूपात प्राप्त होत नाही. शास्त्राचा आधार घेवून समकालीन विविध वस्तू व अवशेषांचा अभ्यास करुन इतिहासलेखन केले जाते. स्थूलमानाने 'पुरातत्वशास्त्र' म्हणजे 'मानवाच्या उत्पत्तीचे विश्लेषण'असा अर्थ होतो. हजारो वर्षापूर्वी विविध कारणांच्यामुळे मानवी संस्कृती स्थलांतरीत झाल्या, काळाच्या ओघात नष्ट झाल्या अथवा गाडल्या गेल्या. त्यांच्या बरोबर त्यांनी निर्माण केलेल्या भौतिक वस्तूसुध्दा काळाच्या ओघात गडप झाल्या. पुरातत्वशास्त्रामध्ये या प्राचीन संस्कृतीचा शोध घेणे, उत्खनन करुन पुरातत्वीय वस्तूचे संकलन करणे व प्राप्त पुरातत्वीय वस्तूच्यांवर शास्त्रीय पध्दतीने प्रक्रिया करुन मानवी संस्कृतीच्या अस्तित्वाचे व विकासाचे एक साधन म्हणून त्याचे जतन करण्याचे कार्य केले जाते. पुरातत्वशास्त्रात तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय घटकांचा अभ्यास केला जातो. उत्खनन झालेल्या प्रदेशातून किंवा ठिकाणामधून ज्या वस्तू प्राप्त होतात त्या वस्तूना 'पुरातत्वीय वस्तू' (Archaeological Artifacts) असे म्हणतात. गॅहम क्लार्क या पुरातत्व इतिहास संशोधकाने आपल्या "Archaeology and Society' ग्रंथामध्ये पुरातत्वीय वस्तूचे महत्व विशद करताना असे म्हटले आहे की, 'भूतकाळातील मानवी जीवनाची घडण जाणण्यासाठी केलेला अवशेषांचा पध्दतशीर व शास्त्रीय अभ्यास म्हणजे पुरातत्व होय.' तर "Archaeology in the field' या ग्रंथात मानवी सभ्यतेला भूतकाळातील स्वरुपाचा अभ्यास करणारे शास्त्र म्हणजे पुरातत्व अशी व्याख्या केलेली आहे. सर मार्टिमर व्हीलर यांच्या मते पुरावशेषांचे उत्खनन करणारा हा केवळ वस्तूचे उत्खनन करत नसतो तर तो भूतकाळातील लोकांचे, लोकजीवनाचे उत्खनन करीत असतो.

भारतामध्ये पुरातत्वशास्त्राचा अभ्यास १८ व्या शतकामध्ये सुरु झाला. सन १७८४ मध्ये एशियाटीक सोसायटीची स्थापना झाली. या सोसायटीच्या माध्यमातून युरोपीय अभ्यासकानी प्राचीन भारतीय संस्कृतीच्या अभ्यासास चालना दिली. भारतामधील पुरातत्वशास्त्रास चालना देण्यामध्ये सर विल्यम जोन्स, जॉन मार्शल, अलेक्झांडर कनिगहॅम, जेम्स बर्जेस, लॉर्ड कर्झन, सर मार्टिमर व्हीलर इत्यादी ब्रिटिश तर राखालदास बॅनर्जी व माधवस्वरुप वत्स या भारतीय संशोधकानी महत्वाची भूमिका बजावलेली दिसते. आलेक्झांडर कनिगहॅम यांना 'भारतीय पुरातत्व संशोधनाचे जनक' म्हणून संबोधले जाते. लॉर्ड कॅनिग यांच्या काळात सन १८६१ मध्ये 'भारतीय पुरातत्व सर्वेक्षण' खात्याची स्थापना झाली. (Archaeological Survey of India)

**२) परातत्वीय साधनांचे प्रामुख्याने दोन प्रकारात वर्गीकरण केले जाते -**

१) पुरातत्वीय वस्तू:

२) पुरातत्वीय वास्तू:

अभ्यासाच्या दृष्टीकोणातून जरी वरीलप्रमाणे दोन प्रकारात वर्गीकरण केले जात असले तरी खालील प्रमाणे पुरातत्वीय साधने आढळून येतात.

पुरातत्वीय साधने

- अ) पुराणवस्तू (उत्खनित अवशेष)
  - वस्तू अवशेष
    - अलंकार/आभूषणे
    - धातू व मातीची भांडी
    - शस्त्रास्त्रे
    - शेतीची अवजारे
    - वजन/मापे
    - नाणी व मुद्रा
    - मानवी/ प्राण्याचे सांगाडे
    - मुर्त्या
  - वास्तू अवशेष
    - स्मारके
    - धार्मिक स्थळे/ मंदिरे
    - वाडे
    - किल्ले
    - नगरांचे अवशेष
    - स्तूप/ विहार
    - लेण्या, गुहा
    - शिल्पावशेष/स्मृतीशिला
- ब) आलेख (अभिलेख)
  - शिलालेख
    - प्रस्तरलेख
    - स्तंभालेख
    - गुहालेख
  - ताम्रपट

पुरातत्वीय वस्तू अथवा वास्तूच्या स्वरुपात जी साधने उपलब्ध होतात त्यांच्यामधून इतिहासाच्या पाऊलखुणा आढळतात. या वस्तू अथवा वास्तूच्या माध्यमातून अभ्यासकास तत्कालीन सामाजिक, सांस्कृतिक,

धार्मिक, आर्थिक व राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकणे शक्य होते. यामधील काही प्रमुख साधनांचा या ठिकाणी अभ्यास करावयाचा आहे.

**३) पुराणवस्तू/ उत्खनित अवशेष :**

मानवी संस्कृती व मानवी विकासाचे भूतकालीन अवशेष होतात त्याला उत्खनित अवशेष असे म्हणतात. मानवी जीवनातील विविध प्रकारच्या नित्योपयोगाच्या वस्तू म्हणजे गतकालीन समाज जीवनाचा एकप्रकारे आरसा असतो. ज्या वस्तूच्या माध्यमातून समकालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवनाचे चित्र प्रतिबिंबीत झालेले असते. ज्या ठिकाणी उत्खनन होते त्या उत्खननामध्ये तत्कालिन संस्कृती अथवा वसाहतीचे विविध थर आढळतात. या थरांच्यामध्ये विविध प्रकारच्या मानवी वापरातील वस्तू आढळतात. यामध्ये भांडी, खापरे, अलंकार, शस्त्रास्त्रे, खेळणी, मणी, कलाकुसरीच्या वस्तू, मानवी सांगाडे, विविध प्राण्याचे सांगाडे, धार्मिक साहित्य, मुर्त्या अशा कितीतरी प्राप्त वस्तूच्यावरून त्या थरांचा कालखंड निश्चित करता येतो. तत्कालीन संस्कृतीचे आकलन होण्यास मदत होते. उत्खननात प्राप्त मानवी व प्राण्याचे सांगाडे यावर रासायनिक प्रक्रिया कार्बन १४ व रेडिओ कार्बन रासायनिक प्रक्रिया करून त्यांचा काळ, वय, वंश त्यांच्या मृत्यूचे कारण, प्राण्याचे प्रकार इत्यादी अवगत होण्यास मदत होते.

उत्खनीत अवशेषामध्ये प्राप्त झालेली मातीची भांडी अथवा खापरे अतिशय महत्वाची असतात. असे म्हटले जाते की, मातीची खापरे ही पुरातत्व विद्येची मुळाक्षरे आहेत. मातीची भांडी मानव हजारो वर्षापासून वापरत आहे, परंतु ते बनविण्याचे तंत्रज्ञान प्रत्येक देशात वेगवेगळे असलेले आढळते. या मातीच्या भांड्यावरून व त्यावरील चित्रकलाकृतीवरून तत्कालीन मानवी संस्कृती, जीवनमान, व्यवसाय, कलात्मक जीवन, इत्यादी प्रकाश पडतो. शेतीची अवजारे, शिकारीसाठी वापरली जाणारी हत्यारे व युध्दातील विविध शस्त्रास्त्रे यावरून तत्कालिन कृषक जीवन कशाप्रकारे होते, तो कशाप्रकारची शेती करित असावा किंवा शेतीचे तंत्रज्ञान काय असावे या संबंधी माहिती मिळते. शिकारीच्या हत्यारा वरुन आदिम अवस्थेपासून मानवी जीवनात झालेला बदल शिकारीच्या पध्दती व हत्यारावरून तो कशाप्रकारे व कोणत्या प्राण्याची शिकार करीत असावा या संबंधी माहिती मिळते. विविध प्रकारची हत्यारे व शस्त्रास्त्रामधून धातू व तंत्रज्ञानात झालेला बदल अभ्यासण्यास मदत होते.

उत्खनीत अवशेषामध्ये दैनंदिन वापरातल्या असंख्य वस्तू प्राप्त होतात. यामध्ये सौंदर्य प्रसाधने, धान्याचे कण, बांगड्या, अलंकार, खेळणी इत्यादी स्वरूपाच्या अनेक वस्तू आढळून येतात. दैनंदिन वापरातल्या वस्तूतून सामान्य माणसाचा इतिहास रेखाटला जाऊ शकतो. सामान्य माणसापासून ते राजे-रजवाड्यापर्यंतच्या वस्तू उत्खननातून प्राप्त होतात. मुलांच्या खेळण्यावरून तत्कालीन दळणवळणाच्या साधनांची कल्पना येवू शकते. विविध प्रकारच्या अलंकारातून त्या-त्या काळातील कलात्मकता कळते, शिवाय ते अलंकार विशिष्ट काळाचा निर्देश करणारे असतात. कारण कलाकुसरीचाही विशिष्ट काळातील एक पोत असतो, यामधून तत्कालिन सांस्कृतिक इतिहास कळतो.

**४) शिल्पावशेष :**

प्राचीन काळापासून भारतात अस्तित्वात आलेल्या मूर्ती, कला अवशेष, चित्रकलेला पाश्चात्य अभ्यासकांनी इतिहासाचे एक साधन म्हणून पाहिलेले आहे. या अवशेषावरून त्यांनी भारतीय कला परंपरांचा इतिहास शोधला. कलेची वैशिष्ट्ये जगासमोर आणली. शिल्पावशेषांच्या माध्यमातून इतिहास, मुर्तीशास्त्र, कला, अभिव्यक्ती इत्यादीची समीक्षा या अवशेषांच्या माध्यमातूनच केलेली आहे. इतिहासाचे एक साधन म्हणून या शिल्पावशेषाला महत्त्व आहे. शिल्पावशेषात मूर्तिशास्त्राचा चित्रपरंपरेचा अभ्यास केला. त्यातून सामान्य जीवन, केशभूषा पध्दती, वेशभूषा पध्दती, अलंकारभूषणे, वापरात असलेली निरनिराळी मापे इत्यादी अभ्यास केलेले आहे. अभिव्यक्तीची अनेक माध्यमे आहेत. यामधील शिल्पकला हे ही एक आहे. या कलाअभिव्यक्तिमध्ये तत्कालीन समाजाचे प्रतिबिंब सहजपणे उतरलेले दिसते. त्या दृष्टीकोणातून शिल्पकला किंवा त्याचे अवशेष तत्कालीन समाजाच्या व्यवहाराचे महत्वपूर्ण पुरावे ठरतात. या पुराव्यांच्या माध्यमातून तत्कालीन समाजजीवनाचा इतिहास रेखाटला जाऊ शकतो. चित्र रेखाटणे किंवा दैनंदिन जीवनातील प्रसंग दगडावर कोरून ठेवणे ही मानवी प्रवृत्ती संपूर्ण जगभर पहावयास मिळते. म्हणूनच हे अवशेष विस्मरणीय व अस्सल दर्जाचा पुरावा मानला जातो.

**६) शिलालेख :**

शिलालेख, ताम्रपट, नाणी ही इतिहास लेखनाच्या दृष्टिकोणातून महत्वाचे साधन आहे. इतिहासाचे अस्सल साधन म्हणून यांचा खूपच उपयोग होतो. प्राचीन भारताच्या तुलनेत मध्ययुगीन कालखंडात आढळणाऱ्या शिलालेखांचे प्रमाण फारच कमी आहे. सदरचे शिलालेख किल्ले, राजवाडे, पडक्या इमारती, कबरी आणि देवालयावर आढळतात. शिलालेखावरून सुलतानांची नावे, कालखंड, राज्याच्या सीमा इत्यादींची संबंधी माहिती मिळते. यामधून तत्कालीन प्रशासकीय, आर्थिक व सामाजिक, आर्थिक इतिहासाशी संबंधीत माहिती प्राप्त होते.

सुलतानशाही व विजयनगरकाळाशी संबंधित शिलालेखांचा अभ्यास खालील ग्रंथांच्यामधून झालेला आहे. डॉ. अली असगर हिकमत इशिराजी यांनी संपादित केलेले 'एपिग्राफिया इंडो-मुस्लामिका' (Epigraphia Indo-Muslemia) मध्ये ऐतिहासिक स्मारकावरील फार्शी शिलालेख पाहावयास मिळतात. भारतीय पुरातत्व सर्वेक्षण खात्याने प्रकाशित केलेले 'एपिग्राफिया इंडिका' (EpigraphiaIndica) हेही महत्वाचे साधन आहे. बेंजामिन लुईस राईस यांनी संपादित केलेले 'एपिग्राफिया कर्नाटिका' (Epigraphia Karnatica) हे ही महत्वाचे साधन आहे, याचे १२ खंड असून यामध्ये १००० शिलालेख प्रसिद्ध केलेले आहेत. कोंडबीडूचे रेड्डी, तेलगू चोल, तेलग पल्लव, वेलांदडू चोल यांचे शिलालेख व ताम्रपटही महत्त्वाचे असून ते 'एपिग्राफिया इंडिका', 'द इंडियन अॅन्टीक्वेरी', 'आंध्र पत्रिका' आणि 'जर्नल ऑफ तेलगू अॅकॅडमी' मधून प्रसिद्ध करण्यात आलेले आहेत. काही शिलालेख व ताम्रपट मॅकेन्झी संग्रह आणि सी. पी. ब्राऊनच्या 'लोकल रेकॉर्डस्' मध्येही समाविष्ट करण्यात आलेले आहेत. मल्याळम्मधील शिलालेख 'त्रावणकोर आर्किलॉजिकल सिरीज', 'राम वर्मा रिसर्च इन्स्टिट्यूट बुलेटीन', 'केरळ, सोसायटी पेपर्स', 'साऊथ इंडियन इन्स्क्रिप्शन्स', 'इंडियन ॲंटिक्वेरी',

'एपिग्राफिया इंडिका', 'इंडियन हिस्टॉरिकल क्वार्टरली ॲन्युअल रिपोर्टस् ऑफ साऊथ इंडियन एपिग्राफी' यामधून प्रकाशित व संग्रहित करण्यात आलेले आहेत.

शिलालेखांच्यामधून सामाजिक व आर्थिक इतिहासाविषयी बरीच माहिती मिळते. जमीन महसूल, कर आकारणीची पद्धत, व्यवसाय करांची माहिती, मालाच्या जलवाहतुकीवरील कर, पाण्यांवरील कर, व्यापारी संघांची माहिती, विविध जाती आणि जमाती, निरनिराळे धार्मिक उत्सव, समारंभ अशा विविध गोष्टींची माहिती मिळते. वा. सी. बेंद्रे यांनी "A Story of Muslim Inscriptions' हा ग्रंथ लिहिला असून ग्रंथामध्ये मध्ययुगीन भारतातील उपलब्ध आलेख, शिलालेख, ताम्रपट यांची टिपणासह क्रमबद्ध माहिती देण्यात आली आहे.

राजस्थानमधील १५ व्या शतकातील कुंभलगड शिलालेखांमधून तत्कालीन गावे, किल्ले, आश्रमसंस्था, तुलादान, पाठशाळा, शिवरात्री व वसंतोत्सव यासारख्या गोष्टींबद्दल माहिती मिळते. तेलंगणामधील वारंगळ जिल्ह्यातील हनमकोंडा येथील तेलगू भाषेतील हजार खांबांचा शिलालेख, गणपती देव याचा मोटुपल्ली काकतीय शिलालेखातून मध्ययुगीन आंध्र प्रदेश, सागरी व्यापार व आर्थिक बाबींची माहिती मिळते. केरळमधील मंदिरांमध्ये अनेक शिलालेख आढळतात. या आलेखामधून विविध आर्थिक बाबींवर प्रकाश पडतो. या शिलालेखांच्या आधारे केरळमधील सरंजामशाहीचा उदय व विस्तार याचा अभ्यास प्रा. एलामकुलम पी. एन. कुंजन पिळ्ळई यांनी केला आहे. जमीन मालमत्ता व राजकीय सत्ता यावरील ब्राह्मणांचे वर्चस्व, समाजव्यवस्था आणि सोन्याऐवजी नाण्यांचा वाढता उपयोग याची माहिती या आलेखातून मिळते.

**७) ताम्रपट/अभिलेख :**

ताम्रपट हा भौतिक साधनाचा महत्त्वाचा भाग आहे. तांब्याच्या पत्र्यावर कोरलेला लेख म्हणजे ताम्रपट अथवा ताम्रशासन होय. इतिहासलेखन व पुनर्लेखनासाठी अतिशय उपयुक्त व विश्वसनीय साधन म्हणून याचा उपयोग होतो. ताम्रपटावरील नोंदी स्पष्टपणे व नि: सदिग्धपणे, कोणतीही खाडाखोड न करता केलेल्या असतात. या लेखामधून धर्माज्ञा, धर्मोपदेश, राजज्ञा, राज्यकृत्ये, राजसूती, आज्ञापत्रे, वतनपत्रे, नीतीतत्वे, पदव्या, वंशावळी इत्यादी संबंधी माहिती कोरलेली आढळते. विजयनगर साम्राज्याची माहिती मिळविण्यासाठी तर शिलालेख, ताम्रपट व नाणी हे अत्यंत महत्त्वाचे साधन आहे. विजयनगर काळात चार प्रकारचे आलेख होते. 'शासनम्', 'जयपत्रम्', 'आज्ञापत्रम्' आणि 'प्रज्ञापत्रम्'. साधारणत: जमीन दान देण्यासाठी शासनम् दिले जात असे. यांची नोंद दगडांवर, भिंतीवर अथवा ताम्रपटावर केली जात असे. कायदेशीर बाबींमध्ये दिलेले निर्णय जयपत्रम्मध्ये, सरकारी अधिकाऱ्यांना दिलेल्या राजाज्ञा आज्ञापत्रममध्ये, प्रज्ञापत्रममध्ये राजाचे जाहीरनामे, तर ताम्रपटात केलेल्या दानधर्माचा उल्लेख आढळतो. ताम्रपटात दान देणाऱ्याचे नाव, ठिकाण, त्याची वंशावळ, दानाचे स्वरूप, दान घेणाऱ्या व्यक्तीचे नाव इत्यादीचा उल्लेख आढळतो. प्राचीन भारताच्या तुलनेत सुलतानशाहीमधील ताम्रपट फार कमी संख्येने आढळतात.

**८) नाणी :**

पुरातत्त्वीय साधन म्हणून नाण्यांचे अनन्यसाधारण स्थान आहे. इतिहासाच्या साधनापैकी हे एक अविनाशी साधन आहे. तत्कालीन इतिहासलेखनासाठी नाणी हे अतिशय विश्वासार्ह भौतिक साधन आहे. सन १७९० मध्ये भारतीय नाण्यांचे अध्ययन करण्यास सुरवात झाली. सन १८२४ मध्ये कर्नल टॉड ह्याने नाण्यांविषयी एक लेख प्रकाशित केला. कर्नल व्हेन्चुरा व चार्लस मॅसन यांनी अनेक नाणी जमा केली. सन १८३७ साली विल्सन ह्याने भारतीय नाण्यांची एक यादी केली तर कर्नल टॉमसने सन १८५८ मध्ये जॉन प्रिन्सेपचे 'एसेज ऑन इंडियन अँटिक्विटिक्स' संपादित करून भारतीय नाणकशास्त्रात मोलाची भर घातली. अलेक्झांडर कनिंगहॅम ह्याने नाणकशास्त्राचा पाया घातला. सन १८८६ मध्ये एलियटचा 'कॉइन्स ऑफ सदर्न इंडिया' व सन १८९७ मध्ये रॅपसनचा 'इंडियन कॉइन्स' हा ग्रंथ प्रकाशित झाला. ब्रिटिश अधिकाऱ्यांनी मुस्लिम राज्यकर्त्यांच्या नाण्यांचा अभ्यास केला. यामध्ये जे. डब्ल्यू लेड्ले, हेन्री टॉमस कोलब्रुक यांनी बंगालमधील सुलतानांच्या नाण्यांचा अभ्यास केलेला आहे. विल्सन व रॉजर्स यांनी आदिलशाही सुलतान आणि मलबारचे मुस्लिम राजे यांच्या नाण्यांविषयी संशोधन प्रकाशित केले. जी. पी. टेलर ह्याने गुजराथमधील सुलतान, कॉडरिंग्टन व गिब्ज यांनी बहामनी सुलतानांच्या नाण्यांचा अभ्यास केला आहे. सी. जे. रॉजर्स, के. एन. दीक्षित, राजेंद्रलाल मित्र, सी. आर. सिंघल, व्ही. एस्. अग्रवाल, आर. बर्न, एच. ए. शेखानी, एम. ए. वलीखान, पी. एम. जोशी इत्यादींचे मुस्लिम नाण्यांच्यावरील संशोधन महत्त्वाचे आहे. सन १८७१ मध्ये टॉमस ह्याने लिहिलेला 'क्रॉनिकल्स ऑफ द पठाण किंग्ज ऑफ देल्ही' हा प्रबंध प्रसिद्ध केला. सन १९०४ मध्ये 'द न्युमिस्मॅटिक सप्लीमेंटस् ऑफ द जर्नल ऑफ एशियाटिक सोसायटी ऑफ बेंगॉल' ही पत्रिका सुरू झाली. सन १९१० मध्ये 'द न्युमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया' ही संस्था स्थापन झाली. 'द न्युमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया' या संस्थेने केलेले 'कॉपर्स ऑफ इंडियन कॉइन्स' या अनेक खंडात्मक ग्रंथाच्या प्रकाशनाचे काम महत्वपूर्ण आहे. ग. ह. खरे यांनी 'मंडळातील नाणी' हा ग्रंथ प्रकाशित केलेला असून त्यांनी दिल्ली सुलतानशाहीची काही नाणी प्रकाशित केलेली आहेत.

मध्ययुगीन कालखंडात दिल्लीचे सुलतान, विजयनगरच्या सम्राटांची विविध धातूंची नाणी उपलब्ध होतात. या नाण्यांवरून राजांची किंवा त्याच्या कालखंडाची, त्याच्या साम्राज्यविस्ताराची, धार्मिक जीवनाची आर्थिक स्थिती व चलनपद्धती, राजघराणे, धर्म, देवता, प्रतीके, बिरुदे यावर प्रकाश टाकणे शक्य होते. याशिवाय नाण्यावर कोरलेल्या विविध प्रतिमा, केशरचना, वेशभूषा, भाषा, लिपी व धातू इत्यादी संबंधीवर प्रकाश टाकल्यास मदत होते. या कालखंडातील नाणी आकार-प्रकारातील विविधता, उच्च दर्जा व कलात्मकता या दृष्टीने अत्यंत समृद्धी होती. सुलतानशाहीमध्ये अनेक मुस्लिम शासकांनी गादीवर येताच स्वत:ची नाणी प्रचारात आणली होती. सुलतानांच्या नाण्यांवर पहिल्या चार खलिफांची आणि त्यांच्या समकालीन, खलिफांची नावे कोरलेली दिसतात. शिवाय सुलतानाचे नाव, नाणे पाडलेले वर्ष आणि टांकसाळीचे शहर यांचा उल्लेख केलेला आहे. यावरून सुलतानाच्या गादीवर येण्याचे वर्ष, त्याचा साम्राज्यविस्तार, त्याचे नाव, खलिफाशी असलेले त्याचे संबंध, शेजारील देशांशी असलेले त्याचे संबंध अशी बरीच माहिती मिळते.

अल्तमशने प्रथम रुप्याची नाणी 'टंका' पाडण्यास सुरुवात केली. अल्तमश स्वतंत्र सार्वभौम राजा होता हे जरी खरे असले तरीही तो घटनात्मकदृष्ट्या खलिफाच्या अधिपत्याखाली होता, हे त्याच्या सन १२२८ नंतरच्या नाण्यांवरून समजते. त्यानंतर मुस्तन्शीर या बगदादच्या खलिफाकडून अधिकारपत्र स्विकारल्यानंतर खलिका नाव असलेली नाणी पाडण्यास सुरुवात केली. अल्लाउद्दीन खिलजीने दक्षिण भारताच्या स्वारीमधून जी लूट आणली त्यामधून सोन्याची नाणी पाडली. अल्लाउद्दीनसारखा बलवानसुद्धा स्वत:ला 'खिलाफतीचा उजवा हात' म्हणवून घेत असल्याचे त्याच्या नाण्यांवरून समजते. मात्र कुतुबुद्दीन मुबारक याने खलिफाचे वर्चस्व नाममात्र झुगारून दिले आणि तो स्वत:लाच इस्लामचा सर्वश्रेष्ठ प्रमुख, स्वर्ग आणि पृथ्वीवरील ईश्वराचा प्रतिनिधी आणि सर्वश्रेष्ठ इमाम असे संबोधून घेवू लागला. मुहंम्मद बीन तुघलकाने प्रथम खलिफाचे वर्चस्व झुगारून दिले होते मात्र पुन्हा आपल्या कारकीर्दीच्या उत्तरार्धात नाण्यांवर खलिफाचं नाव छापण्यास सुरुवात केली हे त्यांच्या नाण्यांवरून समजून येते.

विजयनगरमधील राजांच्या सोन्याच्या नाण्यांवरून त्यांच्या आर्थिक भरभराटीची कल्पना येते. नाण्यावरील नावे, देवदेवतांची चिन्हे, बिरुदावल्यावरून त्यांचा राज्यविस्तार, धार्मिक श्रद्धा याविषयी माहिती मिळते. विजयनगरच्या सोन्याच्या वराह नाण्यांबरोबरच लहान नाणीही पाडलेली होती. त्यावरून त्यांच्या राज्यात व्यापार भरभराटीत होता आणि व्यापारातील अनेक लहान मोठे व्यवहार करण्यासाठी छोट्या किमतीची नाणी उपयुक्त होती हे लक्षात येते. विजयनगरच्या प्रारंभीच्या नाण्यांवर कानडी व नागरी लिपीतील लेख आहेत. उत्तरार्धाच्या काळात मात्र नाण्यांवर फक्त नागरी लेख आढळतात. मदुरा आणि बहामनी सुलतानांची नाणीही सापडली आहेत. त्यांची नाणी दिल्ली सुलतानांच्या नाण्यांप्रमाणेच होती. त्या राज्यांची आर्थिक, राजकीय, धार्मिक माहिती समजण्यास ही नाणी महत्त्वाची आहेत.

● **स्वय अध्ययन प्रश्न क्र. २**

**रिकाम्या जागा भरा.**

१) १८ व्या शतकात ........ यांनी भारतात पुराणवस्तू संशोधनाची सुरुवात केली.

२) एशियाटीक सोसायटीची स्थापना ............ मध्ये झाली.

३) सन १८६१ मध्ये भारतीय पुरातत्व सर्वेक्षणखात्याची स्थापना ..... ने केली.

४) उत्खननात प्राप्त मानवी व प्राण्याचे सांगाडे यावर ........... रासायनिक प्रक्रिया केली जाते.

५) एपिग्राफिया कर्नाटिकाचे ........... खंड प्रकाशित झालेले आहेत.

६) वा. सी. बेंद्रे यांनी शिलालेखावर आधारित ............... हा ग्रंथ लिहिला आहे.

७) हनमकोंडा येथील हजार खांबांचा शिलालेख ............ भाषेत आहे.

८) क्रॉनिकल्स ऑफ द पठाण किंग्ज ऑफ देल्ही हा ग्रंथ ........... यांनी लिहिला आहे.

९) द न्युमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया ही संस्था ...........मध्ये स्थापन झाली.

१०) 'खिलाफतीचा उजवा हात' असे .......... सुलतान म्हणवून घेत.

### १.२.३ परकीय प्रवाशांचे प्रवास वृतांत: इब्न बतूता, डोमिंगो पायीश :

प्राचीन काळापासून परकीयांना भारताचे आकर्षण असलेले दिसते. काही आक्रमक वृत्तीने भारतात आले तर काही उत्सुकतेपोटी आलेले दिसतात. मध्ययुगीन कालखंडातही विविध देशातील प्रतिनिधी व प्रवासी भारतात आलेले दिसतात. त्यांच्या प्रवास वृतांत आणि वर्णनातून तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक घटकांवर प्रकाश पडतो.

**अ) इब्न बतूता (१३०४–१३७८) :**

**१) इब्न बतूताचा पूर्व इतिहास :**

प्रसिद्ध मोरोक्कन प्रवासी इब्न बतूता मुहंम्मद तुघलकाच्या काळात भारतात आला होता.'किताब उल-रहेला' हे त्याचे प्रसिद्ध प्रवास वर्णन आहे. इब्न बतूताचे मूळ नाव 'शेख फकीह अबू अब्दुल्ला मुहंम्मद इब्न अब्दुल्लाल्ह इब्न मुहंम्मद इब्न इब्राहिम' असे होते. बतूताचा जन्म २४ फेब्रुवारी १३०४ रोजी मोरक्कोमधील तानजीर (टॅनजीयर) येथे एका काझी कुटुंबात झाला. वयाच्या २१ वर्षी तो मक्का मदीनेच्या (हज) यात्रेला निघाला, त्याने एकूण तीन हज यात्रा केल्या, दरम्यान त्याने अनेक शहरांना भेटीही दिल्या. बतूताने हा सर्व प्रवास एकट्याने व बहुतांश प्रवास जमिनीवरून केला. बतूताचा मुस्लिम धर्मशास्त्राचा विशेष अभ्यास असल्याने प्रवासादरम्यान अनेक राज दरबारात त्याचे स्वागत झाले. बतूताने आपल्या एकूण प्रवासामध्ये अनेक मुस्लिम व बिगरमुस्लिम देशांना भेटी दिल्या. यामध्ये उत्तर आफ्रिकेतील इजिप्त, सुदान, सोमालिया, अल्जेरिया, ट्युनिशिया, पूर्व आफ्रिकेतील मोगादिशू, मोबासा, टांझानिया, पूर्व युरोप मधील इस्त्रायल, तुर्कस्थान, मध्यपूर्वेतील सिरिया, लेबनान, सौदी अरेबिया, इराक, पर्शिया, मध्य आशियामधील उजबेकीस्तान, युक्रेन, तुर्कमेनीस्तान, बुखारा, समरकंद, दक्षिण आशियामधील अफगाणिस्तान, भारत, मालदिव, श्रीलंका, आग्नेय आशियामधील चीन या ठिकाणांचा समावेश होतो. बतूताने आपल्या प्रवासादरम्यान अनेक प्रसिद्ध शहरांना भेटी दिल्या. विशेषतः ही ठिकाणे राजधानीची शहरे, तीर्थस्थळे व व्यापारी केंद्रे होती. त्याने भेट दिलेल्या सर्व ठिकाणच्या व्यापारी वस्तूं, आयात निर्यातीबद्दल त्याने विस्तृत लिखाण केलेले आहे.

**२) इब्न बतूताचे भारतातील वास्तव्य: (१३३३) :**

इब्न बतूता आपल्या तिसऱ्या हज यात्रेच्या दरम्यान भारतात आला. या वेळी दिल्लीच्या तख्तावर मुहंम्मद बिन तुघलक हा सुलतान होता. १२ सप्टेंबर १३३३ रोजी तो सिंधु नदी पार करुन भारतात आला. सन १३३४ मध्ये त्याची मुहंम्मद बिन तुघलकाच्या दरबारात दिल्लीचा काझी या पदावर नेमणूक झाली. काझीच्या पदावर तो जवळजवळ सहा वर्षे होता. सन १३३३ ते १३४७ पर्यंत तो भारतात राहिला. याकाळात त्याचे बहुतांश वास्तव्य दिल्लीत होते. मुहंम्मद तुघलकाच्या संशयी स्वभावामुळे त्याला अनेक वेळा मनस्ताप सहन करावा लागला होता. अनेक प्रसंगी निमित्त काढून त्याने दिल्ली सोडून जायचा प्रयत्न केला. शेवटी तुघलकांचा राजदूत

म्हणून तो इ.स. १३४७ मध्ये चीनला जाणार होता. परंतु त्यांचे जहाज दुर्घटनाग्रस्त झाल्याने तो जाऊ शकला नाही.

**२) इब्न बतूताचा परतीचा प्रवास :**

इब्न बतूता चीनला जाण्यात यशस्वी होवू शकला नाही, मात्र पुन्हा तो मुहंम्मद तुघलकाकडे गेला नाही, एवढेच काय त्याची मुहंम्मद बिन तुघलकाच्या तावडीतून अर्थात दिल्लीतून सुटका झाली. या दरम्यानच्या प्रवासात तो उत्तर प्रदेशमधील अलिगड-कनौज, महाराष्ट्रामधील दौलताबाद येथे आला व कर्नाटकमध्ये गेला. शेवटी तो कालीकतला गेला. तेथून त्याला चीनला भेट द्यायची होती. यातूनच तो प्रथम मालदिवला गेला. मालदीववरून श्रीलंका, मलबार, बंगाल, आसाम, सुमात्रा व तेथून चीनला पोहचला. सन १३४६ मध्ये त्याने परतीचा प्रवास सुरू केला, पार्शियन खाडी पार करून बगदादला पोहचला. शेवटी तो सन १३४९ मध्ये टॅनजीयर या आपल्या मूळ गावी पोहचला. बतूताने आपल्या आयुष्यात एकूण २९ वर्षे प्रवास केला. यामध्ये त्याने जवळजवळ ४० देशांना भेटी दिल्या. त्याचा प्रवास वृतांत पूर्ण झाल्या नंतर त्याची मोरोक्कोचा न्यायाधीश म्हणून नेमणूक झाली. सन १३६९ मध्ये त्याचा मृत्यू झाला.

**३) किताब उल-रहेलाचे लिखाण :**

इब्न बतूता परत आपल्या मायदेशी पोहचेपर्यंत त्याने आपल्या प्रवासाचे कोणतेही लिखाण केलेले नव्हते. मात्र मोरक्कोचा सुलतान अबु इनआम मरीनी (मरिनिड) यांने त्याला त्यांचे प्रवास वर्णन लिहिण्यास प्रोत्साहित केले. बतूताने आपल्या सर्व प्रवासाची हकीकत स्वत: लिहिली नसून त्याने जो प्रवास वृतांत सांगितला आहे तो इब्न जुझाय्या ह्या विद्वानाने शब्दबद्ध केला आहे. बतूताच्या अरबी हस्तलिखिताचे मूळ नाव 'तुहफतुनुज्जार फी गराइविल अमसार' व 'अजाईबुल अफसार' असे होते. (अर्थ: ज्यांना विविध शहरांचे वैभव पहावयाची आणि प्रवासाचा थरार अनुभवाची तळमळ आहे. त्यांच्यासाठी भेट) बतूताचा हा प्रवास वृतांत इ.स. १३५५-५६ मध्ये लिहून पूर्ण झाला. पुढे तो 'किताब-उल-रेहेला' या नावाने प्रसिद्ध झाला. बतूताच्या ह्या प्रवास वृतांताचा मेहंदी हसन याने सन १९५३ मध्ये "Rehla of Ibn Batuta' या नावाने इंग्रजीत अनुवाद केलेला आहे.

**४) किताब उल-रहेलाचे महत्व :**

इब्न बतूताच्या रहेलाचा भारताचा दृष्टीकोणातून विचार त्याने मुहंम्मद बीन तुघलकांच्या बरोबर दिल्लीवर राज्य करणाऱ्या पूर्वीच्या सुलतानांबद्दलचा संक्षिप्त इतिहास दिलेला आहे. ही सर्व माहिती त्याला काजी-उल-कज्जात या पदावर काम करत असलेल्या कमालुद्दिन मुहंम्मद कडून मिळाली असे तो नमूद करतो. बतुता ऐतिहासिक घटनाच्याकडे अतिशय सूक्ष्म दृष्टीकोनातून पाहत होता. तत्कालिन ज्ञात जगाबरोबर तेथील भौगोलिक परिस्थिती, समुद्र, पर्वत, डोंगर, नद्या, रस्ते, विविध शहरे, नगररचना, वैभव इत्यादीची सविस्तर माहिति रहेलामध्ये आली आहे.

बतूताने भारतातील न्यायव्यवस्थेबरोबर इल्ततमशच्या न्यायव्यवस्थेबाबत माहिती दिलेली आहे. सुलतानांचे

लष्करी संघटन, हेरखाते, प्रशासन व राजकीय घडामोडी, तुघलकांचा राजधानी बदलण्याचा निर्णय योग्य होत की अयोग्य, दरबारीसमारंभ इत्यादी बरोबर बल्बनने नासिरुद्दिनची ज्या प्रकारे हत्या करुन राज्य मिळवले त्या घटनेची तो सविस्तर माहिती देतो. याशिवाय तो मुहंम्मद तुघलकाच्या विविध प्रयोगांबद्दल स्वतंत्रपणे माहिती देतो.

भारतामधील कापड उद्योग, धातुकाम, कागद, साखर, चर्मोद्योग, कृषी उत्पादने, व्यापार, व्यापारी पद्धती, वाहतूक व्यवस्था, इ. उद्योगांबद्दल त्याने विस्तृत चर्चा केलेली आहे. गुजरात आणि बंगाल हे कापडाच्या उत्पादनात अग्रेसर होते असे तो नमूद करतो. व्यापारी मालातील विविध वस्तु, माल वाहतुकीची साधने, चैनीच्या वस्तु व व्यापारी केंद्रांची सविस्तर माहिती दिलेली असून, कोणत्या व्यापारी केंद्रातून कोणत्या प्रकारचा व्यापार होत होता याची माहिती देतो. उदा. मोगादिशूमधील उत्तम दर्जाच्या कापडाचा व्यापार, टांझानियाचा सोन्याचा व्यापार, सुमात्रा येथील कापूर, सुपारी, लवंगाचा व्यापार इ. बतुताने तत्कालीन वाहतुकीच्या साधनांची, टपाल व्यवस्था, जलमार्ग आणि दळणवळणाच्या सुविधेबाबत माहिती दिलेली आहे. उदा. दिल्ली-मुलतान मार्ग, आग्रा-लाहोर मार्ग इत्यादी हमरस्त्यांचे निरिक्षणे त्याने नोंदवलेली आहेत.

थोडक्यात बतूताच्या वृतांतामधून जनमानसाचे उत्तम निरिक्षण पहावयास मिळते. सामाजिक रचना, वेशभूषा, खाद्य पदार्थ, आहार-विहार, रीतीरिवाज, आचरण पद्धती, स्त्रियांचे समाजातील स्थान, कुटुंब पद्धती, लग्न समारंभ, धार्मिक स्थिती, सुफी संत, फळे, फुले, पशू-पक्षी, अशा अनेक विध घटकांच्या बरोबर मुहंम्मद तुघलकाच्या काळातील समकालीन सर्वच घटकांची अतिशय सखोल माहिती मिळविण्याचे हे अतिशय महत्त्वाचे साधन आहे. बतूता परकीय प्रवासी असल्याने त्याच्यावर कोणतेही बंधन अथवा दडपण नसल्याने त्याने अतिशय मुक्तपणे लिहिलेले आहे.

**ब) डोमिंगो पायीश (पेस) : (इ. स. १६ वे शतक).**

**१) डोमिंगो पायीशचे पूर्व चरित्र :**

डोमिंगो पायीश हा पोर्तुगीज प्रवासी होता, विजयनगर साम्राज्यात पोर्तुगीज व्यापारी व दूत म्हणून त्यांने प्रवास केला. 'डोमिंगो पायीश' अथवा 'पेस' या नावानेही तो ओळखला जातो. पायीशच्या पूर्व आयुष्याबद्दल फारशी माहिती उपलब्ध होत नाही. सन १५१० मध्ये गोव्यावरती पोर्तुगीज सत्ता स्थापन झाल्यानंतर सन १५२० मध्ये तो गोव्यात आल्याचे संदर्भ सापडतात. सन १५३७ पर्यंत तो गोव्यात वास्तव्यास होता. सन १५२० ते १५२२ या कालखंडात त्यांने विजयनगर राज्यात प्रवास केला. या प्रवासा दरम्यान त्यांने जे-जे पहिले ते-ते लिहून ठेवले आहे. पायीश ज्यावेळी विजयनगरला आला तेंव्हा तेथे कृष्णदेवरायाची (१४८९-१५२९) सत्ता होती. अर्थातच पायीशच्या वृतांतात कृष्णदेवराय बद्दल विस्तृत माहिती मिळते.

**२) पायीशचा प्रवास वृतांत :**

गोव्याचे पोर्तुगीज विजयनगरचा उल्लेख 'नरसिंगचे राज्य' म्हणून करत. त्यामुळे त्याच्या वृत्तांताचे नाव 'क्रोनिका दोस हेस दी बिसनाग' (Chronica dos reis de Bisnaga) अर्थात 'क्रॉनिकल ऑफ द

विजयानगर किंग्स' (ज्या गोष्टी मी पाहिल्या आणि नरसिंगचे राज्य इत्यादी संबंधी माहिती मिळवून घेतली त्याविषयी)असे आहे. पायीशचा हा वृत्तांत साधारण सन १५२०-२२ च्या नंतर लिहिलेला आहे. विजयनगरच्या साम्राज्याच्या दोन राजधानी होत्या, पहिली राजधानी अनेगोंदी ही होती तर बिसनग अर्थात विजयनगर (सध्याचे हंपी). पायीश व बार्बोसा हे परकीय प्रवासी एकमेकांना समकालीन होते. डॉ. के. ए. एन. शास्त्री यांनी "Foreign Notices of South India' या मध्ये वरील दोन्ही प्रवाशांचे वृतांत प्रकाशित केलेले आहेत.

**३) विजयनगरमधील शहरांचे वर्णन :**

पायीशने विजयनगर या राजधानीच्या शहराचे सविस्तर वर्णन दिलेले आहे असून या शहराभोवती डोंगर असून याचा परीघ ८ कोस असल्याचे तो नमूद करतो. डोंगरामध्ये असणाऱ्या सपाट जागांवर भक्कम तटबंदी केलेली असून ती ओलांडल्याशिवाय शहरात प्रवेश करता येत नाही. मोकळ्या जागेत संत्री, लिंबे वगैरे फळे तसेच विविध भाज्या पिकत असल्याचे तो लिहितो. या भाज्यांत कोबी पिकत नसल्याचे तो आवर्जून लिहितो. या शहरातील घरे रस्त्याच्या दुतर्फा बांधलेली असून अतिशय मजबूत व विस्तीर्ण आहेत. शहरात येणारे पाणी हे खोदलेल्या चरातून, नाल्यांतून व बंद नळांतून आणले जाते.

विजयनगरचे विस्तृत वर्णन पायीशयाने आपल्या वृतांतात केले आहे. तो म्हणतो की, विजयनगर रोमएवढे मोठे होते. तेथील राजप्रासादांनी लिस्बनच्या किल्ल्याऐवढी जागा व्यापली होती. सुरेख उत्तुंग प्रवेशद्वारे, रुंद रस्ते, व्यापारी पेठा, मंदिरे, फळबागा, द्राक्षमळे यांमुळे शहरास शोभा प्राप्त झाली असून तेथे सर्व सुविधा उपलब्ध होत्या.विजयनगरमधील विविध शहरे, गावे, बंदरे इत्यादींचा उल्लेख केलेला आहे. यामध्ये सध्याच्या होन्नावर, भटकळ, बसरुर इ. समावेश आहे. अरेसिकेरे (दारचा) या शहराचे त्यांने विस्तृत वर्णन केलेले आहे. हंपी येथील नगररचना, घरे, रस्ते याबद्दल माहिती दिलेली आहे. शहरे दगडी तटबंदींनी युक्त असून या तटबंदी दुहेरी-तिहेरी आहे. या शहरांना एकापेक्षा अधिक प्रवेशद्वारे आहेत. राजधानीची शहरे ही नैसर्गिक मोठमोठ्या दगडांनी व्यापलेली असल्याने त्यांचा प्रवेश हा खिंडीतून होतो. त्यापुढे खंदक, तटबंदी, दुसरी तटबंदी, मोकळे मैदान, रुंद रस्ते, रस्त्यांच्या दुतर्फा सावलीसाठी झाडे-घरे-दुकाने आणि मैदानाच्या पलिकडे मोठा वाडा,पुन्हा मोकळे मैदान आणि मग राजवाडा अशी रचना आहे.

**४) विजयनगर साम्राज्याच्या सीमा :**

पायीशने विजयनगर साम्राज्याच्या सीमांचे विस्तृत वर्णन केलेले आहे. विजयनगर राज्याच्या पश्चिम सरहद्दीवर पर्वतांची रांग असून तिच्या पश्चिमेस समांतर समुद्रकिनारा आहे. पूर्वेकडे बालाघाट व कोरोमंडल असून एका बाजूला बंगालचा प्रदेश आहे. त्याच्या शेजारी ओरिसा राज्य असून उत्तरेस दख्खनचे साम्राज्य आहे. ओरिसा हे राज्य नरसिंहरायाच्या राज्यापेक्षा मोठे असून ते बंगालपर्यंत पसरलेले असून त्याचा विस्तार पूर्वेकडे मलाक्कापर्यंत तर पश्चिमेस खंबायतपर्यंत आहे. भटकळपासून ओरिसाच्या सरहद्दीपर्यंत या साम्राज्याची रुंदी अंदाजे ३५० कोस असल्याचे त्यांने नमूद केले आहे. पश्चिमेस गोव्याचा प्रदेश आहे. विजयानगर साम्राज्यत प्रवेश करण्यासाठी अनेक डोंगररांगा पार कराव्या लागतात असे तो नमूद करतो, शिवाय घनदाट

जंगलातून प्रवास करावा लागतो. या साम्राज्यातील काही महत्त्वाची शहरे ही समुद्रकिनारी असून यामध्ये मडगाव, अंकोला, भटकळ, होन्नावर, मेंगलोर, बर्सिलोर, कन्नूर या शहरांचा उल्लेख केलेला आहे. विजयनगरचा प्रदेश समृद्ध असून येथे मोठ्या प्रमाणात गाई, बैल, म्हशी, शेळ्या-मेंढ्या व पक्षी आहेत. या प्रदेशात भात, मका, विविध कडधान्ये व इतर अनेक पिके घेतली जातात.

**५) कृष्णदेवरायाचे वर्णन :**

पायीशने विजयनगरचा राजा कृष्णदेवराय याचे सविस्तर वर्णन केले आहे. कृष्णदेवराय मध्यम उंचीचा, गोरा, स्थूल असून त्याच्या तोंडावर देवीचे व्रण आहेत. त्याचा स्वभाव न्यायी आहे. राजाची दिनचर्या सूर्योदयापूर्वी सुरु होते. अंगाला तेल लावून सर्व तेल निथळेपर्यंत तो कुस्ती खेळतो, तलवारीचा सराव करतो, घोडदौड करून स्नान करतो व नंतर देवाची पूजा करतो. सकाळी राज्यकारभारास सुरुवात करतो. प्रथम तो शहरांतील सर्व अधिकाऱ्यांबरोबर चर्चा करुन कामकाज करतो. मग तटबंदीजवळ वाट पाहणाऱ्या इतर लोकांना बोलावून त्यांच्याशी चर्चा करत असल्याचे त्यांने नमूद केले आहे.

**६) दरबारी शिष्टाचार :**

पायीशने विजयनगरच्या दरबारी शिष्टाचाराबद्दलही लिहिले आहे. दरबारात राजासह सर्वजण अनवाणी फिरतात. राजासमोर सर्व लोक अस्तिन्यात हात घालून आणि नजर खाली करुन बसलेले असतात. राजा त्यांच्याशी मध्यस्थांमार्फत बोलतो, सर्वजण डोक्याच्यावर हात उंच करून नमस्कार घालतात.

**७) विजयनगरमधील समाजजीवन :**

विजयनगरमधील समाजजीवन व लोकांबद्दल पायीशने बरीच चर्चा केलेली आहे. लोक खूप निरोगी, सुदृढ व धिप्पाड आहेत. धारवाडमधील एका दगडातून कोरलेल्या मंदिराचे त्यांने वर्णन केलेले असून मंदिरांवर पुरुष, स्त्री, देवता, गाय, बैल, माकडे यांच्या प्रतिमा कोरलेल्या आहेत. एका मंदिरात मानवी शरीर व हत्तीचे तोंड असलेल्या देवतेची मूर्ती असून सहा हातात सहा शस्त्रे असल्याचे त्यांने नमूद केले आहे. मूर्तीच्या हातातली चार शस्त्रे या आधी अदृश्य झालेली असून इतर दोन जेव्हा अदृश्य होतील, तेव्हा जगाचा नाश होईल असे तो म्हणतो. देवाला दररोज नैवेद्य दाखवून देवतेपुढे नर्तकी नृत्य करत असल्याचे तो लिहितो. पान खाण्याचा येथील लोकांना विशेष छंद असून लोक सुपारी बरोबर पान खाऊन मुखशुद्धी करतात. येथील बहुतांश लोक शाकाहारी आहेत मात्र गाय, बैल, डुक्कर सोडून इतर प्राण्यांचे मांस खातात. स्वत: बनवलेल्या घाण्यामध्ये बिया घालून तेल काढतात. पावसाचे पाणी साठवण्यासाठी अनेक तलाव खोदलेले असून ते त्याची खूप काळजी घेतात. दिवाळीमध्ये नववर्ष साजरे केले जाते, त्यावेळी सर्वांना वार्षिक पगार दिला जातो. समाजात वेश्यां व्यवसाय प्रचलित असून वेश्यांची घरे उत्तम प्रतीची आहेत, अधिकारी व श्रीमंत लोकांच्या अंगवस्त्रे असलेल्या वेश्यांना खूप मोठा मान आहे, या वेश्यांना राजकुळातील स्त्रियांकडे जाण्यास मनाई असल्याचे तो लिहितो.

**८) शेती, व्यापार, महसूल :**

विजयनगर मधील शेती, व्यापार, महसूल इत्यादी बद्दल तपशीलवार लिहिलेले आहे. विजयनगरमध्ये

तांदूळ, मका, द्विदल धान्ये, कापूस आणि गहू भरपूर प्रमाणात उत्पादन होते. व्यापारसमृद्ध असून येथील शहरांमध्ये विविध वस्तू विकणाऱ्या विविध बाजारपेठा आहेत. विविध भागात वेगवेगळ्या वारी हे बाजार भरत, बाजार संध्याकाळच्या वेळी भरत असल्याचे तो नमूद करतो. कारागीरांचीवस्ती रस्त्याच्या कडेला आहेत. प्रशासन विविध सरदारांच्या माध्यमातून केले जाते. व्यापारी करांबरोबरच, जमिन महसूल हे उत्पन्नाचे प्रमुख साधन असे. सरादारांना ही गावे दिली जातात आणि त्यांच्याकडून महसूल गोळा करण्याची पद्धती आहे.

थोडक्यात: डोमिंगो पायीश हा पोर्तुगीज प्रवासी होता. मध्ययुगीन काळात भारतात येऊन गेलेल्या युरोपीय प्रवाशांच्या मध्ये पायस हा एक महत्त्वपूर्ण प्रवासी आहे. त्यांने मध्ययुगीन काळात भरभराटीस आलेल्या विजयनगर साम्राज्यास भेट दिलेली होती व तेथे तो काही काळ वास्तव्यास देखील होता. विजयनगर साम्राज्यातील अनेक घटकावर त्यांच्या लिखाणातून प्रकाश पडतो. विजयनगर या राजधानीचे वर्णन, विजयनगरचा वैभवशाली व्यापार, आर्थिक संपत्तीचे वर्णन, आर्थिक संपन्नता, दळणवळणाचे मार्ग, सामाजिक परिस्थिती, सांस्कृतिक विरासत, प्रथा-परंपरा, व्यापारी मार्गाबरोबर व्यापारी माल व त्यांचे दर, मसाल्याचे उत्पादन व व्यापार, विविध फळाचे उत्पादन व व्यापार, अलंकार, जड-जवाहिर, धातुकाम, जहाज बांधणी, चलन व्यवस्था अशा अनेक बाबींचे सविस्तर वर्णन पायस आपल्या लिखाणात करतो. भारताच्या मध्ययुगीन इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीकोनातून पायीशने लिहिलेली माहिती अत्यंत महत्त्वाची आहे.

- **स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३**

**रिकाम्या जागा भरा.**

१) इब्न बतूताचा जन्म ................ येथे झाला.

२) किताब-उल-रेहेला हा ग्रंथ ...........याने लिहिला आहे.

३) इब्न बतूताची मुहंम्मद बिन तुघलकाच्या दरबारात ...... या पदावर नेमणूक झाली

४) इब्न बतूताने .......... देशांना भेटी दिल्या.

५) इब्न बतूताला आपला प्रवास वृतांत लिहिण्यासाठी ............ मदत झाली.

६) डोमिंगो पायीश हा प्रवासी ........ या देशातून भारतात आला.

७) ............ राजास आंध्र भोज असे संबोधले जाते.

८) गोव्याचे पोर्तुगीज विजयनगरचा उल्लेख ......... म्हणून करत.

९) डोमिंगो पायीशच्या प्रवास वृतांताचे नाव .......... आहे.

१०) डोमिंगो पायीश .......... राजाच्या काळात विजयनगर येथे आला होता.

## १.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

पुराभिलेख : विविध माध्यमातून लिहिलेले कोरीव लेख

पुरातत्वविद्या : प्राचीन वस्तू आणि वास्तूंचा अभ्यास करणारे शास्त्र

ताम्रपट : तांब्याच्या पत्र्यावर कोरलेले लेख

आळवार : वैष्णव पंथीय संत

भौतिकसाधने : पुरतत्वीय अवशेष

## १.४ स्वय अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**● स्वय अध्ययन प्रश्न क्र. १ ची उत्तरे**

| | |
|---|---|
| १) प्रो. मायकेल स्टॅनफोर्ड | २) १३२०-१४१४ |
| ३) झियाउद्दीनबर्नी | ४) सय्यद |
| ५) नदीम अर्थात सहायक | ६) सुन्नी |
| ७) अमुक्तमाल्यदा | ८) तेलगू |
| ९) तुळु | १०) गोदा |

**● स्वय अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे**

| | |
|---|---|
| १) प्रो. विल्यम जोन्स | २) सन १७८४ |
| ३) लॉर्ड कॅनिग | ४) कार्बन १४ व रेडिओ कार्बन रासायनिक प्रक्रिया |
| ५) १२ खंड | ६) Story of Muslim Inscriptions |
| ७) तेलगू | ८) टॉमस |
| ९) सन १९१० | १०) अल्लाउद्दीन खिलजी |

**● स्वय अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे**

| | |
|---|---|
| १) तानजीर/टॅनजीयर | २) इब्न बतूता |
| ३) दिल्लीचा काझी | ४) ४० |
| ५) कमालुद्दिन मुहंम्मद | ६) पोर्तुगाल |
| ७) कृष्णदेवराया | ८) नरसिंगचे राज्य |
| ९) क्रोनिका दोस हेस दी बिसनाग | १०) कृष्णदेवराया |

## १.५ सारांश :

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण सुलतानशाही कालखंडाचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त असलेल्या वाङ्मयीन साधंने, पुरातत्वीय साधने आणि  परकीय प्रवाशांची प्रवास वर्णने यांचा अभ्यास केला. बर्नीने आपल्या ग्रंथांमध्ये सुलतानशाही कालखंडातील विविध आर्थिक मुद्यांवर प्रकाश टाकलेला आहे. कापड उद्योग, धातू उद्योग, चर्मोद्योग, लाकूड उद्योगा संबंधी त्याने तपशिलाने माहिती दिलेली आहे. बर्नीसुलतानशाही कालखंडातील सामाजिक परिस्थिती संदर्भांत भाष्य करताना दिसतो. सुलतानशाही कालखंडातील हिंदू धर्म, येथील व्यक्ती, रूढी-परंपरा, आचार-विचार या विषयी आपली निरीक्षणे नोंदवलेली आहेत. अमुक्तमाल्यदा हा ग्रंथ आपल्याला कृष्णदेवरायाच्या राजपद व राजनीतीच्या संकल्पना समजून घेण्यासाठी एक महत्वाचे साधन आहे. विजयनगर कालीन प्रशासन कसे चालत होते, मंत्री, सल्लागार यांच्या नेमणूका कशा केल्या जात,उत्पन्नाची साधने कोणकोणती होती, प्रजेसाठी राजाने कोणकोणत्या कल्याणकारी योजना राबवाव्यात इ. संबंधीची विस्तृत माहिती मिळते. सर्वात महत्वाचे म्हणजे एक उत्तम राजा, एक प्रशासक, सेनापती बरोबर एक उत्तम दर्जाचा साहित्यिक म्हणूनही कृष्णदेवरायाचे व्यक्तिमत्त्व आपल्यासमोर उभे राहते.

लिखित साधनांच्या बरोबर शिलालेख, ताम्रपट, स्तंभालेख, नाणी, मूर्ती, भांडी, चित्रे, इमारतीचे अवशेष व भिंतीचित्रे यासारखी भौतिक साधने इतिहास लेखनासाठी उपयुक्त ठरतात. संस्कृतीच्या या विविध साधंनाच्यावरून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकता येतो. १८ व्या शतकात सर विल्यम जोन्स यांनी भारतात पुराणवस्तू संशोधनाची सुरुवात करून संशोधकांना इतिहासाचा अमूल्य ठेवा उपलब्ध करून दिला. सुलतानशाही कालखंडातील (इ. स. १२०६ ते १५२६) इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी वाङ्मयीन साधने (लिखित) उपलब्ध आहेत. अर्थात या लिखित साधनांच्या तुलनेने सुलतानशाही कालखंडातील पुरातत्त्वीय साधने तुलनेने कमी आढळतात. हे जरी खरे असले तरी ही साधने वाङ्मयीन साधनापेक्षाही विश्वासार्ह असतात आणि आहेत. या साधनांमधून प्राप्त झालेली माहिती वस्तुनिष्ठ असल्याने याच्या मदतीने इतिहासाचे विश्लेषण करणे सोपे जाते. या कालखंडातील शिलालेख, ताम्रपट, नाणी, राजवाडे व गढ्या, किल्ले, शस्त्रास्त्रे, वस्त्रे, अलंकार, चित्रे, नकाशे व काष्ठशिल्प इत्यादींचा प्रामुख्याने पुरातत्त्वीय साधनांमध्ये समावेश होतो.

बतूताच्या वृतांतामधून जनमानसाचे उत्तम निरिक्षण पहावयास मिळते. सामाजिक रचना, वेशभूषा, खाद्य पदार्थ, आहार-विहार, रीतीरिवाज, आचरण पद्धती, स्त्रियांचे समाजातील स्थान, कुटुंब पद्धती, लग्न समारंभ, धार्मिक स्थिती, सुफी संत, फळे, फुले, पशू-पक्षी, अशा अनेकविध घटकांच्या बरोबर मुहंम्मद तुघलकाच्या काळातील समकालीन सर्वच घटकांची अतिशय सखोल माहिती मिळविण्याचे हे अतिशय महत्त्वाचे साधन आहे. बतूता परकीय प्रवासी असल्याने त्याच्यावर कोणतेही बंधन अथवा दडपण नसल्याने त्याने अतिशय मुक्तपणे लिहिलेले आहे. डोमिंगो पायीश हा पोर्तुगीज प्रवासी होता. मध्ययुगीन काळात भारतात येऊन गेलेल्या युरोपीय प्रवाशांच्या मध्ये पायस हा एक महत्त्वपूर्ण प्रवासी आहे. त्यांने मध्ययुगीन काळात भरभराटीस आलेल्या विजयनगर साम्राज्यास भेट दिलेली होती व तेथे तो काही काळ वास्तव्यास देखील होता. विजयनगर

साम्राज्यातील अनेक घटकावर त्यांच्या लिखाणातून प्रकाश पडतो. विजयनगर या राजधानीचे वर्णन, विजयनगरचा वैभवशाली व्यापार, आर्थिक संपत्तीचे वर्णन, आर्थिक संपन्नता, दळणवळणाचे मार्ग, सामाजिक परिस्थिती, सांस्कृतिक विरासत, प्रथा-परंपरा, व्यापारी मार्गाबरोबर व्यापारी माल व त्यांचे दर, मसाल्याचे उत्पादन व व्यापार, विविध फळाचे उत्पादन व व्यापार, अलंकार, जड-जवाहिर, धातुकाम, जहाज बांधणी, चलन व्यवस्था अशा अनेक बाबींचे सविस्तर वर्णन पायीश आपल्या लिखाणात करतो. भारताच्या मध्ययुगीन इतिहासाच्या अभ्यासाच्या दृष्टीकोनातून पायीशने लिहिलेली माहिति अत्यंत महत्त्वाची आहे.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) टिपा लिहाः**

१) झियाउद्दीन बर्नी

२) तारीख-ए-फिरोझशाहीमधील दोष काय आहेत?

३) राजा कृष्णदेवराय

४) अमुक्तमाल्यदामधील राज्यकारभार विषयक विचार

५) पुरातत्वीय साधनांचे वर्गीकरण

६) डोमिंगो पायीश

**ब) दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) सुलतानशाहीचे एक साधन म्हणून तारीखे-ए-फिरोजशाहीचे महत्व विशद करा.

२) अमुक्तमाल्यदाचे ऐतिहासिक महत्व सांगा.

३) सुलतानशाही कालीन पुरातत्वीय साधनांची चर्चा करा.

४) इब्न बतुताच्या प्रवास वृतांताची सविस्तर चर्चा करा.

५) डोमिंगो पायीशच्या प्रवास वृतांताचे विजयनगरच्या इतिहासाचे साधन म्हणून महत्व विशद करा.

## १.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठीची पुस्तके :


१) डोमिंगो पाईश व फेर्नाव नुनीश., विजयनगरचे साम्राज्य (मूळ अनुवादः रॉबर्ट स्टुअल, मराठी अनुवादः चंद्रशेखर जहागिरदार, वसुंधरा फिलियोझा (संपा), नॅशनल बुक ट्रस्ट, नवी दिल्ली, १९९५.

२) लेले, मा. व्यं. (अनुवाद)., एक नष्टस्मृती साम्राज्य किंवा विजयनगर साम्राज्याचा इतिहास, महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळ, पुणे, १९१९.

३) हवालदार, अस्मिता., विजयनगर हृदयस्थ साम्राज्य, कॉंटिनेंटल प्रकाशन, पुणे, २०१९.

४) शास्त्री, नीलकंठ, के. एन., दक्षिण भारत का इतिहास, बिहार हिन्दी ग्रंथ अकादमी, पटना, २००३

५) पवार, विश्वनाथ., पांडे, अमर., गागराणी, कविता., (संपा.) मध्ययुगीन भारताचा राजकीय इतिहास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१५

६) मराठी विश्वकोश, विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र शासन, वाई. (ऑनलाइन खंड)

७) वर्मा, हरिषचंद्र., (संपा.) मध्याकालीन भारत., भाग १, (७५०-१५४०), हिन्दी माध्यम कार्यान्वय निदेशलाय, दिल्ली, २००४

८) राधेशरण., इतिहास और इतिहास लेखन., मध्यप्रदेश हिन्दी ग्रंथ अकादमी, भोपाल, २०१०.

❖❖❖

## घटक – २

# प्रमुख राज्यकर्ते

अनुक्रमणिका :

२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

  २.२.१ अल्लाउद्दीन खिलजी : अंतर्गत धोरण व सुधारणा

  २.२.२ मुहंम्मद-बिन-तुघलक : प्रतीकात्मक प्रतीकात्मक चलनाचा प्रयोग

  २.२.३ कृष्णदेवराया : लष्करी विजय व सांस्कृतिक योगदान

  २.२.४ मुहंम्मद गवान : बहामनी राज्यासाठीचे योगदान

२.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

२.४ सारांश

२.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

२.६ स्वयं : अध्ययन प्रश्नाची उत्तरे

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ

## २.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील माहिती स्पष्ट करता येईल.

- अल्लाउद्दीन खिलजीचे अंतर्गत धोरण व सुधारणा समजून घेता येतील.
- मुहंम्मद-बिन-तुघलकच्या प्रतीकात्मक चलनाचा प्रयोगाची माहिती सांगता येईल.
- कृष्णदेवरायाचे लष्करी विजय व सांस्कृतिक योगदान स्पष्ट करता येर्सल.
- मुहंम्मद गवानची बहामनी राज्यातील कामगिरी सांगता येईल.

## २.१ प्रास्ताविक :

मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे प्रामुख्याने तीन कालखंडात विभाजन केले जाते. ते सुलतानशाही

मुघलकाळ व मराठा असे हे तीन प्रकार होत. महंम्मद पैगंबराने अरबस्थानात इस्लाम धर्माची स्थापना केली व इस्लाम धर्माच्या प्रचाराचे कार्य हाती घेतले. अरबांमधील मोहम्मद-बीन-कासिमने इ.सन. ७१२ मध्ये भारतावर स्वारी केली. २० जून ७१२ मध्ये सिंध राजा दाहीर यांच्या बरोबर झालेल्या युध्दात दाहीरचा पराभव झाला. कासिमने भारतातून मोठी संपत्ती मिळविली. महंम्मद गझनीने इ.स. १००० ते १०२७ या कालखंडामध्ये भारतावर एकूण १७ स्वाऱ्या केल्या. या स्वाऱ्यामध्ये गझनीने मोठी लुट केली. महंम्मद गझनी नंतर भारतात येणारा तिसरा मुस्लिम आक्रमक म्हणजे मोहम्मद घोरी हा होय. तो अत्यंत महत्वकांक्षी व साम्राज्यवादी होता. पृथ्वीराज चव्हाण व महंम्मद घोरी यांच्या मध्ये इ.स. ११९१ मध्ये पहिले तराईनचे युध्द झाले. या युध्दात महंम्मद घोरीचा पराभव झाला. इ.स. ११९२ मध्ये मोठया प्रमाणात युध्दसामुग्रीनीशी पृथ्वीराज चव्हान बरोबर युध्द केले, यामध्ये पृथ्वीराज चव्हाणचा पराभव झाला. या विजयानंतर उत्तर भारतावर महंम्मद घोरीचे वर्चस्व निर्माण झाले. भारतातील प्रतिनिधी म्हणून त्यांने कुतुबुद्दीन ऐबक याच्या हाती सत्ता दिली. कुतुबुद्दीन ऐबकने इ.स. १२०६ मध्ये गुलाम वंशाची स्थापना केली. इ.स. १२०६ ते १२९० या कालखंडामध्ये गुलाम सत्ताधीशांनी राज्य केले. १२९० ते १३२० या कालखंडामध्ये खिलजी, इ.स. १३२० ते १४१३ या कालखंडात तुघलक, इ.स. १४१४ ते १४५१ या कालखंडात सय्यद घराने, तर १४५१ ते १५२६ याप्रदीर्घ कालखंडामध्ये लोदी घराण्यातील सत्ताधीशांनी राज्य केले. आपणास या प्रकरणामध्ये खिलजी घराण्यातील अल्लाउद्दीन खिलजी तुघलक घराण्यातील मुहंम्मद बीन तुघलक विजयनगर साम्राज्यातील कृष्णदेवराय बहामनी राज्यातील सत्ताधीश मुहंम्मद गवान या प्रमुख सत्ताधीशांचा अभ्यास आपल्याला या प्रकरणात करावयाचा आहे.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ अल्लाउद्दीन खिलजी : अंतर्गत धोरण आणि सुधारणा :

अल्लाउद्दीन खिलजी संपूर्ण दिल्ली सुलतानशाहीच्या इतिहासातील बलशाली शासक होता. अल्लाउद्दीन खिलजी हा दिल्ली सुलतानशाहीची स्थापना करणा-या जलालउद्दीन खिलजीचा पुतण्या व जावाई होता. त्याने १२९६ ते १३१६ या कालखंडामध्ये दिल्लीवर राज्य केले. अफगाणिस्तानातील खल्ज या ठिकाणी अनेक वर्षापासून ते राहत असल्यामुळे त्यांना खिलजी म्हटले जाऊ लागले. परंतु खिलजी घराण्याबाबत इतिहासकारामध्ये मतभेद आहेत. स्मिथ हा इतिहासकाराने खिलजी यांना अफगाण किंवा पठाण मानतो, तर सर हेग त्यांना तुर्क जातीचे मनतो. अल्लाउद्दीन खिलजी अतिशय शूर, महत्वकांक्षी व व्यवहारी होता. तो कारा माणिकपूरचा राज्यपाल होता. माळव्यावर व देवगिरीवर स्वारी करून त्याने मोठी संपत्ती मिळविली. त्याला दिल्लीची सत्ता मिळवायची होती. सर्व तरूण खिलजी सरदार वृध्द सुलतानाच्या महत्वकांक्षाहीन नेतृत्वाला कंटाळले होते. अल्लाउद्दीने त्याचा फायदा घेण्याचे ठरविले व त्याने सुलतानाला कारा येथे भेटीसाठी बोलावले. पुतण्याच्या प्रेमाने आंधळा झालेला सुलतान भेटीसाठी गेला असता अल्लाउद्दीन खिलजीने जलालुद्दीनचा कौशल्याने खून केला. १९ जुलै १२९६ रोजी स्वतः गादीवर बसला.

**१) पूर्वइतिहास :**

अल्लाउद्दीन खिलजीचा जन्म इ.स. १२६६ साली झाला. तो लहान असतानाच त्याच्या पित्याचे निधन

झाले. अल्लाउद्दीनचे मूळ नाव अली गर्शप असे होते. लहाणपणीच त्याचा पिता शिहाबुद्दीन निधन पावल्यामुळे अल्लाउद्दीनचे पालनपोषण त्याचा काका जलालुद्दीन फिरोज खिलजीने केले. जलालउद्दीनने अल्लाउद्दीनचे शौर्य व हुशारी पाहून आपल्या एका मुलीचा विवाह त्याच्या बरोबर केला. अल्लाउद्दीन खिलजी निरक्षर होता परंतु युध्दकलेचे त्यास उत्तम ज्ञान होते. कोणतीही गोष्ट तो सहज साध्य करू शकत असे.त्याचे पराक्रम पाहून त्याला उच्चपदे व पदव्या दिल्या आणि कुरा व आयोध्या प्रांताचा राज्यपाल नेमले. पुतण्यावर खुष होऊन जल्लाउद्दीनने त्यास सेनापती म्हणून नेमले. अल्लाउद्दीन खिलजीच्या कार्य कर्तृत्वामुळे दिल्ली दरबारी त्याचे वजन वाढत गेले.

**२) देवगिरीवरील स्वारी :**

अल्लाउद्दीन खिलजीला भेलसावरील स्वारीच्या वेळेस दक्षिण भारतातील देवगिरी राज्याच्या संमृध्दीची माहिती मिळाल्यानंतर त्याने या राज्यावर स्वारी करण्याचे ठरविले. त्यावेळी देवगिरीवर रामचंद्रदेव यादवाची सत्ता होती. अल्लाउद्दीनने चंदेरीवर स्वारी करण्याचे खोटे कारण सांगून सुलतानाची परवानगी मिळविली. प्रत्यक्षात मात्र तो चंदेरीला गेला नाही. अतिशय गुप्तपणे तो २० हजार सैन्यासह मध्यभारत व बुंदेलखंडाच्या घनदाट जंगलातून तो अचानकपणे एलिचपूर या देवगिरीच्या सीमेवरील ठिकाणी पोहचला. रामचंद्रदेव यादवास या स्वारीची कोणतीच कल्पना नसल्यामुळे तो पूर्णपणे बेसावध होता. रामचंद्रदेवाचा मुलगा शंकरदेव स्वारीसाठी बाहेर गेला होता. अल्लाउद्दीन खिलजीने देवगिरीला वेढा दिला. वेळ काढण्यासाठी रामचंद्रदेवाने तहाची बोलणी सुरू केली. मात्र शंकरदेव स्वारीवरून परत आल्यामुळे तहाची बोलणी झाली नाहीत. अल्लाउद्दीन खिलजी व रामचंद्रदेव यांच्यामध्ये घनघोर युध्द झाले यामध्ये रामचंद्रदेवाचा पराभव केला. शंकरदेवाने मोठा पराक्रम दाखविला. परंतु असामान्य धाडस व प्रगत युध्दतंत्र यामुळे अल्लाउद्दीन खिलजीला विजय मिळाला. उभयतांमध्ये तह होऊन एलिचपूरचा महसूल प्रतिवर्षी अल्लाउद्दीन खिलजीला मिळाला. अल्लाउद्दीनला या स्वारीमध्ये ६०० मण सोने, ७ मण मोती, २ मण हिरे, १०० मण, चांदी व ४००० रेशमी वस्त्राचे डाग इत्यादी लुट मिळाली. मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील देवगिरीवरील स्वारी ही महत्वपूर्ण घटना होय. या स्वारीमुळे दिल्लीच्या सुलतानासाठी दक्षिण भारताचे दरवाजे कायमचे उघडले गेले.

**३) राज्यारोह :**

देवगिरीच्या विजयानंतर अल्लाउद्दीन खिलजीने दिल्लीची सत्ता मिळविण्याचे ठरविले. दिल्ली दरबारातील सर्व तरूण महत्वकांक्षी सरदार जलालुउद्दिनच्या मवाळ व महत्वकांक्षाहीन नेतृत्वाला कंटाळले होते. अल्लाउद्दीन खिलजीने या परिस्थितीचा फायदा घेण्याचे ठरविले. त्याने सुलतानाला कुरा येथे भेटीस यावा असे कळविले पुतण्याच्या प्रेमाने आंधळा झालेला सुलतान अल्लाउद्दीनच्या भेटीसाठी गेला, १९ जुलै १२९६ रोजी अल्लाउद्दीने त्याला कपटाने ठार केले व स्वतःला सुलतान म्हणून घोषीत केले.

**४) राजसत्तेचा सिध्दांत :**

बल्बनच्या ईश्वरी वरदान सिध्दांतावर अल्लाउद्दीन खिलजीची राजपदाविषयीची संकल्पना आधारलेल्या होत्या. सुलतान हा ईश्वराचा पृथ्वीवरील प्रतिनिधी असल्यामुळे तो इतरांपेक्षा श्रेष्ठ आहे. सुलतानाला कोणीही नातेवाईक नाहीत. सर्व लोक त्याची प्रजा आहे. सर्वांवर सुलतान आपली सत्ता गाजवू शकतो. पृथ्वीवर

सुलतानापेक्षा श्रेष्ठ व्यक्ती दुसरी नाही अल्लाउद्दीन म्हणत असे' राज्यहितासाठी व लोककल्याणासाठी मला जे कृत्य योग्य वाटेल ते मी केल्याशिवाय राहणार नाही. मग ते इस्लाम धर्माला धरून असो किंवा नसो. कायदेशीर असो अथवा बेकायदेशीर असो. राज्यकारभारात धर्माची व धर्मगुरूंची लुडबुड कमी करून धर्म आणि राजकारण यांची फारकत करणारा अल्लाउददीन खिलजी हा पहिला मुस्लिम सुलतान होता. अल्लाउद्दीनचे सुलतानपद अमीर उमराव किंवा उलेमा यांच्या बळावर अवलंबून नसून त्याच्या स्वतःच्या सैनिक सामर्थ्यावर आधारलेले होते.

**५) अल्लाउद्दीन खिलजीचे अंतर्गत धोरण आणि सुधारणा :**

अल्लाउद्दीन खिलजीने साम्राज्य विस्ताराबरोबरच प्रशासकीय सुधारणेकडे ही तेवढेच लक्ष दिले. अलाउद्दीन खिलजीने कायम स्वरूपी खडे सैन्य उभारले. सैन्याचा पगार राज्याच्या तिजोरीतून रोख देण्यास सुरूवात केली. हिंदू-मुस्लिम या दोघांचीही भरती पायदळ घोडदळ व हत्तीदलामध्ये केली जात असे. याबरोबर अंगरक्षकाची संख्याही मोठी होती. त्यांना जानदार म्हटले जाई. अल्लाउद्दीन खिलजीचे अंतर्गत धोरण व सुधारणा पुढील प्रमाणे सांगता येईल.

**अ) प्रशासन व्यवस्था :**

अल्लाउद्दीन खिलजीने प्रशासनाच्या सोयीसाठी विविध विभाग निर्माण केले. या विभागावर विविध अधिकाऱ्यांच्या नेमणूका केल्या. मध्यवर्ती प्रशासनातील सर्व अधिकार सुलतानाकडे ठेवले. विविध मंत्र्यांच्या नेमणूका केल्यामुळे प्रशासनामध्ये एकवाक्यता आली. त्यामध्ये पुढील मंत्र्यांच्या नेमणूका केलेल्या होत्या.

**१) दिवाण-इ-वझारत :**

दिवाण-इ-वझारत हा मुख्यमंत्री होता. साम्राज्यातील जमीन महसुलाचे अधिकार याच्याकडे दिलेले होते.

**२) दिवाण-इ-इन्शा :**

या मंत्र्याकडे राज्यातील सरकारी पत्रव्यवहार सांभाळण्याचे काम होते.

**३) दिवाण-इ-रियासत :**

या मंत्र्याकडे आर्थिक धोरण ठरविण्याचे काम असे. यातून राज्याची आर्थिक बाजू भक्कम करणे हे त्याचे उद्दिष्ट असे.

**४) दिवाण-इ-आरिझ :**

याच्याकडे सैन्यप्रमुखाचे काम होते. सैन्यभरती करणे सैन्याचे संघटन करणे व सैन्याचा पगार देणे इत्यादी कामे त्याला करावी लागत असत.

**५) दिवाण-इ-रसालत :**

हा मंत्री परराष्ट्र खाते साभाळत असे. परराज्याबाबतचे धोरण तो आखत असे. परराज्यातून आलेल्या मान्यवरांचे तो स्वागत करून त्यांची काळजी घेत असे.

**ब) सैन्य व्यवस्था :**

देशात शांतता व सुव्यवस्था ठेवण्यासाठी करण्यासाठी सुज्ज अशी सैन्य व्यवस्था असणे आवश्यक होते. अल्लाउद्दीन खिलजी हा पहिला सुलतान होता की ज्याने आपल्या साम्राज्यात राजधानीच्या ठिकाणी सुसज्ज सैन्याची व्यवस्था निर्माण केली. राजधानीत ४ लाख ५० हजार सैन्य जय्यत तयार असे. अल्लाउद्दीन खिलजीने सैन्य व्यवस्थेकरीता दिवाण-इ-आरिझ हा एक स्वतंत्र विभाग झाला. सैन्य मंञ्याला लष्करात सैन्य भरती करण्याचे सर्व अधिकार देण्यात आले होते. त्यामुळे उत्तम सैन्य भरती होण्यास मदत झाली.

**१) सैन्यातील श्रेण्या :**

सैन्य भरतीमध्ये तुर्की पध्दत व घोडदळमध्ये श्रेणी पध्दतीनुसार अल्लाउद्दीन खिलजीने सैन्याची उभारणी केली. अशी सैन्यभरती करणारा तो पहिला सुलतान होता. पहिल्या श्रेणीतील सैन्यातील दोन पेक्षा जास्त घोडे ठेवावे लागत असत. त्याला २३४ टंका पगार मिळत असे. व्दितीय श्रेणीतील सैन्यांना दोन घोडे ठेऊन त्या मोबदल्यात १५६ टंका वार्षिक पगार दिला जात असे. तृतीय श्रेणीच्या सैनिकाला एक घोडा ठेवल्यास ७८ टंका वार्षिक पगार दिला जात असे.

**२) खडे सैन्य :**

अल्लाउद्दीन खिलजीने प्रथमतः खडे कायमस्वरूपी सैन्य उभारले. या सैन्याला रोख पगार दिला देण्यास सुरूवात केली. सुलतानाने स्वत:साठी अंगरक्षकांच्याही नेमणूका केल्या त्याला जानदार म्हणत असत. अल्लाउद्दीन खिलजीने आपल्या सैन्य दलामध्ये हिंदू व मुस्लीम या दोन्ही धर्मातील लोकांना सैन्यामध्ये भरती करून घेतले जात असे.

**३) जहागीर पध्दत बंद :**

अल्लाउद्दीन खिलजीने सेनापती किंवा सैनिक अथवा कोणत्याही अधिकाऱ्याला जहागीर देण्याची प्रथा बंद करून टाकली. लष्करातील सैन्याला रोख पगार दिले. अल्लाउद्दीन खिलजीच्या या धोरणामुळे साम्राज्यात शांतता व सुव्यवस्था निर्माण झाली.

**४) विशेष सवलती संपुष्ठात :**

मुकादम चौधरी, खोत या हिंदू व मुस्लिम अधिकाऱ्यांना ज्या विशेष सवलती मिळत होत्या त्या पूर्णपणे संपुष्ठात आणल्या. त्यामुळे राज्याच्या तिजोरीत मोठया प्रमाणात पैसा गोळा होण्यास मदत झाली. जमिनी, इनामे, पेन्शस रद्द- इनामे पेन्शनस् आणि धार्मिक संस्था यांना दिलेल्या जमिनी रदद केल्या. इनामे, पेन्शनस् रद्द करून सुलतानाने लोकांच्याकडील पैसा वसुल केला. धार्मिक संस्थांना दिलेल्या जमिनी खालसा केल्या व त्या सरकार जमा केल्या. यातून खूप मोठा फायदा झाला.

**५) घोड्यांना डाग देण्याची पध्दत :**

अल्लाउद्दीन खिलजीने घोडदळामध्ये एकसुत्रता आणण्यासाठी व भ्रष्टाचार बंद करण्यासाठी घोड्यांना डाग

देण्याची पध्दत सुरू केली. घोडदळातील घोडयांची आदलाबदल बंद झाली. घोडयाची तपासणी करण्यात आली. अल्लाउददीन खिलजीच्या या सुधारणेमुळे उत्तम घोडदळ निर्माण होऊ शकले.

**६) हजेरीपट :**

अल्लाउद्दीन खिलजीने लष्करातील सैन्यांची मोजदाद ठेवण्यासाठी हजेरीपट पध्दत आमलात आणली. या सरकारी हजेरी पटामध्ये सैनिकांचे नाव, रंग, शरीरावरील खाणाखूणा याची लेखी माहिती ठेविली जात असे. सैनिकांची रोज हजेरी घेतली जात असे. या नोंदणी पध्दतीमुळे हजर, गैरहजर याची माहिती मिळत असे.सैन्यातील भ्रष्टाचार कमी झाला. सैन्याची कार्यक्षमता वाढविण्यासाठी घोडयांची दररोज परेड घेण्यात येऊ लागली.

**७) किल्ले प्रशासन :**

अल्लाउद्दीन खिलजीच्या संरक्षण व्यवस्थेत किल्ल्यांना अतिशय महत्व होते. अनेक नवे किल्ले बांधून जुन्या किल्ल्यांची डागडुजी करण्यात आली. किल्ल्यावर अनुभवी सैनिकांच्या व प्रामाणिक अधिकाऱ्यांच्या नेमणूका करण्यात आल्या. अशा या व्यवस्थेमुळे मंगोल आक्रमणापासून अल्लाउद्दीन खिलजीच्या साम्राज्याचे संरक्षण होऊ शकले.

**क) न्यायव्यवस्था :**

अल्लाउद्दीन खिलजीने न्यायदान व्यवस्थेत सुधारणा करत काझींच्या नेमणूका केल्या. अपराध्यांची चौकशी करण्यासाठी पोलीस व गुप्तहेरांची मदत घेतली जात असे. न्यायदानाच्या क्षेत्रात मुस्लिम कायदा पद्धती प्रचलित असल्यामुळे हिंदू प्रजेला न्याय मिळणे कठिण असे. पोलीस व गुप्तहेरांच्या माध्यमातुन गुन्हेगाराची चौकशी करून काझी मुसलमान कायद्याप्रमाणे न्याय देत असे.

**ड) सामाजिक सुधारणा :**

अल्लाउद्दीन खिलजीने समाजाच्या व राज्यकारभाराच्या दृष्टीने अनेक सुधारणा घडवून आणल्या. सामाजिक सुधारणा करीत असताना कोणाचाही सल्ला घेतला नाही. अल्लाउद्दीन खिलजीने केलेल्या सामाजिक सुधारणा महत्वपूर्ण मानल्या जातात.

**१) मादक पदार्थावर बंदी :**

सुलतानाविरूद्ध अनेक सरदार व जनता मादक पदार्थ प्राशन करून काहीही बरळत असे. त्यामुळे सुलतानाने साम्राज्यात मद्य घेण्यास पूर्णपणे बंदी घातली. हा कायदा आमलात आणण्यासाठी स्वतः मद्य सोडले. संपूर्ण दिल्लीत मद्यपान बंद केले. या कायद्याचे पालन जे करणार नाहीत त्यांना कडक शिक्षा करण्यात आल्या.

**२) सरदारांच्या रक्तसंबंधांना आळा सामुदायिक कार्यक्रम व संम्मेलनावर बंदी :**

सामुदायिक कार्यक्रम व संम्मेलने अशा कार्यक्रमातून सुलतानाविरूद्ध कट कारस्थाने रचली जात असत. त्यामुळे असे कोणतेही सामुदायिक कार्यक्रम भरवावयाचे नाहीत असा कायदा केला.

**३) सरदार वर्गाची अतिरिक्त मालमत्ता जप्त :**

सरदार वर्गाकडे असलेली मालमत्ता व पैसा हेच सुलतानाविरूध्द कट करण्याचे मुख्य कारण होय. म्हणून सुलतानाने सरदार वर्गाकडील अतिरिक्त मालमत्ता जप्त केली. अनेक धार्मिक कारणांवरून सरदारांच्या जमिनी जप्त केल्या.

**इ) हिंदू विषयक कडक धोरण :**

अल्लाउद्दीन खिलजीने हिंदूवर कडक निर्बध लादले. त्यांच्याकडून उत्पन्नाचा निम्मा हिस्सा शेतसारा म्हणून घेतला. हिंदूवर जाचक असा जिझिया कर लादला. कुरण, घरे, जनावरे यावरही त्याने कर लादले. घोड्यावर बसणे, शस्त्रास्त्रे बाळगणे, उत्तम वस्त्रे वापरणे, धार्मिक उत्सव साजरे करणे इ. गोष्टींची हिंदुना मनाई होती. त्याच्या या निष्ठूर व जुलमी धोरणांमुळे हिंदू प्रजा अत्यंत त्रस्त झाली होती.

**ई) महसुल सुधारणा :**

अल्लाउद्दीन खिलजी हा पहिला सुलतान होता की ज्याने जमिनीची मोजणी केली. जमिनीमध्ये जे काही पिक येईल त्यानुसार महसुल आकारला जात असे. उत्पनाचा निम्मा भाग शेतसारा म्हणून वसुल केला जात असे. याशिवाय घरपट्टी, कुराणपट्टी, आयातनिर्यात जकात हे कर घेतले जात असत. शेतसारा रोख रक्कमेत किंवा धान्याच्या स्वरूपात भरण्याची पद्धत होती.

**१) वस्तूंचे भाव नियंत्रण :**

अल्लाउद्दीन खिलजीचे बाजार भाव नियंत्रण ही त्या काळातील एक व नाविन्यपूर्ण सुधारणा घटना होती. अल्लाउद्दीन खिलजीने जीवनोपयोगी वस्तूंचे भावनियंत्रण करून त्या अल्प किंमतीत सर्वसामान्य लोकांना मिळतील अशी व्यवस्था केली. अर्थशास्त्रीय दृष्टया या योजनेला महत्वाचे स्थान आहे. अल्लाउद्दीन खिलजीने बाजारावर नियंत्रण घालुन अनेक वस्तूंच्या किंमती ठरवून दिल्या. धान्याचे भाव निश्चित केले. त्या काळी बाजारात वस्तुंचे दर खालील प्रमाणे होते.

- **खाद्य पदार्थ**

| वस्तू | वजन | किंमत |
|---|---|---|
| गहू | १ मण | ७।। जीतल |
| तांदूळ | १ मण | ५ जीतल |
| साखर | १ मण | १$^{१}/_{३}$ जीतल |
| डाळ | १ मण | ५ जीतल |
| मीठ | १ मण | ५ जीतल |
| उडीद | १ मण | ५ जित्तल |
| तूप | २.५ शेर | १ जीतल |

| कापड व इतर वस्तू | | |
|---|---|---|
| रेशीम | १ नग | १६ टंका |
| कापड | १ नग | ६ टंका |
| उत्तम घोडा | १ नग | १०० ते १२० टंका |
| दुभती गाय | १ नग | ३ ते ४ टका |
| दुभती म्हैस | १ नग | १० ते १२ टंका |
| घरकाम करणारा गडी | १ | १० ते १५ टंका |
| सुंदर दासी | १ | २० ते ४० टंका |

रिजवी यांच्या मतानुसार एक जीतल एक पैशाबरोबरीचा तर एक टंका एक रूपयाच्या बरोबरीचा होता.

अशा प्रकारे त्याने विविध वस्तूंच्या किंमती ठरविल्या. याचवेळी त्याने असाही कायदा केला की शेतकऱ्यांनी आपले धान्य सरकारने नेमलेल्या व्यापाऱ्यांना विकावे. मालाच्या देवाण-घेवाणीसाठी दिल्लीत कापड बाजार व धान्य बाजार या दोन बाजारपेठा उघडल्या. व्यापाऱ्यांना सरकारतर्फे निश्चित धान्याचा कोठा देण्यात आला. 'दिवाण-इ-रियासत' हा स्वतंत्र विभाग बाजारावर देखरेख ठेवण्यासाठी सुरू केला. त्यावरील अधिका-याला 'शहना-ई-मंडी' असे म्हणत.या योजनेतील सर्वोच्च अधिकारी दिवाण-ई-रियासत असून त्याचा सर्व बाजारावर अधिकार चालत असे. त्याला मदत करण्यासाठी शहाना-ई-मंडी असे.त्याच्या हाताखाली वेगवेगळे अधिकारी असत. यातून त्याने काळबाजार व भष्टाचार मोडीत काढला. दलाली पध्दत पूर्णपणे बंद झाली. खोटे वजन व मापे वापरणाऱ्यास तुरूगात डांबण्यास सुरूवात केली.

अल्लाउद्दीन खिलजीला उत्तम प्रशासक मानले जाते. त्याच्या या सुधारणामुळे प्रशासनात एक शिस्त व सुसज्ज अशी व्यवस्था निर्माण झाली. सैन्य संघटनेमुळे साम्राज्यविस्तार करणे व साम्राज्याचे रक्षण करणे शक्य झाले. सम्राज्यात आपली पकड घट्ट ठेवण्यासाठी व शांतता निर्माण करण्यासाठी त्याने महत्वपूर्ण सुधारणा घडवून अणल्या.

**६) अल्लाउद्दीनची योग्यता :**

अल्लाउद्दीन खिलजीच्या योग्यतेबददल इतिहासकारांमध्ये मतभेद आहेत. स्मिथ म्हणतो अल्लाउददीन खिलजी एक जुलमी व रानटी राजा होता. त्यास न्यायनीतीची चाड नव्हती, तर लेनपूल म्हणतो जरी तो रक्तपिपासू व निर्दय शासक होता तरी तो एक शक्तिशाली व योग्य शासक होता हे कोणीही नाकबूल करणार नाही. अशा अल्लाउददीन खिलजीची योग्यता पुढील प्रमाणे सांगता येईल.

**अ) गुण :**

**१. सर्वश्रेष्ठ सुलतान :**

अल्लाउद्दीन खिलजी हा सुलतानशाहीतील सर्वश्रेष्ठ सुलतान मानला जातो. सुलतानशाहीतील दुसऱ्या

कोणत्याही सुलतानाला त्याच्या एवढा साम्राज्यविस्तार करता आला नाही. तो साहसी, असामान्य योध्दा व कुशल सेनापती होता.

**२. प्रतिभाशाली प्रशासक :**

अल्लाउद्दीन खिलजी हा उत्तम प्रशासक होता. त्याने परंपरागत प्रशासन व्यवस्थेमध्ये बदल करून नवीन प्रशासनाची स्थापना करणारा हा पहिला प्रशासक होय. त्याच्या कुशल प्रशासन व्यवस्थेमुळे बाहय आक्रमण व अंतर्गत बंडाचा बंदोबस्त होऊन राज्यात शांतता स्थापन झाली.

**३. विशाल राज्य निर्माण केले :**

सुलतान शाहीचे मोठे राज्य निर्माण करणारा, उत्तम प्रशासन निर्माण करणारा, दक्षिण भारतावर स्वारी करणारा अल्लाउद्दीन खिलजी हा मध्ययुगीन भारताचा अग्रगण्य शासक समजला जातो. तो सुलतानशाहीतील यशस्वी सुलतान म्हणून त्याचे स्थान श्रेष्ठ आहे.

**४. उत्तम योध्दा :**

अल्लाउद्दीन खिलजी उत्तम योध्दा व उत्तम तलवार बहाद्दर होता. त्याच्या प्रामाणिक व पराक्रमी सेनापतीमुळे त्याला अनेक विजय मिळाले.

**५. शांतता व सुव्यवस्था :**

अल्लाउद्दीन खिलजीने संपूर्ण राज्यामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. त्याने भरीव सुधारणा करून प्रशासन उत्तम केले. राज्यात भरीव सुधारणा करणारा तो पहिला सुलतान ठरला.

**६. कला प्रेमी :**

अल्लाउद्दीन खिलजी कला प्रेमी शासक होता. त्यांने सिरी नावाचे नवीन नगर वसविले, अनेक किल्ले, मशिदी, महाल व तलाव बांधले. अलाई दरवाजा व हजार खांबांचा राजवाडा ही त्याच्या स्थापत्य कलेची वैशिष्ट्ये आहेत.

**७. उलेमांचे वर्चस्व नष्ट केले :**

अल्लाउद्दीन खिलजीने मुसलमान धर्मगुरूंना प्रशासनापासून दूर ठेवण्याचे धोरण राबविले. उलेमा वर्गाचा राज्यकारभारातील हस्तक्षेप संपुष्टात आणले व राज्यकारभारावरील त्यांचे वर्चस्व नषट केले.

**८. विध्वानांचा आश्रयदाता :**

अल्लाउद्दीन खिलजीच्या दरबारामध्ये अमीर खुसरो, अमीर हसन वगैरे कवी तत्वज्ञ व इतिहासकार होते. तो स्वतः निरक्षर होता तरी देखील तो विध्दानाचा आश्रयदाता होता.

**ब) दोष :**

**१. क्रूर व निर्दयी :**

अल्लाउददीन भयंकर क्रूर व रक्तपिपासू होता. त्याने अनेकांच्या कत्तली केल्या. सत्तेसाठी जलालुद्दीन या काकाला कपटाने ठार केले. मंगोलाकडून जफरखान ठार झाल्यावर त्याला आनंद झाला. अल्लाउद्दीनने स्वतःची मुले व बेगमेसही कैदत टाकले. युध्द आणि रक्तपात हेच त्याचे जीवन होते.

**२. कडवा मुसलमान :**

अल्लाउददीन कट्टर मुसलमान होता. राज्यकारभारात इस्लाम धर्माला महत्व दिले नसले तरी तो स्वतः सच्चा मुसलमान समजत असे. त्याने इतर धर्मियांचा अनन्वित छळ केला.

**३. हिंदूंचा छळ :**

अल्लाउद्दीन खिलजीने अनेक हिंदु धर्मियांचा छळ केला. अनेकाना हिंदुंना मुस्लिम धर्म स्विकारायला लावला. हिंदुवर जाचक जिझिया कर लादला. तो कट्टर सुन्नी पंथीय असल्यामुळे त्याने नेहमी मुस्लिम धर्माचा पुरस्कार केला.

**३. नैतिक अधिष्ठानचा अभाव :**

नीती–अनीतीची चाड न बळगता कोणतेही कृत्य करावयास तो मागे पुढे पाहत नसे. अल्लाउद्दीन खिलजीच्या राज्याला नैतिकतेचे अधिष्ठान नव्हते. त्याच्या राज्याला सामान्य जनतेचा पाठिंबा नव्हता. त्याने स्वतःच्या स्वार्थी भावनेसाठीच सुधारणांची कामे केली.

● **सारांश :**

अल्लाउद्दीन खिलजीमध्ये चांगल्या आणि वाईट अशा दोन्ही प्रकारच्या गुणांचा त्याच्या व्यक्तिमत्वात समावेश होता. मध्ययुगीन भारताच्या राज्यकर्त्यात अल्लाउद्दीन खिलजीला उच्च व मानाचे स्थान दिले जाते. तो एक उत्तम राज्यकर्ता होता. एल्फीन्स्टनच्या मतानुसार अल्लाउददीन खिलजीची कारकीर्द वैभवशाली होती. काही क्रूर व जुलमी कृत्ये करून सुध्दा सर्वसाधारण सत्तेचा सदुपयोग करणारा तो यशस्वी सुलतान होऊन गेला.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्नः**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. अल्लाउद्दीन खिलजीचे मूळ नाव .......... होते.

अ) मुहंम्मद ब) अली खुली क) अली गर्शप ड) सय्यद

२. अल्लाउद्दीन खिलजीने स्वतःला सुलतान म्हणून .......... मध्ये घोषित केले.

अ) १२९६ ब) १२९७ क) १२९८ ड) १२९९

३. अल्लाउद्दीन खिलजीने सैन्य व्यवस्थेकरीता ........... हा स्वतंत्र विभाग सुरू केला.

अ) दिवाण-इ-आरिझ ब) दिवाण-इ-इन्शा

क) दिवाण-इ-वझारत ड) यापैकी नाही

४. अल्लाउद्दीन खिलजीने सैन्य भरतीमध्ये ........... पध्दत आमलात आणली.

अ) अफगाण ब) इराणी क) तुर्की ड) यापैकी नाही

५. अल्लाउद्दीन खिलजीने ........... देण्याची प्रथा बंद केली.

अ) वतन ब) पदव्या क) बक्षिसे ड) जहागीर

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. अल्लाउद्दीन खिलजीच्या स्वारीच्या वेळी देवगिरीवर कोणाची सत्ता होती?

२. अल्लाउद्दीन खिलजीने जमीन महसुलाचे अधिकार कोणत्या मंत्र्याकडे दिले होते?

३. कोणत्या सुलतानाने दक्षिणेवर पहिली स्वारी केली?

४. घोड्यांना डाग देण्याची पध्दत कोणत्या सुलतानाने सुरू केली?

५. अल्लाउद्दीन खिलजीने कोणते नवीन नगर वसविले?

### २.२.२ मुहंम्मद-बिन-तुघलकः प्रतीकात्मक प्रयोग :

मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील विविध प्रयोग करणारा सुलतान म्हणून मुहंम्मद-बिन-तुघलकाला ओळखले जाते. तो उत्तम वक्ता व उत्कृष्ठ लेखक होता. त्याला गणित, वैद्यक युध्दकला व राज्यकारभाराची उत्तम जाण होती. विद्या व कला यांचा तो ज्ञाता होता. दिल्ली सुलतानशाहीतील सर्व सुलतानामध्ये तो अधिक विध्वान होता. आपल्या कर्तबगारीवर शिपाई पदापासून सुलतान पदापर्यंत पोहचला. ग्यासुउद्दीन तुघलकाच्या मृत्युनंतर त्याचा मोठा मुलगा फकरूद्दीन जुनाखान उर्फ उलुघखान हा मुहंम्मद-बिन-तुघलक या नावाने इ.सन १३२५ मध्ये गादीवर आला.

**● मुहंम्मद बीन तुघलकाचा पूर्वइतिहास :**

मुहंम्मद-बिन-तुघलक बालपणापासूनच शूर व महत्वकांक्षी होता. मुहंम्मद-बिन-तुघलकाचे बालपणाचे नाव जुनाखान असे होते. त्याच्या वडिलाचे नाव ग्यासुददीन तुघलक होते. लहान पणापासूनच त्याची स्मरणशक्ती चांगली होती. प्रजेच्या कल्याणासाठी त्याने अनेक योजना राबविल्या. तो महत्वकांक्षी व शूर होता.

**● राज्यारोहण :**

इ. स. १३२५ मध्ये ग्यासुद्दीनच्या मृत्युनंतर तीन दिवसानी त्याचा मुलगा जुनाखानला नवीन शासक म्हणून

जाहिर करण्यात आले. तो उलगाखान किंवा फकरूद्दीन मुहंम्मद जौना मुहंम्मद-बीन-तुघलक हा किताब धारण करून सत्तेवर आला. वडिलांच्या मृत्युचा शोक प्रकट करण्यासाठी त्याने काळी वस्त्रे धारण केली. राज्यारोहणानंतर तो ४० दिवस तुघलकाबादला मुक्काम करून राहिला. शोकपर्वाच्या समाप्तीनंतर मुहंम्मद-बिन-तुघलकाने मोठ्या थाटामाटाने मिरवणुकीसह दिल्ली शहरात प्रवेश केला व तेथे सिंहासनारोहणाचा कार्यक्रम सुरू केला. सुलतानाच्या स्वागतासाठी संपूर्ण शहर सुशोभित करण्यात आले होते. राज्याभिषेकाच्या वेळी मुहंम्मद-बिन-तुघलक अनेक आप्तेष्ट सहकारी मित्र, कर्मचारी, विद्वांना पेन्शन, पदव्या, बक्षीसे, सवलती व जहागिरीची खैरात केली. या खैरातीमुळे लोक सुलतानाच्या कृत्याकडे दुर्लक्ष करू लागले.

● **मुहंम्मद-बिन-तुघलकाचे अंतर्गत धोरण** :

मुहंम्मद-बिन-तुघलकास राज्यकारभाराचे उत्तम ज्ञान होते. राज्यकारभारामध्ये बदल करण्याची त्याची इच्छा होती. नवीन-नवीन प्रयोग करून राज्यकारभाराची उत्तम घडी बसविण्याचा त्याने सतत प्रयत्न केला. मुहंम्मद-बिन-तुघलकाने प्रजेच्या कल्याणासाठी अनेक योजना राबविल्या. त्याने आपल्या कार्यकिर्दीमध्ये विविध नविन प्रयोग केले. यामध्ये राजस्व सुधारणा दोआबातील करवाढ, आदर्श कृषी योजना राजधानी बदलण्याचा प्रयोग, प्रतीकात्मक चलनांचा प्रयोग अशा विविध योजनांचा समावेश होता.

आदर्श कृषी योजना राबविण्याकरीता ६० चौरस मैलांवर ७० लाख टंका खर्च करून त्याकरीता तीन वर्षांचा कालावधी निश्चित करण्यात आला होता. तुघलकाने दिवाण-ए-कोहा हा स्वतंत्र विभागही शेतीच्या विकासाकरीता स्थापन केला होता. त्याने दिल्लीहून देवगिरी व देवगिरीहून पुन्हा दिल्ली असा राजधानी बदलण्याचा प्रयोगही केला. सर्वच प्रयोग अयशस्वी ठरले.

**१. राजस्व सुधारणा :**

मुहंम्मद-बिन-तुघलकाने सुलतान पदाची सुत्रे हाती घेतल्यानंतर सर्व राज्यात महसुलाचा दर एकच असावा अशी इच्छा व्यक्त केली. यासाठी प्रत्येक प्रांतात महसूल खर्च व उत्पन्नाचे एक रजिस्टर ठेवावे व त्याची एक प्रत दिल्ली दरबारी पाठवावी असा वटहुकूम त्याने काढला. सुलतानाच्या या निणर्यामुळे प्रशासनात एकवाक्यता आली.

**२. दुआबातील करवाढ** :

मुहंम्मद-बिन-तुघलक सत्तेवर आल्यानंतर मोठया प्रमाणात पैसे वाटले. त्यामुळे राज्याचा खजिना रिकामा झालेला होता. मात्र मुहंम्मद-बिन-तुघलकाला अनेक महत्वकांक्षी योजना अंमलात आणावयाच्या होत्या. त्याकरिता मोठया प्रमाणात पैसे लागणार होते. या सर्व परिस्थितीचा अभ्यास करून सुलतानाने गंगा-यमुनेच्या दुआबात शेतसारा वाढविण्याचा निर्णय घेतला. दुआबातील प्रदेश सुपीक असल्यामुळे तेथे शेतसारा वाढविल्यास शेतकरी निमूटपणे हा कर भरतील अशी मुहंम्मद-बिन-तुघलकाची अपेक्षा होती. या प्रांतामध्ये बहुसंख्य प्रजा हिंदू असल्यामुळे त्यांनी सुलतानाविरूध्द वेळो-वेळी बंडाळया चालविल्या होत्या. जर त्यांच्यावर अधिक शेतसारा लादल्यास तेथील हिंदू प्रजा त्यामुळे दरिद्री होईल व सुलतानाविरूध्द बंड करण्याची त्यांच्याकडे ताकद

राहणार नाही अशी मुहंम्मद-बिन-तुघलकाची अपेक्षा होती. मुहंम्मद-बिन-तुघलक हा पहिला सुलतान होता की त्याने ही योजना राबविली. मुहंम्मद-बिन-तुघलकाने कर वाढ योग्य रीतीने आमलात अणण्याकरीता 'दिवाण-ए- मुस्तखरिज' नावाचे एक स्वतंत्र खाते निर्माण केले. कर वसुली होते की नाही याची माहिती प्रांतानुसार वेळोवेळी या खात्याच्या माध्यामातून मिळणार होती. 'दिवाण-ए-कोहा' नावाचा दुसरा विभाग कृषी खात्यात निर्माण करण्यात आला होता. या विभागात महसुल खात्यातील सर्व माहिती जमा करावी अशी अपेक्षा होती. जवळ-जवळ ५ ते १० टक्क्यांनी दुआबात शेतसा-याचे प्रमाण वाढविण्यात आले. एवढेच नव्हेतर शेतसा-या व्यतिरिक्त पशु, घरे, कुरणे यावर ही कर लावण्यात आले. दुर्दैवाची गोष्ट म्हणजे ज्या वर्षी ही दरवाढ सुलतानाने अमलात आणली त्याच वर्षी दुआबात खुप मोठा दुष्काळ पडला. शेतकरी हैराण झाले परंतु सुलतानाने कर वाढ मात्र रदद केली नाही. कर वसुलीसाठी शेतक-यांचा छळ करण्यात आला. शेतकऱ्यांची परिस्थिती दयनीय झाल्यामुळे त्यांनी सुलतानाविरूध्द बंड केले. त्यावेळी दुष्काळग्रस्त प्रजेला जास्तीत जास्त मदत पाठवली. परंतु ही मदत पाठविण्यास खूप उशीर झाला होता. भ्रष्टाचारी अधिका-यांनी ही मुदत सुध्दा शेतकऱ्यांपर्यंत नीट पोहोचू दिली नाही. अशा प्रकारे सुलतानाची कर वाढीची योजना अपयशी ठरली.

**३. आदर्श कृषी योजना :**

मुहंम्मद-बिन-तुघलकाने शेतीच्या प्रगतीसाठी 'दिवाण-ए- कोही' हा एक नवीन विभाग निर्माण केलेला होता. या विभागाचे उद्दिष्ठ म्हणजे शेतक-यांना सरकारी साहय देऊन जास्तीत जास्त जमीन लागवडीखाली आणणे. मुहंम्मद-बिन-तुघलकाचे असे मत होते की सरकारने सुध्दा आदर्श शेती करावी. त्यासाठी सरकारने ६० चौरस मैलाचा प्रदेश लागवडीसाठी खरेदी केला व त्यावर लागवडीसाठी ७० लाख टंका मंजूर करण्यात आल्या. परंतु हा प्रयोग पूर्णपणे फसला. कारण या योजनेसाठी निवडलेली संपूर्ण जमिन नापीक होती. अधिकारी वर्ग भष्टाचारी निघाला. या योजनेसाठी देण्यात आलेला वेळी ही तीन वर्ष होता. तो कमी पडला.त्यामुळे हा प्रयोग रदद करण्यात आला.

**४. राजधानी बदलाचा प्रयोग :**

मुहंम्मद-बिन-तुघलकाची अणखी एक योजना म्हणजे राजधानी बदलण्याचा प्रयोग होय. ती योजना म्हणजे दिल्लीहून राजधानी हलवून ती देवगिरी येथे नेण्याची होती. दिल्ली शहरातील सर्व लोकांनी एका आठवड्याच्या आत दौलताबादला जावे असा सुलतानाने आदेश काढला. या आदेशाची आमलबजावणी काटेकोरपणे करण्यात आली. या प्रवासामध्ये हजारो लोक मरण पावले. दौलताबादला गेलेल्या लोकात मोठा असंतोष निर्माण झाला. त्याच बरोबर दौलताबादहून उत्तर प्रांतावर नीट लक्ष ठेवता येत नाही हे लक्षात आल्यानंतर सुलतानाने दिल्लीला पुन्हा राजधानी आणण्यास अनुमती दिली. राजधानी पुन्हा दिल्लीला आली. सुलतानाच्या राजधानी बदलण्याच्या प्रयोगामुळे मुहंम्मद-बिन-तुघलकाच्या प्रतिष्ठेला फार मोठा धक्का बसला. मुहंम्मद-बिन-तुघलकांने वरील अनेक सुधारणा आमच्या कार्यकाळात केल्या असल्या तरी आपणास या प्रकरणात फक्त त्यांच्या प्रतिकात्मक चलन पद्धतीचा अभ्यास करावयाचा आहे.

### ५. प्रतिकात्मक प्रचलनाचा प्रयोग/चलनाचा नवीन प्रयोग :

मुहंम्मद-बिन-तुघलकाची कारकीर्द म्हणजे भारतीय नाणेशास्त्राच्या इतिहासात महत्वाचा टप्पा आहे. कलात्मक दृष्टीने मुहंम्मद-बिन-तुघलकाची नाणी उत्तम आहेत. त्यातून सुलतानाचे व्यक्तिमत्व प्रतिबिंबित होते. नाणी पाडत असताना त्याचा नमुनादर्जा व सुबकता याकडे विशेष लक्ष दिले होते.

- **प्रतिकात्मक चलनाच्या प्रयोगास प्रारंभ :**

नवीन प्रयोग करण्याच्या त्याच्या छंदापोटी प्रतिकात्मक चलनाचा प्रयोग त्याने सुरू केला. चांदीच्या नाण्याची कमतरता निर्माण झालेली होती ती त्याला भरून काढावयाची होती. महत्वाचे म्हणजे मुहंम्मद-बिन-तुघलकाने सुलतान पदावर आल्यानंतर अफाट खर्च केलेला होता. यातून बाहेर पडण्यासाठी त्याने चलनाचा प्रयोग केला.

- **नाण्यातील नाविण्यता व विविध नाणी :**

मुहंम्मद-बिन-तुघलकाने चलन पद्धतीने अनेक सुधारणा केल्या. त्याने दोकानी नावाची नवीन नाणी सुरू केली. त्याचप्रमाणे दिनार नावाचे २०० ग्रेन वजनाचे सोन्याचे व १४४ ग्रेन वजनाचे चांदीचे नाणे सुरू केले. मुहंम्मद-बिन-तुघलकाच्या नाण्यांची जडण-घडण, आकार व सुबकता या गोष्टी अत्यंत नाविण्यपूर्ण होत्या. त्या नाण्यावर नाणे जेथे पाडण्यात आले आहे त्या ठिकाणच्या टाकसाळीचे नाव व कोणत्या वर्षी ते नाणे पाडले आहे ते वर्ष इत्यादी मजकूर त्यावर कोरलेला असे. या सर्वात प्रतिकात्मक मुद्रेच्या रूपाने तांब्याची नवी नाणी सुरू करण्याचा त्याचा प्रयोग अभिनव होता. मुहंम्मद-बिन-तुघलकाची सोन्याचांदीची सहा प्रकारची तर तांब्याची १२ प्रकारची व मिश्र नाणी २५ प्रकारची होती.

- **नाण्याच्या प्रयोगाचे परिणाम :**

मुहंम्मद-बिन-तुघलकाच्या तांब्याच्या नवीन नाण्यांच्या प्रयोगाचा साम्राज्यातील आर्थिक परिस्थितीवर विपरीत परिणाम झाला. सोने, चांदी बाजारातून लुप्त झाले. तांब्याची नाणी स्विकारण्यास परदेशी लोकांनी सुध्दा नाकारले. यातून राजमुद्रेचे अवमूल्यन झाले. जवळ-जवळ १०० तांब्याच्या नाण्याची किंवा सोन्याचा एक टका झाली. त्याचा परिणाम आवश्यक वस्तूंच्या किंमतीवर घडून आला. शेती, उद्योग, व्यापार यावर मोठा परिणाम घडून आला. राज्यामध्ये आर्थिक अराजकता निर्माण झाली. सर्वसामान्य जनतेने सोने-चांदी लपवून राज्याचा कर देण्याकरीता याच नाण्यांचा उपयोग केला. सर्वसामान्य जनतेला या योजनेचा खुप त्रास सहन करावा लागला. सर्व राज्यात अराजकता व अव्यवस्था निर्माण झाली. त्यामुळे मुहंम्मद-बिन-तुघलकाने आपाली ही योजना मागे घेतली.

- **नाणी बदलाचा आदेश :**

मुहंम्मद-बिन-तुघलकाने नवा वटहुकूम काढला व असे जाहीर केले की लोकांनी आपल्या जवळ असलेली तांब्यांची नाणी सरकारी खजिन्यात जमा करून त्या मोबदल्यात सोन्याची नाणी घेऊन जावीत या आदेशामुळे मोठा गोंधळ निर्माण झाला. हजारो लोक नाणी बदलण्यासाठी पुढे आले. तांब्याच्या नाण्यांचे

ढीगच्या ढीग कोषगारात जमा झाले. त्यामुळे कोषागारातील सर्व सोने लोकांमध्ये वाटले गेले. अशा प्रकारे मुहंम्मद-बिन-तुघलकाचा प्रतिकात्मक मुद्रा प्रचलनाचा प्रयोग फसला गेला.

● **अपयश :**

मुहंम्मदाच्या नाण्याच्या प्रयोगाला अपयश का आले. त्याची कारणे थोडक्यात सांगता येतील. ती म्हणजे १) टांकसाळीवर सरकारचे नियंत्रण नव्हते. २) हा प्रयोग समजण्यासाठी जनतेला शिक्षण द्यायला हवे होते तसे दिले गेले नाही. ३) मुहंम्मद-बिन-तुघलकाने या योजनेची अंमलबजवाणी नीट केली नाही. ४) मुहंम्मद-बिन-तुघलकाने ज्या वेगवेगळया योजना आमलात आणून जो गोंधळ घातलेला होता. त्यामुळे प्रजेचा त्यावर विश्वास राहिला नव्हता.

अशा विविध कारणांमुळे मुहंम्मद-बिन-तुघलकाला या योजनेत अपयश आले. मुहंम्मद-बिन-तुघलकाने तांब्याच्या नाण्यांच्या उत्पादनावर अथवा राज्याच्या टाकसाळीवर नियंत्रण न ठेवण्याची मोठी चुक केली. त्यामुळे कोणीही व्यक्ती नाण्याच्या आकाराचे धातूंचे तुकडे तयार करून त्यावर राजकीय टाकसाळीत राजमुद्रेचा ठसा घेऊन चलनाच्या रूपात या नाण्यांचा उपयोग करू लागला. परिणामी सर्वांनी स्वतःच्या घरी किंवा सोनाराकडून तांब्याची नाणी पाडून घेतली. सरकारी कर भरण्यासाठी खरेदी विक्रीसाठी तांब्याची नाणी उपयोगात आणून सोन्या चांदीची नाणी घरात ठेवली गेली.

● **सारांश :**

मुहंम्मद-बिन-तुघलकाचा नवीन चलनाचा प्रयोग साम्राज्याच्या आर्थिक परिस्थितीवर गंभीर परिणाम करणारा ठरला. व्यापार, उद्योग, व्यवसाय यांची जबर हानी झाली. बाजारातून सोने व चांदी नष्ट झाले. परकीय व्यापारी आर्थिक देवणघेवाणीमध्ये तांब्याची नाणी नाकारू लागली. या संदर्भात इतिहासकार जियाउद्दीन बरनी लिहितो प्रत्येक हिंदूचे घर एक टाकसाळ झाले. सर्व प्रजेने सोने, चांदी लपवून राज्य कर देण्याकरिता याच नाण्याचा उपयोग केला. राजमुद्रेचे अवमूल्यन झाले. शंभर तांब्याच्या नाण्यांबरोबर सोन्याच्या एका टंकाची किंमत झाली. राज्यामध्ये अस्थिरता व गोंधळ निर्माण झाला. यामुळे मुहंम्मद-बिन-तुघलकाने ही योजना बंद केली व साम्राज्यातील लोकांना कळविण्यात आले की त्यांच्याजवळ असलेली तांब्याची नाणी सरकारी खजिन्यात जमा करून त्या मोबदल्यात सोन्याची नाणी घेऊन जावीत तुघलकाबादमध्ये हजारो लोकांनी आणलेल्या नाण्यांचे ढीगच्या ढीग लागले. परिणामी मुहंम्मद-बिन-तुघलकाच्या आदर्श योजनेला अपयश आले. आदर्श व दूरदृष्टीची योजना असूनही अंमलबजावणी योग्य रितीने झाल्याने हा प्रयोग अयशस्वी झाला.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न** :

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. मुहंम्मद-बिन-तुघलक .......... साली गादीवर आला.

अ) १३२० ब) १३२५ क) १३५० ड) १३५५

२. मुहंम्मद-बिन-तुघलकाने .......... नाणे सुरू केले.

अ) दिनार ब) टंका क) रूपया ड) खोरसानी

३. मुहंम्मद-बिन-तुघलक राज्यारोहणानंतर ४० दिवस .......... शहरात मुक्काम करून राहिला होता.

अ) बिदर ब) लाहोर क) दौलताबाद ड) तुघलकाबाद

४. मुहंम्मद-बीन-तुघलकाने आपली राजधानी बदलून .......... येथे हालविण्याचा प्रयत्न केला.

अ) गुलबर्गा ब) बिदर क) देवगिरी ड) होस्पेट

५. मुहंम्मद-बिन-तुघलकाने राबविलेल्या चलनाच्या प्रयोगामध्ये तांब्याची नाणी .......... प्रकारची होती.

अ) १० ब) १२ क) १४ ड) १६

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. मुहंम्मद-बिन-तुघलकाने शेतीच्या प्रगतीसाठी कोणता नवीन विभाग निर्माण केलेला होता?

२. 'प्रत्येक हिंदूचे घर एक टांकसाळ झाले.' असे कोणत्या इतिहासकाराने म्हटले आहे?

३. मुहंम्मद-बिन-तुघलकाची मिश्र नाणी किती प्रकारची होती?

४. मुहंम्मद-बिन-तुघलकाने कोणत्या प्रांतात कर वाढ केली?

५. मुहंम्मद-बिन-तुघलकाने आदर्श कृषी योजना राबविण्यासाठी दिलेला वेळ किती वर्षे होता?

## २.२.३ कृष्णदेवराय लष्करी विजय व सांस्कृतिक कार्य :

**● प्रास्ताविक :**

मुहंम्मद-बिन-तुघलकाच्या कारकिर्दीत दक्षिण भारतात अराजकता व गोंधळ निर्माण झाला. त्याचा फायदा घेऊन हरीहर व बुक्क या बंधुनी इ. स.१३३६ मध्ये विजयनगर साम्राज्याची स्थापना केली. या बंधुनी तुंगभद्रा नदीच्या काठी विजयनगर या शहरी आपली राजधानी स्थापन केली. दक्षिण भारताच्या इतिहासामध्ये विजयनगरचे वैभवशाली व विस्तारित सत्य म्हणून ओळखले जाते. विजयनगरच्या राज्यामध्ये चार घराण्यांनी राज्यकारभार केला. १) सगम वंश (१३३६ ते १४८६), २) शालुव शाल्व (१४८६ ते १५०५), ३) तुलुव वंश (१५०५ ते १५७०), ४) अरविंद वंश (१५७० ते १६१४) या वंशांनी मिळून विजयनगरवर जवळजवळ पावणे तीनशे वर्षे राज्य केले. यामध्ये संगम वंशातील १२ राजांनी शालुव वंशातील २ राजांनी, तुलुव वंशातील ५ राजांनी व अरविंद वंशातील ७ राजांनी राज्यकारभार साभाळला. त्यामध्ये कृष्णदेवराया विजयनगरचा सर्वश्रेष्ठ राजा होय. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये विजयनगर राज्याने प्रगतीचे शिखर गाढले होते. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये विजयनगरचे राज्य अति उच्च शिखरावर पोहचले होते. विजनगरच्या दृष्टीने कृष्णदेवरायाची

कारकिर्द वैभवशाली व भरभराटीची ठरली. विजनगरच्या दृष्टीने कृष्णदेवरायाची कारर्किद वैभवशाली व भरभराटीची ठरली. अखंड विजयी राजा म्हणून कृष्णदेवरायाचे स्थान श्रेष्ठ असेच आहे. कृष्णदेवराया उत्कृष्ट शासक होताच त्याच बरोबर कलेचा भोक्ता होता. कृष्णदेवराया विजयनगरच्या राजांमध्ये सर्वश्रेष्ठ राजा होता. त्यांच्या काळामध्ये विजयनगर राज्याचा सर्वांगिण विकास झाला.कृष्णदेवराया लढवय्या राजा उत्कृष्ठ प्रशासक व महान सेनानायक होता.

**● कृष्णदेवरायाचा पूर्वइतिहास :**

विजयनगरच्या सर्व सत्ताधीशांमध्ये कृष्णदेवरायाची किर्ती फार मोठी आहे. कृष्णदेवरायाचा जन्म १६ फेब्रुवारी १४७१ रोजी झाला. तो इ. स. १५०९ मध्ये विजयनगरच्या सत्तेवर आला. तो शूर वीर व लढवय्या सेनापती होता. अखंड विजयी म्हणून त्यांचा नावलैकीक होता. कृष्णदेवरायाची कारकिर्द विजयनगरला सर्वश्रेष्ठ बनविणारी ठरली.

**● राज्यारोहण :**

वीर नरसिंह तुलुव याच्यानंतर त्याचा भाऊ कृष्णदेवराया (१५०९-१५३०) सत्तेवर आला. तो सत्तेवर आला तेव्हा त्याला चोहोबाजूनी विरोध झाला. बहामनी, ओरिसा, उम्मतूर, आदिलशाह इ. लहान मोठे राजे कृष्ण देवरायाच्या विरूध्द उभा राहिले. प्रथमतः त्याने अंतर्गत बंडाळया मोडून सर्वावर बुध्दी चातुर्याने व कुशलतेने मात केली.

**● लष्करी विजय** :

**१) बहामनी व आदिलशाह बरोबर संघर्ष :**

कृष्णदेवरायाने राज्यारोहण केल्यानंतर लगेच बहामनी बरोबर संघर्ष करून त्याचा पराभव केला. दक्षिणेमध्ये बहामनी राज्याची स्थापना इ. स. १३४७ मध्ये झाली. विजयनगर व बहामनी यांच्यामध्ये नेहमीच संघर्ष सुरू होता. कृष्णदेवराया सत्तेवर आल्यानंतर त्यांच्याशी संघर्ष करावा लागला. गोवळकोंड्याच्या दक्षिणेस ७० कि. मी. अंतरावर कोविलकोंडा येथे मोठे युध्द झाले. विजयनगर सैन्यानी विजय मिळविला. बिदर व विजापूरच्या रोखाने शत्रू सैन्य पळून गेले. कृष्णदेवरायाने पळणाऱ्या सैन्याचा पराभव केला. गोवळकोंड्याचा किल्ला जिंकून घेतला. कृष्णदेवरायाच्या नेतृत्वाखाली विजयनगरला जवळ-जवळ १२५ वर्षानंतर विजय मिळाला. या युद्धामध्ये विजापूरचा युसूफ आदिलशहा व बिदरचा महंमुदशहा हे दोन्ही सुलतान हजर होते. महंमुदशहा जखमी झाला व युसूफ आदिलशहा याच वर्षी मरण पावला. इ. स. १५०९ मध्ये कृष्णदेवरायाने मिळविलेल्या या विजयाला महत्वाचे स्थान आहे. या विजयामुळे कृष्णदेवरायाची सर्वत्र प्रशंसा झाली.

**२) गंगराजाचा पराभव :**

विजयनगरच्या दक्षिणेस आसलेल्या या उम्मतूर येथील वोडेयार राजाने प्रभुत्व झुगारून देऊन स्वतंत्रपणे राज्य वाढविले. देपणाच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा गंगराज राजा झाला. त्याने विजयनगरवर मोहिम करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे कृष्णदेवरायाने त्याच्याविरोधी मोहिम हाती घेतली. इ. स. १५१२ साली कृष्णदेवरायाने

उम्मतूरवर स्वारी केली तेव्हा गंगराजा शिवसमुद्रमच्या किल्ल्यावर जाऊन बसला. कृष्णदेवरायाने सर्व सैन्याच्या तयारी निशी किल्ल्यावर हल्ला केला. तुंबळ युध्द झाले. अनेकजण मारले गेलेतर काही पळाले. स्वतः गंगराजा पळून जात असताना कावेरी नदीत पडल्याने त्याचा मृत्यु झाला. यात कृष्णदेवरायाला मोठा विजय मिळाला.

**३. ओरिसावरील मोहिम :**

ओरिसावरील मोहिम इ. स. १५१२ ते १५१६ अशी चार वर्षे चालली. कृष्णदेवरायाने केलेल्या ओरिसा बरोबरच्या संघर्षाची माहिती खालील प्रमाणे सांगता येईल.

**अ) उदयगिरीचा पाडाव :**

गजपती राजघराणे (१५१३-१५१४) ओरिसात सत्ता चालवित होते. उदयगिरीच्या गजपती प्रतापरूद्रने विजयनगरची महत्वाची स्थळे ताब्यात घेतल्याने विजयनगरला धोका निर्माण झाला होता. कृष्णदेवरायाने इ. स. १५१३ च्या सुरूवातीला ओरिसावरील स्वारीला प्रारंभ केला. प्रथमतः दुर्गम अशा विजदुर्गाच्या किल्ल्यावर हल्ला केला. प्रतापरूद्रचा चुलता तिरूमलने शरणागती पत्करली व तो प्रांत कृष्णदेवरायाने आपल्या ताब्यात घेतला.

**ब) कोंडाविडू व कोंडपल्ली (१५१५) :**

इ. स. १५१५ मध्ये ओरिसाच्या विजयानंतर कृष्णदेवरायाने सर्व तयारीनिशी कोंडविडू वर हल्ला केला. प्रथमतः किल्ल्यास वेढा दिला. किल्ल्यावरील संपूर्ण रसद तोडण्यात आली. किल्ल्यावरील अमलदार कृष्णदेवरायापुढे शरण आला. कृष्णदेवरायाने प्रतापरूद्रचा पुत्र वीरभद्रला कैद केले. कोंडाविडूच्या पराभवानंतर प्रतापरूद्राने कोंडपल्ली येथे आपला तळ ठोकला. या किल्ल्याला विजयनगर सैन्यानी वेढा दिला. विजयनगरच्या सैन्याला गजपती व कुतुबखान यांनी संयुक्तपणे विरोध केला. कृष्णदेवरायाला त्यामुळे दोघांबरोबर लढावे लागले. अगदी सर्व तयारीनीशी व आत्मविश्वासाने कृष्णदेवरायाने संयुक्त फौजांवर हल्ला केला. पराक्रम करून कृष्णदेवरायाने कोंडपल्लीवर विजय मिळविला व तो किल्ला सर केला. अशा प्रकारे कोंडविडू व कोंडपल्ली कृष्णदेवरायाने आपल्या वर्चस्वाखाली आणले.

**क) पोट्टनुरू व सिंहाद्री ठिकाणे काबीज :**

कृष्णदेवराने पोट्टनुरूवर हल्ला करण्याच्या अगोदर साळुव तिमाच्या सैन्याला कृष्णदेवरायाचे सैन्य मिळाले. विशाखापट्टणम् जवळच्या पोट्टनुरू या शहराजवळ येऊन हे संयुक्त सैन्य पोहचले. हे शहर म्हणजे प्रतापरूद्राच्या राज्याची राजधानी होती. प्रतापरूद्रानेही या युध्दाची मोठी तयारी केली. त्याने आपल्या अंकीत असलेल्या महापात्राना बोलावून घेऊन लढाण्याचे आव्हान केले होते. हे महापात्र म्हणजे स्वतंत्रपणे राज्यकारभार करणारे परंतु गजपतीचे मांडलिक असत. ही वार्ता कृष्णदेवरायाना समजताच त्याने यातून मार्ग काढण्यासाठी साळुव तिम्मा याच्या बरोबर चर्चा केली. त्याने कृष्णदेवरायाला फोडाफोडीचे राजकारण करण्याचा सल्ला दिला. सोन्या व हिऱ्यांनी भरलेल्या थैल्या प्रत्येक महापात्राकडे पाठविण्यात आल्या. त्यातील एक दोन थैल्या प्रतापरूद्राच्या हाती पडाव्यात अशी व्यवस्था करण्यात आली. महापात्राकडे पाठविलेल्या एक दोन थैल्या नेमक्या प्रतापरूद्राच्या हातात पडल्या. महापात्रापैकी बरेचजण फितूर झाल्याचे त्याची खात्री झाली. आता आपला

टिकाव लागणार नाही म्हणून त्याने रणांगणातून पळ काढला. राजा पळतो आहे म्हटल्यावर महापात्राही पळू लागले. शिल्लक राहिलेल्या सैन्यावर कृष्णदेवरायाच्या सैन्यानी हल्ला केला व त्यांचा पराभव केला. अशा प्रकारे कृष्णदेवरायाने पोट्टनूरूवर ताबा मिळविला. कृष्णदेवराया तेथे जवळजवळ सहा महिने थांबला. त्यानंतर कृष्णदेवराया सिंहाद्री येथे आला व ते ठिकाण ही त्याने ताब्यात घेतले. प्रतापरूद्र पराभूत झाल्यामुळे हतबल झाला. कृष्णदेवराय व प्रतापरूद्र यांच्यामध्ये सिंहाद्री येथे तह झाला त्यामध्ये जिंकलेल्या प्रदेशापैकी कृष्णेच्या दक्षिणेकडील सर्व प्रदेश विजयनगरच्या साम्राज्यात समाविष्ट व्हावा. उत्तरेकडील सर्व प्रदेश प्रतापरूद्राला परत द्यावा.या बरोबरच प्रतापरूद्राने आपली कन्या जगन्मोहिनी कृष्णदेवरायाला द्यावी.

**४. रायचूर मोहिम किंवा विजापूर सघर्ष १५२० :**

तुंगभद्रा व कृष्णा यांच्या दुआबात रायचूर हे प्रसिध्द शहर होते. अनेक वर्षे ते विजयनगरच्या ताब्यात होते. परंतु नंतर ते ४०-४५ वर्षे मुस्लिम सत्तेच्या ताब्यात होते. कृष्णदेवरायाने हे नगर जिंकूण घेण्याचे ठरवून सर्व मंत्र्यांची बैठक भरविली. रायचूर मोहिमेच्या तयारीला सुरूवात केली. आपला खास अधिकारी सिद्दी यास मोठी रक्कम देऊन घोडे विकत आणण्यासाठी गोव्याला पोर्तुगीजांकडे पाठविले. परंतु तो गोव्याला घोडी आणण्यासाठी न जाता विजापूरला रवाना झाला. इस्माईल आदिलशाहाला त्याने हे सांगताच त्याने त्याच्याकडील मोठी रक्कम काढून घेतली व त्याबदल्यात त्याला दाभोळची सुभेदारी दिली. कृष्णदेवरायाने सिद्दीला आमच्या ताब्यात दयावे असे सांगितले. मात्र ईस्माईलने त्याकडे दुर्लक्ष केले. यातूनच कृष्णदेवरायाने ईस्माईल व सिद्दी यांच्या विरोधात मोहिम हाती घेताली. लष्कराची प्रचंड तयारी करून कृष्णदेवरायाने या मोहिमेसाठी ७ लाख पायदळ, २५ हजार घोडदळ, सहाशे हत्ती अशा बलाढय फौजेनीशी रायचूरच्या आसपास छावण्या टाकल्या. कृष्णा नदीच्या उत्तरेला इस्माईलचे सैन्य होते. त्याने नदी ओलाडून कृष्णदेव रायाच्या सैन्यावर हल्ला करण्याचा धाडसी निर्णय सैन्याचा विरोध असतानाही घेतला. कृष्णदेवराया स्वतः युध्द मोहिमेवर युध्दाचे नेतृत्व करीत होता. विजयनगरच्या सैन्यानी रायचूर किल्ल्याला वेढा टाकला. विजयनगरच्या सैन्यामध्ये असणाऱ्या पोर्तुगीज सैन्याने महत्वपूर्ण कामगिरी करून रायचूर च्या किल्ल्यावरील तटाच्या वेशीच्या संरक्षकांना तोफेच्या साहयाने ठार केले. त्यामुळे विजयनगर सैन्याला रायचूर जिंकणे शक्य झाले. इ. स.१५२०मध्ये कृष्णदेवरायाने रायचूर पूर्ण जिंकून घेतले. रायचूर बरोबरच कृष्णदेवरायाने सागर, सोलापूर, गुलबर्गा, विजापूर या युध्द मोहिमावर आदिलशहाचा पराभव केला. या विजायानंतर कृष्णदेवरायाने या शहरामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण करून शहराचा कारभार सुरळीत चालू केला.

**५) सागर, केंभावी व गुलबर्गा ताब्यात :**

विजापूर व विजयनगर या सैन्याचा इ. स. १५२१ ते १५२४ या काळात संघर्ष होत राहिला. त्यातूनच रायचूरच्या नैऋतेस असणाऱ्या सागर व केंभावी या ठिकाणी मोठे युध्द झाले. आदिलशाही सैन्याचा विजयनगरच्या सैन्यानी पराभव केला. स्वतः कृष्णदेवराया या मोहिमेमध्ये जातीने हजर होता. या विजयानंतर विजयनगरचे सैन्य गुलबर्गा बिदर कडे वळले. मोठा संघर्ष होऊन गुलबर्गा बिदर ही शहरे कृष्णदेवरायाने आपल्या ताब्यात घेतली. अल्लाउद्दीन यास बहामनी सुलतान म्हणून जाहीर केले. त्याला तख्तावर बसविण्यात यशस्वी

झाल्यामुळे कृष्णदेवरायाने स्वतःस 'यवनराज्यस्थापनाचार्य' ही पदवी धारण केली. पुढे १५२८ ते १५२९ दरम्यान कुतुबशहा व आदिलशहा यांच्यावर हल्ले करून कृष्णदेवरायाने आपला दबदबा कायम राखत त्यांना सळो की पळो करून सोडले. पुन्हा त्यानी कृष्णदेवरायाच्या हयातीमध्ये कधीही डोके वर काढले नाही.

**६) पोर्तुगीजांशी मैत्री :**

कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीतील महत्वाचे वैशिष्ट म्हणजे त्याने पोर्तुगीजांबरोबर जोडलेले सलोख्याचे संबंध. पोर्तुगीजाकडून त्यांने उत्तम घोडे व इतर युध्दोपयोगी वस्तू मिळविल्या. पोर्तुगीजांनी भटकल येथे किल्ला बांधण्यासाठी कृष्णदेवरायाची परवानगी मिळविली. दोघांनी ही एकमेकांबरोबर मैत्री संपादन करून चांगले संबंध निर्माण केले. कृष्णदेवरायाने आपले राज्य हिंदी महासागरातील काही बेटासह उत्तरेकडे रायचूर दुआब व कृष्णा नदीपासून दक्षिणेकडे हिंदी महासागरापर्यंत आणि पूर्वेकडे विशाखापट्टमपासून पश्चिमेकडे दक्षिण कोकण पर्यंत वाढविले.

**● कृष्णदेवरायाचा मृत्यु :**

कृष्णदेवरायाचे मध्ययुगात भारताच्या इतिहासामध्ये एक अढळ स्थान आहे. अनेक बलाढ्य शत्रूवर मात करून विस्तीर्ण साम्राज्याची स्थापना केले. त्याने तिरूमल नामक आपल्या अज्ञान मुलास गादीवर बसविले. चाळीस वर्षे राज्यकारभार केल्या नंतर तो आजारी पडला. दरबारामध्ये अंतर्गत कलहाला सुरूवात झाली. यातच विजापूरचा आदिलशहा विजयनगरवर चालून आला. त्याला तोंड देण्याच्या तयारीत असताना व मोहिमेची तयारी करीत असताना इ. स. १५३० मध्ये कृष्णदेवरायाचा मृत्यु झाला.

**● कृष्णदेवरायाचे सांस्कृतिक योगदान :**

**सांस्कृतिक कार्य :** कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीत विजयनगरची ख्याती सर्व दूर पसरली होती. विजयनगरचे वैभव परकीय प्रवाशांना आकृष्ट करणारे होते. नुनीझ, पेस, बार्बोसा, फेरीस्ता, निकापलो कोंटी, अब्दुल रज्जाक यांनी भेटी दिल्या होत्या. आपल्या प्रवास वर्णनामध्ये त्यांनी विजयनगर शहराच्या कलावैभवाचे वर्णन केलेले असून स्थापत्यशास्त्राच्या दृष्टीकोणातून मंदिरे, गोपूरे, राजवाडे, महाल, तटबंदी, जलाशय, सभागृहे यांच्या वर्णनाची महिती येते. यातून आपणास विजयनगर सौंदर्याची महिती मिळते. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये साहित्य, नृत्य, नाट्य व संगीत आदि क्षेत्रामध्ये मोठया प्रमाणात प्रगती झाली. तो स्वतः विद्वान असल्यामुळे त्याने अनेक विद्वान व कलाकारांना राजधाश्रय दिला.

**● ग्रंथरचना – साहित्य :**

कृष्णदेवराया उत्तम वक्ता व संभाषणपटू होता. त्याच्या पदरी आठ नामांकित कवी होते.त्यांना अष्ट दिग्गज असे म्हटले जात असे. त्याने तेलगू भाषेला नेहमीच उत्तेजन दिले. इ. स.१५११ मध्ये कृष्णदेवरायाने स्वतः तेलगू भाषेमध्ये 'अमूक्त्यमाल्यदा' हे दिर्घ काव्य लिहिले. ते 'विष्णुचित्तीयमु'या नावानेही ओळखले जाते. कृष्णदेवरायाचे 'जांबुवंतीकल्यांणम' हे नाटक उपलब्ध आहे. कृष्णदेवरायाच्या राज्यघराण्यातील स्त्रियाही संस्कृतमधून कविता व नाटके लिहिण्यात रस घेत असत. कृष्णदेवराय स्वतः कन्नड भाषीक असूनही तेलगू व संस्कृत भाषेवर त्याचे प्रभुत्व होते. तेलगू भाषिकात आजही कृष्णदेवरायाला मानाचे स्थान आहे.

कृष्णदेवरायाच्या दरबारात तेलगू कवीचे वर्चस्व होते. राजदरबरात तेलगू भाषेला वरचे स्थान होते. त्याच्या कारकिर्दीत तेलगू वाङ्मय बहरास आले होते. कृष्णदेवराया कवी संमेलने भरवीत असे. दरबारातील राण्यासुध्दा या सोहळयाला हजर असत. तेलगुबरोबरच कृष्णदेवरायाच्या दरबारात कन्नड व तमिळ भाषेत ग्रंथ निर्मिती झालेली होती. कुमार सरस्वती व ज्ञानप्रकाश हे दोघे राजदरबारात राजकवी होते. कुमार सरस्वती याने कृष्णदेवरायाच्या लग्न सोहळ्यावर काव्य लिहिले आहे. कृष्णदेवरायाची थोरवी ज्ञानप्रकाश या कवीने गायली आहे.

● **स्थापत्य कलेतील प्रगती :**

विजयनगर हे शहरच स्थापत्यकलेचा आदर्श व उत्कृष्ट नमुना आहे. अतिशय देखण्या व सुंदर अशा आहेत. अनेक वास्तू या शहारामध्ये निर्माण केल्या. विजयनगरचे साम्राज्य स्थापत्य व कलेचे सुवर्णयुग होते. कृष्णदेवरायाने मंदिरे, कालवे, जलाशय, नविन नगरे यातून मोठ्या प्रमाणात स्थापत्यशैलीत प्रगती केली. विजयनगर राजधानी जवळ मातोश्री नागलादेवी हिच्या स्मृतिप्रीत्यार्थ नागलपूर शहराची निर्मिती केली. विजयनगर येथे कृष्णस्वामी मंदिर व रामस्वामी मंदिर बांधले. विविध गोपूरे, मंदिरे स्थापत्यकलेतील बांधकामाची साक्ष पटवितात. त्याने इ. स. १५२८ मध्ये विष्णूचा नृसिंह अवतार दर्शविणारा भव्य दगडी पुतळा बसविला. विजयनगरमध्ये अनेक बांधकामे करून शहर स्थापत्यकलेच्या दृष्टीने सुंदर बनविले.

कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये विजयनगरचे साम्राज्य अतिउच्च शिखरावर पोहचले होते. विजनगरच्या दृष्टीने कृष्णदेवरायची कारकिर्द वैभवशाली व भरभराटीची ठरली होती. कृष्णदेवराया उत्कृष्ट शासक होताच त्याच बरोबर कलेचा भोक्ता होता. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये निर्माण झालेले स्थापत्य भारताच्या इतिहासामध्ये श्रेष्ठत्व प्राप्त करून जाते. हजारस्वामी व कृष्णस्वामी ही दक्षिण भारतामध्ये प्रसिध्द अशी मंदिरे बांधली. विजयनगर राजधानीमध्ये एक विशाल तलाव बांधला. कृष्णस्वामीच्या मंदिराजवळ नृसिंहाचा २५ फूट उंच व फूट रूंदीचा प्रचंड दगडी शिल्प कोरले आहे.

वियनगरकालीन मंदिर बांधकामशैलीची दोन वैशिष्टे जाणवतात पदर सुटणारे दगड व ग्रेनाईट दगड विजयनगमधील बांधकामासाठी जास्तीत जास्त वापर केल्याचे दिसून येते. विजयनगर मधील वास्तूकला ही स्वतंत्र विजयनगर शैली म्हणून प्रसिध्दीस आली. मंदिराची सजावट. आकार, धार्मिक आचार व विचार यातून मंदिर परिसरातील वास्तूंची संख्या अनेक पटीने वाढली. हजार स्तंभानी युक्त असे मंडप बांधलेले असत. हे स्तंभ बांधकामाला व वरच्या तुलांन आणि छपराला मजबूत आधार देणारे देवतेतेचे मंदिर मध्यभागी व आकाराने विस्तृत असे ईशान्य बाजूला देवाच्या देवतेचे म्हणजेच पत्नीचे मंदिर छोटे लहान असे.मुख्य संभामंडपाचा वापर उत्सवनृत्य व प्रार्थनेसाठी केला जात असे. विजयनगरकालीन मंदिराच्या स्तंभावर मोठ्या प्रमाणात शिल्पे कोरलेली आढळतात.

हाजाररामा मंदिर व विरूपाक्ष मंदिर ही दोन मंदिरे विजयनगर शैलीची उत्कृष्ट उदाहरणे आहेत. आजही ही मंदिरे चांगल्या आवस्थेत आहेत. या वास्तू मध्ये मुख्य मंदिर, अम्मा मंदिर व भव्य सभा मंडप आहे.

मंदिराच्या मंडप गार्भायात वर उंच शिखर आहे. हे शिखर द्रविड शैलीचे आहे. मंदिराच्या बाहेरील भिंतीवर रामायणातील शिल्पे कोरलेली आहेत. मंडपाचे स्तंभ तुला व कर्णावर विपुल नक्षीकाम केलेले आहे.पूर्वेकडे गोपूर बांधलेले आहे.

कृष्णदेवरायाने विविध वास्तू, अनेक शिल्पे, जलाशये, अनेक कालवे इत्यादी. वास्तू बांधल्यामुळे विजयनगरच्या वास्तू शैलीला कळसास पोहचविले. वास्तूशिल्पामध्ये कृष्णदेवरायाने मौलिक कामगिरी केली. कृष्ण देवरायाच्या कारकिर्दीमध्ये वास्तूशिल्पे पुढील प्रमाणे सांगता येतील.

होस्पेट अनंतशयनगुडी कृष्णदेवरायाच्या सर्वश्रेष्ठ कार्याचे फलीत म्हणजे होस्पेट शहर होय. नागलपूर या नावाने ते ओळखले जात होते. हे शहर विजयनगरच्या कृष्णदेवरायाने निर्माण केले. इ. स. १५१६ मध्ये या नगराच्या बांधकामास सुरूवात झाली. पुढे इ. स. १५२० मध्ये ते पूर्ण झाले म्हणजे जवळ जवळ चार वर्षे या बांधकामासाठी लागली. हे नगर कृष्णदेवरायाच्या आवडीचे होते. तो तेथे अनेक दिवस मुक्कामास असे. हे शहर सर्वच बाबतीमध्ये वैभवशाली होते. शहरातील रस्ते अतिशय सुंदर होते. रस्त्याच्या दोन्ही बाजूला बाजार भरत असे. रस्त्याच्या दुतर्फा हिरवी गार झाडी होती.

● **अनंतशयनगुडी :**

कृष्णदेवरायाने इ. स. १५२४ मध्ये ही उपनगरी स्थापन केली. आपल्या पुत्राच्या जन्मवर्षी त्याच्या नावाने ही नगरी वसविली आहे. या नगरीमध्ये कृष्णदेवरायाने अनंतशयन हे मंदिर उभारले. हे देवालय १४७-८५ मीटर एवढे विस्तीर्ण मंदिर ४७ मीटर लांब व २५ मीटर रूंद आहे. या मंदिरातील सभा मंडपाची उंची २७ मीटरहून अधिक लांब व रूंदी २३ मीटर आहे. गाभाऱ्यातील घुमटाची उंची १० मीटर आहे. या घुमटाचा आकार अतिशय मनोवेधक आहे. मंदिराच्या सभोवतालच्या भिंतीची उंची जवळ जवळ २४ मीटर आहे. सध्या या मंदिराचा काही भाग उध्वस्त झालेला दिसतो.

● **जलाशय :**

कृष्णदेवरायाने इ. स. १५२० साली प्रचंड जलाशयाचे काम केले आहे. या कामासाठी कृष्णदेवरायाने पोर्तुगीज अभियंत्याची मदत घेल्याचे दिसून येते. हा जलाशय मोठे दोन पहाड जोडून निर्माण केला आहे.

● **राजनगरी :**

कृष्णदेवरायाची राजनगरी म्हणजे सौंदर्याचा उत्कृष्ट नमुना होय. या वैभवशाली राजनगरीमध्ये विविध वास्तू होत्या. राजप्रसाद, शासकीय इमारती, सेनापती, प्रधान व इतर अधिकाऱ्यांची निवासस्थाने होती. या नगरीमध्ये विविध उपविभाग होते. या नगरीत विश्रामगृहे, सभागृहे, खलबतखाने आणि मौल्यवान वस्तू किंवा शस्त्रास्त्रे ठेवण्यासाठी तळघरे ही होती. अशा विविध इमारतीनी राजनगरीची शोभा वढविली होती.

इ. स. १५२३ मध्ये कृष्णदेवरायाने दसरा डब्बा किंवा भमहानवमी डिब्बा ही वास्तू उभी केली. या बांधकामांना विजय मंदिर आणि भुवनविजय अशी नावे देण्यात आली. याच नावाने या वास्तू पुढे प्रसिध्दीस

आल्या. कृष्णदेवरायाने इ. स. १५१३ मध्ये हजारा राम नावाचे मंदिर उभारले. काही ठिकाणी मोठ-मोठे तलाव बांधले. संपर्ण रामायण उठावाच्या शिल्पात कोरलेले आहे. या मंदिरातील सभोवतालची शिल्पे कलाविष्काराचे दर्शन घडविते. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये वैष्णव मंदिर कृष्ण स्वामी मंदिर विजयनगर मधील सर्वात उंच ५२ मीटर उंचीचे गोपूर आहे. भव्य असे विजयविठ्ठल मंदिर तेवढेच सुंदर ही आहे. कृष्णदेवरायाने बांधलेले श्रीकृष्णाचे भव्य मंदिर आजही अप्रतिम स्थापत्यकलेचा उत्कृष्ठ नमुना आहे. इतिहासकार डॉ. ईश्वरी प्रसाद म्हणतात 'दक्षिण भारताच्या इतिहासात त्याची बरोबरी करणारा कोणीही हिंदू किंवा मुस्लिम शासक झालेला नाही'.

● **नाट्य कला :**

कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये नाटयकला बहरास आली. गायक, वादक, नर्तक, अभिनेते त्याला साथ देणारे नट हे एकत्र मिळून जो संच तयार होई त्याला त्याला 'मेळा'असे म्हटले जाई. हे मेळे गावेगावी फिरून आपली कला सादर करीत. उघड्या मैदानावर तंबू ठोकून मंच तयार केला जात असे प्रेक्षक उघडया मैदानावर बसून ती नाटके पाहत असत. प्राचीन कथा घेऊन हे कलाकार नाटक सादर करून मंनोरंजन करीत असत. अशा कलाकारांना खुप लोकप्रियता मिळत असे. त्यातून त्यांना चांगली बक्षिसेही मिळत असत. अशी नाटयकला सादर करण्यासाठी काही ठिकाणी नाट्यगृहे ही बांधल्याचा उल्लेख आहे.या नाटय प्रकारामध्ये स्त्री पात्रे ही असत ती पात्रे स्वतः स्त्रिया करीत असत. तसे उल्लेख शिलालेखात आले आहेत. हुबेहुब भासतील असे सजीव व नैसर्गिक देखावे रंगमचावरील पडद्यावर साकारले जात असत. नद्या, पर्वत, ओढे, नाले, अरण्ये, पशुपक्षी, विविध प्राणी आदी. देखावे रंगमंचावर उभे केले जात असत. जी पात्रे काम करणार आहेत. अशा कलावंतांनी केलेल्या केशभूषा व वेशभूषा हुबेहुब वाटत. कृष्णदेवरायाच्या कालखंडामध्ये 'बोग्मलाट' हा छायानाटयाचा प्रकार खूप लोकप्रिय होता.

● **संगीत व नृत्य :**

कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये संगीत व नृत्यकला भरभराटीला आली. विजयनगरच्या शिल्पामधून स्त्री-पुरूषांनी तंतूवाद्ये व चर्मवाद्ये हातात घेतल्याची जथ्थेच्या जथ्थे दिसतात. विजयनगरच्या विविध वास्तूवर या छटा कमी जास्त प्रमाणात दिसून येतात. कृष्णदेवराया स्वतः आपल्या कृष्णा या गुरूकडे विणावादन शिकला होता. एवढेच नव्हे तर कृष्णदेवरायाने राजस्त्रियांना गायन व वादन शिकविण्यासाठी उत्तम अशा संगीत शिक्षकाची नेमणूक केली होती.

● **चित्रकला :**

दशावतार, वालीवध, रावणवध, रावणाच्या दरबारात हनुमान, राम रावण युध्द, कालियार्दन, कृष्णाच्या विविध लीला, रामायण, महाभारत या प्राचीन प्रसंगाचे चित्रकलांचे चित्रीकरण मोठया प्रमाणात झाले. हिरवा, लाल, राखाडी या रंगाचा वापर या चित्रकलेमध्ये दिसून येतो. अंडाकृती चेहरा व अणूकुचीदार नाक हे या चित्रकलेचे वैशिष्ट होते. विविध प्राण्यांचे डोळे माणसांच्या डोळ्यांप्रमाणे होते. हे डोळे, पापण्या व भुवयासह काढण्याची पध्दत होती. विजयनगरच्या दरबारामध्ये परकीय चित्रकार होते. त्यामध्ये इंग्रज, पोर्तुगीज या

चित्रकारांचा उल्लेख करावा लागेल. विविध चित्रांवरून विजयनगरच्या कला व सौदर्याची प्रचिती येते. इंग्रजी चित्रकार अलेक्झांडर फ्रेम याने काढलेले विजयनगर दरबारातील चित्रे सौदर्यपूर्ण आहेत.

● **वीरगळ :**

वीरगती प्राप्त करणाऱ्या वीरांच्या प्रती कृतज्ञतेच्या भावनेतून मरणोत्तर आदर व्यक्त करणे किवा एखादे महान कार्य करीत असताना धारातिर्थी पडणाऱ्याचे कायम स्वरूपी स्मरण करण्याच्या हेतूने वीरगळ निर्माण करण्याची प्रथा विजयनगर संस्कृतीमध्ये होती. गावाचे रक्षण करत असताना वीरमरण प्राप्त करणाऱ्यांची स्मारके ही विजयनगर मध्ये उभारल्याचे दिसून येतात. त्यांच्याबद्दल समाजामध्ये आदर असे.

● **सतीशिळा :**

पतीच्या मृत्युनंतर पत्नीने त्या पतीच्या चितेबरोबर जिवंत दहन करणे किंवा पतीच्या शवाबरोबर पत्नीला जिवंत जाळणे पती निधनानंतर पत्नीने स्वतःला जाळून घेणे किंवा पुरून घेणे प्रतिष्ठेचे मानले जात असे. अशा अनेक सतीशिळा विजयनगरमध्ये आढळून येतात. विठ्ठल मंदिरामध्ये आढळलेल्या सती शिळा विजयनगरकाळाचे वैशिष्ट्ये दर्शवितात.

● **सारांश :**

विजयनगरच्या इतिहासात कृष्णदेवरायाची कारकिर्द म्हणजे सुर्वण युग होती. आजही विजयनगर शहराचे कलावैभव अतिशय सुंदर असे आहे. स्थापत्यशाश्त्राच्या दृष्टीकोनातून विजयनगरची मंदिरे, गोपूरे, राजवाडे, महाल, तटबंदी, जलाशय, सभागृहे सौंदर्यकलेचा अविष्कारच आहेत मंडप हे विजयनगर मंदिराचे वैशिष्टे होय. मंदिरामध्ये वास्तू व शिल्प यांचा सुंदर मिलाफ आढळतो. ही विजयनगरकालीन स्थापत्य व वास्तूकला म्हणजे वैज्ञानिक प्रगतीचे द्योतक म्हणावे लागेल.

● **कृष्णदेवरायाची योग्यता :**

**१. प्रभावी व्यक्तिमत्त्व :**

कृष्णदेवरायाचे व्यक्तिमत्त्व रूबाबदार, भारदस्त व आकर्षक असे होते. इतरावर त्याच्या व्यक्तिमत्त्वाची छाप पडत असे. म्हणून पायीश या पोर्तुगीज प्रवाशाने लिहिले आहे 'हा राजा मध्यम उंचीचा गौरकाय रेखीव आणि धट्टाकट्टा होता. त्याच्या चेहऱ्यावर देवीचे व्रण होते. परंतु तो आकर्षक वाटे तो आनंदी व उत्साही स्वभावाचा होता. परदेशी प्रवाशांचा मान सन्मान करणारा तो एक सामर्थ्यशाली थोर सम्राट होता. तो नियमित व्यायाम करून आपले शरीर सदृढ व कार्यक्षम ठेवीत असे. पराक्रमी व शक्तिशाली राजा म्हणून कृष्ण देवरायाचे वर्णन करावे लागेल.

**२. महान विजेता व शक्तिशाली राजा :**

प्रत्येक युध्दामध्ये कृष्णदेवराया विजयी झाला होता. विजापूर ओरिसावरील विजय यातून त्याची विरता दिसून येते. कृष्णदेवरायाचे वर्णन एक बलाढ्य व शक्तिशाली राजा म्हणून करता येईल. मुस्लिम सत्ताधिशांकडून

नेहमी पराभूत होणारी सेना कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये विजयी सेना झाली. बहामनी, गजपती, उम्मतूर, ओरिसा वरील आक्रमणे त्याच्या प्राक्रमाची व शौर्याची साक्ष देतात. जिद्द आत्मविश्वासातुन तो नहमी विजयी ठरला.

**३. सुसंस्कृत विद्वान व विद्वांनाच आश्रयदाता :**

कृष्णदेवरायाने 'अमूक्त्यमाल्यदा' हे दीर्घ काव्य लिहिले. ते तेलगू भाषेत आहे. त्यामध्ये राजनीती व राज्यकारभाराची माहिती मिळते. तो उत्तम वक्ता होता.त्याच्या दरबारामध्ये प्रसिध्द आठ कवी होते. त्यांना 'अष्ट दिग्गज' असे म्हणत. तेलगू व संस्कृतला त्यांनी उत्तेजन दिले. परदेशी विद्वानांचा त्यांनी आदरसत्कार केला.

**४. विस्तीर्ण व वैभवशाली साम्राज्याचा निर्माता :**

कृष्णेच्या दक्षिणेकडील सर्व दक्षिण भारत त्याच्या ताब्यात होता. बिदर गुलबर्गा या मुस्लिम सत्तधिशांच्या राजधान्या जिंकणारा तो एकमेव विजयनगरचा राजा होता. बंकापूर, भटकल, गिरसप्पा इ. राजे त्याचे मांडलिक होते. त्याने अनेक लढाया करून बलाढ्य साम्राज्य निर्माण केले. विजयनगरचे वैभव पाहून परकीयांचे डोळे दिपून जात असत.

**४. सहिष्णु, क्षमाशील व दिलदार राजा :**

कृष्णदेवरायाने आपल्या प्रजेला धार्मिक स्वातंत्र्य दिले. तो जरी स्वतः वैष्णव पंथाचा असला तरी त्याने सर्व धर्मियांना न्यायाने वागविले. ओरिसातील शत्रूना कैद केल्यानंतर त्याच्याशी क्रूरपणे न वागता त्यांना क्षमा करून सन्मानाने वागविले. त्याने शत्रूच्या निरपाराध सैन्याची कधीही कत्तल केली नाही.

**५. उत्तम प्रशासक :**

कृष्णदेवराया फक्त विजेताच होता असे नव्हे तर उत्तम प्रशासक होता. सामान्य रयतेचे व शेतकऱ्यांचे-कष्टकऱ्यांचे कल्याण हे त्याच्या राज्यकारभाराचे मुख्य ध्येय होते. सामान्य रयतेवर जुलूम अन्याय होणार नाही. याकडे लक्ष दिले व अधिकाऱ्यांना आदेश दिले. गुंड, चोर व लुटारू यांना कडक शिक्षा दिल्या. त्यामुळे अंतर्गत शांतता व सुव्यवस्था निर्माण झाली. सर्व जाती धर्मातील व परकीय देशातील जनतेला त्याच्या राज्यामध्ये फिरता येत होते. त्यांने आपल्या साम्राज्यामध्ये धरणे व जलाशय बांधून शेतीला मोठ्या प्रमाणात पाणी उपलब्ध करून दिले. तांदूळ, ऊस, विविध फळे यांची मोठया प्रमाणात निर्मिती केली. पाटबंधारे, कालवे, तलाव या कामांकडे विशेष लक्ष दिले. जंगल व्याप्त जमिन कमी करून ती लागवडी खाली आणली. तुंगभद्रा नदीला धरण बांधुन त्याचा वापर पिण्यासाठी व शेतीसाठी केला. नागलपूर शहर वसविल्यानंतर त्या शहराला पाणीपुरवठा होण्यासाठी त्याने एक मोठा जलाशय बांधला.

● **सारांश :**

दक्षिण भारताच्या इतिहासात कृष्णदेवरायाची कारकीर्द अत्यंत वैभवशाली व समृध्दीची होती. त्यांनी केलेली बांधकामे उत्कृष्ट अशीच आहेत. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीत विजयनगर साम्राज्याने वैभवाचे शिखर

गाठलेले होते. डॉ. ईश्वरीप्रसाद, डॉ. आर. सी. मुजूमदार, डॉ. श्रीवस्तव या इतिहासकारांनी 'कृष्णदेवराय हा विजयनगरचा सर्वश्रेष्ठ सम्राट असून भारताच्या इतिहासातील थोर सम्राटांपैकी एक होय' असे गौरव उद्‌गार काढले. सर्वच इतिहासकारांनी कृष्णदेवरायावरती स्तुतीसुमनांचा वर्षाव केलेला आहे. एकंदरीत कृष्णदेवरायाची कारकीर्द म्हणजे मध्ययुगीन कालखंडातील दक्षिण भारताच्या इतिहासातील सुवर्ण पान आहे.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**योग्य पर्याय निवडुन रिकाम्या जागा भरा.**

१. विजयनगर राज्याची स्थापना ........ साली झाली.

अ) १३३६ ब) १३४७ क) १३५० ड) १३६०

२. रायचूर हे प्रसिध्द शहर यांच्या दुआबात होते.

अ) तुंगभद्रा व कृष्णा ब) गंगा व कृष्णा क) गोदावरी व कावेरी ड) नर्मदा व गंगा

३. अमूक्त्यमाल्यदा हे काव्य .........यांनी लिहिले

अ) रामराया ब) तिरूमल क) व्यकटराय ड) कृष्णदेवराया

४. कृष्णदेवरायाच्या कालखंडामध्ये.......... हा छायानाटयाचा प्रकार खूप लोकप्रिय होता.

अ) बोग्मलाट ब) सोमलाट क) कृष्णलाट ड) गोमलाट

५. विजयनगर संस्कृतीमध्ये ...........निर्माण करण्याची प्रथा होती.

अ) पुतळे ब) समध्या क) स्मारके ड) वीरगळ

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. नागलपूर शहराची निर्मिती कोणत्या राजाने केली?

२. विजयनगरमध्ये दसरा डब्बा ही वास्तू कोणत्या राजाने निर्माण केली?

३. कृष्णदेवरायाने इ. स. १५२४ मध्ये कोणती उपनगरी स्थापन केली?

४. कृष्णदेवरायाने स्वतःस कोणती पदवी धारण केली?

५. कृष्णदेवरायाने कोणत्या साली हजारा राम नावाचे मंदिर उभारले?

## २.२.४ मुहंम्मद गवानः बहामनी राज्यातील कामगिरी :

बहामनी राज्यामध्ये मुहंम्मद गवानचे व्यक्तिमत्व अतिशय वैशिष्ट्यपूर्ण समजले जाते. एक उत्तम राज्यकर्ता म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. बहामनी राज्याची संपूर्ण सत्ता त्याच्या हाती एकवटली असताना सुद्धा त्याने कधीही सत्तेचा दुरूपयोग केला नाही. बहामनी राज्याशी एकनिष्ठ राहून मुहंम्मद गवाने राज्य चालविले. मुहंम्मद

गवानचे स्थान राजा म्हणून नव्हे तर राज्यकर्ता म्हणून महत्वपूर्ण आहे. तो आपल्या कर्तबगारीमुळे भारताच्या इतिहासात प्रसिध्दीस आला. मुहंम्मद गवानने आपल्या कारकिर्दीमध्ये बहामनी राज्याची प्रगती केली. बहामनी सत्ताधीश म्हणून मुहंम्मद गवान सत्तेवर बसला नसला तरी ही बहामनीचा मुख्य प्रधान व वजीर म्हणून त्याची कारकिर्द अतिशय महत्वाची आहे.

**● मुहंम्मद गवानचा पूर्व इतिहास :**

मुहंम्मद गवानचा जन्म इ. स. १४०३ मध्ये झाला. तो इराणचा रहिवाशी होता. इराण मध्ये त्याचे पूर्वज वजीराचे काम करत असत. परंतु अंतर्गत संघर्षामुळे त्याला इराण सोडावे लागले. व्यापाऱ्याच्या निमित्ताने तो बाहेर पडला. अनेक देशाचा प्रवास करून १४४६ साली वयाच्या ४३ व्या वर्षी तो समुद्रमार्गे बिदर या बाहमनी राज्याच्या राजधानीत पोहचला. इ. स. १३४७ मध्ये हासन गंगू बहामनी याने बहामनी राज्याची स्थापना केलेली होती. अल्लाउद्दीनशहा नावाने त्याने राज्यकारभार केला. मुहंम्मद गवान ज्यावेळेस भारतात आला त्यावेळी तेथे अल्लाउद्दीन शहाची सत्ता होती. मुहंम्मद गवान मधील गुण ओळखून बहामनी सुलतानाने त्याला सरदारकी दिली. येथूनच त्याच्या कामगिरीला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली. सुलतानाने त्याला मलिक-उल-तुज्जार हे बिरूद दिले. पुढे तो पेशवा म्हणजे मुख्य प्रधान म्हणजे वजीर बनला. इ. स. १४५७ मध्ये गवानाने बहामनी राज्याचा मुख्य वजीर पदाची सुत्रे हाती घेतली. जवळ-जवळ वीस वर्षे बहामनी राज्याच्या प्रशासनावर मुहंम्मद गवानचे वर्चस्व राहिले.

**ब) सामाज्यविस्तार :**

मुहंम्मद गवानने बहामनी राज्याचा प्रधानमंत्री म्हणून प्रामाणिकपणे सेवा केली. बहामनी राज्याचा मोठ्या प्रमाणात राज्यविस्तार केला. राज्याचे वैभव व विस्तार वाढविला. एवढेच नव्हेतर विजयनगरवर स्वारी करून भरपूर संपत्ती लुटली. ओरिसावर स्वारी करूना मोठी लुट मिळविली. त्याने जो राज्यविस्तार केला तो खालील प्रमाणे सांगता येईल.

**१) माळवा राजाचा पराभव :**

बहामनी राज्यावर माळवा सुलतानाने इ. स. १४६७ मध्ये स्वारी केली परंतु त्याचा पराभव झाला व बहामनी सत्तेचा विजय झाला. येथूनच खऱ्या अर्थाने बहामनी सत्तेच्या राज्यविस्ताराला सुरूवात झाली व मुहंम्मद गवानच्या नेतृत्वाखाली बहामनीने मोठ मोठे विजय संपादन केली.

**२) कोकण स्वारी :**

मुहंम्मद गवानच्या नेतृत्वाखाली इ. स. १४६९ मध्ये ही स्वारी आली. कोकण किनारपट्टीवरील राज्यांचा पराभव करून त्याच्या ताब्यातील बरेच किल्ले जिंकून घेतले. संगमेश्वर राजाचा पराभव करून विशाळगड किल्ला जिंकून घेतला. त्यात सोने, रत्ने, हत्ती, गुलाम वगैरे मोठ्या प्रमाणात लुट मिळाली. या स्वारीमध्ये मुहंम्मद गवानने मोठे यश मिळविले. त्यांने समुद्रापर्यंत बहामनी साम्राज्याचा विस्तार केला.

**३) गोवा जिंकला :**

विजयनगरच्या ताब्यातील गोवा जिंकून घेतले. कोन्दवीरी, राजकुन्द्री हे किल्ले जिंकुन घेतले. इ. स. १४७३ साली गोव्यावर स्वारीकरून गोवा जिंकून घेतले. विजयनगर सैन्यानी कडवा विरोध केला परंतु मुहंम्मद गवानच्या सैन्यासमोर त्यांना पराभव पत्करावा लागला.

**४) ओढ्यावर स्वारी :**

ओढ्यातील भावा भावाच्या संघर्षाचा फायदा घेण्याचे ठरवून मुहंम्मद गवानने ओढयावर स्वारी केली. ओढ्याचा राजा अंबरराव हा होता. त्याला त्याचा भाऊ मंगळराव त्रास देत होता. मुहंम्मद गवाने अंबररायला मदत केली. त्या बदल्यात मुहंम्मद गवानला राजमहेंद्री व कंडामिली ही ठाणी मिळाली. मुहंम्मद गवानने पुन्हा सहा वर्षानंतर या प्रदेशावर आक्रमण केले व भिमराजचा पराभव केला.

**५) तेलंगणावर विजय :**

मुहंम्मद गवानने तेलगंणावर आक्रमण केले तेव्हा तेथे नरसिंहराया हा हिंदू राजा राज्य करीत होता. हे राज्य बहामनी राज्या शेजारीच होते. मुहंम्मद गवानने या स्वारीत मोठा प्रदेश काबीज केला. बहामनी सुलतान या महंमद गवानच्या विजयावर खूश झाला.

**६) कांचीविरूद्ध स्वारी किंवा कांजीवरमची स्वारी :**

विजयनगरच्या विरूध्दच्या या स्वारीला एक वेगळे महत्व आहे. कांचीच्या सैनिकांनी बहामनी सैन्याला प्रतिकार केला परंतु त्यांचा बहामनी सैन्यासमोर टिकाव लागला नाही. या स्वारीमध्ये मोठी लुट मिळाली. जडजवाहिरे मोठ्या प्रमाणात मिळाले.

अशाप्रकारे एका मागोमाग एक मोहिमा राबवून मुहंम्मद गवानने बहामनी राज्याचा विस्तार मोठ्या प्रमाणात केला. या मोहिमांमधुन बाहमनी राज्याला मोठा आर्थिक लाभ झाला. या स्वाऱ्या व मोहिमातून मुहंम्मद गवानच्या लष्करी सामर्थ्याची प्रचिती आली.

**क) मुहंम्मद गवानच्या सुधारणा :**

मुहंम्मद गवानला राज्यकारभाराचे उत्तम ज्ञान होते. शासन व्यवस्थेत तो अतिशय निपुण होता. मुहंम्मद गवानने अनेक सुधारणा घडवून आणल्या. मुहंम्मद गवानने बहामनी राज्याला वैभव प्राप्त करून दिले. त्याने प्रशासकीय सुधारणा करून बहामनी राज्याची भरभराट घडवून आणली. त्याने ज्या प्रशासकीय सुधारणा केल्या त्याचा आढावा पुढील प्रमाणे घेता येईल.

**१) प्रशासकीय सुधारणा :**

मुहंम्मद गवानाने प्रशासनात मोठा बदल केला. बहामनी राज्याचे आठ प्रांताचे विभाजन केले, त्यामध्ये दौलताबाद, बिदर, गुलबर्गा, विदर्भ हे चार विभाग होते. पुन्हा त्या प्रत्येकाचे दोन प्रांत पाडल्यामुळे बहामनी राज्याचे एकूण आठ प्रांतात विभागणी झाली.

**२) सैन्य सुधारणा :**

मुहंम्मद गवानने लष्करामध्ये सुधारणा केल्या. त्यांने लष्कराचे उत्तम प्रकारे संघटन केले. सैनिकांना नगद वेतन दिले. सैनिकांचे पगार वाढविले. सैन्यात शिस्त निर्माण केली. उत्तम घोडदळ निर्माण केले. सैनिकांना युध्दकलेचे प्रशिक्षण देण्याची व्यवस्था केली. त्यामुळे सैनिकांची कार्यक्षमता वाढली.

**३) न्याय व्यवस्थेत सुधारणा :**

मुहंम्मद गवान अप्रतिम न्यायबुध्दीचा होता. जनतेला निःपक्षपणे व चोख न्याय मिळावा अशा सुचना अधिकारी वर्गाला दिल्या. गुन्हेगारांना उचित शिक्षा केल्या. त्यामुळे गुन्हेगारीला आळा बसला. संपूर्ण बहामनी राज्यामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण झाली.

**४) जमीन सुधारणा :**

मुहंम्मद गवानने जमिनीची मोजणी करून शेत सारा निश्चित केला. शेतसारा वसुलीचे कडक नियम केले. शेतकऱ्यांना अनेक सवलती दिल्या. शेतसारा धान्य किंवा रोख पैशाच्या स्वरूपात भरण्याची व्यवस्था केली. महसूलातील भ्रष्टाचार बंद करून शेतकऱ्यांना अनेक सवलती दिल्या. त्याने केलेल्या महासूलविषयक सुधारणा काळाच्या पुढे होत्या.

**५) केंद्रशक्तीत वाढ :**

मुहंम्मद गवानने कडक नियम करून राज्यातील सुभेदारांचे हक्क व अधिकार कमी केले. प्रांतांचे विभाजन करून सुभेदारांची शक्ती कमी केली. अशा सुभेदारांचे अधिकार कमी केल्यामुळे राज्याची केंद्रशक्ती आपोआप वाढली. त्याचे हे धोरण बहामनी राज्यविस्ताराला व प्रशासकीय प्रगतीला महत्वपूर्ण ठरले.

**६) किल्ल्यावर नियंत्रण :**

मुहंम्मद गवानने सुभेदारांचे नियंत्रण कमी केले. प्रशासन केंद्रस्थानी केले. राज्यातील किल्ल्यांवरील सुभेदारांचे नियंत्रण कमी करून त्यावर केंद्राचे नियंत्रण ठेवले. त्यामुळे किल्ले प्रशासनाला बहामनी प्रशासनामध्ये महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले.

७) **विद्या व कलेला उत्तेजन :**

मुहंम्मद गवान विद्या व कलेचा भोक्ता होता. तो स्वतः उत्तम कवी व गणितज्ञ होता. त्याला साहित्याची फार आवड होती. बिदर येथील त्याच्या ग्रंथालयात जवळ-जवळ ३००० विविध विषयांवरील ग्रंथ होते. त्याने राजधानीच्या ठिकाणी म्हणजेच बिदर या ठिकाणी एक भव्य मदरसा म्हणजेच महाविद्यालय बांधले. त्याने बिदर या ठिकाणी या सुंदर इमारतीला फरशांनी सुशोभित केलेले होते. या महाविद्यालयामध्ये एक हजार शिक्षक आणि विद्यार्थ्यांची व्यवस्था केलेली होती. विशेष म्हणजे येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना निःशुल्क कपडे आणि जेवण दिले जात असे. तेथे इराण व इराक येथील विद्वान मुहंम्मद गवानच्या आग्रहावरून शिकविण्यासाठी आले होते.

**ड) मुहंम्मद गवानचा मृत्यु :**

बहामनी राज्यामधील सर्वात मोठी समस्या बनली ती म्हणजे अमीरांमधील अंतर्गत संघर्ष होय. बहामनी दरबारामध्ये अमीरांमध्ये दोन गट पडले. एक गट पूर्वी आलेल्या अमीरांचा होता. तर दुसरा गट हा नंतर आलेल्या अमीरांचा होता. त्यांना दख्खनी आणि अफाकी या नावाने ओळखले जात असे. मुहंम्मद गवान हा नंतर आलेला असल्यामुळे त्याला पूर्वीच्या अमीरांचा म्हणजेच दख्खनी अमीरांचा विश्‍वास संपादन करणे कष्टाचे बनले. यामध्ये त्याला खूप त्रास झाला. या दोन गटामध्ये मुहंम्मद गवानने समझोता करण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात त्याला यश आले नाही. हा संघर्ष असाच चालू राहिला. मुहंम्मद गवानच्या शत्रूनी त्याच्या विरूध्द सुलतानाचे कान भरले. तो गुप्तपणे विजयनगरला सामील आहे असे खोटेच सांगून त्यासाठी पुरावा म्हणून त्याचा शिक्का असलेले आणि ओरिसाच्या राजास लिहिलेले एक पत्र सादर केले. सुलतानाने मुहंम्मद गवान यास ताबडतोब बोलावले व त्यास हे पत्र दाखविले. मुहंम्मद गवानने शिक्का आपला असल्याचे कबुल केले. परंतु पत्रातील मजकूर आपला नसल्याचे सांगितले. दारूच्या सेवनाने मद्यधुंद झालेल्या सुलतानाने कोणताही विचार न करता इ. स. १४८२ मध्ये मुहंम्मद गवानला मृत्युदंडाची शिक्षा दिली. मुहंम्मद गवानने ३७ वर्ष बहामनी राज्याची प्रामाणिकपणे सेवा केली. परंतु दुर्देवाने तो दक्षिणी मुसलमानांच्या कारस्थानाचा बळी ठरला. तिसऱ्या महंमदास ज्यावेळेस खरी वस्तुस्थिती समजली त्यावेळेस त्याला अतिशय पश्‍चाताप झाला. पश्‍चातापदग्ध मनस्थितीत सुलतानाचा १२ जानेवारी १४८२ रोजी मृत्यु झाला.

**इ) महमूद गवानची योग्यता :**

**१) उत्तम सुधारक :**

मुहंम्मद गवानने सत्तेवर आल्यानंतर विविध सुधारणा केल्या. प्रशासन, लष्कर. कृषी या क्षेत्रामध्ये सुधारणा केल्यामुळे तो उत्तम सुधारक होता असे म्हटले जाते. त्याने बहामनी सत्तेच्या प्रशासकीय रचनेत आमुलाग्र असा बदल करून साम्राज्यामध्ये शांतता व सुव्यवस्था निर्माण केली. प्रशासकीय सुधारणा करून बहामनी सत्तेला भक्कम बनविले.

**२) निस्वार्थी व स्वामीनिष्ठ :**

मुहंम्मद गवान निस्वार्थी होता.त्याने सत्तेचा वापर कधीही स्वतःच्या स्वार्थासाठी केला नाही. सर्वाचे हित पाहून त्यांने प्रत्येक धोरण राबविले. बहामनी राज्याची सर्व सत्ता सुत्रे त्याच्या ताब्यात असताना सुध्दा तो बहमनी राज्य व सुलतान याच्याशी कायमच एकनिष्ठ राहिला. त्याने आयुष्यभर स्वामीनिष्ठा जोपासली.

**३) साधी राहणी :**

मुहंम्मद गवान अतिशय साध्या स्वभावाचा होता. तिसऱ्या महंमदाचा स्वभाव त्याने समजून घ्यावयास हवा होता. मुहंम्मद गवानने शेवट पर्यत अतिशय साध्या पध्दतीने आपले जीवन व्यथीत केले. तो स्वतः साध्या सतरंजीवर झोपत असे. स्वयंपाकासाठी मातीची मडकी वापरीत असे. सेवा या एका शब्दातच मुहंम्मद गवानचे सर्व कार्य सांगता येईल.

### ४) विद्वान :

मुहंम्मद गवान स्वतः विद्वान होता. प्रशासनात तो अतिशय कुशल होता. बिदरमध्ये त्याचे सुसज्ज असे ग्रंथालय होते. त्या ग्रंथालयामध्ये जवळ जवळ तीन हजार ग्रंथ होते. गणित वाङ्मय या क्षेत्रात त्याचे प्राविण्य होते. वैद्यकीचे त्यास चांगले ज्ञान होते.

### ५) दानशूर :

मुहंम्मद गवान दानशूर होता.त्याने सर्व संपत्ती दान करून टाकली. दर शुक्रवारी वेषांतर करून तो लोकास दान धर्म करीत असे. हे दान राजाने दिले आहे असे तो सर्वांना सांगत असे. स्वतः कधीही तो चैन विलासामध्ये राहिला नाही. आयुष्यभर तो साध्या पध्दतीने जीवन जगला.

### ६) निष्ठावंत :

निष्ठा या एकाच शब्दात त्याच्या आयुष्याचे सर्व सार आहे. त्याची ही निष्ठा प्रत्येक गोष्टीबद्दल होती. ती निष्ठा सुलतान, राज्य कारभाराबद्दल होती. एवढेच नव्हेतर त्याने हातात घेतलेल्या प्रत्येक कामाबद्दल होती. बाहमनी साम्राज्याच्या इतिहासातील सर्वश्रेष्ठ पुरूषात त्याची गणना केली जाते.

### फ) मुहंम्मद गवानच्या पाडावाची कारणे :

मुहंम्मद गवानच्या निस्वार्थी नेतृत्वाचा खून झाला ही घटना इतिहासामध्ये अतिशय दुःखद घटना मानली जाते. स्वामीनष्ठ मुहंम्मद गवानचा पाडाव झाला त्याची कारणे पुढील प्रमाणे सांगता येतील.

१. मुहंम्मद गवान साधुवृत्तीचा होता. परंतु राजकारणात साधीवृत्ती चालत नाही. त्यामुळे मुहंम्मद गवानचा पाडाव झाला.

२. बहामनी राज्यात दक्षिणी विरूद्ध परकीय असे गट निर्माण झाले. त्याच्यावर मुहंम्मद गवानला नियंत्रण ठेवता आले नाही.

३. बहामनी राज्याचा शासक व्यसनी व हलक्या कानाचा होता. ही वस्तुस्थिती मुहंम्मद गवानने समजून घ्यावयास हवी होती. त्याने खबरदारीचे कोणतेही उपाय योजले केली नाही.

४. बहामनी राज्यातील हिंदूची सहानुभूती गवानला मिळाली नाही कारण त्याने विजयनगरवर सतत स्वाऱ्या करून तेथील लुटालुट करण्यात धन्यता मानली. त्यामुळे हिंदूंची मने दुखविली.

● **सारांश** :

निष्ठा व सेवा या दोन शब्दातच मुहंम्मद गवानच्या कार्याचे मुल्यमापन करता येईल. जवळ जवळ ३७ वर्षे मुहंम्मद गवानने बहामनी राज्याची प्रामाणिकपणे सेवा केली. शेवटी तो दक्षिणी मुसलमांच्या कारस्थानाचा बळी ठरला. मुहंम्मद गवान सरळ स्वभावी होता. दानशूर, विद्वान, उत्तम प्रशासक, शूर योध्दा, निस्वार्थी, स्वाभिमानी या शब्दामध्ये त्याच्या कामगिरीचे मुल्यमापन करावे लागेल.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१. मुहंम्मद गवान ........... साली भारतात आला.

अ) १४४६ ब) १४६४ क) १४७० ड) १४८६

२. ........... राज्यकर्त्याचे बिदर येथे ग्रंथालय होते.

अ) अल्तमश ब) बल्बन ड) कृष्णदेवराय ड) मुहंम्मद गवान

३. इ. स. १४७३ साली मुहंम्मद गवानने ........... प्रांतावर स्वारी केली.

अ) गोवा ब) विदर्भ क) कोकण ड) बिदर

४. मुहंम्मद गवानने बहामनी राज्याचे ........... प्रांतात विभाजन केले.

अ) सात ब) आठ क) दहा ड) बारा

५. मुहंम्मद गवानने कोकण स्वारी ........... साली केली.

अ) १४५० ब) १४५९ क) १४६९ ड) १४७९

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१. मुहंम्मद गवान कोणत्या देशाचा रहिवाशी होता?

२. कोणत्या वर्षी मुहंम्मद गवानाने बाहमनी राज्याचा मुख्य वजीर म्हणून सुत्रे हाती घेतली?

३. बहामनी राज्यावर माळवा सुलतानाने कोणत्या साली स्वारी केली?

४. नरसिंहराय हा कोणत्या प्रांताचा राजा होता?

५. कोणत्या दिवशी वेषांतर करून मुहंम्मद गवान लोकास दान धर्म करीत असे?

● **परिभाषिक शब्द :**

खुष्कीचा मार्ग : जमिनीवरील मार्ग.

काझी : न्यायखात्याचा प्रमुख.

अष्ट दिग्गज : प्रसिध्द आठ कवी.

बोग्मलाट : छायानाट्याचा प्रकार.

वीरगळ : वीरमरण प्राप्त करणाऱ्याचे स्मारक.

शस्त्रभांडार : युध्द साहित्य ठेवण्याचे ठिकाण.

## २.३ सारांश :

मध्ययुगीन भारताच्या राज्यकर्त्यात अल्लाउद्दीन खिलजीला उच्च स्थान दिले जाते. तो एक उत्तम राज्यकर्ता होता. मोठे राज्य प्रस्थापित करणारा उत्तम प्रशासन निर्माण करणारा, दक्षिण भारतावर स्वारी करणारा अल्लाउद्दीन खिलजी हा मध्ययुगीन भारताचा अग्रगण्य शासक समजला जातो. मुहंम्मद-बिन-तुघलकाची कारकीर्द म्हणजे भारतीय नाणेशास्त्राच्या इतिहासात महत्वाचा टप्पा आहे. मुद्रा निर्मात्यांचा अग्रणी म्हणून मुहंम्मद-बिन-तुघलकाचे नाव घेतले जाते. कलात्मक दृष्टीने मुहंम्मद-बिन-तुघलकाची नाणी उत्तम आहेत. त्यातून सुलतानाचे व्यक्तिमत्व प्रतिबिंबित होते. विजयनगरचे राज्य बलाढय व वैभवशाली राज्य म्हणून ओळखले जाते. कृष्णदेवराया विजयनगरचा सर्वश्रेष्ठ राजा होय. कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमध्ये विजयनगरचे साम्राज्य अति उच्च शिखरावर पोहचले होते. विजनगरच्या दृष्टीने कृष्णदेवरायची कारकिर्द वैभवशाली व भरभराटीची ठरली. कृष्णदेवरायाच्या वैभवसंपन्न राजवटीचे सर्वांनाच आकर्षण होते. विजयनगरची मंदिरे, गोपूरे, राजवाडे, महाल, तटबंदी, जलाशय, सभागृहे सौंदर्यकलेचा अविष्कारच आहेत. बहामनी राज्यामध्ये मुहंम्मद गवानचे व्यक्तिमत्व अतिशय वैशिष्टयपूर्ण समजले जाते. एक उत्तम शासनकर्ता म्हणून त्याच्याकडे पाहिले जाते. बहामनी राज्याची संपूर्ण सत्ता त्याच्या हाती एकवटली असताना सुध्दा त्याने कधीही सत्तेचा दुरूपयोग केला नाही. बहामनी राज्याशी एकनिष्ठ राहून मुहंम्मद गवानने राज्य चालविले. मुहंम्मद गवानचे स्थान राजा म्हणुन नव्हेतर शासनकर्ता म्हणुन महत्वपूर्ण आहे.

## २.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

१. अल्लाउद्दीन खिलजीच्या अंतर्गत सुधारणा स्पष्ट करा.

२. मुहंम्मद-बीन-तुघलकाचा मुद्रा चलनाच्या प्रयोगाची सविस्तर माहिती सांगा.

३. कृष्णदेवरायाच्या सांस्कृतिक योगदानाची माहिती द्या.

४. मुहंम्मद गवानच्या कामगिरी स्पष्ट करा.

## २.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयं अध्ययन प्रश्न क्र.१ ची उत्तरे**

अ) १) अली गर्शप २) १२९६ ३) दिवाण-इ-आरिझ
४) तुर्की ५) जहागीर

ब) १) रामचंद्रदेव यादव २) दिवाण-इ-वझारत ३) अल्लाउद्दीन खिलजी
४) अल्लाउद्दीन खिलजी ५)सिरी

- **स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २ ची उत्तरे**

अ) १) १३२५ २) दिनार ३) तुघलकाबाद

४) देवगिरी ५) १२

ब) १) दिवाण-ए- कोही २) जियाउद्दीन बरनी ३) २५

४) दुआबात ५) तीन

- **स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३ ची उत्तरे**

अ) १) १३३६ २) तुंगभद्रा व कृष्णा ३) कृष्णदेवराया

४) बोग्मलाट ५) वीरगळ

ब) १) कृष्णदेवराया २) कृष्णदेवराया ३) अनंतशयनगुडी

४) यवनराज्यस्थापनाचार्य ५) १५१३

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र.४ ची उत्तरे**

अ) १) १४४६ २) मुहंम्मद गवान ३) गोवा

४) आठ ५) १४६९

ब) १) इराण २) १४५७ ३) १४६७

४) तेलंगणा ५) शुक्रवारी

## २.६ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :


१. मोडक, बा.प्र., दक्षिणेंतील मुसलमानी राज्याचा इतिहास

२. चिटणीस, कृ.ना., मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था

३. सरदेसाई, गो.स., मुसलमानी रियासत

४. कोलारकर, श.गो., मध्ययुगीन भारताचा इतिहास

५. आठवले, सदाशिव, विजयनगरचा सम्राट कृष्णदेवराय

६. बेंद्रे, वा.सी, विजापूरची आदिलशाही

७. खरे, गणेश, महाराष्ट्राचा इतिहास मध्ययुगीन कालखंड भाग- १

८. Dr. M. P. Patil, Court Life under the Vijaynagar Rulers

९. Shastri, K. A. N, History of South India.

१०. Heras, H. D., Begining of vijaynagar History.


❖❖❖

## घटक – ३

# प्रशासन आणि अर्थव्यवस्था

अनुक्रमणिका :

३.१ उद्दिष्टे

३.२ प्रास्ताविक

३.३ विषय विवेचन

 ३.३.१ प्रशासन : केंद्रीय आणि प्रांतिक

 ३.३.२ शेती आणि जमीन महसूल व्यवस्था

 ३.३.३ उद्योग आणि व्यापार

३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.६ सारांश

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

### ३.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यासानंतर आपल्याला पुढील गोष्टी स्पष्ट करता येतील –

१. सुलतानशाही व विजयनगरकालीन केंद्रीय आणि प्रांतीय प्रशासन व्यवस्था समजून घेता येईल.

२. सुलतानशाहीकालीन शेती, घेतली जाणारी उत्पादने, जमिनीची प्रतवारी आणि शेतीसाठी केलेल्या उपाययोजना आणि जमीन महसूल व्यवस्था लक्षात येईल.

३. विजयनगरकालीन शेती, घेतली जाणारी उत्पादने, जमिनीची प्रतवारी आणि शेतीसाठी केलेल्या उपाययोजना आणि जमीन महसूल व्यवस्था सांगता येईल.

४. सुलतानशाहीकालीन उद्योग व व्यापार कशा स्वरूपाचा होता हे समजण्यास मदत होईल.

५. विजयनगरकालीन उद्योग व व्यापार कशा स्वरूपाचा होता हे समजून घेता येईल.

### ३.१ प्रास्ताविक :

१२ व्या शतकाच्या शेवटी उत्तर भारतात तुर्कांनी स्थापन केलेली राज्ये हळूहळू एक शक्तिशाली आणि केंद्रीय स्वरुपात पुढे आले. दक्षिणेतील मदुराई पर्यंत त्यांनी आपल्या राज्याचा विस्तार करून त्यावर आपले नियंत्रण प्रस्थापित केले. सुलतानशाही सत्तेचा ऱ्हास १५ व्या शतकाच्या सुरुवातीला झाला. दिल्ली सुलतानशाहीने येथील राजपूत प्रशासनातील बरेच घटक बदल न करता त्यांनी आपल्या प्रशासनात घेवून त्यांना भारतातील तुर्की प्रशासनाचा भाग बनविले. दिल्ली सुलतानशाही शासन प्रणालीचा प्रभाव १६ व्या शतकात उदयास आलेल्या प्रशासन पद्धतीवर दिसतो. या काळात जमिनीची मोजणी करून तिची प्रतवारी ठरवण्यात आली. त्यामध्ये प्रामुख्याने अल्लाउद्दीन खिलजीचे नाव प्रथम घ्यावे लागते. त्याने आपल्या प्रशासनात आमूलाग्र बदल घडवून आणले. जमीन महसुलाच्या बाबतीतही अनेक बदल केले व राज्याचा महसूल वाढविला.

देशाच्या आर्थिक क्षेत्रात जमीन महसूल, व्यापार व उद्योगधंद्याचे स्थान महत्त्वाचे आहे. मध्ययुगीन भारताची अर्थव्यवस्था मुख्यत्वे करून स्वयंपूर्ण होती. सर्वसाधारण लोकांच्या गरजा कमी होत्या. मुघल काळाच्या तुलनेने सुलतानशाही काळामध्ये विविध प्रकारच्या तयार मालाला कमी मागणी होती. निरनिराळे उद्योगधंदे मध्यम दर्जाचे आणि साध्या प्रकारचे असल्याने कच्च्या मालालाही विशेष मागणी नव्हती. त्यामुळे आपल्याला असे दिसून येते की, या काळात मोठे कारखाने सुरु झाले नाहीत आणि मोठ्या प्रमाणावर उद्योगधंद्याची उभारणी झाली नाही. परंतु या काळात उद्योगधंदे होते. प्रस्तुत प्रकरणात आपण सुलतानशाही व विजयनगर कालीन प्रशासन व अर्थव्यवस्थेचा प्रामुख्याने अभ्यास करणार आहोत.

### ३.२ विषय विवेचन :

प्रस्तुत प्रकरणात सुलतानशाही आणि विजयनगर प्रशासन व्यवस्था, शेती व महसूल व्यवस्था कशी होती यावर प्रकाश टाकण्यात आलेला आहे. याचबरोबर येथील असणारा उद्योग व व्यापार कोणत्या स्थितीत होता याचीही माहिती दिलेली आहे. तत्कालीन प्रशासकीय कार्यक्षमता राबविण्यात आलेली धोरणे कोणत्या स्वरूपात होती. आर्थिक दृष्टिकोनातून राज्याची अवस्था काय होती, याची माहिती समजण्यास मदत होईल. याकाळातील प्रत्येक राज्यकर्त्याने आपापल्या परीने यामध्ये योगदान देण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. राज्याची प्रशासकीय आणि अर्थव्यवस्था कार्यक्षम तथा चागली असेल तर राज्यकर्ते आपली सत्ता जास्त कालपर्यंत टिकवू शकतात.

### ३.२.१ प्रशासन : केंद्रीय आणि प्रांतिक :

### अ) सुलतानशाहीकालीन केंद्रीय व प्रांतिक प्रशासन :

#### १) केंद्रीय प्रशासन :

सुलतानशाही काळात केंद्रीय प्रशासनाचा प्रमुख सुलतान होता. त्याच्या हातात अनियंत्रित सत्ता होती, म्हणून त्यास लष्करी हुकुमशहा समजण्यात येई. मुस्लिम धर्माचे संरक्षण करणे, त्याचा प्रसार करणे आणि मुस्लिम

प्रजेचे कल्याण ही त्याची कर्तव्ये असत. सुलतान हा सर्वोच्च सेनापती आणि न्यायाधीश असे. त्याची इच्छा म्हणजेच कायदा समजण्यात येत असे. या सुलतानाला राज्यकारभारात मदत करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी मंत्रीमंडळ स्थापन करण्यात आले होते. परंतु मंत्र्याच्या सल्ल्याने काम करावे असे बंधन सुलतानावर नव्हते. मंत्र्याची नेमणूक करणे अथवा काढून टाकणे हे सर्वस्वी अधिकार सुलतानाचा होता. सुलतान हा आपल्या सोयीनुसार मंत्रिमंडळाची संख्या वाढवू शकत असे अथवा कमी करू शकत असे. सुलतानकालीन प्रशासकीय विकास हा प्रामुख्याने १३ व्या शतकाच्या शेवटी झाला. सुलतानकालीन प्रशासनातील मंत्रालये / खाती व प्रशासनाच्या सोयीकरिता राज्याचे केलेले विभाग पुढीलप्रमाणे होते.

**२) सुलतान :**

भारतातील सुलतानांनी स्वतःला सच्चा मुसलमान व बगदादच्या अब्बासी खालीफाचा प्रतिनिधी म्हणून घोषित केले होते. तसेच त्यांनी खुतबामध्ये बगदादच्या अब्बासी खालीफाच्या नावाचा समावेश केला. परंतु याचा अर्थ असा नाही की खलिफा हा भारतातील प्रशासनाचा प्रमुख होता. सुलतान हे खालीफाचे प्रतिनिधी म्हणून स्वतःला इस्लामी जगताचे आपण एक अंग आहोत हे दाखविण्याचा प्रयत्न करीत असत.

सुलतानशाही मध्ये सुलतानाचे स्थान हे महत्वपूर्ण मानले जात होते. तो राज्यव्यवस्था, कायदाव्यवस्था आणि सैन्यव्यवस्थेचा प्रमुख असे. तो निरंकुश शासक असल्याने राज्याची संपूर्ण शक्ती त्याच्या हातात केंद्रित झाली होती. सुलतान हा राज्याचे संरक्षण आणि सुरक्षा यासाठी जिम्मेदार होता. कायदा आणि न्यायदान करणे हे त्याचे उत्तरदायित्व होते. न्याय व्यवस्थेमध्ये न्यायाधीशांची नेमणूक तो करत असे. राज्यातील कोणत्याही अधिकाऱ्याच्या अन्यायाच्या विरोधात सरळ अपील सुलतानाकडे करता येत असे. न्यायदान करणे कोणत्याही शासकाचे अत्यंत महत्वपूर्ण दायित्व मानले जाते.

मुस्लिम शासकामध्ये वारसाचा कोणताही असा स्पष्ट नियम विकसित झालेला नव्हता. इस्लामी कायद्यामध्ये राज्याचा शासक निवडण्याची प्रथा होती. परंतु व्यावहारिकदृष्ट्या जो शासक यशस्वी असेल, त्याच्याच मुलाला उत्तराधिकारी म्हणून नेमले जात असे. सुलतानशाही मध्ये उत्तराधिकारी म्हणून मोठ्या मुलालाच बसविले जात होते असे नाही तर कोणत्याही मुलाला गादीवर बसविले जाई. उदा. अलत्मशने आपला उत्तराधिकारी म्हणून आपल्या मुलाला न बसविता मुलीला गादीवर बसविले. आपला वारस आपणच नेमण्याची पध्दत रूढ झाली. त्यामुळे सुलतानांना आपोआपच अनियंत्रित सत्ता प्राप्त होवू लागली व ते हुकुमशहा बनले. कुराणाची खरी कल्पना अशी आहे की, मुस्लिमांचा राजा एकच असतो आणि तो म्हणजे ईश्वर. सुलतान हा ईश्वराचा प्रतिनिधी ह्या नात्याने तो पृथ्वीतलावर राज्य करीत असे. त्यामुळे अनेक सुलतानांनी ईश्वराचा प्रतिनिधी म्हणून राज्य केले. त्यामुळे त्यांना अनियंत्रित सत्ता प्राप्त झाली.

**३) सुलतानकालीन प्रशासन**

**सुलतानकालीन प्रशासन**

- केंद्रीय प्रशासन
  - १. दिवाणी-ए-विझारत (सहायक : नायब वझीर)
    - १. मुशरीफ-ए-मुमालिक (महालेखाकार)
    - २. मुस्तौफी-ए-मुमालिक (महालेखा परिक्षक)
  - २. दिवाण-ए-अरिझ (सैन्य मंत्रालय)
  - ३. दिवाण-ए-इन्शा (पत्रव्यवहार खाते)
  - ४. दिवाण-ए-रसालत (परराष्ट्र मंत्रालय)
  - ५. सद्र-उस-एसदूर (धर्मदाय खाते)
  - ६. दिवाण-ए-काझा (न्याय खाते)
  - **इतर खाती –**
  - १. दिवाण-ए-अमीर कोही
  - २. बरिद-ए-मुमालिक (गुप्तहेर खाते)
  - ३. मंजलिस-ए-खलबत (सल्लागार मंडळ)
  - ४. वकील-ए-दर (राजदरबार शिष्टाचार)
  - ५. अमीर-ए-अखुर (अश्वशाळा)
  - ६. शहना-ए-पील (हत्तीशाळा)
  - ७. अमीर-ए-मजलिस (मेजवानी, उत्सव)
  - ८. दिवाण-ए-वक्त
  - ९. दिवाण ए-मुस्तखराज
- प्रांतीय प्रशासन
  - १. मुक्ती/वली (मदतीला) साहिब-ए-दिवाण, ख्वाजा
  - २. अरिज
  - ३. काझी
- शिक/जिल्हा
  - शिकदार
- परगणा
  - चौधरी, मुनसीफ
- ग्राम
  - मुकादम

**४) केंद्रीय प्रशासनाची रचना :**

**१. दिवाण – ए – वजारत :**

याचा प्रमुख वझीर असे म्हणत सुलतानाच्या गैरहजेरीत राज्याचा सर्व पत्रव्यवहार पाहणे, इतर खात्यावर

नियंत्रण ठेवणे इ. कामे करावी लागत असत. सुलतान आणि प्रजा यांना जोडणारा दुवा असे. सुलतान प्रजेच्या भावना, त्यांच्या आकांक्षा वजीरा मार्फतच समजत असत. राज्याच्या जमाखर्चावर लक्ष ठेवत असे. याच्या मदतीला नायब वझीर असे तो राज्याच्या जमाखर्च ठेवण्यात वजीराला मदत करीत असे. नायब वजीराच्या मदतीला मुशरीफ-ए-मुमालिक (महालेखाकार) व मुस्तौफी-ए- मुमालिक (महालेखा परीक्षक) हे दोन अधिकारी असत. मुशरीफ-ए-मुमालिक (महालेखाकार) हा प्रांत आणि इतर विभातील प्राप्त हिशोबाचा लेखाजोखा ठेवत असे तर मुस्तौफी-ए-मुमालिक (महालेखा परीक्षक) हा या हिशोबाची तपासणी करत असे.

**२. दिवाण-ए-अरिज (सैन्य मंत्रालय) :**

दिवाण-ए-वजारत नंतर महत्वाचे खाते म्हणजे दिवाण-ए-अरिज होय. याचा प्रमुख अरिझ-ए-मुमालिक असे. हा सैन्य भरती करणे, सैनिकांची हजेरी ठेवणे, सैन्याच्या परेड घडवून आणणे, सैन्याची शिस्त सांभाळणे, त्यांचा पगार देणे, अन्न पुरवठा करणे इ. कामे करावी लागत असत.

**३. दिवाण-ए-इन्शा (पत्रव्यवहार खाते) :**

या खात्याला राजप्रमुखाचा पत्रव्यवहार पहावा लागत असे. या कामामध्ये त्यास पत्रलेखनात प्राविण्य असलेले अनेक लेखक मदत करीत असत. परराज्याचा पत्रव्यवहार, सरकारी आज्ञापत्रे आणि इतर पत्रव्यवहार या खात्यास पहावा लागत असे.

**४. दिवाण-ए-रसालत (परराष्ट्र मंत्रालय) :**

या खात्यामार्फत परदेशात वकील पाठविणे किंवा आलेल्या वकिलांचे स्वागत करणे त्याच बरोबर परदेशी वकिलांची पत्रव्यवहार ठेवणे इत्यादी कामे या खात्यास करावी लागत असे. थोडक्यात हे मंत्रालय म्हणजे आधुनिक काळातील परराष्ट्र खाते होय.

**५. सद्र-उस-सदुर ( धर्मदाय खाते) :**

या मंत्रालयाकडे धार्मिक संस्था, शाळा, गोरगरीब, विद्वान पंडित यांना आर्थिक सहाय्य करणे हे काम या खात्यास करावी लागत असे.

**६. दिवाण-ए-काझा (न्याय मंत्रालय) :**

या खात्याचा मुख्य काझी होता. तो न्यायव्यवस्थेची देखरेख करीत असे. न्यायदानाचे काम तो अतिशय चोखपणे बजावीत असे. मात्र न्यायदानाचा अंतिम निर्णय सुलतान हाच घेत असे.

**५) इतर खाती :**

**१. दिवाण-ए-अमिर कोही (कृषी मंत्रालय) :**

हे खाते सुलतान मुहंम्मद तुघलक याच्या काळात निर्माण झाले. त्याने आपल्या कारकीर्दीत शेतीला उपयुक्त असेच निर्णय घेतले होते. या खात्यावर प्रशासनातील मुख्य वजीर हा नियंत्रण ठेवत असे. मुहंम्मद तुघलकाने आपल्या राज्यातील शेतीयोग्य नसलेली जमीन ओलीताखाली आणण्याचा प्रयत्न केला. शेती करिता अनेक

प्रकारची अनुदाने देण्यात आली होती. त्याकरिता मुहंम्मद तुघलकाने शेतकऱ्यांना बी बियाणे, अवजारे, कर्ज पुरवठा इत्यादी गोष्टी देऊ केल्या होत्या. त्यातून शेतकऱ्यांचा विकास साधण्याचा प्रयत्न त्याने केला होता. त्यामुळे हा विभाग शेतीचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचा मानला जात होता.

**२. दिवाण–ए–बरिद (गुप्तहेर खाते) :**

या खात्याचा प्रमुख बरिद–ए–मुमालिक हा होता. सुलतान हा आपल्या मर्जीतील आणि विश्वासातील व्यक्तीची नेमणूक या खात्यावरती प्रमुख म्हणून करीत असे. गुप्तहेर खाते हे राज्यातील आणि राज्याबाहेरील गुप्त बातम्या सुलताना पर्यंत पोहोचवण्याचे काम करीत होता. यामुळे सुलतानाला बाह्य आक्रमणापासून आणि अंतर्गत बंडाळी पासून सावध होता येत असे. यादृष्टीने हे खाते महत्त्वाचे मानले जात होते.

**३. मजलीस–ए–खलबत (सल्लागार मंडळ) :**

हे खाते राजाला अनेक महत्वाच्या निर्णयांमध्ये सल्ला देण्याचे काम करीत होते. या सल्लागार मंडळात प्रशासनातील महत्त्वाच्या व्यक्तींचाच समावेश केला जात होता. यामध्ये अनेक विद्वान मंडळी असत. राज्याच्या हिताच्या दृष्टिकोनातून ही विद्वान मंडळी राजाला सल्ला देण्याचे काम करीत असत. सुलतान हा अनियंत्रित सत्ताधीश असल्याने त्यांचा सल्ला मान्य करण्याचे बंधन त्याच्यावर नसे.

**४. वकील–ए–दर (राजशिष्टाचार विभाग) :**

हा विभाग शाही महल आणि सुलतान यांच्या व्यक्तिगत सेवा करत होता. या विभागांमध्ये अत्यंत विश्वससनीय अशा व्यक्तीचीच नेमणूक करण्यात येत असे. या विभागाच्या माध्यमातून राजदरबारशी संबंधित आदेश प्रसारित करणे आणि कार्यान्वित करणे ही महत्त्वाची जबाबदारी या विभागाला पार पाडावी लागत होती. या विभागाच्या बरोबरीचा विभाग म्हणजे आमिर–ए–हाजीब हा अधिकारी दरबारी शिष्टाचार विषयक नियम लागू करत असे. हा अधिकारी सुलतान आणि निम्न श्रेणीचे पदाधिकारी अथवा जनता यांच्यामध्ये मध्यस्थी करण्याचे काम तो करत होता. त्यामुळे हा अधिकारी कधीकधी वजीरा पेक्षाही वरचढ ठरत असे.

याव्यतिरिक्त केंद्रीय प्रशासनामध्ये वेगवेगळे विभाग कार्यरत होते. त्यामध्ये आमीर–ए–आखुर (घोड्यांचा विभाग), शहाना–ए–पील (हत्ती विभाग), आमिर–ए–मजलीस ( सल्लागार मंडळ विभाग), यासारख्या विभागाच्या माध्यमातून केंद्रीय प्रशासनाचा कारभार पाहिला जात होता.

**६) प्रांतीय प्रशासन :**

प्रशासनाच्या दृष्टिकोनातून सुलतानशाही कालखंडात खालील वेगवेगळ्या प्रांतात विभाजन केले होते. परंतु हे समान विभागात असल्याचे दिसून येत नाही. लष्करी अधिकाऱ्यांनी आणि सरदारांनी राज्याचे जे निरनिराळे भाग पाडले होते तेच सुलतानांनी कायम ठेवले. त्यांनाच 'प्रांत' किंवा 'इक्ता' असे नाव देण्यात आले होते. प्रांतीय प्रशासनाच्या प्रमुखास 'वली' अथवा 'मुक्ती' असे म्हणत. तो प्रांतातील शांतता, सुव्यवस्था राखणे तसेच सैन्यांचा बंदोबस्त करणे, कराची वसुली करणे आणि न्याय व्यवस्था सांभाळणे. हे त्याच्या अधिकारक्षेत्रात येत होते. तो

प्रांतीय शासक या नात्याने विस्तृत अधिकाराचा उपयोग करून घेत होता. आर्थिक बाबतीमध्ये म्हणजेच महसूल अथवा कर वसूल करण्यासाठी साहिब-ए-दिवाण अथवा ख्वाजा या अधिकाऱ्यांची मदत घेत असे. ख्वाजा या अधिकाऱ्यास मदत करण्यासाठी मुतसरीफ आणि कारकून या दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली होती. या व्यतिरिक्त प्रांतीय प्रशासनामध्ये प्रांतीय वजीर आणि प्रांतीय अरिज व काझी हे होते.

**७) स्थानिक प्रशासन :**

राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीने सुलतानशाही काळात प्रांत निरनिराळ्या जिल्ह्यात विभागण्यात आला होता. त्यास 'शिक' या नावाने संबोधले जात होते. याचा प्रमुख 'शिकदार' हा असे. तर जिल्ह्याचे विभाजन परगणा म्हणजेच तालुक्यामध्ये करण्यात आले होते. या परगण्यामध्ये 'मुनसिफ' आणि 'चौधरी' हे अधिकारी होते. जे तालुक्याचा कारभार सांभाळत होते. तालुक्याचे विभाजन ग्राम अथवा खेडे यामध्ये करण्यात आले होते या ग्रामाचा प्रमुख मुकादम हा होता तो संपूर्ण ग्रामाचा कारभार पहात असे. अशाप्रकारे सुलतानशाही काळातील केंद्रीय प्रशासनाचे स्वरूप दिसून येते. या दिल्ली सुलतानशाही काळातील प्रशासनाचा प्रभाव पुढील काळात आलेल्या मोगल साम्राज्यावर पडल्याचे दिसून येते. यावरून हे प्रशासन किती प्रभावशाली होते हे स्पष्ट होते.

**ब) विजयनगर कालीन केंद्रीय प्रांतिक प्रशासन :**

दक्षिण भारतातील हिंदु राज्यांचा विध्वंस करून तेथे मुस्लिम सत्ता स्थापन करणारा अल्लाउद्दीन खिलजी हा पहिला मुस्लिम होय. तुघलक सुलतानांच्या कारकिर्दीत ही अशा प्रकारचे प्रयत्न होवून दक्षिणेतील वारंगळ, द्वारसमुद्र आणि मदुराई ही हिंदू राज्ये खालसा करून सुलतानशहीमध्ये समाविष्ट करण्यात आली. मुस्लिम शासकांची आक्रमणे, अत्याचारी वागणूक यामुळे दक्षिणेतील हिंदुंच्या मनात मुसलमानी शासकाबद्दल तीव्र असंतोष निर्माण झाला होता. तसेच मुहंम्मद तुघलकाच्या काळात साम्राज्याचे विघटन सुरू झाले. या राजकीय अस्थिरतेचा फायदा घेऊन दक्षिणेत हरिहर व बुक्क यांनी इ.स. १३३६ मध्ये विजयनगरच्या राज्याची स्थापना केली. याच काळात हसन गंगू याने १३४७ मध्ये बहामनी राज्याची स्थापना केली.

पुढील काळात विजयनगरच्या राज्याची सतत भरभराट होत गेली. या राज्याचा विस्तार कन्याकुमारीपासून बेळगाव पर्यंत झालेला होता. इटालियन प्रवासी निकोलो कोंटी याने १४२० मध्ये विजयनगरला भेट दिली होती. त्याने केलेल्या वर्णनावरून विजयनगरचे साम्राज्य हे बलाढ्य व ऐश्वर्यसंपन्न हिंदू साम्राज्य होते. विजयनगर येथे संगम वंश, शाल्व वंश, तुल्व वंश आणि अरविदु वंश या चार वंशांनी साधारणपणे पावणे तीनशे वर्ष राज्य केले. अनेक कर्तबगार व पराक्रमी राजे या सत्तेवर येऊन गेले. त्यामुळे विजयनगरची भरभराट झाली. दक्षिणेत हिंदू धर्म आणि संस्कृती यांचे पुनरुज्जीवन व संवर्धन करण्याचे महत्त्वाचे कार्य या साम्राज्याने केले. येथील राज्यकर्त्यांनी लष्करी सामर्थ्या बरोबरच आदर्श शासनव्यवस्था निर्माण करण्याचे प्रयत्न केले. साहित्य, कला व शास्त्रांची भरभराट झाली. येथील शासन व्यवस्था लोकाभिमुख व कल्याणकारी होती. मध्ययुगीन भारतातील शासन व्यवस्थेचा अभ्यास करताना सुलतान कालखंड व मुघल कालखंडातील प्रशासन व्यवस्थेबरोबरच विजयनगरच्या प्रशासन व्यवस्थेचा आपणास विचार करावा लागेल. विजयनगर साम्राज्यात विविध सत्ताधिशाच्या कारकिर्दीत

लिहिलेले ग्रंथ, शिलालेख व नाणी तसेच हंपी येथील उत्खननातून मिळालेले अवशेष व भारतात आलेला इटालियन प्रवासी निकोलो कोंटी, इराणच्या शहाचा वकील अब्दुल रजाक, दोमिंगो पेस हा पोर्तुगीज प्रवासी, याशिवाय बार्बोसा, पियट्रो डेल्ला व्हेल्ले या प्रवाशांचे वृत्तांत इत्यादी विविध साधनांमधील माहितीवरून विजयनगरच्या प्रशासन व्यवस्थेची माहिती मिळविणे शक्य होते.

सन १३३६ ते १५६५ या काळात दक्षिण भारतात विजयनगर येथे वैभवशाली हिंदू साम्राज्याची स्थापना झाली. त्याचे भोवतीच्या इस्लामी सत्तेबरोबर प्रदीर्घ संघर्ष चालू होता. असा संघर्ष असतानाही येथील सत्ताधीशांनी प्रजेच्या कल्याणकारीकार्याकडे व राज्यकारभाराकडे विशेष लक्ष दिले. त्यांनी अनियंत्रित व जुलमी पद्धतीने राज्यकारभार केला नाही. हिंदू धर्म व परंपरांचे व्यवस्थितपणे पालन करून ते राज्यकारभार करीत होते. या राज्यकारभारात राजाला मदत करण्यासाठी मंत्रीपरिषद होती. या मंत्रीपरिषदेत निरनिराळ्या जाती व जमातीचे प्रतिनिधी घेतलेले होते. प्रधान सेनापती व कोषाध्यक्ष यांना मंत्री परिषदेत व राज्यकारभारात महत्त्वाचे स्थान होते. राजाला सल्ला देण्यासाठी विद्वान ब्राह्मण, साहित्यिक, कवी व सेनापती यांची एक समिती असे. राजा हा या समितीच्या सल्ल्यानेच महत्त्वाचे निर्णय घेत असे.

**अ) केंद्रीय प्रशासन :**

**१. राजा :**

राजा साम्राज्यातील सर्वश्रेष्ठ अधिपती होता. या राजाला 'राया' अथवा 'नरेश' या नावाने संबोधले जाई. राजा हा राज्य आणि प्रशासन यामधील केंद्रबिंदू होता. प्राचीन भारतीय परंपरेनुसार राज्य 'सप्तांग विचारधारेवर' आधारलेले होते. राजा हा प्राचीन राज्याभिषेक पद्धतीचा अवलंब करीत होता. राजाची निवड करण्यामध्ये मंत्री आणि नायक याची महत्त्वपूर्ण भूमिका असे. तसेच राज्यकारभाराची सर्व सूत्रे राजाच्या हाती होती. कायदा, कार्यकारी व न्याय या प्रशासनाच्या तिन्ही शाखांचा तो प्रमुख सत्ताधीश होता. राजा हा प्रमुख सत्ताधीश असला तरी धर्माची बंधने पाळून त्याला आपला राज्यकारभार करावा लागत असे. विजयनगर मधील राजानी अनियंत्रित स्वरुपाची राजेशाही निर्माण होऊ दिली नाही. म्हणजेच तो जुलमी हुकूमशहा बनला नाही. राज्य संवर्धन करणे, अंतर्गत शांतता व सुव्यवस्था राखणे इत्यादी कर्तव्य राजाला पार पाडावी लागत होती. कृष्णदेवराय यांनी लिहिलेल्या 'अमुक्तमाल्यादा' या ग्रंथामध्ये राजाची कर्तव्ये, स्वराज्य कारभाराविषयीचे आपले विचार सांगितले आहेत.

उत्तराधिकारी हे ज्येष्ठ मुलाला केले जात असे. परंतु क्वचित प्रसंगी जर राजाला (पुत्र) नसेल तर एखाद्या योग्य व्यक्तीस युवराज पदावर बसविले जात असे. या युवराज पदासाठी संघर्ष झाल्याचे दिसून येत नाही, कारण राजा हा आपल्या हयातीतच आपला उत्तराधिकारी घोषित करीत असे. त्यामुळे गादीसाठी संघर्ष झाल्याचे विजयनगर साम्राज्यात दिसून येत नाही.

**२) राज – परिषद :**

राजाच्या सत्तेला नियंत्रित करण्यामध्ये महत्वाची भूमिका बजावत असे. राजा हा महत्वपूर्ण घडामोडीबद्दल

राज – परिषदेचा सल्ला घेत असे. हीच परिषद राजाचा अभिषेक करत असे आणि देशाचे प्रशासनही करीत असे.

**३) अन्य परिषद :**

या परिषदे व्यतिरिक्त राजाला सल्ला देण्यासाठी अजून एक परिषद होती. या परिषदेमध्ये प्रांतीय सुभेदार, मोठ – मोठे नायक, सामंत – शासक, व्यापारी प्रतिनिधी असत. ही परिषद आकराने मोठी होती.

**४) मंत्री परिषद :**

केंद्रीय प्रशासनामध्ये मंत्रिपरिषद महत्त्वाचा घटक मानला जात असे. मंत्री परिषदेचा प्रमुख अधिकारी प्रधानी अथवा महाप्रधान (प्रधानमंत्री) हा होता. मंत्री परिषदेमध्ये प्रधानमंत्री, मंत्री, उपमंत्री, वेगवेगळ्या विभागाचे अध्यक्ष आणि राजाच्या जवळचे संबंधित असणारे लोक त्यामध्ये असत. ही मंत्री परिषद साधारणपणे २० सदस्यांची असे. या मंत्रिपरिषदेच्या अध्यक्षास 'सभा नायक' या नावाने संबोधले जात. तसेच प्रधानमंत्री अथवा प्रधानी हा सुद्धा या परिषदेचा अध्यक्ष होऊ शकत असे. या मंत्री परिषदेमध्ये विद्वान, राजकारणामध्ये निपुण असणारे व ज्यांचे वय पन्नास ते सत्तर वर्ष असेल अशाच निरोगी व्यक्तीस या मंत्री परिषदेचा सदस्य बनविले जात होते. ही मंत्री परिषद केंद्रीय प्रशासनामध्ये अत्यंत महत्त्वपूर्ण मानली जात होती. राजा हा आपल्या कारभारामध्ये या मंत्री परिषदेचा सल्ला घेत असे. परंतु त्यांचा सल्ला राजावर बंधनकारक नसे.

**५) दंड नायक :**

केंद्रीय प्रशासनामध्ये या इतर अधिकाऱ्यांच्या व्यतिरिक्त दंड नायक हे उच्च अधिकारी होते. 'दंड नायक' हे पद असून वेगवेगळ्या अधिकाऱ्यांची विशिष्ट श्रेणी होती. या विशिष्ट श्रेणीलाच दंड नायक या नावाने ओळखले जात होते. या दंड नायकांना प्रशासनामध्ये सेनापती, न्यायाधीश, प्रांतपती असे अधिकारी म्हणून नेमले जात होते. केंद्रीय प्रशासनामध्ये राजा आणि युवराज यांच्यानंतर प्रधानमंत्री अथवा प्रधानी हा महत्वाचा अधिकारी राज्यकारभार पाहत असे. मराठाकालीन पेशवा हे जसे पद होते तसेच विजयनगर साम्राज्यात प्रधानी हे पद होते.

**६) केंद्रीय सचिवालय :**

विजयनगरकालीन केंद्रीय प्रशासनामध्ये फक्त राजा आणि त्याचे मंत्रीपरिषद हेच राज्याचा कारभार पहात होते असे नाही तर केंद्रामध्ये एका सचिवालयाची स्थापना करण्यात आली होती. हे सचिवालय वेगवेगळ्या विभागांमध्ये विभागले होते. यामध्ये 'रायसम' अथवा सचिव, कर्निकम म्हणजेच अकाउंटंट असे अधिकारी असत. या विभागातील प्रमुखांना वेगवेगळ्या नावाने ओळखले जात होते. जसे की 'मानेय प्रधान', 'गृहमंत्री', 'मुद्राकर्ता' हा अधिकारी शाही दरबारातील मुद्रा ठेवण्याचे काम करत असे. अशाप्रकारे वेगवेगळ्या अधिकाऱ्यांच्या माध्यमातून विजयनगर साम्राज्यातील केंद्रीय सचिवालय करण्यात आले होते.

**७) प्रांतीय प्रशासन :**

विजयनगर साम्राज्य अनेक प्रांतांमध्ये विभागले गेले होते. या प्रांतांना राज्य अथवा मंडल असे म्हणत. विजयनगर साम्राज्यात या प्रांतांची संख्या सातत्याने बदलत गेलेली दिसून येते. इ. स. १४ वे ते १६ वे शतक

यादरम्यान प्रांतांचा विस्तार होत गेल्याचे दिसून येते. कृष्णदेवरायांच्या काळामध्ये प्रांतांची संख्या सगळ्यात जास्त होती. या प्रांतांना मंडलमध्ये विभाजीत केले होते. या मंडला विषयी काही इतिहासकारांची मते वेगळी असल्याचे दिसून येते. त्यांच्या मते मंडल हा  प्रांताचा मोठा विभाग होय.

प्रत्येक प्रांतावर राज्यपाल किंवा प्रांताधिकारी नेमण्यात येत असे. त्यास 'नायक' असे म्हणतात. ही पदे राज घराण्यातील कर्तबगार राजपुत्र किंवा पराक्रमी सरदार यांना देण्यात येत असत. प्रांताधिकाऱ्यांना नेमण्याचा अगर काढून टाकण्याचा अधिकार राजाला होता. प्रांताधिकारी हा प्रांताचा सर्वश्रेष्ठ असून तो स्वतःची स्वतंत्र फौज बाळगत असे. त्याच्या मदतीसाठी मुलकी व लष्करी अधिकारी असत. या नायकांना( प्रांताधिकारी)  राज्याच्या जमाखर्चाचा हिशोब राजाकडे सादर करावा लागे. प्रांताच्या एकूण उत्पन्नापैकी एक तृतीयांश उत्पन्न केंद्र सरकारकडे पाठवावे लागे, व राहिलेले दोन-तृतीयांश उत्पन्न प्रांताच्या खर्चासाठी वापरले जात असे. याकामी दुर्लक्ष केल्यास तो गुन्हा समजून नायकास कडक शासन होत असे. प्रांताची व्यवस्था केंद्राप्रमाणेच होती. केंद्रातील राजे सामर्थ्यवान असल्यामुळे नायक त्यांच्या नियंत्रणात राहत असत. राजा कमकुवत असल्यास नायक स्वतंत्ररीत्या वागत असे.

**८) नायकार व्यवस्था :**

प्रांतीय प्रशासनामध्ये या नायकर व्यवस्थेचा उल्लेख केला गेला आहे. या व्यवस्थेबद्दल अनेक इतिहासकारांमध्ये मतभेद असल्याचे दिसून येते. काही इतिहासकारांच्या मते विजयनगर साम्राज्यात सेनानायकालाच 'नायक' म्हणत असत. तर काही इतिहासकारांच्या मते हे नायक वस्तूतः सरंजामदार होते. ज्यांना राजा वेतनाच्या मोबदल्यात काही जमीन देत असे. या दिलेल्या जमिनीला 'अमरम्'  या नावाने संबोधले जात असे. जो या दिलेल्या जमिनीचा उपभोग करतो त्यास 'अमर नायक' असे म्हणत. सोळाव्या शतकाच्या मध्यावधीमध्ये या नायकांची संख्या जवळ जवळ दोनशे एवढी होती. हे नायक तामिळनाडू या प्रदेशात मोठ्या प्रमाणात नियुक्त करण्यात आले होते. नायकर व्यवस्थेचा उल्लेख प्रांतीय प्रशासनाच्या संदर्भात केला आहे. परंतु नायकाची स्थिती प्रांतीय गव्हर्नरच्या तुलनेत वेगळी होती हे खालील गोष्टीवरून दिसून येईल.

१. प्रांतीय गव्हर्नर हा प्रांतांमध्ये राजाचा प्रतिनिधी म्हणून काम पाहत असे तर नायक हा एक सैनिक सामंत होता. तो फक्त राजाला महसूल पाठवून देणे आणि सैनिकी मदत करणे एवढेच काम करत असे या कामाकरिता त्याला काही जिल्ह्यांचा प्रदेश देऊ करण्यात आला होता.

२. प्रांताच्या गव्हर्नरच्या तुलनेत या नायकांना आपल्या प्रदेशात अधिक स्वातंत्र्य होते. राजा हा नायकर यांच्या प्रदेशांमध्ये एखादी घटना घडली असेल तर त्यामध्ये हस्तक्षेप करत नसे. एखाद्या  नायकाने अक्षम्य गुन्हा केला असेल तरच राजा त्यामध्ये हस्तक्षेप करून त्याला त्या पदावरून दूर करत असे.

३. गव्हर्नरच्या तुलनेत नायक हे आपल्या प्रदेशात कृषी योग्य जमिनीचा विस्तार करणे, शेती अथवा सामान्य जनतेचे रक्षण करणे, जंगल साफ करणे इत्यादी आपले उत्तरदायित्व मानत असत. या नायकर व्यवस्थेचा चिकित्सक दृष्टीने अभ्यास केल्यास ही व्यवस्था मध्यकालीन युरोपमधील सामंतवादाची आठवण करून देते. या

व्यवस्थेमध्ये सामंतवादी लक्षणे आपणास दिसून येतात. हीच 'नायंगार' व्यवस्था विजयनगर साम्राज्याच्या विनाशास कारणीभूत ठरली.

**९) स्थानिक प्रशासन :**

प्रत्येक प्रांताचे विभाजन अनेक जिल्ह्यात करण्यात आले होते या जिल्ह्यांना 'कोट्टम' अथवा 'वलनाडू' म्हणत असत. या कोट्टमचे विभाजन 'नाडू' मध्ये करण्यात आले होते. ज्याला आज परगणा अथवा तालुका या नावाने संबोधले जाते. नाडूचे विभाजन मेलाग्राम मध्ये करण्यात आले होते. या 'मेलाग्राम' मध्ये किमान ५० गावांचा समावेश होता. प्रशासनातील सर्वात छोटा विभाग म्हणजे 'उर' किंवा 'ग्राम' हा होय. काही ग्रामाच्या समूहाला 'स्थळ' आणि 'सीमा' असे म्हटले जाई. या ग्रामाचा कारभार पाहण्यासाठी 'ग्राममंडळ' असे त्याच्या प्रमुखाला 'अय्यंगार' असे म्हणत. हा अधिकारी ग्रामरक्षण, गावात शांतता राखणे, गावातील न्यायनिवाडा करणे इत्यादी कार्य त्यास करावे लागत असे. हा अधिकारी वंशपरंपरागत असे. त्याशिवाय खेड्यात 'सेनातेव्वा' (हिशोबनीस), 'तलरा' (कोतवाल), 'बिगार' व इतर अधिकारी होते. ग्राम अधिकाऱ्यांना पैसे, धान्य अथवा जमीन या स्वरूपात वेतन मिळत असे. ग्रामपंचायतीच्या कारभारावर नियंत्रण ठेवण्यासाठी 'महानायकाचार्य' हा अधिकारी असे. त्यांच्यामार्फत राजा खेड्यातील कारभारावर लक्ष ठेवत असे. तो ग्राम व राजा यांच्यामधील दुवा होता.

अशा प्रकारे विजयनगर साम्राज्याचा राज्यकारभार काही विशिष्ट तत्त्वावर आधारलेला होता. त्यामुळे तो कार्यक्षम झालेला होता. परंतु त्यात काही दोष होते, प्रांतीय राज्यपालांना मोठ्या प्रमाणात स्वातंत्र्य देण्यात आले होते त्याचा त्यांनी दुरुपयोग केला. त्याचप्रमाणे विजयनगरचे सैन्यसुद्धा अपेक्षेप्रमाणे कार्यक्षम नव्हते. पोर्तुगीज लोकांना व्यापाराच्या निमित्ताने पश्चिम किनाऱ्यावर व्यापारास विजयनगरच्या राजाने परवानगी दिली. ही एक मोठी चूक झाली असे म्हणावे लागेल. या विविध दोषांमुळे विजयनगरचे साम्राज्य हळूहळू ऱ्हास पावले.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –१.**

**अ) रिकाम्या जागा भरा**

१) सुलतानशाही काळात सैन्य मंत्रालयाला ............... या नावाने संबोधले जात असे.

अ) दिवाण–ए–कोही ब) दिवाण–ए–बरीद क) दिवाण–ए–अरिझ ड) दिवाण–ए–वझीर

२) .............. हा प्रांतीय प्रशासनाचा प्रमुख असे.

अ) सिपाहसालर ब) दिवाण क) अरिझ ड) मुक्ती

३) दिवाण–ए–अमीरकोही हा विभाग .............. या सुलतानाने सुरू केला.

अ) बल्बन ब) अल्लाउद्दीन खिलजी क) फिरोजशहा तुघलक ड) मुहंम्मद तुघलक

४) दिवाण–ए–अंरिज या खात्याचा प्रमुख .............. हा असे.

अ) अरिझ-ए-मुमालिक		ब) दिवाण-ए-इन्शा

क) मुस्तौफी-ए-मुमालिक		ड) मुशरीफ-ए-मुमालिक

५) शहान-ए-पील म्हणजे .............. होय.

अ) हत्ती विभाग	ब) घोड्यांची पागा	क) सल्लागार मंडळ	ड) कृषी विभाग

६) सुलतानशाहीकालीन जिल्हा प्रशासन प्रमुखास .............. या नावाने संबोधले जाते.

अ) मुनसीफ	ब) शिकदार	क) मुकादम	ड) चौधरी

७) ग्रामाच्या प्रमुखास .............. या नावाने ओळखले जाते.

अ) पाटील	ब) मुकादम	क) ग्रामसेवक	ड) चौधरी

८) सुलतानशाहीकालीन गुप्तहेर खाते .............. या नावाने ओळखले जात होते.

अ) मजलीस-ए-खबलत		ब) दिवाण-ए-बरिद

क) दिवाण-ए-अमिर कोही		ड) वकील-ए-दर

९) .............. हा ईश्वराचा प्रतिनिधी ह्या नात्याने तो पृथ्वीतलावर राज्य करीत असे.

अ) सुलतान	ब) खलिफा	क) दिवाण	ड) काझी

१०) सुलतानशाही कालीन घोड्याच्या विभागाला .............. म्हणून ओळखले जाई.

अ) शहाना-ए-पील	ब) अमिर-ए-मजलीस	क) अमीर-ए-आखुर	ड) आमिर-ए-हाजीब

११) दक्षिण भारतातील हिंदूचे राज्य विध्वंस करून तेथे मुसलमानी सत्ता स्थापन करणारा .............. हा पहिला मुसलमान होय.

अ) मुहंम्मद तुघलक	ब) फिरोजशहा तुघलक	क) अल्लाउद्दीन खिलजी	ड) बल्बन

१२) .............. साली विजयनगर साम्राज्याची करण्यात आली.

अ) १३३६	ब) १३३७	क) १३३८	ड) १३३९

१३) .............. साली बहामनी राज्याची स्थापना झाली.

अ) १३४७	ब) १३४८	क) १३४९	ड) १३५०

१४) विजयनगर येथे या .............. वंशांनी साधारणपणे पावणे तीन वर्षे राज्य केले.

अ) ३	ब) ४	क) ५	ड) ६

१५) निकोलो कोंटी हा .............. या देशाचा प्रवाशी होता.

अ) जपान ब) अमेरिका क) इटली ड) इंग्लंड

१६) .............. या राज्यातील राजाला 'राय नरेश' या नावाने संबोधले जाई.

अ) बहामनी ब) विजयनगर क) सुलतानशाही ड) मुघल

१७) मंत्रीपरिषदेच्या अध्यक्षास .............. या नावाने संबोधले जात होते.

अ) प्रदानी ब) सभा नायक क) राजा ड) युवराज

१८) मंत्री परिषदेमध्ये साधारणपणे .............. होते.

अ) २० ब) २१ क) २२ ड) २३

१९) विजयनगर साम्राज्यात जिल्ह्याला .............. संबोधले जाई.

अ) सरकार ब) कोट्टम क) उर ड) मेलग्राम

२०) विजयनगर साम्राज्यात ग्रामाच्या प्रमुखाला .............. असे म्हणत.

अ) अय्यंगार ब) नायक क) तलरा ड) सेवातेव्वा

### ३.२.२ शेती आणि जमीन महसूल व्यवस्था :

**अ) सुलतानशाही कालखंड :**

प्राचीन काळाप्रमाणे मध्ययुगीन कालखंडामध्ये शेतीविषयक विविध घटकाकडे लक्ष दिले जात होते. या काळातील कोणत्याही सत्तेच्या उत्पन्नाचे प्रमुख साधन म्हणजे महसूल हेच होते. या काळातील सर्वसाधारणपणे ७५ टक्के लोक खेड्यात राहत असून ते प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून राहत होते. त्यामुळे शेतीविषयक आर्थिक धोरणाला या काळातही विशेष महत्त्व मिळाल्याचे दिसते. मध्ययुगीन कालखंडात शेती हा एकूण समाजाच्या आर्थिक जीवनाचा महत्त्वपूर्ण घटक असल्याने शासनकर्त्यांनी या घटकाच्या प्रगतीकडे विशेष लक्ष दिलेले दिसते. शेतीतील उत्पन्न व त्यावरील महसूल हेच राज्याचे प्रमुख उत्पन्नाचे साधन होते. अनेक अधिकाऱ्यांना जमीनी जहागीर म्हणून देऊ केल्या होत्या. हेच जहागीरदार शेतकऱ्यांची पिळवणूक करत असत. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळात यामध्ये महत्वपूर्ण बदल झाल्याचे दिसून येते. अल्लाउद्दीन खिलजीने देवू केलेल्या इनाम जमीनी, जहागीर, धार्मिक इनाम जमीनी या सर्व जप्त केल्या. यावरती सरकारचा अधिकार निर्माण केला. त्याने आपल्या कालखंडात उत्पन्नाच्या अर्धा हिस्सा महसूल म्हणून ठरविला. सुलतानशाही काळात सुलतान अल्लाउद्दिन खिलजी, मुहंम्मद तुघलक, फिरोजशहा तुघलक या राज्यकर्त्यांनी शेती व्यवसायाच्या दृष्टीकोनातून विशेष कार्य केल्याचे दिसून येते. त्यांच्या या प्रयत्नांमुळे तत्कालीन राज्याचा महसूल वाढण्यास मदत झाली.

**१) शेती उत्पादने व जलसिंचन :**

सुलतानशाही काळात खरीप आणि रब्बी अशा दोन्ही हंगामात पिके घेतली जात होती. आजही तीच पद्धत अनुसरलेली दिसून येते. सुलतानशाही काळात एकूण २५ प्रकारची पिके घेतली जात होती. उदाहरणार्थ ज्वारी, बाजरी, भात, कडधान्य इत्यादी. याशिवाय या काळात पैसे मिळवून देणारी पिके म्हणजेच नगदी पिकेसुद्धा घेतली जात होती. उदाहरणार्थ ऊस, नीळ इत्यादी त्याचबरोबर आंबा, टरबूज या सारख्या फळांचे उत्पादन घेतले जात होते. उदाहरणार्थ फिरोजशहा तुघलक याने दिल्लीच्या आसपास १२०० फळबागा तयार केल्या होत्या. त्याच बरोबर मका, तंबाखू या सारखी पिके जे बाहेरून आलेली होती. त्यांचे उत्पादन येथे घेतले जात होते. या व्यतिरिक्त बंगाल, काश्मीर इत्यादी प्रदेशात रेशमी उत्पादन घेतले जात होते. अशा वेगवेगळ्या उत्पादनाची शेती सुलतानशाही काळात केली जात होती. या शेतीच्या माध्यमातून आपला चरितार्थ चालवला जात असे. त्याच बरोबर राज्याचा महसूल वाढविण्यामध्ये या शेतीचा महत्वाचा वाटा मानला जात होता. शेतीला पूरक असे काही छोटे उद्योग निर्माण झाले होते.

**२) जलसिंचन :**

सुलतानशाही काळात अल्लाउद्दीन खिलजी, मुहंम्मद तुघलक, फिरोजशहा तुघलक या सुलतानांनी शेतीच्या विकासासाठी व तिच्या प्रगतीसाठी जाणीवपूर्वक लक्ष दिले होते. या सुलतानांनी आपल्या कारकीर्दीत अतिशय उल्लेखनीय अशी कामगिरी केली होती. या सुलतानांनी अनेक विहिरी, तलाव, बंधारे, कालवे खोदले होते. अल्लाउद्दीन खिलजी याने ‘हज-ए-ईलाही’ हा तलाव बांधला. या काळात जवळजवळ पाच कालवे खोदण्यात आले होते. सुलतानांनी अनेक नद्यांवर कालवे खोदले होते. या माध्यमातून शेतीला पाणीपुरवठा केला जात होता. पाण्याची मुबलकता निर्माण केल्यामुळे शेतकरी वेगवेगळ्या प्रकारची पिके घेऊ लागला होता. यातून राज्याच्या महसूलात वाढ झाली होती. मुहंम्मद तुघलकाने शेतीच्या विकासासाठी ‘अमीर-ए-कोही’ नावाचा विभाग सुरु केला. फिरोजशहा तुघलकाने आपल्या कारकीर्दीत ‘हज-ए-शमी’ नावाचा तलाव बांधला. फेरिस्ताने आपल्या प्रवास वृतांतात येथे पन्नास धरणे बांधल्याचा उल्लेख केला आहे. शासनाच्या माध्यमातून अनेक कालवे व धरणे बांधल्यामुळे त्याचा मोठ्या प्रमाणात फायदा शेतकऱ्यांना झाला. अशाप्रकारे या सुलतानांनी शेतीचे महत्व ओळखून जलसिंचनासाठी महत्त्वाची भूमिका बजावली होती.

**३) सुलतान कालीन जमीन महसूल व्यवस्था :**

सुलतानशाही सत्तेच्या स्थापने बरोबरच जमीन महसूल याचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा बनला होता. कारण महसूल हे राज्याच्या कराचे महत्त्वाचे साधन मानले जात होते. या काळातील जमीन महसूल व्यवस्था ही मुस्लिम विचारधारा आणि प्रचलित देशी विचारधारा यांचे संमिश्र होते. या काळातील जमीन महसूल विषयीची माहिती जास्त उपलब्ध होत नाही. त्यांनी आपापल्या पद्धतीने आपापल्या ताब्यातील जमिनीचे महसूल ठरवून दिले होते. त्यामुळे वेगवेगळ्या जमीन महसुलाच्या पद्धती अस्तित्वात आल्या होत्या. या जमीन महसूल विषयाच्या नोंदी तत्कालीन काळातील समकालीन इतिहासकार बरनी व इब्न बतूता यांनी आपल्या प्रवास वृत्तांतात दिल्या आहेत.

या काळातील महसूल व्यवस्थेच्या दृष्टीने विचार करता जमीनधारणा पद्धती चार प्रकारांमध्ये विभागलेले होती.

**१. इक्ता पद्धती :** ही पद्धती प्रशासन आणि महसूल वसूली या उद्देशाने राबविली जात होती. इक्तेदार किंवा मुक्ती हा महसूल गोळा करत असे. ठरवून दिलेला महसूल तो शासनाकडे जमा करत असे.

**२. खालसा जमीन :** ही जमीन शासनाची होती. याच्यावर पूर्ण शासनाचे नियंत्रण असे. सुलतानाच्या व दरबाराच्या खर्चासाठी या जमीनीचा उपयोग केला जात होता. सरकार हे चौधरी, मुकादम आणि स्थानिक अधिकारी यांच्या माध्यमातून कर वसूल करत असे. या व्यतिरिक्त आमिल हा अधिकारी सर्व कर गोळा करून केंद्राकडे जमा करत असे.

**३. इनाम जमीन :** यामध्ये 'मद्द-ए-माश', 'सुयुरघल', 'वक्फ इनाम' जमीन यासारख्या इनाम जमीनीचा समावेश होता. ही जमीन धार्मिक संस्थांना इनाम म्हणून देण्यात आली होती. या जमीनीवर कोणत्याही प्रकारचा कर लावला जात नसे.

४. अशी जमीन की, जी हिंदू राजाच्या अधिपत्याखाली असे.

**४) सुलतानशाही कालीन कराच्या पद्धती :**

**कराचे प्रकार :** सुलतानशाही काळात वेगवेगळ्या प्रकारचे कर आकारले जात होते. सर्वसाधारणपणे या कार्याची विभागणी दोन वर्गामध्ये करण्यात आली होती. १. धार्मिक कर, २. धर्मनिरपेक्ष कर.

**१. धार्मिक कर :**

**१. जकात :** जे हनिफी सिद्धांतावर विश्वास ठेवणारे या कराकडे धार्मिक कर या रूपामध्ये बघतात. हा कर मुस्लिम जनतेचे कर्तव्य म्हणून स्वेच्छेने दिला जात असे. या करांच्या माध्यमातून समाजातील असहाय्य लोकांना मदत करण्याच्या उद्देशाने आपल्या संपत्तीतील काही हिस्सा जकात म्हणून दिला जात असे. जकात हा कर बळजबरीने वसूल केला जात नसे. ते धर्म विरुद्ध मानले जात होते. जकातच्या अंतर्गत संपत्ती ही दोन भागांमध्ये विभागले जात असे. १. प्रत्यक्ष कर २. अप्रत्यक्ष कर १. प्रत्यक्ष करांमध्ये जनावरे अथवा शेती यातून मिळणारे उत्पन्न २. अप्रत्यक्ष करामध्ये सोने-चांदी आणि व्यापारी वस्तू इत्यादीचा समावेश असे.

**२. जिझिया :** हा कर गैर मुस्लीम समाजावर लावला जात होता. हा कर या समाजाच्या संपत्तीची आणि त्यांची रक्षा करण्यासाठी घेतला जात असे. हा कर गैर मुसलमानांना आपल्या उत्पन्नाच्या प्रमाणात द्यावा लागत होता. जिझिया कर देणाऱ्यांचे तीन विभागात वर्गीकरण करण्यात आले होते. १. श्रीमंत वर्ग २. मध्यम वर्ग ३. सामान्य वर्ग यामध्ये श्रीमंत वर्गाला ४० टंका, मध्यम वर्गाला २० टंका तर सामान्य वर्गाला १० टंका प्रतिवर्षी जिझिया कर द्यावा लागे. यामध्ये स्त्रिया, लहान मुले, साधू, भिक्षूक हे या करापासून मुक्त होते. तसेच ब्राह्मण व पुरोहित यांच्याकडूनही हा कर घेतला जात नव्हता.

**२. धर्मनिरपेक्ष कर :**

**१. खराज :** हा कर राज्यातील सर्वात महत्त्वाचे उत्पन्नाचे साधन होते. हा मूळ कर मुसलमान नसलेल्या

शेतकऱ्याकडून घेतला जात असे म्हणजेच गैर मुस्लीम व्यक्तीकडून घेतला जाणारा भुमी कर होय. परंतु एखाद्या मुसलमान व्यक्तीने खराज जमीन कसली तर त्याच्याकडूनही हा कर घेतला जात असे. खराज हा कर उत्पन्नाच्या १/३ पेक्षा कमी व १/२ पेक्षा जास्त घेतला जात नसे.

**२. खम्स :** युद्धातील लुटीतून मिळालेली संपत्ती ही खम्स म्हणून ओळखली जात असे. लुटीत मिळालेल्या संपत्तीची वाटणी करण्यात येत असे. ४/५ भाग सैनिकामध्ये वाटला जात असे. तर १/५ भाग हा राजकोशात जमा केला जात असे. सुलतानशाही काळात अल्लाउद्दीन खिलजी व मुहंम्मद तुघलक यांनी लुटीत मिळालेल्या संपत्तीचे या पद्धतीने वाटणी केल्याचे दिसून येते.

**३. इतर कर :**

याव्यतिरिक्त काही इतरही धर्मनिरपेक्ष कर अस्तित्वात होते. उदा. सिंचन कर (शर्ब), गुरे चरण्यासाठी कर, उत्पादन शुल्क कर, आयात- निर्यात कर, घरपट्टी कर, रणपट्टी, व्यापार कर, इ. कर सुलतानशाही काळात घेतले जात होते.

**५) सुलतानशाही कालीन जमीन महसूल व्यवस्था :**

दिल्ली सुलतानांनी एकसारखी जमीन महसूल व्यवस्था सर्वत्र राबविलेली दिसत नाही. प्रत्येक सुलतानाच्या काळात वेगवेगळ्या समस्या होत्या. त्यामुळे त्या त्या सुलतानावर सर्व काही अवलंबून होते. अशी ही जमीन महसूल व्यवस्था पुढीलप्रमाणे जाणून घेता येईल.

**१) घल्ला बक्ष पध्दत :** जमीन महसूल ठरविण्याची सर्वात साधी व सोपी पद्धत म्हणजे 'घल्ला' अथवा 'गल्ला' बक्ष पध्दत ही होती. या पद्धतीत कोणतीही गुंतागुंत नव्हती. ती कमी खर्चाची होती. या घल्ला - बक्ष पद्धतीलाच 'बटाई पद्धत' म्हणूनही ओळखले जाते. या पद्धतीत तीन प्रकार होते

**१. राशी बटाई :** यामध्ये कापणी झाल्यानंतर खळ्यामध्ये जेव्हा धान्य व भुसा वेगळा केला जातो. तेव्हाच अन्नधान्याची वाटणी केली जात असे.

**२. खेत बटाई :** यामध्ये पीक उभे असतानाच पण कापणी पूर्वी सरकारचा हिस्सा निश्चित केला जात असे.

**३. लंक बटाई :** या पद्धतीमध्ये सरकारचा हिस्सा खळ्यावरच ठरविण्यात येत असे. पण तो धान्य व भुसा वेगळा करण्यापूर्वी ठरविण्यात येत असे. लंक याचा अर्थ 'कापणीला तयार झालेले पिक' असा होतो. तर घल्ला म्हणजे धान्याचा किंवा पिकाचा सरकारी हिस्सा होय. इतिहासकार इरफान हबीब यांच्या मते गल्ला बक्षी पद्धत ही खरोखर जमीन महसूल ठरविण्याची पद्धत नसून महसूल ठरवावा लागण्याची गरज भासू नये, अशा प्रकारे तो गोळा करण्याची पद्धत आहे.

**२) हस्त-ओ-बूद :** 'घल्ला बक्ष' पद्धती व हस्त-ओ-बूद या दोन्ही पद्धतीच्या वैशिष्ट्या मध्ये साम्य दिसून येते. हस्त-ओ-बूद या संज्ञेचा शब्दश अर्थ 'उभे पीक' असा आहे. म्हणून उभ्या पिकाच्या आधारावर जमीन

महसूल निश्चित केला जातो. या पद्धतीमध्ये लागवडी योग्य सर्व जमिनीवर महसूल आकारला जात होता. ही पद्धत सामान्य शेतकऱ्यांना पसंत पडते. कारण या पद्धतीमध्ये पिकांची समक्ष पाहणी करून प्रत्यक्ष उत्पन्नावर जमीन महसूल ठरविला जात असे. जमीनीचे मोजमाप करावयाची गरज नसल्याने महसूल ठरवण्याचे काम सरकारी महसूल अधिकाऱ्यांच्या दृष्टीने सोपे व कमी खर्चाचे होत असे. त्यामुळे सरकारी खर्चात बचत होत असे. महसूल ठरविणाऱ्या अधिकाऱ्यावरील कामाचा बोजा कमी होत असे. तसेच भ्रष्टाचारी अधिकाऱ्यापासून शेतकऱ्यांची सुटका होत असे. ही पद्धत शेतकऱ्यांना फायद्याची व सरकारला काटकसरीची असली तरी सर्वच प्रकरणात ती व्यवहार्य नसे. उभे पीक पाहून उत्पन्नाचा अंदाज ठरविण्याकरिता प्रत्येक शेतावर आपला अधिकारी पाठविणे सरकारला शक्य नव्हते. त्यामुळे काही बाबतीत ही पद्धत फायद्याची होती तर काही बाबतीत ती तोट्याची होती असे दिसून येते.

**३) कानकूट :** या पद्धतीत सरकारच्या अडचणी काही प्रमाणात कमी होत व आकारणी काही शास्त्रीय तत्त्वावर निश्चित करण्याचा प्रयत्न केला जात असे. प्रथम जमिनीच्या मोजणीचे काम हाती घेतले जात असे. जमीनीचे प्रत्यक्ष मोजमापावर आधारल्याशिवाय कोणतीही महसूल पद्धत शास्त्रीय होत नसे. निवडक शेतामधील उत्पन्नाचा अंदाज घेतला जाई म्हणजे जमीनीच्या तुकड्याच्या 'पिकाचा दर' निश्चित केला जाई. तो दर त्या सर्व क्षेत्राला लागू केला जाई. सर्व उत्पन्न सरकार व शेतकरी अशा दोन्ही हिश्यात विभागले जाई. एकंदर उत्पन्नातून शेतकऱ्याचा हिस्सा वजा केला म्हणजे उरलेल्या सरकारी विषयाचा रोख रकमेत रुपांतर केले जाई. हस्त-ओ-बूद पद्धतीप्रमाणे फक्त पिकाखालील जमीनीचाच महसूल धरला जाई. लागवडीयोग्य सर्व जमीनीवर महसूल लादला जात नसे म्हणून फक्त पिकाखालील जमीन मोजली जात असे. आमीन हा अधिकारी जमीनीचा एक तुकडा निवडत असे तर शेतकरी हा जमीनीचा दुसरा तुकडा निवडत असे. या दोन तुकड्यातील पिकाची तोडणी करण्यात येई व नंतर मोजलेल्या जमीनीचे एकूण उत्पन्नाचा अंदाज घेतला जाई. सरकारी हिस्सा धान्याच्या स्वरूपात निश्चित केला जाई. व त्याचे रूपांतर प्रचलित भावाने पैशात करण्यात येई. या पद्धतीमुळे पिकाला जर नुकसान झाल्यास शेतकऱ्याचा जो तोटा होत असे त्यात सरकार भागीदार होत असे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या दृष्टिकोनातून ही पद्धती बरी होती असे दिसून येते.

**४) नसक पद्धती :** 'नसक' म्हणजे पिकाची अंदाजाने केलेली किंमत होय. मागील गेल्या दहा किंवा बारा वर्षात प्रत्यक्ष दिलेल्या जमीन महसुलाची सरासरी काढून त्याच्या पायावर सरकारचा जमीनीच्या उत्पन्नातील हिस्सा या पद्धतीत ठरविला जात असे. जमीन महसूल हा रोख रकमेत निश्चित केला जात असे. या बाबतीत ही पद्धती कानकूट पद्धतीपेक्षा वेगळी होती. कारण त्या पद्धतीत महसुल फक्त धान्याच्या स्वरूपातच निश्चित केला जात असेल तर या पद्धतीत रकमेच्या स्वरूपात निश्चित केला जात होता. कानकूट पद्धतीप्रमाणे पिकाखालील जमीनीच्या प्रमाणात महसुलाची आकारणी बदलत नसेल तर शेत सबंध लागवडीखाली आणलेले असो किंवा त्याचा फक्त एक भाग लागवडी खाली असो किंवा एक पीक घेतले असो अथवा अनेक पिके घेतलेली असोत, आकारणी मात्र कायम असे. नसक मध्ये जमिनीच्या मोजमापाची आवश्यकता नसे. किंवा उत्पन्नाच्या प्रासंगिक अंदाजाची गरज नसे. अशाप्रकारे गेल्या काही वर्षात प्रत्यक्ष जो महसूल दिलेला असेल त्यावर आधारित अशी ही ओबडधोबड व पटकन कोठेही लावता येणारी पद्धती होती. त्यामुळे ती जमीनीच्या कोणत्याही तुकड्याला

लागू करता येत असे. महसुलाच्या इतर कोणत्याही पद्धतीशी तिचा केव्हाही विरोध येत नसे. तर वेगवेगळ्या वेळी वेगवेगळी आकारणी झालेल्या वेगवेगळ्या जमीनी या पद्धतीने एकत्र आणता येत असत. ही पद्धती मुघल काळात आढळून येते. या पद्धतीविषयी अनेक इतिहासकारांनी आपली वेगवेगळी मते मांडली आहेत. इतिहासकार निजाफ अलीखान यांच्या मते 'नसक' या शब्दाने फक्त महसुली शेती एवढाच अर्थ व्यक्त होतो. महसूल ठरविण्याची पद्धत असा अर्थ होत नाही.

ब्लौचमन यांच्या मते या जमीन महसूल अधिकारी व शेतकरी मिळून सरकारचा हिस्सा ठरवण्याची पद्धत असा अर्थ व्यक्त होतो.

मोरलॅन्ड म्हणतात की, ही संक्षिप्त रितीने केलेली आकारणी होती तर श्रीराम वर्मा यांच्या मते, गेल्या काही वर्षात जो महसूल दिला असेल त्याची सरासरी काढून त्यावरून सरकारी मागणी निश्चित करण्याची ही पद्धती होती. इरफान हबीब यांच्या मते, नसक म्हणजे पूर्वी निश्चित केलेली कुठलीतरी आकारणी स्विकारून प्रत्यक्ष मोजमाप करण्याची टाळाटाळ होय.

अशा प्रकारे राज्याचा महसुल वाढविण्याच्या दृष्टिकोनातून या सुलतानांनी शेतीमध्ये वेगवेगळे प्रयोग करून शेतीचा विकास करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे अल्लाउद्दीन खिलजी हा पहिला सुलतान की ज्याने आपल्या काळात जमीनीची मोजणी करून त्यावर शेतसारा आकारणी सुरू केली. या सुलतानांचा विचार पुढील काळात मोगल बादशहाने राबविला. त्यामध्ये शेरशाह या अफगाण पठाणाने आपल्या कारकीर्दीत जमीन महसूल व्यवस्था शास्त्रीय पद्धतीने कशी राबवता येईल. याचा विचार केला व त्यातून राज्याचा महसूल वाढवून आर्थिक पाया भक्कम करण्याचा प्रयत्न केला.

**ब) विजयनगर कालीन शेती व जमीन महसूल व्यवस्था :**

मध्ययुगीन भारतातील इतर विभागाप्रमाणे दक्षिणेत शेती हाच लोकांचा प्रमुख व्यवसाय होता. त्यामुळे महसूल व्यवस्थेला बरेच महत्त्व प्राप्त होते. जमीन विषयक अनेक व्यवहाराचा अभ्यास केल्यास दक्षिणेत जमिनीच्या खाजगी मालकीची सर्वमान्य संस्था अस्तित्वात होती. खाजगी व्यक्ती कडून राजाने जमीन विकत घेणे, जमीनीच्या गहाणाबाबत व्यवहार, त्याबरोबर प्रत्यक्ष केलेले महसूलबाबतचे ठराव, या सर्व गोष्टी जमीनीवर लोकांचा हक्क मालकीच्या स्वरूपाचा होता. राजाला स्वतःच्या खाजगी जमीनी होत्या. पडीक किंवा लागवडीखालील न आणलेल्या जमीनीची मालकी राजाकडे असे. या काळातील कृषी अर्थव्यवस्थेमध्ये मंदिरांना अनन्यसाधारण महत्त्व होते. या काळात कृषी योग्य जमिनीचा मोठ्या प्रमाणात विस्तार झाला. संपूर्ण विजयनगर साम्राज्यात बंजर आणि जंगलानी युक्त अशी जमीन कृषी योग्य बनविली. यामध्ये विजयनगर साम्राज्यातील राजांचे मोठ्याप्रमाणात योगदान दिसून येते. या काळात जमीन धारणा पद्धती, जलसिंचन व शेती तसेच जमीन महसूल व्यवस्था हे घटक अत्यंत महत्त्वाचे  मानली जात होते. त्यामुळे या घटकांविषयी जाणून घेणे गरजेचे ठरते.

**१) शेती :** या काळात मोठ्या प्रमाणात शेती केली जात होती. सामान्यतः जमिनीचे दोन भागात वर्गीकरण या वर्गीकरण करण्यात आले होते. १) बागायत जमीन (जलसिंचन सुविधा युक्त जमीन) २) जिरायत जमीन

(जलसिंचन सुविधा विरहित जमीन) असे दोन भागांमध्ये जमीनीचे वर्गीकरण करण्यात आलेले होते. पहिल्या श्रेणीतील जमीनीमध्ये दोन किंवा तीन उत्पादने घेतली जात होती. धान्य उत्पादनामध्ये भात, हरभरा डाळ, जव आणि तीळ उत्पादन घेतले जात होते. तसेच नीळ, कापूस यांची शेती केली जात होती. पश्चिम किनारपट्टीच्या भागांमध्ये मसाल्याची शेती केली जात होती. तसेच याच भागात काळी मिरची आणि आले यांचेही उत्पादन घेतले जात होते. जे जगामध्ये वेगवेगळ्या भागात निर्यात केले जात होते. कर्नाटकच्या भागांमध्ये इलायची याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जात होते. तसेच नारळाचे उत्पादन किनारपट्टीच्या भागात घेतले जात होते. ही सर्व उत्पादने पाण्याची मुबलकता असल्यामुळे घेतली जात होती. यावरून हे स्पष्ट होते की या काळात शेतीचा विकास मोठ्या प्रमाणात झाला होता.

**२) जलसिंचन :** विजयनगर प्रशासनामध्ये जलसिंचनाचा असा कोणताही विभाग अस्तित्वात नव्हता. केवळ व्यक्तिगत प्रयत्नांद्वारे या जलसिंचनाच्या साधनांचा विकास केला जात होता. जलसिंचन साधने विकसित आणि विस्तारित करण्यामध्ये मंदिर, मठ, व्यक्ती आणि संस्था यांचे समान योगदान दिसून येते. या काळात जलसिंचनाच्या साधनांचा विस्तार करणे हे पुण्यकर्म मानले जात होते. जे कोणी या साधनांचा विस्तार करेल अशा राज्यांना करमुक्त जमीन दान दिली जात असे. विजयनगर साम्राज्यात जलसिंचनासाठी बंधारे, तलाव, पाट इत्यादी बांधले गेले होते. या यामध्ये शेतीसाठी पाणीपुरवठा केला जात होता. नदीवर अनेक बंधारे बांधून शेतीला पाटाच्या साह्याने पाणी दिले जात होते. या काळात वेगवेगळ्या भागात मोठमोठे तलाव निर्माण करण्यात आले होते. याविषयीचे उल्लेख अनेक शिलालेखाच्या माध्यमातून आपणास मिळतात. जलसिंचनाच्या साधनाचे रक्षण करणे अथवा त्याची व्यवस्था लावणे ही सामुदायिक जबाबदारी मानण्यात आली होती. या साधनांचा उपयोग घेणारे राज्याला नियमित कर भरत होते. राज्यातील एखादी व्यक्ती निपुत्रिक मृत्यू पावली असता त्याची सर्व संपत्ती ही जलसिंचनाच्या साधनांची डागडुजी करण्यासाठी वापरली जात होती. कधीकधी जलसिंचनाच्या साधनाचे पुनर्निर्माण करण्यासाठी राज्य स्थानिक कर माफ करत असे तसेच गावामध्ये पाणी वापरण्यावरून एखादा वाद निर्माण झाला तर तो ग्रामसभेतील स्थानिक अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सोडविला जात होता. अशाप्रकारे विजयनगर साम्राज्यात जलसिंचनाच्या माध्यमातून शेतीचा विकास करण्याचा प्रयत्न मोठ्या प्रमाणात करण्यात आला होता. यातूनच राज्याच्या महसुलामध्येही मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती.

**३) जमीन धारणा पद्धती :** या काळात स्थूलमानाने जमीन धारणा पद्धतीचे दोन प्रकार होते. पहिल्या प्रकारात देणगी दिलेल्या जमीनी व दुसऱ्या प्रकारात सेवेच्या मोबदल्यात दिलेल्या जमीनी, पहिल्या प्रकारात कर माफ किंवा नाममात्र कराने देवळे किंवा धार्मिक संस्थांना दिलेल्या जमिनीचा समावेश असे. उदाहरणार्थ मठ, जैन बस्ती किंवा मशिदी यांचा समावेश असे. देशातील धार्मिक विद्या तेवत ठेवण्याची ज्याच्याकडून अपेक्षा असे अशा ब्राह्मणांनाही जमीनी दिल्या जात असत. दुसऱ्यात प्रकारात सरकारी नोकरांना ते बजावत असलेल्या सेवेच्या मोबदल्यात दिलेल्या जमिनीचा समावेश होतो. कारण अशा सेवेचा मोबदला जमिनीच्या स्वरूपात देण्याची पद्धत होती. जर अशा प्रकारच्या जमीनी सैन्य उभारणी व राखण्यासाठी दिल्या जात असतील तर ज्यांना अशा जमीनी दिल्या जात त्यांना कर्नाटकात 'नायक' व महाराष्ट्रात 'वतनदार' ही संज्ञा होती.

देणगी म्हणून दिलेल्या जमीनीचे ‘ब्रह्मदाय’, ‘देवदाय’ व ‘मठपुरा’ असे तीन प्रकार असत.

१) ब्राह्मणांना वैयक्तिक रित्या किंवा सामुदायिकरीत्या दिलेल्या जमिनींना ब्रह्मदाय असे म्हणत असत. पुष्कळ वेळा ब्राह्मणांच्या एखाद्या विशिष्ट गटाला संबंध खेडी इनाम दिलेली असत. या प्रकारात इनाम दिलेल्या खेड्याला ‘अग्रहार’ असे म्हणत. या गटातील प्रत्येक व्यक्तीच्या हिश्याला ‘वृत्ती’ असे म्हणत असत.

२) देवदाय या प्रकारात देवळात दिलेल्या या कामांचा समावेश असे देवाची दैनंदिन व प्रासंगिक सेवा करणे पंचामृत अभिषेक चार्तुमास पूजा नंदादीप किंवा दिवा सतत तेवत ठेवणे व इतर अनेक प्रकारच्या सेवेचा त्यात समावेश असे.

३) शेवटी मठपुरा या जमीन देणगी प्रकारात मठांना दिलेल्या देणग्यांचा व इनाम जमीन यांचा समावेश होतो. तेथे प्रचलित असलेल्या धार्मिक परंपरा चालू ठेवण्याकरिता या देणग्या दिलेल्या असत. अशा प्रकारच्या देणग्या फक्त सरकारकडूनच मिळत असत असे नसून सामान्य व्यक्तीकडूनही या देणग्या दिल्या जात असत. आपल्या स्वतःच्या जमीनी इनाम म्हणून देवळे किंवा मठ यांची स्थापना सामान्य व्यक्तीने केल्याची अनेक उदाहरणे आढळून येतात.

४) सेवेबद्दल दिलेल्या इनामामुळे नायकांचा एक अधिकारी वर्ग निर्माण झाला होता. त्याच्या सेवेचे स्वरूप लष्करी व मुलकी अशा दोन्ही प्रकारचे असे. विजयनगर साम्राज्यात या नायकांना विभाग वाटून दिलेली असत. आपापल्या भागात शांतता व सुव्यवस्था राखण्याचे काम त्यांच्यावर सोपविलेले असे. हे विभाग किंवा जमीनी सामान्यपणे वंशपरंपरेने जमीन म्हणून ओळखली जात असे. विजयनगर साम्राज्यात ‘नायकार व्यवस्था’ ही महत्त्वपूर्ण मानली जात होती. तत्कालीन काळात म्हैसूर विभागात जमीन धारणेच्या विविध पद्धती अस्तित्वात होत्या. त्या कंदाय, वारूम, श्रय व जुडी या होत. नायकार व्यवस्थेच्या अंतर्गत त्यांच्या विशेष सेवेच्या बदल्यात त्यांना विशिष्ट भूप्रदेश दिला जात होता. अशा जमीनीला ‘अमरम’ या नावाने संबोधले जात असे. याच्या प्रमुखास ‘अमर नायक’ असे म्हणत असत. सुरूवातीला कर व्यवस्था काही अटी-शर्ती वरती सुरू करण्यात आली होती. कालांतराने ती वंशपरंपरागत झाली. गावांमध्ये काही विशिष्ट सेवा दिल्या बद्दल त्यांना करमुक्त जमीन दिली जात असे. अशा साधारण पद्धतीस ‘उंबली’ या नावाने संबोधले जात होते. या काळातील मोठे जमीनदार आणि सरकारी अधिकारी रयतेचे मोठ्या प्रमाणात शोषण करीत होते. याकाळात शेतमजूर याविषयी काही उल्लेख आपणास मिळतात. या शेतमजूरास ‘कुदी’ असे म्हणतात. जमीनीच्या देवाण-घेवाण बरोबरच हे शेतमजुरही हस्तांतरीत होत असत. त्यांना सेवामुक्त केले जात नसे. अशा प्रकारे विजयनगर साम्राज्यात जमीन धारणा पद्धती अवलंबिण्यात आली होती.

**४) जमीन महसूल व्यवस्था :** विजयनगर कालीन जमीन महसूल व्यवस्था एक व्यापक विषय आहे. याविषयी तत्कालीन काळातील शिलालेख व अन्य साधने यातून मोठ्या प्रमाणात माहिती उपलब्ध होते. विजयनगरकालीन राज्याच्या उत्पन्नाचे वेगवेगळे स्रोत होते. उदाहरणार्थ जमीन महसूल, संपत्ती कर, व्यापारी कर, व्यावसायिक कर, उद्योग कर, सामाजिक आणि सामुदायिक कर इत्यादी परंतु राज्याचा महत्त्वाचा उत्पन्नाचा स्रोत म्हणजे जमीन महसूल हाच होता.

**१) जमीनीचे प्रकार :** विजयनगर व त्याच्या मांडलिक राज्यांमध्ये जमीनीचे वेगवेगळ्या तत्त्वाप्रमाणे वर्गीकरण केलेले होते. त्यामुळे अनेक प्रकारची वर्गीकरणे झाली होती. पाणीपुरवठ्याच्या सोयीप्रमाणे जमीनीचे वर्गीकरण करण्यात आले होते. उदाहरणार्थ 'गद्दे' म्हणजे ओली जमीन व 'बेद्‌द्लू' म्हणजे कोरडी जमीन, ओल्या जमीनी या सामान्यपणे खालच्या जमीनी असून त्यांना पाणी पुरवठा भरपूर होत असे. तर कोरड्या जमीनी या उंचावरच्या जमीनी असून त्यांना पाणीपुरवठा कमी मिळत असे. ओल्या जमीनीची पुनर्विभागणी काही वेळा तांदळाची जमीन व बागांची जमीन यात केली जात असे. तर दुसऱ्या प्रकारच्या जमीनीत सुपारी, मिरी या प्रकारची पिके घेत असत. दुसरे एक वर्गीकरण जमीनीच्या प्रकारावर केले होते. 'इक्केरी' मध्ये ओल्या जमीनीचे पाच प्रकार केले होते.

१) उत्तम- काळी जमीन व काळी वाळूमिश्रित जमीन २) मध्यम- उंच आणि मोकळी तांबडी किंवा संयुक्त जमीन ३) कनिष्ठ - गडद किंवा दसकी, वाळू व झरे असलेली जमीन ४) अधम - कठीण, उंच व कोरडी जमीन ५) अधमाधम - उष्ण कोरडी व पाण्याच्या पातळीच्या वर असलेली जमीन ओल्या जमीनीचे जसे प्रकार सांगितले आहेत तसेच कोरड्या जमिनीचे सहा प्रकार सांगितले आहेत. ते पुढीलप्रमाणे १) येरी - काळी माती २) करी मसब - गडद चिकन माती वाळू सह ३) केम्मण - तांबडी जमीन ४) मळल - वालुकामय जमीन ५) इम्मण - मिश्र जमीन ६) गोणीकल - रेती मिश्रित जमीन अशाप्रकारे विजयनगर साम्राज्यात वेगवेगळ्या प्रदेशात जमीनीचे प्रकार सांगण्यात आले आहेत. यावरुन जमीन कोणकोणत्या प्रकारची होती हे स्पष्ट होते.

**२) महसूल आकारण्याच्या पद्धती :** जमिनीचे स्वरूप, तिच्यावरील पिकांचे स्वरुप, पाणीपुरवठ्याची उपलब्धता या प्रकारचे अनेक घटक महसुलाची आकारणी करताना विचारात घेतले जात असत. काही जमीनी पूर्णपणे पावसावर अवलंबून असत. काहींना पाणीपुरवठ्याची सोय असे. काही जमीनी नद्यांच्या काठावर असत तर काही जमिनींना विहिरीपासून पाणीपुरवठा केला जात असे. काही वेळा बागायती पिके जिरायती जमिनीवर घेतली जात असत, पिकांचे प्रकार, शेतीची विशिष्ट वसाहतीतील जागा, जमिनीची सुपीकता व पाणीपुरवठ्याच्या सोयी यामुळे सहाजिकच निश्चित केलेल्या आकारणीत फरक असे स्थूलमानाने आकारणी निश्चित करण्याच्या चार पद्धती होत्या. ठोक पद्धत, पेरणी क्षमता पद्धत, नांगर पद्धत व क्षेत्र पद्धत अशा पद्धती होत्या.

**अ) ठोक पद्धत :** पहिल्या पद्धतीत शेताच्या एकूण उत्पन्नापैकी काही भाग जमीन महसुल म्हणून घेतला जात असे. ही पद्धत साधी पण खर्चाची होती. शिवाय शेताच्या उत्पन्नात होणारे चढ-उतार लक्षात घेतले जात नसत. त्यामुळे काही वेळा सरकारचा तर काही वेळा शेतकऱ्यांचा तोटा होत असे या पद्धतीचे मोगल काळात गल्ला बक्षी किंवा बटाई पद्धतीशी साम्य आढळते.

**ब) पेरणी क्षमता पद्धत :** ही पद्धत अशास्त्रीय व बेभरवशाची पद्धत होती. असे असले तरी या पद्धतीमुळे शेतकऱ्यांकडून जमीन महसुलाच्या निश्चित उत्पन्नाची सरकारला शाश्वती निर्माण होत असे. कारण या पद्धतीत एखाद्या जमिनीचा तुकडा पेरण्यास आवश्यक असलेल्या बियाण्यांच्या परिणामावर जमीन महसूल ठरविला जात असे. किंवा दुसऱ्या शब्दात म्हणजे जमिनीच्या पेरणी क्षमतेवर महसूल ठरविला जाई. या पद्धतीत अडचण अशी होती की पेरलेले बियाणे व आलेले उत्पन्न यांचे प्रमाण ठरविणे कठीण असे कारण बियाण्यांचे ठराविक परिमाण

सारख्याच परिस्थितीत सर्वच क्षेत्रात सारखेच उत्पन्न देईल याची शाश्वती नसे. किंवा एकाच क्षेत्रात वेगवेगळ्या परिस्थितीत सारखे उत्पन्न येत नसे.

**क) नांगर पद्धत :** या पद्धतीमध्ये नावाप्रमाणेच विशिष्ट शेत नांगरणी करिता आवश्यक असणाऱ्या नांगराच्या संख्येवरून जमीन महसुलाची आकारणी केली जात असे. ही पद्धत महाराष्ट्रातील काही भागात ही प्रचलित होती. या पद्धतीत जमिनीची सुपीकता पाणीपुरवठ्याच्या सोई व काढलेली पिके हे घटक विचारात घेतले जात नाहीत. त्यामुळे ही पद्धत फारच व समाधानकारक होती.

**ड) क्षेत्र पद्धत :** या पद्धतीत सरकारने मंजूर केलेल्या मोजणी गजाने शेतकऱ्यांच्या जमिनीची मोजणी केली जात असे. विजयनगर साम्राज्यात एकच प्रमाणभूत मोजणी गज असा नव्हता. वेगवेगळ्या वसाहतीत पूर्वी चालत आलेल्या विशिष्ट प्रथांवर आधारित वेगवेगळे मोजणी गज होते.

**इ) जमीन महसुलाच्या दर :** विजयनगर साम्राज्यात जमीन महसुलाचा दर प्राचीन काळच्या पराशरस्मृती वर आधारलेला आढळून येतो. त्याला अनुसरून शेताच्या एकूण उत्पन्नापैकी सरकारचा १/६, १/४ मालकाचा असे. १/३० हिस्सा देवालयाचा असे, १/२० ब्राह्मणांचा आणि राहिलेला अर्धा हिस्सा शेतकऱ्यांचा असे. इतर हिस्सेदार यांचे वाटे शेतकरी सरकारलाच घालत असे. व सरकार संबंधित हिस्सेदाराना त्यांचे हीस्से देत असे. शेतकऱ्याने मात्र शेतीच्या उत्पन्नाच्या १/४ भाग सरकारला द्यावा अशी अपेक्षा असे. विजयनगर साम्राज्यात कृष्णदेवरायाने जमिनीची सर्व पाहणी करून प्रमाण जमीन महसूल ठरवून दिला. या काळात दोन विशिष्ट संज्ञा आढळून येतात. त्या म्हणजे 'प्राकूरेखे' (पूर्वीचा दर) व 'रायरेखे' (राजाचे दर) या होत. याचा अर्थ असा होतो की कोणतातरी दर पूर्वीच निश्चित केला गेलेला होता. विजयनगरच्या राजांनी बहुदा प्रचलित दर बदलून आपले स्वतःचे दर निश्चित केले. ओल्या जमिनीवरील महसुल कधी वस्तूच्या रूपात तर कधी रोख रकमेत जमा केला जात असे.

**४) महसुल गोळा करण्याच्या पद्धती :**

या काळात महसुल गोळा करण्याच्या चार पद्धती अस्तित्वात होत्या.

१. पहिल्या पद्धतीत सरकारी अधिकारी अनेक ठिकाणी शेतकऱ्यांकडून प्रत्यक्षच महसुल जमा करीत असत. ज्या जमिनीचा महसुल हे अधिकारी जमा करीत असत त्या वैयक्तिक मालकीच्या असत हे उघड होते. या व्यक्तीबरोबर महसुलाबाबतचे करार सरकारने प्रत्यक्षपणे त्याच्याबरोबर केलेले असत ही पद्धत म्हणजे दुसरे तिसरे काही नसून रयतवारी पद्धती होती. यापैकी काही जमीनी राजाने स्वत:कडे ठेवलेल्या असाव्यात व त्याच्या जमिनीचा खंड महसूल अधिकारी जमा करीत व नंतर सरकारी दरबारी खजिन्यात भरत असावेत.

२. या दुसऱ्या पद्धतीत विशिष्ट भागातील महसुल सर्वात जास्त बोली बोलणाऱ्याला मक्त्याने दिला जात असे. यामुळे आपल्या पगारी अधिकाऱ्यांकडून महसूल गोळा करण्याचा सरकारचा त्रास वाचत असे. पण त्यामुळे कोणत्याही पद्धतीने महसूल गोळा करण्यास मक्तेदारांना मिळत असे. मक्त्याच्या किंवा कंत्राटाच्या पद्धतीतहा दोष होता. कंत्राटाची पद्धती ही 'गुत्तीगे' (कंत्राट) पद्धत म्हणून ओळखली जात होती. 'गुत्तीगे' फक्त जमीन

महसूलाचेच असे नाही तर ते इतर कोणत्याही कराचे असू शकते. उदाहरणार्थ मच्छीमारी, जलवाहतूक व जकात कर यांचे मक्ते कंत्राटी पद्धतीवर दिल्याचे आढळून येते. या पद्धतीच्या निश्चित स्वरूपाविषयी मतभेद आढळून येतात. इतिहासकार मोरलांड म्हणतात की, दक्षिण भारतातील जमीन महसूल पद्धतीत ते सामान्य वैशिष्ट होते. ही अतिशय साधी पण फार जुलमी पद्धती होती. त्यात मक्तेदाराला रयतेकडून सरकारला द्यावयाच्या रकमेपेक्षा अधिक रक्कम जमा करता येत असे व जादाची रक्कम स्वतःला घेता येत असे. तर टी.व्ही. महालिंगम यांचा मते या दोन्ही पद्धतीत फरक असे. पहिल्या पद्धतीत फक्त कर किंवा महसूल यांचाच मक्ता दिलेला असे व मक्तेदारला त्या भागाच्या कारभाराशी काहीही कर्तव्य नसे, तर दुसऱ्या पद्धतीत मक्तेदाराकडे सर्वच विभाग त्याच्या कारभारासह सोपविलेला असे.

३. तिसऱ्या पद्धतीत महसूल खेड्यातील समुदायाकडून म्हणजे 'नाडू' किंवा 'सभा' यांच्याकडून वसूल केला जाईल. हे संबंधित 'नाडू' किंवा 'सभा' आपापल्या गावातील शेतकऱ्यांकडून महसुल गोळा करीत असत. अशाप्रकारे लोकांकडून प्रत्यक्ष महसूल गोळा करून तो सरकारात भरण्याचे कामाबद्दल सरकारी अधिकारी किंवा मक्तेदार हे जबाबदार नसून खेड्यातील 'नाडू' किंवा 'सभा' जबाबदार असत.

४. या चौथ्या आणि शेवटच्या पद्धतीत सरकारने काही सरदारांना त्याच्या सेवेबद्दल दिलेल्या जमिनीच्या महसुलाचा काही भाग सरदाराकडून सरकारला मिळत असे. अशा सरदारांना दोन प्रकारची जबाबदारी असे पहिली म्हणजे ठराविक रक्कम प्रतिवर्षी सरकारला देणे व दुसरी म्हणजे सरकाराकरिता काही लष्कर बाळगणे. अशा प्रकारे दोन वेगवेगळ्या पद्धती म्हणजे सरदारांच्या सेवेचा मोबदला त्यांना जमिनीच्या स्वरूपात देणे व महसुल गोळा करण्याचा अधिकार सर्वात जास्त बोली बोलणाऱ्यांना देणे, या पद्धती एकमेकात मिसळण्यात आल्या होत्या. म्हणून ही पद्धत म्हणजे 'गुत्तीगे' पद्धत व जहागीरदारी पद्धत यांचा संयोग होता. अशा प्रकारे विजयनगरकालीन जमीन महसुल व्यवस्था प्रचलित व्यवस्थेवर आधारलेली होती. त्यामध्ये काही सुधारणा करुन या काळातील राजांनी राज्याच्या महसुलवाढीच्या दृष्टिकोनातून प्रयत्न केले.

**● स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –२.**

**अ) रिकाम्या जागा भरा**

१) सुलतानशाही काळात एकूण ............... प्रकारची पिके घेतली जात होती.

अ) २५ ब) ५० क) ५५ ड) ६०

२) फिरोजशहा तुघलकाने दिल्लीच्या आसपास .............. फळबागा तयार केल्या होत्या.

अ) ९०० ब) ८०० क) १२०० ड) १०००

३) .............. याने 'हज–इ–ईलाही' हा तलाव बांधला.

अ) फिरोजशहा तुघलक ब) अल्लाउद्दीन खिलजी क) मुहंम्मद तुघलक ड) बल्बन

४) ............. च्या कारकीर्दीत 'हज-इ-शमी' नावाचा तलाव बांधला.

अ) सय्यद लोदी ब) रझिया सुलतान क) फिरोजशहा तुघलक ड) अल्तमश

५) ............. या परकीय प्रवाशाने आपल्या प्रवासवर्णनात सुलतानशाही काळात ५० धरणे बांधल्याचा उल्लेख केला आहे.

अ) बर्नियर ब) ट्राव्हलयीन क) फेरीस्ता ड) बार्बोसा

६) ............. या सुलतानाने शेतीच्या विकासासाठी 'अमीर-ए-कोही' नावाचा विभाग सुरू केला.

अ) फिरोजशहा तुघलक ब) अल्लाउद्दीन खिलजी क) मुहंम्मद तुघलक ड) रझिया सुलतान

७) सुलतनशाही काळात सर्वसाधाररपणे कराची विभागणी ............. भागात करण्यात आली होती.

अ) २ ब) ३ क) ४ ड) ५

८) सुलतानशाही काळात सामान्य वर्गाला ............. टंका प्रतिवर्षी जिझिया कर द्यावा लागे.

अ) १० ब) २० क) ३० ड) ४०

९) युद्धातील लुटीतून मिळालेली संपत्ती ही ............. म्हणून ओळखली जात असे.

अ) खम्स ब) खराज क) शर्ब ड) जकात

१०) घल्ला बक्ष पद्धतीला ............. म्हणूनही ओळखले जाते.

अ) राशी बटाई ब) बटाई पद्धत क) खेत बटाई ड) लांक बटार्स

११) विजयनगर साम्राज्यात सामान्यत: जमिनीचे ............. भागात वर्गीकरण करण्यात आल होते.

अ) ३ ब) ५ क) २ ड) ६

१२) ब्राह्मणांना वैयक्तिक रित्या किंवा सामुदायिकरित्या दिलेल्या जमिनींना ............. असे म्हणत असत.

अ) ब्रह्मदाय ब) इनाम क) अग्रहार ड) देवदाय

१३) मठपुरा हा जमीन देणगी प्रकार ............. दिला जात असे.

अ) गावांना ब) मठांना क) देवळांना ड) ब्राह्मणांना

१४) विजयनगर साम्राज्यात शेतमजूरास ............. असे म्हणत.

अ) उम्बली ब) कुदी क) कदाय ड) वारूम

१५) विजयनगर साम्राज्यात जमीन महसूल आकारणी निश्चित करण्याच्या ............. पद्धती होत्या.

अ) ४) ब) ५ क) ६ ड) ७

१६) विजयनगरकालीन ............. जमीन महसूल पद्धत ही अशास्त्रीय व बेभरवशाची होती.

अ) ठोक ब) पेरणी क्षमता क) नांगर ड) क्षेत्र

१७) विजयनगर साम्राज्यात ............. पद्धतीत जमिनीची मोजणी गजाने केली जात असे.

अ) ठोक पद्धतीत ब) क्षेत्र पद्धतीत क) नांगर पद्धतीत ड) पेरणी क्षमता पद्धतीत

१८) विजयनगरकालीन शेतकऱ्याला आपल्या उत्पन्नाच्या ........... इतका भाग सरकारला द्यावा लागे.

अ) १/६ ब) १/३ क) १/४ ड) १/२

१९) बेद्दलू या याचा अर्थ ............. जमीन असा होतो.

अ) ओली जमीन ब) कोरडी जमीन क) बागायत जमीन ड) मळईची जमीन

२०) इनाम दिलेल्या खेड्याला ............. असे म्हणतात.

अ) वृत्ती ब) अग्रहार क) देवदाय ड) मठपुरा

### ३.२.३ उद्योग आणि व्यापार :

मध्ययुगीन भारताची अर्थव्यवस्था मुख्यत्वेकरून स्वयंपूर्ण होती. त्यामानाने सर्वसाधारण लोकांच्या गरजा कमी होत्या. देशाच्या आर्थिक जीवनात उद्योगधंद्यांचे स्थान महत्त्वाचे आहे. भरभराट पावलेले उद्योगधंदे लोकांच्या राष्ट्रीय संपत्तीत भर घालतात. त्यामुळे राष्ट्राच्या व्यापार व्यवसायाला प्रेरणा मिळते. उद्योगधंदे उत्कर्ष पावणाऱ्या अर्थव्यवस्थेचे मूळ आहे. त्यामुळे तत्कालीन उद्योगधंदे कशा स्वरूपात होते हे जाणून घेणे गरजेचे ठरते.

**● सुलतानशाही कालीन उद्योगधंदे :**

मुघल काळाच्या तुलनेत दिल्ली सुलतानशाही काळामध्ये विविध प्रकारच्या तयार मालाला कमी मागणी होती. निरनिराळे उद्योगधंदे, मध्यम दर्जाचे आणि साध्या प्रकारचे असल्यामुळे कच्च्या मालाला ही विशेष मागणी नव्हती. त्यामुळे आपल्याला असे दिसून येते की, या काळात मोठे कारखाने सुरू झाले नाहीत. तसेच मोठ्या प्रमाणावर उद्योगधंद्याची उभारणी झाली नाही. तत्कालीन कारागीर स्थानिक लोकांच्या गरजांना व परदेशी निर्यातीला पुरतील इतक्याच वस्तू तयार करत असावेत असे वाटते. परदेशी प्रवाशांनी लिहून ठेवलेल्या वृत्तांतामुळे या सर्व गोष्टींना दुजारा मिळतो. सुलतानशाही काळातील या उद्योगधंद्यांमध्ये कापड उद्योग, धातुकाम उद्योग, दगड आणि विटांचे काम करणारा उद्योग, चर्मोद्योग, लाकूडकाम, हस्तीदंताचे नक्षीकाम, काचकाम, कागद, खेळणी तयार करणे, नकली जडजवाहर, सुगंधी द्रव्ये, जहाज बांधणी इत्यादी उद्योगांचा अंतर्भाव होत असे. तत्कालीन काळात कापड उद्योगाचे तीन प्रमुख प्रकार होते. मलमल उद्योग, रेशीम उद्योग, आणि लोकर उद्योग तसेच रंगकाम हा एक उद्योग होता. कापडा खेरीज इतर अनेक वस्तू या उद्योगात तयार केल्या जात असत. उदाहरण गालीचे, रजया, मच्छरदाण्या, पलंगपोस इत्यादी तत्कालीन काळातील वर्थेमा, महुआना आणि बार्बोसा या परकीय प्रवाशांनी व बरनी, अफीफ आणि अमीर खुस्रो यांनी या उद्योगाच्या भरभराटीच्या अवस्थेवर बराच प्रकाश टाकला आहे.

**१) कापड उद्योग :**

कापड  उद्योग हा सुलतानशाही कालखंडातील सर्वात महत्त्वाचा आणि लोकप्रिय असा उद्योग होता. भारतात कपाशीचे पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जात होते. कुटीर उद्योग आणि मोठे उद्योग यामध्ये कापसापासून कापड बनविले जात असे. दिल्ली, आग्रा, बनारस, पाटणा, सोनारगाव, लाहोर, मुलतान, खंबायत, सुरत, ठठ्ठा, बुऱ्हाणपूर, देवगिरी यासारख्या मोठ्या गावांमध्ये, शहरांमध्ये उद्योगधंदे केंद्रित झाले होते. यामध्ये गुजरात आणि बंगाल हे कापड उत्पादन करण्यामध्ये तसेच निर्यात व्यवसायासाठी प्रसिद्ध होते. हा कापड उद्योग भारतातील व परदेशातील लोकांच्या मागणीवर अवलंबून होता. भारतात फक्त उच्चकुलीन व सत्ताधारी वर्गातील लोक कलाकुसर केलेले तलम कापड  वापरत असत, तर सर्वसामान्य लोक साधारण कपड्यावर समाधान मानत असत. भारतीय तलम, सुती कापडाला परदेशात मोठ्याप्रमाणात मागणी  होती.कापड उद्योगाचे प्रमुख तीन प्रकार पुढीलप्रमाणे –

**अ) मलमल कापड उद्योग :** भारतात विशेषतः बंगालमध्ये उत्कृष्ट प्रतीचे आणि तलम मलमल तयार होत असे. येथील कापड उद्योग उच्च दर्जाला पोहोचला होता. ढाक्‍याची मलमल अतिशय प्रसिद्ध होती. त्यामुळे लोकांकडून त्याची प्रशंसा केली जात होती. अमिर खुसरो म्हणतो की, बंगालची मलमल इतकी तलम असे की, जर १०० हात लांबीचा मलमली चा तुकडा एखाद्या माणसाच्या डोक्यात भोवती गुंडाळला तर त्याचे केस त्याच्या घडीतून सुद्धा दिसू शकत असत. तसेच देवगिरीचे कापड तलम पाण्याप्रमाणे पारदर्शक होते. हे मलमलीचे कापड एखाद्या सुईच्या भोकातून ही जाऊ शकेल इतके ते तलम असे, तरीही त्या कापडाला सुईने काढता येत नसे. इतका त्या कापडाचा मजबूतपणा आपणास दिसून येतो. महुआना या चिनी प्रवाशाने या मलमली कापडाचे सहा प्रकार पाहिले आहेत. तर वर्थेमाने बैराम, नामोने, लीझिती, दौझार आणि सिनाबाफ इ. कापडाच्या प्रकारचा उल्लेख केला आहे. बार्बोसाच्या वर्णनानुसार बंगाली, सिरबंद युरोपातील स्त्रियाच्या मस्तकावरील आवरण म्हणून फार लोकप्रिय होते. तो म्हणतो खंबायत हे सुद्धा सुती कापडासाठी प्रसिद्ध होते. तेथे छापील सुती कापड, मखमल, सॅटीन आणि टफेटा वगैरे निरनिराळ्या तलम व जाड्या भरड्या प्रकारचे कापड तयार होत असे. अल्लाउद्दीन खिलजीच्या काळातील वर्णन करताना बरनीने किनखाफ, जरीचे कापड, शस्तुरी, भिरैन आणि देवगिरी या कापडांच्या काही प्रकारचा उल्लेख केला आहे. इब्न बतुता म्हणतो की, उत्कृष्ट मलमलीच्या एका संपूर्ण ताग्याची किंमत १०० टंका असे.

**ब) रेशीम कापड उद्योग :** या कापडाचा उपयोग विशेषतः उच्चकुलीन वर्गात केला जात असे. पाटणा, मुर्शिदाबाद, काश्मीर, बनारस, कासिमबाजार आणि धोराघाट  ही रेशीम उत्पादनाची प्रसिद्ध केंद्र होती. गुजरात येथे रेशीम उत्पादन प्रत्यक्षात होत नसले तरी तेथील रेशीम विणण्याच्या उद्योगाबद्दल ते प्रसिद्ध होते. खंबायत येथील रेशीम व रेशीम कापड अतिशय उत्कृष्ट दर्जाचे असे व त्यापासून रेशीम उद्योजकांना मोठे उत्पन्न मिळत असे. त्यामुळे खंबायत मधील रेशीम उद्योग अल्लाउद्दीन खिलजीच्या ताब्यात होता. रेशमी गालीच्यासाठी सुरत प्रसिद्ध होते. रेशमी कापड आसाम मध्येसुद्धा तयार होत असे. तेथील खासी आणि मणिपुरी या जमाती या व्यवसायात कुशल मानल्या जात होत्या. ओरिसामध्ये एक प्रकारचे अतिशय उत्कृष्ट प्रतीचे कापड तयार केले जात असे. त्याला तुस्सार म्हटले जात असे. रेशमाप्रमाणे दिसत असले तरी त्यामानाने स्वस्त होते.

**क) लोकर उद्योग :** हा उद्योग काही भागापुरता मर्यादित होता. त्यामध्ये राजस्थान, लाहोर, काबूल, काश्मीर, आग्रा, फत्तेपूर सिक्री, अमृतसर, पाटणा, जौनपुर आणि बुऱ्हाणपूर इत्यादीचा समावेश होत असे. परंतु सर्वात उत्तम दर्जाचे लोकर मात्र भारता बाहेरून येत असे. काश्मीरमध्ये निरनिराळ्या प्रकारच्या शाली, ब्लांकेट्स आणि इतर लोकरी कपडे यांचे उत्पादन होत असे. तर फत्तेपूरसिक्री हे रेशमी गालीच्यासाठी प्रसिद्ध होते.

**२) रंगकाम उद्योग :**

कापड विणकाम आणि कापडाचे रंगकाम या दोन्ही व्यवसायाची वाढ एकाच वेळी झाली. रंगकाम आणि सुती कापड रंगविणे या उद्योगांना महत्त्व प्राप्त झाले. कारण रंगीबेरंगी पट्टे आणि नक्षीकाम असलेल्या कपड्यांना लोकांकडून मागणी असे. भडक आणि चमकदार रंगांना सर्वत्र मागणी असे. भारताच्या काही भागात विशेषतः लाहोरपासून अवधपर्यंतच्या पट्ट्यात निळीचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होत असे. त्यामुळे या उद्योगाची वाढ झाल्याचे दिसून येते. उदाहरणार्थ गोवळकोंडा, अहमदाबाद, मछलीपट्टणम, ढाका, कासीमबजार आणि गुजरात ही रंग काम व्यवसायाची प्रमुख केंद्रे बनली होती.

**३) धातुकाम उद्योग :**

या व्यवसायाला प्राचीन काळापासून मोठी परंपरा लाभली होती. सुलतानशाही काळामध्ये ही परंपरा सर्वसाधारणपणे त्याच स्वरूपात पाळली गेली. लोखंड आणि पोलाद यांना विविध कारणासाठी मोठ्या प्रमाणात मागणी होती. लोखंडाचा उपयोग तलवारी, बंदुका, तोफा आणि इतर शस्त्रे यांच्या उत्पादनासाठी केला जात असे. तसेच घरे, राजप्रसाद, किल्ले यांच्या बांधणीमध्ये सुद्धा याचा वापर केला जात होता तर भांडी व फर्निचर यासाठीही वापर करत असत. नांगर, कुऱ्हाडी, खुरपे, कोयते, विळे व बैलगाड्या आणि शेतीची अवजारे तयार करण्यासाठी याचा उपयोग केला जात होता. जहाजबांधणीच्या कामामध्ये मुशी व साचे तयार करण्यासाठी व तसराळी, पेले, सुरया, कात्री इत्यादी विविध वस्तू तयार करण्यासाठी लोखंडाचा उपयोग होत असे.

गुजरात, गोवळकोंडा, सियालकोट, मुलतान, लाहोर आणि मेवाड हे लोखंडी व पोलादी वस्तूंच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध होते. गुजरातमध्ये धनुष्य, बाण आणि विशिष्ट प्रकारचे खंजीर तयार केले जात असत. तर मेवाड हे बंदुकांच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध होते. या काळात सोने व चांदी यांची कारागिरी प्रशंसनीय स्वरूपाची होती. सोने चांदी आणि बिदरी मिश्र धातूंची भांडी, हार, जडावाचे सोन्या-चांदीचे दागिने, ताटल्या, पेले आणि इतर वस्तू या उच्चकुलीन लोकात व मोठ्या शहरात नित्याच्या वापरत असत. नाजूक कलाकुसर आणि कुशल सुवर्णकार यासाठी गुजरात प्रसिद्ध होते. तांबे व पितळ या धातूंचा उपयोग भांडी तयार करण्यासाठी केला जात असे. सर्वसाधारण ही भांडी खालच्या वर्गातील लोक वापरत असत. तसेच बंदुका व तोफा तयार करण्यासाठी नाणी पाडण्यासाठी, यांचा वापर केला जात असे. बिहारमध्ये सिंगभूम, अलवार मधील बैरत येथे राजस्थानमधील उदयपूर, सिंघाना व इतर ठिकाणी खाणीमध्ये तांबे सापडते. बनारस, लखनौ आणि इतर काही ठिकाणे तांब्याच्या व पितळेच्या धातू कामासाठी प्रसिद्ध होती.

### ४) कागद उद्योग :

सुलतानशाही कालखंडात कागद उद्योगाचे श्रेय अरब, समरकंदचे कारागीर आणि चिनी लोक यांना जाते. चिनी लोकांनी प्रथम कागदाचा शोध लावला. प्रामुख्याने तुतीच्या झाडाचे धागे आणि तागाच्या व अंबाडीच्या धाग्याच्या कापडाच्या चिंध्या व तत्सम इतर पदार्थ यापासून कागद तयार केला जात असे. चिनी लोकांकडून अरबांनी ही कला अवगत करून घेतली. परंतु तूतीच्या झाडाचा धागा अजिबात न वापरता फक्त काथ्याचा वापर केला.

या कागदाचा उपयोग फर्मान काढण्यासाठी, वार्तापत्र लिहिण्यासाठी, पुस्तके लिहिण्यासाठी, चित्रे काढण्यासाठी आणि सजावट करण्यासाठी केला जात होता. तत्कालीन काळात कागदाला मागणी मर्यादित स्वरूपाची असे आणि ही मागणी पूर्ण करण्याइतपत पुरवठा होत नसे.

काश्मीर, सियालकोट, दिल्ली, अवध, गया, बिहार, बंगाल आणि गुजरात या भागात प्रामुख्याने कागदी उद्योगाचा विकास झालेला होता.

### ५) साखर उद्योग :

सुलतानशाही काळात साखर उद्योग अस्तित्वात असल्याचे दिसून येते. साखरेसाठी लागणारा ऊस भारताच्या अनेक भागात विशेषतः लाहोरपासून ते दिल्लीपर्यंत तसेच बंगाल, माळवा आणि बिहार या भागात मोठ्या प्रमाणात ऊसाचे उत्पादन घेतले जात होते. बंगालमध्ये साखरेचे उत्पादन मोठ्या प्रमाणात होत असल्याने येथील साखर परदेशात निर्यात केली जात होती. या साखर निर्यात व्यापाराविषयी चिनी प्रवासी महुआना म्हणतो की, बंगालमधील साखरेच्या निर्यात व्यापारामुळे बरेच उत्पन्न मिळत असे.

### ६) चर्मोद्योग :

सुलतानशाही काळात चर्मोद्योग वाढीस लागला होता. चामड्याच्या विविध वस्तू तयार करण्यासाठी असलेली मागणी या उद्योगाच्या माध्यमातून पूर्ण केली जात असे. घोड्याचे लगाम व खोगीर चामड्यापासून तयार केले जात असत. त्यामुळे या उद्योगाला महत्त्व प्राप्त झाले होते. बंगालमधील साखरेच्या निर्यातीला चामड्याच्या पिशव्या वापरल्या जात असत. तसेच तलवारीच्या म्यानासाठी योद्धे चामड्याचा वापर करत असत. सर्वसाधारणपणे वापरात असलेली पादत्राणे चामड्याची असत. शेतकऱ्यांना पाण्याच्या पखाली, गोफण, बैलांना बांधण्याचे पट्टे इत्यादी गोष्टी चामड्यापासून तयार केल्या जात असत. हा चर्मोद्योग दिल्ली, बंगाल, गुजरात, आसाम आणि सिंध या भागात केंद्रीभूत व भरभराटीस आलेला होता. खंबायत हे पादत्राणांसाठी प्रसिद्ध होते. चामड्याच्या वस्तूची निर्मिती मोठ्या प्रमाणावर आणि उत्कृष्ट दर्जाची केली जात असे. त्यामुळे या वस्तूंना परदेशात ही मोठ्या प्रमाणात मागणी होती.

### ७) इतर उद्योग :

या काळात याशिवाय इतरही अनेक उद्योग होते. काचेचा वापर विविध उद्देशासाठी केला जात असे.

उदाहरणार्थ बांगड्या, मणी, आरसे, थाळ्या, वाडगे, पिकदाण्या यासारख्या काचेच्या वस्तू विशेषतः उच्चवर्णीय लोकांच्या वापरात असत. हा काच उद्योग गुजरात, गोरखपुर, आग्रा आणि बिहार येथे चालत होता.

दगड आणि वीट कामाचा उद्योग येथे चालत होता. या उद्योगाची विशेष प्रगती झालेली होती. याविषयी अमिर खुस्त्रो याने वर्णन केले आहे तो म्हणतो की, दिल्ली येथील गवंडीकाम करणाऱ्या लोकांनी इतर मुस्लीम जगतातील लोकांना खूपच मागे टाकलेले होते. अल्लाउद्दीन खिलजी आणि फिरोजशहा तुघलक या सुलतानांनी कलेला विशेष प्रोत्साहन दिले होते. विटा तयार करणे आणि फरशीला चकाकी देणे यासारख्या उद्योगांची पूरक उद्योग म्हणून त्या काळात वाढ झाली होती.

सुलतानशाही काळात आसाम, बुऱ्हाणपूर, जयपूर, बनारस, दिल्ली आणि काश्मीर व इतरही काही भागात कलात्मक नक्षीकाम केले जात होते. सुगंधी द्रव्य, वेताच्या आणि बांबूच्या वस्तू, जडजवाहीर, हस्तिदंतकाम, डिंक तयार करणे, लाकूड काम आणि खेळणी बनवणे यासारख्या उद्योगांची भरभराट काही भागात झाली होती. या उद्योगासाठी तत्कालीन काळात अनुकूल परिस्थिती होती. नकली जडजवाहीरचे काम मुख्यत्वेकरून गुजरात मध्ये केले जात होते. काश्मीर आणि सिंध मध्ये उत्कृष्ट प्रकारचे गालिचे तयार होत असत. तर हस्तिदंती कामासाठी उत्तरेतील मुलतान आणि दिल्ली हे प्रसिद्ध होते.

सुलतानशाही काळात उद्योगांची सुरुवात होऊन या उद्योगधंद्यांमुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक सुधारणा झाल्या. परंतु काही केंद्रे विकसित झाल्याचे दिसून येते. याकरिता सुलतानांनी या उद्योगधंद्यांना मोठ्या प्रमाणात राजाश्रय दिल्याचे दिसून येते. काही का असेना मुघल काळासारखे मोठे उद्योग धंदे नसतीलही परंतु उद्योगधंद्याची सुरुवात या काळात झाली होती हे स्पष्ट होते.

**ब) विजयनगर कालीन व्यापार व उद्योगधंदे :**

उत्तर भारताप्रमाणेच दक्षिण भारतातही विविध उद्योगधंदे भरभराटीस आले, परंतु हवामानातील फरक आणि कच्च्या मालाची उपलब्धता यामुळे उत्तर भारतात काही उद्योगधंदे फोफावले तर दक्षिणेकडे इतर उद्योगधंदे भरभराटीस आले. उदाहरणार्थ कापड उद्योग, लोकरी उद्योग, रेशमी कापड, यांना उत्तरेकडे जास्त मागणी असल्याने हे उद्योग तिकडे भरभराटीस आले. तर दक्षिणेकडे नैसर्गिकरित्या मिळणाऱ्या हिऱ्यामुळे खाणउद्योगाची मोठ्या प्रमाणात भरभराट झाली. दक्षिणेत हवामान उष्ण असल्यामुळे येथील लोक कपड्याचा वापर कमी करतात.या उद्योगाविषयीची माहिती अब्दुल रजाक, निकोलो कोंटी, वर्थेमा, बार्बोसा, थेवेनॉट यांच्या प्रवास वृत्तांतातून मिळते. अशा या उद्योगधंद्यांची माहिती जाणून घेणे आपणास गरजेचे ठरते.

**१) कापड उद्योग :**

तत्कालीन काळात कापडाला बाहेरून मोठ्या प्रमाणात मागणी असल्यामुळे कापड उद्योगाच्या केंद्राची वाढ दक्षिण भारतातही झाली. दक्षिण भारतात गोवा, चौल, मैसूर, मलबार, आंध्र मधील मतफीली, कालिकत जवळील कानपमई, पुलिकत आणि चित्रदुर्ग भागातील बुद्धेहाळ ही कापड उद्योगाची केंद्रे होती. दक्षिण भारतात सुती कापडाचे विविध प्रकार आपणास पहावयास मिळतात. उदाहरणार्थ मलमल, मलमलीचे मोठे अंगरखे,

पागोटे, खळ लावलेले कापड इत्यादी. चिनी प्रवासी महुआना याने केलेल्या वर्णनानुसार कोईमतूर येथे 'चिहिली' या प्रकारच्या कापडाचे उत्पादन केले जात होते. त्याची किंमत आठ ते दहा वराह (सोन्याची नाणी) इतकी असे. उत्तर भारतातील चिटाच्या कापडा प्रमाणेच दक्षिण भारतात छापील सुती कापडासाठी पुलिकत प्रसिद्ध होते.

सुती कापडा व्यतिरिक्त अंबाडी, मखमल, सॅटीन आणि नारळापासून बनवलेला धागा यापासून कापड विणण्यात येत असे. कोईमतूर या भागात रंगीत, रेशीम कपड्यांचे उत्पादन केले जात होते. बुदिहाळ या भागामध्ये अंबाडीच्या धाग्यापासून कापडाचे उत्पादन केले जात होते. दख्खनमध्ये चौल आणि अतिदक्षिणेकडील परशुराम पेरून्तेरू  ही ठिकाणे रंगकामाच्या  उद्योगाबद्दल प्रसिद्ध होती, तर कोरोमंडल किनाऱ्यावर मछलीपट्टणम येथे चिटाचे कापड तयार केले जात असे.

**२) धातू उद्योग :**

सोने, चांदी, तांबे आणि लोखंड या धातूंचा उपयोग प्रामुख्याने नित्योपयोगी आणि चैनीच्या वस्तू बनविण्यासाठी केला जात असे. ग्रीबलच्या वर्णनानुसार असे समजते की, सोन्याचे साठे दख्खनमध्ये म्हैसूरपासून औरंगाबादपर्यंत पसरले होते. मैसूरमध्ये काही खाणी खूप खोलवर खणाव्या लागत असत आणि यांत्रिक उपकरणांमध्ये विशेष सफाई नसल्यामुळे विशिष्ट कालानंतर हे काम थांबवावे लागत असे. खनिजापासून सोने काढण्याची कला ही विशेष प्रगत झाली नव्हती. मनुष्यबळाच्या सहाय्यानेच हे काम करावे लागत असे. परंतु ते फार खर्चिक असे बिदनूर येथे  सोन्याच्या खाणी होत्या.

म्हैसूरमध्ये कोलार येथे सोन्याच्या खाणी दिसून येतात. सोन्याचा उपयोग मूर्ती तयार करण्यासाठी, देवाला देणगीदाखल दिलेल्या वस्तू तयार करण्यासाठी, राजे लोक आणि मुख्य सरदार यांचे दरबार सजविण्यासाठी, नाणी पाडण्यासाठी आणि सामान्य लोक वापरत असलेले दागिने तयार करण्यासाठी सोन्याचा मोठ्या प्रमाणात वापर केला जात असे.

लोहयुक्त खनिजे म्हैसूर राज्यात विशेष करून चिक्कनायकनहल्ली आणि कोलार या जिल्ह्यात सापडतात. जोर्डानस हा परकीय प्रवासी म्हणतो की, भारताच्या पश्चिम किनाऱ्या लगतच्या भागात लोखंड सापडत असे. चित्रदुर्ग भागातील टेकड्यांच्या विशिष्ट प्रकारच्या खडकात व सोंडूर संस्थांच्या कुमारस्वामी बेटाच्या भागात लोह खनिजे बहुदा आढळून येतात. या लोह्खनिजापासून यापासून चांगले लोखंड, कच्चे लोखंड आणि पोलाद तयार करत असत. लोखंडाचा उपयोग लष्करी कामासाठी मोठ्या प्रमाणावर होई. उदाहरणार्थ तलवारी, धनुष्य, बाण, ढाली, कट्यारी व परशु लोखंडापासून तयार केले जात असे तसेच दिवे, पलंग व इतर गृहउपयोगी भांडी करण्यासाठीही लोखंडाचा वापर केला जाई. बिदनूर येथे निबय्या या नावाचा कारखाना होता. येथे सैन्याच्या उपयोगासाठी लागणाऱ्या वस्तू म्हणजे चिलखते, तोफा, तोफांचे गोळे तयार होत असत.

तांबे मुख्यतः कुईलोन येथे सापडते. यापासून राजपरिवारातील सजावटीच्या कामासाठी तसेच गृहोपयोगी भांडी, देवळात लागणारी पूजा पात्रे तयार केली जात असत. तांबे, जस्त, कथील आणि शिसे  यांच्या मिश्र धातूपासून तयार केलेल्या बिदरी धातूच्या वस्तूसाठी बिदर प्रसिद्ध होते.

**२) जडजवाहिर :**

उत्तम प्रतीचे व इतर रचनासाठी दक्षिण भारत प्रसिद्ध होता येथील हिऱ्यांच्या खाणी विषयी परकीय प्रवाशांनी आपल्या प्रवास करताना त्यामध्ये माहिती दिल्याचे आढळून येते. हिरे मिळणारे विभाग मुख्यतः कर्नुल व अनंतपूर जिल्ह्यात होते. हिरे व इतर मौल्यवान रत्ना बद्दल परकीय प्रवासी बार्बोसा  याने असे म्हटले आहे की, मौल्यवान रत्नांची या राज्यात मोठी ने-आण चालत असे कारण त्यांची तेथे विशेष आवड होती. त्याबद्दल मोठ्या अभिमानाने सांगितले जाते. या रत्नांचा उपयोग मोठ्या प्रमाणावर देवांच्या मूर्तीचे दागिने करण्यासाठी राजे व त्यांचे सरदार यांच्या चैनीच्या व भपकेदार वस्तू तयार करण्यासाठी आणि काही वेळेला सर्वसामान्य लोकांच्या दागिन्यासाठी केला जात असे. हिरे यांच्या व्यतिरिक्त माणके, पितस्फटिक अथवा पुष्कराज, शुभ्र नीलमणी, मोती व पाचू ही रत्ने मध्ययुगीन दक्षिण भारतात उपलब्ध होत असत. याविषयी अब्दुल रजाक असे म्हणतो की,' या देशातील सर्व रहिवासी मग ते श्रीमंत असोत अगर गरीब असोत किंवा हलक्या वर्गाचे कारागीर असोत, आपल्या कानात, गळ्यात, बाहू वर हातात व बोटात खड्यांचे व सोन्याचा मुलामा दिलेले दागिने वापरताना दिसतात.

**३) मीठ उद्योग :**

मिठाचा उद्योग काही भागातच केंद्रित झाल्याचा दिसून येतो. मलबार मध्ये मीठ तयार करण्याचा धंदा हा एका विशिष्ट जातीचा म्हणजे 'वेटटूवन' जातीचा होता असा उल्लेख बार्बोसा याने केला आहे. बल्लारी येथे 'उप्पार' म्हणून ओळखले जाणारे मिठाचा धंदा करणारे लोक खारवट जमिनीतून मीठ तयार करीत असत. या काळातील शिलालेखांवर मिठागरांवर घेतल्या जाणाऱ्या कराविषयी उल्लेख आढळतात. असे कर विशेषतः मलबार गुंटूर दक्षिण अर्काट, चींगलेपुट, तंजावर, त्रावणकोर, म्हैसूर व शिवमोगे याभागात आकारले जात होते.

**४) साखर उद्योग :**

दक्षिण भारतात साखर निर्मितीचा उद्योग होता. तेथे मोठ्या प्रमाणात साखर मिळत असल्याबद्दलचे अनेक उल्लेख आपणास मिळतात. परंतु साखर निर्मितीच्या पद्धती बद्दलची माहिती फारशी मिळत नाही. साखर साधारणपणे बारीक शुभ्र किंवा ताडाची साखर या दोन प्रकारची मिळत असे. लालसर साखरेला दक्षिण भारतात जगरी (क्षरसीळ) म्हणतात. ही साखर नारळाच्या रसापासून बनवली जात असे. तसेच इतर जातीच्या ताडाच्या आणि तत्सम वृक्षाच्या रसापासून तयार करीत असत. बार्बोसा म्हणतो की, भटकळ या प्रसिद्ध व्यापारी केंद्रातून बारीक साखर निर्यात होत असे. त्या भागात अशी साखर मोठ्या प्रमाणात उपलब्ध होत असे. ही साखर पिठाच्या रूपाने मिळत असल्याने ती लहान पुड्यांमधून मिळत असे. याचबरोबर साखरेच्या वड्या ही तयार केल्या जात असत. याचा अर्थ येथे खडी साखरेचे उत्पादनही घेतले जात असावे.

**५) जहाज बांधणी उद्योग :**

जहाज बांधणीचा उद्योग मुख्यत्वेकरून कालिकत, कोचिन, चिंगुईकार आणि मालदीव येथे भरभराटीला आलेला होता. या केंद्रांमध्ये निरनिराळ्या प्रकारची जहाजे बांधली जात होती. उदाहरणार्थ 'अल्मेडीया' म्हणजे वल्हवून नेण्याची व एकसंध इमारती लाकडाची बनवलेली होडी होय. 'अटल्या' म्हणजे समुद्र किनाऱ्यावर गस्त

घालण्यासाठी बांधलेली होडी होय. 'बरगटीम' (bargatim) म्हणजे समुद्रकिनाऱ्यावर वापरण्यायोग्य हलक्या वल्हयाची होडी होय. 'चूटरी' म्हणजे शीड असलेली व एकसंघ लाकडाची वल्ही असलेली बोट 'फुस्टा' म्हणजे लांब अंतरावरील सफरीसाठी योग्य असे गलबत होय. 'पराव' म्हणजे वेताची वल्हि वेताचीच डोलकाठी असलेले जहाज होय. 'झंबको' (zambako) म्हणजे मोठे जहाज होय हे बहुदा लांबच्या प्रवासासाठी उपयोगाचे असे वर्थेमा याने केलेल्या वर्णनाप्रमाणे कालिकत येथे बांधली जाणारी जहाजे २०० टन वजनाची असत. या काळातील जहाज उद्योगाविषयी वर्थेमा आणि इब्न बतूता यांनी सविस्तर लिहिले आहे.

दक्षिण भारतामध्ये काही उर्वरित उद्योग आपणास दिसून येतात. यामध्ये लाकूड कामाचा उद्योग चर्मोद्योग मच्छिमाराच्या उद्योग, वीट उद्योग, कुंभार उद्योग यासारखे उद्योग या काळात अस्तित्वात असल्याचे दिसून येते. या उद्योगधंद्यांना विजयनगर साम्राज्यातील राज्यकर्त्यांनी मोठ्याप्रमाणात राजाश्रय दिला होता म्हणूनच हे उद्योग काही प्रमाणात विकसित झाल्याचे आपणास दिसून येते.

**ब) सुलतानशाहीकालीन व्यापार :**

सुलतानशाही काळामध्ये भारताचा व्यापार मोठ्या प्रमाणात होता. येथे निर्माण होणाऱ्या उत्पादनापैकी ढाक्याची मलमल, बंगालचे रेशीम कापड, कातडी आणि साखर यासारखे उत्पादने भारतातून निर्यात केले जात होते. भारतातून निर्यात होणाऱ्या मालामध्ये अन्नधान्य, मसाले आणि मौल्यवान रत्ने, अफू, सुगंधी तेल, मलम आणि तत्सम पदार्थ याचा समावेश असे तर आयात केल्या जाणाऱ्या वस्तू मध्ये प्रतिष्ठित वर्गाकडून मागणी असलेल्या चैनीच्या वस्तू म्हणजेच मखमली आणि भरतकाम केलेला माल, घोडे आणि खेचरे यांचा समावेश असे. तसेच सोने, चांदी आणि तांबे यांचाही समावेश असे. तत्कालीन काळात अरबी घोड्यांना भारतात मोठ्या प्रमाणात मागणी होती. असा हा व्यापार कसा केला जात होता याविषयीची माहिती जाणून घेणे गरजेचे ठरते.

**१) परदेशी व्यापार :**

भारताचा परदेशी व्यापार हा समुद्र व भुमार्गे असा दोन्ही मार्गाने चालत होता. समुद्रमार्गे चालणाऱ्या व्यापारामुळे भारतीय वस्तू पाच महत्त्वाच्या ठिकाणी नेल्या जात असत. ते म्हणजे  तांबडा समुद्र, पूर्व आफ्रिकेचा किनारा, मलाक्का बेटे, चीन आणि प्रशांत महासागरातील इतर काही देश तर खुष्कीच्या मार्गाने भारतीय वस्तू अफगाणीस्तान, मध्य आशिया, इराण आणि  इराक  या चार देशांना निर्यात करण्यात येत असत. तांबड्या समुद्रामधून अलेक्झांड्रिया, दमास्कस, बगदाद आणि भूमध्य समुद्र व युरोपातील इतर काही ठिकाणी या महत्त्वाच्या व्यापारी केंद्रांना माल पाठविण्यात येत असे.

परदेशी बाजारपेठांमधून चैनीच्या व इतर वस्तू आणल्या जात असत. सुलतान मुहंम्मद तुघलकाच्या कारकिर्दीत जरीचे सामान आणि रेशमी माल यांची आयात चीन, अलेक्झांड्रिया, इराकहून करण्यात येत असे. उत्तम प्रकारचे जातिवंत घोडे इराक, तुर्कस्तान, बल्ख, येमेन, इराण, कोस, होरमुझ आणि एडन येथून आयात केले जात असत.

कापड व अन्नधान्य यासारख्या वस्तू भारतामधून इराणच्या आखातातील कलहट येथे आणि तांदूळ वगैरे येमेन येथे निर्यात होत असे. बर्बोसाने पटेनेक्सी नावाच्या बंदराचा उल्लेख केला आहे. हे बंदर विरावळ सोमनाथ बंदर असावे. दीवचे राज्य सोडून भारताकडे येताना पतेनेक्सी नावाचे एक मोठे शहर आहे. ते एक चांगले बंदर आहे. तेथे मोठा व्यापार चालत असे बार्बोसा म्हणतो. गोवा येथील सागरी बंदरात मक्का, एडन, मलबार, आणि भारताचे इतर भाग येथून व्यापारी जहाजे येत असत. भावनगर या बंदरामध्ये जहाजाची बऱ्यापैकी ये-जा होत असे. येथे जकातीची मोठी रक्कम जमा केली जात असे. भडोचजवळील गंधार हे बंदर एका नदीच्या मुखाशी होते. तेथे सर्व प्रकारच्या वस्तूचा व्यापार चालत असे. गंधार, खंबायत आणि भडोच ही बंदरे सुरत बंदरापेक्षा कमी प्रतीची होती. परंतु मध्ययुगीन काळात खंबायत हे बंदर भरभराटीस आले होते. येथे विविध प्रकारचे कामगार राहत असत. खंबायत हे हस्तिदंती कंकणे, खाटा, निरनिराळे रंगीत मणी, खडे आणि मोती, नक्षीकाम केलेले पोवळे, इतर किमती रत्ने यासाठी प्रसिद्ध होते.

मक्का आणि एडन येथून पोवळे, तांबे, पारा, हिंगुळ, शिसे, तुरटी, गुलाबपाणी, केशर, सोने, चांदी, या वस्तू गुजरातमध्ये मोठ्याप्रमाणावर आयत केल्या जात असत. चीन आणि मलाक्का येथून दीव येथे रेशीम येत असे. गुजरातमधील रांदेर येथील मुरीश लोक स्वतःच्या बोटीतून तापी नदीवर निरनिराळे मसाल्याचे प्रकार, औषध, रेशीम, कस्तुरी, बेन्झाइन, चिनीमाती, इतर अनेक वस्तू यांचा मलाक्का, बंगाल तेनासरीम, पेगू, मार्ताबाम आणि सुमात्रा येथे व्यापार करत असत. सुती कापड, सुती मलमल, आणि जाडेभरडे पांढरे सुती कापड हे अरबस्तान, इराण, मलाक्का, सुमात्रा, मेम्बासा, मालींदी आणि आफ्रिकेच्या पूर्व किनाऱ्यावर वसलेले मागडोक्सो येथे निर्यात केल्या जात असत. तसेच गहू, बाजरी, तांदूळ, इतर धान्ये, शेंगाची इतर अनेक झाडे यांचीही निर्यात केली जात असे. बंगालमधून मोठ्याप्रमाणावर साखर, कापूस, धान्य, आले, सुंठ आणि मांससुद्धा निर्यात केले जात असे. वर्थेमा या प्रवाशाच्या वर्णनानुसार रेशमी आणि सुती कपडे इराण, सिरीया, तार्तार्, तुर्कस्तान, आफ्रिका, इथोपिया, आणि इतर देश येथे खंबायत आणि बंगाल येथून निर्यात केले जात असत.

जमिनीमार्गे तुर्की लोक आणि मंगोल लोक मुलतान आणि क्वेटा, खैबरखिंड आणि काश्मीर या तीन मार्गांनी परदेशी व्यापार करत असत. ते साधारणपणे अफगाणिस्तान, तुर्कस्तान, इराण कधी कधी पश्चिम आशिया मधील प्रदेश बाल्कन देश आणि चीन येथे घोडे, उंट, शस्त्रे आणि केसाळ कातडी या गोष्टीचा व्यापार करत असत.

**२) अंतर्गत व्यापार :**

अंतर्गत व्यापार दोन प्रकारचा होता. किनाऱ्यावरील व्यापार आणि देशांतर्गत व्यापार पतेनेक्सी (Patenexi) येथील रंगीत रेशीम कापड, सुती कापड, सुती माल, घोडे आणि गहू या वस्तू बंगाल आणि भारताच्या इतर भागामध्ये पाठवण्यात येत असत. इतर भागातून भारतीय जहाजे या ठिकाणी नारळ, गुळ, आणि मसाले आणत असत. मलबारी जहाजे मुख्यत्वेकरून किनाऱ्यावरील व्यापार करत असत. सोरठ व गुजरातमधील मंगरूळ येथून घोडे, गहू, तांदूळ, कापूस, कापड, आणि इतर वस्तू भारतातील निरनिराळ्या बाजारपेठेत नेल्या जात असत. तेथे नारळ, मेण, वेलदोडे, आणि मसाले हे पदार्थ आणले जात असत. किनारपट्टीवरील या व्यापारामुळे मोठ्या प्रमाणावर फायदा होत असे. दीवचा व्यापार मलबार, भटकळ, गोवा, चौल आणि दाभोळ यांच्याबरोबर चालत

असे. मलबारी नावामधून येणाऱ्या व्यापारी मालामध्ये सुपारी, लोखंड, भटकळची साखर, मिरे, आले, सुंठ, लवंग, दालचिनी, जायफळ, जायपत्री, चंदन, रेशीम कापड इ. चीन व मलाक्काहून आलेल्या वस्तूचा समावेश असे. तर परतताना ते रेशमी कापड, देशी कापूस, घोडे, गहू, सुगंधी तेल, आणि अफू नेत असत. बंगाल मधून व्यापारी जहाजे केप कोमोरिन मार्गे साखर, सिनबाफा, आणि बीटील्हा या प्रकारची कपडे घेवून खंबायत आणि मलबार येथे जात असत.

देशांतर्गत व्यापार हा दोन प्रकारचा होता. स्थानिक व्यापार व मोठ्या प्रमाणावर केला जाणारा व्यापार असा होता. स्थानिक व्यापार मुख्यतः मंडई आणि आठवड्याचा बाजार येथे चालत असे. यामध्ये नित्योपयोगी वस्तू, भाजीपाला व अन्नधान्य यांचा व्यापार केला जात असे. या व्यापारामध्ये घाऊक व्यापारी व जवळपासच्या खेड्यातील दुकानदार यांच्यामध्ये चालत असे. जनावरांचा बाजारसुद्धा भरवला जात असे. तेथे गायी, बैल, म्हशी, बकऱ्या, मेंढ्या, घोडे आणि कधीकधी उंटसुद्धा विकत घेवून विकले जात असत.

मोठ्या प्रमाणावरील केला जाणारा व्यापारामध्ये मालाच्या उठावासाठी मोठ्या बाजारपेठांचे अस्तित्व ही प्रमुख गरज होती. उदा. मुलतान, लाहोर, जौनपुर, बनारस, अलाहाबाद, अजमेर, पुरी, आग्रा, पाटणा, ठठ्ठा, अहमदाबाद, बुऱ्हानपूर, इ. व्यापारी केंद्रे प्रसिद्ध होती. तसेच पश्चिम किनारपट्टीवरील पोरबंदर, सोरठ, मंगरूळ, दिव, गोवा, भावनगर इ बंदरेही प्रसिद्ध होती.

**३) व्यापारी जमाती :**

या काळात मोठ्याप्रमाणावर व्यापार हा काही विशिष्ट जमाती करत असत. उदा. बंजारी, बनीये, मुलतानी व खुरासानी इ. या जमातींना भाट, दलाल, साहू व महाजन यांची मदत लागत असे. बंजारी लोक राजपुतान्याचे होते. ते व्यापारी मालाची दूरवर ने आण करीत असत. त्यांची दळणवळणाची प्रमुख साधने बैल, बैलगाडी, आणि घोडे ही होती. खुरासानी हे मुसलमानी व्यापारी असत आणि ते खुरासान अथवा शेजारी देशामधून व्यापारासाठी भारतात आलेले असत. ते भारतातील सर्व भागामध्ये व्यापार करत असत. गुजरातमधील बनीया लोक मुख्यतः गुजरात, दख्खन, मलबार व कोचीन वगैरे पश्चिम किनारा येथे व्यापार करत असत हे बनीया लोक प्रामुख्याने जैन होते. यासारख्या व्यापारी जमाती सुलतानशाही काळात आपला व्यापार करीत असत.


**४) दळणवळण साधने :**

तत्कालीन व्यापारी आपला माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेण्यासाठी जनावरे किंवा मनुष्य यांचा वापर करत असत. बैलगाडी व्यतिरिक्त उंट, गाढव, खेचर, होडी यांचाही वापर करत होते. होडीचा उपयोग नदीतून मालाची ने आण करण्यासाठी करत असत. याविषयीचे वर्णन इब्न बतूता याने केले आहे.

**५) प्रमुख व्यापारी मार्ग :**

**१) भू–मार्ग :** मध्ययुगीन काळातील नगर, शहर, ग्राम, हे जवळजवळ भूमार्ग व जलमार्ग यांना जोडले गेले होते. या व्यापाऱ्यांच्या सुविधेसाठी मार्गावरती अनेक धर्मशाळा, तलाव आणि वृक्ष इ.ची सोय करण्यात आली

होती. तक्षशीलापासून बंगालमधील सोनारगाव पर्यंतचा मार्ग हा डोंगरदऱ्या आणि वाळवंटातून जात असे. दिल्ली राजधानी ही वेगवेगळ्या मार्गांनी जोडली गेली होती.




इब्न बतूताने आपल्या प्रवासवृतांतात दिल्लीला जोडणाऱ्या मार्गाचे वर्णन केले आहे. तो स्वतः अलिगढ, कनौज, ग्वाल्हेर, खुजुराहो, चंदेरी, धार, उजैनवरून दौलताबादला गेला होता. त्याने सिंधवरून दिल्लीला पोहोचण्यासाठी जनानी, सिविस्तान, लाहरी, भक्कर, कचछ, मुलतान, अजोधन, अबोहर, सरसुती, हासी, मसूदाबाद, पालम हा मार्ग निवडला होता. या प्रवासवृतांतावरून आपणास अनेक मार्गाची माहिती मिळते.

**२) जलमार्ग :**

व्यापार भूमार्गाप्रमाणे तर जलमार्गे सुद्धा केला जात होता. या काळात नदीमार्गे व्यापार केला जात होता. नदी किनारी वसलेल्या शहराशी हा व्यापार केला जात असे. नदीमार्गे केल्या जाणाऱ्या व्यापारामध्ये सिंधू नदीचा उपयोग मोठ्या प्रमाणावर केला जात होता. कारण सिंधू नदी अरबी समुद्राला जोडली गेली होती. व्यापारी जहाजे ही खाडी नजीक असलेल्या देशा व्यतिरिक्त गुजरात बंदरातून हिंदी महासागरातून श्रीलंका, मलाया, हिंदीचीन, बर्मा, जपान व चीन या देशांना भारतीय व्यापारी माल घेवून जात होते.

अंतर्गत व्यापार हा छोट्या मोठ्या नद्यांच्या सहाय्याने केला जात होता. दिल्ली व आग्रा यांच्यामध्ये नियमित

होडीने व्यापार करत असत. गंगा नदीतून पटना व बंगाल व्यापार चालत असे. या व्यापारी सुविधाकरिता ठिकठिकाणी अनेक पूल आणि घाट बांधण्यात आलेले होते. अशा प्रकारे व्यापारी मार्ग अस्तित्वात होते. परंतु अनेकवेळा या व्यापाऱ्यांना लुटले जात असे. त्यामुळे त्याच्या व्यापारात अडचणी येत असत.

**ड) विजयनगरकालीन व्यापार :**

दक्षिणेत चोलाच्या साम्राज्यानंतर जवळ-जवळ शंभर वर्ष येथे दुसरी सत्ता निर्माण झाली नाही. विजयनगर साम्राज्याच्या काळात व्यापार आणि उद्योग यांचे पुनरुज्जीवन करण्याचा प्रयत्न राज्यकर्त्यांनी केला. सुलतानशाहीत ज्याप्रकारे व्यापार चालत होता. तशाच प्रकारचा व्यापार दक्षिणेतही चालत असल्याचे तत्कालीन अनेक परकीय प्रवासी यांच्या प्रवास वृत्तांतातून आपणास समजून येते. या काळातही मोठ्या प्रमाणात मालाची आयात निर्यात केली जात होती. विजयनगर साम्राज्यात परदेशी व्यापार व अंतर्गत व्यापार असा दोन प्रकारचा व्यापार चालत होता. त्यामध्ये दळणवळणाची साधने, व्यापारी केंद्रे, व्यापारी जमाती कशा होत्या हे पाहणे गरजेचे ठरते.

**१) परदेशी व्यापार :**

दक्षिण भारताचा परदेशाशी असलेला व्यापार भरभराटीस आलेला होता. सरहद्दीवर खुश्कीचे मार्ग नसल्यामुळे परदेशी व्यापार फक्त सागरी मार्गाने चालत असे. दक्षिण भारतीय द्वीपकल्पाच्या पश्चिम किनारपट्टी विविध आकाराची निरनिराळे बंदरे होती. या बंदरांचे पाच गटात वर्गीकरण करण्यात आले होते. कोकण गट, तुळुनाड गट, मलबार गट, माबार गट, आणि तेलंगणा गट, तुळूनाडू गटातील बंदरे उत्तरेकडील गोवा ते दक्षिणेकडे माउंट, दिल्ली येथपर्यंत पसरलेली होती. आणि त्यामध्ये मीरजान, होंनावर, भटकळ, बारकुर, बसरुर, मंगळूर, आणि कुंबळा यासारख्या महत्त्वाच्या बंदरांचा समावेश होत असे. कोकण गटामध्ये मध्ययुगीन महाराष्ट्रात जो व्यापार कोकण किनारपट्टीवरील बंदरातून केला जात होता. उदा. चौल, दाभोळ, राजापूर, वेगुर्ला, गोवा इ. यापैकी बर्बोसाने गोवा बंदराविषयीचे वर्णन आपल्या प्रवास वृत्तांतात केले आहे. राज्यकर्त्यांना गोव्याच्या व्यापारापासून बराच महसूल मिळत असे. विजयनगरच्या आयात व्यापारामध्ये उत्तम दर्जाचे घोडे महत्त्वपूर्ण होते. ते गोव्यामधून आयात केले जात असत. प्रत्येक वर्षी ओरमुझ येथून घोडे जहाजाद्वारे गोव्याला आणले जात असत. आणि विजयनगर व दख्खनचे व्यापारी ते घोडे खरेदी करत असत. तर येथून ओरमुझला गहू, तांदूळ, साखर, लोखंड, मिरे, आले, निरनिराळ्या प्रकारचे मसाले आणि औषधे इत्यादी माल नेत असत. मक्का आणि एडन येथून अनेक व्यापारी माल वाहून नेणारी जहाजे सुद्धा गोव्याला येत असत. त्याच्या किनाऱ्यावरचा व्यापार मलबार, चौल, दाभोळ आणि खंबायत येथून येणाऱ्या जहाजांनी होत असे.

**अ) तुळूनाडू गट :**

तुळूनाडू गटातील पहिले सागरी बंदर मिरजान हे होते आणि ते आघनासीन नदीच्या काठावर वसलेले होते. मलबार येथील झाम्बुको जहाजे येथे नारळ, खोबरेल तेल आणि गूळ हा माल मोठ्या प्रमाणावर आणत असत, आणि परत जाताना काळा जाडाभरडा तांदूळ नेत असत. होन्नावर आणि मलबार यामध्ये काळा तांदूळ, नारळ, खोबरेल तेल, ताडगूळ आणि माडाची दारू यांचा व्यापार चालत असे.

भटकळ हे एक महत्त्वाचे बंदर होते. याविषयी वर्थेमा हा प्रवासी असे म्हणतो की, भटकळ हे भारतातील एक चांगले शहर होते. तटबंदी असलेले अतिशय सुंदर आणि समुद्रापासून साधारणतः एक मैल दूरवर असे ते शहर होते. येथे मूर व ख्रिश्चन लोक राहत असत. ओरमुझला होणाऱ्या निर्यातीमध्ये पांढरा तांदूळ, पिठीसाखर आणि लोखंड यांचा समावेश होत असे. अरबस्थान व इराण येथील मूर लोकांकडून चांगल्या प्रतीच्या बेहड्यांच्या साठ्याला मोठी मागणी असे. मक्का येथे जाणाऱ्या जहाजातून मूर लोक मसाले नेत असत. मलबारी लोक तेथून लोखंड व साखर यांची खरेदी करत असत. ओरमुझ येथील जहाजे भटकळला प्रत्येक वर्षी अनेक घोडे आणि मोती आणत असत. मलबारी लोक ताडगूळ, नारळ, खोबरेल तेल, माडाची दारू, मोठ्या प्रमाणावर मिरे व औषधे आणून विकत असत. आयात केलेल्या वस्तूंमध्ये नाणी पाडण्यासाठी, स्वयंपाकाची भांडी आणि इतर भांडी यासाठी लागणारे तांबे, पारा, हिंगुळाचा तांबडा रंग,पोवळे, तुरटी आणि हस्तीदंत यांचा समावेश होत असे. त्या प्रदेशात मिऱ्याचे खूप उत्पादन होत असे. म्हणून पुढील काळात इंग्रजांनी तेथे आपली वखार स्थापन केली.

होंनावर हे बंदर दक्षिणेतील महत्त्वाचे बंदर मानले जात होते. 'होन्नावर' याचा शब्दश: अर्थ म्हणजे सोन्याचे खेडे होय. ते शरावती नदीवर वसलेले होते. या बंदराचे वर्णन पीयट्रो डेल्ला व्हेल्ले याने केले आहे. याचे वर्णन करताना तो म्हणतो की, ओनोर हे एक समुद्राजवळील लहान ठिकाण आहे पण त्याचे बंदर म्हणून महत्त्व निर्विवाद आहे. ते नदीच्या दोन फाट्या पैकी एक फाटा दक्षिणेकडे आणि दुसरा उत्तरेकडे गढीपाशी मिळतो आणि त्या नद्या एका प्रवाहाने नदीला मिळतात. होन्नावर नगराच्या जवळील शरावती नदीचा प्रवाह २०० ते ३०० टनाची जहाजे जाऊ शकते इतका व मोठा होता.

बसरूर किनाऱ्यावरील दुसरे महत्त्वाचे व्यापारी शहर म्हणजे बसरूर हे होते. ते कुंदापूर नदीच्या मुखाशी वसलेले होते. अरबस्तान इजिप्त यासारख्या देशांमधून लोक येथे व्यापार करण्यासाठी येत असत. डच लोकांनी येथे तांदूळ खरेदी करण्यासाठी कचेरी उघडली होती. तेथून हा तांदूळ मलबार किनाऱ्यावर असलेल्या सैनिकांसाठी पाठविला जात असे. तसेच पोर्तुगीज हे गोव्यासाठीसुद्धा तांदूळ येथूनच घेत असत. ६ ते ८ जहाजे त्यांचा तांदूळ मस्कत येथे नेत असत. तेथून परत येताना घोडे, खजूर, मोती आणि इतर व्यापारी माल अरबस्थानहून आणत असत.

सडलेला आणि स्वच्छ तांदूळ, बारकूर व बसरुर येथून मोठ्या प्रमाणावर मलबार, ओरमुझ, एडन, कन्नूर व कालिकत येथे निर्यात केला जात असे. तसेच आयात केलेल्या मालामध्ये तांबे, नारळ, खोबरेल तेल आणि साखरे मळी यांचा समावेश असे. अलेक्झांडर हॅमिल्टन यांच्या मताप्रमाणे कर्नाटक वसाहतीमध्ये मंगळूर हे सर्वात मोठे व्यापाराचे केंद्र होते. सतराव्या शतकाच्या अखेरीस त्याचे महत्त्व कमी झाले असले तरी ते मलनाड प्रदेशाची बाजारपेठ म्हणून प्रसिद्ध होते. मंगळुर येथून एडन आणि मलबार येथे काळा तांदूळ निर्यात होत असे. तसेच तेथून मिरे ही निर्यात होत असे. त्याच्या बदल्यात तेथे मालदीव बेटाहून नारळाच्या सालीपासून बनवलेला धागा येत असे. काळा तांदूळ स्वस्त असे. त्यामुळे मलबारी लोक तो मोठ्या प्रमाणावर नेऊन गरीब लोकांना विकणे शक्य होत असे. कारण तांदूळ हे त्यांचे प्रमुख अन्न होते.

**ब) मलबार गट :**

यामध्ये पंचवीस बंदरांचा समावेश होत असे. उत्तरेकडे माउंट, दिल्ली व दक्षिणेकडे केप कोमोरीन यामध्ये ही बंदरे होती. आफ्रिका, युरोप, अरेबिया, इराण, सिलोन आणि नैऋत्य अशिया या सहा परदेशी बाजारपेठा बरोबर त्यांचा व्यापार चालत असे. पूर्व आफ्रिकेच्या किनाऱ्यावरील प्रमुख व्यापारी केंद्र म्हणजे सोफाला, मोझांबिक, मोंबासा व मानाडॉक्सी होती. सोफाला आणि मोझांबिक यांच्यामध्ये सोन्याचा व्यापार चालत असे. मलाक्का, जावा, सुमात्रा, मोलुक्का बेटे, बंदा, बोर्निया व सेलेबिज ही नैर्ऋत्य आशियातील बाजारपेठेची केंद्रे होती.

मलाक्का येथून चिनी मातीच्या वस्तू, झिलाईदार वस्तू, कापूर व सुगंधी द्रव्य आयात केली जात असत. जावा व सुमात्रा येथून सोने आणि मीरे येत असे. मोलुक्का येथून लवंगा येत असत तर जायफळ आणि जायपत्री हे बंदा येथून येत असे.

मलबार गटातील प्रमुख सागरी बंदरे म्हणजे कन्नानोर, धर्मपट्टनम, कालिकत, कोचीन, कायनकोलम व कोईलोन हे होती. येथून दाभोळ, चौल, गोवा, खंबायत, कोरोमंडल किनारा, सिलोन, मालदीव बेटे, बंदा व ओरमुझ या बंदराबरोबर व्यापार चालत असे. कोचीन बंदरातून सुपारी, कोको, मिरे, गुळ व ताडगूळ यांचा व्यापार कोरोमंडळ किनारा, दाभोळ, चौल व खंबायत याबरोबर चालत असे. मलबार गटातील सर्वात दक्षीणेकडील सागरी बंदर कुईलोन हे होते. या महत्वाच्या बंदराचा पूर्वेकडील देशाशी विशेषतः चीनशी चांगला व्यापार चालत असे. चीनी वस्तूचे ते एक महत्वाचे केंद्र बनले होते. येथून विविध वस्तू सिलोन, कोरोमंडळ किनारा, बंगाल, मलाक्का, सुमात्रा व पेगू, येथे निर्यात केल्या जात असत. कुईलोनमध्ये मोठ्याप्रमाणावर उपलब्ध असलेले मिरे ही व्यापाराची प्रमुख वस्तू होती.

**क) माबार गट :**

हा पूर्व किनाऱ्यावरील बंदराचा महत्वाचा गट होय. माबार गटातील किंवा कोरोमंडळ गटातील प्रमुख बंदरे म्हणजे कायल, नेगापट्टम, मैलापूर व पुलकित ही होती. सिलोन, पेगू, मलाक्का, सुमात्रा व चीन ही या बंदराच्या परदेशी व्यापारी प्रमुख केंद्रे होती. कोरोमंडळ किनाऱ्यावरील व्यापाऱ्यांना शेट्टी असे म्हणत. कायल बंदर मोत्यासाठी प्रसिद्ध होते. कायल हे बंदर विजयनगरच्या अधिपत्याखाली नव्हते. परकीय प्रवासी बार्बोसा याने दिलेल्या माहितीवरून असे समजते की, फक्त मैलापूर व पुलिकत ही महत्त्वाची बंदरे विजयनगरचा एक भाग होती. मलबारहून येणारी व्यापारी जहाजे प्रत्येक वर्षी तांदूळ नेण्यासाठी कोरोमंडल किनाऱ्यास येत असत. खंबायतहून तांबे, पारा, हिंगूळ, मिरे व इतर वस्तू येत असत. मलाक्का, चीन व बंगालहून विविध प्रकारचे मसाले आणि औषधे येत असत. पेगु येथून पुलिकत येथे मोठ्या प्रमाणावर माणिक व कस्तुरी यांची निर्यात केली जात असे. तसेच पुलिकत मध्ये मोठ्या प्रमाणावर छापील कापडाचे उत्पादन केले जात होते. ते मलाक्का, पेगू, सुमात्रा, मलबार व गुजरात येथे निर्यात केले जात असे तर खंबायत, मलबार व मक्का येथून तांबे पारा, हिंगूळ, खांबयती वस्तू, रंग, धान्य, मक्का येथील मखमल व गुलाब पाणी यांची आयात केली जात असे.

**ड) तेलंगणा गट :**

या गटात मोटुपल्ली आणि मसुलीपट्टम ही दोनच महत्त्वाची बंदरे होती. मोटुपल्ली येथील व्यापारी मोती,

गुलाबपाणी, चंदन, चीनी कापूर, हस्तिदंत, कापराचे तेल, तांबे, जस्त, रेझीन, रेशीम धागा, पोवळे, अत्तरे, सुगंधी द्रव्य, मिरे व सुपारी यांचा व्यापार करत असत. मोटूपल्ली आणि मसुलीपट्टम ही दोन्ही शहरे हिरे, उत्तम नाजूक कापड, मोठी रत्ने आणि मोती यासाठी प्रसिद्ध होती.

**२) अंतर्गत व्यापार :**

विजयनगर साम्राज्यात अंतर्गत व्यापार तीन प्रकारचा होता. अ) किनाऱ्यावरील व्यापार ब) नद्यांमधून केला जाणारा व्यापार क) खुष्कीच्या मार्गाने केला जाणारा व्यापार

यापैकी किनाऱ्यावरील व्यापाराचा उल्लेख सागरी व्यापार जाणून घेताना केला आहे. त्या कालखंडातखंबायत, भटकळ, मंगळूर, मलबार, कोचीन, पुलिकत, कायल, मसुलीपट्टम या बंदरांमध्ये लहान गलबततून मालाची वाहतूक केली जात असे. यामध्ये तांदूळ, नारळ, खोबरेल तेल, गूळ आणि इतर वस्तू मलबार होऊन खंबायत व सुरत येथे पाठविल्या जात. तेथून सुती कापड व रेशमी वस्त्रे इत्यादी मलबार किनाऱ्यावर आणल्या जात असत. मलबार भागातील पदार्थ कायल, नागापट्टम, पुलिकत, मोटुपल्ली व कन्याकुमारी याला वळसा घालून मसुलीपट्टम येथे पाठविल्या जात तर कायल येथून कच्चे मोती, पुलिकत येथून कापड, मोटुपल्ली व मसुलीपट्टम येथून हिरे व रत्नांचे खडे, तर मलबार, गोवा, सुरत व खंबायत येथे व त्याचप्रमाणे बंगालच्या किनाऱ्यावर पाठवले जात असत.

**अ) नद्यांमधून केला जाणारा व्यापार :**

दक्षिण भारतात नदीमार्गे केला जाणारा व्यापार मोठ्या प्रमाणात चालत असे. परंतु तो उत्तर भारताच्या प्रमाणात कमी चालत असे. दक्षिण भारतात नदी मार्गाने होणाऱ्या मालाच्या आयात निर्यातीवर वर बऱ्याच मर्यादा पडत असत. येथे पश्चिम घाट व पूर्व घाट यांनी बराच प्रदेश व्यापलेला होता या पर्वतांच्या रांगा समुद्रकिनाऱ्या पर्यंत गेल्या होत्या. पश्चिम घाट हा दक्षिणोत्तर एक हजार मैल लांब होता. त्याच्या काही रांगा पूर्वेकडे लांबवर पसरलेल्या होत्या. यालाच सह्याद्रीच्या पर्वतरांगा असे म्हणतात. पूर्वघाट सुद्धा उत्तर-दक्षिण असा तेलंगण व कोरोमंडल या भागातून पसरलेला होता. त्याचे दक्षिणेकडील टोक पश्चिमेकडे वळून निलगिरी पर्वताजवळ पश्चिम घाटाला मिळाले होते. त्याच्या पुढे दक्षिणेकडे गेलेल्या सह्याद्रीच्या रांगाना वेलदोड्याचे डोंगर असे संबोधले जाई. दक्षिण भारतात मुख्यतः तीन नद्यांची खोरी होती. १) गोदावरी नदीचे खोरे यात पैनगंगा आणि वर्धा या मुख्य उपनद्या होत्या. २) कृष्णा नदीचे खोरे यात तुंगभद्रा व भीमा या मुख्य उपनद्या होत्या आणि ३) कावेरी नदीचे खोरे उत्तरभारतातील गंगा यमुना सिंधू या नद्यांच्या तुलनेत दक्षिण भारतातील नद्या वर्षातील काही दिवसच जलमार्ग म्हणून उपयोगी होत्या. यातून वाहणारे पाणी मोसमी पावसाचे होते. शिवाय या नद्या उत्तर येथील नद्याप्रमाणे रुंद व खोल नव्हत्या तरीसुद्धा या नद्यांतून काही वाहतूक केली जात असे. दक्षिण भारताच्या पश्चिम भागातील गंगावळी, शरावती व नेत्रावती या सारख्या नद्या होत्या. दक्षिण भारतातील नद्यामार्गे केला जाणारा व्यापार हा लहान होड्या, तरफा व गलबते यांच्या साह्याने केला जात होता.

खुष्कीच्या मार्गाने केला जाणारा व्यापार : विजयनगर साम्राज्यात राजधानीच्या शहरापासून निरनिराळ्या दिशांनी सुमारे सात महामार्ग जात असत.

पहिला रस्ता :- बंकापूर मार्गे गोवा आणि विजय नगर यांना जोडत असे.

दुसरा रस्ता :- शिवसमुद्र मार्गे श्रीरंगपट्टणला जात असे.

तिसरा रस्ता :- कोचीन आणि मलबार यांना जोडलेला असे.

चौथा रस्ता :- चंद्रगिरी, तिरुपती, कांची, तिरुवन्नमलै, चिदंबरम, मदुराई आणि राजेश्वर यामार्गे धनुष्यकोडी येथे जात असे.

पाचवा रस्ता :- उदयगिरिहून कोंडाविडू येथे जात असे.

सहावा रस्ता :- कंपिली आणि कोविलकोंडा यामार्गे मसुलीपट्टम येथे जात असे

सातवा रस्ता :- विजयनगर आणि रायपूरच्या उत्तरेकडील इतर नगरे यांना जोडत असे.

तत्कालीन काळातील परदेशी प्रवासी पियट्रो डेल्ला व्हेल्ले, बार्बोसा, पेईस, अब्दुल रझाक व निकोलो कोंटी यांच्या प्रवास वृत्तांतातून विजयनगर साम्राज्यातील रस्त्या विषयी तुरळक माहिती मिळते. जमिनीवरून वाहतूक करण्यासाठी हत्ती, घोडे, खेचरे, पालख्या, बैलगाड्या, डोली, ओझी वाहून नेणारे बैल, तट्टे, इतकेच नव्हे तर, म्हशी व गाढवे यांचाही वापर केला जात असे. जमिनीवरून केल्या जाणाऱ्या व्यापारी मालामध्ये मिरे, सुपारी, फळे, चंदनी लाकूड, वेलदोडे, जिरे, हिंग, लोखंड, डाळी, मोहरी, मेथी, सुके खोबरे, खजूर, चिंच, कात, सुती व रेशमी कापड, रेशीम गोंडे, तंबाखू, हळद, आले, सुंठ, बांबूच्या टोपल्या, गुळ, तूप, तेल, मीठ, तांदूळ, रागी आणि इतर धान्य यांचा समावेश होत असे.

**ब) व्यापारी जमाती :**

विजयनगर काळात स्थानिक व्यापारी आपल्या कुवतीनुसार त्यांचा व्यापार चालवीत असत. छोटे दुकानदार आणि शेतकरी हेही स्थानिक व्यापारात भाग घेत असत. खेड्यामध्ये तयार होणाऱ्या वस्तू एक तर खेड्यातल्या बाजारात विकल्या जात असत किंवा जवळच्या एखाद्या मोठ्या गावातील आठवडी बाजारात किंवा जत्रेत पाठवल्या जात असत. वरील प्रमाणे व्यापार मात्र व्यापारी जमाती आणि व्यापारी श्रेणी यांच्या आधारेच शक्य होत असे. दक्षिण भारतातील व्यापारी जमातीमध्ये वीर बनजिग, शेट्टी मलबारी बनिया व रेड्डी यांचा समावेश होत असे. वीर बनजिग हे कर्नाटकातून येत असत. शेट्टी या जमातीचे लोक कर्नाटक केरळ तामिळनाडू आणि तेलंगण येथे आढळून येतात तेलंगणातील शेट्टी लोक सिलोनहून हत्ती, ओरमुझहून घोडे, गोव्याहून कस्तुरी व चीनहून सुंदर रेशीम आयात करत असत. तसेच पंजाबहून कापराची झाडे आणत असे. या सर्व वस्तू विजयनगर, कोंडाविडू, गुलबर्गा आणि ओरिसा येथील सत्ताधाऱ्यांना विकत असत. मलबार येथील शेट्टी लोक रत्ने, मोती, पोवळे, सोने आणि चांदी यांचे व्यवहार करत असत.

या काळात ब्राह्मण लोकांचा ही एक व्यापारी वर्ग होता. हे न्युनिझ याच्या वर्णनावरून दिसून येते. त्याच्या मते ब्राह्मण लोक व्यापारात प्रामाणिक असत अचूक आणि हुशार असत हिशोबात ते चलाख असत. पण कष्टाच्या कामांमध्ये ते कमी पडत असत.

अनेक गुजराथी बनीया लोक कोचीन, कन्नूर आणि कालिकत येथे स्थायिक झालेले होते आणि निरनिराळ्या ठिकाणच्या निरनिराळ्या वस्तूंचा व्यापार ते करत असत. ते राजाला त्याच्या व्यापारावर मोठ्या प्रमाणात कर देत असत. विविध वस्तूंचा व्यापार करण्यासाठी ते निरनिराळ्या देशांना भेटी देत असत.

दक्षिण भारतातील व्यापारी संघाचे अस्तित्व हे त्या भागातील व्यापारी व्यवस्थापनाचे एक वैशिष्ट्य होते. हे व्यापारी संघ दोन प्रकारचे असत. प्रादेशिक संघ आणि व्यावसायिक संघ प्रादेशिक संघामध्ये एका प्रदेशात राहणारे परंतु निरनिराळ्या वस्तूंचा व्यापार करणारे व्यापारी असत. तर व्यावसायिक संघांमध्ये फक्त एका प्रकारच्या वस्तूचा व्यापार करणारे व्यापारी एकत्र येत असत. उदाहरणार्थ महानाड – शेट्टी हे पहिल्या गटात येत असत तर तांबुल शेट्टी हे दुसऱ्या प्रकारात मोडत असत.

**क) व्यापारी केंद्रे :**

विजयनगर कालीन दक्षिण भारतामध्ये चालत असलेला समुद्रावरील आणि जमिनीवरील व्यापार निरनिराळ्या ठिकाणी भरभराटीला आलेले, उद्योगधंदे, जलमार्ग व खुष्कीच्या मार्गामुळे शहरांची आणि गावांची वाढ झाली. अशा या औद्योगिक केंद्रांचे उल्लेख परदेशी प्रवाशांच्या वृतांतामध्ये शिलालेखामध्ये व तत्कालीन साहित्यामध्ये मिळतात. यामुळे देशांतर्गत महत्त्वाची शहरे नावारूपास आली. यामध्ये विजयनगर शहराचा आरग इक्केरी, बिदनूर, मदुराई, श्रीरंगपट्टणम, पेनुकोंडा, उदयगिरि, चंद्रगिरी, तंजावर, कोंडविडु या प्रादेशिक राजधानीच्या शहरांचा समावेश होत असे. कोहिनूर, बनवासी, श्रीशैलम्, कालहस्ती, तिरुपती, चिदंबरम, श्रीरंगम् आणि रामेश्वरम् या तीर्थक्षेत्रांचा यामध्ये समावेश होतो. विजापूर गोवळकोंडा गुलबर्गा हेही व्यापारी केंद्रे म्हणून नावारूपास आली. विजयनगर शहराचे वर्णन करताना डोमिंगो पेस म्हणतो की, या रस्त्यावर अनेक व्यापारी अतिशय सुंदर घरांमध्ये राहत असत. त्यांच्याकडे अनेक प्रकारचे माणीक, हिरे, पाचू, मोती आणि कच्चे मोती इत्यादी विक्रीसाठी असत. रोज संध्याकाळी येथे एक जत्रा भरत असे. तेथे घोडे, लिंबे, संत्री, द्राक्षे, लाकूड इत्यादी वस्तू विक्रीसाठी ठेवण्यात येत असत. या शहरांमध्ये देशोदेशीचे आणि निरनिराळ्या जमातीचे लोक आढळतात. पेईसला हे शहर रोम सारखे भव्य आणि अतिशय सुंदर वाटते.

मलनाड प्रदेशातील इक्केरी हे शहर भरभराटीला आलेले होते. हे शहर अतिशय मोठे होते. येथे बाजारपेठा व धान्याची कोठारे बांधण्यात आली आहेत. तसेच रस्तेही मोठे होते. बिदनूर हे पश्चिम कर्नाटकमधील वैभवशाली शहर होते. विल्क्सच्या मतानुसार ते पूर्वेकडील देशामधील सर्वात समृद्ध व्यापारी शहर होते. संपूर्ण दक्षिण भारताचे धान्याचे कोठार म्हणून बिदनूर प्रसिद्ध होते. निरनिराळे कारागीर व हस्तोद्योग करणारे लोक येथे मोठ्या प्रमाणात राहत होते. कंचगार, बिदी, कुरुबर, तिटेट, चीकपेटे, गुजरी पेठे, कवाड गिरी मध्ये व्यापारी लोक राहत असत. बिदनूर हे दक्षिण भारतातील सर्वात मोठ्या आणि दाट लोकवस्तीच्या शहरांपैकी एक शहर होते.

सागर हे दक्षिण भारतातील महत्त्वाचे देशांतर्गत शहर होते हे शहर नियोजनबद्ध असे होते बाजारपेठचे शहर म्हणून याची प्रसिद्धी दूरवर पसरलेली होती. त्यामुळे देशातील विविध भागातील व्यापारी या प्रसिद्ध व्यापारी केंद्रामध्ये येत असत. येथून देशातील उत्पादन केलेल्या वस्तूबाहेर पाठविला जात असत. येथे मिरे, कापड, लोखंड व धान्य या वस्तू हेग येथे निर्यात केल्या जात असत, आणि त्याच्या मोबदल्यात मीठ, नारळ, टेरा, जपानीका या

वस्तू आयात केल्या जात असत. येथे उत्तम दर्जाचे चंदनी लाकूड याचा व्यापार चालत असे बुकानन याने केलेल्या नोंदीनुसार असे दिसून येते की प्रत्येक वर्षी सागर येथून निर्यात केल्या जाणाऱ्या सुपारीचे वजन सुमारे आठ हजार लोड आणि मिऱ्याचे वजन सुमारे ५०० लोड इतके असे. प्रत्येक लोड सुमारे आठ मण अथवा १९६ १/२ पौंड वजनाचा असे.

गैरसोप्पा हे दुसरे महत्त्वाचे शहर दक्षिण भारतात होते. शरावती नदी वरच्या धबधब्याला त्याचे नाव दिल्यामुळे हे शहर अमर झाले. तेथे मिऱ्याचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर घेतले जात होते म्हणून मिऱ्याच्या व्यापारासाठी हे शहर प्रसिद्ध होते.

अशाप्रकारे विजयनगर साम्राज्यात व्यापार चालत असे या व्यापाराला या साम्राज्यातील राज्यकर्त्यांनी राजाश्रय देऊन तो वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला होता. तसेच साम्राज्याचा आर्थिक पाया मजबूत करण्याचाही प्रयत्न या राज्यकर्त्यांनी केला होता. या व्यापारामुळे अनेक शहरांचा व्यापारी केंद्र म्हणून विकास झाला व ही शहरे देशामध्ये प्रसिद्ध झाली.

**● स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –३.**

**अ) रिकाम्या जागा भरा**

१) सुलतानशाही काळात कापड उद्योगाचे ............... प्रकार होते.

अ) ४ ब) ५ क) ३ ड) २

२) ............... येथे उत्कृष्ट प्रतीचे आणि तलम मलमल तयार होत असे.

अ) गुजरात ब) बंगाल क) आग्रा ड) दिल्ली

३) ............... या प्रदेशाने या मलमली कापडाचे सहा प्रकार सांगितले.

अ) महुआना ब) बार्बोसा क) बरणी ड) अफीफ

४) महुआना हा प्रवाशी ............... या देशाचा रहिवाशी होता.

अ) ग्रीक ब) चीन क) रोम ड) इटली

५) .............. या इतिहासकाराच्या मते, उत्कृष्ट मलमलीच्या एका संपूर्ण ताग्याची किंमत १०० टंका असे.

अ) इब्न बतुता ब) महूआना क) आफीफ ड) वर्थेमा

६) ............... या राज्यात तुस्सार हे उत्कृष्ट प्रतीचे कापड होते.

अ) आसाम ब) मणिपूर क) गुजरात ड) ओरिसा

७) ............... हे शहर रेशीमगालीच्या साठी प्रसिद्ध होते.

अ) आग्रा ब) फत्तेपूरसिक्री क) बंगाल ड) गुजरात

८) ............... हे बंदूकांच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध होते.

अ) मेवाड ब) मुलतान क) लाहार ड) सियालकोट

९) ............... या राज्यात धनुष्य बाण आणि विशिष्ट प्रकारची खंजीर तयार केले जात असत.

अ) गोवळकोंडा ब) मेवाड क) गुजरात ड) लाहार

१०) ............... या लोकांनी प्रथम कागदाचा शोध लावला.

अ) ग्रीक ब) चीनी ड) गुजराती ड) राजस्थानी

११) दक्षिण भारतातील बंदराचे ............... गटात वर्गीकरण करण्यात आले होते.

१) ५ ब) ६ क) ७ ड) ८

१२) ओरमुझ येथून ............... जहाजाद्वारे गोव्याला आणले जात असत.

अ) हत्ती ब) घोडे क) सोने ड) चांदी

१३) तुळूनाडू गटातील पहिले सागरी बंदर ............... हे होते.

अ) मिरजान ब) खंबायत क) मलबार ड) एडन

१४) होन्नावर हे बंदर ............... नदीवर वसलेले होते.

अ) कृष्णा ब) कावेरी क) शरावती ड) तुंगजभद्रा

१५) 'होन्नावर' याचा शब्दाश: अर्थ म्हणजे ............... होय.

अ) सोन्याचे खेडे ब) चांदीचे खेडे क) मासळीचे खेडे ड) मिरे

१६) बसरूर हे व्यापारी शहर ............... या नदीच्या मुखाशी वसलेले होते.

अ) शरावती ब) कुंदापूर ड) कावेरी ड) ताम्रपर्णी

१७) ............... येथे 'चिहिली' या प्रकारच्या कापडाचे उत्पादन केले जात होते.

अ) कोईमतूर ब) पुलीकत क) मलबार ड) चौल

१८) ............... हा परकीय प्रवासी म्हरतो की, भारताच्या पश्चिम किनाऱ्या लगतच्या भागात लोखंड सापडत असे.

अ) निकोलो कोंटी ब) अफीफ क) बार्बोसा ड) जोर्डासन

१९) ............... येथे तांबे सापडते.

अ) कोलार ब) म्हैसूर क) कुईलोन ड) बुदिहाळ

२०) लालसर साखरेला दक्षिण भारतात ............... म्हणतात.

अ) जगरी साखर ब) ताडाची साखर क) बारीक साखर ड) स्पटिक साखर

## ३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

**दिवाण–ए–अमीरकोही :** मुहंमद तुघलकाच्या काळात हे कृषी मंत्रालय म्हणून विभाग सुरू करण्यात आला.

**वकील–ए–दर :** हा विभाग शाही महाल व सुलतान यांच्या व्यक्तिगत सेवेसाठी होता. यालाच राजशिष्टाचार विभाग या नावाने ओळखले जाते.

**कोट्टम्/वलनाडू :** विजयनगर साम्राज्यात गावाचा कारभार पाहण्यासाठी 'ग्राममंडळ' असे त्याच्या प्रमुखास 'अय्यंगार' असे म्हणत.

**स्थळ :** विजयनगर साम्राज्यात गावाच्या समूहाला 'स्थळ' किंवा 'सीमा' असे म्हटले जाईल.

**खालसा जमीन :** सुलतानाच्या व दरबाराच्या खर्चासाठी या जमिनीचा उपयोग केला जात असे.

**खराज :** हा कर उत्पन्नाच्या १/३ पेक्षा कमी व १/२ पेक्षा जास्त घेतला जात नसे.

**खम्स :** युद्धातील लुटीतून मिळालेली संपत्ती ही खम्स या नावाने ओळखली जाईल.

**नसक :** 'नसक' म्हणजे पिकाची अंदाजाने केलेली किंमत होय.

**कुदी :** विजयनगर साम्राज्यात शेतमजुरास 'कुदी' या नावाने संबोधले जाई.

## ३.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न – १**

| | | |
|---|---|---|
| १) – क) दिवाए–ए–अरिझ | २) – ड) मुक्ती | ३) – ड) मुहंमद तुघलक |
| ४) – अ) अरिझ–ए–मुमालिक | ५) – अ) हत्तीविभाग | ६) – ब) शिकदार |
| ७) – ब) मुकदम | ८) – ब) दिवाण–ए–बरिद | ९) – अ) सुलतान |
| १०) – क) आमीर–ए–आखुर | ११) – क) अल्लाउद्दीन खिलजी | १२) – अ) १३३६ |
| १३) – अ) १३४७ | १४) – ब) ४ | १५) – क) इटली |
| १६) – ब) विजयनगर | १७) – ब) सभा नायक | १८) – अ) २० |

| | | |
|---|---|---|
| १९) – ब) कोट्टम | २०) – अ) अय्यंगार | |

**स्वयं अध्ययन प्रश्न – २**

| | | |
|---|---|---|
| १) – अ) २५ | २) – क) १२०० | ३) – ब) अल्लाउद्दीन खिलजी |
| ४) – क) फिरोजशहा तुघलक | ५) – क) फेरीस्ता | ६) – क) मुहंमद तुघलक |
| ७) – अ) २, | ८) – अ) १० | ९) – अ) खम्स |
| १०) – ब) बटाई पद्धत | ११) – क) २ | १२) – अ) ब्रह्मदाय |
| १३) – ब) मठांना | १४) – ब) कुदी | १५) – अ) ४ |
| १६) – ब) पेरणी क्षमता | १७) – ब) क्षेत्र पद्धती | १८) – क) १/४ |
| १९) – ब) कोरडी जमीन | २०) – ब) अग्रहार | |

**स्वयं अध्ययन प्रश्न – ३**

| | | |
|---|---|---|
| १) – क) ३ | २) – ब) बंगाल | ३) – अ) महुआना |
| ४) – ब) चीन | ५) – अ) इन्ब बतुता | ६) – ड) ओरिसा |
| ७) – ब) फत्तेपूरसिक्री | ८) – अ) मेवाड | ९) – क) गुजरात |
| १०) – ब) चीनी | ११) – अ) ५ | १२) – ब) घोडे |
| १३) – अ) मिरजान | १४) – क) शरावती | १५) – अ) सोन्याचे खेडे |
| १६) – ब) कुंदापूर | १७) – अ) कोईमत्तूर | १८) – ड) जोर्डासन |
| १९) – क) कुईलोन | २०) – अ) जगरी साखर | |

## ३.६ सारांश :

सुलतानशाही कालखंडात राज्य विस्ताराच्या प्रसारा बरोबरच प्रशासन हा महत्त्वाचा घटक मानला जात होता. या दृष्टिकोनातून सुलतानशाही व विजयनगर कालखंडात त्या-त्या राज्यकर्त्यांनी प्रशासनाची उत्तम प्रकारे व्यवस्था केली होती. प्रशासन चालवण्यासाठी राज्याची वेगवेगळ्या विभागात विभागणी करण्यात आली होती. या विभागावर अधिकाऱ्यांच्या नेमणूका करून तेथील प्रशासन योग्य पद्धतीने चालविले होते. प्रशासनाचे सर्व अधिकार राज्यकर्त्यांकडे असल्याने त्याचे प्रशासनावर नियंत्रण होते. या प्रशासनाच्या माध्यमातून राज्यामध्ये शांतता आणि सुव्यवस्था चांगल्या प्रकारे राबविण्यात आली होती. स्वतः राज्यकर्ते त्यामध्ये रस घेत असल्याने प्रशासनाला गती मिळाली होती. उदाहरणार्थ अल्लाउद्दीन खिलजी, बल्बन, मुहंम्मद तुघलक, फिरोजशह तुघलक, कृष्णदेवराया या राज्यकर्त्यांनी प्रशासनामध्ये वेगवेगळ्या योजना राबविल्याचे दिसून येते. त्यामुळे पुढील काळात

येणाऱ्या राज्यकर्त्यांनी या प्रशासनाचा वारसा टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. हे राज्यकर्ते आपले प्रशासन लोकांच्या हिताच्या दृष्टिकोनातून चालवत असत. त्यामुळे हे राज्यकर्ते केंद्रीकृत सत्ताधीश जरी असले तरी त्यांचे प्रशासन लोककल्याणकारी हुकूमशाहीचे होते.

राज्यकारभाराच्या दृष्टिकोनातून अर्थव्यवस्था अतिशय महत्त्वाची मानली जाते. या अर्थव्यवस्थेवर राज्याचा सर्व डोलारा उभा असल्याचे दिसून येते. प्रशासन आणि वेगवेगळ्या योजना राबवायच्या असतील तर पैसा हा घटक सर्वात महत्त्वाचा होता. त्या दृष्टिकोनातून या राज्यकर्त्यांनी आपल्या कारकीर्दीत शेती उद्योग व व्यापार याला राजाश्रय देऊन त्याचा विकास साधण्याचा प्रयत्न केला. या उद्योग-व्यापार यामुळे अनेक बंदरे व शहरे नावारूपास आली. त्या व्यापारामुळे ती जगामध्ये प्रसिद्ध झाली. या व्यापारी केंद्रामुळे बाह्य देशाशी व्यापार मोठ्या प्रमाणात होऊ लागला. त्यामुळे राज्याचा आर्थिक पाया मजबूत होण्यास मदत झाली. शेतीच्या दृष्टिकोनातून या राज्यकर्त्यांनी अनेक महत्त्वपूर्ण पावले उचलल्याचे दिसून येते. अल्लाउद्दीन खिलजी, फिरोजशहा तुगलक, यांनी तलाव बांधले, मुहंम्मद तुघलक याने अमीर-ए-कोही यासारखा विभाग सुरू केला. या राज्यकर्त्यांनी जमिनीची मोजणी करून तिची प्रतवारी ठरविण्यात आली. त्यावर महसुल आकारण्यात आला. या महसुल वाढीसाठी शेतकऱ्यांना अवजारे, बी-बियाणे, पाणी, कर्ज याची उपलब्धता करून दिली. त्यामुळे राज्याचा महसुल वाढण्यामध्ये मदत झाली. सुलतानशाही काळात या उद्योग व्यवसायामुळे राज्याच्या गरजा भागविण्यास मदत झाली. त्याचबरोबर राज्याची आर्थिक उन्नती होण्यासही मोठा हातभार लागला. या प्रकरणाचा अभ्यास केल्यानंतर आपणास तत्कालीन प्रशासकीय व आर्थिक परिस्थितीचे आकलन होईल हे निश्चितच.

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे द्या**

१. सुलतानशाही कालीन केंद्रीय व प्रांतीय प्रशासनाची चर्चा करा.

२. विजयनगरकालीन केंद्रीय व प्रांतीय प्रशासनाची माहिती द्या.

३. सुलतानशाही कालीन जमीन महसुल विषयी माहिती द्या.

४. सुलतानशाही कालीन उद्योगधंद्या विषयी चर्चा करा.

५. विजयनगर साम्राज्यातील उद्योगधंद्याचे वर्णन करा.

६. सुलतानशाही कालीन व विजयनगरकालीन परदेशी व्यापाराची माहिती द्या.

**ब) टिपा लिहा.**

१. सुलतानशाही कालीन केंद्रीय प्रशासन

२. सुलतानशाही कालीन जमीन महसूल व्यवस्था

३. विजयनगरकालीन केंद्रीय प्रशासन

४. सुलतानशाही कालीन अंतर्गत व्यापार

५. विजयनगरकालीन अंतर्गत व्यापार

६. सुलतानशाही कालीन कापड उद्योग

७. विजयनगरकालीन व्यापारी केंद्रे

**३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके :**


१. डॉ. कोलारकर, श. गो., मध्ययुगीन भारताचा इतिहास (१२०६ ते १७०७), मंगेश प्रकाशन, नागपूर २०१४.

२. प्रो. सतीश चंद्र, मध्यकालीन भारत, ओरीएंट ब्लैकस्वान हैदराबाद, २०१३.

३. प्रो. वर्मा, हरीश्चंद्र, मध्यकालीन भारत, भाग -१, दिल्ली विश्वविद्यालय, दिल्ली २०१५.

४. चिटणीस, के. एन., मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, पुणे १९८१.

५. रेड्डी, के. कृष्ण, भारत का इतिहास, दिल्ली २०१२

६. Mujumdar, R. C., The Delhi Sultnate, Bhartiy vidhya Bhavan Bombay.

७. Lal, K.S., Studies in Medieval Indian History.


❖❖❖

## घटक – ४

# धर्म, समाज आणि संस्कृती

अनुक्रमणिका :


४.१ उद्दिष्टे

४.२ प्रास्ताविक

४.३ विषय विवेचन

४.३.१ सुफी पंथ : चिश्ती संप्रदाय, भक्ती चळवळ : संत कबीर, शीख धर्म : गुरुनानक

४.३.२ समाज : हिंदू आणि मुस्लिम

४.३.३ स्थापत्य : दिल्ली सुलतानशाही, विजयनगर आणि बहामनी

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.६ सारांश

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ संदर्भ ग्रंथ

४.९ क्षेत्रिय कार्य


## ४.१ उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला खालील गोष्टी स्पष्ट करता येतील.

- मध्ययुगीन भारतातील धार्मिक विचार व संकल्पना यांचे आकलन होईल.
- भक्ती चळवळीविषयी माहिती सांगता येईल.
- सुफी पंथ व त्यांचे तत्वज्ञान आणि चिश्ती संप्रदाय व इतर उपसंप्रदाय यांची ओळख होईल.
- संत कबीर यांचे भक्ती चळवळीतील योगदानाची स्पष्ट कल्पना करता येईल.
- शीख पंथ व त्याचे तत्वज्ञान आणि गुरूनानक यांच्या कार्याची माहिती होईल.
- मध्ययुगीन सुलतानशाही कालखंडातील हिंदू व मुस्लिम समाजाची माहिती मिळेल.

- सुलतान कालखंडातील स्थापत्यशैलीची वैशिष्ट्ये व स्थापत्यातील प्रगती यांची माहिती होईल.
- बहामनी व विजयनगर कालखंडातील स्थापत्याची माहिती मिळेल.

## ४.२ प्रास्ताविक :

मध्ययुगीन भारतीय धर्म, समाज व संस्कृती यांना वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. इस्लामी आक्रमकांनी प्रारंभीपासूनच इस्लाम धर्माचा प्रसार करण्यासाठी सातत्याने विविध मार्गाचा अवलंब केला. इस्लामचा प्रचार आर्य प्रसार हे त्यांनी आपले पवित्र कर्तव्य मानले होते. त्यासाठी त्यांनी मंदिराचा नाश, मूर्तीची विटंबना, जिझिया कर, इस्लाम स्विकारण्यास प्रोत्साहन या तत्त्वाचा अवलंब केला. त्यामुळे हिंदू व मुसलमान या दोन भिन्न धर्मात तेढ व संघर्ष निर्माण झाला.

हिंदू व मुस्लिम यांच्यातील दीर्घकालीन परस्पर संबंधामुळे दोन्हीतील कट्टरता कमी होण्यास मदत झाली. काळाच्या ओघात परस्परांचा एकमेकांवर प्रभाव पडून उदारमतवादी विचारांचा उदय झाला. त्यातूनच विविध पंथ, संप्रदाय उदयास आले यातील भक्तांनी व संतांनी जनसेवा व मानवतेचे कल्याण यातूनच ईश्वराची उपासना साध्य होते असा विचार मांडून समाजाला योग्य दिशा देण्याचे महत्वाचे कार्य केले. या मध्ययुगीन काळात जे काही प्रभावी संप्रदाय होऊन गेले त्यापैकी सुफी संप्रदाय, भक्ती चळवळ व शीख धर्म यांचा प्रामुख्याने आपल्याला अभ्यास करावयाचा आहे. मध्ययुगीन सुलतानशाही कालखंडातील हिंदू व मुस्लिम समाजाची माहिती तसेच सांस्कृतीक घटकामध्ये स्थापत्याच्या दृष्टीने मध्ययुगीन कालखंडात दिल्ली सुलतानशाही, विजयनगर व बहामनी काळात स्थापत्य शास्त्रात झालेली प्रगती इत्यादी सर्व घटकांचा अभ्यास या प्रकरणात करावयाचा आहे.

## ४.३ विषय विवेचन :

### ४.३.१ सुफी पंथ : चिश्ती संप्रदाय, भक्ती चळवळ : संत कबीरं शीख धर्म : गुरुनानक

#### अ) सुफी संप्रदाय :

मध्ययुगीन कालखंडात भारतात ज्याप्रमाणे भक्तिसंप्रदाय लोकप्रिय झाला होता त्याचप्रमाणे सुफी संप्रदाय लोकप्रिय झाला होता. इस्लाममधील उदारमतावर आधारलेला हा संप्रदाय होता. सुफी संतांनी इस्लाम धर्मातील भक्तीचा महिमा वाढविला. त्यासाठी ईश्वरोपासना व समाजसेवा यावर त्यानी भर दिला. सुफी संप्रदायातील विविध संताच्या वैचारिक जागृतीमुळे इस्लाम मधील धार्मिक कट्टरता कमी होण्यास मदत झाली. परित्याग करण्याचा त्यांनी स्वधर्मीयांना उपदेश केला.

#### १) सुफी संप्रदायाचा उदय :

सुफी संप्रदायाच्या उगमाबाबत इतिहासकारामध्ये मतभेद आढळतात. इतिहासकार सेतू माधवराव पगडी यांच्या मतानुसार, मुहंम्मद पैगंबरांना फलित म्हणजे 'गुढ विद्या' होय. यालाच 'सुफीची विद्या' असे म्हणतात. त्यामुळे सुफी संप्रदाय इस्लामच्या स्थापनेबरोबरच उदयास आला असा मत प्रवाह आहे.

प्रो. हुमायूँ कबीर यांच्या मतानुसार, 'सुफी पंथाला कुराणाचा आधार होता. परंतु भारतीय विचारधरांचा फार मोठा प्रभाव त्यांच्यावर पडलेला आहे'. इब्न खाल्दूनच्या मते, परमेश्वराकरिता सर्वस्वाचा त्याग करणे, सर्वसंग परित्याग करणे आणि समाजापासून दूर एकांतात बसून परमेश्वराचे चिंतन करणे ही सुफीच्या प्रारंभ काळातील तत्वे होती.

डॉ. ए. एल. श्रीवास्तव यांच्या मते, सुफी तत्वज्ञानावर हिंदू विचार, श्रद्धा व परंपरा यांचा प्रभाव होता. सुफींनी ज्या शांती व अहिंसा तत्वांचा स्विकार केला ती दोन्हीही तत्वे हिंदू, बौद्ध व जैन धर्माची वैशिष्ट्ये आहेत.

काहींच्या मते भारतात इस्लामच्या प्रवेशाबरोबरच इस्लाम धर्मातील साक्षात्काराच्या विचारांना चालना मिळाली. इ. स. ९ व्या शतकात खलिफांच्या चर्चेतून सुफींचा दृष्टीकोण व्यापक बनला. ते कर्मकांडाकडून ज्ञानामार्गाकडे वळले. ईश्वराच्या प्राप्तीसाठी त्यांनी आपले ध्येय ठरविले. भारतात सुफी पंथाची सुरूवात महमंद गझनीच्या आगमनाबरोबर झाली. लाहोरच्या आलिबीन उस्मान उर्फ दातागंजबक्ष हा भारतातील सुफी पंथाचा जनक समजला जातो.

**२) सुफी शब्दाचा अर्थ व सुफी पंथाची व्याख्या :**

याबाबत विद्वानामध्ये मतभेद आहेत.

सुफी पंथाची व्याख्या सांगण्याचा अनेक अभ्यासकांनी प्रयत्न केला आहे.

१. 'सुफी' हा शब्द अरबी भाषेतून आलेला आहे. सुफीचा अर्थ 'चटई' आहे. जे चटईवर एका ओळीत बसून ईश्वराची उपासना करतात ते सुफी संत होय.

२. सुफ्फा या मदिनेतील मशिदीच्या समोरच्या चबुतऱ्यावर बसणाऱ्या फकिरांना सुफी असे म्हणतात.

३. 'सुफी' हा शब्द 'सफा' या शब्दापासून निर्माण झालेला आहे. 'सफा' म्हणजे 'शुद्धता' होय. ज्याचे अंतःकरण शुद्ध आहे त्यांना सुफी म्हणतात.

४. डॉ. बुद्ध प्रकाश यांच्या मते, सुफी याचा अर्थ 'लोकर' असा आहे. लोकरीचे वस्त्र परिधान करून धर्मप्रसार करणाऱ्यांना सुफी म्हटले जाते.

५. डॉ. गजाली यांच्या मते, ज्ञान व सदाचार यांचा समन्वय म्हणजे सुफी होय. वरील सर्व व्याख्यावरून असे स्पष्ट होते की सुफी पंथाने आत्मज्ञान, साक्षात्कार हे आपले ध्येय मानून आपला आध्यात्मिक विकास साधला आहे.

**३) सुफी पंथाचे (संप्रदाय) तत्वज्ञान :**

सुफी पंथाचे स्वरूप लक्षात येण्यासाठी या पंथाचे तत्वज्ञान अभ्यासणे आवश्यक आहे.

**अ) परमेश्वर :**

परमेश्वरावर प्रेम करणे हा त्यांच्या तत्वज्ञानाचा मुख्य भाग आहे. परमेश्वराच्या स्वरूपाबद्दल इस्लाम

धर्माच्या तत्वज्ञानात तीन मतप्रवाह आहेत.

**१. इजादिया :** परमेश्वराने शून्यातून सृष्टी निर्माण केली. सृष्टी व परमेश्वर भिन्न आहेत.

**२. शहुदिया :** परमेश्वर सर्वव्यापी व सर्वश्रेष्ठ आहे.

**३. वजूदिया :** परमेश्वर हे एक सत्य असून सर्वत्र तोच आहे.

परमेश्वराच्या अविष्काराला 'तनजुल्लात' म्हणतात तर परमेश्वराच्या निर्भेळ स्वरूपाला 'अल्ल वजदूल मुतलक' असे म्हणतात. अज्ञान हे सर्व दुःखाचे मुळ आहे. मोक्ष म्हणजे अज्ञानाचा नाश. अहंकार व आसक्ती यांचा निरास आहे. परमेश्वर कृपेनेच सर्वश्रेष्ठ ज्ञान व शाश्वत आनंद प्राप्त होतो अशी सुफीची धारणा आहे.

**ब) अध्यात्म मार्गातील टप्पे :**

अध्यात्म जीवनातील प्रगतीला सुफी पंथात 'मार्ग' म्हणतात. ईश्वर प्राप्तीसाठी पुढील काही अवस्था मानलेल्या आहेत.

अ) उबुदियात – म्हणजे सेवा होय.

ब) इश्क – म्हणजे प्रेम आणि ईश्वराची ओढ होय.

क) जाहेद – म्हणजे निवृत्ती. परमेश्वराला सोडून बाकी सर्व गोष्टींचा त्याग होय.

ड) मारिफत – म्हणजे ज्ञानप्राप्ती. परमेश्वराच्या स्वरूपाचे ज्ञान होते.

इ) वजूद – म्हणजे उन्मादावस्था होय. यासाठी भक्त परमेश्वराची ध्यानधारणा करतो.

याशिवाय तोबा–पश्चाताप, इनावत–मतांतर, जुहुद–त्याग, तवक्कूल–शरणागती, सब्र–समाधान, शुक्र–कृतज्ञता, मुकाम (रजा) ईश्वरी इच्छा असे ७ टप्पे सुफी संप्रदायाने सांगितले आहेत.

**क) सुफींचे आचारशास्त्र :**

आत्म्याच्या उद्धारासाठी चार आचार मार्ग प्रतिपादन केले आहेत.

अ) शरियत – धर्माचरणाचे पालन करणारे नियम यात सांगितले आहेत. त्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो. कुराणाचे पठन करणे, नमाज पडणे, चिंतन करणे, इंद्रियाचा निषेध करणे इ. होय.

ब) मलकूत – दैवी आशिर्वाद होय.

क) जबरूत – सिद्धीची अर्थप्राप्ती होय.

ड) लाहूत – परमेश्वरात विलीन होणे.

**ड) सुफींचा त्रिप्रवास :**

काही सुफी संताच्या मते मनुष्याच्या आत्मोद्धाराचे तीन मार्ग किंवा प्रवास आहेत.

अ) सयरिल्ला – म्हणजे परमेश्वरापर्यंत प्रवास करणे.

ब) सैरफिल्ला – म्हणजे परमात्म्य स्वरूपात प्रवास करणे.

क) सैरे अनिल्ला – म्हणजे परमेश्वरापासून प्रवास यात आत्मा परमात्म्यापासून अलग होऊन जीव धारण करण्यासाठी विश्वाकडे प्रवास करतो. अशा पद्धतीने त्या व्यक्तीच्या आत्म्याचा प्रवास होत असतो.

**इ) गुरूभक्ती :**

सुफी पंथात गुरू भक्तीला अतिशय महत्व आहे. सुफी गुरूला शेख, पीर किंवा मुर्शिद या नावाने ओळखतात तर शिष्याला मुरीद असे म्हणतात. गुरूच्या समाधीची जागा म्हणजे दर्गा होय. दर्ग्याची यात्रा म्हणजे 'जिरायत' होय आणि गुरूच्या पुण्यतिथी निमित्त जी यात्रा भरते त्यास 'उरूस' असे म्हणतात. प्रथम शिष्याला पीराचा नंतर मुहंम्मद पैगंबराचा व शेवटी परमात्मा स्वरूपाचा साक्षात्कार घडवितो. गुरूभक्तीमध्ये गुरू सांगेल ते करण्याची तयारी शिष्याने ठेवावी लागते. गुरू मार्गदर्शक असल्याने सुफी पंथात महत्वाचे स्थान आहे.

**४) भारतातील सुफी पंथातील उपसंप्रदाय (सिलसिला) :**

मध्ययुगीन भारतात सुफी संप्रदायाचा प्रसार होऊन त्याच्या अनेक शाखा किंवा उपसंप्रदाय निर्माण झाले. भारतामध्ये प्रमुख असे सहा उपसंप्रदाय म्हणजेच सिलसिला होते हे पुढीलप्रमाणे –

**१. चिश्ती संप्रदाय :**

ख्याजा अबू याने या संप्रदायाची स्थापना १२ व्या शतकात हिरातजवळ चिश्ती या गावी केली. भारतात चिश्ती संप्रदायाची स्थापना ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती याने केली. या संप्रदायाचे मुख्य ठिकाण अजमेर आहे. 'सत्ताशास्त्रीय एकत्ववाद' हे चिश्ती संप्रदायाचे प्रमुख तत्व होते. कुराण पठण, संताची सेवा, मक्केची यात्रा करणे यास महत्व होते. शेख अब्दुल, शेख मसूद, हजरत गेसूदराज शेख अली हे चिश्ती संप्रदायाचे प्रसार करणारे काही प्रमुख संत होते. सर्वात जास्त लोकप्रियता व प्रसिद्धी चिश्ती संप्रदायाला मिळाली होती.(याची सविस्तर माहिती चिश्ती सिलसिला मध्ये दिली आहे.)

**२. सुऱ्हावर्दी संप्रदाय :**

इ. स. १२ व्या शतकात इराक मध्ये या संप्रदायाची स्थापना नजीबउद्दीन यांनी केली. त्यांचे शिष्य बहाउद्दीन झकेरिया यांनी १३ व्या शतकात या संप्रदायाचा प्रसार भारतात केला. सिंध प्रांतातील सुलतान हे त्यांचे मुख्य केंद्र होते. बहाउद्दीन झकेरिया यांना अल्तमशने 'शेख–उल–इस्लाम'ही पदवी दिली. या संप्रदायाची राहणी संपन्न होती. त्यांचे मठही प्रशस्त होते. समाजातील वरिष्ठ वर्गाला आपल्याकडे आकर्षित करण्यात हा संप्रदाय यशस्वी झाला. त्यांनी अनुदानरुपाने बरीच संपत्ती व जमीनी प्राप्त केल्या. मध्ययुगीन भारतातील श्रीमंत संत म्हणून झकेरिया यांचा उल्लेख होतो. प्रादेशिक सत्ताधीशांशी सलोख्याचे संबंध प्रस्थापित करून बंगाल व गुजरात मध्ये यांचा प्रसार केला. शेख जलालुद्दीन, फिरदौसीया व बुखारी यांसारख्या प्रमुख संतानी या संप्रदायाचा प्रसार केला.

**३. नक्शबंदीया संप्रदाय :**

तुर्की मोगल यांच्या खोट्या धर्म समजूतीविरूद्ध इराणी संस्कृतीने दिलेली प्रतिक्रिया म्हणून या संप्रदायाचा उल्लेख केला जातो. अहमद-अदा-यश्वी याने १२ व्या शतकात मध्य आशियात याची स्थापना केली. हा संप्रदाय भारतात आणण्याचे काम मुहमद-बाकी-बिला याने अकबराच्या काळात केले. परंतु भारतात त्याचा प्रसार करण्याचे काम शेख अहमद सरहिंदी यांनी केले. 'साक्षीतादात्म्य' हे या संप्रदायाचे प्रमुख तत्व होते. सर्व काही परमेश्वर आहे व परमेश्वर सर्व काही आहे यावर त्यांनी भर दिला आहे. धार्मिक सहिष्णुतेचा पुरस्कार करून धार्मिक कर्मकांडाला तीव्र विरोध केला. इस्लामी कट्टरतेला फाटा देवून बुद्धीवादी दृष्टीकोणाचा स्विकार केला. प्रत्येकाने आपल्या मनावर संयम ठेवून ईश्वराचे सतत स्मरण करण्यावर भर दिला.

**४. कादिरीया संप्रदाय :**

शेख अब्दुल कादीर जिलानी यांनी बगदाद येथे या संप्रदायाची स्थापना केली. भारतात याची सुरूवात मुहंम्मद गौस याने केली. महंमद मीर याने मुघल कालखंडात या पंथाचा सर्वदूर प्रसार केला. इस्लाम धर्म प्रसारासाठी सहिष्णुतेचे धोरण स्विकारले. बंगाल व बिहार या प्रदेशात याचा प्रसार झाला. यामुळे आध्यात्मिक उन्नती साधण्याचा प्रयत्न झालेला दिसतो.

**५. सत्तारिया संप्रदाय :**

याची स्थापना अबु-यझीद-अल-बिस्तामी याने केली. हा संप्रदाय भारतात १५ व्या शतकात शेख अब्दुल्ला याने आणला. या पंथाची भक्ती साधना व तत्वज्ञान यावर हिंदू धर्माचा मोठा प्रभाव दिसतो. बाबर, हुमायून व अकबर या मुघल बादशहांशी या पंथाचे घनिष्ठ संबंध होते.

**६. फिरदौसिया संप्रदाय :**

बद्रुद्दीन समरकंदी याने भारतात या संप्रदाचा पाया घातला. बिहारमध्ये याचा प्रसार झाला. तुघलक काळात हा पंथ प्रसिद्धीस आला. अहमद इब्न याहया मानेरी हा या संप्रदायातील एक प्रमुख गुढवादी होऊन गेला. वरील सहा संप्रदायापैकी पहिले दोन संप्रदाय सुलतानशाही कालखंडात, तिसरा व चौथा संप्रदाय मुघल कालखंडात लोकप्रिय झाले तर शेवटचे दोन विशेष प्रभावी नव्हते.

**५) चिश्ती सिलसिलामधील सुफी संत व त्यांचे कार्य :**

**१. ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती :**

यांचा जन्म इ. स. ११४२ मध्ये झाला. लहानपणापासून ते विरक्त होते. मुहंम्मद घोरीबरोबर भारतात आले व अजमेरला स्थायिक झाले. त्यांनी बगदाद, समरकंद व मक्का इ. विविध इस्लामच्या पवित्र स्थळांना भेटी दिल्या. इ. स. ११५६ मध्ये ते चिश्ती संप्रदायाचे प्रमुख झाले. इ. स. ११६६ मध्ये अजमेर येथे चिश्ती संप्रदायाची स्थापना केली. मानवसेवा हीच खरी ईश्वरसेवा होय हे त्यांच्या शिकवणुकीचे सार होते. त्यांचा मानवतावादी दृष्टीकोन, साधी राहणी व सर्वांना पेलतील अशी धर्मकर्तव्ये यामुळे हा सिलसिला भारतात मोठा संप्रदाय बनला.

त्यांनी भारतात या संप्रदायाचा प्रसार केला. इ. स. १२३६ मध्ये ते मरण पावले. दर वर्षी लक्षावधी हिंदू-मुस्लिम भक्त अजमेर येथे त्यांच्या दर्ग्याचे दर्शन घेण्यासाठी येतात. ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती यांच्यानंतर चिश्ती सिलसिलामध्ये अनेक सुफी संतांनी चिश्तिीचा प्रसार करण्याचे तसेच जनकल्याणाचे कार्य केले. त्यामधील काही प्रमुख संत व त्यांनी केलेले कार्य पुढीलप्रमाणे.

**२. शेख हमिदुद्दीन आणि शेख काकी :**

हे ख्वाजा चिश्तीचे अनुयायी होते. ते विशेष प्रसिद्ध होते व अत्यंत साधे, सरळ, उदार जीवन जगत होते. त्यांची धार्मिकता एवढी प्रभावशाली होती की, लोक त्यांना 'सुलतान तारीकीन'(संन्यासांचा सुलतान) ही पदवी दिली होती. अल्तमशच्या काळात दिल्ली येथे शेख बख्तियार काकी आले होते. अल्तमशने त्यांना त्याच्या राजवाड्याशेजारी राहण्याची विनंती केलेली असतानाही त्यांनी दिल्ली शहराबाहेर खानकाहमध्ये वास्तव केले. शेख-उल-उस्लाम हे पदही नाकारले. खानका (विस्तीर्ण प्रकारचे मठ) मधील त्यांच्या वास्तव्यामुळे त्यांच्या खानकाहला खूप प्रसिद्धी मिळाली. मुस्लिमांच्या व्यतिरिक्त असलेल्या व्यक्तींच्याही आध्यात्मिक गुणाची ते कदर करीत असत. त्यांनी हिंदू मुस्लिम यांच्यातील दरी कमी करण्याचा प्रयत्न केला.

**३. शेंख फरीद उर्फ बाबा फरीद (इ.स. ११७५ ते १२६५) :**

चिश्ती सिलसिला संपूर्ण भारतभर लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. सुफी संप्रदायाचे तत्वज्ञान समाजात रूजविण्याचा त्यांनी प्रयत्न केला. अत्यंत हलाखीचे जीवन जगणारे बाबा फरीद उत्तम कवी व वक्ते होते. कुतुबूद्दीन बख्तियार काकींचे शिष्य होते. त्यांनी धनसंपत्ती व घरदार सोडून वैराग्य धारण केले होते. त्यांनी अनेक इस्लाम देशात भ्रमण केले होते. समाजाला प्रेमाची शिकवण देवून समाजात बंधूभाव वाढीस लागण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. इ. स. १२६५ मध्ये त्यांचा मृत्यू झाला.

**४. ख्वाजा बंदे नवाज उर्फ गेसूदराज :**

इ. स. १३२१ मध्ये दिल्लीत त्यांचा जन्म झाला. सुफी पंथ चिश्ती सलिसिला यांचा प्रचार व प्रसार करण्याचे महत्वाचे कार्य यांनी केले. दक्षिण व उत्तर हिंदूस्थानातील विविध ठिकाणांना भेटी देवून ज्ञानप्राप्ती केली. फिरोजशहा बहामनीच्या आग्रहावरून त्यांनी कर्नाटकातील गुलबर्गा येथे कायमचे वास्तव केले. परमेश्वरप्राप्ती व ज्ञानप्राप्तीसाठी ते देशभर फिरले. त्यांनी देशभरातील मकबऱ्यांना भेटी दिल्या. इ.स. १३६५ मध्ये दिल्ली येथे उद्‌भवलेल्या महामारीत त्यांनी दिल्लीतील लोकांची फार सेवा केली आणि सुफी पंथाच्या प्रसारासाठी शेकडो ग्रंथ लिहिले. दक्षिण भारतात त्यांचे नाव फार प्रसिद्ध झाले. इ. स. १४२२ मध्ये त्यांचा अंत झाला. गुलबर्गा येथे त्यांचा दर्गा आहे. दरवर्षी साजरा होत असलेल्या उरूसामध्ये हिंदू-मुसलमान लोक मोठ्या प्रमाणात सहभागी होतात.

**५. शेख निजामुद्दीन अवलिया :**

यांचा जन्म इ. स. १२३८ मध्ये बदायू येथे झाला. वयाच्या बाराव्या वर्षी त्यांनी हजरत बाबा फरीदुद्दीन गंजशकर यांचे शिष्यत्व पत्करले. गुरूच्या आज्ञेने ते दिल्लीत राहू लागले. सुलतान मुबारक खिलजी व गियासुद्दीन तुघलक या दोन सुलतानांचा अपवाद वगळल्यास सुलतान कैकूबादपासून मुहंम्मद तुघलकापर्यंतचे सर्वच सुलतान

त्यांचा आदर करीत असत. ते संगीत, नृत्य कव्वाली याद्वारे ईश्वर उपासना करीत असत. त्याचे हे वर्तन गियासुद्दीन तुघलक यांना न आवडल्याने बंगालच्या स्वारीहून परत येताना औलिया यांना दिल्ली सोडण्याचा आदेश दिला. तेव्हा औलिया यांनी 'हनुज दिल्ली दूर अस्त'(अजून दिल्ली फार दूर आहे) असे म्हटले. त्यांची भविष्यवाणी खरी ठरली कारण सुलतान दिल्लीला येण्यापूर्वीच अफगाणपूर येथे अपघातात मरण पावला. इ. स. १३२५ मध्ये या सुफी संताचे देहावसान झाले. अनेक प्रसिद्ध कवी, लेखक व संगीतातून त्यांचे शिष्य होते. सुप्रसिद्ध कवी अमीर खुश्रो त्यांचा शिष्य होता.

चिश्ती सिलसिला सर्वसामान्य लोकांत लोकप्रिय करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. दिल्ली येथील वास्तव्यात त्यांनी एकूण सात सुलतानांची राजवट पाहिली. परंतु एकाही सुलतानाच्या दरबाराला भेट दिली नाही. मानवसेवा हीच ईश्वरसेवा समजून त्यांनी चिश्ती संप्रदायाच्या माध्यमातून प्रबोधन व इस्लामचा प्रसार केला. त्यांनी भौतिक सुखापासून दूर राहण्याचा व ईश्वरावर प्रेम करण्याचा उपदेश लोकांना दिला. मुहंम्मद तुघलकांवर या अवलियाचा विशेष प्रभाव होता. ते हिंदू मुसलमानात कोणताही भेद मानीत नसत. स्वतःसाठी काहीही राखून ठेवीत नसत. त्यामुळे कित्येकदा त्यांना उपवास घडे, तेव्हा ते म्हणत मी ईश्वराचा पाहुणा आहे. त्यांच्या पवित्र आचरणामुळे चिश्ती संप्रदाय लोकप्रिय झाला. तत्कालीन प्रजेवरही त्यांचा अतिशय प्रभाव होता. त्यांच्या मृत्यूनंतर दिल्ली येथे त्यांचा मकबरा बांधण्यात आला. दरवर्षी साजरा होत असलेल्या उरूसामध्ये हिंदू मुसलमान लोक मोठ्या प्रमाणात सहभागी होतात.

**६. शेख हमिदुद्दीन महमूद :**

चिश्ती संत शेख निजामुद्दीन अवलिया यांचे शिष्यत्व स्विकारलेल्या शेख मुहंम्मद यांनी चिश्ती संप्रदायासाठी श्रेष्ठ दर्जाचे कार्य केले व अवलियाचा वारस या नात्याने त्यांनी अवलियाची परंपरा पुढे चालविली. त्यांच्या कार्यामुळे त्यांना दिल्लीचा चिराग (दिवा) या नावाने ओळखतात. वयाच्या २५ व्या वर्षी ते सुफी झाले. २० वर्ष विरक्त राहून चिश्ती संप्रदायाचे जनकल्याणाचे कार्य केले. अखिल भारतीय प्रतिष्ठा लाभलेले ते शेवटचे संत होते. याशिवाय शेख सलिम चिश्ती, महात्मा गैसबराज, ख्वाजा कुतुबूद्दीन, जलालूद्दीन सुर्ख बुखारी इ. अनेक सुफी संत होवून गेले.

**६) चिश्ती संताची जीवनशैली :**

चिश्ती संताची जीवनशैलीचा व त्यांच्या आचारविचारांचा भारतीयांवर मोठा प्रभाव पडलेला दिसून येतो. शेकडो सुफी संतांनी सर्व भारतभर धर्मप्रसाराचे केंद्रे स्थापन केली व धर्मप्रसारासाठी शेकडो ग्रंथ लिहिले. आज सुफी संतांचे दर्गे व त्यांचे भरणारे उरूस हा देशाच्या संस्कृतीचा एक भाग बनला आहे. अशा या चिश्ती संताची जीवनशैली पुढील प्रमाणे असलेली दिसते.

१. चिश्ती संतांची राहणी अत्यंत साधी, कपडे जाडेभरडे व कोणत्याही प्रकारचा डामडौल नव्हता.

२. शारिरीक इच्छांवर नियंत्रण प्रस्थापित करणे व उपोषणाद्वारे शरीरावर नियंत्रण ठेवणे.

३. कोणत्याही प्रकारचा संचय न करता ते दरिद्री जीवन जगत होते.

४. काही संत विवाहित असले तरी त्यांनी राजांकडून कोणतीही मदत न स्विकारता शिष्यांनी दिलेल्या मदतीवर व भेटीवर आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चालविला. त्यांचा सर्व वेळ ध्यानधारणा करण्यात व्यतीत होत असे.

चिश्ती संताच्या कार्यामुळे व धर्मप्रसारामुळे भारतात चिश्ती संप्रदाय सर्वात जास्त लोकप्रिय झालेला दिसून येतो.

**७) सुफी पंथाचे महत्व :**

सुफी पंथाचा उगम पश्चिम आशियात झाला असला तरी इस्लामी आक्रमणाबरोबरच भारतात सुफींचे आगमन झाले. सुफीच्या धर्मप्रसारास सत्ताधीशांनी पाठिंबा दिला. त्यामुळे सुफींचा प्रसार झाला. या संदर्भात असे म्हटले जाते की भारतावर राजवट आहे ती सुलतान व अमीर उमरावांची व दुसरी सुफी साधूसंताची आहे. इस्लामी सुफी संप्रदाय व भारतातील भक्तिसंप्रदाय यांच्यातील विचाराच्या परस्पर देवाणघेवाणीतून परस्परांवर प्रभाव पडला. शेकडो सुफी संतांनी सर्व भारतभर धर्मप्रसाराची केंद्रे स्थापन केली. आपल्या संप्रदायाच्या प्रसारासाठी ग्रंथ साहित्याची रचना केली. एकेश्वरवाद, मानवतावाद, वैराग्य वृत्ती, तपश्चर्या, नामस्मरण, चिंतन यांची जोपासना करीत भक्तीचा प्रसार करण्याचे काम केले. सुफी संतांनी स्थापन केलेले मठ, दर्गे, समाधीस्थळे या ठिकाणी दर्शनासाठी जमणारे भक्त आणि सालाबादप्रमाणे होणारे उरूस हे आपल्या भारतीय संस्कृतीचा एक अविभाज्य भाग बनले आहेत.

सुफी पंथीयांनी भारतातील हिंदु परंपरा, चालीरीती यांचा स्वीकार करून हजारो हिंदुंना मुस्लिम धर्माची दीक्षा दिली. सुफी संतांनी स्वतः ग्रंथ लेखन करून उत्तम असे शिष्य निर्माण केले. त्यामुळेच इस्लामी राजवटीला मदत झाल्याचे दिसते. इस्लामी राजकारणात मुसलमानी सत्तेच्या विस्तारासाठी सुफींच्या कामगिरीकडे दुर्लक्ष करणे म्हणजे सुर्यप्रकाशाला सुर्यप्रकाश न म्हणणे होय. एकंदरीत सुफींनी भारतात मानवतावादी दृष्टीकोनातून हिंदू मुस्लिम यांच्यात समन्वय साधण्याचे कार्य केले तसेच त्यांच्यामुळेच धर्मप्रसाराचे कार्य भारतात घडून आले व हिंदूस्थानातील इस्लामी वर्चस्वाला स्थैर्य प्राप्त करून दिले.

**ब) भक्ती चळवळ :**

भक्ती चळवळ ही मध्ययुगीन भारताने या देशाच्या इतिहासाला दिलेली एक महान देणगी आहे. मानवी जीवनात धर्म, परमेश्वर व परमेश्वराची भक्ती यास विशेष महत्व आहे. भक्ती हा हिंदु धर्मीयांचा स्थायी भाव आहे. जीवनमुक्ती किंवा मोक्षप्राप्ती करायची असेल तर प्राचीन हिंदु विचारवंतानी ज्ञानमार्ग, कर्ममार्ग व भक्तीमार्ग असे तीन मार्ग सांगितले आहेत. यापैकी कोणत्याही एका मार्गाचा अवलंब केल्यास आपले ध्येय साध्य होते असे मानले जाई. मध्ययुगीन संतांनी भक्तीमार्गांचा विशेष पुरस्कार केला. त्यातूनच भक्ती मार्गाची चळवळ निर्माण झाली.

**१) भक्ती मार्गाचा उदय :**

भक्तीमार्ग चळवळीचा उदय कसा झाला, याबाबत इतिहासकारात मतभेद आढळतात. सर चार्लस इलियट यांनी आपल्या 'हिंदुइझम अॅड बुद्धीझम' या ग्रंथात भक्ती मार्गावर इस्लामी प्रभाव असू शकतो असे मत मांडले

आहे. परंतु अनेक विद्वानांना हे मान्य नाही. भक्ती मार्गाचा उगम उपनिषद आणि भगवदगीता या ग्रंथातून झालेला आहे असे मत मांडले आहे.

एकंदरीत सुलतानशाहीच्या काळात झालेली भक्ती मार्गाची ही चळवळ एकाएकी निर्माण झालेली नव्हती तर हिंदू व मुसलमान या दोन धर्मातील तत्वज्ञानाच्या परस्पर संपर्कामुळे आणि विशिष्ट परिस्थितीत परस्परांवर प्रभाव पडून भक्ती मार्गाचा उदय झाला असे मान्य करावे लागते.

**२) भक्ती मार्ग चळवळीची उदयाची कारणे :**

**१. पलायनवाद :**

१२ वे शतक ते १५ व्या शतकापर्यंत हिंदु व राजपूत राजाचा पराभव होऊन इस्लामी सत्ता स्थापन झाली. हिंदुवरील अन्याय, अत्याचार वाढले. अशा परिस्थितीत निराश झालेल्या हिंदु जनतेने परमेश्वराच्या उपासनेकडे धाव घेतली. संतांनी भक्तीचा मार्ग दाखविला. हिंदु समाजाला भक्ति पंथाने भावनिक आधार देऊन स्थिर केले.

**२. हिंदुवरील अन्याय व अत्याचार :**

इस्लाम धर्माच्या अनुयायांनी हिंदुवर केलेले अत्याचार यामुळे भक्ती चळवळ उदयास आली. मंदिराचा नाश, मूर्तीची विटंबना, संपत्तीची लूट यामुळे आपल्या सुरक्षेसाठी हिंदूनी ईश्वराला मदतीसाठी आवाहन करण्यास सुरूवात केली.

**३. हिंदु धर्मातील दोष :**

मध्ययुगीन भारतीय समाज हा जातीभेदावर आधारलेला होता. हिंदु धर्मातील कर्मकांड, जातीभेद, बहुदेवतावाद, पुजापाठ यासारखे अनेक दोष निर्माण झाले होते. अशा परिस्थितीत सामाजिक समतेचा पुरस्कार करून सर्वांनाच भक्ती करण्याचा अधिकार मिळाल्यामुळे या भक्ती मार्गाचा जोरदार पुरस्कार करण्यात आला.

**४. हिंदु मुस्लिम समन्वय :**

दीर्घकालीन सहवासानंतर हिंदू व मुस्लिम संस्कृतीचा काही प्रमाणात समन्वय घडून आला. त्यामुळे दोन्ही धर्मातील विचारवंत व संत यांनी परस्पर सामंजस्याची भूमिका घेतली. त्यातून भक्तिमार्ग चळवळीला गती मिळाली.

**५. सुफी पंथाचा प्रभाव :**

सुफी पंथातील संतांची जीवनपद्धती, त्यांची शिकवण, ईश्वर भक्ती, धार्मिक सहिष्णुता व कर्मकांडाला विरोध, यासारख्या विचारांचा परिणाम हिंदू समाजावर व हिंदू संतावर झाला. त्यामुळे भक्ती मार्गाला प्रेरणा मिळाली.

**३) भक्तीचे चळवळीचे स्वरूप/उद्देश :**

प्रत्येक प्राणीमात्रास भक्तीचा अधिकार आहे. मानवी जीवनाचे अंतिम ध्येय मोक्षप्राप्ती आहे. यासाठी

ईश्वराची उपासना करणे, नामस्मरण करणे हे भक्तीचे उद्दिष्टे आहे. परमेश्वराविषयी प्रेम म्हणजेच भक्ती होय. मध्ययुगीन भक्ती आंदोलनाने यज्ञयाग, कर्मकांड याऐवजी भक्तीमार्गावर अधिक भर दिला. त्यासाठी पुढील उद्देश निश्चित केले होते.

१. एकेश्वरवादाचा पुरस्कार करणे.

२. धार्मिक तत्वांना व्यावहारिक स्वरूप प्राप्त करून देणे.

३. धार्मिक तत्वज्ञान सामान्य लोकांपर्यंत बोली भाषेतून पोचविणे.

४. धर्मातील कर्मकांड, अंधश्रद्धा नाहीशी करण्यासाठी प्रयत्न करणे.

५. धार्मिक सहिष्णुता निर्माण होण्यासाठी योगदान देणे.

६. ईश्वर भक्तिसाठी भक्तिमार्गाची ओळख करून देणे.

७. परमेश्वराशी एकरूप होणे व आत्म्याचा परमात्म्याशी संयोग घडविणे.

इस्लामचा उदय व हिंदुस्थानातील मुस्लिम सत्तेची स्थापना यामुळे भक्ती चळवळीला चालना मिळाली. इस्लामचा एकेश्वरवाद व मुर्तिपूजेला विरोध व सामाजिक समतेचे धोरण यामुळे हिंदु समाजातील निम्न वर्ग (बहुजन वर्ग) इस्लामकडे आकृष्ट होणे स्वाभाविक होते. अशा परिस्थितीत आपला धर्म आणि समाज व्यवस्थ्ज्ञा या सुधारणा करून धर्मांतर थांबवणे हे भक्ती चळवळीतील सुधारकांचे एक मुख्य उद्दिष्ट होते.

**४) भक्तीमार्ग चळवळीतील प्रमुख संत :**

शिव आणि विष्णू या दोन देवतांच्या नावे शैव व वैष्णव हे दोन पंथ उदयास आले. विविध संताच्या प्रभावी विचारांमुळे व मार्गदर्शनामुळे ही भक्तीची चळवळ सुरू होती. संत रामानंद किंवा रामानुजाचार्य यांना भक्तिमार्गाचे जनक मानले जाते. ब्रम्ह आणि आत्मा हे वेगवेगळे आहेत असे मत मांडून विशिष्ट द्वैतवादाचा प्रसार केला. निंबकाचार्य यांनी कृष्ण भक्तीचा पुरस्कार केला. माधवाचार्य यांनी विष्णूंची उपासना करून द्वैतवादाचा प्रसार केला. चल्लभाचार्य हे पुष्टीमार्गाचे संस्थापक होते. कृष्णाला ते परब्रम्ह व आनंद स्वरूपात पाहतात. चैतन्य महाप्रभू हे बंगालमधील भक्तिमार्ग चळवळीचे प्रमुख प्रवर्तक होते. त्यांनी कृष्ण भक्तीचा संदेश जनतेला दिला. महाराष्ट्रात गोविंदप्रभू यांनी 'महानुभाव' संप्रदायाची स्थापना केली. 'गीता' व 'भागवत' या ग्रथांना महानुभाव पंथीय पुज्य मानतात. श्रीचक्रधरस्वामी हे या पंथातील सर्वात प्रसिद्ध संत असून त्यांनी लिहिलेला 'लिळाचरित्र' हा ग्रंथ त्यांचे जीवन चरित्र आहे.

भागवत / वारकरी संप्रदायाचा पाया महाराष्ट्रात संत ज्ञानेश्वरांनी घातला. सोळाव्या वर्षी त्यांनी भगवतगीतेवरील 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ मराठी भाषेत लिहिला. त्यांच्याच काळात वारकरी संप्रदायाचे आराध्य दैवत पंढरपूरच्या विठ्ठलाने संपूर्ण महाराष्ट्राला भक्तीचे वेड लावले. संत नामदेवांनी महाराष्ट्राप्रमाणेच राजस्थान, पंजाब व हरियाणा या भागात 'भागवत' संप्रदायाचा प्रसार केला. त्यांनी हिंदी व मराठी भाषेत हजारो अभंग रचले. कर्मकांड व जातपात यास विरोध केला. या परंपरेत एकनाथ, तुकाराम, गोरा कुंभार, सावता माळी, जनाबाई, मुक्ताबाई, बहिणाबाई अशा अनेक संतांनी वारकरी संप्रदायाचा प्रसार केला.

धारकरी (रामदासी) भक्ती संप्रदायाची स्थापना समर्थ रामदासांनी केली. रामदासांनी सत्य, अहिंसा, नम्रता यावर भर दिला. या संप्रदायाचे आराध्य दैवत राम आहे. रामानंदानी उत्तर भारतात भक्तिपंथ पोहोचविला व रामभक्तीचा महिमा वर्णिला. रामानंदाच्या प्रसिद्ध १२ शिष्यांमध्ये संत रविदास व संत कबीर यांचा समावेश होतो. सिकंदर लोदी या सुलतानाच्या काळात संत रविदास(संत रोहिदास) होऊन गेले. त्यांनी समाजातील उच्चनीच, जातपात, जातीभेद, वर्णभेद, धर्मभेद, पंथभेद, मुर्तिपूजा, कर्मकांड इत्यादींचा कडाडून विरोध केला. जन्माने कोणीही उच्चनीच नसतो तर तो कर्माने होतो. परमेश्वर एक आहे. निरनिराळ्या जाती धर्मासाठी परमेश्वर निरनिराळा असू शकत नाही. सर्व माणसे एकाच परमेश्वराची लेकरे आहेत. अंतर्मुखी पुजा हीच परमेश्वराची खरी पुजा होय. नामभक्ती हीच खरी जीवनसाधना अशी रोहिदासांची शिकवण होती. सामाजिक समता, मानवताधर्म, लोककल्याणकारी समाज व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी भक्ति आंदोलनाच्या माध्यमातून सामाजिक क्रांती निर्माण केली.

अशा अनेक संताच्या कार्यामुळे भक्ती चळवळ नावारूपास आली. भक्ती चळवळीतील विविध संतापैकी संत कबीर यांच्या कार्याची ओळख पुढीलप्रमाणे.

**अ) संत कबीर :**

**१) प्रारंभिक जीवन :**

कबीराच्या मातापित्याबद्दल निश्चित अशी माहिती उपलब्ध नाही. अशी कथा सांगितली जाते की एका विधवा ब्राम्हण स्त्रीच्या पोटी त्यांचा जन्म काशी येथे झाला. तिने लोकभयास्तव त्या मुलाला एका तलावाकाठी सोडून दिले. परंतु नीरू व नीमा नावाच्या एका मुसलमान विणकर (जुलाहा) दांपत्याने त्यांचे पालनपोषण केले. अशा प्रकारे ब्राम्हण स्त्रीच्या पोटी जन्म घेऊन मुसलमान कुटूंबात त्यांचे संगोपन सुरू झाले. कबीराच्या पत्नीचे नाव लोइ होते. त्यांना कमाल व कमाली या नावाची दोन मुले होती. कबीराने विणकर बनूनच आपले आयुष्य काशीमध्ये घालविले. त्या भागास 'कबीर चौराहा' म्हणून ओळखले जाते.

**२) ईश्वर भक्ती :**

कबीरांनी रामानंदाकडून प्रेरणा घेऊन त्यांचे शिष्यत्व पत्करले. त्यांना लिहिता वाचता येत नव्हते. परंतु सत्संगामुळे त्यांनी अपार ज्ञान संपादन केले. कबीर हे हिंदू की मुसलमान याबाबत वाद आहेत, मात्र ते श्रीरामाचे उपासक होते. परंतु ते स्वतः म्हणतात, परमेश्वर निर्गुण निराकार आहे. तो स्थूल नाही, दृश्य नाही की अदृश्य नाही. परमेश्वर हा सृष्टीचा निर्माता आहे. उत्कट भक्तीद्वारे ईश्वराप्रत जाता येते. प्रेम व भक्तीद्वारे मोक्ष मिळविता येतो. भक्तीशिवाय धर्म हा धर्मच नाही असे कबीर म्हणतात.

**३) शिकवण :**

कबीर हे क्रांतिकारी संत होते. कर्मकांड, तीर्थे, मुर्तिपूजा, जातीयता या गोष्टीला त्यांनी कडाडून विरोध केला. त्यांनी एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. काम, क्रोध, मोह, मत्सर यापासून जो दूर राहतो तो परमेश्वराच्या

जवळ जाण्यास पात्र ठरतो. ईश्वरप्राप्ती ही कोणाची मक्तेदारी नाही तो सर्वांचा अधिकार आहे. कबीरांनी टीका केली आहे. श्रम प्रतिष्ठेला कबीरांनी महत्वपूर्ण स्थान दिले आहे. ईश्वराचा परमभक्त होण्यासाठी व्यक्तीने विकारांपासून दूर राहून आपले चारित्र्य स्वच्छ ठेवावयास हवे. जीवात्मा हा परमात्म्याशी एकरूप होतो. यासाठी कबीर समुद्र आणि त्यावरील तरंग यांचा नेहमी दाखला देतात. तरंग जसा समुद्राशी एकरूप होतो तसा जिवात्मा परमात्म्याशी तादात्म्य पावतो. मन परित्र नसेल तर तीर्थयात्रा निरूपयोगी ठरते.

**४) हिंदू मुस्लिम समन्वय :**

भक्तीमार्ग आणि सुफी विचार या दोहोंचाही त्यांच्यावर प्रभाव पडला आणि या दोहोंच्या समन्वयातून त्यांनी निर्गुणतेचे विचार मांडले. हिंदू मुस्लिम दोन्ही धर्मातील समान तत्वावर कबीरांनी भर दिला. त्यांच्या मते मक्का हे खरोखरच काशी आहे आणि राम हा रहीम झालेला आहे. अशा विचारांमुळे हिंदु व मुस्लिमांमधील कट्टर धार्मिकता कमी होण्यास मदत झाली. वेद, पुराण, कुराण ही एकच ईश्वराची विविध प्रकारे केलेली वर्णने आहेत. स्वतः रामाचा परमभक्त असतानाही हिंदू-मुस्लिम असा भेद त्यांनी केला नाही. जे नमाजात आहे ते पुजेतही आहे. सत्यस्वरूप परमात्मा महादेवही आहे व मोहम्मदही आहे.

**५) कबीराचे साहित्य किंवा रचना :**

मध्ययुगीन भारतात एक सर्वश्रेष्ठ संत म्हणून कबीरांस ओळखले जाते. कबीराच्या रचना उत्कृष्ट आहेत. त्यांनी ब्रज व हिंदी भाषेत उपदेश व रचना केल्या. त्यांच्या रचनेला शब्द, वाणी, वचन, उपदेश अशी नावे दिली आहेत. त्यांची साखी प्रसिद्ध आहे. त्यांची वाणी ओजस्वी, निर्भिड व स्पष्ट आहे. त्यांच्या वचनांना संकलित करण्यात आले आहे. त्याला 'बिजक' म्हणतात. कबीराचे दोहे प्रसिद्ध आहेत गुरू रामानंद यांच्यावरील प्रेमाबद्दल ते म्हणतात.

काशी में हम प्रकट भये है रामानन्द चताये ।
काशी में किरती सून आई, कबीर मोहि कथा बुझाई ।।

हिंदू मुस्लिम ऐक्याविषयी विचार प्रकट करताना म्हणतात.

भाई रे दुई जगदीश कहा, से आया, वह कौन बौराया ।
अल्ला, राम, रहीम, केशव, हरी हजरत नाम धराया ।।

मन पवित्र नसेल तर तीर्थयात्रा निरूपयोगी ठरते हे सांगताना म्हणतात,

मन मथुरा, दिल द्वारिका, काया कासी जान ।
इस द्वारे का देहरा, तापे प्रेति पिछाना ।।

धर्मदास या शिष्याने बीजक हा कबीरांच्या काव्यांचा ग्रंथ निर्माण केला तर दुसरा संग्रह, काशीमधील नागरी प्रचारिणी सभेत तयार केला आहे.

**६) कबीर पंथ :**

संत कबीरांनी सर्व आयुष्यभर मानवमात्रासाठी कार्य केले. त्यांनी मानवता हाच खरा धर्म मानला. कबीरांचे शिष्य धर्मदास, चत्रभुज, बंकेजी व सेहतजी यांनी कबीरांच्या विचारांच्या प्रसारासाठी कबीर पंथ उदयास आणला. पुढील काळात पंथाच्या अनेक शाखा निर्माण झाल्या. त्यात प्रामुख्याने धर्मदासी, भगताही, साहेबदासी, जीवा यांचा उल्लेख होतो. यात प्रत्येकाचा कारभार पाहण्यासाठी महंत नेमला जातो व त्या माध्यमातून कबीरांच्या विचारांचा, उपदेशाचा, सिद्धांताचा प्रसार केला जातो. उत्तर भारतात या पंथाचा प्रसार वेगाने झाला. स्वामी परमानंद रचित 'कबीर मन्शुर' हा कबीर पंथीयांचा आपल्या प्रचारासाठी अनेक ठिकाणी मठाची निर्मिती केली. स्त्रियांनाही पंथामध्ये प्रवेश होता. या पंथाची एक आचारसंहिता होती त्यात पुढील विचाराचा समावेश होतो. मुर्तिपूजा वर्ज्य, ईश्वराचे नामस्मरण करावे, ईश्वरी भक्तीचा अधिकार सर्वांना, भेदभाव टाळावे, हिंदु, मुस्लिम सर्वांना पंथात प्रवेश आहे. एकंदरित संत कबीरांच्या कार्यामुळे धर्मभेद व जातिभेद यांना धक्का बसला व सर्व मानवजात एक आहे ही शिकवण समाजात रुजविली गेली.

**७) भक्तिमार्ग चळवळीचे परिणाम :**

सर्वसाधारण माणसातील दोष नष्ट करण्यासाठी भक्तीमार्ग निर्माण झालेला होता. ती लोकांची चळवळ होती व त्यामुळे सर्वसाधारण लोकात भक्तीमार्गाबाबत मोठ्या प्रमाणावर आस्था निर्माण झालेली होती. बुद्ध धर्मानंतर अतिशय लोकप्रिय झालेली चळवळ म्हणून आपल्याला भक्तीमार्गाचे नाव घ्यावे लागेल. त्याचा भारतीय जीवनावर काय परिणाम झाला ते पाहणे आवश्यक ठरते.

१. भक्तीमार्ग पंथाने समाजातील ढोंग, धर्माचे बाह्य अवडंबर, मूर्तीपूजा, व्रतवैकल्ये, जातिभेद, मद्यपान इत्यादी वाईट गोष्टींचा निषेध केला आणि अंतःकरणाच्या शुद्धतेवर जास्त जोर दिला. त्यामुळे सामाजिक सुधारणेला उत्तेजन मिळाले.

२. ज्या ज्या ठिकाणी भक्तिमार्ग जाऊन पोहोचला त्या त्या ठिकाणी एकतेची भावना निर्माण झाली. पंजाब, महाराष्ट्र, बंगाल, गुजरात इत्यादी प्रदेशात ऐक्याची भावना निर्माण झाली. स्वतःच्या संस्कृतीचा आणि धर्माचा अभिमान वाढीस लागला.

३. हिंदु-मुस्लिम धर्मांना एकमेकांना जवळ आणण्याचे महत्वाचे कार्य भक्तीपंथाने केले. दोन्ही धर्मातील कटुता त्यामुळे बरीच कमी झाली.

४. भक्तिपंथातील सर्व साधुसंत उत्तम प्रकारचे साहित्यिक आणि कवी होते. आपला भक्तिपंथ सर्वसाधारण लोकांना कळावा म्हणून त्यांनी लोकांच्या भाषेतून प्रादेशिक-भाषेतून आपले वाङ्मय निर्माण केले. त्यामुळे भारतीय साहित्यात अद्वितीय भर पडली.

५. मुस्लिम राज्यकर्त्यांनी हिंदूवर जे अनन्वित अत्याचार केले त्याचा विसर काही काळ का होईना भक्तीपंथामुळे हिंदू जनतेला पडू शकला, म्हणूनच काही लोकांनी भक्तिपंथ म्हणजे एक पलायनवाद होता असे म्हटलेले आपल्याला आढळून येते, परंतु ही टीका तितकीशी बरोबर नाही.

६. भक्तिमार्गातील व सुफी पंथातील संतांनी जातीय व्यवस्थेचा तीव्र निषेध केला व ईश्वराच्या दरबारात कसल्याही प्रकारचा भेदभाव नसतो अशी शिकवण दिली. त्यांच्या या शिकवणुकीमुळे सर्व जातींना समतेची वागणूक मिळू लागली.

**ब) शीख धर्म व गुरूनानक :**

भारतीय समाजातील होमहवन, कर्मकांड, जातीयता, तीर्थयात्रा व जातीभेद या सर्व बाबींना विरोध करून इस्लामी आक्रमण व धार्मिक कट्टरता याला तोंड देण्यासाठी पंजाब प्रांतात जो प्रभावी विचार मांडला गेला व त्या विचारांचा प्रसार करणारा जो पंथ निर्माण झाला त्यास 'शीख' म्हणतात. गुरू नानकांनी शीख धर्माची स्थापना केली. आपला उपदेश मानणाऱ्यांना ते शिष्य म्हणत. हाच शब्द पुढे 'सिख' म्हणजेच 'शिख' या रूपाने प्रसारित झाला. समतेचा विचार समाजात रूजविण्याचा प्रयत्न शीख धर्मगुरूंनी केला. शीख पंथाला गुरूंची परंपरा आहे. ही परंपरा गुरू नानकांपासून ते गुरू गोविंदसिंगापर्यंत असून दहा गुरू या पंथामध्ये झाले. त्यामध्ये गुरूनानक, गुरू अंगद, गुरू अमरदास, गुरू रामदास, गुरू अर्जुन, गुरू हरगोविंद, गुरू हरिराय, गुरू हरिकिशन, गुरू तेजबहादूर व गुरू गोविंदसिंग हे होत. 'ग्रंथसाहेब' हा या धर्माचा पवित्र ग्रंथ मानला जातो. गुरू नानकांच्या विचारांचे संकलन यात करण्यात आले आहे. गुरू अंगद यांनी सर्वप्रथम गुरूमुखी लिपीमध्ये लिहून काढले तेव्हापासूनच ही लिपी सुरू झाली.

**१) गुरू नानक (इ. स. १४६९–१५३९) :**

शीख धर्माचे संस्थापक आणि शिखांचे पहिले (आदिगुरू) गुरू हे भारतातील दिल्ली सुलतानशाहीच्या अखेरच्या कालखंडात होऊन गेले. त्यांनी व्यक्तिगत व सामाजिक आचरणातही सर्वधर्म समभाव प्रकट केले होते. त्यांच्या या कार्यामुळे त्यांना धर्मसुधारक, धर्मप्रवर्तक व धर्मसमन्वय साधणारे महापुरूष म्हटले जाते.

**२) जन्म बालपण व शिक्षण :**

सध्या पाकिस्तानात असलेल्या पंजाबमधील शेखुपूरा जिल्ह्यातील तलवंडी येथे २६ नोव्हेंबर १४६९ रोजी खत्री कुटुंबात त्यांचा जन्म झाला. त्यांची आई तृप्तीदेवी व वडील कालुचंद होते. बालपणापासून ते तीव्र बुद्धीचे व जिज्ञासू असल्याने शिक्षकांना विविध प्रश्न विचारत. त्यानंतर ते शाळा सोडून अध्यात्म, चिंतन आणि सत्संग यात जीवन व्यतीत करू लागले. लहानपणापासूनच त्यांना ईश्वराची ओढ होती. त्यासाठी ते रानावनात एकटेच भटकत असत. त्यांना हिंदू पंडित व मुस्लिम मौलवी विद्याभ्यास शिकवित असे.

**३) भ्रमण यात्रा, ईश्वर भक्ती व सत्कर्मावर भर :**

गुरू नानक यांनी पंजाब, हिंदी, संस्कृत, फारशी भाषांवर प्रभुत्व मिळवले होते. त्यांनी वयाच्या २७ व्या वर्षी सरकारी नोकरीचा आणि कुटुंबाचा त्याग करून जगात कोणीही हिंदू नाही किंवा कोणीही मुस्लीम नाही असा समानतेचा उपदेश करीत भ्रमण यात्रेस सुरूवात केली त्यांनी पाच वेळा देशाची भ्रमंती केली. पूर्वेला जगन्नाथपुरी, उत्तरेस काश्मिर काबूलपर्यंत, पश्चिमेला मक्का मदिनेपर्यंत आणि दक्षिणेस सिलोनपर्यंत गेले. या भ्रमंतीत त्यांना

अनेक साधुसंताचा सहवास लाभला. अनुभव, सहवास आणि चर्चेतून त्यांचे विचार पक्के होत गेले. त्यांना ज्ञानप्राप्ती झाली. त्यांनी पंजाब व पश्चिम भारतात आपल्या विचारांद्वारे भक्ती आंदोलनाचा प्रसार करण्याचे कार्य केले. ईश्वराचे भजन करा, जप करा असे ते सांगत आणि स्वतःही भजन करत गावोगावी फिरत असे. भक्ती का व कशी करावी हे सांगत. तीर्थयात्रा, मुर्तिपूजा, शरीरयातना, ईश्वरी नामाचा जप करणे निरर्थक आहे. ईश्वराला शरण जाणे हाच एकमेव मार्ग आहे. आत्यंतिक भोग व त्यागवाद या दोन्ही मार्गांचा त्यांनी निषेध केला. नानक काबूलमध्ये गेले असता बाबराशी भेट झाली. या भेटीत बाबराने त्यांना मद्य देवू केले. परंतु नानकांनी ते नम्रपणे नाकारले. मद्यापेक्षा भगवंताची भक्ती हे अधिक चांगले मद्य माझ्याकडे असल्याचे त्यांनी सांगितले.

**४) शीख धर्माचे संस्थापक, रचना व शिकवण :**

गुरू नानक शीख धर्माचे संस्थापक मानले जातात. त्यांच्या तत्वज्ञानाला, विचारांना व शिष्यांना 'शीख धर्म' असे म्हणतात. त्यांनी आपले आयुष्य धर्मप्रचारात व प्रवासात व्यतीत केले. ते दक्षिणेत सिलोनपर्यंत गेले. तेथेच त्यांनी 'प्राणसंगली' या ग्रंथाची रचना केली. 'जपूजी' म्हणजे शीख धर्माची भगवद्गीता. 'असा दी बार' या रचनेत नानकांनी ईश्वराची स्तुती केली आहे. सूर्योदयापासून रात्री झोपेपर्यंत दिवसातून ज्या वेगवेगळ्या प्रार्थना शीख मंडळी करतात त्या रहिदास, सोहिला वगैरे नावाने प्रसिद्ध आहे.

**५) गुरू नानकांची शिकवण :**

१. जातीवर माणसाचे श्रेष्ठत्व ठरू शकत नाही.

२. ईश्वराचे अखंड चिंतन करावे.

३. प्राणीमात्रांविषयी दयाभाव ठेवावा.

४. स्त्रियांना आदर व सन्मानाची वागणूक द्यावी.

५. जो सर्वांना समान लेखतो तोच खरा साधू.

६. ईश्वराच्या नावाचे भक्तिभावाने स्मरण केल्यास पुण्य मिळते.

७. सत्य हाच परमेश्वर आहे.

८. मूर्ती हे देवाचे खरे रूप नाही त्यामुळे मूर्तीपूजा करू नये.

९. शुद्ध आचरण ठेवा, अंधश्रद्धा, कर्मकांड, ढोंगीपणा व चमत्कार इ. चा निषेध करा.

अशा प्रकारे गुरू नानकाचे कार्य मानवजातीसाठी महत्वपूर्ण आहे. डॉ. ए. सी. बॅनर्जी म्हणतात, ''नानकांच्या चारित्र्यातील माधुर्य व त्यांच्या विचारांची प्रामाणिकता यामुळे त्यांना फार मोठा शिष्य परिवार लाभला. समाजाच्या सर्व थरातील लोक त्यांचाआदर करतात म्हणूनच गुरू नानक शाह फकीर, हिंदू का गुरू, मुसलमान का पीर या विशेषणांनी आजही नानकांचे स्मरण केले जाते.'' इ. १५३८ मध्ये गुरू नानकांचे निधन झाले. त्यांनी केलेला उपदेश आणि मार्गदर्शन समाजाला महत्वपूर्ण ठरले.

**६) शीख धर्माचे तत्वज्ञान :**

शीख धर्म हा गुरू परंपरा मानणारा धर्म आहे. या धर्मात निर्गुण, निराकार व एकमेव ईश्वर यावर भर दिला आहे. गुरू, गुरू ग्रंथसाहेब आणि गुरूद्वारा या तीन घटकात शीख धर्माचे तत्वज्ञान सामावलेले आहे.

**१. गुरू :**

ईश्वर म्हणजेच गुरू होय. तो प्रत्यक्ष ज्ञानज्योती होय. जीवनात सद्‌गुरू हाच खरा मार्गदर्शक होय. त्याच्या ज्ञानमार्गानेच ईश्वर प्राप्ती होते. गुरूचे महत्व स्पष्ट करताना गुरूनानक म्हणतात.

गुरू मेरी पूजा, गुरू गोविंद ।
गुरू मेरा परब्रम्ह, गुरू भगवंत ।।

जीवनात ज्ञान, कर्म, भक्ती व योग हे सर्व गुरूकृपेनेच साध्य होतात. प्रत्येकाने गुरूनिष्ठा बाळगली पाहिजे. गुरू हा ज्ञानमय असून त्याचे स्मरण हे परमार्थाचे साधन आहे. गुरूच्या मार्गदर्शनाने प्रपंचातून ईश्वरसेवा साधून आत्मसाक्षात्कार हे ध्येय गाठले पाहिजे. सदगुरूंच्या कृपेने ज्ञानप्राप्ती होते व ज्ञानातूनच मोक्ष गाठता येतो. अशा प्रकारे गुरूला सर्वाधिक महत्व दिले आहे.

**२. गुरूग्रंथ :**

शीख धर्माचा पवित्र ग्रंथ म्हणून 'ग्रंथसाहिब' किंवा 'आदिग्रंथ' या नावांनी ओळखला जातो. या ग्रंथास ज्योतिःस्वरूप मानतात. या ग्रंथाच्या आधारेच निती निर्धारित केली जाते. गुरू अंगद यांनी शिखांना मार्गदर्शन करण्यासाठी एखादा ग्रंथ असावा या दृष्टीकोनातून गुरू नानकांच्या वचनाचे संकलन करून त्यांची रचना सुरू केली. गुरू अर्जूनदेवाच्या काळात या ग्रंथाचे लेखन पूर्ण झाले. या ग्रंथात शीख संताप्रमाणेच संत नामदेव, संत रविदास, संत कबीर व संत सूरदास यांची पदे समाविष्ट करण्यात आली. या ग्रंथात पहिल्या पाच गुरूंची मिळून ४८३९ पदे आहेत. यातील गुरूनानकांची 'जपुजी' ही रचना सर्वश्रेष्ठ मानली जाते.

**३. गुरूवाणी किंवा गुरूबाणी :**

शीखांचे पहिले गुरू गुरूनानक यांची जी वचने संकलित करण्यात आली त्यास 'जपुजी' असे म्हणतात. या 'जपुजी' वर शीख बांधवांची खूप श्रद्धा आहे. 'गुरूग्रंथसाहिब' या शिखांच्या पवित्र धर्मग्रंथाचा प्रारंभच जपुजीने झाला आहे. या जपूजीच्या रचनेलाच 'गुरूवाणी' असे म्हणतात.

ओमकार सतिनामु करता परखु निरमड ।
निरवैरू अकाल मूरति अजून सैभगुरूप्रसादि ।।

ओमकार स्वरूप, सत्यरूप, अनादि, स्वयंभू, सृष्टीचा निर्माता अशा परमेश्वराच्या स्मरणाने व कृपेने आपल्या कामाची सुरूवात करूया असा या मंत्राचा अर्थ आहे. हाच गुरूवाणीतील पहिला मुलमंत्र आहे.

परमेश्वराचे नामस्मरण हेच खरे तप होय. नामस्मरण व सद्‌गुरूनिष्ठा हे ईश्वरसाधनेचे सर्वश्रेष्ठ साधन आहे

असे गुरूनानक सांगतात. संन्यासी व वैराग्य वृत्तीने केवळ परमार्थ प्राप्ती होत नाही तर संसार व समाजसेवा यातून सुद्धा ईश्वरसाधना घडू शकते. श्रम, स्वावलंबन, सहकार्य व सेवा या मुल्यांना गुरूनानकांनी अधिक महत्व दिले आहे. आपल्या कार्याला व्यवहाराची जोड दिली आहे. गुरूनानकांच्या शिकवणुकीत व्यक्तीच्या नैतिक, आध्यात्मिक सद्गुणांचा विकास, सदाचार याला महत्व आहे. ग्रंथसाहिब हा ग्रंथ साधुसंताच्या वाणीचे सारच आहे. त्यामुळे या ग्रंथाची प्रतिष्ठा व पवित्रता सातत्याने टिकून आहे.

**४. गुरूद्वारा :**

शीख धर्मियांचे प्रार्थना स्थळ म्हणजे गुरुद्वार होय. शिखांचे उपासना मंदिर म्हणून गुरूद्वारांचे विशेष स्थान आहे. शीख धर्मानुसार गुरूद्वारा हे परमेश्वराच्या निवासस्थानाकडे जाण्याचा दरवाजा आहे. इंश्वरी उपासनेद्वारे हा दरवाजा उघडला जातो. अशी शिखांची श्रद्धा आहे. गुरुद्वारात मुर्ती न ठेवता एका चौरंगावर 'गुरूग्रंथ साहिब' ची प्रतिष्ठापना केलेली असते. हा ग्रंथ रेशमी रूमालात ठेवलेला असतो. रोज सकाळी समारंभपूर्वक गुरूग्रंथ उघडतात. वाचन करून परत रूमालात ठेवतात. गुरू उपासना पहाटे पाच वाजल्यापासून सुरू होते. जपुजी, सुखमनी, आसादीवार, जाण व आनंद हे नित्याचे प्रातःकालीन पाठ असतात. पाठपठणांचा कार्यक्रम झाल्यानंतर प्रार्थना केली जाते. त्यात दहा गुरू, पंचप्यारे, चार गुरूमंत्र चाळीस मुक्त आत्मे व धर्म रक्षणासाठी ज्यांनी आत्मबलिदान केलेले हुतात्मा या सर्वांचे स्मरण करून प्रार्थना संपविले जाते. गुरूद्वारात भक्तांना डोक्यावर टोपी, फेटा किंवा रूमाल बांधावे लागते. स्त्रिया डोक्यावरून पदर घेतात. गुरूग्रंथाबद्दल आदर दाखविल्याचे ते प्रतीक असते. शीख धर्मात गुरू, गुरूग्रंथ, गुरूवाणी व गुरूद्वारा हे चार ईश्वर असून ती शीख धर्मीयांची आदरस्थाने आहेत.

**७) खालसा पंथ :**

इ.स. १६९९ मध्ये बैसाखीच्या शुभ मुहूर्तावर खालसा संघटनेची स्थापना गुरू गोविंदसिंग यांनी केली त्यालाच 'खालसा पंथ' म्हटले जावू लागले. मुघलांच्या आक्रमणाचा प्रतिकार करण्याच्या उद्देशाने व लढाऊ वृत्ती निर्माण करण्याच्या हेतूने खालसा पंथाची निर्मिती करण्यात आली. खालसा पंथातील अनुयायांना दीक्षा घेताना पाच प्रकारच्या कंकराचचा म्हणजेच (चिन्हांचा) स्वीकार करण्यास सांगितले त्यास 'पंचकंकार' म्हणतात. ते पुढीलप्रमाणे :-

१. केस – डोक्यावरचे व दाढीचे केस वाढविणे.

२. कंगी – केसांची योग्य निगा राखण्यासाठी कंगवा बाळगणे.

३. कच्छ – पायजमा गुडघ्यापर्यंत असावी.

४. कडे – धातूचे कडे हातात घालावे.

५. कृपाण – छोटी खंजीर किंवा दुधारी तलवार जवळ बाळगणे.

**८) तलवारीचे महत्व :**

खालसा पंथाच्या प्रत्येक शिष्याजवळ खंजीर किंवा तलवार बाळगणे आवश्यक मानले जाते. तलवार म्हणजे संतांचा रक्षण करणारा व दुष्टांचा नाश करणारा आहे. त्यामुळे त्याचा आश्रय घेणे आवश्यक आहे. खालसा पंथांनी भक्ती व शक्ती यांचा सहयोग घडवून आणला. त्यामुळे शीख धर्माला एक आध्यात्मिक व नैतिक अधिष्ठान प्राप्त झाले. धर्माचरणाबरोबरच राष्ट्रीय कर्तव्यालाही खालसा पंथाने महत्व दिले आहे. दीक्षा घेतल्यानंतरच खालसा पंथाचे सदस्य होता येते.

**९) खालसा पंथातील पंचप्यारे :**

इ.स. १६६६ मध्ये आनंदपूर येथे गुरू गोविंदसिंगानी उपस्थित जनसमुदायासमोर तलवार काढून धर्मासाठी बलिदान करण्याचे आव्हान केले. त्यास दयाराम, जगन्नाथ, सोहबचंद, धमरचंद व हिंमतराय या पाच जणांनी तयारी दर्शविली. त्या पाचही जणांना शीख धर्मात 'पंचप्यारे' म्हणून ओळखले जाते. हे पाच जण खत्री, जाट, परीट, न्हावी व कहार अशा पाच जातीचे होते.

**१०) खालसा पंथाचे आचारशास्त्र :**

खालसा संघटनेत सहभागी होवून दीक्षा घेणाऱ्या अनुयायांना आचाराचे पालन करण्याची प्रतिज्ञा घ्यावी लागत असे.

१. आपल्या डोक्याचे व दाढीचे केस कापणार नाहीत.

२. गरीबांना मदत करून अन्यायाविरूद्ध लढा द्यावा.

३. मादक पदार्थांचे सेवन करू नये.

४. एकेश्वर वादावर श्रद्धा ठेवून सर्वांना समान मानणे.

५. उच्चनीचतेला थारा न देता परस्परांशी बंधुभावाने वागावे.

**११) शीख धर्मातील मोक्ष कल्पना :**

शीख धर्मात शरीर, पुनर्जन्म, मोक्ष या संकल्पना मांडल्या आहेत. सर्व जीवात मनुष्यजन्म श्रेष्ठ आहे. अग्नीपासून ठिणग्या, मातीपासून कण वेगळे होतात. त्याचप्रमाणे ईश्वरापासून जीव अलग होवून विविध योनीत विभागले जातात व अखेरीस हे सर्व जीव एकाच परमेश्वराच्या चरणी लीन होतात. या जीवाला सुख, शांती व मोक्ष यांचा लाभ प्राप्त करावयाचे असल्यास पुढीलप्रमाणे वर्तन ठेवावे लागते.

१. अहंकाराचा त्याग करून स्वतःला ईश्वरचरणी अर्पण करावे.

२. निंदा स्तुती यापासून स्वतःला वेगळे ठेवावे.

३. संत संगतीत राहावे.

४. नीतीचे पालन करून मनाला सन्मार्गाने वागावे.

५. अवैध व्यवसाय टाळावे.

६. सत्य व ज्ञान प्राप्ती साठी प्रयत्न करणे.

७. भक्ती मार्गाचा अवलंब करून ईश्वरी उपासना करावी.

८. सद्गुरूंच्या उपदेशाप्रमाणे वागावे.

९. संसारात कमलपत्रा प्रमाणे रहावे.

१०. लोभ व मोह यापासून दूर रहावे.

वरीलप्रमाणे आचरण केल्यास मानव जन्म-मृत्यूच्या फेऱ्यातून मुक्त होतो. अशी शीख धर्मीयांची श्रद्धा आहे.

**१२) शिखांची तीर्थस्थळे किंवा चार तख्ते :**

प्रत्येक शीख बांधवांनी आपल्या उत्पन्नाचा १० वा हिस्सा धर्मकार्यासाठी द्यावा असे सांगितले आहे. भारतात चार गुरूद्वारा आहेत त्यांना शीख धर्माची चार तख्ते म्हणतात.

**१. अमृतसर :**

गुरू रामदासाच्या काळात तलाव खोदून ज्या शहराचा पाया घातला ते शहर म्हणजे अमृतसर होय. तलावाच्या मध्यभागी सुवर्ण मंदीर असून तेथे पवित्र धर्मग्रंथ 'ग्रंथसाहेब' ठेवण्यात आले आहे. अमृतसर हे केंद्रीय धर्मपीठ असून त्यास 'श्री अकाल तख्त' म्हणतात.

**२. पाटणा :**

शिखांचे पूर्वेकडील हे महत्वाचे धर्मपीठ आहे. पाटणा हे गुरू गोविंदसिंग यांचे जन्मस्थळ असल्यामुळे येथील गुरूद्वारा अत्यंत महत्वपूर्ण आहे.

**३. आनंदपूर :**

आनंदपूर येथे गुरू गोविंदसिंगानी खालसा संघटनेची स्थापना केली. त्यांचे वास्तव्य ही याच ठिकाणी होते. तसेच इ.स. १६६६ मध्ये खालसा पंथातील 'पंचप्यारे' यांना आनंदपूर येथेच दीक्षा दिली. त्यामुळे आनंदपूर हे महत्वाचे ठिकाण मानले जाते.

**४. नांदेड :**

नांदेड येथे शीख धर्मातील शेवटचे १० वे धर्मगुरू गुरूगोविंदसिंग यांची समाधी आहे. दक्षिणेकडील हे एक प्रमुख केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे.

याशिवाय लाहोर, दिल्ली, द्वारका, जगन्नाथपुरी, बिदर ही धार्मिक केंद्रे म्हणून ओळखली जातात. '२६ नोव्हेंबर' हा दिवस 'गुरू नानक जयंती' म्हणून साजरा करतात. तसेच 'दीक्षादिन' व 'बलिदान दिन' हे प्रामुख्याने शीख धर्मात साजरे केले जातात.

**१३) शीख धर्माचे योगदान :**

१६ व्या शतकात प्रारंभी गुरूनानक यांनी सर्वधर्म समभावावर आधारित पंथाची स्थापना केली. हिंदू धर्मातील कर्मकांड व बहुदेवतावाद याला विरोध केला. इस्लाम मधील कट्टरता व कडवेपणा याला विरोध करून हिंदू-मुस्लिमातील वैरभाव कमी करण्याचा प्रयत्न केला. हिंदू व मुस्लिम दृष्ट प्रवृत्तीविरूद्ध लढा देवून सज्जनांचे रक्षण करण्याचे कार्य या धर्माने केले. प्रसंगी धर्माबरोबरच राष्ट्र रक्षणासाठी प्राण अर्पण करण्यास तयारी असली पाहिजे अशी शिकवण दिली. संसार सांभाळतच मुक्तीच्या मार्गावर जाता येते असे विचार मांडले. गुरूग्रंथात हिंदू व मुस्लिम दोन्ही धर्मातील संताची पदे व वचने यांचा समावेश केल्याने खऱ्या अर्थाने ग्रंथ संकलनात समन्वय झाला आहे असेच मानावे लागेल.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. भारतातील सुफी पंथाचे जनक ............. यास ओळखले जाते.

अ) अलीबीन उस्मान ब) ख्वाजा बन्दे नवाज क) बाबा फरीद ड) शेख मसूद

२. अजमेर हे ............. संप्रदायाचे प्रमुख केंद्र होते.

अ) फिरदौसिया ब) चिश्ती क) कादिरीया ड) नक्शबंदी

३. दक्षिण भारतातील ............. हे सुफी संत विशेष प्रसिद्ध होते.

अ) बाबा फरीद ब) शेख निजामउद्दीन क) गेसुदराज ड) शेख कामी

४. भक्तिमार्गाचा जनक म्हणून ............. यांना ओळखले जाते.

अ) वल्लभाचार्य ब) रामानुजाचार्य क) निंबकाचार्य ड) माधवाचार्य

५. संत कबीर हे ............. व्यवसाय करीत असत.

अ) सुतार ब) सोनार क) विणकर ड) लोहार

६. वारकरी संप्रदायाचा पाया ............. यांनी घातला.

अ) संत तुकाराम ब) संत ज्ञानेश्वर क) संत एकनाथ ड) संत नामदेव

७. ............. हा शीख धर्माचा पवित्र ग्रंथ मानला जातो.

अ) कुराण ब) बायबल क) ग्रंथसाहेब ड) वेद

८. खालसा पंथाची स्थापना ............ यांनी केली.

अ) गुरु गोविंदसिंग ब) गुरू रामदास क) गुरू अर्जुनदेव ड) गुरु नानक

९. ............ हे दक्षिणेकडील शीख धर्माचे प्रमुख केंद्र म्हणून प्रसिद्ध आहे.

अ) अमृतसर ब) आनंदपूर क) पटणा ड) नांदेड

१०. शीखगुरु गोविंदसिंग यांचे ............. हे जन्मस्थळ आहे.

अ) अमृतसर ब) पाटणा क) आनंदपूर ड) नांदेड

### ४.३.२ मध्ययुगीन हिंदू आणि मुस्लिम समाज :

सुलतानशाही कालखंडात हिंदू व मुसलमान हे समाजातील दोन प्रमुख वर्ग होते. शासनकर्ते इस्लाम धर्मीय असल्याने इस्लामला राजधर्म म्हणून मान्यता होती. या दोन्ही समाजाचे रितीरीवाज, राहणी, खानपान, उपासना पद्धती व भाषा परस्पर भिन्न होती. मुस्लीमांना अनेक सवलती प्राप्त होत. हिंदूना साधे नागरिकत्वाचे हक्क मिळत नसे. कारण दोन्ही वर्गाचे संबंध हे शासक आणि शासित असेच होते. परिणामी दोन्ही वर्गात कटुता निर्माण झालेली होती. मध्ययुगीन भारतातील हिंदू व मुस्लिम समाजाची माहिती पुढील प्रमाणे.

**अ) हिंदु समाज :**

**● हिंदू समाजातील वर्ण व जाती व्यवस्था :**

प्रारंभी हिंदू समाजरचना वर्ण व्यवस्थेवर आधारित असून नंतर जाती व्यवस्थेत त्याचे परिवर्तन झाले. समाजरचनेत ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र हे चार वर्ण होते. सुलतानशाहीत जाती व्यवस्था बळावली होती. समाजात अनेक जाती व पोटजाती होत्या. इब्न बतुताने हिंदू समाजव्यवस्थेत जातीप्रथा कडक असल्याचा उल्लेख केला आहे. ब्राम्हणांना समाजात तात्विक दृष्ट्या महत्व व पहिले स्थान होते. परंतु राजकीय व आर्थिक क्षेत्रात त्यांनी आपले स्थान गमावले होते. त्यांची जागा आता रजपूत क्षत्रियांनी घेतली होती.

वैश्य वर्ण हा आपला मुळचा व्यवसाय व्यापार करत होता. वैश्य समाजात सावकार, वाहतूक व ठोक व्यापारी यांचा समावेश होता. साहू लोक सावकारी करीत होते. विविध जातीतील लोक आपल्याच जातीचा व्यवसाय करीत. हिंदू समाजाच्या खालच्या वर्गात लोहार, सोनार, सुतार, विणकर, शिंपी, तेली, कुंभार, न्हावी, चांभार तसेच विविध व्यवसाय काम करणारे भूमीहीन मजूर होते. जाती बहिष्कृत स्थिती शोचनीय होती व त्यांच्याकडे तिरस्काराने पाहिले जाई.

दक्षिणेतील ब्राम्हणांनी मात्र मुलकी व लष्करी विभागात अत्युच्च स्थान मिळविली होती. क्षत्रियातील अनेक लोक नायक होते. दक्षिणेत काही कारागीर, जाती जमाती वेगळ्या निर्माण झाल्या होत्या. लोहार, सोनार, पितळेचे काम करणारे, सुतार आणि मुर्तीकार यांना 'पांचाल' म्हणत. आंध्र प्रदेशात त्यांना 'पांचाहन' म्हणत. दक्षिणेत ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि त्यांच्या उपजाती वगळून इतर जातींची वलंगै (उजव्या हाताच्या जाती) आणि इडंगै

(डाव्या हाताच्या जाती) असे दोन विभाग होते. थोडक्यात हिंदू समाजाचे जातीव्यवस्थेमुळे तुकडे झाले होते.

**२) हिंदू समाजाची स्थिती अत्यंत वाईट व हलाखीची :**

सुलतानांचा धर्मवेडेपणा, आक्रमकता व विध्वंसक धोरणामुळे हिंदूवरील अन्याय व अत्याचार वाढले. त्यामुळे त्यांची स्थिती अत्यंत वाईट व हलाखीची होती. सुलतानशाही काळात हिंदूंना 'झिम्मी' या नात्याने जिझिया कर भरावा लागत असे. हिंदूंच्या कत्तली करणे, हिंदू स्त्री पुरूषांना कैद करून गुलामांच्या रूपाने विक्री करताना मुस्लीम शासक व अमिरांना अजिबात खंत वाटत नसे. बर्नीच्या मते, 'अल्लउद्दीन खिलजीच्या काळात हिंदूना आपल्या उत्पन्नाचा ५० टक्के भाग कर म्हणून द्यावा लागत होता. तुर्की सुलतान व त्यांचे सरदार हिंदू सुंदर मुलींशी जबरदस्तीने लग्न लावत असे'. या शिवाय अन्यविविध प्रकारचे कर व यातनामुळे हिंदू समाज हा दरिद्री अवस्थेला पोहचला होता. याविषयी बरनी म्हणतो की, 'चौधरी, खोत, मुकादम या हिंदू अधिकाऱ्यांची स्थिती अशी दारूण झाली होती की, त्यांच्या बायकांना गरिबीमुळे पोट भरण्याकरिता मुसलमानांच्या घरी मोलमजुरीची, हलकीसलकी कामे करावी लागत होती. यामुळे हिंदू समाजाची स्थिती अत्यंत दयनीय होती.

**३) हिंदू समाजात दुष्ट चालीरीती व प्रथा :**

हिंदू समाजात पूर्वीपासून चालत आलेले अनेक दोष या काळात अधिक तीव्र झाले. जातीभेदाची भावना वाढीस लागून जातीय संस्था अधिक तीव्र बनल्या. हिंदू समाजात बहुपत्नीत्व, जादूटोणा व चमत्कार, सतीची चाल, पडदा पद्धती, हुंडापद्धती, बालहत्या, गुलामगिरी, बालविवाह, देवदासी, अशा विविध दृष्ट चालीरिती व प्रथा सुरू होत्या.

**४) गुलामगिरीची प्रथा :**

हिंदू व मुस्लीम समाजात ही प्रथा होती. सुलतानशाहीच्या काळातील ही प्रथा मानवजातीसाठी शाप होती. बर्नीच्या मते, एका दास व दासीची किंमत ५०० ते १०० टंका होती. जनावराप्रमाणेच गुलामांची खरेदी विक्री चालत असे. मुस्लीम व हिंदू समाजात गुलामांचे स्वतंत्र वर्ग अस्तित्वात होते. निकोलो डी कौंटीच्या मते, 'विजयनगर राज्यात गुलामांची संख्या खूप मोठी होती'. महाराष्ट्रात पुरूष गुलामाला 'पोरगा' तर स्त्री गुलामाला 'कुणबीण किंवा बटिक' असे म्हणत. स्त्री गुलामांचा व्यापार मोठा चालत असे. पाटण, गुजरात आणि खानदेश मधून गुलाम आणून त्यांची विक्री करत असत.

**५) कुटूंबपद्धती :**

हिंदू व मुस्लीम धर्मामध्ये कुटूंब व्यवस्थेला महत्व होते. हिंदू समाजात संयुक्त व पितृसत्ताक कुटूंबपद्धती अस्तित्वात होती. कुटूंब संस्थेचा मुख्य कणा म्हणजे विवाह होय. कुटूंबातील जेष्ठ पिता किंवा पुरूष गृह प्रमुख असे. कुटूंबात स्त्रियांना दुय्यम स्थान असे. वर निवडीचे वधूंना स्वातंत्र्य नव्हते. विवाहबाबत करार होत असत.

**६) हिंदू स्त्रियांची स्थिती :**

हिंदू समाजात मुलगी जन्माला येणे अशुभ मानले जाई. स्त्रीच्या सुरक्षिततेतून बालविवाहाची प्रथा सुरू झाली

असावी. मुलींचे लहान वयातच (८ वर्ष) विवाह लावून देण्यात येई. उच्च वर्णातील हिंदू स्त्रिया बुरखा धारण करीत असत. त्यांना धार्मिक सण, उत्सवात महत्वाचे स्थान होते. स्त्रिला बालवयात पिता, तारूण्यात पती, बृद्धपणी मुलांच्या आज्ञेनुसार वागावे लागत होते. विधवा विवाहांना मान्यता नव्हती. त्यामुळे त्यांची स्थिती वाईट होती. विधवा स्त्रियांवर अनेक बंधने होती. केशवपन, सती अशा अनिष्ठ प्रथांमुळे विधवा स्त्रियांचे जीवन नरक बनले होते. सलतनतकाळात हुंडापद्धती होती.

स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार फारसा नव्हता. बदायुनीच्या मते, 'बाजारात मोकळेपणाने फिरणाऱ्या तरूण स्त्रियांना वेश्या बनण्यासाठी विवश केले जात असे.' इब्न बतुताच्या मते, सलतनतकाळात स्त्रियांना समाजात सन्मान होता, 'त्यांना शिक्षण दिले जात असे. परंतु कन्येचा जन्म ही अशुभ घटना समजली जात असे. स्त्रियांना स्वातंत्र्य नव्हते'. अमीर उमराव घराण्यातील स्त्रियांना गायन, नृत्य, वाद्यवृंदाचे शिक्षण दिले जात असे. विजयनगरच्या राज्यात उमराव वर्गातील स्त्रिया अंतःपुरात बंदिस्त असत.

**७) सती व जोहार :**

उत्तर व दक्षिण भारतात ही पद्धत रूढ होती. समकालीन प्रवाशांचे वृत्तांत आणि सर्व देशभर पसरलेले सतीचे दगड यांची साक्ष देतात. राजस्थानमध्ये 'जोहार' पद्धत मर्यादित होती. उदा. अल्लाउद्दीन खिलजीने इ.स. १३०१ मध्ये रणथंबोरच्या किल्ल्याला वेढा दिला. आपला पराभव होणार असे दिसताच हिंदू राजाने अग्नी पेटविला त्याच्या सर्व स्त्रियांनी त्यामध्ये उडी घेवून जोहार केला तसेच इ.स. १३०३ मध्ये मेवाडचा राजा रत्नसिंह याची सौंदर्यवती पत्नी राणी पद्मिनीने चितोड किल्ल्यावर इतर स्त्रियांसह जोहार केला.

**ब) मध्ययुगीन मुस्लिम समाज :**

दिल्ली सुलतानशाहीच्या काळात राज्यकर्ता वर्ग मुसलमान असल्याने त्या लोकांनाच सर्व सुखसोई, सवलती व उच्चपदे इ. प्राप्त होत. भारतात मुस्लीम सत्ता स्थापन झाल्यावर अनेक वर्ग तयार झाले. त्यामध्ये अमीर, उमराव, जमिनदार, काझी, उलेमा, व्यापारी, शेतकरी, वैद्य, कारागीर असे विविध वर्ग होते.

१) सुलतानशाहीकालीन मुस्लीम समाजरचनेची वर्ग विभागणी आपणास स्थुलमानाने पुढीलप्रमाणे करता येईल.

**अ) अहल-ए-दौलत (सत्ताधारी वर्ग) :** सुलतान, राजपरिवार, नातेवाईक, परकीय मुसलमान, उमराव, सरदार, जहागिरदार व जमिनदार, अल्तमशने स्थापन केलेली चाळीसगनी संघटना इ.चा समावेश होता.

**ब) अहल-ए-सादत किंवा अहल-ए-कलम (बुद्धिजीवी व सांस्कृतिक वर्ग)** : श्रीमंत, अमीर उमराव, बुद्धिजीवी, काझी, उलेमा, सय्यद, साहित्यिक, धार्मिक नेते, मोठे व्यापारी इ. चा समावेश होता.

**क) सैनिक(अहल-ए-सैपक) व विविध व्यावसायिक कारागीर वर्ग :** मिठाईवाले, हलवाई, खाटिक, सोनार, लोहार, सुतार, कुंभार, टोपी करणारे, गवळी इ. व्यावसायिक कारागिरांचा समावेश होता.

**ड) शेतकरी व खालच्या थरातील बाटके :** मुसलमान हिंदूचा यात समावेश होता.

**इ)** शेतमजूर व गुलामांचा एक वर्ग होता.

**२) सरदार, अमीर, उमराव व प्रशासकीय अधिकारी यांचे विलासी जीवन :**

सुलतानशाहीत दिल्ली दरबारात समाजात या वर्गाचे मोठे वर्चस्व होते. हे सरदार लोक अरब, तुर्क, इराणी आणि अफगाण जातींचे होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे भरपूर जमिनी व अनेक सुखसुविधा होत्या. हे सरदार लोक दास व दासी बाळगत आणि चैनी व विलासी जीवन जगत असत. सुलतानावर देखील या वर्गाचे वर्चस्व होते. त्यामुळे सुलतान या सरदारांची मर्जी सांभाळून वाटचाल करित असे. नाही तर त्यांना सुलतान पदास मुकावे लागत असे.

**३) काझी व उलेमा वर्ग :**

सुलतानशाही काळात एक प्रमुख काझी असे. राजधानीत येणाऱ्या खटल्यांचा तो न्यायनिवाडा करीत असे. त्यांच्या हाताखाली शहरात व प्रांतात इतर काझी असत. प्रमुख काझीकडे 'सद्र-उस-सदुर', न्यायदाना बरोबरच धार्मिक खाते सोपवलेले होते. सुलतानावर काझींचा प्रभाव होता. मुस्लिम धर्मगुरूंना उलेमा म्हटले जात. धार्मिक परंपरेमध्ये सुलतानापेक्षा उलेमाला महत्वाचे स्थान होते. सर्व सुलतान राजकारणात उलेमांचा सल्ला घेत असत. उलेमांची धार्मिक, न्यायालयीन व शैक्षणिक क्षेत्रामध्ये मक्तेदारी होती. अनेक उलेमा हे इमान, खतीब, मुहलासिब, मुफ्ती व काझी म्हणून काम करीत.

**४) मुस्लिम समाजातील वांशिक गट व श्रेष्ठ-कनिष्ठ संकल्पना :**

मध्यकाळात अफगाण, तुर्क, अरब, इराणी, मुघल, मंगोल, ॲबेसिनियन इ. भारतात येऊन स्थिर झाले. काळाच्या ओघात मुसलमानात अबर, पर्शिय (इराणी), तुर्क, मंगोल, पठाण, भारतीय मुसलमान असे वांशिक गट निर्माण झाले. तरी हिंदूप्रमाणे जाती व्यवस्थेचे उग्र स्वरूप धारण केले नाही. मुस्लिमामध्ये शिया व सुन्नी हे दोन प्रमुख धर्मपंथ होते. त्यामुळे समाजात श्रेष्ठ-कनिष्ठ भेदभावाची संकल्पना रूढ होती. तर तुर्की सुलतान हे स्वतःला इतरांपेक्षा श्रेष्ठ समजत होते.

**५) मुस्लिम समाजातील कुटुंबपद्धती व स्त्रियांची स्थिती :**

मुस्लिम समाजात संयुक्त व पितृसत्ताक कुटुंबपद्धती होती. पिता हा कुटूंबाचा प्रमुख असे. घरकामासाठी दास-दासी ठेवण्याची प्रथा होती. मुस्लीम स्त्रियांना वडिलांच्या संपत्तीत भावाबरोबर समान वाटा मिळत असे. विवाह बाबतीत तिला दुय्यम स्थान होते. मुलीचा जन्म म्हणजे संकट मानले जात असे. लग्नामध्ये मुलीला भरपूर हुंडा दिला जात असे. सर्वच वधूपित्यांना हुंडा देणे शक्य होत नसल्याने फिरोजशहा तुघलकाने गरजू वधूपित्यांना मदत करण्यासाठी 'दिवाण-इ-खैरात' हे स्वतंत्र खाते सुरू केले होते. जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य नव्हते. बालविवाह व बहुपत्नीत्व पद्धत रूढ होती. घटस्फोट (तलाक) घेणे सोपे होते, पडदा पद्धती होती. मुस्लीम मुलींना शिक्षणाचा अधिकार नव्हता. विधवा मुस्लीम स्त्री पुनर्विवाह करू शकत होती. पतिव्रता स्त्रीला समाजात मान होता. मुस्लीम समाजातील स्त्रीचा दर्जा हा हिंदू स्त्रीपेक्षा खालावलेला होता. उच्च व मध्यम वर्गातील स्त्रियांना संगीत व नृत्यास मज्जाव होता. राजघराण्यातील व सरदार घराण्यातील काही स्त्रियांचे राजकारणात वर्चस्व होते. उदा. अल्तमश नंतर दिल्लीच्या गादीवर राज्य करणारी सलतनतकाळातील पहिली मुस्लीम स्त्री म्हणजे रझिया सुलतान ही होती.

**४) गुलामगिरी व इतर प्रथा :**

मुस्लीम समाजाचे गुलाम हे अविभाज्य अंग होते. गुलामांमध्ये स्त्री-पुरूष दोन्हीही गुलाम असत. हिंदू स्त्रियांना गुलाम बनविणे त्यांना भूषण वाटत असे. मध्यकाळात प्रत्येक सुलतान व अमीर अनेक गुलाम बाळगत असत. भारतातील आसाम मधील गुलाम हे ताकत व सहनशक्तीसाठी विशेष प्रसिद्ध होते. इब्न बतुताच्या मते, मुहंम्मद-बिन-तुघलक त्यांच्या उपरावांना व नातेवाईकांना गुलाम स्त्रिया भेट म्हणून पाठवत असे. मुसलमान गुलामांचे प्रामुख्याने विकत घेतलेला, भेट म्हणून मिळालेला, युद्धबंदी, व स्वतःला विकणारा हे चार प्रकार होते. फिरोजशहा तुघलकाकडे सर्वात जास्त गुलाम होते.

मुस्लीम समाजात दानधर्म करण्याची चांगली प्रथा अस्तित्वात होती. जुगार मदिरापान, द्युत क्रीडा व अफू प्राशन इ. अनिष्ट प्रथाही होत्या. काही शाही सुलतान मदिरा, बारूणी, वाद्य आणि संगीताचे भोक्त होते. ख्वाजा मोईनुद्दीन चिश्ती हे कव्वालीचे भोक्ते होते. कव्वाली हिंदू व मुस्लीमांमध्ये लोकप्रिय झाली. मध्यकाळात मुस्लीम समाजात उच्चभ्रूंचा खेळ म्हणजे चौगान (पोलो) हा होता. याशिवाय घोड्यावर बसणे, घोड्यांच्या शर्यती लावणे, शिकार आणि धनुष्यबाण चालविण्यात आपले कसब दाखविणे हे ही खेळ खेळले जात होते.

वरील प्रमाणे हिंदू व मुस्लीम समाजाची स्थिती दिसून येते.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - २**

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. ............ या प्रांतात स्त्री गुलामाला कुणबीण किंवा बटीक असे म्हणत.

अ) विजयनगर ब) महाराष्ट्र क) मलबार ड) गुजरात

२. ............ याने गरजू वधु पित्यांना मदत करण्यासाठी 'दिवाण-इ-खैरात' हे स्वतंत्र खाते सुरू केले.

अ) फिराजशहा तुघलक ब) महंमद तुघलक

क) बल्बन ड) अल्तमश

३. ............ सुलतान त्याच्या उमरावांना व नातेवाईकांना गुलाम स्त्रिया भेट म्हणून पाठवत असे असा उल्लेख इब्न बतुताने केला आहे.

अ) फिरोजशहा तुघलक ब) अल्लाउद्दीन खिलजी

क) सिकंदर लोदी ड) महंमद तुघलक

४. ............ या प्रांतात पुरुष गुलामाला 'पोरगा' म्हणत असे.

अ) महाराष्ट्र ब) विजयनगर क) मलबार ड) गुजरात

५. ............ याने 'चाळीसगनी संघटना' स्थापन केली होती.

अ) अल्लाउद्दीन खिलजी ब) अल्तमश

क) फिरोजशहा तुघलक ड) सिकंदर लोदी

६. दिल्लीच्या गादीवर राज्य करणारी सलतन काळातीलपहिली मुस्लीम स्त्री ............ ही होती.

अ) रझिया सुलतान ब) राणी पद्मीनी क) हमिदा बानू बेगम ड) चाँदबिबी

७. सुलतानशाही काळात राजधानीत येणाऱ्या खटल्यांचा ............ हा न्यायनिवाडा करीत असे.

अ) सरदार ब)अमीर क) काझी ड) उमराव

८. ............ या सुलतानाकडे सर्वात जास्त गुलाम होते.

अ) फिरोजशहा तुघलक ब) गियासुद्दीन तुघलक

क) मुहंम्मद तुघलक ड) अल्तमश

९. सुलतानशाही काळात हिंदूंना 'झिम्मी'या नात्याने ............ हा कर भरावा लागत असे.

अ) जिझिया ब) महसूल क) व्यापारी ड) यापैकी नाही

१०. सुलतानशाही काळात 'अहल-ए-सैपक' म्हणजे ............ यांचा एक वर्ग होता.

अ) सत्ताधारी ब) बुद्धिजीवी क) सैनिक ड) शेतकरी

### ४.३.३ मध्ययुगीन स्थापत्यकला (दिल्ली सुलतानशाही, विजयनगर व बहामनी)

मुस्लिम राज्यकर्त्यांनी राज्यविस्तार व धर्मप्रसाराबरोबरच सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रात आपला प्रभाव निर्माण केला. कला व स्थापत्यकलेच्या क्षेत्रात फार मोठी प्रगती केली. त्यांनी उभ्या केलेल्या इमारती, राजवाडे, मशिदी, कबरी व मनोरे इत्यादी भारतभर दिसून येतात. स्थापत्याच्या दृष्टीने मध्ययुगीन कालखंडात अभूतपूर्व प्रगती झाली.

इ.स. १२०६ ते १५२६ या सुलतानशाहीच्या कालखंडात दिल्लीवर गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद व लोदी वंशाचे राज्य होते. कुतूबुद्दीन ऐबक व अल्तमश यांनी कुतूबमिनारची उभारणी केली. याच काळात 'कुवत-उल-इस्लाम' मशीद बांधली गेली. अल्लाउद्दीन खिलजीने अलाई दरवाजाची उभारणी केली. सुलतानकाळात जोनपूर, फतेहबाद, हिस्सार-फिरोज, फिरोजाबाद या शहरांची उभारणी झाली. प्रत्येक वंशातील राज्यकर्त्यांनी भारतात अनेक वास्तूंची उभारणी केली.

सुलतानशाही काळात हिंदूची वास्तुकला ही प्रगतीच्या शिखरावर होती. मुस्लीम शासकांनी अनेक कारागिरांना भारतात आणले, त्यांनी भारतीय कलाकारांबरोबर अनेक वास्तू उभारल्या. भारतीय आणि इराणी शैलीच्या मिश्रणातून 'दिल्ली शैली' निर्माण झाली. मुस्लीमांनी विकसित केलेली इराणी शैली व येथील भारतीय वास्तू शैली

यांचे मिश्रण सुलतानशाहीच्या बांधकामात दिसूत येते. फर्ग्युसन हा प्रसिद्ध स्थापत्य शास्त्रज्ञ म्हणतो, ''दिल्लीच्या तुर्की सुलतानांनी भारतात वास्तुकलेच्या क्षेत्रात जी देणगी दिली त्यापेक्षा चांगली देणगी दुसरी कोणतीही असू शकत नाही.''

**● सुलतानशाही स्थापत्य शैलीचे वैशिष्ट्ये :**

१. उंच मिनार, लहान मोठे गोल घुमट व मेहराबयुक्त भव्य प्रवेशद्वार.

२. इमारती मध्ये विस्तृत पटांगण, जाळीदार नक्षीकाम व वेलबुट्टी.

३. कमळ पाकळीप्रमाणे लंबवर्तुळार कमानी.

४. बांधकाम लाल व संगमरवरी दगडांचा वापर.

५. वास्तू भोवती उद्यानांची निर्मिती.

६. सभामंडप, रंगीत विटा, खिडक्या, कोरीवकाम व सजावट इत्यादी.

सुलतानशाही स्थापत्य शैलीची महत्वपूर्ण वैशिष्ट्ये मानली जातात.

**अ) गुलाम कालखंडातील वास्तू (इ.स. १२०६ ते १२९०) :-**

**१. कुव्वत-उल-इस्लाम मशीद :**

सुलतानशाही काळातील कुतूबुद्दीन ऐबकने दिल्ली येथे बांधलेली ही पहिली इमारत (मशीद) होय. हिंदुच्या २७ मंदिरांची मोडतोड करून ते दगड मशिदीच्या इमारतीसाठी वापरले गेले. या मशिदीत हिंदु शिल्पे व नक्षीकाम दृष्टीस पडते. ही वास्तू भव्य व सुंदर असून तिला 'इस्लामची शक्ती' असे म्हटले जाते. पुढे अल्तमश व अल्लउद्दीन खिलजीने यात सुधारणा व वाढ केली. मशिदीच्या भिंतीवर कलात्मक मेहराब करून त्यावर कुराणातील वचने कोरलेली आहेत.

**२. ढाई दिन का झोपडा :**

कुतुबूद्दीन ऐबकने इ.स. १२०० मध्ये अजमेर येथे निर्माण केलेली ही दुसरी इमारत होय. ही इमारत चव्हाण वंशातील सम्राट विग्रहराज याने बांधलेली संस्कृत पाठशाळा होती. अल्तमशने या वास्तूचे सौंदर्यीकरणे केले. ही वास्तू केवळ अडीच दिवसात बांधली असा समज असला तरी प्रत्यक्षात बांधकामाला अडीच वर्ष लागली होती.

**३. कुतुबमिनार :**

या काळातील सर्वात लक्षणीय वास्तू म्हणजे दिल्ली येथे बांधलेली तिसरी वास्तू म्हणजे कुतूबमिनार होय. गुलाम वंशाचा व भारतीय मुस्लीम सत्तेचा संस्थापक कुतूबद्दीन ऐबकने इ.स. ११९९ मध्ये दिल्ली येथे कुतूबुद्दीन नावाच्या संताच्या स्मृतिप्रीत्यर्थ कुतुबमिनारच्या बांधकामास सुरूवात केली. सुलतान अल्तमशने ही वास्तू इ.स. १२१२ मध्ये पूर्ण केली. हा मनोरा पाच मजली असून त्याची उंची २३४ फूट उंच आहे. खालचे तीन मजले लाल दगडाचे असून त्यावर सुंदर नक्षीकाम आहे. वरचे दोन मजले संगमरवर व लाल दगडात आहेत. ही इमारत अतिशय

लक्षणीय असून ती पूर्णतः पहिली मुसलमानी इमारत मानली जाते. सर जॉन मार्शल म्हणतात, ''ही संपूर्ण वास्तू इस्लामी शैलीची असून या मिनारचे जे मनोरे आहेत ते इस्लामी वास्तू शैलीशी मेळ दाखविणारे व भारतीय शैलीला अपरिचित आहेत. त्यांच्या मते ही मिनार म्हणजे इस्लामी सामर्थ्याचे उत्कृष्ट उदाहरण आहे.''

**४. बल्बनचा मकबरा :**

बल्बनने दिल्ली येथे स्वतःचा मकबरा व लाल महाल या नावाने ओळखला जाणारा राजवाडा बांधला. दिल्ली येथील मशीद पूर्णपणे इस्लामी धर्तीची आहे.

**५. अल्तमशचे थडगे (मकबरा) :**

सुलतान अल्तमशने इ.स. १२३५ मध्ये कुतूबमिनारजवळ आपला मकबरा हा लाल दगडात बांधला आहे. ही वास्तू चौकोनाकृती असून त्यावरील नक्षीकाम लक्षणीय आहे. या थडग्याच्या भिंतीच्या आतील भागावर व छतावर कुराणातील वचने कोरण्यात आली आहेत.

**६. सुलतान गढीचा मकबरा :**

सुलतान अल्तमशने आपला मुलगा नासिरूद्दीन मेहमूदच्या स्मृतीप्रीत्यर्थ हा मकबरा इ.स. १२३१ ते १२३२ च्या सुमारास बांधला. या मकबऱ्याच्या चारही बाजूस किल्ल्यांप्रमाणे तटबंदीच्या भिंती आहेत. चार दिशेला चार गोलघुमट आहेत. प्रवेश दालन व मकबऱ्याचा बाह्य भाग संगमरवरी दगडांचा आहे.

**७. इतर वास्तू :**

अल्तमशने दिल्लीत जामा मशीदीचे बांधकाम केले तसेच त्याने 'हौज-एशम्मी' व 'शम्सी ईदगाह' हे बांधलेले आहेत. त्याचप्रमाणे राजस्थानातील नागौर येथे 'अतार किन हा दरवाजा' ही इमारत बांधली आहे.

**क) खिलजीकालीन वास्तू :**

(इ.स. १२९० ते १३२०) गुलाम वंशानंतर दिल्लीच्या गादीवर खिलजी घराणे सत्तेवर आले. अल्लाउद्दीन खिलजी सतत युद्धात व्यस्त असला तरी त्याने स्थापत्यामध्ये रूची दाखवली. त्याने दिल्लीजवळ इ.स. १३०३ मध्ये सिरी नावाचे शहर वसविले. जुन्या दिल्लीजवळ 'जमातखाना' नावाची मशीद उभारली. अल्लाउद्दीनने 'हौज-ए-खास' म्हणजे सत्तर एकर जमिनीत नियोजनबद्ध जलाशयाची (तलाव) निर्मिती केली.

**१) अलाई दरवाजा :** अल्लाउद्दीन खिलजीने इ. स. १३११ मध्ये या वास्तुचे बांधकाम केले. कुव्वत-उल-इस्लाम मशिदीच्या प्रांगणात जे भव्य व सुंदर प्रवेशद्वार आहे ते अलाई दरवाजा म्हणून ओळखले जाते. आज भग्नावस्थेत असणारा हा दरवाजा इस्लामी वास्तुकलेचा उत्तम नमूना समजला जातो. दरवाज्याच्या भिंती लाल व पांढऱ्या दगडाच्या असून जागोजागी कुराणातील वचने कोरण्यात आली आहेत.

**२) निजामुद्दीन अवलियाचा दर्गा :** ही खिलजी कालखंडातील महत्त्वपूर्ण वास्तू होय. या दर्ग्याचे बांधकाम लाल व पांढऱ्या संगमरवरी दगडात करण्यात आले आहे. हा दर्गा ४६ मीटर लांब व १९ मीटर रुंद आहे. कोरीव

काम व वेलबुट्टी यामुळे या वास्तूच्या सौंदर्यात भर पडली आहे. याशिवाय अल्लाउद्दीनने भडोच, मथुरा येथे मशिदी बांधल्या आहेत. या सर्व वास्तू इस्लामी शैलीच्या असून वास्तूकलेत भव्यपणा आढळतो.

**ड) तुघलककालीन वास्तू : (इ. स. १३२० ते १४१३) :**

तुघलक घराण्याचा संस्थापक गियासउद्दीनने तुघलकाबाद नावाचे शहर दिल्लीजवळ वसविले व शहरात एक किल्ला बांधला होता. याशिवाय त्याने गियासउद्दीनचा मकबरा ही इमारत बांधली. हा मकबरा हिंदू व मुस्लीम कलेचा संमिश्र असा शानदार नमूना आहे.

महंमद तुघलकाने आदिलाबाद हा किल्ला व 'जहानपनाह' (विश्वरक्षक) या शहराची उभारणी केली. जुने दिल्ली शहर व सीरी या दोन शहराच्या भिंती एकमेकांना जोडून सन १३२७ मध्ये या शहराची उभारणी करण्यात आली. ज्याला तेरा दरवाजे होते व चौथे दिल्ली म्हणून संबोधले जाई. येथील फारच थोडे अवशेष आता शिल्लक आहेत. त्यामध्ये विजयमंडळ नावाची उंच गढी, सतपुला नावाचा मोठा पूल यांचा समावेश आहे. दौलताबाद राजधानीच्या दृष्टीने अनेक वास्तूची बांधकाम केली होती. परंतु काळाच्या ओघात ती नष्ट झाली आहेत.

फिरोजशहा तुघलक हा कलाप्रेमी व महान भवन निर्माता होता. त्याने अनेक शहरे व किल्ले, राजवाडे, मशिदी व स्मारके यांचे बांधकामे केली. जोनपूर, फतेहबाद, हिस्सार, फिरोजाबाद इ. शहरे वसविली. फिरोजाबाद नगरला पाचवी दिल्ली म्हटले जात होते. प्रसिद्ध संत कबीरूद्दीन यांचे थडगे तुघलक काळात बाधण्यात आले. हे थडगे लाल घुमट या नावाने ओळखले जाते.

**इ) सय्यद व लोदीकालीन वास्तू (इ. स. १४१४ ते १५२६) :**

सय्यद व लोदीकाळात वास्तूकलेत फारशी प्रगती झाली नाही. आर्थिक साधनांची कमतरता व वास्तूकलेविषयी निराशा यांमुळे सय्यद काळात वास्तकलेचा विकास झाला नाही. हा सुलतानशाहीच्या पतनाचा कालखंड होता. लोदी काळात अनेक मकबऱ्यांची निर्मिती झाली. अष्टभुजीय मकबरे व चौकोनी आयताकृती मकबरे तयार करण्यात आले. महंमदशहा आणि सिकंदर लोदीच्या थडग्यावर इमारत बांधली. ही वास्तू घुमटामुळे रंगीत फरशांमुळे व नक्षीकामामुळे महत्त्वपूर्ण ठरली. सिकंदर लोदीच्या पंतप्रधानाने (वजीर) बांधलेली 'मोट की मशीद' प्रेक्षणीय आहे. लोदी काळातील हा वास्तूकलेचा उत्कृष्ट नमूना मानला जातो.

**ई) विजयनगर कालीन वास्तुकला (स्थापत्य) :**

हरिहर व बुक्क यांनी विजयनगरची स्थापना केली. तुंगभद्रा नदीच्या तीरावर माधवाचार्य उर्फ विद्यारण्यस्वामी यांच्या मार्गदर्शनाने विजयनगर हे शहर इ.स. १३३६ मध्ये वसविले. या राज्यावर संगम वंश, शाल्व वंश, तुल्व वंश आणि आरविंदू वंशातील अनेक पराक्रमी राजांनी राज्ये केली. मुळचे 'हंपी' गाव व त्याच्या जवळची विस्तारत गेलेली राजधान असे सुमारे १४ ते १५ चौरस किलोमीटरचे क्षेत्र म्हणजे विजयनगर होय. या शहराची रचना व उभारणी ही स्थापत्य कलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. निकोलो कौंटी (इटालियन), अब्दुल रझाक

(इराण), डोमिंगो पेस (पोर्तुगीज) व दुआर्टे बार्बोस या परकीय प्रवाशांनी विजयनगरला भेट दिलेल्या होत्या. विजयनगर राज्यातील मोठमोठी मंदिरे, सुंदर बागबगीचे, राजवाडे बांधकामे, विजयनगरमधील सौंदर्य संपन्नता व आकर्षकता यांचे वर्णन प्रवासी व इतिहासकारांनी केलेले आढळून येते. राजधानीचे वर्णन करताना निकोलो कौंटी लिहितो, ''विजयनगर शहर एका उंच डोंगराच्या पायथ्याशी आहे. शहराचा विस्तार ६० मैल आहे. तटाच्या भिंती, पर्वताच्या रांगा उंच असून त्या सर्व दऱ्यांना वेष्टून गेल्या आहेत. राज्यात ९० हजार लोक सदैव लढण्याच्या तयारीत असतात. शहरात पाण्याचे कालवे व मोठमोठ्या बागा आहेत. ऊस व तांदूळ पुष्कळ पिकतो. वाडे, मंदिरे, तट व गोपूरे इत्यादींनी शहरास अवर्णनीय शोभा आलेली आहे.

**१) संगम व शाल्व घराण्यांच्या काळातील वस्तुकला :**

विजयनगरच्या पहिल्या दोन राजांच्या काळात युद्धसंघर्ष व राज्याचे संरक्षण महत्त्वाचे होते. युद्धसंघर्ष सातत्याने करावा लागला तरी या राजांनी किल्ले व तटाच्या बांधकामाकडे लक्ष दिले. राजधानीत योजनापूर्वक रस्ते आखले, विहिरी व तलाव खोदले, कालवे काढले, व्यापार, उद्योगवाढीसाठी लक्ष दिले. शाल्व व संगम घराण्यांच्या कारकिर्दीत वास्तुकलेची मोठी प्रगती झाली नाही. दुसरा हरिहर याने शंकराची अनेक देवालये बांधली. हंपी येथील विरूपाक्षाचे मंदीर प्रसिद्ध आहे. राजा हरिहर याने आपल्य गुरूचे स्मारक म्हणून हे मंदिर बांधले. हरिहर याने अनेक शंकराची मंदीरे बांधली. विजयनगर शहरात त्याच्या काळात वाडे, तट व गोपूरे बांधण्यात आले. तसेच दुसऱ्या देवरायांच्या कारकिर्दीत वास्तुकलेचा विकास झाला.

**२) कृष्णदेवरायाच्या काळातील वास्तुकला :**

कृष्णदेवरायाला स्थापत्य कलेची विशेष आवड होती. त्यामुळे त्याच्या कारकिर्दीत स्थापत्यकलेची मोठी प्रगती झाली. अनेक सुंदर मंदीरे, राजरस्ते, बाजार, तलाव, मोठ-मोठे राजवाडे इत्यादींची रायाने निर्मिती केली. कृष्णदेवरायाची कारकिर्द (१५०९ ते १५३९) ही विजयनगर राज्याच्या दृष्टीने अत्यंत वैभवशाली व भरभराटीची ठरली होती. तो एक सुसंस्कृत आणि विद्याकलांचा उदार आश्रयदाता असा नृपती होता. त्याच्या कारकिर्दीत साहित्याच्या क्षेत्रातही मोठ्या प्रमाणात निर्मिती झाली. मंदिरांना, मणांना, पंडितांना त्याने द्रव्याच्या, सोन्यामोत्यांच्या आणि भूमीच्याही अगणित देणग्या दिल्या. वास्तुशिल्पाची कामे मोठ्या प्रमाणात केली. कृष्णदेवरायाने जे काही बांधविले, कोरविले वा खादेविले त्यामागील प्रेरणा आणि त्या कृतीतील ठळक कलात्मक वैशिष्ट्ये याचा वेगळा ठसा उमटला आहे.

**३) वास्तुशिल्पे व बांधकाम यांचे चार विभाग :**

कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीमधील वास्तुशिल्पे आणि इतर बांधकामे यांची चार गटात विभागणी करता येईल. ते चार गट म्हणजे १) होस्पेट-अनंतशयनगुडी, २) राजनगरी, ३) विरूपाक्षपुरा-कृष्णपुरा, ४) विठ्ठलपुरा.

मातोश्री नागलदेवीच्या स्मृतीप्रित्यर्थ रायाने सुंदर मंदिर व इमारतींनीयुक्त नागलपूर (सध्याचे होस्पेट) हे नवे शहर वसविले. कृष्णदेवरायाने हे नवीन नगर वसवले. येथे भक्कम तटबंद्या, मोठे रस्ते, एकमजली परंतु राजवाड्यासारखी दिसणारी घरे इ. बांधकामे तेथे केली होती. १५२० मध्ये कृष्णदेवराने नागलपूरच्या जवळ एका

प्रचंड जलाशयाचे काम केले. दोन पहाड जोडून हा प्रकल्प पुरा करण्यात आला असे पोर्तुगीज प्रवासी सांगतात. तेथे बाजूला मोठमोठे शिलाखंड टाकून पोर्तुगीज अभियंत्यांची मदत घेऊन कृष्णदेवरायाने भिंतीचे काम करून घेतले. बांधकामात चुन्याचा वापर करण्यात आला. त्याशिवाय अनंत शयनगुडी नावाच्या भागात अनंतशयन मंदिर बांधले.

राजनगरी भागात राजप्रसाद होते. तेथे इतर इमारती बांधल्या गेल्या. सभागृहे, विश्रामगृहे, खलबतखाने व मौल्यवान वस्तू किंवा शस्त्रे ठेवण्यासाठी तळघरे, हत्तींचा हत्तीखाना इत्यादींचा त्यामध्ये समावेश होतो. महानवमी डिब्बा किंवा दसरा डिब्बा ही वास्तू इ. स. १५१३ मध्ये बांधली. या वर्षी त्याने ओरिसाच्या गजपतीविरुद्ध युद्धात पहिला जय मिळविला. त्याची स्मृती या पाषाणाच्या बांधकामाच्या रूपाने त्याला चिरकाल राखावयाची होती. भुवनविजय आणि विजयमंदिर म्हणूनच ते त्या काळी विख्यात झाले. महानवमी डिब्ब्याच्या वायव्येस सुमारे पाऊण किलोमीटर अंतरावर हजाराराम म्हणून प्रसिद्ध असलेले मंदिरही कृष्णदेवरायाने बांधले आहे. विरूपाक्ष मंदिराच्या उत्तरेस सुमारे एक किलोमीटर अंतरावर कृष्णपुरा लागतो. या भागात उग्र नरसिंह किंवा लक्ष्मीनरसिंहाचा पुतळा आणि कृष्णस्वामी मंदिर या दोन कलाकृती महत्त्वाच्या आहेत. नरसिंहाचा पुतळा २५ फूट उंच व १६–१७ फूट रुंदीचा प्रचंड दगडी पुतळा त्याने कोरविला आहे.

विजयनगर साम्राज्याच्या काळात मंदिर वास्तुकलेचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. स्वतंत्र विजयनगर शैली म्हणून मंदिर वास्तुकला ओळखली जाते. मंदिरामध्ये चालणाऱ्या वेगवेगळ्या धार्मिक आचारासाठी मंदिर परिसरात वास्तुची संख्या वाढली. कृष्णस्वामी मंदिर इ. स. १५१४–१५ मध्ये कृष्णदेवरायाच्या आज्ञेने बांधले गेले. रायाने ओरिसाच्या गजपतीचा पराभव करून उदयगिरीहून जी लूट आणली होती त्यात एक सुंदर बाळकृष्णाची मूर्ती होती. ती रायाला फारच आवडली होती आणि तिच्यासाठी हे मंदिर निर्माण केले. इ. स. १५१३ मध्ये कृष्णदेवायाने विजयविठ्ठल मंदिराचे काम सुरू केले. त्याने आपल्या उम्तमत्तूचा किंवा गजपती विरुद्धचा विचार नोंदविण्यासाठी बहुधा या मंदिराचा प्रारंभ केला असावा. विठ्ठलपुऱ्यातील एक किंवा अधिक विठ्ठल मंदिराची कामे कृष्णदेवरायाच्या कारकिर्दीत झालेली दिसतात. दोलोत्सव मंडपात विविध प्रकारची शिल्पे कोरलेली आहेत. शिल्पे पाहिल्यानंतर नेत्रसुख व श्रवणसौख्य मिळते. येथील काही स्तंभातून मृदंगावर किंवा तबल्यारव मारतात तसे मारले की संगीताचे सूर उमटतात. हा फार मोठा चमत्कार तेथील तज्ज्ञांनी घडवून आणला आहे.

कृष्णदेवरायाने कृष्णस्वामी मंदिर बांधले. या मंदिरात ३६ स्तंभ आहेत. इ. स. १५१३ मध्येरायाने विठ्ठलपुरा येथे विजयविठ्ठल मंदिर बांधले. मंदिराची लांबी ४१ फूट तर रुंदी ३० फूट आहे. या मंदिराच्या आवारात अम्मन मंदिर, दोन कल्याण मंडप, एक १०८ स्तंभाचा शतस्तंभी म्हणून ओळखला जाणारा मंडप आहे. तसेच एक पाषणरथ आहे. पाषाणरथ ही एक अद्भुत निर्मिती आहे. रायाने अनंतशयन, हजाराराम, कृष्णस्वामी, विजयविंठल ही चार मोठी मंदिरे बांधली आहेत. फर्ग्युसनच्या मते, कृष्णदेवरायाने बांधलेले विजयविठ्ठल मंदिर हे दक्षिण भारतातील सर्वोत्कृष्ट मंदिरापैकी एक होय. विजयनगर साम्राज्याच्या काळात मंदिर वास्तुकलेचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. स्वतंत्र विजयनगर शैली म्हणून ही ‘मंदिर वास्तुकला’ ओळखली जाते.

### ४) इतर वास्तू :

मंदिराशिवाय विजयनगर येथे बांधलेल्या इतरही काही वास्तु आजही चांगल्या अवस्थेत आहेत. त्यामध्ये राजवाड्याचे काही अवशेष आहेत. एक उंच चौथरा सिंहासनाचा चौथरा म्हणून ओळखला जातो. तसेच हत्तीखाना, कमल महाल आणि दोन उंच मनोरे चांगल्या अवस्थेत आहेत. याशिवाय विजयनगरच्या अवशेषामध्ये एक भले मोठे चारी बाजूंनी पायऱ्या असलेले जलकुंड (राजघराण्यातील स्त्रियांना पोहण्याचा तलाव) यांचाही समावेश होतो. तालीकोटच्या लढाईत (२३ जानेवारी १५६५) इस्लामी आक्रमकांनी या शहराचा, तेथील कलावैभवाचा, प्रचंड इमारतींचा व वास्तुकलेच्या वैशिष्ट्यांचा विनाश केला.

### फ) बहामनी कालीन स्थापत्यकला (इ. स. १३४७ ते १५२७) :

बहामनी सुलतान हे विद्या, साहित्य व कलाप्रेमी होते. बहामनी राज्यात हजारो परकीय मुसलमान भारताबाहेरुन आलेले होते. त्यांनी आपल्याबरोबर तुर्कस्तान व इजिप्त येथील स्थापत्यकलेची शैली आणली होती. त्या शैलीचा भारतीय स्थापत्य शैलीशी समन्वय होऊन 'बहामनी स्थापत्य कला' उदयास आली. या वास्तूकलेमध्ये हिंदू, फारसी व तुर्की शैलीचा मिलाफ झालेला दिसतो. या काळातील स्थापत्य वास्तूंची माहिती पुढीलप्रमाणे–

### १) मशिदी, कबरी, महाल व मांदमिनार :

दुसरा मोहम्मदशहा याला काव्य व तत्वज्ञानाची विशेष आवड होती म्हणून तो 'दक्षिणेचा ॲरिस्टॉटल' या नावाने ओळखला जातो. बहामनी काळात अनेक मशिदी बांधण्यात आल्या. अल्लाउद्दीन बहामनीने गुलबर्गा येथे बालहिसार व जामा मशिदी बांधली (१३६७). अहमदशहा वाली याने इ. स. १४२५ मध्ये बिदर येथे आपली राजधानी हलवली. या ठिकाणी त्याने अनेक किल्ले, महाल, गगन, महाल, चिनी महाल व नागीन महाल उभे केले. या वास्तूंत 'तख्तखाना' (सिंहासन दालन) 'शहाबूरी' (शाहीमहाल) यांचे सौंदर्य अप्रतिम होते. येथील '१६ खंबा मशीद' व सर्वात उल्लेखनिय वास्तू म्हणजे विद्वान महमूद गवानने इ. स. १४७२ मध्ये बांधलेला 'मदरसा' होय. या तीन मजली इमारतीत अध्यापन दालन, वाचनालय कक्ष, शिक्षक व विद्यार्थ्यांसाठी निवास व्यवस्था आणि मशिद असून या इमारतीची बांधकाम शैली ही समरकंद येथील पर्शियन विद्यापीठाशी मिळती जुळती आहे. इ.स. १४३५ मध्ये दौलताबाद येथे बांधलेली 'चारमिनार' ही वास्तू होय. तिची उंची १०० फूट आहे. प्रमाणबद्धता, कारागिरी व सौंदर्य इ. या वास्तूची वैशिष्ट्ये आहेत.

### २) किल्ल्यांची बांधकामे व इतर वास्तू :

बहामनी सुलतानांनी काही जुन्या किल्ल्यांचा जिर्णोद्धार केला व काही किल्ला नव्याने बांधले. त्यामध्ये बिदर, एलिचपूर, गाविलगड, नरनाळा, माहूर, परिंडा, नळदुर्ग, वरंगळ, गुलबर्गा, गोवलकोंडा, पन्हाळा, मुद्गल इ. डोंगरी व भुईकोट किल्ल्यांचा समावेश होतो. गुलबर्गा व बिदर या बहामनींच्या राजधान्या होत्या. या ठिकाणी अनेक इमारती, दर्गे व थडगी आहेत. त्यावर हिंदू शैलीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. ताजुद्दीन फिरोजशहा या बहामनी राज्यकर्त्याने दौलताबाद येथे खगोलशास्त्राचा अभ्यास करण्यासाठी एक वेदशाळा निर्माण केली होती. तसेच भीमा नदीच्या काठी फिरोजाबाद नगराची उभारणी केली.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न –३**

**योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१. कुतुममिनारचे बांधकाम ............. याने पूर्ण केले.

अ) कुतुबुद्दीन ऐबक ब) अल्तमश क) बल्बन ड) रझिया

२. अलाई दरवाजाची निर्मिती ............. याने केली.

अ) मुहंम्मद तुघलक ब) फिरोजशहा तुघलक क) अल्लाउद्दीन खिलजीड) अल्तमश

३. कुव्वत-उल-इस्लाम मशीद ............. याने बांधली

अ) सुलतान बल्बन ब) सुलतान रझिया क) कुतुबुद्दीन ऐबक ड) सुलतान अल्तमश

४. ............. याने बिदर येथे बांधलेला मदरसा सर्वात उल्लेखनिय वास्तू आहे.

अ) अल्लाउद्दीन बमहानी ब) महंमद गवान क) दुसरा मोहम्मदशहा ड) फिरोजशहा

५. विजय विठ्ठल मंदिराची उभारणी ............. याने केली.

अ) हरिहर ब) कृष्णदेवराय क) रामदेवराय ड) बुक्क

६. ............. इटालियन परकीय प्रवासाने विजयनगरला भेट दिली होती.

अ) अब्दुल रझाक ब) निकोलो कौंटी क) डोमिंगो पेस ड) बार्बोसा

७. ............. च्या लढाईत इस्लामी आक्रमकांनी विजयनगर वास्तुकलेच्या वैशिष्ट्यांचा विनाश केला.

अ) तालीकोट ब) पहिल्या पानिपत क) दुसऱ्या पानिपत ड) भातवडी

८. एकशे आठ स्तंभाचा मंडप व पाषाणरथ यांची निर्मिती ............. याने केली.

अ) पहिला हरिहर ब) दुसरा हरिहर क) कृष्णदेवराय ड) बुक्कराय

९. ............. याने आदिलाबाद हा किल्ला व 'जहानपनाह' या शहराची उभारणी केली.

अ) मुहंम्मद तुघलक ब) फिरोजशहा तुघलक क) अल्लाउद्दीन खिलजी ड) सुलतान अल्तमश

१०. गुलाम वंशानंतर दिल्लीच्या गादीवर ............. घराणे सत्तेवर आले.

अ) सय्यद ब) तुघलक क) खिलजी ड) लोदी

### ४.३.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ :

सफा : शुद्धता, पवित्रता

चौराह : चार मार्ग एका ठिकाणी जुळतात तो चौक

जुलहा : हाताने वस्त्र विणणारे विणकर

भक्तिमार्ग : परमेश्वराची उपासना करण्यासाठी स्विकारलेला आचार मार्ग

जपुजी : गुरुनानकांच्या वचनांचे संकलित रूप होय.

गुरुबाणी : जपुजीच्या रचनेला गुरुबाणी म्हणतात.

पंचकंकार : केस, कंगी, कच्छ, कडे, कृपाण, अशी पाच चिन्हे

पंच प्यारे : शीख धर्मासाठी आत्मबलिदान देणारे जीव

खालसा पंथ : शीख अनुयायांची लढाऊ संघटना.

गुरुद्वारा : शीख धर्माचे धार्मिक प्रार्थना स्थळ

स्थापत्य : स्थापत्य म्हणजे वस्तू रचना, बांधकाम होय. यामध्ये किल्ले, वाडे, मकबरे, मशिदी, मंदिरे इ. चा समावेश होतो.

सुलतानशाही : (१२०६ ते १५२६) या काळात गुलाम घराणे, खिलजी घराणे, तुघलक घराणे, सय्यद व लोदी घराण्यांनी दिल्लीवर राज्य केले.

## ४.५ स्वयं अध्ययन, प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – १**

१) अलीबीन उस्मान
२) चिश्ती
३) गेसुदराज
४) राजानुजाचार्य
५) विणकर
६) संत ज्ञानेश्वर
७) ग्रंथसाहेब
८) गुरु गोविंदसिंग
९) नांदेड
१० पाटणा

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

१) महाराष्ट्र
२) फिरोजशहा तुघलक
३) मुहंम्मद तुघलक
४) महाराष्ट्र
५) अल्तमश
६) रझिया सुलतान
७) काझी
८) फिरोजशहा
९) जिझिया
१०) सैनिक

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

१) अल्तमश

२) अल्लाउद्दीन खिलजी

३) कुतुबुद्दीन ऐबक

४) महंमद गवान

५) कृष्णदेवराया

६) निकोलो कौंटी

७) तालीकोट

८) कृष्णदेवराय

९) मुहंम्मद तुघलक

१०) खिलजी

## ४.६ सारांश :

मध्ययुगीन भारतीय इतिहासात धर्म, समाज व संस्कृती यांना वैशिष्ट्यपूर्ण स्थान आहे. सुफी संप्रदायाने हिंदू तत्वज्ञानाचा सखोल अभ्यास करून काही परंपरा व रीतीरिवाज यांचा स्वीकार केला. त्यामुळे तिरस्काराची भावना कमी होण्यास मदत झाली. हिंदु व मुस्लिमात समन्वय साधण्याचे कार्य सुफींनी केले. सुफी पंथात गुरु भक्तीला अतिशय महत्त्व दिले गेले. परमेश्वराला सर्वव्यापी व सर्वश्रेष्ठ मानले. सुफींनी संगीत नृत्य व साहित्य या माध्यमातून आपल्या पंथाचा प्रसार केला. ख्वाजा मुईनुद्दीन चिश्ती यांनी चिश्ती संप्रदायाची स्थापना केली. बाबा फरीद, गेसूदराज, शेख निजामुद्दीन औलिया यासारख्या संतांनी सुफी संप्रदायाचा प्रसार केला. त्यामुळे भारतात चिश्ती, सुहावर्दी, नक्शबंदी, कादिरिया, फिरेदोसिया यासारख्या उपसंप्रदायाचा प्रसार देशाच्या विविध भागात झाला. धर्मप्रसारासाठी मठ, खानकाह, दर्गे व समाधी स्थळे निर्माण करून भक्तीसाठी उरूस या उत्सवाची सुरूवात केली. इस्लामी राजवटीला स्थिरता प्राप्त होण्याच्या दृष्टीने सुखी पंथाचे कार्य महत्त्वपूर्ण ठरते. हजारो हिंदूना आपल्या तत्त्वज्ञानाकडे आकर्षित करून एकेश्वरवादाचा पुरस्कार केला. मानवतावाद व सहिष्णूता निर्माण करण्याचे कार्य सुफींनी मध्ययुगीन कालखंडात केले.

हिंदुस्थानावरील इस्लामी आक्रमणापासून हिंदू व मुसलमान या दोन भिन्न धर्मात संघर्ष व कट्टरता निर्माण झाली. दोन्ही धर्मातील उदारमतवादी विचारांचा उदय झाला. त्यातूनच विविध पंथ व संप्रदाय उदयास आले. भक्तिमार्ग चळवळीने हिंदू धर्म व समाजातील दूषित प्रवृत्ती, कर्मकांड, जातीयता, वर्णभेद, धर्मभेद इ. नष्ट करण्याचा प्रयत्न अतिशय प्रभावीपणे झाला. संत तुलसीदास, संत रविदास व संत कबीर यासारख्या अनेक भक्ति चळवळीतील संतांनी समाजाला भक्तीचा नवा मार्ग दाखवून आपल्या उपदेशाने, वचनाने व साहित्यातून धार्मिक सहिष्णुतेचे वातावरण निर्माण केले. भक्तीमार्ग चळवळीमुळे समाजात एक नवी प्रेरणा निर्माण झाली.

भारतात १६ व्या शतकात प्रारंभी शीख धर्माचा उदय झाला. गुरुनानक हे धर्माचे संस्थापक मानले जातात. गुरु परंपरेत एकूण दहा गुरु झाले. शेवटचे दहावे गुरु गोविंदसिंह हे होते. त्यांनी खालसा संघटनेची स्थापना केली. गुरु नानकाच्या पासून वचनांचे संग्रह करून गुरु अर्जुनसिंगाच्या काळात ग्रंथसाहिब ग्रंथाचे लेखन पूर्ण केले. शीख धर्मात गुरु, ग्रंथ, गुरुबाणी आणि गुरुद्वारा यांना विशेष महत्त्व आहे. खालसा पंथातील पंचप्यारे, पंचककार, आचारशास्त्र यांना महत्त्व दिले आहे. अमृतसर हे शीखांचे पवित्र ठिकाण असून त्याला श्री अकाल तख्त असे

म्हणतात. अशा प्रकारे मध्ययुगीन कालखंडात सुफी, भक्ती चळवळीचा व शीख संप्रदायाचा सर्वच क्षेत्रात प्रभाव पडून धार्मिक, सामाजिक व राजकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण संक्रमण घडून आले.

मध्ययुगीन हिंदू समाजात वर्ण व जातीव्यवस्था होती. बालविवाह, बहुपत्नीत्व, सती, केशवपन इ. अनेक वाईट चालीरिती व प्रथा रूढी होत्या. गुलामगिरीची प्रथा मानवजातीला शाप होती. स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान होते. हिंदू समाजाची स्थिती अत्यंत वाईट व हालाखीची होती.

मुस्लीम समाजात अमीर, उमराव, जहागीरदार, काझी, उलेमा, व्यापारी, सैनिक, कारागीर व गुलाम असे विविध वर्ग होते. अमीर, उमराव व काझी हे विलासी जीवन जगत होते. समाजात त्यांना महत्त्वाचे स्थान होते. समाजात वांशिक गट व श्रेष्ठ-कनिष्ठ संकल्पना रूढ होत्या. संयुक्त व पितृसत्ताक कुटुंब पद्धती रूढ होती. मुस्लीम समाजातील स्त्रियांचा दर्जा हा हिंदू समाजातील स्त्रियांपेक्षा खालावलेला होता. गुलामगिरी हे मुस्लीम समाजाचे अविभाज्य अंग होते.

स्थापत्याच्या दृष्टीने सुलतानशाही काळात मोठी प्रगती झाली. कुतुबमिनार यासारख्या उत्तुंग वास्तू उभ्या राहिल्या. तर विजयनगर व बहामनी काळात अनेक मंदिरे, किल्ले, मकबरे, मशिदी, मनोरे, दर्गे यांची निर्मिती झाली. थोडक्यात या कालखंडात सांस्कृतिक प्रगती साधली गेली. प्रस्तुत घटकामध्ये मध्ययुगीन कालखंडातील धर्म, समाज व सांस्कृतिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला आहे.

## ४.७ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) दिर्घोत्तरी प्रश्न.**

१. सुफी संप्रदायाचे तत्त्वज्ञान स्पष्ट करा.

२. चिश्ती सिलसिला याविषयी माहिती लिहा.

३. मध्ययुगीन भारतातील एक सर्वश्रेष्ठ संत म्हणून संत कबीराचे कार्य स्पष्ट करा.

४. शीख धर्मातील गुरुग्रंथ, गुरुवाणी व गुरुद्वारा यांचे महत्त्व स्पष्ट करा.

५. भक्तिचळवळीच्या कारणांचा थोडक्यात आढावा घ्या.

६. मध्ययुगीन भारतातील हिंदु समाज याविषयी सविस्तर विवेचन करा.

७. सुलतानशाही काळातील स्थापत्य कलेचा आढावा घ्या.

**ब) टीपा लिहा / लघुत्तरी प्रश्न.**

१. चिश्ती संप्रदायाचे कार्य

२. चिश्ती संतांची जीवनशैली

३. सुफींचेच तत्त्वज्ञान व आचारशास्त्र

४. भक्ति चळवळीचे परिणाम

५. गुरुनानक

६. मध्ययुगीन मुस्लिम समाजातील प्रमुख वर्ग

७. खालसा पंथ व गुरुद्वारा

८. बहामनी काळातील स्थापत्यकला

९. विजयनगर साम्राज्यातील स्थापत्यकला.

१०. मुस्लीम समाजातील स्त्रियांची स्थिती.

## ४.८ संदर्भ ग्रंथ :


१. कृ. ना. चिटणीस, 'मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था', खंड १ ते ४, पुणे, १९७६.

२. डॉ. श.गो. कोलारकर, 'मध्ययुगीन भारताचा इतिहास (१२०६ ते १७०७)', श्री. मंगेश प्रकाशन, १९९४.

३. डॉ. कृ. आ. आचार्य, डॉ. भा.कृ. आपटे, 'मध्ययुगीन भारत', नागपूर, १९७८

४. बारगळ, ढवळे, 'मध्ययुगीन भारत', विद्या प्रकाशन, नागपूर, १९८७.

६. Srivastava, A. L., Medieval India, Culture Agro, 1964

७. Dr. Chitnis, K. L., Social-Economic Aspects of Medieval India, Pune, 1974.

८. Habib Mohammad, Politics and Society in Early Medieval Period, Vol. IV & II.


## ४.९ क्षेत्रीय कार्य :

आपल्या परिसरातील भक्ति संप्रदायाची माहिती संकलित करा.

❖❖❖

## घटक – १

# साधने

**अनुक्रमणिका :**

१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ वाङ्‌मयीन साधने : अकबरनामा, गुलशने-ए-इब्राहिमी

१.२.२ पुरातत्वीय साधने : (स्मारके वगळून)

१.२.३ परकीय प्रवाशांची वर्णने : फ्रांन्सिस बर्नियर, निकोलाव मनुची

१.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.५ सारांश

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके.

## १.० उद्दिष्टे :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील माहिती विशद करता येईल.

- मध्यकालीन भारताची संदर्भ साधने स्पष्ट करता येतील.
- ऐतिहासिक संदर्भ साधनांचे वर्गीकरण सांगता येईल.
- इतिहासलेखन व पुनर्लेखनासाठी संदर्भ साधनांचे महत्त्व स्पष्ट करता येईल.
- मुघलकालीन भारताच्या अभ्यासासाठी अकबरनामा व गुलशन-ए-इब्राहिमी या साधनांचे महत्त्व सांगता येईल.
- मुघलकालीन भारताच्या अभ्यासासाठी पुरातत्वीय साधंनांचे महत्त्व सांगता येईल.
- मुघलकालीन भारताच्या अभ्यासासाठी फ्रांन्सिस बर्नियर आणि निकोलाव मनुची यांच्या प्रवास वृतांताचे महत्त्व स्पष्ट करता येईल.

## १.२ प्रास्ताविक

### १) मुघल कालखंडातील इतिहासलेखन :

सुलतानशाही कालखंडातील इतिहासलेखनांचा पुढचा टप्पा म्हणून मुघलकालखंडाचा उल्लेख केला जातो. मुघलकालखंडातील इतिहासलेखनाचे स्वरूप,तंत्र व पद्धती वेगळी दिसून येते. इतिहासलेखनात निवेदनाऐवजी विविधता आलेली दिसते. राजकीय इतिहासाबरोबर सामाजिक घटनांचा समावेश आहे,लिखाणात सांस्कृतिक जीवनातील विविध अंगांना स्थान दिलेले आहे. याशिवाय वस्तुनिष्ठ दृष्टीकोणातून ऐतिहासिक घटनांची चिकित्सा करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. मुघलकाळात इतिहासलेखनांत आत्मचरित्रे हा नवीन प्रवाह अस्तित्वात आला. मुघल कालखंडात इतिहासलेखनाबरोबरच तत्कालीन विविध घटनांची माहिती देवू शकणारी अनेक प्रकारची साधने या काळात निर्माण झालेली दिसतात. त्यामुळे मुघल कालखंडात अधिक विस्तृत व सलग इतिहास मांडणे शक्य होते. मुघलकालखंडात पार्शियन भाषेला राजभाषेचा दर्जा मिळाल्यासारखी स्थिती निर्माण झालेली होती. पार्शियन भाषेला यामुळे प्रतिष्ठा मिळाली, बहुतांश इतिहासलेखन पार्शियन भाषेतून झालेले दिसते. अनेक इराणी विद्वान भारतात आले, त्यांनी पार्शियन भाषेत वाङ्‌मय निर्मिती केलेली दिसते. परिणामी जहाँगिरांच्या काळात पार्शियन भाषा उच्चतम स्थानावर असलेली दिसते.

### २) मध्ययुगीन भारतीय इतिहासलेखनाची प्रेरणा :

इ. स. १२०६ मध्ये दिल्ली येथे सुलतानशाहीची स्थापना झाली. सुलतानशाही बरोबर अरबी, तुर्की, इराणी, लेखनकलाही येथे आली. आपण मिळविलेल्या विजयांच्या नोंदी ठेवण्यासाठी तत्कालीन राज्यकर्त्यांनी अनेक लेखकांना राजाश्रय दिल्याने अनेक विद्वान व लेखक उदयास आले. राजाश्रयाशिवाय इतर काही लेखकांनी स्वतंत्रपणे इतिहासलेखन केलेले दिसते. या काळातील इतिहास लेखकांचा दृष्टीकोण व विषय धर्मनिष्ठ नव्हता तर लौकिक स्वरूपाचा होता. मध्ययुगीन भारतात सुलतानशाहीच्या स्थापनेअगोदर इतिहास लेखनपरंपरा अस्तित्वात नव्हती हे राजतरंगिणीवरून दिसते. अरबी संस्कृतीच्या प्रभावाने भारतात इतिहास लेखनास प्रेरणा व चालना मिळाली हे जरी खरे असले तरी मुलतः भारतीय इतिहासकार किंवा इतिहासलेखक अभावाने मिळतात ते ही मुघल कालखंडात किंवा इतर शाह्यांच्या दरबारी होते. सुलतानशाही कालखंडात लिहिलेल्या इतिहासात महत्त्वाच्या घटनांच्या नोंदी, लष्करी मोहिमा, राजकीय घडामोडी अथवा बातमीवजा होते. खासकरून निवेदनवजा होते. त्यामुळे त्यामध्ये माहितीचे विश्लेषणल चिकित्सा किंवा त्यांची विश्वासार्हता पडताळून पाहण्याची काळजी तत्कालीन लेखकांनी घेतलेली दिसत नाही. मुघल कालखंडात इतिहासलेखांतील ही उणीव काही अंशी दूर झालेली दिसते.

### ३) मध्ययुगीन इतिहासलेखनाचे प्रमुख प्रकार :

मध्ययुगीन काळात अनेक प्रकारचे इतिहासलेखन झालेले दिसते. लिखाणाच्या प्रेरणा व उद्देश वेगवेगळे असलेले दिसतात. प्रवासवर्णन, वसीयतनामा, मनकिब, तवारिखा, करीने, वाकियात, आत्मचरित्र, शकावल्या, स्थानपोथी, आख्यानकाव्य, बखर, रासोकाव्य, ख्यात, रोजनिशी व अखबरात इत्यादीमधून तत्कालीन राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक व आर्थिक घटकांवर प्रकाश टाकण्यास मदत होते.

**४) मुघल कालखंडातील इतिहासलेखनांचे प्रकार :**

मुघल कालखंडात प्रामुख्याने खालील प्रकारात अधिक लिखाण झालेले दिसते -

१) आत्मवृत्त/आत्मचरित्रे.

२) दरबारी इतिहासलेखकांचे अधिकृत इतिहासलेखन.

३) खाजगी अनधिकृत इतिहासलेखन.

४) प्रादेशिक इतिहास.

५) सुफी संताची चरित्रे.

**५) इतिहास लेखनांचा नवीन प्रवाह: आत्मचरित्रे :**

मुघल कालखंडात आत्मचरित्रावर लिखाण करण्याचा नवीन प्रवाह अस्तित्वात आलेला दिसतो. मुघल शासनकर्त्यांनी या लिखाणास सुरूवात केली. यामध्ये बाबराने 'तुझुक-इ-बाबरी' व जहाँगिराचे 'तुझुक-इ-जहाँगिरी' या दोन्ही आत्मचरित्रावरून त्यांच्या व्यक्तीमत्वावर व तत्कालीन अनेक घटकांवर प्रकाश पडतो. दोघांच्याही कथनात निवेदन आढळते.

## १.२ विषय विवेचन :

### १.२.१ वाङ:मयीन साधने: अकबरनामा, गुलशन-ए-इब्राहिमी

**अ) अकबरनामा: अबुल फझल/फज्ल :**

**१) अबुल फजलचे पूर्व चरित्र: : (१५५१-१६०२) :**

अबुल फझलचे संपूर्ण नाव अबुल-फल-इन-मुबारक असे होते. सिंध प्रांतात राहणाऱ्या व मूळच्या येमेनी वांशिकतेच्या शेख मुसा उर्फ मुबारक याचा अबुल फझल हा पाचवा पुत्र होता. अबुल फजलचे पूर्वज पंधराव्या शतकाच्या आसपास नागौरमध्ये येवून स्थायिक झाले. सन १५०६ मध्ये अबुल फजलचे वडील शेख मुबारकचा जन्म झाला. शेख मुबारक यांना शेख ओमर, शेख युसुफ, मिरफुद्दीन सफवी यांच्यासारख्या विद्वानांचा सहवास लाभला होता. अबुल फजलचा जन्म आग्रा येथे १४ जानेवारी १५५१ रोजी झाला. वडील शेख मुबारक यांच्याकडून त्याने आपले शिक्षण पूर्ण केले. फजल लहानपणापासून मेहनती आणि कष्टाळू असल्याने त्याने वयाच्या १५ वर्षा पर्यन्त पारंपारिक शिक्षण पूर्ण केले. (उलुमेनकली, फुनूने हिक्मी) फजलला अरबी भाषेचे उत्तम ज्ञान असल्याने त्याने धर्म आणि तत्वज्ञानात प्रभुत्व प्राप्त केले. विविध धर्मांचा तुलनात्मक अभ्यास करून अनेक धार्मिक चर्चेत सहभाग घेतला. परिणामी त्याच्यात धार्मिक सहिष्णुता व औदार्य निर्माण झाले. अबुल फजल ज्या घराण्यामध्ये जन्माला आला होता त्या घराण्याच्या विचारधारेचा त्याच्यावर मोठ्या प्रमाणात प्रभाव होता. कट्टर उलेमाचा वागणुकीचा अबुल फजलच्या मनावर खोलवर परिणाम होता. अकबरकालीन प्रसिद्ध कवी आणि अकबराच्या नवरत्नापैकी एक अबूल फैजी हा अबुल फझलचा भाऊ होता. अबूल फैजीच्या विनंतीवरुन

अकबर बादशाहने फझलला आपल्या सेवेत घेतले. प्रथम तो दिल्ली प्रांताचा दिवाण म्हणून नोकरीस लागला आणि त्यानंतर तो अकबराचा राजनैतिक पत्रव्यवहार पाहू लागला. अबुल फजलची विद्वत्ता व कर्तृत्व पाहून अकबराने त्याला पंचहजारी मनसबदारी दिली होती. अकबराच्या खास मर्जीतील असल्याने त्याचा मुघल दरबारातील नवरत्नामध्ये समावेश झाला. अबुल फजल जसा विद्वान होता तसा धर्मसहिष्णूही होता. अकबराने जे सहिष्णू धार्मिक धोरण राबविले त्यामध्ये तो अबुल फझलचा वारंवार सल्ला घेत असे. अकबराने 'दीने-ए-इलाही' नावाचा जो नवा धर्मस्थापन केला त्याची वैचारिक बैठक, लेखन अबुल फझजलने केलेले होते. मात्र अकबर व जहांगीर यांच्यामध्ये जो वारसा प्रश्न निर्माण झाला त्याच्या द्वेषातून जहांगीराने वीरसिंग बुंदेलाकडून १२ ऑगष्ट १६०२ रोजी अबुल फझलचा खून करविला.

**२) अबुल फजलचे साहित्य :**

मुघल काळातील अतिशय महत्त्वाचा लेखक म्हणून अबुल फजलाचा उल्लेख होतो. अबुल फजल हा अकबराचा जवळचा मित्र व सल्लागार होता. शिवाय त्याच्या विचाराचा अकबरावर प्रभाव होता. अकबराने स्वतःच्या कारकिर्दीचा इतिहास लिहिण्यास अबुल फझलला सांगितलेले होते. त्यामुळे मुघल काळातील अत्यंत महत्त्वाचे साधन म्हणून अबुल फझलच्या साहित्याचा उल्लेख होता तो खालीलप्रमाणे -

**अ) अकबरनामा :**

अकबरनामाचे प्रमुख तीन भाग आहेत. पहिल्या भागात मुघल घराण्याचा तैमूरपासून ते अकबराच्या पहिल्या १७ वर्षापर्यंतच्या कालखंडाचा इतिहास दिलेला आहे. पहिला भाग पुन्हा दोन उपघटकात विभाजित केलेला आहे. पहिल्या उपघटकात अकबराचा जन्म, तैमूर घराण्याची वंशावळ, बाबरचा राज्यविस्तार इ. तर दुसऱ्या उपघटकात अकबराच्या राज्यारोहणापासून पुढील १७ वर्षाच्या घटना नमूद केलेल्या आहेत. अकबरनाम्याच्या या भागात अकबराच्या कार्यकाळातील १७ व्या वर्षापासून ते पुढे ४६ वर्षापर्यंतच्या घटना नमूद केलेल्या आहेत आणि तिसरा भाग 'ऐने-ए-अकबरी'चा आहे. हा भाग म्हणजे एक प्रकारचा स्वतंत्र ग्रंथच आहे.

**ब) ऐने-ए-अकबरी :**

अबुल फझलच्या या अकबरनामा मधील तिसरा भाग म्हणजे ऐने-ए-अकबरी हा ग्रंथ आहे. या ग्रंथात अकबरकालीन अनेक बारीक-सारीक आकडेवारीचा उल्लेख आहे. मुघल साम्राज्याच्या भौगोलिक व ऐतिहासिक घटनांचे विवरण दिलेले आहे. त्याचबरोबर अकबराच्या काळातील विविध संस्थांचे वर्णन दिलेले आहे. हा ग्रंथ पाच उपघटकात विभाजित केलेला आहे. या पाच उपघटकात मुघल साम्राज्यातील सर्वच घटकांचा समावेश केलेला आहे. उदा. शाही परिवार, दरबार, टाकंसाळ, खाद्यानांचे प्रकार, सैन्य, अधिकारी रचना, शिक्षण, जमीनीचे वर्गीकरण, महसूल, सुफी संप्रदाय इत्यादी संबंधी माहिती आहे.

**क) इन्शा-ए-अबुल फजल/ मुक्तुबात-ए-अलामी :**

अबुल फजलने स्वतः जमविलेल्या सरकारी पत्राचा हा ग्रंथ आहे. या ग्रंथाचे तीन भाग आहेत. पहिल्या भागात स्वतः अकबराने विविध सत्ताधिशांना लिहिलेली पत्रे व फर्माने आहेत. दुसऱ्या भागात स्वतः अबुल

फजलने अकबराला लिहिलेली पत्रे आहेत. तर तिसरा भाग अनेक पत्रांची सरमिसळ आहे. या पत्राच्या माध्यमातून अकबरकालीन अनेक ऐतिहासिक घटनावर प्रकाश पडतो.

**ड) रुक्कात–ए–अबुल फझल :**

अबुल फझलच्या व्यक्तीगत पत्राचा संग्रह या ग्रंथात आहे. या ग्रंथाचे संकलन नूर मुहंम्मद याने केलेले आहे. अबुल फझलने अकबर, राजपुत्र, बेगमा, स्वत:चे आई–वडील, भाऊ व इतर सरदाराना लिहिलेली पत्रे आहेत.

**३) अकबरनामाचे लिखाण आणि उद्देश :**

अबुल फझल सन १५७४–१५७५ मध्ये अकबर बादशहाच्या दरबारात दाखल झाला. आपली विवेकबुद्धी आणि वैचारिक बैठकीमुळे तो लवकरच अकबर बादशहाच्या मर्जीत आला. सन १५८९ मध्ये त्याला अकबर बादशहाने अकबरच्या काळातील इतिहास लिहिण्याचा आदेश दिला. अबुल फजलने यासाठी इतिहासाशी संबंधित अरबी व पर्शियन भाषेतील महत्त्वाच्या पुस्तकांचा अभ्यास केला होता. सर्व शाही हुकूम व सरकारी नोंदी त्याच्यासाठी उपलब्ध होत्या. शिवाय तारीख–ए–अल्फीसाठी जमा केलेले साहित्य देखील होते. दरबारामधील सर्व अधिकाऱ्यांना आदेश होते की त्यांनी आपल्या आठवणी आणि महत्वाच्या नोंदी लिहून दरबारात पाठवून द्याव्या. अबुल फजलने स्वत: दरबारातील अनेक अधिकाऱ्यांच्याकडून माहिती प्राप्त केलेली होती. तो दरबारात नोकरीला असल्याने दरबारातील अनेक घडामोडी त्याने आपल्या डोळ्याने पाहिलेल्या होत्या. ज्या घटनांच्यामध्ये मतभेद अथवा तफावत आढळलेली होती त्यासंबंधी त्याने जास्तीत जास्त लोकांच्या कडून माहिती घेतलेली होती.

अबुल फजलचे ध्येय अकबराच्या जीवनातील आध्यात्मिक पैलूवर प्रकाश टाकणे हे होते. अकबराचे 'सुलह–ए–कुल' चे धोरण आणि अकबर बादशाहाचे महान व्यक्तिमत्व सर्वसामान्य लोकांपर्यंत पोहोचवणे हे या ग्रंथाचे उद्दीष्ट होते. फजलच्या मते बादशाहत ही ईश्वराची देणगी आहे. सात वर्षांच्या अथक परिश्रमानंतर अबुल फजलने सन १५९८–९८ मध्ये अकबरनामा हा ग्रंथ पूर्ण करून अकबरासमोर सादर केला. हा ग्रंथ तीन विभागामध्ये विभागलेला आहे. तिसरा भाग 'आइने अकबरी' अर्थात 'ऐन–ए–अकबरी' हा आहे. या पर्शियन ग्रंथाचा इंग्रजी अनुवाद एशियाटिक सोसायटी ऑफ बंगाल यांनी प्रकाशित केला असून त्याचा अनुवाद एच. बेव्हरीज यांनी केला आहे.

**४) अकबरनामा :**

**अ) पहिला भाग :**

पहिला विभाग अकबराच्या जन्माच्या विस्तृत माहितीने सुरू होतो आणि १५ सप्टेंबर १५७२ रोजी समाप्त होतो. अर्थात अकबराच्या सतरा वर्षांच्या जीवनाचा इतिहास त्यामध्ये आहे. याशिवाय यामध्ये सृष्टीची निर्मिती, विविध धर्मांची विचारधारा, अकबरच्या पूर्वजांच्या संबंधीची माहिती आहेत. जसे की तैमूर वंश, बाबरचे

पानिपत युद्ध, मुघल घराण्याची स्थापना, हुमायून आणि सूर घराण्याची कारकीर्द इत्यादीची सविस्तर माहिती दिलेला आहे.

**ब) दुसरा भाग :**

दुसऱ्या भागामध्ये अकबरच्या राज्यारोहणापासून पुढे ४६ व्या वर्षापर्यंतची परिस्थिती दिली आहे. तिसरा भाग म्हणजे ऐन-ए-अकबरी अर्थात अकबरनामा आहे. यामधून फजलची विचारशक्ती, तर्क, तारीख, वर्ष आणि एखाद्या घटनेच्या किती खोलात जायचे याचे दर्शन घडते. दुसरे पानिपत युद्ध, अकबराचा उत्तर भारतातील पराक्रम व मुघल राज्यविस्तार इत्यादीची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**क) तिसरा भाग :**

या भागामधील 'आईन' अकबरच्या कारभाराचे चित्र स्पष्ट करते. मात्र अबुल फजलने आपल्या लेखन शैलीच्या मदतीने शासन प्रणालीमध्ये अध्यात्मवादाचा प्रभाव दर्शविला आहे, की ज्यामुळे हा ग्रंथ अधिक कठीण मात्र रंजक बनवतो. याच्या वेगळ्या स्वरूपामुळे हा भाग 'ऐन-ए-अकबरी' म्हणून ओळखला जातो. 'ऐन अथवा आईन' म्हणजे धोरण, कायदा, अकबराची सर्व धोरणे या भागामध्ये दिलेली आहेत. तिसऱ्या भागाचे पुन्हा पाच पोट भाग आहेत.

**१) पहिला भाग :**

पहिल्या पोट भागामध्ये राजघराण्यातील खाजगी प्रशासन संबंधी ९० कायदे दिले आहेत व राणीवसा (जनानखाना), स्वयंपाकघर (मुदपाकखान), विविध खाद्य पदार्थ, भाजीपाला, फळफळावाचे दर इत्यादी संबंधी माहिती आहे. याशिवाय चित्रकला, टांकसाळ, नाणी पाडण्याचे तंत्रज्ञान, लष्करी धोरण, तोफखाना, हत्ती, ऊंट, घोडदळ, बांधकाम, विविध प्रकारचे कामगार इत्यादी बाबत विस्तृत चर्चा केलेली आहे.

**२) दूसरा भाग :**

दुसऱ्या पोट भागामध्ये सेवक, त्यांची पदे, वेतन, अधिकार, जबाबदाऱ्या, कलाकार, साहित्यिक, संगीतकार, चित्रकार, 'नवरत्न दरबार' इत्यादी संबंधी सविस्तर माहिती दिलेली आहे.

**३) तिसरा भाग :**

तिसऱ्या पोट भागामध्ये अकबरकालीन महसुल पद्धती, महसुलविषयक धोरण, महसुल विभाग, महसुल अधिकारी, त्यांचे वेतन, अधिकार, जबाबदाऱ्या, नियम आणि तत्कालिन भौगोलिक स्थिती, पिके, पाणीपुरवठा, मजूरी, शेतकऱ्यांची अवस्थावर चर्चा केलेली आहे.

**४) चौथा भाग:**

चौथ्या पोट भागामध्ये अकबराच्या सहिष्णू धार्मिक धोरणाची चर्चा आहे. भारतातील या काळातील हिंदुंची धर्मशास्त्रे, तत्वज्ञान, सामाजिक चालीरिती, साहित्य, विज्ञान यासंबंधीची चर्चा करून अकबराने भारतामध्ये आपले सहिष्णू धार्मिक धोरण का? आणि कसे? राबिविले याची माहिती दिलेली आहे.

**५) पाचवा भाग :**

पाचव्या भागामध्ये फजलने अकबर बादशाहाचे संदेश एकत्र केले आहेत. अकबराची वैचारिक बैठक, धोरण, भूमिका इत्यादी समजून घेण्यासाठी हा भाग महत्त्वाचा आहे.

**५) अकबरनामाचे समालोचन :**

**गुण :**

अबुल फझल हा मुघलकालीन प्रसिद्ध दरबारी इतिहासकार होता. त्याचा अकबरनामा हा ग्रंथ ऐतिहासिक दृष्ट्या मौलिक साधन आहे. अकबराच्या कारकीर्दीतील अतिशय महत्वाच्या घडामोडीचा स्वत: फझल साक्षीदार असल्याने त्याच्या लिखाणाला दुजोरा मिळतो. त्याच्या इतिहास लेखनात त्याची प्रखर बुद्धिमत्ता दिसते. तो दरबारी इतिहासकार असल्याने तत्कालीन अस्सल कागदपत्रे त्याने पाहिलेली होती आणि यासंबंधी त्याने विस्तृत टिपणे लिहिली आहेत. पत्रव्यवहार, आदेश, महसुली कागदपत्रे, दरबारी नोंदीचा उपयोग त्याने आपल्या लिखाणासाठी केला असल्याने त्याच्या लिखणाला दर्जा प्राप्त झाला आहे. त्याचे लिखाण प्राथमिक साधनांवर आधारलेला असल्याने मुघल प्रशासनाबाबत वस्तुनिष्ठ आणि तपशीलवार माहिति प्राप्त होते.

**मर्यादा :**

अबुल फजल हा अकबराच्या दरबारातील दरबारी इतिहासकार, अधिकारी, अकबरचा सल्लागार आणि मित्र असल्याने त्याच्या लिखाणात काही मूलभूत स्वरुपाच्या मर्यादा आहेत. अबुल फझल हा एक अकबराचा निष्ठावान सेवक होता, तो स्वत: अकबराला परमेश्वराचे रूप मानत होता. अकबर व मुघलकालीन प्रशासनाची चांगली एकच बाजू फक्त मांडली आहे. दुसरी बाजू यामधून दिसून येत नाही. अकबराची आणि त्याच्या धोरणाची फक्त स्तुती करतो. अकबराची स्तुती करताना तो लिहितो की, ''अकबर की आंख सूर्य के समान है। उसका हृदय सत्यान्वेषण के लिये गुणों की वेधशाला है। उसके ध्येय शुद्ध हैं। उसकी बुद्धि पूर्ण है। वह प्रतिभा सम्पन्न है। उसमें अपार क्षप्राशीलता है। उसका हृदय शुद्ध है। उस पर सांसारिकता का कोई धब्बा नहीं है। इतने असंख्य गुण न जाने कैसे एक व्यक्ति में एकत्र हो गये हैं। मेरी भाषा में इतनी शक्ति नहीं है कि उसकी पर्याप्त प्रशंसा कर सकूँ। उसके गुणों का ज्ञान केवल फरिश्तों को ही है।''

**ब) गुलशन–इ–इब्राहिमी: फिरिश्ता (सन १५५०–१६२३)**

**१) फिरिश्ताचे पूर्व चरित्र :**

मध्ययुगीन मुस्लिम रियासतीचा फार्सी इतिहासकार म्हणून फिरिश्ता परिचित आहे. फिरिश्ताचे संपूर्ण नाव मुहंमद कासिम हिंदू शाह उर्फ फिरिश्ता असे होते. 'फिरिश्ता' चा अर्थ देवाने पाठवलेला दूत असा मानला जातो. फिरिश्ताचा जन्म पश्चिम आशियातील कॅस्पीयन समुद्र किनाऱ्यावरील आस्ताराबाद (इराण) येथे सन १५५० मध्ये झाला. वडिल गुलाम अली याच्याबरोबर तो भारतात आला. अहमदनगरचा निजामशाहा पहिला मुर्तजा याने गुलाम अलीची आपला मुलगा मिरान हुसैन याचा फार्सीचा शिक्षक म्हणून नेमणूक केली. त्यासोबत

फिरिश्ताचेही शिक्षण झाले. मात्र त्याच्या वडिलांचा काही दिवसांतच मृत्यू झाल्याने फिरिश्ताच्या डोक्यावरील वडिलांचे छत्र नाहीसे झाले. निराधार फिरिश्ताला मुर्तजा निजामशाहने आश्रय दिला. त्याचा सांभाळ केला. निजामशाहने आपल्या विश्वासातील एक सेवक म्हणून त्याच्याकडे पुढच्या काळात संरक्षणपथकाची जबाबदारी दिलेली होती. सन १५८७ मध्ये निजामशाहीत प्रचंड अराजकता निर्माण झाली. निजामशाहाचा मुलगा मिरान हुसैनने मुर्तजास पदच्युत करून स्वत:च गादी बळकावली. मात्र वर्षभरातच बंडाळी निर्माण झाली, मिरान हुसैनला पदच्युत केले. पुढे त्याचा खून झाला. फिरिश्ता निजामशाहीतील या सर्व घटनाक्रमात तटस्थ राहिला. अस्थिर राजकीय परिस्थितीत निजामशाहीतील अनेक कर्तबगार सरदार या वेळी विजापूरच्या आदिलशाहीत दाखल झाले. हे पाहून फिरिश्ताही विजापूरच्या दुसऱ्या इब्राहिम आदिलशाहाकडे गेला. आदिलशाहने त्याची फारशी दखल घेतली नाही. शिवाय पंथाने शिया असल्याने त्याला आदिलशाहीतील सुन्नी वातावरण फारसे रुचले नाही. आदिलशाहीतील दिलावरखान नावाच्या अधिकाऱ्याने त्याला सैन्यात नोकरी दिली. फिरिश्ता पुढे आपल्या आयुष्याच्या अखेरपर्यन्त विजापूरमधेच होता आणि तेथेच त्याचा सन १६२३ मध्ये मृत्यु झाला. इतिहासकारांच्यामध्ये त्याच्या मृत्यु बद्दल मतभेद आहेत.

**२) गुलशन–इ–इब्राहिमीचे लिखाण :**

आदिलशाहाच्या सैन्यात नोकरी करीत असताना त्याच्याकडे मीर खूंद (मीरखव्वांद) याने लिहिलेल्या 'रौजतुस्सफा' या ग्रंथाची एक प्रत दिली गेली आणि सन १५९३ मध्ये भारतातील मुस्लिम राजवटीचा अधिकृत इतिहास लिहिण्यास सांगितले. इब्राहिम आदिलशाहच्या आज्ञेवरून त्याने विविध कामानिमित्त सिंध, उत्तर प्रदेश, गुजरात, माळवा, बिहार इत्यादी प्रदेशांत प्रवास करत असताना त्याने त्या–त्या प्रदेशातील इतिहासलेखनास उपयुक्त अशा अनेक महत्त्वाच्या घटनांच्या नोंदी करून ठेवल्या. बहामनी राज्याचे विघटन होऊन निर्माण झालेल्या निजामशाही, आदिलशाही, कुतूबशाही, बरीदशाही आणि इमादशाही या पाचही शाह्यांचा इतिहास फिरिश्ताने लिहिला आहे. सन १६०६ मध्ये त्याने 'तारीख–इ–फिरिश्ता'अथवा 'गुलशन–इ–इब्राहिमी' हा महत्त्वाचा ग्रंथ त्याने फार्सी भाषेत लिहून पूर्ण केला. 'गुलशन–इ–इब्राहिमी' अथवा 'तारीख–इ–नवरसनामा' या नावांनेही तो ओळखला जातो. तत्कालीन ३५ हून अधिक संदर्भग्रंथांचा वापर यासाठी केला असल्याचे म्हटले आहे. अहमदनगरच्या वास्तव्यात त्याने मानवी वैद्यकाचाही अभ्यास केलेला होता असे त्याच्या इख्तियारात–इ–कासिमी अथवा दस्तूरुल अतिब्बा नावाच्या या ग्रंथातील वाग्भट, चरक व सुश्रुत यांचा उल्लेखावरून दिसते. सन १७६८ मध्ये गुलशन–इ–इब्राहिमी मधील सुरूवातीच्या प्रकरणांचे इंग्रजीत भाषांतर कर्नल अलेक्झांडर डोव्ह याने केले आहे. तर दक्षिणेकडील इतिहासविषयक प्रकरणांचे भाषांतर कॅप्टन जॉनथन स्कॉट याने सन १७९४ मध्ये केले आहे. गुलशन–इ–इब्राहिमीचे संपूर्ण इंग्रजी भाषांतर जनरल जे. ब्रिग्ज याने सन १८२९ मध्ये केले. ब्रिग्जच्या इंग्रजी ग्रंथाचा मराठी अनुवाद डॉ. भ. ग. कुंटे यांनी केला असून तो महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने सन १९८२ मध्ये प्रकाशित केला आहे.

**३) गुलशन–इ–इब्राहिमीची मांडणी :**

गुलशन–इ–इब्राहिमी या ग्रंथाची मांडणी प्रस्तावना व उपसंहार वगळता एकूण बारा प्रकरणांत केलेली

आहे. फिरिश्ताने प्रस्तावनेमध्ये भारतात मुस्लिमांचा प्रवेश होण्या पूर्वीचा इतिहास अतिशय संक्षिप्तपणे मांडला आहे. अरबांची पूर्वेकडील यशस्वी घोडदौड कशी झाली याचीही चर्चा केली आहे.

पहिल्या दोन प्रकरणामध्ये गझनी, लाहोर, दिल्ली येथील मुघलासह इतर मुस्लिम राजवटींची माहिती आहे. प्रकरण तीनमध्ये दक्षिण भारतातील गुलबर्गा, विजापूर, अहमदनगर, बीदर, एलिचपूर, गोवळकोंडा या राजधान्या असलेल्या मुस्लिम रियासतींचा विस्तृत इतिहास आहे. चार ते दहा प्रकरणांत गुजरात, माळवा, खानदेश, बंगाल, बिहार, मुलतान, सिंध व काश्मीर येथील मुस्लिम राजवंशांची चर्चा केलेली आहे. अकरावे प्रकरण मलबारसंबंधी असून बाराव्या प्रकरणात हिंदुस्थानातील तत्कालीन संतमहंतांची माहिती आहे. उपसंहारात भारताची भौगोलिक, विशेषतः हवामानविषयक माहिती आढळते.

**४) गुलशन–इ–इब्राहिमीचे समालोचन :**

**गुण :**

गुलशन–इ–इब्राहिमी हा ग्रंथ विजापूरची आदिलशाही आणि अहमदनगरची निजामशाही यांच्याबद्दलचा अधिकृत इतिहास सांगणारा प्रसिद्ध ग्रंथ आहे. फिरिश्ता दोन्ही दरबारांमध्ये नोकरीला असल्याने त्याला दरबारातील घटना, अधिकाऱ्यांची चांगली माहिती होती. दरबारी दफ्तरखान्यातील कागदपत्रे त्याला पाहता आली, त्याशिवाय त्याने इतर अनेक ग्रंथांच्या अभ्यास करून या ग्रंथाची मांडणी केली आहे.

**मर्यादा :**

फिरिश्ताने आपल्या गुलशन–इ–इब्राहिमीच्या माध्यमातून मुस्लिम राजवटीच इतिहास कथन करताना काही मूलभूत चुका केलेल्या आहेत. सुलतानांचे पराक्रम सांगताना त्याने अतिशयोक्ती, खोटी माहिती आणि वर्णने दिलेली आहेत. विजयनगर साम्राज्यबद्दल त्याचे गैरसमज असल्याने, त्याच्या विषयी लिखाणातून आकस दिसतो. दक्षिणेतील हिंदु धर्म आणि मंदिरासंबंधी अत्यंत चुकीचे वर्णन केले आहे. फिरिश्ताचा इतिहास ग्राह्य मानला तर इब्राहिम आदिलशाह दुसरा याच्या हिदु धोरणावर प्रश्नचिन्ह उभे राहते. खरे तर तो अतिशय सहिष्णू वृतीचा होता हे इतर समकालीन साधनंच्यामधून स्पष्ट होते.

**⁕ स्वय अध्ययन प्रश्न क्रमांक १**

**रिकाम्या जागा भरा.**

१) अबुल फझलचे संपूर्ण नाव .......... असे होते.

२) अबुल फजलचे पूर्वज पंधराव्या शतकाच्या आसपास.......... मध्ये स्थायिक झाले होते.

३) अबुल फजलचा जन्म आग्रा येथे .......... रोजी झाला.

४) अकबराने .......... नावाचा नवा धर्म स्थापन केला.

५) अबुल फझलच्या अकबरनामा मधील तिसरा भाग म्हणजे .......... हा ग्रंथ आहे.

६) अकबरनामाच्या दुसऱ्या भागामध्ये अकबरच्या सिंहासनापासून पुढे .......... व्या वर्षापर्यंतची माहिती आहे.

७) फिरिश्ताचा जन्म पश्चिम आशियातील कॅस्पीयन समुद्र किनाऱ्यावरील .......... येथे झाला.

८) फिरिश्ताचा मृत्यु विजापूर येथे .......... मध्ये झाला.

९) गुलशन-इ-इब्राहिमी हा ग्रंथ .......... या नावानेही तो ओळखला जातो.

१०) गुलशन-इ-इब्राहिमीचा मराठी अनुवाद .......... यांनी केला आहे.

### १.२.२ पुरातत्त्वीय साधने (स्मारके वगळून) :

लिखित साधनांच्या बरोबर शिलालेख, ताम्रपट, स्तंभालेख, नाणी, मूर्ती, भांडी, चित्रे, शस्त्रास्त्रे, अवजारे इमारतीचे अवशेष व भित्तीचित्रे यासारखी भौतिक साधने उपयुक्त ठरतात संस्कृतीच्या या साधनाच्यावरून सामाजिक, आर्थिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकता येतो. १८ व्या शतकात सर विल्यम जोन्स यांनी भारतात पुराणवस्तू संशोधनाची सुरुवात करून संशोधकांना इतिहासाचा अमूल्य ठेवा उपलब्ध करून दिला आहे. मध्ययुगीन भारताच्या मुघल कालखंडातील (सन १२२६ ते १७०७) इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी विपुल स्वरूपात वाड्:मयीन साधने (लिखित) उपलब्ध आहेत. अर्थात या लिखित साधनांच्या तुलनेने मुघल कालखंडातील पुरातत्त्वीय साधने तुलनेने कमी आढळतात. हे जरी खरे असले तरी ही साधने वाड्:मयीन साधनापेक्षा विश्वासार्ह असतात आणि आहेत. या साधनांमधून प्राप्त झालेली माहिती वस्तुनिष्ठ असल्याने त्यांच्या मदतीने इतिहासाचे विश्लेषण करणे सोपे जाते.

#### १) शिलालेख :

शिलालेख, ताम्रपट, नाणीही इतिहास लेखनाच्या दृष्टिकोनातून महत्वाचे साधन आहे. इतिहासाचे अस्सल साधन म्हणून यांचा खूपच उपयोग होतो. प्राचीन भारताच्या तुलनेत मध्ययुगीन कालखंडातील आढळणाऱ्या शिलालेखांचे प्रमाण फारच कमी आहे. सदरचे शिलालेख किल्ले, राजवाडे, पडक्या इमारती, कबरी व देवालयावर आढळतात. शिलालेखावरून सुलतानांची नावे, कालखंड, राज्याच्या सीमा इत्यादींच्या संबंधी माहिती मिळते. यामधून तत्कालीन प्रशासकीय, आर्थिक व सामाजिक इतिहासाशी संबंधीत बरीच माहिती प्राप्त होते.

डॉ. अली असगर हिकमत इशिराजी यांनी संपादित केलेले 'एपिग्राफिया-इंडो-मुस्लमिका' (Epigraphia-Indo-Moslemica) मध्ये ऐतिहासिक स्मारकावरील फार्शी शिलालेख पाहावयास मिळतात. काही शिलालेख व ताम्रपट, मॅकेन्झी-संग्रह आणि सी. पी. ब्राऊनच्या लोकल रेकॉर्डस् मध्ये ही समाविष्ट करण्यात आले आहेत. वा. सी. बेंद्रे यांनी -'Story of Muslim Inscriptions ' हा ग्रंथ लिहिला असून ग्रंथामध्ये मध्ययुगीन भारतातील उपलब्ध आलेख, शिलालेख, ताम्रपट यांची टिपणासह क्रमबद्ध माहिती देण्यात आली आहे. भोसले घराण्याच्या

वंशावळीची माहिती बृहदेश्वर (तंजावर) मंदिरातील शिलालेखावरून मिळते. या कालखंडातील आग्र्यामधील जामा मशिदीवरील फारशी शिलालेख, ताजमहालमधील शिलालेख इत्यादीवरून मुघल घराण्याचा अभ्यास होतो.

**२) ताम्रपट/अभिलेख :**

मध्ययुगीन मुघल कालखंडाच्या इतिहासलेखनासाठी शिलालेख इतकेच ताम्रपट या साधनाला महत्त्व आहे. ताम्रपट हा भौतिक साधनाचा महत्त्वाचा भाग आहे. तांब्याच्या पत्र्यावर कोरलेला लेख म्हणजे ताम्रपट अथवा ताम्रशासन होय. इतिहासलेखन व पुनर्लेखनासाठी अतिशय उपयुक्त व विश्वसनीय साधन म्हणून याचा उपयोग होतो. कारण ताम्रपटावरील नोंदी स्पष्टपणे व नि:सदिग्धपणे कोणतीही खाडाखोड न करता केलेल्या असतात. या लेखांच्यामधून धर्माज्ञा, धर्मोपदेश, राजज्ञा, राज्यकृत्ये, राजसूती, आज्ञापत्रे, वतनपत्रे, नीतीतत्वे, पदव्या, वंशावळी इत्यादी संबंधी माहिती कोरलेली आढळते.

**३) नाणी :**

पुरातत्त्वीय साधन म्हणून नाण्यांचे अनन्यसाधारण स्थान आहे. इतिहासाच्या साधनापैकी हे एक अविनाशी साधन आहे. तत्कालीन कालखंडाच्या इतिहासलेखनासाठी नाणी हे अतिशय विश्वासार्ह भौतिक साधन आहे. ग. ह. खरे यांनी 'मंडळातील नाणी' हा ग्रंथ प्रकाशित केलेला असून त्यांनी दिल्ली सुलतानशाहीची काही नाणी प्रकाशित केलेली आहेत.

विविध धातूच्या नाण्यांच्या उपलब्धतेवरुन तत्कालीन राजाची आर्थिक परिस्थिती लक्षात येते. एखाद्या राजाची नाणी कोण-कोणत्या प्रदेशात अथवा देशात सापडतात त्यावरून त्या राज्याचा साम्राज्यविस्तार, नाण्याचे विनीमय मुल्य व परकीय व्यापार कशाप्रकारचा असावा यावरही प्रकाश पडतो. राजाचे अथवा बादशहाचे नाव, वडिलांचे नाव, नाणे पाडल्याचे वर्ष, काही वेळा महिना, ज्या ठिकाणी नाणे पाडले त्या टांकसाळीचे नाव मिळते. नाण्यामुळे राज्यकर्त्यांच्या अधिपत्याखालील प्रदेश, ठिकाण, हिजरी वर्ष याची माहिती मिळते. जेव्हा एक नवा राज्यकर्ता गादीवर येत असे तेंव्हा असा प्रघात होता की, शुक्रवारच्या नमाजमध्ये त्याचे नाव घेऊन नमाजप्रसंगी खुतबा पठण केले जात असे. इस्लाम धर्मियांतील प्रजेला आजपासून नवा राजा झाला याची माहिती होत असे तर इतर धर्मियांना देखील ही माहिती व्हावी म्हणून लगेचच त्या राजाच्या नावाची नाणी पाडली जात आणि व्यवहारासाठी प्रचलित केले जात. त्यामुळे इतर प्रांतीय राज्यकर्त्यांना देखील याची माहिती होत असे. तत्कालीन काही नाण्यांवर कुराणातील धर्म प्रार्थना, कलीमा, चार खलिफांची नावे पहावयास मिळतात. मात्र ही प्रथा औरंगजेबच्या काळापासून बंद करण्यात आली. नाण्यावर येणारे विविध चिन्ह संस्कृतीचे प्रमाण ठरतात तसेच राजाचे चित्र, विविध राशींवर आधारीत काढलेली नाणी (जहाँगीरच्या) काळातील पहावयास मिळतात तर अकबराची अशिरगड, आग्रा येथून पाडलेल्या नाण्यांवर पक्ष्यांची चित्रे पाहावयास मिळतात. मुघल काळात १६ जुलै ६२२ पासून प्रामुख्याने हिजरी कालगणना वापरण्यास सुरवात झाल्यामुळे नाण्यांवर देखील हिजरी सन पहावयास मिळते. ज्या दिवशी मुहंमद पैगंबर मक्केहून मदीनेस (सन ६२२) गेले त्या दिवसापासून या काळाची गणना सुरु झाल्याने हे वर्षासन मुस्लिम शासकाच्या व तसेच इतर राज्यकर्त्यांनी

मुस्लिम बादशहाच्या नावाने पाडलेल्या नाण्यांवर आढळते.

मुघल कालखंडात हुमायूनपासून सर्वच मुघल सम्राटांनी सोने व चांदीची नाणी पाडल्याचे दिसून येते. मुघल काळात सोने, चांदी व तांबे इत्यादी विविध प्रकारची नाणी पाडण्यात आली. बाबर व हुमायून यांच्या कारकिर्दीतील 'शारूखी'व 'दिरहम'ही चांदीची नाणी होती. हुमायूनच्या कारकिर्दीपासून सोन्याच्या नाण्याचा वापर झाल्याचे दिसते, अर्थात ती वजनाने लहान होती. शेरशहाने रुपया हे चांदीचे नाणे तर दाम व टंका हे तांब्याचे नाणे सुरू केले. आधुनिक भारताला शेरशहाने दिलेली देणगी म्हणजे रुपया ही नाणे होय. मुहर हे मुघल कालीन सोन्याचे नाणे प्रसिद्ध असून विशेषतः जहांगिराच्या काळातील मुहरा या अतिशय आकर्षक होत्या. शेरशहाने सुरू केलेल्या दाम व टंका या नाण्यांना अनुक्रमे 'फुलस' व 'टंका-ए-अकबरशाही' असे नाव देण्यात आले. मुघल सम्राट जहांगीरच्या काही नाण्यांवर त्याच्या नावाबरोबर त्याची पत्नी नूरजहाँचेही नाव कोरलेले आढळते. अकबराच्या काही नाण्यांवर बदकाचे तर काही नाण्यांवर 'राम-सीता' यांचे चित्र कोरले आहे. जहांगिराच्या काही नाण्यांवर मेंढा, काही नाण्यांवर सूर्य, राशीचक्र इत्यादी प्रतिमा आढळतात. शहाजहान व औरंगजेबाच्या कारकिर्दीत नाण्यांचा दर्जा घसरल्याचे दिसते. या काळात मुहर, रुपया व निसार ही नाणी अस्तित्वात होती.

**४) वस्त्रे, धातू कलावस्तु :**

मुघल काळात ओरिसा, बंगाल, गुजरात, खंबायत, बुराहणपूर, लाहोर, जौनपूर, अलाहाबाद, बनारस, पाटणा, अवध, ढाक्का, लखनौ इत्यादी कापडनिर्मिती केंद्रे होती. विशेष प्रकारच्या रेशीम कापडासाठी पैठण, आग्रा, खंबायत ही शहरे प्रसिद्ध होती. लाहोर मधील 'ओर्मेसिन' व 'मच्छिवारा काफ्ता' हे कापड प्रकार प्रसिद्ध होते. सरहिंद येथे लालशालू व चिटाचे कापड तयार होत होते. बनारस येथील 'मिरीरकुल' हे कापड प्रसिद्ध होते. अकबराने लोकर उत्पादनाला उत्तेजन दिलेले दिसते. आज मुघल काळातील कोणत्याही स्वरूपाची वस्त्रे प्राप्त होत नसली तरी तत्कालीन चित्रावरून याची माहिती प्राप्त होते. भारतातील वेगवेगळ्या प्रांतांत भिन्न प्रकारची वेशभूषा अस्तित्वात होती. कपड्यावरुन व्यक्तीचा समजतील दर्जा कळून येतो. विविध प्रथा, परंपरा, सण-उत्सव यातील वैविध्य वस्त्रावरून समजून घेण्यास मदत होते. विविध स्तरातील स्त्री-पुरुष यांच्यातील विविध वस्त्र प्रकार याचे आकलन होते.

मुघल काळात स्त्रियांबरोबरच सर्व स्तरातील व्यक्ति, मुघल सम्राट व अमीर-उमरावाना विविध प्रकारच्या दाग-दागिन्यांची हौस होती. शिरपेच, अंगठ्या, हातकडे, कमरपट्टे, पैजण, कंगन, बाजूबंद, माळ, मोत्यांचे हार, रत्नांचे हार, नथ, बाजूबंद, बाहुभूषण इत्यादी प्रकारच्या अनेक दाग-दागिन्यांचा समावेश होतो. अकबर, जहांगीर व शाहजहान या सम्राटांच्या काळात धातुकाम मोठ्या प्रमाणात चालू होते. वस्त्रकाम अकबर व जहांगीर यांच्या काळात अधिक झाले. मध्य आशियात सापडणाऱ्या विविध रंगांच्या छटा असलेल्या, मात्र पांढऱ्या व गडद हिरव्या पारदर्शक हरितमण्यांच्या दगडांतून जडावकामाच्या साहाय्याने विविध वस्तू तयार केल्या जात. ह्या दगडाचा पृष्ठभाग घोटून गुळागुळीत करून त्यावर कोरीवकाम केले जाई. अधिक प्रमाणात कोरून त्यामध्ये सोने, मौल्यवान खडे विशिष्ट पद्धतीने जडवून अलंकरण केले जात. उदा. हुक्कापात्र, मद्यपात्र, झुंबर, हत्यारांच्या

मुठी, गृहोपयोगी वस्तू इत्यादीचा समावेश होतो. या वस्तूंचे आकार आकर्षक व वैशिष्ट्यपूर्ण असत. पिंपळपान, गुलाबपुष्प आदी आकारांत घडवलेली जहांगीर कालीन मद्यपात्रे अतिशय मनोहारी आहेत. वेगवेगळ्या प्राण्यांची शीर्षे त्याकाळच्या हत्यारांच्या मुठीवर कोरलेली आढळतात. त्यात हत्ती, घोडा, वाघ, बोकड इ. प्राण्यांचा समावेश आहे. दिल्ली व हैदराबाद येथील वस्तुसंग्रहालयांत या जडाव कामातील महत्त्वाच्या वस्तू तसेच मीनाकारीतील वैशिष्ट्यपूर्ण वस्तू प्रदर्शित केलेल्या दिसतात. मीनाकारीची कला सोने, चांदी व पितळ या धातूंवर केली जात असे. हैदराबादजवळील बीदर जिल्ह्यात बीदरीकाम म्हणून नावारूपाला आलेली या तंत्राची खास पद्धती विशेष उल्लेखनीय आहे. बीदरीकामाचा वापर करून सुरया, फुलदाण्या, दागिन्यांच्या पेट्या, अत्तरदाण्या, पानसुपारीची तबके अशा विविध वस्तू घडविल्या जात. या वस्तूंना मोर, बदक, गुलाबपुष्प असे विविध मोहक आकार देत. गोलाकार, वाटोळ्या, घंटाकृती इ. विविध आकारांतही काही वस्तू बनवल्या जात. लघुचित्राच्या कामात जसे तीनचार चित्रकार एकाच चित्रावर काम करीत, तसेच या कामातही एकाच वस्तूवर तीनचार कारागीर काम करीत.

**५) बाग-बगीचे व कालवे :**

मुघल कालखंडात अनेक बाग-बगीचे तयार करण्यात आले. यावर पर्शियन बागांचा प्रभाव जाणवतो, याला चारबाग पद्धती म्हणतात. मुघल बादशहानी  दिल्ली, आग्रा आणि इतर ठिकाणी फळा-फुलांच्या बागा लावल्या. जहांगीर बादशहाने काश्मीरमध्ये 'शालिमार उद्यान' 'निशांत बाग' निर्माण केली. दिल्ली मधील 'हुमायूँ का मकबरा बाग', आग्रा येथील ताजमहाल बाग, आर्म बाग, मेहेताब बाग, रामबाग, जहराबाग,  पिंजोर मधील यादवेन्द्र बाग, इलाहाबाद मधील खुसरो बाग इत्यादींचा उल्लेख करता येईल. शहाजहान द्वारा निर्मित 'अंगुरीबाग' प्रसिद्ध आहे. मुघल बादशहांच्या बरोबर राजस्थानमधील राजपूत राजांनी जोधपूर, उदयपूर, बिकानेर व जयपूर इत्यादी ठिकाणी अनेक बाग- बगीचे तयार केले. या काळात कालवे व बंधारे बांधून शेतीला व जनतेला पाणीपुरवठ्याची सोय केली जाई. पंजाब, सिंध, लाहोर, गोवळकोंडा इत्यादी ठिकाणी तलाव बांधून शेतीला पाणीपुरवठ्याची सुविधा पुरवण्यात आल्याचे उल्लेख मिळतात. मेवाड मधील 'धेवर' सरोवर प्रसिद्ध होते. शहाजहान व जहांगीरच्या कालखंडात तलाव निर्मितीवर भर देण्यात आला. शहाजहानने रावी नदीपासून लाहोरपर्यंत ९८ मैल लांबींचा कालवा काढला. शहाजहानने 'नहर- ए-साहिब' हा फिरोज तघुलकाचा कालवा दुरुस्त करून त्याची लांबी पुढे ६० मैल वाढविली. त्याचे नूतनीकरण करून 'नहर-ए-शाह' असे त्याचे नामकरण केले होते. सन १६१५ मध्ये बुरहानपूर येथे तब्कुतुल अर्ज याने बांधलेला कालवा प्रसिद्ध आहे. मुघल काळातील बाग-बगीचे, धरणे व कालवे काही उत्तम स्थितीत तर काही अवशेषरूपाने पहावयास मिळतात. तत्कालीन मुघल कालखंडाच्या इतिहासलेखनासाठी ही सर्वांत विश्वसनीय साधने समजली जाते. या वरुन इतिहास संशोधकास तत्कालीन बांधकाम कला, स्थापत्य तंत्रज्ञान, पाणी व्यवस्थापन, शेती पद्धती, आवड-निवड, अभिरुचि इत्यादीवर प्रकाश टाकण्यास मदत होते.

**६) राजवाडे, गढ्या आणि किल्ले :**

मुघल कालखंडातील इतिहासाचे आणखी एक महत्त्वाचे भौतिक साधन म्हणजे विविध राजवाडे, गढ्या

आणि किल्ले हे आहे. या पुरातत्त्वीय साधनाच्या माध्यमातून मुघल स्थापत्य कलेचा इतिहास जाणून घेणे सोपे होते. मुघल बादशाहांना स्थापत्य कलेची आवड असल्याने त्यांनी इतर वास्तूंबरोबरच राजवाडे, गढ्यांची बांधकामे मोठ्या प्रमाणावर केली. शेरशहाने बांधलेला पुराना किल्ला, अकबराच्या काळात बांधलेला आग्र्याचा किल्ला, लाहोरचा किल्ला, याशिवाय त्याने अजमेर, मेरठ, कटक इत्यादी ठिकाणी किल्ले बांधलेले आहेत. शहाजहानच्या काळात बांधलेला लाल किल्ला जग प्रसिद्ध आहे. निजामशाही व आदिलशाही कालखंडातील अनेक किल्ले आज दक्षिण भारतात आपले अस्तित्व टिकवून आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या किल्ल्यांच्या बळावरच मुघल आणि अदिलशाहा सारख्या शत्रूना नामोहरण केले आहे.

मुघल बादशाहाबरोबर राजपूत राजांनीही भव्य राजवाडे बांधले. या राजवाड्याच्या भोवती संरक्षणासाठी तटबंदी व खंदकाच्या सोयी करून ठेवलेल्या असत. या राजवाड्यामध्ये राजकुमार व राजकुमारीची दालने, राजांचे महाल, राणी महाल, दास व दासी यांच्या निवासाची सोय असे. उदा. दिल्ली, आग्रा, शहाजहानबाद, फत्तेपूर सिक्री, जयपूर, जोधपूर, इत्यादी ठिकाणी निवास व संरक्षणासाठी अनेक गढ्यांची बांधकामे केलेली होती. या साधनांवरून तत्कालीन राजकीय व लष्करी स्थितीची माहिती आणि संशोधन करू शकतो. आजही भारताच्या कानाकोपऱ्यात मुघल कालखंडातील या वस्तूंचे भग्न अवशेष शेकडो वर्षे ऊन, वारा व पाऊस यांचा मारा सहन करूनही अस्तित्व टिकवून आहेत. वरील सर्व पुरातत्त्वीय साधने मुघल इतिहासाची महत्त्वाची साधने असून त्यांच्या माध्यमातून तत्कालीन स्थापत्यशास्त्रीय इतिहास जाणून घेणे सोपे होते. मध्ययुगीन कालखंडात मुस्लिम आक्रमकांच्यानंतर भारतीय वास्तूकलेमध्ये झालेला बदल, छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात दुर्गस्थापत्य क्षेत्रात झालेली क्रांती यांचा अभ्यास करण्यासाठी या वास्तू अवशेषांचे महत्वाचे स्थान आहे. स्थापत्य शास्त्राचा उत्कृष्ठ नमुना असलेले हे किल्ले आजही अस्तित्वात आहेत. या अवशेषावरून संशोधक विविध कालखंडातील आणि राज्यकर्त्यांची दुर्गनिती अभ्यासू शकतो. मुघल कालखंडातील जाळीकाम, नक्षीकाम यांना महत्त्वपूर्ण स्थान आहे. मुघल कालीन राजमहाल अशा पद्धतीच्या नक्षीकामांनी सुशोभित करण्यात येत असत. या नक्षीकामांमध्ये पानाफुलांची नक्षी प्रामुख्याने कोरली जात. विविध राजवाड्यांवर, किल्ल्यांवर व सरदारांच्या घरांवर अनेक प्रकारची काष्ठशिल्पे कोरलेली असत. आजही त्यांचे अवशेष पाहावयास मिळतात.

**७) शस्त्रास्त्रे व अवजारे :**

पुरतात्वीय साधंनांच्यामध्ये विविध प्रकारची शस्त्रास्त्रे व शेतीची अवजारे यांचा समावेश होतो. भारत आणि परदेशातील विविध वस्तुसंग्रहालयांच्यामध्ये शस्त्रास्त्रे व अवजारे पाहावयास मिळतात. तत्कालीन युद्धशास्त्राचा आणि शेतीचा अभ्यास करण्यासाठी ही साधने महत्वाची आहेत. बाबराने पानिपतच्या युद्धात पहिल्यांदा तोफाचा वापर केला, बंदुकांचा वापर सुरू झाला. पारंपरिक युद्ध शास्त्रात खूप मोठा बदल घडून आला. किल्ला स्थापत्य शास्त्रात झालेला बदल आणि शास्त्रास्त्रे यांचा या वस्तु अवषेशावरून अभ्यास केला जावू शकतो. ते एक महत्वाचे साधन आहे. मुघल काळातील ढाल, तलवार, भाला, धनुष्यबाण, कट्यार, खंजीर, दांडपट्टा,

सुरा-बरचा, वाघनखे, बंदुका, तोफा, जिरेटोप, चिलखत, शिंगाडा इत्यादी सारखी अनेक शस्त्रास्त्रे पहावयास मिळतात. या शस्त्रास्त्राच्याद्वारे तत्कालीन लढाईमध्ये कोणकोणती शस्त्रे वापरली गेली असून त्या लढाईचे तंत्र कसे होते यावरही प्रकाश टाकता येतो. मुघलकालीन शेतीशी संबंधित विविध आवजारांच्यावरून शेती पद्धतीचा अभ्यास केला जावू शकतो.

**८) पुराणवस्तू/ उत्खनित अवशेष :**

मानवी जीवनातील विविध प्रकारच्या नित्योपयोगाच्या वस्तू म्हणजे गतकालीन समाज जीवनाचा एक प्रकारे आरसा असतो. या वस्तूंच्या माध्यमातून समकालीन सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक जीवनाचे चित्र प्रतिबिंबीत झालेले असते. ज्या ठिकाणी उत्खनन होते त्या उत्खननामध्ये तत्कालीन संस्कृती अथवा वसाहतीचे विविध थर आढळतात. या थरांच्यामध्ये विविध प्रकारच्या मानवी वापरातील वस्तू आढळतात. यामध्ये भांडी, खापरे, अलंकार, शस्त्रास्त्रे, खेळणी, मणी, कलाकुसरीच्या वस्तू, मानवी सांगाडे, विविध प्राण्याचे सांगाडे, धार्मिक साहित्य, मुर्त्या अशा कितीतरी प्राप्त वस्तूंच्यावरून त्या थरांचा कालखंड निश्चित करता येतो. तत्कालीन संस्कृतीचे आकलन होण्यास मदत होते. उत्खननात प्राप्त मानवी व प्राण्याचे सांगाडे यावर रासायनिक प्रक्रिया कार्बन १४ व रेडिओ कार्बन रासायनिक प्रक्रिया करून त्यांचा काळ, वय, वंश, त्यांच्या मृत्यूचे कारण, प्राण्यांचे प्रकार इत्यादी अवगत होण्यास मदत होते. उत्खनीत अवशेषांमध्ये प्राप्त झालेली मातीची भांडी अथवा खापरे अतिशय महत्वाची असतात. असे म्हटले जाते की, मातीची खापरे ही पुरातत्व विद्येची मुळाक्षरे आहेत. मातीची भांडी मानव हजारो वर्षापासून वापरत आहे, परंतु ते बनविण्याचे तंत्रज्ञान प्रत्येक देशात वेगवेगळे असलेले आढळते. या मातीच्या भांड्यावरून व त्यावरील चित्रकलाकृतीवरून तत्कालीन मानवी संस्कृती, जीवनमान, व्यवसाय, कलात्मक जीवन इत्यादींवर प्रकाश पडतो.

मुघल कालखंडात वापरली जाणारी शेतीची अवजारे, शिकारीसाठी वापरली जाणारी हत्यारे व युद्धातील विविध शस्त्रास्त्रे यावरून तत्कालीन कृषक जीवन कशाप्रकारे होते, तो कशा प्रकारची शेती करित असावा किंवा शेतीचे तंत्रज्ञान काय असावे या संबंधी माहिती मिळते. शिकारीच्या हत्यारावरुन आदिम अवस्थेपासून मानवी जीवनात झालेला बदल, शिकारीच्या पध्दती व हत्यारांवरून तो कशाप्रकारे व कोणत्या प्राण्याची शिकार करीत असावा या संबंधी माहिती मिळते. विविध प्रकारची हत्यारे व शस्त्रास्त्रांमधून धातू व तंत्रज्ञानात झालेला बदल अभ्यासण्यास मदत होते.उत्खनीत अवशेषांमध्ये दैनंदिन वापरातल्या असंख्य वस्तू प्राप्त होतात. यामध्ये सौंदर्य प्रसाधने, धान्याचे कण, बांगड्या, अलंकार, खेळणी इत्यादी स्वरूपाच्या अनेक वस्तू आढळून येतात. दैनंदिन वापरातल्या वस्तूतून सामान्य माणसाचा इतिहास रेखाटला जाऊ शकतो. सामान्य माणसापासून ते राजे-रजवाड्यापर्यंतच्या वस्तू उत्खननातून प्राप्त होतात. मुलाच्या खेळण्यावरून तत्कालीन दळणवळणाच्या साधनांची कल्पना येवू शकते. विविध प्रकारच्या अलंकारातून त्या-त्या काळातील कलात्मकता कळते, शिवाय ते अलंकार विशिष्ट काळाचा निर्देश करणारे असतात. कारण कलाकुसरीचाही विशिष्ट काळातील एक पोत असतो. यामधून तत्कालिन सांस्कृतिक इतिहास कळतो.

● **स्वय अध्ययन प्रश्न क्रमांक २ :**

**रिकाम्या जागा भरा.**

१) भोसले घराण्याच्या वंशावळीची माहिती ........ मंदिरातील शिलालेखावरून मिळते.

२) ......... वरील नोंदी स्पष्टपणे व नि:सदिग्धपणे खाडाखोड न करता केलेल्या असतात.

३) शुक्रवारच्या नमाजमध्ये बादशहाचे नाव घेऊन नमाजप्रसंगी ....... पठण केले जात असे.

४) ............ च्या काळात चार खलिफांची नावे लिहिण्याची प्रथा बंद करण्यात आली.

५) अकबराची ......... येथे पाडलेल्या नाण्यांवर पक्ष्यांची चित्रे पाहावयास मिळतात.

६) ......... मधील 'ओर्मेसिन' आणि 'मच्छिवारा वाफ्ता' हे कापड प्रकार प्रसिद्ध होते.

७) जहांगीरने बादशहाने काश्मीरमध्ये ......... बाग निर्माण केली.

८) बुरहानपूर येथे ............... याने बांधलेला कालवा प्रसिद्ध आहे.

९) ........... च्या काळात बांधलेला लाल किल्ला जग प्रसिद्ध आहे.

१०) बाबराने पानिपतच्या युद्धात पहिल्यांदा ............. चा वापर केला.

## १.२.३ परकीय प्रवाशांची वर्णने: फ्रांन्सिस बर्नियर, निकोलाव मनूची :

मुघल कालखंडात अनेक परकीय प्रवासी भारतात येवून गेले. यातील अनेक प्रवासी मुघल दरबारात नोकरीस राहिले तर काहींनी मुघल दरबारला भेट दिली. या प्रवाशांनी आपल्या वास्तव्याच्या काळात तत्कालीन राजकीय, सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक विषया संबंधी आपली निरक्षणे नोंदवून ठेवलेली होती. ही सर्व माहिती भारतात अथवा आपल्या मायदेशी गेल्यानंतर ती सविस्तर शब्द केलेली आहे. त्यांचे हे प्रवास वृतांत मध्यकालीन भारताचे एक समकालीन साधन म्हणून महत्वाचे आहे, आपण प्रस्तुत उपघटकात फ्रान्सिस बर्नियर व निकोलाव मनुची यांच्या प्रवास वृतांताचा अभ्यास करणार आहोत.

### अ) फ्रान्सिस अथवा फ्रान्सिस बर्नियर :

### १) फ्रान्सिस बर्नियरचे पूर्व चरित्र :

बर्नियर हा फ्रेंच डॉक्टर होता. त्याचा जन्म पश्चिम फ्रान्समधील 'अंजू' प्रांतामधील इवे या गावी शेतकरी कुटुंबात त्याचा जन्म झाला. बालपणीच तो अनाथ झाल्याने त्याचे पालनपोषण चुलत्याने केले. पॅरिसमध्ये आपले शिक्षण चालू केले. शेपेल नावाचा श्रीमंत मित्राच्या माध्यमातून त्याची मोठ-मोठ्या व्यक्तींशी त्याचा परिचय झाला, यातूनच त्याचा डि अरपाण या फ्रेंच राजदूताच्या तो संपर्कात आला. सन १६४७ पासून त्याचा युरोपप्रवास सुरु झाला. इंग्लंड, जर्मनी, पोलंड इत्यादी देशांना भेटी दिलेल्या होत्या. प्येअर गासँदी (१५९२-

१६५७) या फ्रेंच तत्त्ववेत्त्याच्या मार्गदर्शनाखाली शारीरक्रिया विज्ञानाची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्याने वैद्यकशास्त्राचा अभ्यास करून एम.डी. ही पदवी संपादन केली (१६५२) व नंतर त्याच वर्षी तो पॅरिसला गेला. वैद्यकीय शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्याचा पूर्वेकडील देशांचा प्रवास सुरु झाला. त्याने याकाळात पॅलेस्टाईन, इजिप्त, अरेबिया इत्यादी देशांना व शहरांना शहरांना भेटी दिल्यानंतर तो ईजिप्तला गेला (१६५६-५८). त्याला प्लेगच्या आजाराने पछाडल्याने तेथे तो एक वर्ष राहून सन १६५८ मध्ये तो भारतात सुरत येथे आला. मुघल दरबारात शहजादा दाराशुकोहच्या पदरी तो वैद्य म्हणून होता. दाराशुकोहच्या मृत्युनंतर तो औरंगजेबाच्या काळात मुघल दरबाराशी संबंधित होता. त्याने मुघल दरबारातील वारसा युद्ध प्रत्यक्ष पहिले होते, तो त्याचा साक्षीदार होता. सन १६६४-६५ च्या दरम्यान त्याने बादशाहच्या आदेशानुसार काश्मीरला भेट दिली. याशिवाय त्यांने भारतातील सुरत, अहमदाबाद, बंगाल, दिल्ली, गोवळकोंडा, मच्छलीपट्टणम, विजापूर व औरंगाबाद इत्यादी शहरांना भेटी दिल्या. सुरतहून तो १६६८ मध्ये मायदेशी परतण्यासाठी शीराझला (इराण) गेला व मार्सेहून पॅरिसला पोहोचला असावा.

### २) प्रवास वृतांताचा उद्देश :

मुघल काळातील माहिती मिळणारे एक ऐतिहासिक साधन म्हणून बर्नियरचा प्रवास वृत्तांत महत्वाचा आहे. सन १६६९-७० मध्ये तो पॅरिसला परत गेला. आपल्या 'ट्रॅव्हल इन मुघल एम्पायर' (Travells in the Mughal Empire) नावाने त्याने प्रवासाचा वृत्तांत त्याने फ्रेंच भाषेत लिहिला आहे. भारतातील प्रवासवृत्तांची सर्व तयारी केली आणि फ्रान्सच्या राजाकडे छपाईची परवानगी मागितली (१६७०). २५ एप्रिल १६७० रोजी त्यास परवानगी प्राप्त झाली व त्याने १३ प्रवास वृत्तांत ऑगस्ट रोजी प्रकाशित केला. बर्नियरने आपला प्रवास वृत्तांत लिहिण्याचा मुख्य उद्देश भारत व्यापारासाठी किती महत्वाचा देश आहे हे सांगण्याचा होता. मुघल सैन्याची माहिती आणि वर्णन करुन त्याला फ्रेंचांना त्यांच्या पासून असणाऱ्या संभाव्य धोक्याची माहिती द्यायची होती असे इतिहासकार म्हणतात. याशिवाय मुघल राजवैभवाचे वर्णन करुन फ्रान्सचा राजा १४ व्या लुईच्या कारकिर्दीवर टिका करणे हा दुहेरी उद्देश होता.

### ३) वारसा युद्ध आणि दाराशुकोह :

बर्नियर मुघल दरबारातील वारसा युद्धाचा प्रत्यक्ष साक्षीदार होता, शहाजहानच्या मुलांमध्ये चाललेला सत्तासंघर्ष त्याने पाहिलेला होता. त्याने या वारसा युद्धाचे तपशीलवार वर्णन केलेले आहे. बर्नियरला व्यक्तिचित्रणात निपुणता होती. त्याने दिलेल्या वर्णनातून असे दिसून येते की व्यक्तींची पात्रे आणि सवयी समजून घेण्यास व त्याचा अभ्यास करण्यास त्याला विशेष रस होता. त्याने त्या काळातील सर्व महत्वाच्या व्यक्तींच्या व्यक्तिरेखा रेखाटली आहे. शहाजहान, दाराशुकोह, मुराद, जहानारा बेगम बरोबरच औरंगजेबाच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल सविस्तर माहिती दिलेली आहे. थोरला मुलगा दाराशुकोह बद्दल त्यांनी लिहिले आहे, दारामध्ये चांगल्या गुणांची कमतरता नव्हती आणि ते अत्यंत उदार होते, परंतु स्वत: बद्दलचे त्यांचे खूप उच्च मत होते. आपल्या मनाच्या सामर्थ्याने तो सर्व काही करु शकतो असा त्याचा विश्वास होता. तो लोकांशी अत्यंत गंभीरपणे वागत असे, ज्याने त्याला सल्ला देण्याचा प्रयत्न केला आणि वास्तविक परिस्थितीबद्दल जागरूक केले. म्हणूनच त्याच्या

जवळच्या मित्रांनी देखील त्याच्या भावाच्या कटाच्या गोष्टी आणि युक्तीविषयी त्याला जागरूक केले नाही. त्याचप्रमाणे दाराचा कट्टर प्रतिस्पर्धी औरंगजेब बद्दल बर्नियर यांनी दिलेली टिप्पणी अतिशय रंजक आहे. तो लिहितो की, औरंगजेबमध्ये डारियस सारखे सौजन्य आणि कुशल वागणूक नव्हती. परंतु त्याच्याकडे निर्णय घेण्याची अद्भूत क्षमता होती आणि त्याचे सहाय्यक आणि वैशिष्ट्ये निवडण्यात त्याची दृष्टी खूप उत्सुक होती. तो गंभीर आहे, आपल्या कल्पना आणि योजना गुप्त ठेवण्यासाठी त्याच्या कौशल्यात आणि गुप्ततेत तो खूप हुशार होता.

औरंगजेबांने दाराशुकोहाला ज्या प्रकारे मारले त्याचे वर्णन करताना तो लिहितो की, मुघल शहजादा दाराशुकोहाला फाशी देण्यापूर्वी फाटके कपडे घालून एका मरतुकड्या हत्तीवर साखळदंडात पाय घालून दिल्लीच्या रस्त्यावर फिरवण्यात आले. दाराच्या या दुर्दशेने काही लोक खूप हळहळले. दाराशुकोहाला गलिच्छ कपडे घालून उघड्या हत्तीवर बसविण्यात आले व संपूर्ण शहरातून त्याची धिंड काढली. हे दृश्य दिल्लीची जनता मोठ्या दुःखाने पाहत होती, पण दारास मदत करण्यास कोणी धजावले नाही. दाराला विश्वासघाताने पकडून देणाऱ्या मलिक जीवनला जनता शिव्यांचा वर्षाव करीत होती. दाराशुकोहच्या हत्येबद्दल बर्नियरने लिहिले आहे की, दाराचा असा शेवट झालेला ऐकून जिकडे तिकडे लोक मोठ्या दुःखाने विलाप करू लागले, जणू काय आपलाच कोणी आप्त गेला अशाप्रकारे पुरुष, बायका, मुले सर्व शोकसागरात बुडून गेली.

**४) मनसबदारी व जहागिरदारी पद्धती :**

बर्नियरने आपल्या प्रवास वृत्तांतात जहागिरदारी व्यवस्थेची माहिती देताना या व्यवस्थेत खूप मोठा अत्याचार होत होता, जहागिदार प्रदेशात करवसुलीचा ठेका घेत आणि शेतकऱ्यांचे प्रचंड आर्थिक शोषण करत. जहागिदारांचे भूसुधारणेकडे अजिबात लक्ष नसल्याने शेतीचे उत्पन्न घटले. शेतकऱ्यांवर जुलूम वाढला ही परिस्थिती मुघलांच्या ऱ्हासाला कारणीभूत ठरली असे तो नमूद करतो. बर्नियरने मनसबदारी प्रथेची सविस्तर माहिती दिलेली आहे. ही पद्धती सर्व प्रथम अकबर बादशाहाने सुरु केली, औरंगजेबाच्या काळापर्यंत या प्रथेने अतिशय वाईट स्वरूप धारण केले. मनसबदार व बादशहाच्या संबंधाबद्दल तो लिहितो की, नजराणा अथवा भेटी दिल्याशिवाय तुमचे कोणतेही काम होणार नाही. मनसबदार आपल्या विलासी जीवनशैलीमुळे कर्जबाजारी व भिकारी कसे झाले याची माहिती नमूद करतो. आपले चैनी विलासी जीवन जागता यावे यासाठी ते रयतेवर कसे अत्याचार करत हेही त्याने नमूद केले आहे.

**५) व्यापार आणि व्यापारी :**

बर्नियरने आग्रा व दिल्ली मधील श्रीमंत व्यापाऱ्यांच्या प्रशस्त व उत्कृष्ट बांधकामाच्या निवासस्थानांचे वर्णन लिहून ठेवले आहे. सामान्य व्यापारी आपल्या दुकानांच्या वरच असलेल्या घरांमध्ये राहत होते, पण ही घरे सुद्धा आतून बऱ्यापैकी प्रशस्त असल्याचे त्याने लिहिले आहे. आपल्या प्रवासादरम्यान त्याने भारतातील विविध प्रसिद्ध शहरांना भेटी दिलेल्या होत्या. उदा. आग्रा, गोवळकोंडा, विजापूर, औरंगाबाद, सुरत, अहमदाबाद इत्यादी अनेक शहरांचा यामध्ये समावेश होता. ही शहरे म्हणजे मुळात वैभवशाली उद्योग व व्यापाराची केंद्रे होती. भारताच्या आंतरराष्ट्रीय व्यापारामध्ये आयातीपेक्षा निर्यातच जास्त आहे. त्यामुळे परदेशातून सोने व

चांदीची मोठ्या प्रमाणावर आवक होते. समृद्ध निर्यातीमुळे भारत हा वैभवशाली देश झालेला आहे. बर्नियर आपल्या वृतांत रस्त्यांची स्थिती, चलन व्यवस्था, वाहतुकीची साधने, आयात-निर्यातीमधील वस्तू इत्यादींची सविस्तर माहिती दिलेली आहे.

**६) सामाजिक जीवन :**

बर्नियरने ज्या घटना प्रत्यक्ष डोळ्यांनी पाहिलेल्या होत्या त्या जशाच्या तशा लिहून ठेवलेल्या आहेत. मुघलकालीन भारताच्या राजकीय, सामाजिक व आर्थिक स्थितीच्या माहितीसाठी त्याचा ग्रंथ उपयुक्त ठरतो. तत्कालीन भारतातील सती प्रथा, अंत्यविधी, ज्योतिष, धार्मिक सण, समारंभ, वेशभूषा व मनोरंजन इत्यादी बाबीवर त्याचे लिखाण अत्यंत उपयोगी पडणारे आहे. हिंदूच्या जातसंस्थेबाबत बर्नियर लिहितो की, युरोपमधील गुलामगिरी पद्धती सारखा हा अनुभव होता. भारतामध्ये जन्म व व्यवसायावरुन भेद केला जातो. याबाबत तो आश्चर्य व्यक्त करतो. स्वत:च्या जातीतच वैवाहिक संबंध ठेवतात. भारतीय समाजात कर्मकांड आणि अंधश्रद्धेचा भरणा असून शिक्षणावर धर्माचा पगडा आहे. इथल्या बाजारात मोठ्या संख्येने भविष्यवाले बसलेले असतात असे तो आवर्जून नमूद करतो. या भविष्यवाल्याकडे सर्व स्तरातील व्यक्ती येतात. तो प्रथम त्यांच्याकडून सर्व माहिती ऐकून घेतो आणि नंतर गृहताऱ्यांची भीती दाखवतो. भारतातील सन १६६६ च्या सूर्य ग्रहणाची माहिती देवून भारत आणि फ्रान्स मधील परपरांची तुलना केलेली आहे. फ्रान्स मध्ये जगाचा अंत म्हणून याकडे येथील लोक पाहतात आणि घरात लपून बसतात तर भारतातील लोक नदीच्या पाण्यात डुबकी मारता ग्रहण संपल्या नंतर लोक नवीन वस्त्र परिधान करतात असे तो नमूद करतो.

भारताच्या तत्कालीन परिस्थिती विषयी बर्नियर लिहितो की, लोकांना कायद्याची माहिती नव्हती असे नाही, तर उच्चपदस्थ सरकारी अधिकारी वर्ग त्यांची उपेक्षा करीत होता. प्रांतीय सुभेदार दुर्वर्तनी, जुलमी व महत्वाकांक्षी होते. प्रजा औदासिन्य व निराशेने ग्रासलेली होती. शेतकऱ्यांची परिस्थिती अत्यंत वाईट होती. मेलेल्या व्यक्तीची संपत्ती सरकार जप्त करी. साम्राज्याची शासन यंत्रणा मुघल सम्राटाच्या मर्जीवर अवलंबून होती. तो कोणालाही उच्चपदावर चढवू शके, तर कोणालाही खाली खेचू शके. दरबाराची शानशौकत ठेवण्यासाठी व प्रजेचे दमन करण्यासाठी ठेवलेल्या विशाल सैन्यामुळे देशाचे दिवाळे निघाले होते. प्रजेच्या कष्टांचे वर्णन करावयास शब्द अपुरे पडतात.

**७) मुघल दरबार :**

बर्नियरने आपल्या वृतांतामध्ये मुघल बादशहाचा दरबारी थाट-माट, दरबारी रीतीरिवाज, दरबाराचे वैभव, ऐश्वर्यपूर्ण दरबारी शिष्टाचार इत्यादी बाबत तपशीलवार माहिती दिलेली आहे.

**८) शाहजहान बादशहाचे पराक्रम :**

बर्नियर शहाजहान बादशहाच्या पराक्रमाबद्दल विस्तृत चर्चा करताना दिसतो. शहाजहानने केलेल्या विविध युद्धांबद्दल त्याने तपशीलवार वर्णन केलेले असून धरमपूरचे युद्ध, सामुगढ युद्धं, खनवाच्या युद्धाची माहिती दिलेली आहे.

**९) मुघलकालीन लष्करी व्यवस्था :**

मुघलकालीन लष्करी इतिहास समजून घेण्यासाठी बर्नियरचा प्रवास वृतांत महत्वाचे साधन आहे. यामधून मुघलकालीन लष्करी व्यवस्थेबद्दल बरीच माहिती प्राप्त होते, उदा. लष्कराचे संघटन, रचना, सैन्य, हत्यारे, पायदळ, तोफखाना, वैशिष्ट्य इत्यादीची माहिती मिळते. रजपुत राजांचे सैन्य, मनसबदारांचे सैन्य, उमरावांचे सैन्य, जमिनदारांचे सैन्य कसे होते, ते मुघल बादशहाला ते सैन्य कसे मदत करत असे, याबरोबरच मुघल युद्ध रचनेसंबंधी माहिती मिळते.

**१०) छत्रपती शिवाजी महाराजांच्या बद्दलचे आकलन :**

बर्नियरच्या प्रवास वृत्तांतात छत्रपती शिवाजी महाराजयांचे चित्र असून तो महाराजांबद्दल सार्वभौमसत्ताधारी शासकांच्या रूपाने शिवाजी महाराज आपले अधिकार गाजवित असे लिहितो. मुघल सम्राट आणि विजापूर सुलतानांच्या धमक्यांची तो कधीच तमा बाळगीत नसे असे नमूद केले आहे. शिवाजी महाराजांच्या सुरत-लुटीविषयी तसेच शाहीस्तेखानावरील हल्ला व आग्राहून सुटका यांसंबंधी बर्नियरने लिखाण केले आहे.

**११) शाही कारखाने :**

बर्नियरने मुगलकालीन विविध शाही कारखान्यांची सविस्तर माहिती दिलेली आहे. भारतीय वेशभूषेने तो प्रभावित झालेला होता. कपड्यावरील भरत कामाचे त्याला विशेष आकर्षण होते. वस्त्रोउद्योगाची त्याने तपशीलवार माहिती देताना त्याला तो कारखाना असे म्हणतो. यामध्ये अनेक कलाकार, कारागीर काम करतात. त्यांच्यावर एक अधिकारी देखरेख करीत असतो. कारखान्यांमध्ये रेशमी, मलमलीचे अतिशय सुंदर कापड़ तयार होते. हे कापड जगातील महाग कपड्यांमध्ये गणले जाते.

**१२) दिल्ली आणि आग्रा मधील उन्हाळा :**

बर्नियरने दिल्ली आणि आग्रा या दोन शहरांची भरपूर स्तुती केलेली आहे. या शहरांची तो युरोप मधील शहरांच्या बरोबर करतो. भारतात उन्हाळा भरपूर असल्याने येथील घरे मात्र युरोप मधील घरापेक्षा बनवटीने वेगळी आहेत. त्याच बरोबर तो युरोप आणि भारतातील भौगोलिक वातावरणाची तुलना करतो. उन्हाळा जास्त असल्याने इथले राजे सुद्धा चप्पल वापरतात, मोजे (स्वॉक्स) वापरत नाहीत असे तो नमूद करतो. येथे उन्हाळा जास्त असून इथले लोक उन्हापासून बचाव करण्यासाठी विविध प्रकारच्या युक्त्या वापरतात. येथील लोक लिंबू पाणी पितात आणि एका हाताचा पंखा वापरतात. याशिवाय दिल्ली या शहराच्या नियोजनाचेही वर्णन केलेले आहे. येथील नगररचना, रुंद रस्ते, भव्य इमारती, विविध बाजार व दुकाने इत्यादीची माहिती देवून येथील आर्थिक विषमतेबद्दल चर्चा करतो. या शहरांच्या हस्तकला उद्योगाविषयी त्यांनी महत्त्वपूर्ण सामग्रीचे मूल्यांकन केले आहे.

**१३) काश्मीर आणि शाल उद्योग :**

बर्नियरने आपल्या प्रवस दरम्यान काश्मीरचा दौरा केलेला होता. काश्मीरविषयी बऱ्याच महत्त्वाच्या गोष्टींचे

संकलन केले आहे. तेथील शाल उद्योगाचे इथे अतिशय मनोरंजक वर्णन केले आहे. तो लिहितो की, शाल विणणे हा भरतकामाचा एक प्रकार आहे. रेशीम लोकर शालींपेक्षा टोन्ड लोकरपासून बनविलेल्या शाली अधिक मौल्यवान आहेत. या मौल्यवान शाली केवळ श्रीमंत वर्गासाठी बनवल्या जातात. काश्मीर व्यतिरिक्त पटना व लाहोरमध्येही अशा शाली बनवल्या जातात. परंतु त्यांची तुलना काश्मीरच्या शालींशी केली जाऊ शकत नाही. त्याने काश्मीरच्या निसर्गसंपन्न वैभवाचे बहारदार वर्णन केलेले आहे. तेथील बाग-बगीचे, तेथील शाल उद्योगाची मोठ्या प्रमाणात माहिती दिलेली आहे.

**१४) सती प्रथा एक कुप्रथा :**

बर्नियरने भारतामधील लाहोर, काश्मीर, दिल्ली, आग्रा, बनारस, बंगाल, इत्यादी भागात प्रवास केला होता. त्याच्या प्रवासा दरम्यान हिंदू समाजात प्रचलित असलेला सती प्रथा त्याने पहिली होती आणि या प्रथेला तो अतिशय अमानुष प्रथा आहे असे म्हणतो आणि या प्रथेचे वर्णन करतो.

**१५) मुघल जनानखाना :**

मुगलांच्या हरेम/जनानखान्यातील राजकन्यांच्या दुर्देवी परिस्थितीबद्दल बर्नियरने सविस्तर लिहिले आहे. मुघल राजकन्याच्या विवाहाबाबत तो लिहितो की, राजकन्यांचे विवाह होत नाहीत, राजकन्येचा विवाह झाला तर तिचा पती राजकीय सत्ता स्पर्धेत उतरू शकतो आणि त्यापासून धोका होवू शकतो. यासाठीही दक्षता घेत असत.

**१६) समालोचन :**

बर्नियरची दृष्टी अत्यंत शोधक व कुतूहलपूर्ण होती. त्यांनी विविध क्षेत्रांविषयी महत्वाची माहिती संकलित केली आहे, जी ऐतिहासिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाची आहे. उत्तराधिकार युद्ध, मुघल प्रशासकीय यंत्रणा, महसूल व्यवस्था आणि शेतकऱ्याचा दर्जा या विषयांवर त्यांनी साहित्य संकलित केले आहे. त्यांनी आपले वर्णन अत्यंत रंजक पद्धतीने सादर केले आहे. बर्नियरने आपल्या प्रवास वृत्तांतामध्ये मुघल दरबारातील अंतर्गत राजकारण, मुघलांचे वारस युद्ध, शहाजहानची कैद, औरंगजेबाची राजकीय महत्वकांक्षा, शाहीखानदाण, रितीरिवाज, नोकर-चाकर व मनसबदारी पद्धतीची सखोल माहिती दिलेली आहे. काश्मीरच्या इतिहासावर त्याने विस्तृत लिखाण केलेले आहे. याशिवाय बर्नियरच्या प्रवास वर्णनात तत्कालीन शेती व्यवस्था, शेतकरी, जमिनीचे प्रकार, सारा पद्धती, वर्गवारी, विविध कृती उत्पादने, व्यापार-उद्योगधंदे, व्यापारी मार्ग, व्यापारी शहरे व केंद्रे, बंदरे, याविषयी सर्व इत्यंभूत माहिती नमूद केलेली आहे. यातून तत्कालीन काळातील आर्थिक विषमतेबाबतही आपल्याला माहिती मिळते. एकाच वेळी प्रचंड श्रीमंत आणि प्रचंड दारिद्र्य हे भारताचे वास्तव होते हेही तो सांगतो. याशिवाय तत्कालीन सामाजिक व सांस्कृतिक घटकांची अतिशय महत्त्वपूर्ण माहिती आपल्या वर्णनात तो नमूद करतो. फ्रान्सिस बर्नियरने आपल्या प्रवास वर्णनात छ. शिवाजी महाराजांचे चित्र दिलेले आहे. बर्नियर हा पेशाने डॉक्टर होता. उच्चशिक्षित असल्याने त्याच्यावर कोणत्याही प्रकारचा दबाव नव्हता. त्यामुळे त्याने आपले लिखाण मुक्तपणे केलेले दिसते. बर्नियरचे निरिक्षण अतिशय तटस्थ, निरपेक्ष स्वरूपाचे असल्याने इतिहासाचे एक समकालीन आणि विश्वसनीय साधन म्हणून त्याकडे पाहता येईल.

**ब) निकोलाव मनुची: (१६३९-१७१७)**

**१) निकोलाव मनुचीचे पूर्वचरित्र :**

१७ व्या शतकात भारतात आलेला मनुची हा इटालियन प्रवासी होता. त्याचा जन्म सन १६३९ मध्ये इटाली मधील व्हेनिस येथे झाला असावा. लहानपणापासून त्याला जग पाहण्याची इच्छा असल्याने वयाच्या १४ व्या वर्षी त्याने आपली देश सोडला. व्हेनिस बंदरामधून स्मिर्ना या शहराकडे जाणाऱ्या एका जहाजावर लपून बसला. लॉर्ड बेलोमाँट या इंग्रज सरदाराने त्याला आपल्या नोकरीत घेतले, त्याच्या बरोबर आशिया मायनरवरून तो पर्शियामध्ये पोहोचला. पुढे त्याने ईस्ट इंडिया कंपनीच्या 'सीहॉर्स' या जहाजातून त्याने तुर्कस्तान, इराणमधून सागरी प्रवास केला. सन १६५६ मध्ये वयाच्या १७ व्या वर्षी तो सुरत येथे पोहचला. तेथून तो बऱ्हाणपूर, ग्वाल्हेर, धोलपूर मार्गे आग्र्याला पोहोचला. काही काळ त्याने दाराशुकोहकडे तोफखान्यावर अधिकारी म्हणून नोकरी होती. पुढे तो शहाआलमकडे त्याचा खाजगी डॉक्टर म्हणूनही काम करीत होता. नंतर तो मिर्झाराजा जयसिंगाकडे नोकरीस राहिला. निकोलाव मनुची याने दाराची विशेष मर्जी संपादन केली. तसेच त्याच्याकडून अनेक सवलती प्राप्त करून घेतल्या. मनुचीने पोर्तुगीज व इंग्रज यांच्यातर्फे मुघलांकडे व मराठ्यांच्याकडे राजदूताची जबाबदारी पार पाडलेली होती. त्याला फार्सी व उर्दू भाषांचे तसेच मुघल दरबारातील रीतिरिवाजांचे चांगले ज्ञान होते. औरंगजेबाच्या दक्षिण मोहिमेत तो सहभागी झालेला होता. या दरम्यान त्याने भारतातील अनेक ठिकाणांना भेटी दिल्या होत्या. सन १६५६ ते सन १७१७ पर्यंत तो भारतातच वास्तव्यास होता व सन १७१७ मध्ये त्याचा भारतात मृत्यू झाला.

**२) स्टोरिया-डो-मोगोरचे लिखाण :**

निकोलाव मनुचीचा दाराशुकोह, मिर्झाराजा जयसिंग, औरंगजेब बादशहा, पोर्तुगीज व इंग्रज यांच्याशी घनिष्ट संबंध आला. या सत्ताधिशांबरोबर त्याला आलेले अनुभव, ऐकलेल्या व पाहिलेल्या घटनांची त्यांने 'स्टोरिया-डो-मोगोर' (Storia-Do-Mogor) या आपल्या प्रवास वर्णनात त्याने भारतातील अनेक घडामोडींचा इतिवृत्तांत नमूद केलेला आहे. मद्रासमधील वास्तव्यात त्याने आपल्या बहुविध आठवणी फ्रेंच व पोर्तुगीज भाषांत लिहून काढल्या आणि चार विभागांत प्रसिद्ध करण्यासाठी त्या पॅरिसला पाठविल्या. त्याच्या या मूळ पुस्तकाचा काही भाग फ्रेंच, इटालियन तर काही भाग पोर्तुगीज भाषेत लिहिला आहे. निकोलावच्या प्रवास वृतांताचे विल्यम आयर्विन याने पहिल्यांदा सन १९०७ मध्ये 'अ पेपीस ऑफ मुघल इंडिया' या नावाने इंग्रजी भाषांतर केले आहे. या भाषांतराचे ४ खंड असून दोन हजार पाने आहेत. 'अ पेपीस ऑफ मुघल इंडिया' या ग्रंथाचे सन १९७४ मध्ये मराठीत भाषांतर सारांश स्वरूपात ज. स. चौंबळ यांनी 'असे होते मोगल' या शीर्षकाने प्रसिद्ध केले. मुघल व मराठ्यांचा इतिहास जाणून घेण्यासाठी हा एक महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तऐवज आहे.

**३) स्टोरिया-डो-मोगोर :**

निकोलाव मनुचीच्या ग्रंथावरून भारतातील १७ व्या शतकातील तत्कालीन इतिहास समजण्यास मदत होते. या ग्रंथाचा काही भाग पोर्तुगीज, फ्रेंच आणि इटालियन भाषेमध्ये लिहिला आहे. मनुचीने या ग्रंथामध्ये

वास्तव आणि काल्पनिक अशा दोन्ही घटनांची सरमिसळ केलेली आहे. मनुचीने आपल्या ग्रंथाची विभागणी पुढील पाच भागात केलेली दिसते.

१) शहाजहानची राजवट ते औरंगजेब बादशहाचे राज्यारोहण

२) औरंगजेब बादशहाचे राज्यारोहण ते सन १७०० पर्यंतचा कालखंड

३) मुघलांची राज्य व्यवस्था

४) औरंगजेब बादशहाची दक्षिण मोहीम

५) औरंगजेब बादशहाच्या राजवटीचा शेवटचा कालखंड व राजपुत्र शाहाआलम पर्यंतची माहिती.

**४) दक्षिणेतील महत्वाच्या घडामोडी :**

मनुचीने किरतसिंगामार्फत मिर्झाराजा जयसिंहाशी ओळख करून घेतली. सन १६६४ मध्ये जयसिंहाची दक्षिणेमध्ये नेमणूक झाली तेंव्हा तो जयसिंहाबरोबर दक्षिणेत आला. पुरंदरच्या युद्धाच्या दरम्यान मिर्झाराजा जयसिंहाच्या तळावर असताना त्याची आणि छत्रपती शिवाजी महाराजांची भेट झाल्याचे त्याने नमूद केले आहे. जयसिंहाच्या विजापूरवरील मोहिमेत तो सहभागी होता. सन १६८२-८३ मध्ये छत्रपती संभाजी महाराजांनी पोर्तुगीजांना कैचीत पकडले तेंव्हा गोव्याच्या गव्हर्नरने मनुचीला मराठ्यांकडे वकिल म्हणून पाठवले होते. औरंगजेबाच्या दक्षिण स्वारीच्या वेळी मुघलांच्या युद्धाना कंटाळून तो मद्रास येथील फोर्ट सेंट जॉर्ज येथे पोहोचला आणि तेथेच स्थायिक झाला. तेथे त्याने वैद्यकीय व्यवसाय पुन्हा सुरू केला. या व्यवसायामुळे त्याल भारतभर प्रवास करता आला. मद्रासच्या गव्हर्नरने मद्रास येथील थॉमस क्लार्कची सर्व संपत्ती, त्याचे घर व बाग त्यास देऊन त्याचा सन्मान केला. मद्रासचा तत्कालीन गव्हर्नर थॉमस पीट याचा मनुचीवर खूप विश्वास होता, त्याने मनुचीकडे बरीच कामे सोपवली होती असे दिसते.

**५) मुघल साम्राज्य :**

मनुचीने मुघल साम्राज्याबद्दल जे अनुभवले त्याबद्दल म्हणतो की, मी जे काही पाहिले आणि अनुभवले त्यावरून मी निश्चितपणे म्हणू शकतो की, मोगलसत्ता नाहीशी करून सर्व साम्राज्य ताब्यात घेणे हे सहज शक्य आहे. त्यासाठी हव्या आहेत फक्त ३० हजार युरोपियन शिपायांचे सैन्य आणि कार्यक्षम सेनाधिकारी त्यांना मोठे विजेते होण्याचे श्रेय मिळू शकेल.

**६) सामाजिक जीवन :**

निकोलाव मनुची भारतात प्रवास करत असताना त्याला चोरांनी लुटल्याचे वर्णन केलेले आहे. भारतातील सामाजिक रूढी-परंपरा, विवाह, जातीसंस्था, सतीप्रथा, शेतकरी, समाज, शहरे, सुरत लूट, जिझिया कर, जकात, मुघल साम्राज्यातील खाणी, मुघल साम्राज्यातील किल्ले, महसूल, स्त्रियांची वस्त्रे, अलंकार, मनोरंजन इत्यादीबाबत त्याने विस्तृत माहिती त्याच्या ग्रंथात दिलेली आहे.

**७) मराठ्यांच्या बद्दलची माहिती :**

छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याचे मूल्यमापन करताना मनुची म्हणतो, शिवाजीने आपला स्वामी म्हणजे विजापूरचा बादशाहाच्या विरुद्ध बंड केले. त्याने अनेक लढाया मारल्या आणि चोहीकडे मुलूख उध्वस्त केला. केवळ तलवारीच्या बळावर त्याने आपला मार्ग आक्रमिला. सत्ता आणि शक्ती संपादन केली. हिंदुस्थानात एक नवीन राज्यच निर्माण केले. मोगल बादशहा म्हणजे केवढा बलिष्ठ, पण त्यालाही त्याने क्षणाचीही विश्रांती लाभू दिली नाही. औरंगजेबाने कित्येक राज्ये जिंकली आणि राजे धरले. पण हे मराठ्यांचे राज्य औरंगजेबाला जबरदस्त ठरले. या मराठी राज्याच्या पायी औरंगजेबाला आपली राजधानी सोडावी लागली आणि गेली एकोणीस वर्षे त्याला छावणीत आपले दिवस काढावे लागत आहेत.

मनुचीने आपल्या ग्रंथात मराठ्यांच्या वर्चस्वाबद्दल पुढील गौरव उदगार काढले आहेत, मराठ्यांचे इतके सरदार आहेत. बरे, वरून त्यांना कोणी मार्गदर्शन करणारा आहे असेही नाही. इतके असूनही ते मोगलांशी सतत लढत आहेत. ही लक्षात ठेवण्या सारखी गोष्ट आहे. साम्राज्याच्या विविध भागात ते सतत आक्रमणे करीत असतात आणि बरीच संपत्ती हस्तगत करतात. त्यांच्या या यशाचे कारण मला एकच दिसते आणि ते म्हणजे इतकी वर्षे सतत चालत आलेली त्यांच्या सरदारामधील एकी होय.

**८) औरंगजेब बादशहाचे वर्णन :**

मनुचीने औरंगजेब बादशहाच्या सत्पुरुष व साधेपणाचे वर्णन केलेले आहे. एकेदिवशी रात्री बादशहा प्रार्थना करण्यास उठला. हातपाय धुतल्याखेरीज प्रार्थना करणे हे पाप आहे, असे मुसलमान लोक मानतात. म्हणून हातपाय धुण्याकरिता पाणी आणण्यासाठी बादशाहाने एका सेवकाला जागे केले. झोपेतून पुरता जागा न झालेला तो सेवक अडखळून बादशहाच्या अंगावर कोलमडला. बादशहा आणि नोकर दोघेही खाली कोसळले. भीतीने गांगरून गेलेले तो नोकर बादशहाच्या बाजूस सापडला. बादशहाने ते पाहिले. तो नोकराजवळ जाऊन त्यास सौम्यपणे म्हणाला, अरे मी तर तुझ्याच सारखा माणूस. मला का भितोस? भीती बाळगावी परमेश्वराची, त्याचा अपराध करू नये. ऊठ भिऊनकोस. ही विलक्षण गोष्ट तेथील लोकांना समजली तेव्हा त्यासर्वांना बादशाहाच्या साधेपणाची खात्री पटली असे तो वर्णन करतो. मात्र निकोलावला औरंगजेब बादशहा, पोर्तुगीज आणि जेझुइट यांच्याबद्दल तिटकारा होता.

**९) समालोचन :**

पोर्तुगीज, फ्रेंच व इटालीयन भाषेत त्याने हा ग्रंथ लिहिलेला आहे. भारत भ्रमणात त्यांने जे ऐकले, पाहिले व अनुभवले त्याचे चित्रण आपल्या लिखाणात केलेले आहे. यातील मुस्लिम राजवटीचा प्रारंभिक इतिहास बाजार गप्पांवर आधारित आहे. अनेक गोष्टी ऐकीव असल्याने त्याच्या तारखा आणि वर्ष चुकलेले आहे. हे जरी खरे असले तरी त्याच्या या ग्रंथावरून तत्कालीन मुघल कालखंडाच्या राजकीय, आर्थिक व सामाजिक परिस्थितीबद्दल फार समर्पक माहिती मिळते. धार्मिक बाबीं विषयीचे त्याचे लिखाण पाल्हाळीक असून ते वास्तवतेने व काल्पनिकतेने भरलेले आहे. काही अपवाद वगळता त्याच्या ग्रंथातील स्थल-कालाचे तपशील आणि विधाने ऐतिहासिक दृष्ट्या विश्वास ठेवण्यायोग्य वाटतात.

● **स्वय-अध्ययन प्रश्न क्रमांक ३ :**

१) बर्नियरचा पश्चिम फ्रान्समधील............... प्रांतामधील इव्हे या गावी झाला.

२) बर्नियर.............. मध्ये भारतात आला.

३) बर्नियरने आपला वृतांत .............. भाषेत लिहिला आहे.

४) बर्नियरने भारतातील .................. च्या सूर्य ग्रहणाची माहिती आहे.

५) ................ प्रवास वृत्तांतात छत्रपती शिवाजी महाराज यांचे चित्र आहे.

६) .......... प्रथेला बर्नियरने अतिशय अमानुष प्रथा म्हंटले आहे.

७) मनुची हा .................. देशाचा प्रवासी होता.

८) स्टोरिया-डो-मोगोरचे मराठी भाषांतर ............ यांनी केले आहे.

९) निकोलावच्या प्रवास वृतांताचे इंग्रजी भाषांतर ............... यांनी केले आहे.

१०) मनुचीने किरतसिंगामार्फत ................. शी ओळख करून घेतली.

## १.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

पुराभिलेख : विविध माध्यमातून लिहिलेले कोरीव लेख

पुरातत्वविद्या : प्राचीन वस्तू आणि वास्तूंचा अभ्यास करणारे शास्त्र

ताम्रपट : तांब्याच्या पत्र्यावर कोरलेले लेख

भौतिकसाधने : पुरातत्वीय अवशेष

दिन-ए-इलाही : सम्राट अकबराने पुरस्कृत केलेला धर्मसंप्रदाय.

खलिफा : प्रेषितांचा वारस

टाकंसाळ : नाणी तयार करण्याचा कारखाना अथवा ठिकाण

सुफी : इस्लामची स्थापना झाल्यानंतरच्या काळात मदिन्यातील मशिदीसमोरील वृक्षाखालच्या पारावर अर्थात चबुतऱ्यावर राहणारे व तेथे बसून धर्माचा अभ्यास करणारे लोक हे 'सुफी' म्हणून ओळखले जातात.

सुलह-ए-कुल : धार्मिक सहिष्णू धोरण

सती प्रथा : विधवा पत्नीला मृत्यु झालेल्या पतीच्या अंत्यसंस्काराच्या वेळी पतीच्या चितेवर जिवंत जाळणे. अथवा जाळून घेण्यास भाग पाडणे.

## १.४ स्वय अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

● **स्वय अध्ययन प्रश्न क्रमांक १ ची उत्तरे**

१) अबुल-फल-इन-मुबारक
२) नागौर
३) १४ जानेवारी १५५१
४) दिन-ए-इलाही
५) ऐन-ए-अकबरी
६) ४६
७) आस्ताराबाद
८) सन १६२३
९) तारीख-इ-नवरसनामा
१०) डॉ. भ. ग. कुंटे

● **स्वय अध्ययन प्रश्न क्रमांक २ ची उत्तरे**

१) बृहदेश्वर (तंजावर)
२) ताम्रपट
३) खुतबा
४) औरंगजेब
५) अशिरगड
६) लाहोर
७) शालिमार
८) तब्कुतुल अर्ज
९) शहाजहांन
१०) तोफाचा

● **स्वयंअध्ययन प्रश्न क्रमांक ३ ची उत्तरे**

१) अंजू
२) सन १६५८
३) फ्रेंच
४) सन १६६६
५) बर्नियर
६) सती
७) इटालियन
८) ज. स. चौंबळ
९) विल्यम आयर्विन
१०) मिर्झाराजा जयसिंह

## १.५ सारांश :

प्रस्तुत प्रकरणामध्ये आपण मुघल कालखंडाचा अभ्यास करण्यासाठी उपयुक्त असलेल्या वाङ्‌मयीन साधंने, पुरातत्वीय साधने आणि परकीय प्रवाशांची प्रवास वर्णने यांचा अभ्यास केला. अबुल फझल व फिरिश्ताने आपल्या ग्रंथांमध्ये मुघल कालखंडातील विविध आर्थिक मुद्यांवर प्रकाश टाकलेला आहे. कापड उद्योग, धातू उद्योग, चर्मोद्योग, लाकूड उद्योगा संबंधी त्याने तपशिलाने माहिती दिलेली आहे. अबुल फझल व फिरिश्ता मुघल कालखंडातील सामाजिक परिस्थिती संदर्भांत भाष्य करताना दिसतो. मुघल कालखंडातील हिंदू धर्म, येथील व्यक्ती, रूढी-परंपरा, आचार-विचार या विषयी आपली निरीक्षणे नोंदवलेली आहेत.

लिखित साधनांच्या बरोबर शिलालेख, ताम्रपट, स्तंभालेख, नाणी, मूर्ती, भांडी, चित्रे, इमारतीचे अवशेष व भित्तीचित्रे यासारखी भौतिक साधने इतिहास लेखणासाठी उपयुक्त ठरतात. संस्कृतीच्या या विविध साधंनाच्यावरून सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक, धार्मिक व राजकीय परिस्थितीवर प्रकाश टाकता येतो. १८

व्या शतकात सर विल्यम जोन्स यांनी भारतात पुराणवस्तू संशोधनाची सुरुवात करून संशोधकांना इतिहासाचा अमूल्य ठेवा उपलब्ध करून दिला. मुघल कालखंडातील (सन १५२६ ते १७०७) इतिहासाचा अभ्यास करण्यासाठी वाङ्:मयीन साधने (लिखित) उपलब्ध आहेत. अर्थात या लिखित साधनांच्या तुलनेने सुलतानशाही कालखंडातील पुरातत्त्वीय साधने तुलनेने कमी आढळतात. हे जरी खरे असले तरी ही साधने वाङ्:मयीन साधनापेक्षाही विश्वासार्ह असतात आणि आहेत. या साधनांमधून प्राप्त झालेली माहिती वस्तुनिष्ठ असल्याने याच्या मदतीने इतिहासाचे विश्लेषण करणे सोपे जाते. या कालखंडातील शिलालेख, ताम्रपट, नाणी, राजवाडे व गढ्या, किल्ले, शस्त्रास्त्रे, वस्त्रे, अलंकार, चित्रे, नकाशे व काष्ठशिल्प इत्यादींचा प्रामुख्याने पुरातत्त्वीय साधनांमध्ये समावेश होतो.

फ्रांन्सिस बर्नियर, निकोलाव मनूचीच्या प्रवास वृतांतामधून जनमानसाचे उत्तम निरिक्षण पहावयास मिळते. सामाजिक रचना, वेशभूषा, खाद्य पदार्थ, आहार-विहार, रीतीरिवाज, आचरण पद्धती, स्त्रियांचे समाजातील स्थान, कुटुंब पद्धती, धार्मिक स्थिती,सुफी संत, अशा अनेकविध घटकांच्या बरोबर अकबर आणि औरंगजेब बादशहाच्या काळातील समकालीन सर्वच घटकांची अतिशय सखोल माहिती मिळविण्याचे हे अतिशय महत्त्वाचे साधन आहे. फ्रांन्सिस बर्नियर, निकोलाव मनूची परकीय प्रवासी असल्याने त्यांच्यावर कोणतेही बंधन अथवा दडपण नसल्याने त्यांनी अतिशय मुक्तपणे लिहिलेले आहे. मध्ययुगीन काळात भारतात येऊन गेलेल्या युरोपीय प्रवाशांच्या मध्ये फ्रांन्सिस बर्नियर, निकोलाव मनूची हे महत्त्वपूर्ण प्रवासी आहेत.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय :

**अ) टिपा लिहा:**

१) अबुल फझल

२) फिरिश्ता

३) अबुल फझलचे साहित्य

४) मुघलकालीन नाणी

५) फ्रांन्सिस बर्नियर

६) निकोलाव मनुची

**ब) दिर्घोतरी प्रश्न :**

१) मुघल कालखंडाचे एक साधन म्हणून अकबरनामाचे महत्व विशद करा.

२) गुलशने-ए-इब्राहिमी चे ऐतिहासिक महत्व सांगा.

३) मुघल कालखंडातील पुरातत्वीय साधंनाची चर्चा करा.

४) फ्रांन्सिस बर्नियरच्या प्रवास वृतांताची सविस्तर चर्चा करा.

५) निकोलाव मनुचीच्या प्रवास वृतांताचे आदिलशाहीच्या इतिहासाचे साधन म्हणून महत्व विशद करा.

## १.७ संदर्भ ग्रंथ व अधिक वाचनासाठीची पुस्तके :


१) चौंबळ, ज. स.,(अनु.) असे होते मोगल, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९७४.

२) कुंटे, भ. ग., (अनु.) गुलशने इब्राहिमी, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, १९८२.

३) वर्मा, हरिषचंद्र., (संपा.) मध्यकालीन भारत., भाग २, (१५४०-१७६१), हिन्दी माध्यम कार्यान्वय निदेशलाय, दिल्ली, २००९.

४) शास्त्री, नीलकंठ, के.एन., दक्षिण भारत का इतिहास, बिहार हिन्दी ग्रंथ अकादमी, पटना, २००३

५) पवार, विश्वनाथ., पांडे, अमर., गागराणी, कविता., (संपा.) मध्ययुगीन भारताचा राजकीय इतिहास, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, २०१५

६) मराठी विश्वकोश, विश्वकोश निर्मिती मंडळ, महाराष्ट्र शासन, वाई. (ऑनलाइन खंड).

७) राधेशरण., इतिहास और इतिहास लेखन., मध्यप्रदेश हिन्दी ग्रंथ अकादमी, भोपाल, २०१०.

८) सावळे, दीपा., महाडीक, घनश्याम., गव्हाणे, किशोरकुमार., मध्यकालीन भारताचा इतिहास, (१५२६ ते १७०७) एज्युकेशन पब्लिकेशन, औरंगाबाद.

९) शर्मा., मथुरालाल., (अनु.) शेख अबुल फजल कृत अकबरनामा, राधा पब्लिकेशन, दिल्ली.


❖❖❖

## घटक – २

# प्रमुख राज्यकर्ते

**अनुक्रमणिका :**


२.० उद्दिष्टे

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

    २.२.१ बाबर : पानिपतचे युद्ध व मुघल घराण्याची स्थापना

    २.२.२ अकबर : रजपूविषयक धोरण

    २.२.३ चाँदबिबी

    २.२.४ इब्राहिम आदिलशहा दुसरा

२.३ पारिभाषिक शब्द शब्दार्थ

२.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.५ सारांश

२.६ सरावासाठी स्वाध्याय

२.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ यादी


## २.० उद्दिष्ट्ये :

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास खालील माहिती स्पष्ट करता येईल.

- मध्ययुगात भारतामध्ये मुघल घराण्याची स्थापना कशी झाली हे विशद करता येईल.
- भारतामध्ये मुघल घराण्याची स्थापना करण्यामध्ये बाबरचे योगदान स्पष्ट करता येईल.
- भारतामध्ये विशाल मुघल साम्राज्य निर्माण करण्यामध्ये अकबर कसा यशस्वी झाला हे सांगता येईल.
- अकबराच्या रजपूतविषयक धोरण कसे होते? हे स्पष्ट करता येईल.
- दक्षिण भारताच्या इतिहासातील चाँदबिबीच्या कर्तबगारीची माहिती सांगता येईल.
- इब्राहिम आदिलशहाच्या धोरणांची माहिती देता येईल.

## २.१ प्रास्ताविक

मध्ययुगीन भारताच्या इतिहासाचे दोन कालखंड पडतात. पहिला कालखंड इ. स. १२०६ ते इ.स. १५२६ याकाळात सुलतानशाही कालखंड म्हणून ओळखले जाते, ज्याचा अभ्यास आपण पाचव्या सत्रामध्ये केलेला आहे. दुसरा कालखंड इ. स. १५२५ ते इ.स. १७०७ या काळाला मुघलशाही कालखंड म्हणून ओळखला जातो. याचा अभ्यास आपणाला सहाव्या सत्रामध्ये करावयाचा आहे. भारतात मुघल सत्तेची स्थापना बाबरने केली. सन १५२६ मध्ये पानिपतच्या पहिल्या लढाईत दिल्लीचा सुलतान इब्राहिमखान लोदीचा पराभव करुन दिल्ली येथे स्वतंत्र्य मुघल घराण्याची स्थापना केली. बाबरनंतर दिल्लीच्या सत्तेवर आलेल्या त्याच्या वारसांनी सत्तेचा विस्तार करुन भारतामध्ये प्रभावी मुघल साम्राज्याचा विस्तार केला. भारतामध्ये विशाल साम्राज्य निर्माण करण्यामध्ये सम्राट अकबर अत्यंत यशस्वी झाला. बाबर, हुमायून, सम्राट अकबर, जहाँगीर, शहाजहान, औरंगजेब ह्या मुघल सत्ताधिशांपैकी बाबर व सम्राट अकबर या दोन  सत्ताधिशांच्या कारकिर्दीचा अभ्यास आपण येथे घेणार आहोत.

बाबर हा मुघल सत्तेचा संस्थापक म्हणून ओळखला जातो. तो एक कसलेला योद्धा आणि सेनापती होता. तो उत्कृष्ट कवी होता. त्याचे 'तुझुक बाबरी' हे तुर्की भाषेतील आत्मचरित्र उत्कृष्ट आत्मचरित्रांपैकी एक मानले जाते. हुमायूननंतर अकबर हा मुघल सत्तेवर आला. अकबर हा अत्यंत महत्वकांक्षी व साम्राज्यवादी बादशहा होता. त्याच्याजवळ राज्यकर्त्याला आवश्यक अशी दुरदृष्टीही होती. रजपूत या देशातील एक महान शक्ती असल्याने तिचा विरोध पत्करून भारतात स्थिर व दीर्घकाळ टिकणारे मुघली साम्राज्य निर्माण करणे शक्य नाही याची अकबराला जाणीव होती आणि म्हणूनच त्याने विविध मार्गाचा अवलंब करुन रजपूतांना आपलेसे केले. त्यामुळेच अकबर बादशहा भारतात विशाल साम्राज्य निर्माण करू शकला.

## २.२ विषय विवेचन :

### २.२.१ बाबराचे पुर्वचरित्र (इ.स. १५२६ ते इ.स. १५३०)

बाबर हा मुघल घराण्याचा संस्थापक म्हणून ओळखला जातो. त्याचा जन्म १४ फेब्रुवारी १४८३ रोजी मध्य आशियातील फरगणा प्रांताची राजधानी अंदिजान येथे झाला. बाबराचे मुळ नाव जहिरुद्दीन महंम्मद असे होते. परंतु त्याचे आजोबा युनूसखान (आईचे वडील) हे लाडाने बाबर(वाघ) या नावाने हाक मारायचे. याच नावाने तो इतिहासात प्रसिद्ध झाला. त्यांच्या वडिलांचे नाव उमरशेख मिर्झा तर आईचे नाव कुत्लघ निगारखानम असे होते. आईवडिलांकडून त्याला चंगेझखान व तैमूरलंग यांचा वारसा मिळालेला होता. त्याचे वडील उमरशेख मिर्झा हे फरगणा प्रांताचे सत्ताधीश होते. इ. स. १४९४ साली उमरशेख मिर्झा यांचा अपघाती मृत्यू झाला. पित्याच्या मृत्युनंतर फरगणा प्रांताची जबाबदारी बाबरवर येऊन पडली व वयाच्या ११ व्या वर्षी तो फरगणा प्रांताचा प्रमुख बनला.

- **बाबरचे राज्यविस्ताराचे प्रयत्न :**

बाबरला फरगणा प्रांताचे प्रमुख पद मिळाले तरी तो तेवढ्यावर समाधानी नव्हता. त्याचा मोठा चुलता

अहमद मिर्झाकडे समरकंद व बुखारा प्रांत गेलेला होता. समरकंद ही तैमूरलंगची राजधानी होती. त्यामुळे समरकंद जिंकून तैमूरच्या सिंहासनावर बसावे, अशी बाबराची महत्वकांक्षा होती. त्यासाठी त्याने सतत पंचवीस वर्षे प्रयत्न केला. याकाळात त्याने तीनदा समरकंद जिंकले व तीनही वेळा गमावले. शेवटी निराश होऊन त्याने भारताकडे लक्ष दिले. समरकंद जिंकून घेण्यासाठी बाबराने मे १४९७ मध्ये स्वारी केली व जिंकून घेतले. परंतु त्याचे हे यश अल्पजीवी ठरले. फरगणा येथे त्याच्या विरोधात कटकारस्थान करण्यात आल्याने बाबर समरकंद व फरगणा हे दोन्ही प्रांत गमावून बसला. तरीही निराश न होता बाबराने सैन्याची उभारणी करून जून १४९९ मध्ये त्याने फरगणा परत जिंकून घेतले.

समरकंद जिंकण्याच्या महत्वकांक्षेमुळे बाबराने आपला भाऊ जहांगीर मिर्झा यांच्याबरोबर करार केला. जून १५०० मध्ये बाबराने समरकंदवर आक्रमण केले. बाबराचा समरकंदमध्ये सहज प्रवेश झाला. त्यानिमित्त सर्वत्र आनंदोत्सव साजरा करण्यात आला. परंतु त्याचा हा विजयही अल्पजीवी ठरला. मुघल सरदार शयबानीखान(चंगीझखानचा नातू) यांच्या बरोबर झालेल्या युद्धात त्याचा पराभव झाला. यानंतर बाबराची पुन्हा भटकंती सुरू झाली. याचकाळात बाबराला एक वृद्ध स्त्री भेटली. तिने भारताच्या श्रीमंतीची माहिती देऊन बाबरला भारतावर आक्रमण करण्यास प्रात्साहित केले.

याचवेळी काबूलमध्ये अंतर्गत गोंधळ निर्माण झाला होता. तेव्हा बाबराने उर्वरित सैन्य घेऊन आपला मोर्चा हिंदूकुश ओलांडून काबूलकडे वळविला. बाबरचा चुलता उलूघबेग याचा इ. स. १५०१ मध्ये मृत्यू झाल्यानंतर त्याचा अल्पयीन मुलगा काबूलच्या गादीवर आला. पण वजीराने सर्व अधिकार आपल्या ताब्यात घेतल्याने लोकांनी त्यास ठार केले. या गोंधळाचा फायदा घेऊन बाबराने काबूल शहर आपल्या ताब्यात घेतले व पुढे त्याने कंदाहारवर आक्रमण करून तेही जिंकून घेतले. (१५०४) काबूलमध्ये त्याने अनेक सुधारणा घडवून आणल्या व तेथील जनतेचा विश्वास संपादन केला. यावेळी त्याने 'मिर्झा' ही उपाधी बदलून बाबराने स्वत:स 'बादशहा' (सम्राट) ही उपाधी धारण केली. बाबराने काबूलला वीस वर्षे राज्यकारभार केला. याकाळात त्याला भारतातील वैभवाबद्दल माहिती मिळाली आणि त्याने भारतावर आक्रमण करण्याचे ठरविले.

**● बाबरच्या स्वारीवेळी भारताची परिस्थिती :**

बाबरच्या स्वारीवेळी भारतातील राजकिय सत्ता अत्यंत शोचनीय होती. केंद्रीय सत्ता दुबळी होती. दिल्लीच्या सुलतान इब्राहिम लोदी हा दुबळा असल्याने अनेक सरदार त्याच्या विरोधात बंड करू लागले होते. फिरोज तुघलकाच्या काळापासून बंगाल दिल्ली साम्राज्यातून फुटून बाहेर पडला आणि तेव्हापासून बंगालमध्ये हुसेन घराण्याचे राज्य चालू होते. मध्य भारतात माळवा, गुजरात, मेवाड ही तीन राज्ये त्यांच्यात सत्ता स्पर्धा चालू होती. सिंध प्रांताने मुहंम्मद तुघलकाच्या काळातच स्वतंत्र राज्य निर्माण केले होते. पंजाब प्रांतावर सुलतानाची नाममात्र सत्ता होती. कारण पंजाबचा राज्यपाल दौलतखान लोदी याला इब्राहिम लोदीचे वर्चस्व मान्य नव्हते. इंब्राहिमखानाशी असलेल्या शत्रुत्वातून दौलतखानने बाबरला भारतात येण्याचे निमंत्रण दिले. यात भर म्हणजे इब्राहिम लोदीचा चुलता अल्लाउद्दीन खान व मेवाडचा राणासंग यांनी इब्राहिमखानाला पायबंद

घालण्यासाठी बाबरशी संधान साधले होते. मुहंम्मद तुघलकाच्या काळात दक्षिणेत विजयनगर व बहामनी ही राज्ये अस्तित्वात आली. पुढे बहामनी राज्याचे विभाजन होऊन पाच शाह्या अस्तित्वात आल्या. त्यांचा आपापसात तसेच विजयनगरशी सतत संघर्ष होत असे, त्यामुळे दक्षिणेतही राजकीय अस्थिरता होती. थोडक्यात तत्कालिन भारतात प्रभावी केंद्रसत्तेचा अभाव होता. छोट्या छोट्या राज्यांमध्ये तो विभागलेला होता. त्यांच्यातील सत्तास्पर्धा व संघर्षामुळे भारतातील राजकिय परिस्थिती अत्यंत गोंधळाची बनलेली होती.

● **बाबरच्या भारतावरील स्वाऱ्या :**

बाबरने आपल्या आत्मचरित्रात त्याच्या भारतावरील स्वाऱ्यांचा वृत्तांत दिलेला आहे. इ. स. १५१९ मध्ये त्याने भारतावर पहिले आक्रमण केले. बंडखोर युसूफजाई टोळ्यांचा पाठलाग करीत बाबर भारतात आला. त्याने बाजौर किल्ला जिंकून घेतला. भारतावर दहशत बसविण्यासाठी त्याने बाजौरमध्ये मोठ्या प्रमाणात कत्तल केली. त्यानंतर त्याने 'भेरा' हा किल्ला जिंकून घेतला. बाबरने दूत पाठवून दिल्लीला निरोप दिला की, तुर्की लोकांच्या ताब्यात जे जे प्रांत पूर्वी होते, ते प्रांत बाबरला देण्यात यावे. परंतु या निरोपाला दिल्लीहून उत्तर आले नाही म्हणून भेरा येथे हिंदुबेग याची नेमणूक करुन बाबर काबूलला परत गेला. पण लवकरच पठाणांनी हिंदुबेगचा पराभव करून आपला प्रदेश मिळविला. अशा रितीने बाबरची पहिली स्वारी अयशस्वी ठरली. यानंतर सप्टेंबर १५१९ मध्ये त्याने भारतावर दुसरी स्वारी केली आणि पेशावर जिंकण्याचा प्रयत्न केला. परंतु अंतर्गत यादवीमुळे ही स्वारी अर्धवट सोडून बाबरला काबूलला परतावे लागले. इ. स. १९२० मध्ये बाबराने भारतावर तिसरी स्वारी केली. यावेळी तो बाजौर व भेरा जिंकून सियालकोटपर्यंत पोहोचला. यावेळीही कंदाहारमध्ये त्यांच्या विरोधात बंड झाल्याने काबूलला परत गेला.

दिल्लीचा सुलतान इब्राहिमखान लोदी व दौलतखान लोदी यांच्यात संघर्ष सुरू झाला होता. दौलतखानाला पंजाबची सत्ता पाहिजे होती, त्यासाठी त्याने बाबरकडे मदत मागितली व भारतात येण्याचे निमंत्रण दिले. ही संधी साधून बाबराने इ. स. १५२४ मध्ये चौथी स्वारी केली. यावेळी बाबराने लाहोर जिंकून दिपालपूर, सल्तानपूर हे जिंकून पंजाबचा बराच प्रदेश जिंकला. दौलतखानाने आता पंजाबचे राज्यपालपद आपल्याला मिळावे अशी मागणी केली. परंतु बाबराने ती मागणी नाकारली, त्यामुळे दौलतखान नाराज झाला. बाबरने पंजाबची जबाबदारी आलमखान, दिलावरखान आणि दौलतखान यांच्यात विभागून तो सैन्याची व्यवस्था करण्यासाठी काबूलला निघून गेला. बाबरच्या अनुपस्थितीचा दौलतखानाने फायदा घेतला आणि आलमखान व दिलावरखान यांच्यावर अचानक हल्ला करून संपूर्ण पंजाब आपल्या ताब्यात आणला. त्याने आलमखानाला आपल्या बाजूला वळविले आणि दोघांनी मिळून दिल्लीवर स्वारी केली. परंतु इब्राहिम लोदीने दोघांचाही पराभव केला. बाबराला ही बातमी समजताच तो भारतावर आक्रमण करण्यासाठी निघाला.

बाबराने आपला मोर्चा आत्ता दिल्लीकडे वळविला. वाटेत बाबराने सैन्य आणि इब्राहिमचे सैन्य यांच्या अनेक चकमकी झाल्या परंतु त्यात इब्राहिमच्या सैन्याचा पराभव झाला. बाबार आपले सैन्य घेऊन पानिपत या ठिकाणी पोहोचला व तेथे त्यने आपल्या सैन्याचा तळ टाकला.

### ● मुघल साम्राज्याची स्थापना

### १) पानिपतची पहिली लढाई (२१ एप्रिल १५२६)

दिल्लीतील बलाढ्य सत्तेशी लढावे लागणार याची बाबरला कल्पना होती. त्याने प्रथम आलमखानाची (इब्राहिमचा काका) मदत घेतली. दिल्ली दरबारातील अनेक अधिकाऱ्यांनी त्याला सहकार्य करण्याचे आश्वासन दिले होते, त्यामध्ये मेवाडचा राणासंग ही होता. बाबराच्या स्वारीची बातमी समजताच इब्राहिम लोदीनेही प्रचंड सैन्याची जमवाजमव केली व पंजाबकडे निघाला. त्यानेही पानिपतला आपल्या सैन्याचा तळ टाकला. यावेळी बाबराकडे २४,००० सैन्य होते, तर इब्राहिमकडे ४०,००० सैन्य होते.

पानिपतच्या युद्धभूमीवर बाबराने सैन्याची व्यूहरचना अतिशय उत्कृष्ट पद्धतीने केली होती. सैन्याच्या अग्रभागी ७०० बैलगाड्या मजबूत दोरखंडांनी बांधून उभ्या केल्या होत्या. त्यामागे सुसज्जित तोफखाना ठेवण्यात आला होता, त्याची जबाबदारी उस्तादअली व मुस्ताफा या अधिकाऱ्यांकडे होती. तोफखाण्याच्या रक्षणासाठी खडे सैन्य होते. सैन्याची उजवी बाजू संरक्षित करण्यासाठी खोल खंदक खोदण्यात येऊन त्यावर मोठमोठी झाडे तोडून टाकण्यात आली होती. शत्रूची घेराबंदी करण्यासाठी सैन्याच्या दोन्ही बाजूला फिरत्या घोडदळाच्या(तुलूगमा) दोन तुकड्या ठेवल्या होत्या. याशिवाय राखीव सैन्य ठेवलेले होते. याउलट इब्राहिमने आपल्या सैन्याची रचना पारंपारिक पद्धतीने केलेली होती. २० एप्रिलच्या रात्री बाबरच्या चार-पाच हजार सैनिकांनी इब्राहिमवर अचानकपणे आक्रमण केले, परंतु ते अपयशी ठरले. यामुळे चिडून इब्राहिमखानाने २१ एप्रिलला सकाळीच बाबरावर आक्रमण करण्याचा आदेश आपल्या सैनिकांना दिला. परंतु हल्ला करण्याचे पूर्वनियोजन नसल्याने त्याच्या सैन्यात गोंधळ निर्माण झाला. हे पाहून बाबराने त्यांच्यावर आक्रमण करण्याचा आदेश आपल्या सैन्याला दिला व युद्धाला सुरवात झाली.

बाबराच्या तोफखान्याने इब्राहिमच्या सैन्यावर हल्ला केला. बाबराच्या सैन्याचे इब्राहिमच्या सैन्याला घेरून चौफेर हल्ले सुरू केले, तसेच बाबराने आपले राखीव सैन्य त्यांच्यावर पाठविले. सकाळी नऊ वाजता सुरू झालेले हे भयानक युद्ध दुपारी तीन वाजता संपले. इब्राहिम लोदीसह त्याचे १६ हजार सैन्य रणभूमीवर ठार झाले. इब्राहिम ठार झाल्याचे पाहून त्याचे सैन्य पळू लागले. बाबरच्या सैन्याने त्यांचा दिल्लीपर्यंत पाठलाग केला. बाबराच्या या विजयाने दिल्लीवर मुघल घराण्याची सत्ता निर्माण झाली.

### ● पानिपतच्या लढाईचे परिणाम :

हिंदूस्थानच्या इतिहासात पानिपतची लढाई अत्यंत महत्वाची मानली जाते. ही लढाई निर्णायक ठरली. या युद्धात इब्राहिम लोदीच्या सैन्याची दाणादाण उडाली. इब्राहिम लोदी युद्धभूमीवर मारला गेला. त्यामुळे दिल्लीवरील अफगाण वंशाची सत्ता नष्ट होऊन दिल्लीवर मुघल साम्राज्याची स्थापना झाली. भारताच्या इतिहासात एका नव्या युगाचा प्रारंभ झाला. हे मुघल साम्राज्य जवळ जवळ दोन शतके टिकून राहिले. पानिपतमध्ये मिळालेल्या विजयामुळे बाबरची गणना असामान्य सेनापतींमध्ये होऊ लागली. बाबराच्या विजयामुळे मेवाडचा महाराणा राणासंग याचे दिल्लीला हिंदू साम्राज्य स्थापन करण्याचे स्वप्न भंग पावले.

● **बाबरच्या विजयाची कारणे :**

१) इब्राहिम लोदी आपल्या सरदारांना अयोग्य पद्धतीने वागवित असे, त्यांच्याकडे संशयी नजरेने पहात असे, त्यामुळे अफगाण सरदारांची पूर्ण मदत त्याला मिळू शकली नाही.

२) इब्राहिमच्या सैन्यामध्ये शिस्त व नियोजनाचा अभाव होता. आधुनिक सैनिकी शिक्षण मिळालेले नव्हते. त्यांच्याकडे योग्य नेतृत्वाचा अभाव होता.

३) बाबरला व त्याच्या सैन्याला यृद्धाचा मोठा अनुभव होता. मध्य आशियातील मंगोल, इराणी, उजबेग आणि अफगाण या जमातींशी लढताना बाबराने त्यांची युद्धपद्धती शिकून घेतली होती. या सर्व अनुभवाचा बाबराला भारतात फायदा झाला.

४) बाबराच्या सैन्यात विभिन्न जमातींचे लोक होते. पण बाबराने त्या सैन्याचे सुयोग्य संगठन केले. बाबरच्या सैन्यात शिस्त होती आणि भारत जिंकून घेण्याची जिद्द होती.

५) इब्राहिमच्या सैन्यात तोफखाना किंवा बंदुकांचा विभाग नव्हता किंबहुना त्यांना दारुगोळ्याचा वापरच माहित नव्हता. बाबराच्या सैन्यात स्वतंत्र तोफखाना विभाग होता. त्यामध्ये मोठ्या तोफा व बंदुकांचा समावेश हाता. या तोफखान्यामुळेच बाबराला निर्णायक विजय मिळाला.

६) सेनापती या नात्याने बाबर हा इब्राहिमपेक्षा सरस होता. त्याला युद्धाचा मोठा अनुभव होता. या सर्व गोष्टींचा फायदा बाबरला मिळाला आणि त्यामुळे पानिपतच्या युद्धभूमीवर त्याने विजयश्री खेचून आणली.

● **बाबरने दिल्ली ताब्यात घेतली :**

पानिपतावर विजय मिळविल्यावर बाबराने हुमायुनला आग्रा घेण्यासाठी पाठविले, तर सैन्याची दुसरी तुकडी दिल्ली घेण्यासाठी पाठविली. बाबराने आग्रा व दिल्ली जिंकून घेतली. बाबराच्या सैन्याने प्रचंड लूट मिळविली होती, ती त्याने सर्वांना वाटली. १० मे १५२६ रोजी मोठ्या दिमाखात त्याने दिल्लीमध्ये प्रवेश केला. पानिपतचे युद्ध जिंकल्यावर व प्रचंड संपत्ती मिळाल्यावर बाबर काबूलला परत निघून जाईल अशी सर्वांची अपेक्षा होती. बाबराच्या सैन्याचीही तीच मागणी होती. परंतु बाबर परत जाण्याचे नाव काढीना त्यामुळे त्याच्या सैन्यात बंडाळीची परिस्थिती निर्माण झाली. तेव्हा बाबराने आपल्या सैन्यासमोर आवेशपूर्ण भाषण करून भारतात कायम रहाणे कसे आवश्यक आहे, हे पटवून दिले.

पानिपतानंतर बाबराच्या खऱ्या कार्याला प्रारंभ झाला. इब्राहिम लोदीच्या मृत्यूचा फायदा घेऊन अनेक अफगाण सरदार स्वतंत्र झाले होते. संभल, बयाना, मेवात, धौलपूर, ग्वाल्हेर, बिहार इ. प्रांत स्वतंत्र झाले होते. बाबराने भारतातच राहण्याचा निर्णय घेतल्यावर अनेक अफगाण सरदारांनी त्याच्यासमोर शरणागती स्विकारली. जे बाबराच्या विरोधात होते, त्यांच्या विरुद्ध लष्करी कारवाई केली. यावेळी हुमायूनने संबळ जिंकला, तर बाबराच्या सैन्याने ईटावा, कनौज, धौलपूर, ग्वाल्हेर इत्यादी प्रांत जिंकले. बाबराने सर्व शत्रूंचा बंदोबस्त करण्याचा निश्चय केला.

● **खानुआचे युद्ध (१७ मार्च १५२७)**

रजपूतांचा पूर्ण पराभव केल्याशिवाय मुघल साम्राज्य भारतात टिकणे अश्यक्य आहे, याची बाबराला पूर्ण जाणिव होती. मेवाडच्या राणासंगाने पानिपतच्या युद्धापूर्वी बाबराला मदत करण्याचे वचन दिले होते. परंतु ते वचन त्याने पाळले नाही. राणासंगाला भारतात हिंदू साम्राज्य स्थापन करावयाचे होते. बाबर भारतातच राहणार असे कळल्यावर त्याची घोर निराशा झाली होती. राणासंगाने आत्ता बाबराला भारताबाहेर घालविण्याचा निश्चय केला. त्याने राजस्थानातील सर्व रजपूत राजांना एकत्र केले. अनेक अफगाण देखील राणासंगाला सहकार्य करायला तयार झाले. राणासंग व बाबर यांच्या सैन्याची गाठ फत्तेपूर शिक्रीपासून दहा मैलावर खानुआ याठिकाणी पडली. राणासंग हा कसलेला सेनापती आणि अनेक लढाया लढलेला शूर सेनापती होता. राजपूतांच्या पराक्रमामुळे बाबरच्या सैन्यात भितीचे वातावरण तयार झाले होते. बाबराने आपल्या सैन्यासमोर आवेशपूर्ण भाषण केले व जन्मभर दारू न पिण्याची शपथ घेतली, दारूची सर्व उंची भांडी त्याने फोडून टाकली. त्याने या युद्धाला धर्मयुद्धाचे स्वरूप दिले. त्यामुळे बाबरच्या सैन्यामध्ये विलक्षण उत्साह निर्माण झाला.

यावेळी राणा संगाकडे ८०,००० सैन्य होते तर बाबराकडे ४०,००० सैन्य होते. बाबराच्या सैन्याची व्यूहरचना पानिपतच्या व्युहरचनेप्रमाणेच होती. १७ मार्च १५२७ ला सकाळी ९ वाजता युद्धाला सुरवात झाली. मुघलांचा डावा भाग फोडण्यासाठी राणा संगाने आपल्या सैन्याला आदेश दिला व युद्धाला प्रारंभ झाला. मुगलांच्या डाव्या आघाडीवर जोराचे आक्रमण होताच ते सैन्य बिथरले. त्याच्या मदतीसाठी आपले दुसरे सैन्य पाठविले. त्यांनी रजपूतांच्या उजव्या आघाडीवर जोरदार हल्ला केला व आघाडी फोडली. त्याच सुमारास मुस्ताफाने आपल्या सैन्याला खुल्या मैदानात प्रवेश करण्याचा आदेश देऊन तोफखाना सुरू केला. तोफखाण्याने आपले काम चोखपणे पार पाडले. त्यानंतर मुघलांनी डाव्या बाजूने आक्रमण सुरू केले. रजपूत सैन्य पराक्रमी असूनही मुघलांच्या डाव्या आघाडीने रजपूतांची उजवी बाजू खिळखिळी केली. त्याचवेळी उजवीकडील तुलूगमांना रजपूतांच्या मागील बाजूवर हल्ला करण्याचा आदेश दिला. त्यामुळे राणासंगाचे सैन्य गोंधळात पडले. राणासंग व रजपूत सैन्य मोठ्या शौर्याने लढले. परंतु राणासंग जखमी झाला, त्याच्या सैनिकांनी त्याला रणक्षेत्राबाहेर नेले. मुघलांच्या तोफखानापुढे रजपूत सैन्य फार काळ टिकू शकले नाही. परिणामी बाबराचा खानुवाच्या लढाईत पूर्णपणे विजय झाला. बाबराने मोठ्या प्रमाणात रजपूत सैन्याची कत्तल केली.

● **खानुआ युद्धाचे परिणाम** :

खानुआच्या युद्धात राणासंगाचा मोठा पराभव झाला. तो गंभीर जखमी होवून मृत्यू पावला. पराभूत रजपूत सैन्याची बाबराने मोठी कत्तल केली, त्यामुळे रजपूतांची शक्ती क्षीण झाली. असे असले तरी रजपूत पूर्णतः नष्ट झाले नाहीत. काही वर्षातच ते पुन्हा प्रबळ बनले. बाबराची राजपुतांवर पुन्हा आक्रमण करण्याची हिंमत झाली नाही. परकिय शत्रूला हिंदूस्थानबाहेर घालविण्याचा राणासंगाचा प्रयत्न पूर्णपणे अयशस्वी झाला. आणि मुघल साम्राज्य भारतामध्ये कायम झाले.

● **घागऱ्याचे युद्ध(६ मे १५२९)** :

खानुआच्या युद्धानंतर बाबराने मेवात, चांदवार, रापारी, इटावा इ. प्रदेश जिंकून घेतले. इ. स. १५२८

मध्ये बाबराने चंदेरी किल्याला वेढा दिला. चंदेरीचा राजा मेदिनीराय याने सुरवातीपासून राणासंगाला सहकार्य केलेले होते. मेदिनीरायने पराक्रमाची शर्थ केली, परंतु शेवटी त्याला बाबरापुढे शरणागती घ्यावी लागली. चंदेरीवरील विजयानंतर बाबराने बिब्बनच्या विरूद्ध पावले उचलली. बिब्बनने अवधमधून मुघलांची हकालपट्टी केली होती व त्याने लखनौही जिंकून घेतले होते. बाबराने गंगा नदी ओलांडून त्याच्यावर आक्रमण केले व त्याचा पराभव केला. आपल्या विजयप्रित्यर्थ बाबराने अयोध्या येथे मशीद बांधली.

बाबराला आता आपले सर्व लक्ष बिहार राज्याकडे वळवावे लागले. खानुआच्या युद्धातून मुहंम्मद लोदी पळून गेला आणि त्याने एक लाखाचे सैन्य जमविले आणि तो बनारस, चुनारपर्यंत आला. यामुळे बाबराच्या साम्राज्याला फार मोठा धोका निर्माण झाला. तेव्हा बाबराने आपले सैन्य घेऊन मुहंम्मद लोदीवर हल्ला केला, चुनारचा वेढा उठवून लोदी सैन्य बंगालचा शासन नुसरतशहा याच्या आश्रयाला गेले. नुसरतशहा व मुहंम्मद लोदी यांच्यात मैत्री होती. ६ मे १५२९ रोजी अफगाण सैन्य व बाबराचे सैन्य यांच्यात घागरा येथे लढाई झाली. या लढाईत दोन्ही पक्षाकडून तोफखान्याचा वापर करण्यात आला. अखेर या युद्धात अफगाण सैन्याचा पराभव झाला. नुसरतशहाने बाबराबरोबर तह केला. बिहारवर बाबरचे वर्चस्व निर्माण झाले. बाबराचे हे शेवटचे युद्ध ठरले. अशारितीने सिंधपासून बिहारपर्यंत आणि हिमालयापासून ग्वाल्हेरपर्यंत बाबराचे साम्राज्य प्रस्थपित झाले.

**● बाबराचा मृत्यू (२६ डिसेंबर, १५३०) :**

बाबराला सर्वत्र विजय मिळाल्यावर त्याने स्वतःला बादशहा ही पदवी धारण केली. खानुआच्या लढाईनंतर बाबराने हुमायूनला बदवशानचा राज्यपाल नेमले होते. पण तो लवकरच दिल्लला परत आला. त्याला भेटून बाबराला अतिशय आनंद झाला. त्यानंतर त्याला संभलचा राज्यपाल नेमले. परंतु तो तेथे फार आजारी पडला, त्याला परत दिल्लीला आणण्यात आले. हुमायुनच्या आजाराविषयी एक कथा सांगण्यात येते. परंतु तिला विशेष ऐतिहासिक आधार नाही. हुमायूनची आजारपणातून वाचण्याची शक्यता कमी झाली होती, कुठलेही औषध लागू पडत नव्हते. हुमायून या आजारपणातून बरा व्हावा, यासाठी बाबराने अल्लाकडे प्रार्थना केली व आपली सर्वांत आवडती वस्तू म्हणजे स्वतःचे प्राण ईश्वराला अर्पण केले आणि हुमायूनला वाचविण्याची विनंती केली. अशा रीतीने बाबराचे राहिलेले आयुष्य हुमायूनला मिळाले. हुमायूनची तब्बेत सुधारत गेली आणि बाबर मात्र फार आजारी पडला आणि त्याचा २६ डिसेंबर १५३० रोजी मृत्यू झाला.

**● तुझुक-ए-बाबरी(बाबरनामा) :**

मुघल साम्राज्याचा संस्थापक म्हणून बाबर इतिहासात प्रसिद्ध आहे, तसाच साहित्याच्या क्षेत्रातही त्याच्या 'तुझुक-ए-बाबरी' या ग्रंथावरून त्याचे नाव अजरामर झाले. हे आत्मचरित्र त्याने तुर्की भाषेमध्ये लिहिले आहे. या ग्रंथात त्याने आपल्या गुण दोषांसहित स्वतःचे जीवनचरित्र लिहीले आहे. त्यात त्याने भोवतालच्या लोकांचे रितीरिवाज, पोषाख, आवडीनिवडी, त्याने पाहिलेले प्रदेश, पशुपक्षी, वृक्षवेली, हवामान, उद्योगधंदे यांचे मोठे रसभरीत वर्णन केलेले आहेत. ही वर्णने अत्यंत मनोरंजक रीतीने केलेली आहेत. बाबराची निरीक्षण शक्ती चौफेर, अचूक व तीक्ष्ण होती, त्याची लेखनशैली सुंदर आहे.

बाबराने त्याच्या आत्मचरित्रात भारताविषयी वर्णन केलेले आहे, तो म्हणतो, ''येथील लोक सुंदर नाहीत. त्यांना एक-दुसऱ्यांकडे जाण्याची पद्धत माहित नाही, येथे उत्तम घोडे, कुत्रे, अंगूर, खरबूज मिळत नाहीत, तसेच उत्तम प्रकारची फळेही नाहीत. बाजारामध्ये उत्तम प्रकारचे अन्न मिळत नाही, गरम पाणी मिळत नाही, उच्च शिक्षणाची सोय नाही, इतकेच काय त्यांना कंदिल किंवा मेणबत्त्या माहित नाहीत.''

''मोठमोठ्या नद्या व झऱ्यांचे पाणी सोडल्यास येथे पाण्याचा अभाव आहे. येथील घरे कोंदट असून त्यात हवा कधीच खेळती नसते. येथील शेतकरी अर्धनग्न अवस्थेतच असतात. हिंदुस्थानात फक्त एकच गोष्ट चांगली आहे आणि ती म्हणजे येथे सोने आणि चांदी विपुल प्रमाणात सापडते. पावसाळ्यात येथील हवा अतिशय सुरेख असते. उन्हाळ्यात कोरड्या असणाऱ्या नद्या पावसाळ्यात दुथडी भरून वाहू लागतात. हिंदुस्थानातील दुसरी चांगली गोष्ट ही आहे की प्रत्येक प्रकारचे काम करणारे अनेक कारागीर येथे सापडतात. अशा काम करणाऱ्या कारागीरांची एक स्वतंत्र जातच असते आणि हे कारागीर पिढ्यानपिढ्या एकच धंदा करीत असतात.''

बाबरकालीन ऐतिहासिक घटनांची माहिती देणारे साधन म्हणून 'तुझुक-ए-बाबरी' कडे पाहिले जाते. पुढे अकबराच्याकाळात या ग्रंथाचे फारसीत भाषांतर करण्यात आले (१९९०) तसेच इ.स. १८२६ मध्ये विल्यम अर्स्किनने त्याचे इंग्रजीत भाषांतर केले. याशिवाय अनेक युरोपियन भाषांमध्ये त्याचे भाषांतर झालेले आहे. बाबराने व्यक्त केलेल्या या मतात सत्यांश बराच कमी आहे. कारण तो भारतात अतिशय थोडा काळ वास्तव्य करून राहिला होता. याशिवाय तो भारत जिंकण्याच्या इच्छेने भारतात आलेला होता. त्यामुळे भारतीयांना कमी लेखण्याची प्रवृत्ती त्याच्यात निर्माण झालेली होती. शिवाय सामान्य लोकांशी त्याचा संबंध आलेला नव्हता, त्यामुळे त्याच्या या आत्मचरित्रात भारताविषयी पूर्ण सत्य माहिती कमी आहे.

- **स्वयं अध्ययन प्रश्न - १**

**अ) योग्य पर्याय सांगा**

१) मुघलांचे मूळ राज्य .......... येथे होते.

अ) फरगणा  ब) काबूल  क)कंदाहार  ड) समरकंद

२) पानिपतचे पहिले युद्ध बाबर आणि.......... याच्यामध्ये झाले.

अ) शेरशहा  ब) हेमू  क) इब्राहिम लोदी  ड) सिकंदीर लोदी

३) बाबराने खानुआच्या युद्धामध्ये .......... याचा पराभव केला.

अ) इब्राहिम लोदी  ब) राणासंग  क) राणाप्रमाप  ड) सिकंदर लोदी

४) बाबराने आपले आत्मचरित्र .......... भाषेमध्ये लिहिले आहे.

अ) तुर्की  ब) फारसी  क) हिंदी  ड) उर्दू

५) बाबर याचा जन्म .......... येथे झाला.

अ) काबूल ब) कंदाहार क) अंदिजान ड) समरकंद

६) बबरच्या भारतावरील स्वारीवेळी .......... हा पंजाबचा राज्यपाल होता.

अ) तारदी बेग ब) दौलतखान लोदी क) अल्लाउद्दीन खान ड) हिंदुबेग

७) .......... रोजी घागऱ्याची लढाई झाली.

अ) ६ मे १२९ ब) ५ मे १५२९ क) ६ मे १५३० ड) १० मे १५३१

८) खानुद्या लढाईवेळी राणासंगाकडे .......... सैन्य होते.

अ) ४० हजार ब) ६० हजार क) ५० हजार ड) ८० हजार.

९) खानुआ लढाईवेळी बाबराकडे .......... सैन्य होते.

अ) ४० हजार ब) ५० हजार क) ८० हजार ड) ६० हजार

१०) .......... याने 'तुझुक-ए-बाबरी' या ग्रंथाचे फारसीमध्ये भाषांतर करून घेतले.

अ) हुमायून ब) जहाँगीर क) शहाजहान ड) अकबर

### २.२.२ अकबर (इ. स. १५५६ ते इ. स. १६०५)

#### अ) अकबराचे पूर्व चरित्र व कार्य :

अकबराचा जन्म १५ ऑक्टोबर १५४२ रोजी अरकोट येथे झाला. त्याचे वडील हुमायून व आई हमीदाबानू होय. त्याचे मूळ नाव जलालुद्दीन मुहंम्मद अकबर असे होते. शेरशहाकडून पराभूत झाल्याने हुमायूनला हद्दपार व्हावे लागले असता अमरकोटचा राजा वीरसाल याने त्याला आश्रय दिला होता. तेथेच अकबराचा जन्म झाला. अकबराचे बालपण अतिशय कष्टात गेले. लहानपणी त्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करण्यात आली. परंतु अकबराने लिहिण्या-वाचण्याकडे कधीच लक्ष दिले नाही. शिकार आणि लढाई या गोष्टी त्याला आवडत होत्या. इ.स. १५५१ मध्ये त्याला गझनीचा सुभेदार नेमले. इ.स. १५५४ पर्यंत तो या पदावर होता. इ. स. १५५४ मध्ये हुमायून बरोबर हिंदुस्तानात आला. हुमायुनने दिल्लीला राज्य प्रथापित केल्यानंतर अकबराला पंजाबचा राज्यपाल नेमण्यात आले. बैरामखानाला त्याचा पालक म्हणून पाठविण्यात आले.

२६ जानेवारी १५५६ रोजी हुमायूनचा अपघाती मृत्यू झाला. त्यावेळी अकबर पंजाबमध्ये सिकंदरशहा लोदी बरोबर लढण्यात गुंतलेला होता. हुमायुनच्या मृत्यूची बातमी कळताच बैरामखानाने ताबडतोब पंजाबातील कलनौर येथे १४ फेब्रुवारी १५५६ रोजी अकबराचे राज्यारोहण केले. तशी घोषणा दिल्लीमध्ये ताबडतोब करण्यात आली. राज्याभिषेकवेळी अकबर अल्पवयीन असल्याने त्याची जबाबदारी बैरामखानावर होती.

**१) अकबर व हेमू संघर्ष :**

सिकंदरशहा सूर, मुहंम्मद आदिलशाहा इत्यादींनी मुघल सत्तेविरूद्ध लढा पुकारलेला होता. यासर्वांमध्ये हेमू हाच अकबराचा प्रबळ शत्रू होता. अकबरापुढे हेमूचे फार मोठे संकट उभे होते. हा हेमू अतिशय गरीब परिस्थितीतून स्वतःच्या कर्तबगारीने मोठा झाला होता. एकेकाळी रेवारीच्या बाजारात बाजारात धान्य मोजण्याचे काम तो करीत होता. इस्लामशहाने त्याला आपल्या सेवेत घेतले आणि त्याची प्रगती सुरू झाली. हेमू हा हुशार पराक्रमी व महत्वकांक्षी होता. आदिलशाहाने राज्याची सर्व जबाबदारी त्याच्यावर सोपविली होती. त्याचा त्याने फायदा घेतला. हेमुने हुमायूनच्या मृत्यूचा फायदा घेऊन दिल्ली आपल्या ताब्यात घेण्याचे ठरविले. हेमुने आग्र्यावर आक्रमण करताच आग्र्याचा राज्यपाल इस्कंदखान घाबरला व हेमूचा प्रतिकार करण्याऐवजी तो दिल्लीकडे पळाला, आग्रा जिंकताच हेमुने दिल्लीवर आक्रमण केले. दिल्लीचा राज्यपाल तारबदीबेग व हेमू यांच्यात तुघलकाबाद जवळ युद्ध झाले. या युद्धात तारदीबेगचा पराभव झाला व तो पंजाबकडे पळून गेला. हेमुने दिल्ली जिंकली आणि त्याने दिल्लीच्या किल्यात स्वतःचा राज्याभिषेक करून 'विक्रमादित्य' हा किताब धारण केला. दिल्लीच्या गादीवर पहिल्यांदाच एक हिंदू राजा हेमूच्या रूपाने बसला.

**२) पानिपतचे दुसरे युद्ध (५ नोव्हेंबर १५५६) :**

दिल्लीचा सत्ताधिश हेमू उर्फ विक्रमादित्य याने मुघलांची सत्ता पूर्ण नष्ट करण्याचा निर्धाार केला आहे, ही बातमी पंजाबमध्ये अकबराला समजली. यावेळी अनेक मुघल सरदारांनी हेमूच्या भितीपोटी काबूलला परतण्याचा अकबराला सल्ला दिला. पण माघार न घेता युद्ध करावे आणि पुन्हा सत्ता मिळवावी असा बैरामखानाचा निश्यच होता. त्याने मुघल सैन्यातील भिती व नैराश्य नष्ट करण्यासाठी दिल्लीहून पळून आलेल्या तारदीबेगला जाहीरपणे ठार मारले. त्यामुळे सगळे वातावरण बदलून गेले. अकबराने आपल्या सैन्याला पुढे जाण्याचा हुकूम दिला व शेवटी पानिपत येथे आपल्या सैन्याची छावणी टाकली. हेमूही आपले सैन्य घेऊन पानिपतमध्ये दाखल झाला. त्याच्याकडे एक लाख सैन्य व पाचशे हत्तीचे हत्तीदल होते. तर अकबराकडे २० हजार सैन्य व तोफखाना होता.

५ नोव्हेंबर १५५६ रोजी पानिपतची दुसरी लढाई दोघांच्यामध्ये घडून आली. हेमूने युद्धाची जय्यत तयारी केली होती. बैरामखानाच्या नेतृत्वाखाली मुघल सैन्याची व्यूहरचना करण्यात आली होती. हेमू सैन्याच्या मध्यभागी राहून नेतृत्व करीत होता. सुरवातीला हेमूचीच सरशी होत होती, तर अकबराची परिस्थिती बिकट होती. दरम्यान अंबारीत बसून लढणाऱ्या हेमूच्या डोळ्यात एक बाण घुसला व तो बेशुद्ध होऊन खाली पडला. हेमूचा मृत्यू झाला असावा, असे त्याच्या सैन्याला वाटून त्यांनी युद्धभूमीतून पळ काढला. युद्धात विजय मिळत असलेल्या सैन्याने पळ काढल्याने सर्वत्र गोंधळ निर्माण झाला. अशा रितीने पानिपतच्या युद्धभूमीवर अकबराचा प्रचंड विजय झाला. जखमी हेमूला अकबरासमोर उभे करण्यात आले व त्याला ठार मारण्यात आले.

**३) दुसऱ्या पानिपत युद्धाचे परिणाम :**

१) हेमूचा दुसऱ्या मानिपत युद्धात पराभव झाल्यामुळे दिल्लीवर सत्ता स्थापन करण्याचे हिंदूंचे स्वप्न भंग पावले.

२) या युद्धापूर्वी भारतात अफगाणांची थोडी बहुत सत्ता होती. परंतु या युद्धात मुघलांचा विजय झाल्याने भारतातील अफगाण सत्तेचा शेवट झाला.

३) पानिपतच्या युद्धात विजय मिळाल्याने भारतातील मुघल सत्ता स्थिर झाली आणि अकबराचे सम्राट पदाचे आसन स्थिर झाले.

४) अकबर बादशाहाची गणना महान राज्यकर्त्यांमध्ये केली जाते. त्याची कारकिर्द भारतीय इतिहासात संस्मरणीय ठरली. दुसऱ्या पानिपत युद्धात अकबर पराभूत झाला असता तर त्याची कारकीर्द संस्मरणीय ठली नसती.

५) बैरामखानाच्या कर्तबगारीमुळे मुघलांना या युद्धात विजय मिळाला असल्याने त्याचे मुघल दरबारातील वर्चस्व वाढले.

**४) अकबर विजयाची कारणे :**

दुसऱ्या पानिपत युद्धात अकबराला विजय मिळाला, त्याची कारणे पुढीलप्रमाणे –

१) दुसऱ्या पानिपत युद्धात अकबराच्या सैन्याचे नेतृत्व बैरामखानाकडे होते. तो कसलेला सेनापती होता. याने नियोजनबद्धपणे हेमूवर हल्ला केला आणि विजयश्री खेचून आणली.

२) हेमू हा सुद्धा पराक्रमी सेनापती होता. परंतु त्याच्या डोळ्याला अनपेक्षितपणे बाण लागल्यामुळे तो जखमी जाला. हे पाहून त्याचे सैन्य युद्धभूमीवरून पळाले.

३) हेमूने आपला तोळपखाना आपल्या मुख्य सैन्याच्या तुकडी बरोबर न ठेवता तो आघाडीच्या सैन्याबरोबर पाठविला ही त्याची थोडी चूक ठरली.

४) हेमूकडे कुशल सेनापतीला आवश्यक असलेल्या दूरदृष्टीचा अभाव होता. आग्रा व दिल्ली ताब्यात येताच त्याने मूठभर मुघलांचा तात्काळ पाठलाग केला असता तर मुघलांना भारताबाहेर हुसकावणे शक्य होते. पण हेमूने ही संधी गमावली.

५) हेमूने मुघलांच्या युद्धनितीचा अभ्यास केला असता व त्याप्रमाणे व्यूहरचना केली असती तर युद्धाचा निकाल वेगळा लागला असता. परंतु त्याने सरळ धोपट मार्ग पत्करून मृत्यूच्या खाईत उडी घेतली. त्यामुळे त्याचा पराभव झाला.

६) पानिपतच्या युद्धभूमीवर हेमूकडे एक लाख सैन्य होते. परंतु त्यापैकी केवळ तीस हजार सैन्यच लढाऊ होते. शिवाय मुघल सैन्यात असलेली जिद्द आणि एकी हेमूच्या सैन्यात नव्हती. त्यामुळे त्याचा पराभव झाला.

७) हेमूने युद्धाचे संचालन व मार्गदर्शन न करता प्रत्यक्ष युद्धात सहभाग घेतला. त्याने सैन्याला केवळ मार्गदर्शन केले असते तर ते सैन्याला प्रोत्साहन देणारे ठरले असते. परंतु तसे न केल्यामुळे व हेमूने प्रत्यक्षात युद्धात भाग घेतल्याने मुघल सैन्यांनी आपले सर्व लक्ष हेमूवर केंद्रित केले आणि हेमू जखमी होताच युद्धाचा सारा रंगच बदलून गेला.

वरील विविध कारणांमुळे अकबराला पानिपतच्या युद्धभूमीवर मोठा विजय मिळाला.

**ब) बैरामखान :**

अकबराची सत्ता स्थापन करण्यात आणि त्याचे सिंहासन स्थिर करण्यात बैरामखानाचा सिंहाचा वाटा होता. त्याचा जन्म बदक्शान येथे झाला असून तो शिया पंथीय होता. इ.स. १५३९ साली त्याने हुमायूनची नोकरी स्विकारली. शेरशहाबरोबरच्या संघर्षात हुमायूनला आपली सत्ता गमवावी लागली. त्याला भारतातून हद्दपार होणे भाग पडले. बैरामखान हुमायूनच्या सुख दुःखात शेवटपर्यंत त्याच्याबरोबर होता. त्याने पर्शियाच्या शहाकडून हुमायूनला मदत मिळवून देण्यात महत्वाची भूमिका बजावली. यानंतरच्या काळात हुमायूनचा सल्लागार व सेनापती म्हणूनच राहीला. सरहिंदच्या युद्धात त्याने सिकंदर सुर याचा पराभ्जव केल्याने हुमायूनने त्याला 'खान-इ-खानात' ही पदवी दिली होती. थोडक्यात हुमायूनला त्याने गमाविलेले राज्य मिळवून देण्यात बैरामखानाचा सिंहाचा वाटा होता.

इ.स. १५५६ ते १५६० याकाळात बैरामखान हा अकबराचा पालक व संरक्षक होता. हुमायुनच्या मृत्यूनंतर त्याने तात्काळ अकबराचा राज्याभिषेक घडवून आणला. बैरामखानाच्या कर्तबगारी व पराक्रमामुळे अकबराला पानिपतच्या दुसऱ्या लढाईत विजय मिळू शकला. दिल्ली-आग्रा जिंकल्यानंतर या सर्व प्रदेशात त्याने तात्पुरती प्रशासनव्यवस्था निर्माण केली. त्याने मुघल सत्तेचा विस्तार करण्यासाठी आपल्या सरदारांना विविध प्रदेशात पाठविले. परंतु याचवेळी मुघल दरबारात बैरामखानाच्या विरोधात वातावरण निर्माण झाले. यातूनच अकबर आणि बैरामखान यांच्यात वितुष्ट निर्माण झाले.

अकबर अल्पवयीन असल्याने बैरामखान हाच त्याचा पालक होता, म्हणजेच मुघलांचा खरा सत्ताधीश तोच होता. बैरामखानाचे वर्चस्व इतरांना सहन झाले नाही. बैरामखानाचा हट्टी व तापट स्वभाव, त्याने स्विकारलेले पक्षपाती धोरण, सुन्नी पंथीयांचा विरोध, राजपरिवारातील स्त्रियांचा विरोध आणि अकबराची सत्ता हातात घेण्याची प्रबळ इच्छा या सर्व कारणांमुळे इ. स. १५६० साली अकबराने बैरामखानास पालक पदावरून काढून टाकले आणि त्याला मक्केस जाण्याचा आदेश दिला. बैरामखानाने अत्यंत नाखुषीने ही अज्ञा मान्य केली, कारण त्याला अकबराबरोबरचे संबंध बिघडवायचे नव्हते. परंतु याचवेळी बैरामखान पंजाबमध्ये असताना त्याच्यावर नजर ठेवण्यासाठी पीर मुहंम्मद याला ससैन्य पाठविले. बैरामखानाला याचा राग आला आणि त्याने अकबराविरुद्ध बंड पुकारले. पण पीर मुहंम्मदने त्याचा पराभव केला. अकबराने त्याला माफ करून चंदेरीचा राज्यपाल किंवा आपला सल्लागार म्हणून राहण्यास सांगितले. परंतु बैरामखानाने मक्केत जाणे पसंत केले. परंतु वाटेत गुजरात येथे त्याचा मुबारकखान या अफगाणाने त्याचा खून केला.(३१ जानेवारी १५६१) एका कर्तबगार व्यक्तिचा शेवट असा वाईट पद्धतीने व्हावा, ही दुर्दैवाची गोष्ट आहे.

**क) अकबराचा साम्राज्यविस्तार :**

अकबर हा अत्यंत महत्त्वकांक्षी व साम्राज्यवादी बादशहा होता. त्याच्या राज्याभिषेकप्रसंगी त्याचे राज्य नाममात्र होते. इ.स. १५५६ ते १५६० या काळात त्याने बैरामखानाच्या नेतृत्वाकाली दिल्ली, आग्रा, पंजाब,

ग्वाल्हेर, जोनपूर आणि चुनार हे प्रदेश जिंकून आपले राज्य बळकट केले. इ.स. १५६० ते १६०१ या कालावधीत अकबराने आपला साम्राज्यविस्तार मोठ्या प्रमाणात केला. संपूर्ण भारतभर मुघल सत्तची स्थापना करणे, हे अकबराचे ध्येय होते. सत्ता व सामर्थ्य विस्तार हीच साम्राज्य विस्ताराची कसोटी होती. आक्रमण करण्यासाठी अकबर कोणत्याही कारणांची वाट पहात नसे. प्रदेश लालसा हेच त्याचे मुख्य उद्दिष्ट होते.

अकबर हा मुघल घराण्यातील पहिला राज्यकर्ता आहे की, ज्याने भारतामध्ये विशाल साम्राज्याची निर्मिती केली. युद्धाशिवाय आपला दरारा निर्माण होणार नाही म्हणून अकबराने आक्रमणे सुरू केली व प्रदेश संपादन केले. भारतातील अनेक स्वतंत्र राज्यांना पराभूत केले व त्यांचे स्वातंत्र्य हिरावून घेतले. राजाने नेहमी शेजारील राज्यांवर आक्रमण करून ती राज्ये जिंकून घेतली पाहिजेत. नाहीतर ती राज्ये आपल्यावर आक्रमण करतील, म्हणून साम्राज्य विस्तार आवश्यक आहे. असे अकबराला वाटत होते.

अकबराने माळवा, जोनपूर, गौडवन, चित्तोड, रणथंबोर, कलिंजर, गुराज, बंगाल, बिहार इत्यादी प्रदेश जिंकूण घेतले. त्यानंतर अकबराने काश्मीर, काबूल, वायव्य सरहद्द प्रांत, दक्षिण सिंध, बलुचिस्तान व कंदाहार परिसरावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. पुढे अकबराने अहमदनगर व खानदेश पर्यंत मुघल साम्राज्याचा विस्तार केला. अशाप्रकारे भारतामध्ये अत्यंत प्रभावी व विशाल साम्राज्य निर्माण करण्यामध्ये अकबर बादशाहा यशस्वी झाला.

**ड) अकबराचे राजपूतविषय धोरण :**

सम्राट अकबर हा एक कुशल राजनीतीज्ञ आणि दुरदृष्टी असलेला सम्राट होता. अकबराने राजपूतविषय सामंजस्य व सलोख्याचे धोरण स्विकारले होते. राजपूतविषयक धोरणातून अकबराची दूरदृष्टी धोरण स्विकारल्याशिवाय भारतात मुघल सत्ता दृढ होणार नाही, याची अकबराला जाणीव होती. तसेच राजपूतांच्या सहकार्याशिवाय राजकीय आणि सामाजिक एकता निर्माण होऊ शकत नाही याची जाणीव अकबराला होती. म्हणूनच अकबराने राजपूतविषयक सलोख्याचे धोरण स्विकारले. मुघल हा साम्राज्य विस्तारासाठी व दृढ करण्यासाठी राजपूतांचे सहकार्य संपादन करणारा अकबर हा पहिला मुस्लिम राज्यकर्ता होता. राजपूत ही जमात शूर, धाडशी व स्वामिनिष्ठ आहे हे ओळखून त्यांच्याशी उदारतेचे धोरण स्विकारले. अकबराचे राजपूतविषयक धोरण केवळ भावनेवर आधारीत नव्हते, तर त्यामागे मुघल साम्राज्य टिकविण्याचे पूर्वनियोजन होते. अकबराला सुरवातीपासूनच आपल्या अनुयाची किंवा सरदारांकडून विरोधाला सामोरे जावे लागले होते, तसेच अफगाण सरदारांचाही अकबराला सतत धोका होता. अशा परिस्थितीत राज्यातल्या निरनिराळ्या गटांचा पाठिंबा मिळविणे आवश्यक होते. या कारणांमुळे अकबराने राजपूतांना आपल्या बाजूला वळवून घेण्याचे ठरविले. राजपूतांना आपलेसे करण्यासाठी अकबराने पुढील उपाय योजले.

**१) राजपूतांशी वैवाहिक संबंध :**

अकबराने राजपूतांशी रक्ताचे नाते जोडण्यासाठी वैवाहिक संबंध स्थापन केले. अकबराने इ. स. १५६२ मध्ये जयपूरचा राजा भारमल याची कन्या जोधाबाई हिच्याशी विवाह केला. मुघल-राजपूत संबंधात हा विवाह

क्रांतिकारक ठरला. पुढे अकबराने बिकानेर, जोधपूर, जैसलमेर, या ठिकाणाच्या राजपूत कन्याबरोबरही त्याने विवाह केले. आपल्या मुलांचेही राजपूत राजकन्यांशी विवाह घडवून आणले. अकबराने आपल्या हिंदु राण्यांना पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य दिले. या वैवाहिक संबंधामुळे राजनितीमध्ये नवे युग सुरू झाले.

**२) राजपुतांना प्रशासनामध्ये उच्च पदे :**

अकबराने राजपूत राजे, सरदार यांना आपल्या प्रशासनात नोकऱ्या दिल्या. त्यांना प्रशासनात महत्वाच्या जबाबदारीची पदे देण्यात आली. राजा भारमलचा मुलगा भगवानदास व नातू मानसिंह यांना मनसबदार बनविण्यात आले. अनेक लढायांमध्ये या दोघांनी अकबराला बहुमोल मदत केली. याशिवाय राजा तोडरमल, राजा बिरबल आदींना मोठी अधिकारपदे दिली. त्यांनीही शेवटपर्यंत अकबराची प्रामाणिकपणे सेवा केली.

**३) धार्मिक स्वातंत्र्य :**

अकबराने समस्त हिंदूचा किंबहुना राजपूतांचा पाठिंबा मिळविण्यासाठी उदार व सहिष्णू धार्मिक धोरणाचा स्विकार केला होता. आपल्या हिंदु राण्यांना पूर्ण धार्मिक स्वातंत्र्य दिले होते. त्यांना स्वतःच्या धर्म व रितीरिवाजानुसार धार्मिक विधी व सणवार साजरे करण्याचे स्वातंत्र्य दिले होते. इतकेच नव्हे स्तः अकबर या सर्वांमध्ये सहभागी होत असे. त्याने हिंदूवरील अन्यायकारक जिझीया व यात्रा कर बंद केला.

**४) सामाजिक सुधारणा :**

अकबराने सतीची चाल, बालविवाह यासारख्या हिंदुधर्मातील अनिष्ट चालीरीतीवर कडक बंधने घातली. विधवा पुनर्विवाहास उत्तेजन दिले, हिंदुवरील यात्रा कर बंद केला.

**५) लष्करी कारवाई :**

राजस्थानमधील जे राजपूत राजे स्वेच्छेने आपले वर्चस्व मान्य करतील, तसेच जे विवाहसंबंधास तयार होतील, त्यांना आपल्या सेवेत घ्यायचे, त्यांना सन्मानाने वागवायाच्या धोरणाचा अलवंब केला, मात्र जे राजपूत राजे हे मान्य करणार नाहीत त्यांच्यावर लष्करी कारवाई करून बळाचा वापर करून आपल्या वर्चस्वाखाली आणायचे हे अकबराचे धोरण होते. त्यामुळेच मेवाड व रणथंबोरच्या शासकांशी शेवटपर्यंत संघर्ष करावा लागला.

**मेवाडशी संघर्ष :**

महाराणा उदयसिंहाने चित्तोडच्या पराभवानंतर अरवलीच्या डोंगराळ भागात उदयपूर नावाचे शहर बसवून तेथे स्वतंत्रपणे राज्य करायला सुरवात केली. उदयसिंहाच्या मृत्यूनंतर त्याचा मुलगा राणाप्रताप ३ मार्च १५७२ रोजी मेवाडचा सत्ताधीश बनला. चित्तोडचा किल्ला मुघलांच्या ताब्यातून मुक्त करण्याची प्रतिज्ञा राणाप्रतापने केली. राणाने आपल्या वडीलांप्रमाणेच मुघलांशी वैवाहिक संबंध जोडण्यास व त्यांचे मांडलिकत्व स्विकारण्यास कठोर विरोध केला. अकबराने मानसिंह, भगवानदास व तोडरमल यांना पाठवून राणाप्रतापने आपले मांडलिकत्व स्विकारावे यासाठी प्रयत्न केले. पण राणाप्रताप हा कट्टर हिंदू धर्माभिमानी असल्यामुळे त्याने अकबराचा प्रस्ताव

धुडकावून लावला तेव्हा अकबराने राजा मानसिंग व आसफखान यांच्याबरोबर विशाल सैन्य देऊन मेवाडवर आक्रमण करण्यासाठी पाठविले. राणाप्रतापने या फौजेस हळदी घाटात गाठले आणि तिच्यावर हल्ला चढविला (१८ जून १५७६). राणाप्रताप जवळ फारच कमी सैन्य फौज होती. तरी ती अत्यंत पराक्रमी, धाडसी होती. राजपूतांच्या जबरदस्त हल्ल्यामुळे मुघलांची आघाडी व डावी बाजू विस्कळीत बनली. तथापी मुघलांची आघाडी व डावी बाजू विस्कळीत बनली. तथापि मुघलांची फौज जास्त होती. तसेच बंदूक व बाण यांचा माराही मोठ्या प्रमाणात मुघल सैन्याकडून होऊ लागला. याचा प्रतिकार करणे राणाप्रताप व त्याच्या सैन्याला जड जाऊ लागले. शत्रूकडून राणाप्रताप घेरला गेला आणि लढता लढता जखमी झाल. जखमी राणाला त्याच्या साथीदारांनी सुरक्षित स्थळी हलविले. रजपूत सैन्य मोठ्या शौर्याने लढले. पण शेवटी त्याचा पराभव झाला. राणाप्रतापचा पराभव झाल्याने गोगुंड व इतर काही किल्ले मुघलांच्या ताब्यात आले. तथापि मेवाडचा वायव्य भाग राणाप्रतापच्या अधिपत्याखालीच होता. अकबराने अनेकवेळा वेगवेगळ्या सरदारांना मेवाडवर पाठवून ते जिंकून घेण्याचा प्रयत्न केला. पण शेवटपर्यंत राणा प्रताप आणि रजपूत सैन्य यांच्याशी लढत राहिले. अकबराला संपूर्ण मेवाड शेवटपर्यंत जिंकता आला नाही.

**फ) अकबराच्या रजपूत विषयक धोरणाची चिकित्सा :**

अकबर हा पहिला मुस्लिम राज्यकर्ता आहे. ज्याने रजपुतांशी वैवाहिक संबंध जोडले, इतकेच नाही तर त्यांना आपल्या सेवेत घेऊन मोठमोठ्या मानाच्या जागा दिल्या. आपले सार्वभौमत्व स्विकारणाऱ्या रजपूत राजांना सन्मानाने वागविले. हे त्याचे धोरण निश्चितच यापूर्वीच्या मुस्लिम राज्यकर्त्यांच्या तुलनेत उदारपणाचे होते हे सत्य आहे. पण या धोरणाचे मागे अकबराची साम्राज्य विस्ताराची महत्त्वकांक्षा कारणीभूत होती, हे विसरून चालणार नाही. या धोरणाचा अकबराला आणि मुघल सत्तेला मोठा फायदा झाला. मागील साडेतीनशे वर्षापासूनचा रजपूतांचा इस्लामी सत्ताधीशांना असलेला तीव्र विरोध आता नाहीसा नाही. रजपूत मुघलांचे मित्र बनले, इतकेच नव्हे तर ते मुघल साम्राज्य विस्ताराचे आधारस्तंभ बनले.

अकबराच्या राजपूतविषयक धोरणाचे टीकात्मक परीक्षण अनेक इतिहासकारांनी केलेले आहे. डॉ. ईश्वरीप्रसाद म्हणतात, 'अकबर हा धारणी व मुत्सद्दी असल्यामुळे त्याने राजपूतांच्या सक्रीय सहकार्याचे महत्त्व लक्षात घेतले. हिंदुस्थानात मुसलमानांचे राज्य चिरस्थायी करणे, त्याचा विस्तार करणे व त्यास अधिक समृद्ध करणे हे रजपूतांच्या सहकार्याशिवाय कदापीही शक्य नाही. म्हणून त्यांने राजपूतांशी स्नेहाचे धोरण राबविले. डॉ. आशिर्वादीलाल श्रीनिवास यांच्या मते, 'राजपूत पराक्रमी, प्रामाणिक, त्यागी व स्वामिनिष्ठ होते म्हणून त्यांच्या गुणांची कदर करून त्यांना न्याय देण्याच्या हेतूने अकबराने आपले धोरण आखले. हे करीत असतांना अकबराने स्वत:च्या फायद्याचाही विचार केला म्हणजेच स्वत:च स्वार्थ साधून राजपूतांनाही न्याय देण्याची खटपट त्याने केली. त्यामुळे राजपूत मुघलांचे मित्र होऊ शकले.

अकबराने रजपूतांना आपलेसे करण्यासाठी त्यांच्या बरोबर वैवाहिक संबंध जोडले. त्याने जयपूर, बिकानेर व जेसलेमरच्या रजपूत राजांच्या मुलींशी विवाह केले. या वैवाहिक संबंधामुळे मुघल-रजपूत संबध घट्ट बनले. यासंदर्भात डॉ. बेनीप्रसाद म्हणतात की, 'अकबराच्या अशा धोरणांमुळे भारतीय राजकारणात एका नव्या युगाला

सुरवात झाली.' या विवाहामुळे देशाला बलाढ्य सम्राटांची परंपरा लाभली व मुघल सम्राटांना पराक्रमी लोकांचे साह्य मिळू लागले. थोडक्यात अकबराने वैवाहिक संबंध जोडून आपल्या उदात्त धोरणांचा पुरस्कार केला. त्यामुळे राजकीय स्थैर्य व हिंदू मुसलमान एकीला उत्तेजन मिळाले. अकबराच्या वैवाहिक धोरणांचे समर्थन करताना प्रा. डॉ. ईश्वरीप्रसाद म्हणतात की, 'वैवाहिक संबंधामुळे हिंदु व मुसलमान यांच्यातील वैमनस्याची तीव्रता कमी होऊ शकली.'

अनेक इतिहासकारांनी अकबराच्या रजपूत विषयक धोरणाची भरपूर स्तुती केलेली आहे. पण अकबराच्या या धोरणाचे टीकात्मक परीक्षण केल्यास अनेक गोष्टी स्पष्ट होतात. पहिली गोष्ट ही की या धोरणाच्या मुळाशी केवळ उदार दृष्टीकोन व परधर्म सहिष्णुता नव्हती. कारण अकबराची सर्वस्वी भिस्त लष्करी सामर्थ्यावरच होती. लष्करी सामर्थ्यावरच त्याला भारतात विशाल साम्राज्य निर्माण करता येणार होते. रजपूत ही अत्यंत पराक्रमी, शूर व लढवय्यी जमात आहे, याची त्याला पुरेपूर कल्पना होती आणि म्हणून त्याने रजपुतांविषयी उदार धोरण स्विकारले होते. या धोरणाचे उगमस्थान प्रदेशलालसा होती हे विसरून चालणार नाही. अकबराने रजपूतांच्या मुलींशी केलेले विवाह ही गोष्ट विचारात घेतली की असे दिसून येते की, त्याने हे कार्य एकांगी केलेले आहे. आपले राजघराण्यातील मुली राजपुतांना देऊन हे संबंध वाढविता आले असते. पण अकबराने असे केलेले दिसत नाही. तसेच राजा भगवानदास,राजा मानसिंह, राजा तोडरमल या रजपूतांना अकबाने प्रशासनातील उच्च पदे दिली ही फार कौतुकास्पद नाही. कारण अकबराने रजपुतांच्या स्वभावाचा सखोल अभ्यास केलेला होता. शिवाय रजपूतांकडे असलेल्या प्रशासकीय कौशल्याची त्याला चांगली जाण होती. अकबराने त्याला विरोध करणाऱ्या रजपूत राजांचा विरोध मोडून काढण्यासाठी मुघलांशी एकनिष्ठ असलेल्या रजपूतांचा त्याने वापर केला. म्हणजेच रजपूतांना आपल्याच बांधवाच्या विरोंधत लढविण्यात अकबराचे मुत्सद्देगिरी दिसून येते. थोडक्यात अकबराच्या रजपूतविषयक धोरणशत उदारतेपेक्षा राजकारण अधिक होते. म्हणून अकबराने रजपूत धोरण दूरदर्शी, मुत्सद्दी सम्राटाला शोभणारेच होते. त्यात मानवतावाद, उदारता, हिंदु-मुस्लिम ऐक्य ही तत्वे होती असे म्हणणे वास्तववादी इतिहासाला धरून होणार नाही.

**ई) राजपूतविषयक धोरणाचे परिणाम** :

अकबराने स्वार्थी हेतूने राजपूतांशी मैत्री केली असली तरी त्याच्या या धोरणाला इतिहासात महत्वाचे स्थन आहे. त्याचे पुढीलप्रमाणे परिणाम घडून आले.

१) अकबराच्या राजपूत नितीमुळे राजपूत त्यांचे मित्र बनले त्यामुळे मुघल साम्राज्याचा विस्तार झाला आणि राज्यात शांतता व सुव्यवस्था स्थापन झाली.

२) अकबराने स्विकारलेल्या राजपूतविषयक धोरणामुळे भारतात नव्या युगाचा प्रारंभ झाला. आत्ता हिंदु लोकांनी मुघलांना परकिय समजणे सोडून दिले. हिंदु-मुस्लिम ऐक्याचा नवा अध्याय सुरू झाला.

३) अकबराने आपल्या हिंदु राण्यांना धार्मिक स्वातंत्र्य दिले होते. त्यांना पूजाविधी, सणवार साजरे करण्याची परवानगी होती. शिवाय अकबर यासर्वांमध्ये सहभागी होत असे. अकबराच्या या धोरणामुळे मुघल साम्राज्य धर्मनिरपेक्ष बनण्यास प्रोत्साहन मिळाले.

४) अकबराने राजपूतांना प्रशासनातील उच्च पदे बहाल केली. राजपूतांनी आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा प्रशासनावर उमटविला, त्यामुळे मुघल प्रशासन भक्कम बनले.

५) अकबराच्या राजपूती नितीमूळे हिंदू-मुस्लिम यांच्यात शत्रुत्व कमी होऊन त्यांच्यात समन्वय निर्माण झाला. त्यामुळे हिंदु-मुस्लिम संस्कृतीचा विकास झाला. स्थापत्यकला, चित्रकला, संगीत व साहित्य क्षेत्राात याचा प्रभाव पडला. अकबराने बनविलेल्या बांधकामावर राजपूत शैलीचा प्रभाव दिसतो.

६) अकबराच्या राजपूतविषयक धोरणामुळे मुघल साम्राज्याचा विस्तार आणि विकास झाला. देशाच्या सुख समृद्धीत भर पडली. देशातील राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागली.

**फ) अकबराच्या रजपूत विषयक धोरणाची चिकित्सा :**

मध्ययुगीन भारतातील सर्व शासकांमध्ये सम्राट अकबराचे स्थान श्रेष्ठ आहे. इतिहासकारांनी जगातील थोर राज्यकर्त्यांबरोबर त्याची तुलना केलेली आहे. त्याने भारतामध्ये प्रभावी मुघल साम्राज्याची स्थापना केली तसेच कार्यक्षम प्रशासनव्यवस्था निर्माण केली. त्याने सुमारे ५० वर्षे राज्य केले. १५ ऑक्टोबर १६०५ रोजी त्याचा मृत्यू झाला. मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील अकबराचे स्थान खालील वैशिष्ट्यातून निश्चित करता येईल.

**● स्वयं अध्ययन प्रश्न - २**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) सम्राट अकबराचा जन्म.......... येथे झाला.

अ) फरघना ब) अमरकोट क) गझनी ड) कंदहार

२) पानिपतचे दुसरे युद्ध.......... साली झाले.

अ)१५२६ ब) १५६१ क) १७६१ ड)१५५६

३) अकबराचा पालक म्हणून.......... याने जबाबदारी पार पाडली.

अ) बैरामखान ब) अबुल फझल क) मिर्झा हकीम ड) फैजी

४) अकबर-जोधाबाई विवाह.......... साली झाला.

अ)१५६१ ब) १५६३ क) १५६२ ड) १५६४

५) अकबराने.......... धर्माची स्थापना केली.

अ) दिन-ए-इलाही ब) शिख क) शिया ड) सुफी

६) हळदीघाटची प्रसिद्ध लढार्स अकबर आणि .......... यांच्या मध्ये झाली.

अ) राणाप्रताप ब) राणासंग क) उदयसिंह ड) कर्णसिंह

७) दुसऱ्या पानिपत युद्धात मुघल सैन्याचे नेतृत्व .......... याने केले.

अ) दौलतखान ब) बैरामखान क) अकबर ड) अमीनखान

८) महाराणा उदयसिंहाच्या मृत्यूनंतर .......... हा मेवाडचा सत्ताधिश नव्हता.

अ) राा संग ब) कर्णसिंह क) राणा प्रताप ड) राजा मानसिंह

९) 'अकबर-रजपूत वैवाहिक संबंधामुळे भारतीय राजकारणात एका नव्या युगाला सुरवात झाली' हे विधान .......... यांनी केले आहे.

अ) डॉ. ईश्वरीप्रसाद ब) डॉ. आशिर्वादीलाल श्रीवास्तव

क) प्रा. राम शर्मा ड) डॉ. बेनीप्रसाद

१०) .......... याने हिंदुवरील अन्यायकारक जिझिया कर बंद केला.

अ) अकबर ब) औरंगजाब क) शहाजहान ड) जहाँगीर

## २.२.३ चाँदबिबी (इ. स. १५४७ ते इ. स. १५९९) :

मध्ययुगीन भारताच्या इतिहासावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवणाऱ्या कर्तबगार स्त्रियांमध्ये चाँदबिबीचे नाव उच्च स्थानावर आहे. तिने आपल्या कर्तृत्वाने निजामशाही आणि आदिलशाही कारभारावर आपला प्रभाव पाडलेला होता. आपले माहेर आणि सासरचे नाव उज्वल करण्याचे काम तिने केले आहे. दक्षिण भारतातील बहामनी सत्तेचा शेवट झाल्यानंतर स्वतंत्र पाच शाह्यांची निर्मिती झाली. इ. स. १४९० मध्ये अहमद निजामशहाने निजामशाहीची स्थापना केली. पुढे या घराण्यात होऊन गेलेल्या सुलतानांनी या सत्तेचा विस्तार करून दक्षिणेत नाावलौकिक मिळविला. या सत्तेच्या स्थापनेपासून ते ऱ्हासापर्यंत या घराण्यात अनेक कर्तबगार सुलतान होऊन गेले. या सर्वांमध्ये चाँदबिबीचे स्थान वरच्या दर्जाचे आहे. आजही भारतातील कर्तबगार स्त्रियांमध्ये तिचे नाव मोठ्या गौरवाने घेतले जाते.

चाँदबिबीच्या काळातील सय्यद अली तबातबा आणि फेरिश्ता या इतिहासकारांनी तिच्या कार्याची प्रशंसा केलेली आहे. फेरिश्ताने 'गुलशन-ई-इब्राहिमी' या ग्रंथात तिच्याविषयी गौरवोद्गार काढले आहेत. कर्नल मिडोज टेलर यानी तिच्यावर 'नोबल क्विन' ही तीन खंडाची कादंबरी लिहिली आहे. एलफिन्स्टन व अंटानियो फ्रेझर यांनीही आपल्या इतिहासग्रंथामध्ये तिच्या कार्याची नोंद घेतलेली आहे. इतकेच नाही तर विजापूरचा इब्राहिम आदिलशहा दुसरा याची तिच्यावर कविता जगप्रसिद्ध आहेत.

### १) जन्म, बालपण आणि विवाह :

हुसेन निजामशाहाची पत्नी खुतजा हिच्यापोटी इ. स. १५५० मध्ये चाँदबिबीचा जन्म झाला, अशी माहिती काझी शहाबुद्दीन याने तारीख-इ-शहावी या ग्रंथातून दिलेली आहे. पण काही इतिहासकारांच्या मते तिचा जन्म सन १५४७ मध्ये झाला असावा. बालपणी ती आपला बहुतांश वेळ शिकार आणि लष्करी प्रशिक्षणामध्ये

घालवत असे. तिला सतारवादन, गीत गायन तसेच चित्रकलेची विशेष आवड होती. तिने अरबी, फारसी, तुर्की, मराठी, कन्नड इत्यादी भाषा अवगत केल्या होत्या. हुसेन निजामशहाने आपल्या कन्येचा विवाह आदिलशाही सुलतान अली याच्याबरोबर इ. स. १५६२ मध्ये घडवून आणला होता. त्यानंतर ती विजापूरला गेली.

**२) विजापूरच्या प्रशासनातील कार्य :**

चाँदबिबीने आपला पती अली आदिलशाहाला राज्यकारभारात मदत करायला सुरवात केली. आदिलशाहीला त्रास देणाऱ्या विविध टोळ्यांशी संबंध सुधारले. मांडलिक राजांवर वचक निर्माण केला. या माध्यमातून तिने आपल्या राज्यामध्ये शांतता निर्माण केली. ती जनकल्याणाच्या कामामध्ये उत्साहाने सहभागी होत असे. ती गोरगरीबांना मदत करीत असे. यामुळे विजापूरच्या जनतेमध्ये ती अत्यंत लोकप्रिय बनली.

चाँदबिबीचा पती अली अदिलशाहा याचा इ. स. १५५० मध्ये मृत्यू झाला. चाँदबिबीला मुलबाळ नसल्यामुळे तिचा पुतण्या इब्राहिम याला गादीवर बसविण्यात आले. तो केवळ नऊ वर्षाचा होता. त्याच्या शिक्षण व संगोपनाची जबाबदारी चाँदबिबीवर होती. ही जबाबदारी तिने कार्यक्षमपणे सांभाळली. राज्याची सुत्रे प्रतिनिधी कामिलखानाकडे होती. त्याने दडपशाहीचा वापर करून राज्याची सूत्रे आपल्या हाती घेतली व तो चाँदबिबीला देखील अपमानास्पद वागणूक देऊ लागला. त्यामुळे ती संतप्त बनली. तिने कामिलखानाला सत्तेवरून दूर करण्यासाठी किश्वरखानाला जवळ केले. पण किश्वरखानाने कासिमखानाचे अनुकरण करून अनियंत्रितपणे राज्यकारभार करण्यास सुरवात केली. तेव्हा चाँदबिबीने मुस्तफाखानाला पुढे आणण्याचा प्रयत्न केला. किश्वरखानाला याची कल्पना येताच त्याने मुस्तफाखनाला ठार मारले. यामुळे चाँदबिबी व किश्वरखान यांच्यात वितुष्ट निर्माण झाले. किश्वरखानाने चाँदबिबीवर तिचा भाऊ मुर्तजा निजामशाहाला विजापूरवर आक्रमण करण्यासाठी प्रवृत्त केल्याचा आरोप करून कैद केले. तिला अत्यंत अपमानित करून सातारच्या किल्ल्यात डांबण्यात आले. राणीच्या अपमानामुळे सरदार इखलासखान व सरदार मंडळी संतप्त झाली आणि त्यांनी किश्वरखानाला सत्तेवरून दूर करण्याचा निश्चय केला. हे समजताच किश्वरखानाने अहमदनगरकडे पलायन केले.

इखलासखान विजापूरचा प्रतिनिधी बनताच त्याने चाँदबिबीची कैदेतून मुक्तता केली. याचवेळी विजापूर दरबारात हबशी आणि दख्खनी सरदारांमध्ये भांडणे सुरू होती. त्याचा फायदा घेण्यासाठी वऱ्हाड, अहमदनगर व गोवळकोंड्याच्या सुलतानानी विजापूरवर हल्ले सुरू केले. या कठिण प्रसंगी चाँदबिबीने विजापूरच्या संरक्षणाची चांगली व्यवस्था केली. प्रचंड पाऊस आणि अंधार असतानाही आपल्या चौक्यांना भेटी देऊन सैन्याचे मनोधैर्य वाढविले. शत्रूसैन्य साठ फुटाची तटबंदी उध्वस्त करण्यात यशस्वी झाले. चाँदबिबीने ताबडतोब कोसळलेली भिंत उभी केली. हे काम संपेपर्यंत ती स्वतः हजर होती. तिने मराठी सैन्याची मदत मिळविली. विजापूरी सरदार दिलावरखानाच्या सैन्याने शत्रूपक्षाचा पराभव केला. त्याने राज्याचा वजीर इकलासखान याला कैद करून त्याचे डोळे काढले. त्याने राज्याचे प्रतिनिधीपद स्वतःकडे घेतले. अनेक सरदारांना कैद केले, अनेकांना ठार मारले. पुढे त्याने सन १५८४ मध्ये इब्राहिम आदिलशाहाची बहिण खदिजा हिचा विवाह मुर्तजा निजामशाहाचा मुलगा

हुसेन याच्याबरोबर घडवून आणला. खदिजाबरोबर तिची चुलती चाँदबिबी भावाच्या भेटीसाठी अहमदनगरला निघून गेली.

**३) निजामशाही वाचविण्याचे प्रयत्न :**

चाँदबिबीची सर्वात मोठी कामगिरी म्हणजे मुघली आक्रमणापासून निजामशाहीचे केलेले संरक्षण होय. इब्रसहिम निजामशहाच्या काळात अहमदनगर दरबारात कट कारस्थानांना ऊत आलेला होता. त्यातच विजापूरशी झालेल्या युद्धात निजामशहा मारला गेला. त्यानंतर निजामशाही दरबारात गोंधळ व अराजक निर्माण झाले. त्यातच बादशहाचा अकबर आज्ञेवरून राजपुत्र मुरादच्या नेतृत्वाखाली मुघल सैन्य अहमदनगरवर चालून आले. त्यामुळे निजामशाहीसमोर मोठे संकट उभे राहिले. त्यावेळी निजामशाहीतील सरदारांनी पत्रे पाठवून चाँदबिबीला विनंती केली की तिने अहमदनगरला यावे, सरदारांना एकत्रित करून अहमदनगरचे संरक्षण करावे. अशा कठिण प्रसंगी चाँदबिबीने दक्षिणेत येण्याचा निर्णय घेतला.

निजामशाही दिवाण मिया मंजूने अहमद यास नगरच्या गादीवर बसविले होते. चाँदबिबीने इब्राहिमशहाचा दुसरा मुलगा बहादूर याची बाजू घेतली. त्याला गादीवर बसविण्याच्या व मुघलांपासून निजामशाहीचे संरक्षण करण्याच्या कामास ती लागली. इखलासखान, नेहगखान व मिया मंजू हे सर्वजण निजामशाहीची सत्ता मिळविण्यासाठी प्रयत्नशिल होते. आपल्या संबांधित व्यक्तीला गादीवर बसविण्यासाठी ते धडपडत होते. नेहंगखानाने मोगली सैन्याची फळी फोडून किल्ल्यामध्ये प्रवेश केला आणि तो राणीस येऊन मिळाला. राजपुत्र मुरादने नगरच्या किल्ल्याला वेढा दिलेला होता. दिवसेंदिवस वेढा अधिक कडक होत होता. याप्रसंगी आदिलशाहा व कुतुबशहा यांची मदत मिळविण्यासाठी मिया मंजू तिकडे रवाना झाला. त्याने आपल्या बरोबर सुलतान अहंमद याला घेतले होते. ज्याक्षणी त्याने किल्ला सोडला, त्याचक्षणी चाँदबिबीने किल्ल्याच्या संरक्षणाची सूत्रे आपल्या हाती घेतली. चांदबिबीने राजपुत्र बहादुरला 'निजामशाहा' म्हणून घोषित केले, तिने दरबारातील सर्व मनसबदारांना विशेषतः दखनी आणि हबशी यांना एकत्र आणले. हबशींचे प्रमुख नेते मुजाहिद्दीन समशेदखान, अफझलखान बोरिशी, मुहम्मद जमान तसेच दक्षिणी मुसलमान नेता मुहंम्मदखान या सर्वांना आपल्या बाजूला वळविले. मुहंम्मदखानाकडे मुख्य प्रधानपद देऊन त्याच्यावर किल्ल्याच्या संरक्षणाची जबाबदारी सोपविली. शहरातील प्रजेच्या संरक्षणाची जबाबदारी समशेरखानाकडे देण्यात आली. तिने आपल्या सैन्यामध्ये नवा जोश व उत्साह निर्माण केला.

मुघल सैन्याने अहमदनगरच्या किल्ल्याला चारी बाजूंनी वेढा दिलेला होता. राजपुत्र मुराद स्वतः वेढा लढवत होता. चाँदबिबीने किल्ल्याच्या संरक्षणाची जय्यत तयारी केली होती. ती रात्रंदिवस किल्ल्याच्या संरक्षणासाठी झटत होती याचवेळी आदिलशाही व कुतुबशाही फौजा राणीच्या मदतीसाठी येत पाहून राजपुत्र मुरादने किल्ल्याची तटबंदी उध्वस्त करण्यासाठी सुरूंग खोदले. सुरुंगाचा स्फोट झालेनंतर ढासळलेल्या तटातून आपले सैन्य किल्ल्यात घुसवावे अशी योजना आखली. तेव्हा चाँदबिबीने आपल्या सैन्याला हे सुरुंग नष्ट करण्याचे आदेश दिले व ती स्वतः त्यांच्याबरोबर काम करू लागली. दोन सुरुंग नष्ट करण्यात सैन्य यशस्वी झाले. पण तिसऱ्या सुरूंगाचा स्फोट झाला. तटाची एक बाजू उध्वस्त झाली, अनेक सैनिक ठार झाले. हे पाहून

अधिकाऱ्यांनी पलायन करायला सुरवात केली व राणीलाही पलायन करण्यास सांगितले. तेव्हा राणीने अंगावर चिलखत चढविले आणि हातात नंगी तलवार घेऊन ती जेथे खिंडार पडले आहे, तिथे धावत गेली. राणीचे धाडस पाहून पळणारे सैनिक माघारी फिरले व त्वेषाने लढू लागले. मुघल सैन्याने खिंडार पडलेल्या ठिकाणी तोफा डागल्या, त्यात किल्ल्याची तटबंदी ढासळली. चाँदबिबी तटाच्या तोंडाशी उभे राहून मुघल सैन्याला कापून काढू लागली. राणीने तटाची भिंत बांधण्याचे आदेश दिले. कुशल कारागिरांनी थोड्याच काळात भिंत बांधून काढून मुघलांचा रस्ता बंद केला. मुघल सैन्य पुन्हा पुन्हा किल्ल्यावर चालून येत होते. परंतु तितक्याच वेळा निजामशाही सैन्य बंदुका व तोफा यांचा भडीमार करून हल्ले परतवून लावत होते. किल्ल्याभोवतालचा खंदक मुघल सैनिकांच्या प्रेतांनी भरून गेला होता. चाँदबिबी व तिच्या सैन्याने मोठ्या शौर्याने सर्व हल्ले परतवून लावले. मुघलांपुढे आपला टिकाव लागणार नाही, हे ओळखून राणीने विजापूरकडे मदत मागितली. त्याप्रमाणे विजापूरी सरदार सोहेलखान आपले सैन्य घेऊन निघाला. ही बातमी मोगलांना समजली, त्यातच किल्ला घेण्यात अपयश आल्यामुळे मुघल सैन्य निराश बनले होते. तेव्हा राजपुत्र मुरादने तहाची बोलणी सुरू केली. त्यांच्यामध्ये १४ मार्च १५३६ रोजी तह झाला. त्यानुसार मुघलांनी बहादुरशाहाला निजामशहा म्हणून मान्यता दिली, निजामशाहीतील वऱ्हाड प्रांत मुघलांना देण्यात आला. राजपुत्र मुराद हा चाँदबिबीचे असामान्य शौर्य व पराक्रम पाहून थक्क झाला. व तिला 'चाँद सुलताना' असा किताब दिला. त्यानंतर मुघल सैन्य अहमदनगरचा वेढा उठवून वऱ्हाडकडे निघुन गेले.

**४) निजामशाही वाचविण्याचे अखेरचे प्रयत्न :**

मुघली सैन्याच्या रूपाने एवढे मोठे संकट राज्यावर आले असून सुद्धा निजामशाही सरदार आपापसात भांडतच होते. त्यांना गप्प करण्यासाठी व राज्यकारभार सुरळीत करण्यासाठी राणीने आपला पुतण्या इब्राहिम आदिलशाहकडे मदत मागितली. मिया मंजू याची समजूत घालून त्याला विजापूरला पाठविले. इकलासखानाशी समझोता घडवून आणला. मुहंम्मदखान याची वजीर म्हणून नेमनूक केली. परंतु त्याने सर्व कारभार बळकाविला. त्यामूळे चाँदबिबीने इब्राहिम आदिलशाहाची मदत मागितली. त्याप्रमाणे सोहेलखान आपले सैन्य घेऊन आला व त्याने अहमदनगर किल्ल्याला वेढा दिला. तेव्हा वजीर मुहंम्मदखानाने मोगल अधिकारी खान-ए-खानान यास नगरवर हल्ला करण्यासाठी बोलाविले. तेव्हा सर्व सरदारांनी मिळून मुहम्मदखानास पकडून राणीच्या स्वाधिन केले. मुघलांच्या विरुद्ध लढण्यासाठी राणीने मोठा फौज उभी केली व आदिलशाहा आणि कुतूबशाहाकडे मदत मागितली.

आदिलशहाने सोहेलखान नावाचा सेनापती व कुतूबशहाने मुहंम्मद कुली सुलतान यांच्या नेतृत्वाखाली सैन्य रवाना केले. उभयतांमध्ये गोदावरीतिरी सोनपत येथे घनघोर लढाई झाली (१६ जानेवारी १५९७) या लढाईमध्ये आदिलशाही सरदार सोहेलखान याने मोठा पराक्रम गाजविला. चाँदबिबीने निजामशाही वाचवण्यासाठी निकाराचा लढा दिला पण या युद्धात मित्र सैन्याचा पराभव झाला. मुघल सैन्य विजयी झाले.

**५) चाँदबिबीचा अखेर :**

पराभवानंतर देखिल आदिलशहा व कुतूबशहा यांना चाँदबिबीस सर्वतोपरी मदत केली. आता मुघल

आक्रमणाचा दबाव वाढत चालला होता. याचवेळी चाँदबिबी आणि नोहेगखान यांच्यातील मतभेद तीव्र झाले होते, याचा फायदा मुघलांनी घेतला. त्यांनी निजामशाहीतील महत्वाचे किल्ले लोहगड आणि त्रिबंक जिंकून घेतले. यावेळी राजपुत्र मुराद आणि खान खानात यांच्यात मतभेद निर्माण झाले. तेव्हा अकबराने खान खानात याला उत्तरेत बोलावून घेतले आणि त्याच्या जागी अबुल फझल याला दक्षिणेत पाठविले. त्याने मुघली संघर्ष अधिक तीव्र केला. त्याचवेळी बंडखोर नेहंगखानाने अहमदनगरवर हल्ला करून किल्ला जिंकण्याचा अयशस्वी प्रयत्न केला. दरम्यानच्या काळात राजपुत्र दानियल आणि मुघल सैन्याने अहमदनगरवर जोरदार हल्ला केला. नेहंगखानाने जुन्नरकडे पलायन केले. मोगल सैन्याने किल्ल्यावर तोफांचा मारा सुरू केला. मुघलांनी सुरूंग लावण्याचे काम सुरू होते. चाँदबिबीच्या दृष्टीने ही फार मोठी चिंतेची बाब होती. अनेक महिने चालणाऱ्या मुघली वेढ्यापुढे आपले फारसे चालणार नाही व मनुष्यहानी बरीच होईल, असा विचार करून तिने अहमदनगरचा किल्ला मुघलांच्या स्वाधीन करण्याचे ठरविले. परंतु ही बातमी बाहेर पडली आणि या कृत्याला विरोध असणाऱ्या विश्वासघातकी हमीदखान आणि त्याच्या सहकाऱ्यांनी राणीच्या महालावर हल्ला केला आणि १३ जुलै १६६० रोजी तिचा खून केला. त्याचवेळी मुघल सैन्याने किल्ल्याला खिंडार पाडून अहमदनगरचा किल्ला ताब्यात घेतला. निजामशाही सुलतान बहादूरशहाला कैद करून ग्वाल्हेरच्या किल्ल्यात पाठवण्यात आले. या युद्धात चाँदबिबीचा बळी जाऊन देखिल निजामशाहीचा विनाश टळू शकला नाही.

चाँदबिबीच्या मृत्यूविषयी विविध मतप्रवाह दिसून येतात. मुघल इतिहासकार काफीखान याने चाँदबिबीने विहीरीमध्ये उडी टाकून जीव दिला, अशी माहिती दिली आहे. काझी शहाबुद्दीन याच्यामते चाँदबिबी व तिच्या मैत्रिणींनी 'मधली बावडी' नावाच्या विहीरीमध्ये जीव दिला. अशाप्रकारे दक्षिण भारतातील एक पराक्रमी स्त्रीचा शेवट घडून आला.

**● चाँदबिबीच्या कार्याचे मुल्यमापन :**

मध्ययुगीन भारताच्या इतिहासामध्ये एक पराक्रमी व योद्धा म्हणून चाँदबिबीचे नाव अग्रक्रमाने घेतले जाते. तिच्याकडील धाडस, शौर्य, पराक्रम आणि त्याग याला इतिहासामध्ये तोड नाही. ती अत्यंत रुपवान व सुंदर होती. ऐन तारूण्यात पतीचे निधन होऊनही तिने आपले वर्तन शेवटपर्यंत निर्मळ ठेवले. विजापूर आणि अहमदनगर प्रशासनाच्या कार्यावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटविलेला आहे. निजामशाही वाचविण्यासाठी मुघलांशी दिलेला लढा अभूतपूर्व असा आहे. तिचा पराक्रम आणि शौर्य पाहूनच राजपुत्र मुराद याने तिला 'चाँद सुलताना' किताब देऊन तिचा गौरव केला. अनेक देशी आणि विदेशी इतिहासकारांनी तिच्याबद्दल गौरवोद्गार काढलेले आहेत. इब्राहिम आदिलशाहाने तिच्यावर कविता लिहून आपली चुलती फार देखणी होती, त्याचबरोबर तिचे रणभूमीवरील शौर्य, प्रजेविषयी कळवळा आणि इब्राहिमच्या बालपणात त्याला दिलेले मातेचे प्रेम याविषयी माहिती दिलेली आहे.

अल्ताफ हुसेन असाद याने लिहिले आहे की, 'चाँदबिबी ही अहमदनगरची अजिंक्य स्त्री होती. त्याकाळी स्त्रियांना काहीच महत्व नसताना चाँदबिबीने जे शौर्य दाखविले ते हिंदुस्थानातच नव्हे तर सर्व जगामध्ये अलौकिक उदाहरण आहे.'

कर्नल मिडोज टेलर याने चाँदबिबीवर 'नोबल क्विन' ही कादंबरी लिहून तिची तुलना इंग्लंडची राणी एलिझाबेथ हिच्याशी केलेली आहे. तो म्हणतो, ती स्वतः साधी, प्रामाणिक, दयाळू व धार्मिक असून हिंदुस्थानामधील स्त्रियांमध्ये एक मौल्यवान व निर्दोष अनमोल रत्न म्हणून उजळत आहे.' माउंट स्टुअर्ट एलफिन्स्टन यानेही आपल्या 'हिस्ट्री ऑफ इंडिया' ग्रंथात चाँदबिबी ही हिंदुस्थानमधील स्त्रियांमध्ये मोठा नावलौकिक मिळवलेली स्त्री आहे, असे गौरवोद्‌गार काढले आहेत.

अंटोनिओ फ्रेझार याने, 'चाँदबिबीने सर्व फौज व जनता आपल्याकडे वळवून आपल्या राज्याचे संरक्षण केले. इतिहासामध्ये पुरुषांच्या बरोबरीने आपले कर्तृत्व सिद्ध केले', असे लिहिले आहे. प्रसिद्ध इतिहासकार फेरिश्ता याने 'गुलशन-ए-इब्राहिमी' या ग्रंथात चाँदबिबीविषयी अतिशय चांगले लिहिले आहे. अशाप्रकारे अनेक इतिहासकारांनी चाँदबिबीविषयी अतिशय चांगले लिहिले आहे. अशाप्रकारे अनेक इतिहासकारांनी चाँदबिबीच्या कार्याची तोंड भरून स्तुती केलेली आहे.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - ३**

**योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) चाँदबिबीचा जन्म इ. स. १५५० साली झाला, अशी माहिती .......... ग्रंथातून मिळते.

अ) गुलशन-इ-इब्राहिमी ब) तारीख-ए-शबाबी क) नोबल क्वीन ड) यापैकी नाही

२) आदिलशाही सुलतान .......... याच्याशी चाँदबिबीचा विवाह झाला होता.

अ) अलि ब) इब्राहिम क) बहादूर ड) इस्माइल

३) चाँदबिबीने नवा निजामशाहा म्हणून .......... याला गादीवर बसविले.

अ) मुर्तजा ब) हुसेन क) बहादूर ड) मिरान

४) .......... याने चाँदबिबीवर 'नोबल क्विन' ही कादंबरी लिहिली.

अ) कर्नल मेडोज टेलर ब) फेरिश्ता क) एलफिन्स्टन ड) ग्रँट डफ

५) 'गुलशन-इ-इब्राहिनी' हा ग्रंथ .......... याने लिहिला आहे.

अ) सय्यद अली तबातबा ब) काझी शहाबुद्दीन क) फेरिश्ता ड) अल्ताफ हुसेन असाद

६) आदिलशाही सुलतान अली आदिलशहा याचा .......... मध्ये मृत्यू झाला.

अ) १५६० ब) १५८० क) १५७० ड) १५५०

७) .......... च्या नेतृत्वाखाली मुघल सैन्याने अहमदनगरच्या किल्ल्याला वेढा दिला होता.

अ) राजपुत्र मुराद ब) अकबर क) सोहेलखान ड) सलिम

८) चाँदबिबीच्या विनंतीवून आदिलशहाने .......... याला निजामशाहीच्या मदतीसाठी पाठविले होते.

अ) मुहंम्मदकुली सुलतान ब) सोहेलखान क) इकलासकान ड) मुहम्मदखान

९) .......... याने चाँदबिबीचा खून घडवून आणला.

अ) हमीदखान ब) नेहंगखान क) इकल्पसखान ड) मिया मंजू

१०) 'चाँदबिबी ही अहमदनगरची अजिंक्य स्त्री होती', हे उद्‌गार .......... यांनी काढले आहेत.

अ) कर्नल टेलर ब) एलफिन्स्टन क) फेरिश्ता ड) अल्ताफ हुसेन असाद

## २.२.४ इब्राहिम आदिलशाहा दुसरा (इ. स. १५३० ते इ. स. १६२७)

आदिलशाहीतील सर्वात कर्तबगार व लोकप्रिय सुलतान म्हणून इब्राहिम आदिलशाहा दुसरा याचे नाव घेतले जाते. सरदार अबुल मुझफ्फर युसूफ याने आदिलशाही राज्याची स्थापना केली. (इ. स. १४८९) इब्राहिम हा आदिलशाहीतील पाचवा सुलतान होता. सुसंस्कृत, उदार व विद्येचा चाहता होता. इतर सुलतानांपेक्षा अनेक बाबतीत वेगळा राज्यकर्ता म्हणूनचे भारताच्या इतिहासात महत्वाचे स्थान आहे.

### १) जन्म व बालपण :

इब्राहिम आदिलशाहाचा जन्म इ. स. १५७१ मध्ये झाला. आदिलशाही सुलतान अली आदिलशाहाला मुलगा नव्हता. त्यामुळे त्याने त्याचा भाऊ तहमारस्य याचा मुलगा म्हणजे इब्राहिम याला आपला वारस म्हणून नेमले होते. त्याच्या पुढच्याच वर्षी अलीचा खून झाला. तेव्हा दरबारातील अधिकाऱ्यांनी नऊ वर्षाच्या इब्राहिमचा राज्याभिषेक केला (इ. स. १५८०). अशाप्रकारे अल्पवयात इब्राहिम हा विजापूरचा सुलतान बनला. यावेळी राज्यकारभाराची सर्व सुत्रे कामिलखान दख्खनी व अली आदिलशाहाची पत्नी चाँदबिबी यांच्या हातामध्ये होती. कामिलखान हा अनुभवी व कुशल राजकारणी असल्यामुळे दरबारातील अधिकाऱ्यांनी त्याची राजप्रतिनिधी म्हणून नेमणूक केली होती. परंतु तो अत्यंत महत्वकांक्षी असल्यामुळे त्याने सत्ता आपल्याकडेच कायम राहावी यासाठी कारस्थाने सुरू केली. तसेच दरबारातील किश्वरखान, दिलावरखान आणि हमीदखान या सरदारांनीही राज्यकारभारावर वर्चस्व निर्माण करण्यासाठी कटकारस्थाने सुरू केली होती. त्यामुळे इब्राहिमच्या सुरवातीच्या काळात दरबारामध्ये गोंधळ आणि अराजक निर्माण झाले होते.

### २) आदिलशाहीतील अराजकता :

सुलतान अल्पवयीन आहे याचा फायदा घेऊन प्रतिनिधी कामिलखानाने सर्व सत्ता आपल्या हाती घ्यावी, या उद्देशाने पावले टाकायला सुरवात केली, त्याने दडपशाहीचा अवलंब सुरू केला. इतकेच नव्हेतर चाँदबिबीला अपमानास्पद वागणूक देऊ लागला त्यामुळे ती संतप्त बनली. तिने कामिलखानाला सत्तेवरून दूर करण्यासाठी किश्वरखानाला जवळ केले. किश्वरखानाने आपल्या सहकाऱ्यांसह अचानक कामिलखानावर हल्ला करून त्याला ठार मारले (इ. स. १५८०).

किश्वरखानाने विजापूरचे प्रतिनिधीपद आल्यानंतर कामिलखानाचेच अनुकरण केले. अनियंत्रितपणे राज्यकारभार करण्यास सुरूवात केले. आदिलशाहीतील गोंधळाचा फायदा घेण्यासाठी निजामशाहा व कुतूबशहा यांनी राज्यावर आक्रमणे सुरू केली. किश्वरखानाच्या मनमानीला कंटाळून चाँदबिबी आणि दरबारी मंडळींनी प्रतिनिधीपद मुस्ताफाखनास देण्याची योजना आखली. किश्वरखानाला त्याची कुणकुण लागताच त्याने मुस्ताफाखानावर हल्ला करून त्याला ठार मारले. ही बातमी चाँदबिबीला समजताच ती अत्यंत संतप्त बनली. किश्वरखानाने चाँदबिबीवर तिचा भाऊ मुर्तजा निजामशाहा याला विजापूरवर आक्रमण करण्यासाठी प्रवृत्त केल्याचा आरोप करून कैद केले. तिला अत्यंत अपमानित करून सातारच्या किल्ल्यात डांबण्यात आले. राणीच्या अपमानामुळे सरदार इकलासखान व इतर सरदार मंडळी संतप्त झाले आणि त्यांनी किश्वरखानाला सत्तेवरून दूर करण्याचा निश्चय केला. हे समजताच किश्वरखानाने घाबरून अहमदनगरकडे पलायन केले. तेथे आश्रय न मिळाल्याने तो गोवळकोंड्याला गेला, पण तेथे मुस्ताफाखानाच्या एका नातलगाने त्याचा खून केला.

इकलासखान (एकलासखान) याने विजापूरचे प्रतिनिधीपद आपल्याकडे घेतले. त्याने चाँदबिबीला कैदेतून मुक्त करून राजधानीत आणले आणि सुलतानाच्या देखभालीची जबाबदारी तिच्यावर सोपविली. इकलासखान हा क्रूर होता. त्याने किश्वरखानाच्या बाजूच्या अनेकांच्या कत्तली केल्या, अनेकांना तुरुंगात डांबले. अनेक अधिकाऱ्यांची उचलबांगडी केली. त्याच्या काळात परकिय मुसलमान दक्षिणी मुसलमान यांच्यातील संघर्ष वाढला. इकलासखानास, हमीदखान व दिलावरखान या बलाढ्य सरदारांचे सहकार्य मिळाल्यामुळे त्याची मनमानी वाढली. दरबारातील अंतर्गत गोंधळाचा फायदा घेण्यासाठी कुतूबशहाने विजापूरवर आक्रमण करायला सुरवात केली. दिलावरखानाच्या नेतृत्वाखाली आदिलशाही सैन्याने शत्रू सैन्याचा दारूण पराभव केला. या विजयामुळे दिलावरखानाचे दरबारातील वजन वाढले. त्याला प्रतिनिधीपद आपल्याकडे असावे असे वाटू लागले. त्याने हमीदखानाच्या मदतीने इकलासखानास कैद करून त्याचे डोळे काढले.

**३) स्वतंत्र कारकिर्दीस सुरवात :**

दिलावरखानाने राजप्रतिनिधी म्हणून नेमणूक झाल्यावर दरबारातील अमीर उमरावांना आपल्या बाजूला वळविले. दरबारातील महत्वाची पदे आपल्या नातेवाईक व मुलांना दिली. सुलतानाच्या खाजगीतील सर्व जागा त्याने आपल्या मुलांकडे सोपविल्या. दरबारातील परदेशी मुसलमानांची हकालपट्टी करून त्याने दरबारावर आपले वर्चस्व निर्माण केले. सन १५८४ मध्ये इब्राहिमचा विवाह कुतूबशाहाची कन्या चाँदबिबी उर्फ मलिकाजहान हिच्याशी घडवून आणला.

इब्राहिम हळूहळू मोठा होत होता आणि त्याने आपल्या कर्तृत्वाने राज्यकारभारावर छाप पाडायला सुरवात केली. जनतेमध्ये तो लोकप्रिय होत चालला. मात्र दिलावरखानाला हेच खटकू लागले. त्याने इब्राहिमला दूर करून त्याच्याजागी त्याचा भाऊ इस्माईल याला बसविण्याचे कारस्थान रचले. इस्माईल यावेळी बेळगावच्या किल्ल्यात कैदेत होता. त्याच्याबरोबर दिलावरखानाने संधान साधले. हे कारस्थान समजल्यावर दरबारातील

अधिकारी व जनता त्याच्यावर नाराज झाली. आपले बिंग फुटताच तो इब्राहिमशहापुढे शरण आला व त्याने माफी मागितली. सुलतानाने त्याला माफ मागितली. सुलतानाने त्याला माफ करून राज्य कारभाराची सूत्र त्याच्याकडेच पुर्ववत ठेवली.

इब्राहिमला राजकारणाची चांगली जाण आलेली होती, त्याचा आत्मविशस वाढलेला होता. दरबारातील ऐनउलमुल्क, आंकुसखान आणि आदिम अलीखान या मातब्बर सरदारांचे पाठबळ इब्राहिमला मिळाले होते. त्यामुळे इब्राहिमची ताकद वाढली. तेव्हा पूर्ण तयारीनिशी इब्राहिमने दिलावरखानावर हल्ला केला. या संघर्षामध्ये दिलावरखानाचा मुलगा ठार झाला. दिलावरखानाने युद्धभूमीतून पळ काढला व तो अहमदनगरला गेला. पुढे इब्राहिमने त्याला पकडून त्याचे डोळे काढले व सातार्‍यात कैदेत ठेवले. या घटनेनंतर इब्राहिमने स्वतःचा राज्याभिषेक समारंभ घडवून आणला. १७ मे १५९० रोजी इब्राहिम राजधानीत आला, अधिकार्‍यांच्या नेमणूका केल्या. पुढील काळात इब्राहिमने स्वतंत्रपणे राज्यकारभार करायला सुरवात केली.

**४) इस्माईलचे बंड :**

सुलतान इब्राहिमशाहाला सत्ता हाती घेताच दुहेरी संकटाचा सामना करावा लागला. एका बाजूने बुरहान निजामशाहाचे आक्रमण आणि दुसऱ्या बाजूने कैदेत असणाऱ्या भाऊ इस्माईलचे बंड राजपुत्र इस्माईल आपल्या भावाविरुद्ध बंड केले. त्याने बेळगावचा सुभेदार व तेथील सैन्याला आपल्या बाजूला वळविले. दरबारातील अधिकाऱ्यांना लाच देऊन आपल्या बाजूला घेतले. सुलतानाला मदत करणाऱ्या ऐनउलमुल्क व आंकूसखान यांनाही फितूर केले. आपला वकिल बुरहान निजामशाहाकडे पाठवून मदतीची याचना केली. निजामशाहाने त्याला मोठ्या सैन्यानिशी मदत करण्याचे आश्वासन दिले. इस्माईलने बेळगाव आणि आसपासचा प्रदेश ताब्यात घेऊन स्वतःला आदिलशाही सुलतान म्हणून घोषित केले. अशाप्रकारे इस्माईलने सुलतानाच्या विरोधात बंडाचे निशाण रोवले. तेव्हा सुलतानाने एलियासखानाला बंडाचा बिमोड करण्यासाठी बेळगावला पाठवले. त्याने बेळगांवच्या किल्ल्याला वेढा दिला, परंतु त्याला अपयश आले. इस्माईलला मदत करण्यासाठी बुरहान निजामशाहा आपले सैन्य घेऊन विजापूरकडे निघाला.

इब्राहिम आदिलशाहाने या दुहेरी संकटाचा मुकाबला करण्यासाठी जय्यत तयारी केली. त्याने हमीदखानाची सेनापतीपदी नेमणूक केली आणि त्याला बंडखोराविरुद्ध पाठविले. हमीदखानाने सावधपणे पावले टाकायला सुरवात केली. इस्माईल व ऐनउलमुल्क या दोघांनाही गाफिल ठेवून अचानकपणे त्यांच्यावर जोरदार हल्ला केला. बंडखोरांच्या सैन्याची दाणादाण उडाली. दोघांनाही कैद करण्यात आले. शिपायाने ऐनउलमुल्कयाचे शिर कापून इब्राहिमशाहाकडे पाठविले, त्याने ते शिर आपल्या राजवाड्यासमोर टांगून ठेवले हाते. बंडखोरांची अवस्था काय होते हे इतरांना समजावे यासाठी सुलतानाने असे केले. बंडखोर राजपुत्र इस्माईल याचे डोळे काढत असताना त्याचा मृत्यू झाला. बंड मोडल्याची बातमी समजताच बुरहान निजामशाहा ताबडतोब अहमदनगरला परतला.

**५) इब्राहिम आदिलशाहाचे कार्य :**

**१) अलबारच्या रायांना (नायकांना) वठणीवर आणले :**

इब्राहिम आदिलशहाने आपल्या राज्याची घडी व्यवस्थित बसविल्यानंतर मलबारच्या रायांना वठणीवर आणण्याचे ठरविले. नायकांनी आदिलशाही दरबाराला न जुमानता खंडण्या देण्याचे बंद केले होते. तेव्हा सुलतानाने मंजूखानास खंडण्या वसूल करण्याच्या कामासाठी पाठवले. तो सैनय घेऊन बंकापूरला आला आणि तेथे मलबारच्या रायांना आपापल्या खंडण्या घेऊन भेटण्यास बोलाविले, जे खंडणी देतील त्यांना माफ केले जाईल. परंतु जे बंडखोर करतील त्यांचा सूड घेतला जाईल, अशी त्याने धमकी दिली. मलबारच्या रायांमध्ये गंगा नाईक हा प्रमुख होता. त्याने आपली खंडणी दिलीच पण सैन्य घेऊन मंजूखानाच्या मदतीला आला. त्यामुळे इतर नायकांना वठणीवर आणणे, मंजुखानाला सोपे गेले.

**२) निजामशाहीचा पराभव :**

बुरहान निजामशाहाच्या मृत्युनंतर त्याचा मुलगा इब्राहिम हा सुलतान बनला. नुकत्याच झालेल्या युद्धात आदिलशाहीकडून झालेल्या पराभवाचा बदला घेण्यासाठी आदिलशाहीवर स्वारी काढली तेव्हा आदिलशाहाने हमीदखानाला प्रचंड सैन्यासह निजामशाही सैन्याविरुद्ध पाठविले. उभयतांमध्ये नळदुर्ग या ठिकाणी घनघोर युद्ध झाले. या युद्धामध्ये इब्राहिम निजामशाहा ठार झाला. पळणाऱ्या शत्रू सैन्याचा पाठलाग करत आदिलशाही सैन्य निजामशाहीच्या सीमेपर्यंत पोहोचले. परंतु सुलतानाने आपल्या सैन्याला माघारी बोलावले. (इ.स. १५९५)

**३) मोगलांबरोबर संबंध :**

इ. स. १५९० ते १५९७ या काळात इब्राहिमने मुघलांना विरोध करण्याचे धोरण स्विकारले होते. दक्षिणेतील शह्यांवर सातत्याने मुघलांची आक्रमणे होत असत. अकबराने राजपुत्र मुराद याला निजामशाहीवर आक्रमण करण्यासाठी पाठवले. त्यावेळी निजामशाही वजीर मलिक अंबर याने ईब्राहिम आदिलशाहाकडे मदत मागितली. मुघलांचा धोका आपणालाही होऊ शकतो हा विचार करून त्याने काही किल्ले, मोक्याची ठिकाणी व काही फौज मलिक अंबरच्या मदतीला पाठविली.

पुढे मुघल बादशाहा जहाँगिरने मलिक अंबरचा बंदोबस्त करण्यासाठी शहजादा परवेझला पाठविले. या संघर्षात इब्राहिमने तटस्थ रहावे, या बादशाहाच्या सुचनेकडे दुर्लक्ष करून त्याने आपले सैन्य मलिक अंबरच्या मदतीला पाठविले होते. इ. स. १६१० नंतर इब्राहिम आदिलशाहा व मलिक अंबर यांच्यातील संबंध बिघडले तेव्हा इब्राहिमने बादशाहा जहाँगिरकडे आपला वकील पाठवून मुघलांबरोबर मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले.

**४) बरीदशाहीचा शेवट :**

बादशाहा जहाँगिरने दक्षिणेतील सर्व राज्यकारभाराची जबाबदारी इब्राहिम आदिलशाहाकडे सोपविली होती. त्याने इ. स. १६१९ मध्ये राजधानी बिदरवर आक्रमण करून तेथील सत्ताधीश मिर्झा अली बरीद याचा पराभव केला. इब्राहिमने बरीदशाही जिंकून दक्षिणेच्या राजकारणातून तिचा शेवट घडवून आणला.

**५) कुतुबशहीशी संबंध :**

इब्राहिम आदिलशाहाने कुतूबशहाची कन्या चाँद सुलताना उर्फ मलिकाजहान हिच्याशी विवाह केला (१५८६). या वैवाहिक संबंधामुळे आदिलशाही व कुतूबशाही यांच्यामध्ये स्नेहाचे संबंध निर्माण झाले. वेळप्रसंगी एकमेकांना लष्करी मदत करून हे संबंध दृढ करण्याचे प्रयत्न केल्याचे दिसून येते.

इब्राहिम आदिलशाहाने इ. स. १५९० ते १६२७ याकाळात कार्यक्षमपणे कारभार केला. सुरवातीच्या काळात त्याच्यावर आलेल्या संकटाचा, बंडाचा व्यवस्थितपणे मुकाबला केला. तसेच आपल्या राज्यावर आलेल्या शत्रुच्या आक्रमणाचा प्रतिकार करून जनतेच्या हिताला प्राधान्य दिले. अधिकाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना केल्या. स्वतः मुसलमान असूनही त्याने प्रशासनात हिंदूंच्या मोठ्या प्रमाणात नेमणूका केल्या. त्याने साहित्य, वास्तूकला, चित्र, कला, संगीत यासारख्या कलांना प्रोत्साहन दिल्यामुळे त्यांची भरभराट घडून आली. कार्यक्षम सत्ताधीश इब्राहिम आदिलशाहा दुसरा याचा मृत्यू सप्टेंबर १६२७ मध्ये झाला.

**६) सुलतान इब्राहिमशहाचे धार्मिक धोरण :**

आदिलशाही सुलतान इब्राहिम दुसरा याने आपल्या राज्यामध्ये उदार व धर्मसहिष्णू धोरणांचा स्विकार केला होता. मध्यकाळात इतर मुस्लिम सत्ताधिश इतर धर्मियांवर अन्याय, अत्याचार करण्यामध्ये धन्यता मानत होते. त्याकाळात अशाप्रकारचे उदार धार्मिक धोरणांचा स्विकार करणारा इब्राहिम इतरांपेक्षा वेगळा वाटतो. म्हणूनच सम्राट अकबरानंतर इब्राहिम आदिलशाहा दुसरा याचे नाव मोठ्या आदराने घेतले जाते. त्याचे धार्मिक धोरण पुढीलप्रमाणे :

**अ) उदार धार्मिक धोरण :**

आदिलशाही सुलतान अली याच्याकाळात राज्यातील दोनशे-तीनशे प्राचीन हिंदू मंदिरांचा विध्वंस करण्यात आलेला होता. तसेच चार ते पाच हजार मुर्त्या फोडण्यात आल्या होत्या. तसेच सातत्याने हिंदूवर अन्याय, अत्याचार करण्यात येत होता. अशाप्रकारे अन्यायी धार्मिक धोरणाची परंपरा असताना इब्राहिमने उदार व सहिष्णू धोरण स्विकारले. त्याने हिंदुंना प्रशासनात मोठ्या प्रमाणात नोकऱ्या दिल्या. ख्रिश्चन धर्मगुरूंना त्याने चांगली वागणूक दिली. त्यामुळे तो आपल्या प्रजेमध्ये लोकप्रिय बनला.

**ब) शिया-सुन्नी भेद नाही :**

आदिलशाही राज्यामध्ये शिया व सुन्नी पंथीयांची संख्या मोठी होती. इब्राहिमने शिया पंथ सोडून सुन्नी पंथ चालू केला होता. असे असले तरी शिया व सुन्नी यांच्याबाबतीत त्याने भेदभाव केला नाही. त्याने सर्वांना आपापल्या पद्धतीने धर्माचरण करण्याची परवानगी दिलेली होती.

**क) हिंदू मंदिरे व साधुसंतांना देणग्या :**

इब्राहिम हिंदू संस्कृतीने भारावलेला होता. तो संगिताचा शौकिन व उत्कृष्ट गीत रचनाकार होता. यासाठी तो सरस्वतीचा भक्त व गणपतीचा शिष्य बनला होता. त्याने शिव, इंद्र, गणपती व सरस्वती या हिंदू देवदेवतांवर

अनेक कवने रचली आहेत. ती अत्यंत अप्रतिम होती. त्याने अनेक हिंदू मंदिरे व साधुसंतांना देणग्या दिलेल्या होत्या. तो हिंदूंच्या पुजाविधीमध्ये मोठ्या भक्तिभावाने सहभागी होत असे.

**ड) कट्टर मुस्मिमांच्या विरोधाला जुमानले नाही :**

इब्राहिम हिंदूच्या पुजाअर्चा, आचारविचार यांचे पालन करीत होता. तसेच इतर धर्मियांना अदारतेने वागवित होता. हे त्याचे धोरण कट्टर मुस्लिमांना आवडले नाही. मुस्लिम धर्मातील मुल्ला, मौलवी, काझी यांनी इब्राहिमला कट्टर विरोध केला. त्यांनी हिंदू देवदेवतांच्या पुजाविधी बंद करण्याचे आदेश दिले. तेव्हा सुलतानाने स्पष्टपणे सांगितले की, ''मी मुसलमान आहे व राहणार आहे, परंतु मुसलमान राहिल्यामुळे मला संगितापासून दूर जावे लागणार असेल तर मी मुसलमान धर्मही सोडेन आणि हिंदू धर्माप्रमाणे आचरण करेन. सांगीत साधना सरस्वतीच्या पूजेशिवाय होऊच शकत नाही. तेव्हा ती मी सोडणार नाही.'' यावरून असे दिसून येते की कट्टर मुस्लिमांनी कितीही विरोध केला तरी इब्राहिमने आपले उदार धोरण सोडले नाही.

**७) इब्राहिम आदिलशाहाच्या काळातील सांस्कृतिक विकास :**

इब्राहिम आदिलशाहा स्वतः उत्तम गायक व गीत रचनाकार होता. विद्या व कलेचा चाहता होता. त्याने आपल्या दरबारामध्ये अनेक कवी, पंडीत, गायक व कलाकार यांना राजाश्रय दिलेला होता. यामुळेच त्याच्या काळात साहित्य, शिल्प, वास्तू, चित्रकला व संगीत या क्षेत्रांचा विकास घडून आला. त्याची माहिती पुढीलप्रमाणे–

**अ) साहित्य :**

इब्राहिम स्वतः विद्वान असून त्याने आपल्या दरबारामध्ये अनेक साहित्यिकांना राजाश्रय दिलेला होता. त्यामुळे त्याच्या काळात साहित्यामध्ये मोठी वाढ झाली. फारसी साहित्यातील सर्वात मोठा कवी झुहूरी हा इब्राहिमच्या दरबारात होता. त्याने तीस हजारांहून अधिक कविता लिहिल्या आहेत. मध्ययुगातील प्रसिद्ध इतिहासकार फेरिश्ता याला इब्राहिमने राजाश्रय दिलेला होता. त्याने सुलतानाच्या विनंतीवरून 'गुलशन–ए–इब्राहिमी' या इतिहासग्रंथाची निर्मिती केली. त्याच्या काळातील सलामी नावाच्या लेखकाने 'मजबा–उल–घराईबा' हे पुस्तक लिहिले. त्यामध्ये इब्राहिम, त्याचा दरबार, राजधानी इत्यादीची स्तुती करणेत आलेली आहे. इब्राहिमने स्वतः 'नौरसनामा' नावाचा ग्रंथ लिहिला आहे.

**ब) संगीत :**

इब्राहिम विद्याप्रेमी असून कविता व संगीताचा चाहता होता. तो स्वतः उत्कृष्ट गायक होता. त्याने कलेच्या प्रसारासाठी आयुष्यभर प्रयत्न केला. त्याने देशभरातील गायकांना आपल्या दरबारामध्ये राजाश्रय दिलेला होता. त्याच्या दरबारात चार हजार गायक कलाकार होते. यातील अनेकांना नियमित वेतन दिले जाई तर अनेकांना इनाम जमिनी दिलेल्या होत्या. इब्राहिमने गायनकला अवगत करण्यासाठी मोठे परिश्रम घेतलेले होते. रात्रभर जागून तो रियाझ करीत असे. मोठा संगीततज्ञ म्हणून त्याला मान्यता मिळाली होती. तर त्याने स्वतःला 'जगद्‌गुरू' पदवी घेतली होती.

**क) चित्रकला :**

इब्राहिमच्या काळात चित्रकलेची भरभराट घडून आली. त्याने आपल्या दरबारामध्ये इराणी, हिंदी चित्रकारांप्रमाणेच युरोपियन चित्रकारांनाही राजाश्रय दिलेला होता. त्याच्या काळातील प्रमुख चित्रकार फारूख हुसेन व मुर्तजाखान हे इराणी होते. त्याच्या काळातील इराणी, हिंदी व युरोपियन चित्रकारांच्या चित्रशैलीतून नवीन दक्षिणी चित्रशैली विकसित झालेली होती. विजापूर व कुमरगी येथील भित्तीचित्रामध्ये खेळ, शिकारी, कुस्ती, संगीत मैफिली यासारख्या विषयांवरील चित्रे काढलेली दिसतात. इब्राहिमच्या काळात कागद, कापड व भिंतीवर शेकडो चित्र काढली गेली. तत्कालिन चित्रे पुणे, मुंबई, कलकत्ता, दिल्ली याबरोबरच लंडन, डब्लिन, इस्तंबूल या परकिय शहरांमध्ये आज उपलब्ध आहेत. फारूख हुसेन या चित्रकाराने हत्तीवर बसलेल्या सुलतानाचे काढलेले चित्र उपलब्ध आहे. सुलतानाने तुर्की, इराणी व दक्षिणी पेहरावातील विविध चित्र काढून घेतलेली होती. संगीतातील विविध राग यांची वैशिष्टे दाखवणारी चित्रे काढलेली होती. या सर्वांवरून तत्कालिन काळात चित्रकलेची किती प्रगती झालेली होती याची माहिती मिळते.

**ड) स्थापत्यकला :**

इब्राहिमच्या काळात स्थापत्यकलेची मोठी प्रगती झाली. इब्राहिमने सात मंझिल, दिलखुशा मंझिल, हैदरी बुरूज आणि मल्लिकाजहान मशीद यासारख्या प्रेक्षणीय वास्तू उभ्या केल्या. त्याने आपली राणी मल्लिकाजहान हिच्यासाठी मल्लिकाजहान मशीद  ही सुंदर वास्तू बांधली. दिलखुशा महल ही चारमजली वास्तू होती. सात मंझिल ही इमारत अत्यंत वैशिष्टपूर्ण असून सात मजली होती. तिला सात खणी महाल असेही म्हणत असत. या महालाच्या भिंती विविध चित्रांनी सुशोभित करण्यात आलेल्या होत्या. अंद मशीद व आथर महाल या सुंदर व प्रेक्षणीय वास्तूही त्याच्या काळात उभारल्या गेल्या. मेहतर महाल नावाची एक आगळीवेगळी वास्तू त्याने बांधली होती. त्याने आपल्या राणीच्या नावाने 'ताजबावडी' नावाचा जलाशय बांधला होता. त्याच्या काळातील उल्लेखनीय काम म्हणजे 'इब्राहिम रोझा' होय. रोझा म्हणजे उद्यान होय. चारी बाजूंनी भक्कम तटबंदी असलेल्या विशाल जागेत हे उद्यान होते. या उद्यानामध्ये दोन इमारती बांधलेल्या आहेत. इमारती भोवतीची उद्याने फळाफुलांनी सदैव बहरलेली असत. त्याच्या काळातील आणखी एक उल्लेखनिय वास्तू म्हणजे नळदुर्ग किल्ल्यातील पाणी महाल होय. यामधील नयनरम्य पाण्याचे कारंजे पाहण्यासारखे आहेत. इब्राहिमने आपल्या दरबारामध्ये मलिक संदळ, इतवारखान यासारख्या वास्तूतज्ञांना राजाश्रय दिलेला होता.

**● विजापूरला विद्यापूर बनविले :**

इब्राहिम हा विद्याप्रेमी सुलतान होता. आपली राजधानी ही ज्ञानाचे केंद्र व्हावे, येथे विद्येचा विकास व्हावा या उद्देशाने त्याने इ.स. १६०४ मध्ये विजापूरचे नाव बदलून 'विद्यापूर' केले होते. त्याच्या प्रोत्साहनामुळे अनेक विद्वान, कवी, कलाकार या शहरामध्ये येऊन राहिले होते. सर्वत्र शांतता व सुव्यवस्था असल्याने सर्व जातीधर्माचे लोक गुण्यागोविंदाने रहात होते.

**● नवरसपूर(नौरसपूर) शहराची स्थापना :**

इब्राहिमने नवरसपूर(नौरसपूर) नावाने नवीन शहराची स्थापना केली होती. आपल्या काव्यातून आणि

गीतातून नऊ रसांचा अविष्कार व्हावा, अशी त्याची भावना होती. म्हणूनच त्याने या शहराला नवसपूर असे नाव दिले होते. या शहरामध्ये त्याने भव्य असा राजवाडा बांधला होता. तसेच प्रेक्षणीय महाल, संगीत महाल व अनेक लहान मोठ्या वास्तू या शहरामध्ये बांधल्या होत्या. अल्पावधीतच हे शहर प्रसिद्ध झाले होते.

दक्षिण भारताच्या इतिहासामध्ये इब्राहिम आदिलशाहा दुसरा 'जगद्‌गूरू' या नावाने प्रसिद्ध आहे. तो बुलंद व्यक्तिमत्वाचा सुलतान होता. त्याने आपल्या आचार विचाराने खऱ्या अर्थाने हिंदू-मुसलमानांचे सामाजिक आणि तात्विक ऐक्य घडवून आणले. हा खऱ्या अर्थाने जगद्‌गुरू होता. तो विलासी असला तरी सुसंस्कृत, सज्जन आणि सहृदयी असा माणूस होता. तितकाच तो रसिक होता. त्याने सातत्याने प्रजेच्या कल्याणाचा विचार करून राज्यकारभार केला. त्यामुळे तो आपल्या प्रजेमध्ये अत्यंत लोकप्रिय बनलेला होता.

● **स्वयं अध्ययन क्र. ४**

**योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) .......... या सुलतानाच्या मृत्यूनंतर इब्राहिम हा विजापूरचा सुलतान बनला.

अ) युसूफ आदिलशाहा ब) अली अदिलशाहा क)तहमास ड) हुसेनशहा

२) चाँदबिबीने सुरवातीच्या काळात .......... याला राजप्रतिनिधी म्हणून नेमले होते.

अ) मुस्ताफाखान ब) दिलावर खान क) कामिलखान ड) किश्वरखान

३) इब्राहिम आदिलशाहाची बहिण .......... हिचा विवाह निजामशाहाच्या मुलाशी झाला.

अ) चाँदबिबी ब) नुरजहाँ क) मुमताज ड) खदिजा

४) इब्राहिमशाहाचा भाऊ .......... याने त्याच्याविरुद्ध बंड केले होते.

अ) इस्माईल ब) हुसून क) मुर्तजा ड) मिरान

५) इब्राहिम आदिलशाहाने .......... या नव्या शहराची स्थापना केली.

अ) विजापूर ब) नवरसपूर क) अहमदनगर ड) विद्यापूर

६) आदिलशाहीची स्थापना .......... याने केली.

अ) अबुल मुझफ्फर युसुफ ब) अली आदिलशहा क) तहमास्य ड) इब्राहिम आदिलशहा

७) किश्वरकानाने चौदबिबीला .......... येथे कैदेत ठेवले होते.

अ) विजापूर ब) सातारा क) अहमदनगर ड) पुणे

८) .......... याने चाँदबिबीची कैदेतून सुटका केली.

अ) किश्वर ब) नेहंगखान क) कामिलखान ड) इकलासकान

९) मलबार येथील नायकांना वठणीवर आणण्यासाठी इब्राहिम आदिलशहाने ......... याला पाठविले.

अ) मंजूखान ब) हमीदखान क) हेनउलमुल्क ड) दिलावरखान

१०) ......... हा प्रसिद्ध चित्रकार इब्राहिम आदिलशहाच्या दरबारात होता.

अ) फेरिश्ता ब) फारूख हुसेन क) मल्लि संदळ ड) इतवारखान

## २.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

१) जिझिया – बिगर मुस्लिमांवर लादलेला धार्मिक कर

२) मिर्झा – जमीनदार किंवा राजपुत्र

३) बादशहा – राजाधिराज, सार्वभौम राजा

४) मनसबदार – 'बनसब' म्हणजे हुद्दा किंवा दर्जा आणि तो ज्याच्याकडे असतो तो मनसबदार.

५) मुघल – (१५२६ ते १७०७) दिल्लीवर राज्य करणारे महत्त्वाचे राजघराणे, या घराण्यात बाबर, हुमायून, अकबर, जहांगिर, शहाजहान व औरंगजेब व राज्यकर्ते होऊन गेले.

६) स्थापत्य – स्थापत्य म्हणजे वस्तुरचना, बांधकाम कला होय.

## २.४ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

| | |
|---|---|
| १) अ) फरगणा | २) क) इब्राहिम लोदी |
| ३) ब) राणासंग | ४) अ) तुर्की |
| ५) अ) अंदिजान | ६) ब) दौलतखान लोदी |
| ७) अ) ६ मे १५२९ | ८) ड) ८० हजार |
| ९) अ) ४० हजार | १०) ड) अकबर |

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

| | |
|---|---|
| १) ब) अमरकोट | २) ड) १५५६ |
| ३) अ) बैरामखान | ४) क)१५६२ |
| ५) दिन-ए-इलाही | ६) क) राणाप्रताप |
| ७) ब) बैरामखान | ८) क) राणाप्रताप |
| ९) ड) डॉ. बेनीप्रसाद | १०) अ) अकबर |

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३**

| | |
|---|---|
| १) ब) तारीख-ए-शबाबी | २) अ) अली |
| ३) क) बहादूर | ४) अ) कर्नल मेडोज टेलर |
| ५) क) फेरिश्ता | ६) ब) १५८० |
| ७) अ) राजपुत्र मुराद | ८) ब) सोहेलखान |
| ९) अ) हमीदखान | १०) ड) अल्ताफ हुसेन असाद |

**स्वयं अध्यन प्रश्न क्र. ४**

| | |
|---|---|
| १) ब) अली आदिलशाहा | २) क) कामिलखान |
| ३) ड) खदिजा | ४) अ) इस्माईल |
| ५) ब) नवरसपूर | ६) अ) अब्दुल मुजफ्फर युसुफ |
| ७) ब) सातारा | ८) ड) इकलासखान |
| ९) अ) मंजूरखान | १०) ब) फारूखुहसने |

## २.५ सारांश :

बाबर हा मुघल घराण्याचा संस्थापक म्हणून मध्ययुगीन भारताच्या इतिहासात ओळखला जातो. तो एक कसलेला योद्धा व सेनापती होता. पानिपतच्या पहिल्या युद्धात इब्राहिमशहा लोदीचा पराभव करून भारतात मुघल सत्तेची स्थापना केली. त्यानंतर खानुआच्या युद्धात राजपूतांचा तर घागऱ्याच्या युद्धात अफगाणांचा पराभव करून त्याने आपली सत्ता स्थिर केली. परंतु इ. स. १५३० मध्ये आजारपणामध्ये बाबराचा मृत्यू झाला. त्याला भारतात फार काळ राहता आले नाही. त्याच्यानंतर हुमायूत सत्तेवर आला. पण त्याला शेरशहाबरोबरच्या संघर्शमध्ये दिल्लीची सत्ता गमवावी लागली. मात्र पंधरा वर्षाच्या वनवासानंतर त्याने पुन्हा दिल्लीची सत्ता हस्तगत केली. इ. स. १५५६ मध्ये हुमायूनचा अपघाती मृत्यू झाला. पण तत्पूर्वीच त्याने अकबराला मुघल सत्तेचा वारस म्हणून घोषित केले होते. अकबरासमोर अनेक अडचणी व समस्या होत्या, त्यामध्ये हेमूचे संकट मोठे होते. पानिपतच्या दुसऱ्या युद्धात हेमूचा पराभव करून अकबराने दिल्लीची सत्ता आपल्या ताब्यात घेतली.

भारतात खऱ्या अर्थाने मुघल साम्राज्याचा पाया अकबरानेच घातला. आपल्या समोरील अडचणींवर व समस्यांवर त्याने यशस्वीपणे मात केली. अकबराने अत्यंत विचारपूर्वक राजपूतांशी सलोख्यांचे धोरण स्विकारले. त्यांच्याशी वैवाहिक संबंध जोडले, प्रशासनात उच्च पदे व मानमरातब दिला. याच राजपूतांच्या सहकार्याने अकबराने भारतात विशाल साम्राज्याची निर्मिती केली. आपल्या प्रशासनात नवे सिद्धांत मांडले आणि या सिद्धांताच्या जोरावर त्याने मुस्लिम राजवट हिंदूस्थानात स्थिर केली. अकबराने आपल्या राज्यातील सर्व धर्मिय

प्रजेला धार्मिक स्वातंत्र्य दिले. त्यामुळेच अकबर आपल्या प्रजेमध्ये अत्यंत लोकप्रिय बनला.

मध्ययुगीन भारताच्या इतिहासावर आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमठविणाऱ्या कर्तबगार स्त्रियांमध्ये चाँदबिबीचे नाव अजरामर आहे. तिने आपल्या कर्तृत्वाने निजामशाही व आदिलशाही कारभारावर आपला प्रभाव पाडलेला आहे. आपले माहेर आणि सासरचे नाव उज्ज्वल करण्याचे काम तिने केले आहे. तिने निजामशाही वाचविण्यासाठी मुघल सत्तेशी दिलेला लढा अभूतपूर्व असा होता. तिचे रणभूमीवरील शौर्य, पराक्रम, प्रजेविषयीची कळकळ यामुळे चाँदबिबी आपल्या प्रजेमध्ये अत्यंत लोकप्रिय बनली. शौर्य, धैर्य, उदारता, प्रसंगावधान व कार्यक्षमता या गुणांनी तिने इतिहास घडविला.

आदिलशाहीतील सर्वात कर्तबगार व लोकप्रिय सुलतान म्हणून इब्राहिम आदिलशाहा दुसरा याचे नाव घेतले जाते. त्याने अल्पवयात आपल्यावर पडलेली सुलतानपदाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. अंतर्गत व बाह्य शत्रूंपासुन आपल्या राज्याचे संरक्षण केले. त्याने उदार व सहिष्णू धार्मिक धोरणाचा अवलंब करून सर्व धर्मियांना धार्मिक स्वातंत्र्य दिले. यामुळे तो आपल्या जनतेमध्ये अत्यंत लोकप्रिय बनला. तो स्वतः उत्तम संगीतकार होता. तसेच त्याला विद्या व कला यांची उत्तम जाण असल्याने त्याने साहित्य, संगीत, चित्रकला, वास्तूकला यासारख्या कलांना प्रोत्साहन दिले व त्यामुळे त्यांची भरभराट घडून आली.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

**टिपा लिहा :**

१) बाबरनामा (तुझूक-इ-बाबरी)

२) पानिपतचे पहिले युद्ध

३) पानिपतचे दुसरे युद्ध

४) पानिपतच्या युद्धातील अकबराच्या विजयाची कारणे

५) दुसऱ्या पानिपत युद्धाचे परिणाम

६) अबराचे राजपूत सलोख्याचे मार्ग

७) चांदबिबीचे निजामशाहीतील कार्य

८) इब्राहिम आदिलशहाचे अंतर्गत धोरण

**दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) साम्राज्य संस्थापक म्हणून बाबराची योग्यता सांगा.

२) अकबराचे रजपूत धोरण स्पष्ट करा.

३) अकबराच्या राजपूतविषयक धोरणाची चिकित्सक परीक्षण करा.

४) चाँदबिबीने निजामशाहीचे कशाप्रकारे संरक्षण केले याची सविस्तर चर्चा करा.

५) इब्राहिम आदिलशाहाच्या काळातील सांस्कृतिक प्रगतीचा आढावा घ्या.

### २.७ संदर्भ ग्रंथ :


१) प्रा. ग. ह. खरे, मध्ययुगीन महाराष्ट्राचा इतिहास, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई २००१.

२) डॉ. श. गो. कोलारकर, मध्ययुगीन भारत, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९४.

३) बारगळ व ढवळे, मध्यकालीन भारत, विद्या प्रकाशन, नागपूर, १९८७.

४) अनु. भ. ग. कुंटे, मूळ लेखक फेरिश्ता : गुल्शन इब्राहिम, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मंबई, १९८२.

५) पी. व्ही. काटे, मध्ययुगीन भारत, कैलास पब्लिकेशन्स, औरंगाबाद, १९९७.

६) प्रा. मदन मर्डीकर, मध्यकालीन भारताचा इतिास, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २००४.

८) S. R. Sharma, Mughal Empire in India, Lakshmi Nariman Agarwal, Agra-3, 1966

९) J. Sarkar : Mughal Administration, Orient Longman, Delhi, 1972.


❖❖❖

## घटक – ३

# प्रशासन आणि अर्थव्यवस्था

**अनुक्रमणिका :**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

    ३.२.१ प्रशासन व्यवस्था : केंद्रिय आणि प्रांतीय

    ३.२.२ जमीन महसुल व्यवस्था : अकबर आणि मलिक अंबर

    ३.२.३ उद्योगधंदे आणि व्यापार

३.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ

३.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.५ सारांश

३.६ सरावासाठी स्वाध्याय

३.७ अधिक वाचनासाठी संदर्भग्रंथ यादी


### ३.० उद्दिष्ट्ये :

या घटकाच्या अभ्यासानंतर –

- मुघलकालीन प्रशासनव्यवस्था सांगता येईल.
- सम्राट अकबराची जमीन महसुल व्यवस्था स्पष्ट करता येईल.
- मलिक अंबरची जमीन महसुल व्यवस्था काय होती ते स्पष्ट करता येईल..
- मुघलकालीन काळातील विविध उद्योगधंद्यांची माहिती देता येईल.
- मुघलकालीन काळातील अंतर्गत व परराष्ट्रीय व्यापार कसा होता हे स्पष्ट करता येईल.

### ३.१ प्रास्ताविक :

हिंदुस्थानात मुघल सत्तेची स्थापना बाबर याने इ. स. १५२६ मध्ये केली. त्याच्यानंतर सत्तेवर आलेल्या त्याच्या उत्तराधिकाऱ्यांनी मुघल सत्तेस बळकटी दिली. अकबराच्या काळात मुघल सत्तेच्या विस्तार उत्तरेबरोबरच

दक्षिणेतही झालेला दिसून येतो. केवळ आपला साम्राज्यविस्तार केला नाही, तर त्यास स्थिरता देण्याचा प्रयत्न केला. त्यासाठी त्यांनी उत्तम प्रशासनव्यवस्था निर्माण करून सुस्थिर केले. जमीन महसुल पद्धतीत सुधारणा घडवून आणून महसुल सर्वत्र उत्पादनाच्या आधारावर रोखीने किंवा धान्य स्वरूपात घेण्यास सुरूवात केली. त्यामुळे मुघल सत्ता आर्थिकदृष्ट्या संपन्न होण्यास मदत झाली. मुघल काळात लहान-मोठ्या उद्योगधंद्यात भरभराट झाली होती. त्या उद्योगधंद्याना अकबराने मदत केलेली होती. भारतातील अंतर्गत व्यापार व परराष्ट्रीय व्यापारातही मोठ्या प्रमाणात वाढ झाली होती. या सर्वाची सविस्तर माहिती आपण या प्रकरणात सविस्तरपणे पाहणार आहोत.

## ३.२ विषय विवेचन :

### ३.२.१ प्रशासनव्यवस्था : केंद्रीय आणि प्रांतीय :

मुघल सत्तेचा संस्थापक जहिरुद्दीन मोहमंद बाबर याने सुलतानशाहीचा अस्त करून मुघल सत्तेचा पाया घातला. त्याने आपल्या कारर्किदीत पानिपत, खानवा व घोग्रा या लढाया जिंकल्या. बाबराच्या मृत्युनंतर हुमायून गादीवर आला मात्र. शेरशहा सूर याने हूमायूनचा पराभव केला. याकाळात हुमायून आश्रयासाठी भटकंती करत होता त्यावेळी अमरकोट येथे इ. स. १५४२ मध्ये अकबराचा जन्म झाला. हुमायूनचा एकनिष्ठ सरदार बैरामखानला अकबराचा गुरु नेमला. हुमायुनच्या मृत्यूच्या वेळी तो बैराखानाबरोबर पंजाबच्या मोहिमेवर होता. तात्काळ तो मोहिम सोडून दिल्लीस आला व स्वत:स मुघल सत्तेचा बादशहा म्हणून घोषित केले. डॉ. श्रीवास्तव अकबराविषयी म्हणतात की, प्रशासक व मुत्सद्दी या नात्याने अकबर अतुल्य आहे. अकबरकालीन प्रशासन विभागाचे पुढील प्रकार होते.

अ) केंद्रीय प्रशासन

ब) प्रांतीय प्रशासन

क) जिल्हा (सरकार) प्रशासन

ड) तालुका (परगणा) प्रशासन

इ) ग्राम प्रशासन.

**अ) क्रेंद्रीय प्रशासन :**

**१) सम्राट/पातशहा :**

सम्राट हे पद मुघल प्रशासनातील सर्वोच्च पद मानले जात होते. सम्राटाच्या हाती सत्तेची सर्व सुत्रे एकवटली होती. सम्राटाचे सर्व पदे व अधिकाऱ्यांवर नियंत्रण असे. तो मुलकी, लष्करी व न्यायविषयक प्रशासनाचा प्रमुख मानला जात होता. सम्राट अकबर हा कायदेमंडळ, कार्यकारी व न्याय या प्रशासनाच्या तिन्ही शाखांचा प्रमुख होता. सम्राटाला धर्मग्रंथाचे पालन करावे लागत होते. उदा. सम्राटाने कुराणाचे पालन न केल्यास त्याला पदावरून दूर करण्याचा अधिकार उलेमांना होता. काही सम्राटांनी मात्र आपली बलशाली सत्ता स्थापन

करण्यात यश मिळविले होते. उदा. सम्राट अकबराने उलेमांकडे असणारे सर्वोच्च धार्मिक अधिकार स्वत:कडे घेतल्याने राजकीय सत्तेबरोबरच धार्मिकतेचेही अधिकार सम्राट अकबराकडे आले होते. अकबर स्वत:ला ईश्वराचा प्रतिनिधी समजत होता. अकबर हा अनियंत्रित पण कल्याणकारी हुकूमशहा होता. मात्र इतर मुघल सम्राटाच्या काळातील अशीच परिस्थिती होती असे पहावयास मिळते.

मुघलकाळात सम्राट हा आपल्या साम्राज्यातील उच्च अधिकारी व मंत्री यांची नियुक्ती करत असे. सर्व साम्राज्यावर नियंत्रण ठेवणे. याशिवाय सम्राटाकडे पुढील अधिकार एकवटेलेले होते. शिकार करणे, मनोरंजनासाठी प्राण्यांच्या झुंजी लावणे, दर शुक्रवारी पालखीतून जाऊन मशिदीत नमाज पठण करणे, सुवर्णतुला करणे इत्यादी. सम्राट जनतेस झरोका-ए-दर्शन किंवा सलामीचा सज्जा करीत असे. झरोका-ए-दर्शन याचा अर्थ सम्राटाने आपल्या दर्शनीय मंझील किंवा हुजूर महलमधून सकाळी आपल्या प्रजेला दर्शन देणे. अकबर आपल्या प्रजेला दर्शन देत असे त्यावेळी दरबारात संगीतकार व गायक उपस्थित राहून गायन करीत असत. एवढेच नव्हे तर दरबारात भाटही उपस्थित राहून सम्राटाची स्तुती करून त्यास खुश करण्याचा प्रयत्न करत असत.

**२) मंत्री व मंत्रालये :**

मुघल प्रशासनात राज्यकारभाराच्या सोयीसाठी सम्राट हा मंत्र्याची नेमणूक करीत असे. मंत्री हा सम्राटाला कामकाजात मदत करीत असे. वेळप्रसंगी मंत्री ते सल्ला देण्याचे काम करत. परंतू तो सल्ला सम्राटाने मानलाच पाहिजे असे बंधन नव्हते. मंत्री आपले प्रशासकीय पद टिकविण्यासाठी सम्राटाची मर्जी सांभाळत असत. मुघल प्रशासनात प्रत्येक सम्राटाच्या काळात मंत्र्यांची संख्या बदललेली दिसून येते. ही संख्या कमीतकमी ४ व जास्तीत जास्त ८ असलेली दिसून येते. उदा. सम्राट अकबराच्या काळात एकूण ८ मंत्री होते. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे -

**१) वजीर (प्रधानमंत्री) :**

मुघल सम्राटानंतर वजीर हा महत्त्वाचा प्रधान होता. याचे मुख्य कार्य सम्राटाला सल्ला देण्याचे होते. एवढेच नव्हे तर सम्राट व मंत्री यांच्यातील दुवा म्हणून काम पाहत असे. सम्राटाच्या गैरहजेरीत वजीरास राज्याचा कारभार सांभाळावा लागत होता. सम्राट वयाने लहान असेल तर वजीरच सम्राटाच्या नावे राज्यकारभार करीत असे. वजीराचे मुख्य कार्य लष्करी अधिकाऱ्यांची नियुक्ती व बढती करणे, साम्राज्याच्या जमाखर्चावर नियंत्रण ठेवणे, महसुल वसुलीसंबधी निर्णय घेणे.

**२) दिवाण :**

दिवाण हे अर्थखाते सांभाळणारे मंत्रीपद होते. वजीरानंतरचे हे महत्त्वाचे पद होते. अकबराच्या काळात प्रारंभी हे पद स्वतंत्र नव्हते. तर वजीरास ही कामे पार पाडावी लागत होती. जोपर्यंत बैराखमात वजीर होता. तोपर्यंत वजीर व दिवाण हे पद एकच होते. मात्र पुढील काळात सम्राट अकबराने हे पद स्वतंत्र केले. या पदाचा कारभार राजा तोरडमल याच्याकडे सोपविला. त्याने तो सक्षमपणे पार पाडला. दिवाण हा साम्राज्याचा जमाखर्च सांभाळण्याचे काम पाहत असे. राज्याचा महसुल ठरविण्याचे कामही तो पार पाडत असे. त्याच्या मदतीस

सहाय्यक दिवाण असे. अर्थखात्यात पुढील विभाग १) दिवाण-ए-खालसा (सरकारी जमीन व्यवस्थापन विभाग), २) दिवाण-ए-जहागीर (जहागीर व मनसबदारी जमीन व्यवस्थापन विभाग), ३) साहिब-ए-तौजी (लष्करी हिशेबनीस), ४) दिवाण-ए-बयूतत (कारखाना प्रमुख-उद्योग विभाग), ५) मुशरिफ-ए-खजाना (कोषाध्यक्ष), ६) सदर या विभागात सचिवाची व इतर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्याचा वजीराला अधिकार होता. मुजफ्फरखान, राजा तोडरमल व नंतर शहा मन्सूर हे अकबराचे नामांकित अर्थमंत्री होऊन गेले. जमाखर्च पाहणे, जमीन महसूलासंबंधीची कामे पार पाडणे, महसुल उत्पन्न वाढावे यासाठी शेतीचा विकास घडवून आणणे. ही सर्व कामे सुरळीतपणे पार पडावीत यासाठी अधिकारी किंवा कर्मचारी यांची निवड करणे.

**३) मीरबक्षी :**

मीरबक्षी यास सैन्यमंत्रीही म्हटले जात होते. हा सैन्यासंबंधीचे सर्व काम पाहत असे. ते सैनिक, मनसबदार व इतर सेनाधिकारी यांची भरती करणे, त्यांचे प्रशिक्षण, नावे, दर्जा, वेतन, बढती, बदली, बडतर्फी इ. माहिती नोंद ठेवण्याचे काम करीत असे. सैन्याचा पगार वाटप करणे, युद्ध मोहिमेचे नियोजन करणे, हेर व बातमीदार नेमणे, राजवाड्याभोवती पहारेदारांची व्यवस्था करणे, मनसबदाराच्या घोडदळाची संख्या ठरविणे. तसेच घोड्यांची अदलाबदल करू नये यासाठी घोड्यांना डाग देणे इत्यादी प्रमुख कर्तव्ये मीरबक्षीला पार पाडावी लागत होती.

**४) खान-ए-सामा :**

खान-ए-सामा हा बादशहाचा खाजगी गृहमंत्री असे. तो बादशहा व त्याचे कुटुंब, जनानखाना यांचा दैनंदिन आहार, विहार, रक्षण, त्यांना लागणाऱ्या वस्तूंचा पुरवठा करणे. अर्थात राजकुटुंबाच्या गरजांची पूर्तता करण्याचे काम खान-ए-सामा यास करावे लागे. सम्राटाच्या भोजनाची व्यवस्था करणे. मोहिमेच्या वेळी त्यांच्या निवासासाठी तंबू व सर्व सामानाची व्यवस्था खान-ए-सामाकडे असे. या मंत्र्याचा संपर्क सतत सम्राटाशी येत असल्याने या पदाचे महत्त्व फार मोठ्या प्रमाणावर वाढले होते. तसेच हा बादशहाचा अत्यंत जवळचा व महत्त्वाचा मंत्री असून त्याची अनेकदा वजीरपदी बढती केलेली दिसून येते.

**५) सदर-उस-सुदूर (धर्ममंत्री) :**

हा धर्ममंत्री म्हणूनही ओळखला जात व साम्राज्यातील धर्मदाय विभागाचा प्रमुख होता. सम्राटाला धार्मिक बाबतीत सल्ला देणे. सम्राटामार्फत दानधर्म करणे. सम्राट व प्रजा यांच्याकडून कुराण ग्रंथातील अज्ञांचे पालन करून घेणे. इस्लाम धर्मास चालना देणे. धर्माधिकाऱ्यांच्या नियुक्त्या करणे, मशिद व धार्मिक तिर्थक्षेत्रासंबंधी लक्ष देणे, मुस्लिमांच्या धार्मिक संस्थांना सहाय्य करणे, कलावंत व विद्वानांना आर्थिक मदत करणे, सम्राटाने दिलेले निर्णय धर्मबाह्य होणार नाहीत यासंबंधी लक्ष देणे. वादग्रस्त प्रश्नांचा निकाल लावणे, दानधर्म, धर्माच्या बाबतीत बादशहाला सल्ला देण्याचे काम करणे. बादशहानंतर सदर-उस-सुदूर हाच साम्राज्याचा सर्वोच्च धर्मप्रमुख समजला जाई. प्रांतिक व स्थानिक सदर नेमण्याचा त्याला अधिकार होता.

**६) काजी-उल-कजात :**

बादशहा हा राज्याचा प्रमुख न्यायाधीश असे. त्याखालोखाल काजी-उल-कजात न्यायमंत्री म्हणून काम

पहात असे. काजी–उल–कजात हा आपल्या हाताखालील प्रांतिक व स्थानिक काजी नियुक्त करीत असत. इस्लाम कायद्यानुसार धार्मिक खटल्यांची सुनावणी करणे, दिवाणी व फौजदारी दाव्यांचा निकाल लावणे आणि बादशहाला न्यायदानात मदत करणे ही याची प्रमुख कार्ये होती. मुघलकाळात सामान्य व्यक्तीस अर्ज करून न्याय मागण्याची तरतूद होती.

**७) दरोगा–ए–डाकचौकी :**

हा मंत्री पत्रव्यवहार व गुप्तहेर खात्याचा विभागप्रमुख असे. मुघलकाळात या विभागास फार महत्त्वाचे स्थान हाते. या मंत्र्यास साम्राज्याचा पत्रव्यवहार सांभाळावा लागत होता. याशिवाय शत्रू पक्षाकडील गुप्त माहिती काढून ती राजास सादर करावी लागत होती. शत्रूच्या हालचालीवर लक्ष ठेवण्याचे काम त्यास करावे लागे.

**८) मीर आतीव :**

हा तोफखाना विभागाचा प्रमुख असे. या अधिकाऱ्यास तोफखान्यासंबंधीची सर्व कामे पार पाडावी लागत. तोफा बनविणे, बंदुका व दारूगोळा तयार करणे, त्यांची नीटनेटकी व्यवस्था लावणे. तोफा निर्मितीविषयी महत्त्वाच्या किल्ल्यावर कारखाने तयार करणे. तोफखान्यासंबंधीची माहिती सम्राटास पुरविणे इ. कामे या अधिकाऱ्यास पार पाडावी लागत होती.

**९) मुघलांच्या केंद्रीय प्रशासनातील इतर अधिकारी व त्यांचे कार्य :**

मुघल केंद्रीय प्रशासनात मुहतसिब हा जनतेचा सदाचार व निरीक्षक म्हणून काम पाहत होता. मीर–ए–तोजिह हा अधिकारी सैन्यांच्या खर्चाचा हिशेब ठेवण्याचे काम करीत असे. दिवाण–ए–खालसा हा राखीव जमिनीची महसुल व्यवस्था ठेवण्याचे काम पाहत होता. मीर–इ–बर हा अधिकारी जंगलाची व्यवस्था ठेवत असे. मीर–इ–बहर हा अधिकारी लढाऊ व व्यापारी जहाजांच्या निर्मितीचे काम पाहत होता. मीर–इ–मश्रिफ हा अधिकारी उत्पन्न व खर्च यांच्या नोंदी ठेवणे. इत्यादी विविध खाती केंद्रीय प्रशासनात निर्माण केलेली होती. अकबराच्या काळात ही विविध खाती दुय्यम स्वरूपात मोडत असली तरी मुख्य खात्यास मदत करीत होती. या वरील अधिकाऱ्याशिवाय अकबराने नवरत्न दरबार बनवला होता. या नवरत्न दरबारामध्ये १) मुलकी न्यायखाते, २) तनखा व धर्मादाय खाते, ३) कृषीविषयक खाते, ४) धर्मविषयक खाते, ५) सार्वजनिक बांधकाम खाते, ६) फौजदारी खटल्यांचा निवाडा, ७) बेवारस मालमत्तेची व्यवस्था, ८) वस्तूंच्या किंमतीवर नियंत्रण, ९) बादशाही छावणीच्या जागा इत्यादी महत्त्वाची खाती होती.

**ब) प्रांतिक प्रशासन :**

मुघल काळात प्रशासकीय कारभाराच्या सोयीसाठी साम्राज्याचे जे विभाग केले होते त्या विभागास प्रांत किंवा सुभा म्हटले जात. सम्राट अकबराने आपल्या साम्राज्याचे १५ सुभे बनविले होते. त्याची ही प्रांतीय व्यवस्था केंद्रीय प्रशासनाप्रमाणेच तयार केली होती. त्याच्या या प्रशासनात पुढील सुभ्यांचा समावेश होता. १) अलाहाबाद, २) आग्रा, ३) अयोध्या, ४) अजमेर, ५) अहमदाबाद, ६) बिहार, ७) बंगाल, ८) दिल्ली, ९) काबूल, १०) लाहोर, ११) मुलतान, १२) मावळ, १३) वऱ्हाड, १४) खानदेश, १५) अहमदनगर इत्यादी.

सम्राट औरंगजेबाच्या काळात ही संख्या २१ वर पोहोचली होती. त्यात १) दिल्ली, २) आग्रा, ३) गुजरात, ४) खानदेश, ५) बंगाल, ६) बिहार, ७) अजमेर, ८) मावळ, ९) काबूल, १०) अवध, ११) अलाहाबाद, १२) मुलतान, १३) लाहोर, १४) वऱ्हाड, १५) ठठ्ठा, १६) ओरिसा, १७) औरंगाबाद, १८) काश्मीर, १९) बीदर, २०) विजापूर, २१) हैद्राबाद इ. या सुभ्यांचे प्रशासन पुढील प्रमाणे होते.

**१) सुभेदार किंवा सिपहसालार (सुभेदार) :**

अकबराच्या काळात प्रांतप्रमुख 'सिपहसालार' असे म्हटले जात होते. पुढे औरंगजेब बादशहाच्या काळात यास सुभेदार किंवा नजीम असे म्हणत. या प्रांतप्रमुखास प्रांतातील राज्यकारभारात अंतर्गत स्वातंत्र्य होते. संपूर्ण प्रांताचा कारभार सुभेदार सांभाळत असल्याने त्याच्यावर फार मोठी जबाबदारी पडत असे. ही जबाबदारी उत्कृष्टपणे पार पडावी यासाठी बादशहा हा आपल्या विश्वासातील व्यक्तीची नियुक्ती करीत असे. विशेषत: राजपुत्र किंवा सम्राटाच्या कुटुंबातील सदस्याची किंवा योग्य सेनापतीची निवड केली जात असे. सुभेदार किंवा प्रांत प्रमुखाची कार्ये पुढीलप्रमाणे होत.

प्रांतात शांतता व सुव्यवस्था राखणे, प्रांतातील महसुल वसूल करणे, प्रांतिक लष्कराची व्यवस्था ठेवणे, प्रजेच्या कल्याणासाठी रस्ते, कालवे, दवाखाने, धर्मशाळा व बागांची निर्मिती करणे. प्रांतातील न्यायदान व्यवस्था सांभाळणे, एखाद्या गुन्हेगाराने गंभीर गुन्हा केला असल्यास त्यास शिक्षेसंबंधी बादशहाची मान्यता घेणे. प्रांतामधील मांडलिक राजाकडून खंडणी वसूल करणे. बादशहाच्या परवानगीने शत्रूवर हल्ला करणे. प्रांतातील बंडखोर सरंजामदार व जमीनदार यांचा बंदेबस्त करणे, प्रांतातील अधिकारी व निवडीबाबत बादशहाकडे शिफारस करणे, धार्मिक तीर्थक्षेत्रांची जपणूक करणे, जमाखर्चाचा ताळमेळ घालणे, शेतकऱ्यांसाठी अनेक विकासाच्या उपाय योजना करणे, इत्यादी कार्य प्रांतप्रमुखास करावी लागत होती.

**२) प्रांतीय दिवाण (प्रांतीय अर्थमंत्री) :**

हा सुभेदारानंतरचा महत्त्वाचा अधिकारी होता. याची नियुक्ती केंद्रीय दिवाणी करीत असे. त्यामुळे तो त्यास जबाबदार असे. हा प्रांताचा अर्थमंत्री होय. सुभेदार व दिवाण हे दोन अधिकारी एकमेकांवर नियंत्रण ठेवण्याचे काम करत असत. ते परस्परांचा गुप्त अहवाल बादशहाकडे पाठवत असत. प्रांतीय दिवाणास पुढील कामे करावी लागत होती. आपल्या खात्याचा अहवाल केंद्राकडे पाठविणे. प्रांतीय खजिन्यावर नियंत्रण ठेवणे. प्रांतातील जमीन महसुल वसूलीसाठी अमीन व आमील या अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे. प्रांतातील दिवाणी खटले चालविणे. शेतकऱ्यांना तगाई देणे. अडी अडचणीच्यावेळी शेतकऱ्यांना मदत करणे, देवस्थानांना इनाम दिलेल्या जमिनीवर देखरेख करणे इत्यादी.

**३) प्रांतीय सदर किंवा काझी (न्यायप्रमुख) :**

प्रांतीय प्रशासन व्यवस्थेत प्रांतीय दिवाणानंतर हा महत्त्वाचा अधिकारी होता. याची निवड केंद्रीय प्रशासनातील सद्र-इ-सदर करीत असे. यास धार्मिक ज्ञान असणे आवश्यक होते. प्रांतातील धार्मिक खटले चालवून न्यायनिवाडा करणे, शहरे व जिल्ह्याच्या न्यायायातील न्यायाधीशांच्या नेमणूका करण्यासंबंधीच्या

शिफारसी करणे, जिल्हा पातळीवरील काझींच्या कामकाजावर लक्ष ठेवणे, केंद्र सरकारकडे जमीन दान देण्याबाबत व आर्थिक मदतीबद्दल शिफारस करणे. इत्यादी कामे करावी लागत होती.

**४) प्रांतीय बक्षी (प्रांतीय सैन्यप्रमुख) :**

प्रांतीय बक्षीची नियुक्ती ही क्रेंदीय मीरबक्षी करीत असे. हा प्रांताचा सैन्यप्रमुख असून त्यास सैन्यासंबंधीची पुढील कामे पार पाडावी लागत होती. प्रांतीय लष्करात सैन्यांची भरती करणे, सैन्याचे संघटन करणे, सैनिकांचे वेतन बढती व बडतर्फी करणे, सैन्यात शिस्त व कार्यक्षमता ठेवणे, प्रांतातील बंडखोरांना नियंत्रणात ठेवणे, प्रांताच्या लष्करासंबंधीची माहिती केंद्रीय मीर बक्षीला कळविणे.

**५) कोतवाल (प्रांत पोलीस प्रमुख किंवा नगर प्रमुख) :**

व्यापारी बंदरे किंवा शहरे येथील राज्यकारभार पाहण्यासाठी प्रशासनाकडून या अधिकाऱ्याची निवड केली जात होती. नगरात अथवा शहरात शांतता व सुव्यवस्था निर्माण करणे, शहराच्या संरक्षणासाठी लष्कर सज्ज ठेवणे, गस्त किंवा पहारा देऊन शहर भितीमुक्त करणे, परकीय लोकांच्यावर लक्ष ठेवणे, शहरातील बाजारपेठा व उद्योगधंदे यांना संरक्षण देणे, बाजारपेठेतील वस्तूंच्या भावावर नियंत्रण ठेवणे, शहरातील अवैध धंद्यावर निर्बंध घालणे, शहरामधील जनतेला सामाजिक सुविधा पुरविणे, स्मशाने व कत्तलखाने याकडे लक्ष पुरवणे, बेवारस असणारी मालमत्ता सरकारकडे जमा करणे इत्यादी कामे कोतवालास करावी लागत होती.

अशाप्रकारे मुघल काळात दळणवळणाची प्रगत व जलद साधने नसून सुद्धा मुघल बादशहांनी सुभेदारांच्या केंद्रत्यागी प्रवृत्तीला आळा घालण्याचे काम प्रांतिक सत्ताविभागणीद्वारे केले होते. प्रांतात भ्रष्टाचार होवू नये म्हणून प्रांतप्रमुखांच्या वारंवार बदल्या केल्या जात असत.

**क) जिल्हा किंवा सरकार प्रशासन :**

जिल्हा प्रशासन ही प्रांतिक प्रशासनाची लहान प्रतिकृतीच होती. प्रत्येक प्रांताचे जिल्हा किंवा सरकार प्रशासन असे विभाग पाडले असून त्यावर फौजदार, अमलगुजार, बितिकची, पोतदार हे अधिकारी नियुक्त केले होते.

**१) फौजदार (जिल्हा प्रमुख) :**

जिल्ह्याचा सर्व कारभार फौजदार पाहत असे. त्याच्याकडे लष्करी जबाबदारी असल्याने तो आपल्याकडे आवश्यक तेवढी फौज ठेवत असे. त्याचे प्रमुख काम जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था राखणे हे होते. त्यासाठी लहानसे सैन्य बाळगणे. याशिवाय जिल्ह्यातील स्थानिक बंडखोर, डाकू, चोर व लुटारुंचा बंदोबस्त करण्यासाठी फौज बाळगून वचक वाढविणारा फौजदार हा नावाप्रमाणे अधिकारी होता. परगण्यातील अधिकाऱ्यावर नियंत्रण ठेवणे, महसुल अधिकाऱ्यांना महसुल वसुलीसंबंधी मदत करणे, सुभेदारांनी केलेल्या आज्ञा पाळणे, जिल्ह्यातील जमीनदारांवर नियंत्रण ठेवणे इत्यादी कामे फौजदारास करावी लागत होती.

**२) जिल्हादिवाण (अमलगुजार) :**

हा जिल्ह्यातील अर्थविभागाचा प्रमुख होता. जमीन महसुल वसुली, शेतीस उपद्रव करणाऱ्या चोर, लुटारू

व बंडखोरांचा बंदोबस्त करणे. शेतीतून उत्पन्न वाढविण्यासाठी प्रयत्न करणे. शेतकऱ्यांना नैसर्गिक संकटकाळात सारामाफी करणे व तकावी देणे, जमिनीचे स्वरूप व घेण्यात येणारी पिके यानुसार महसुल ठरविणे, जिल्ह्यातील महसुल वाढीसाठी प्रयत्न करणे, जिल्हा खजिनदारांच्या कामकाजावर लक्ष ठेवणे व तालुका स्तरावरील महसुल अधिकाऱ्यांना योग्य मार्गदर्शन करणे इत्यादी कामे जिल्हा दिवाणास करावी लागत होती.

**३) जिल्हा हिशेबप्रमुख (बितिकची) :**

अमलगुजार यास मदत करणारा हा महत्त्वाचा महसुल अधिकारी होती. जमिनीची प्रत व पीक याच्या आधारे शेतसारा निश्चिती करण्यासाठी अमलगुजारास माहिती पुरविणे, जिल्ह्यातील कानूनगो, पटवारी, मुकादम वगैरेवर देखरेख ठेवणे, जिल्ह्यात समावेश असणाऱ्या परगण्यांतील महसुल वसूलाबाबतची हिशोबपत्रके तयार करणे, जिल्ह्यातून जमा झालेल्या महसुलाचा हिशेब ठेवणे इत्यादी कामे त्यास करावी लागत होती.

**४) जिल्हा खजिनदार (पोतदार) :**

हा जिल्हा प्रशासनातील शेवटचा अधिकारी होय. याचे महत्त्वाचे काम शेतकऱ्याकडून शेतसाऱ्याची रक्कम स्वीकारणे. त्याबद्दल पावती देणे आणि ही रक्कम खजिन्यात सुरक्षित ठेवून ती केंद्रीय खजिन्यात पाठवायची व्यवस्था करणे, जिल्ह्यातील शेतसारा व इतर करांबाबतची कागदपत्रे एकत्र करणे व याबाबतचा तपशील जिल्हाप्रमुखास देणे.

**ड) तालुका किंवा परगणा प्रशासन :**

मुघल प्रशासनात जिल्ह्याचे परगण्यात किंवा तालुक्यात विभाजन केले जात होते. परगण्याच्या प्रशासनात शिकेदार (तहसीलदार), अमीन (मुनशीप), खजिनदार (पातेदार) इ. प्रमुख अधिकारी होते तर वितिक्की, कानूनगो, चौधरी हे ही तालुका प्रशसानात काम करणारे इतर अधिकारी होते.

**१) शिकदार (तहसीलदार) :**

हा परगण्याचा प्रमुख असून त्याला पुढील कामे पार पाडावी लागत होती. परगण्यात शांतता व सुव्यवस्था ठेवणे. परगण्याची सुरक्षितता राखणे, त्यासाठी सैन्य बाळगणे. न्यायव्यवस्था सुरळीतपणे चालविणे. दिवाणी व धार्मिक खटले चालवून गुन्हेगारांना शिक्षा करणे इत्यादी कामे शिकदारास करावी लागत होती.

**२) अमीन (मुनशीप) :**

अमीन हा परगण्यातील शेती महसूलासंबंधीची कामे पाहणारा अधिकारी होय. त्याची कामे पुढीलप्रमाणे परगण्यातील शेतसारा निश्चित करून वसूल करणे. शेतकऱ्यांकडून शेतसारा गोळा करणे, जिल्हा महसुल अधिकाऱ्यांच्या कामकाजात मदतनीस म्हणून काम पाहणे.

**३) खजिनदार (पोतदार) :**

खजिनदार हा परगण्यातील आर्थिक कामे पहात असे. परगण्याचा जमाखर्च पाहणे, खजिना सांभाळणे

इत्यादी कामे तो पाहत असे.

**४) बितिकची (हिशोबनीस) :**

परगण्यातील हिशेब लिहून ठेवणारा व लेखन कार्य करणारा हा अधिकारी होता. वरील अधिकाऱ्यांशिवाय परगण्यात कानूनगो, चौधरी हे ही अधिकारी कामकाज पाहत असत. त्यामुळे परगण्यातील कामकाज सुरळीत चालण्यास मदत होत असे.

**ई) ग्रामीण प्रशासन :**

ग्राम हा मुघल प्रशासनातील शेवटचा घटक आहे. प्राचीन काळापासून खेडी ही स्वयंपूर्ण होती. त्यामुळे प्रत्येक खेड्यातील कारभार हा स्वतंत्रपणे पहिला जात होता. हीच पद्धत मुघलकाळातही टिकून होती. खेड्यातील कारभार पाहण्यासाठी पुढील अधिकारी नियुक्त केले जात होते.

**१) मुकादम (पाटील) :**

हा गावचा प्रमुख अधिकारी होता. त्याच्याकडे गावचे संरक्षण करणे गावातील तंटे मिटविणे. लोकांना सोयीसुविधा उपलब्ध करून देणे इत्यादी कामे करावी त्याला लागत होती.

**२) पटवारी :**

पटवारी हा अधिकारी पाटलाचा मदतनीस म्हणून काम पाहत असे. त्याचे मुख्य काम शेतसारा वसूल करणे हे होते.

**३) चौकीदार :**

चौकीदार हा अधिकरी पाटलाचा मदतनीस म्हणून खेड्यात काम पाहत असे. याचे प्रमुख काम जमिनीबाबतची माहिती ठेवणे हे होते.

अशाप्रकारे ग्रामीण प्रशासनात वरील अधिकारी कार्यरत होते. त्यांना जातपंचायत कामात मदत करत असे. ती जातीबाबतचे वाद किंवा तंटे मिटविण्याचे काम करत असे. तसेच गावातील धार्मिक सण व उत्सव साजरे करण्यास मदत करत असे.

**● स्वयं अध्ययन प्रश्न – १**

**अ) योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) मुघल सत्तेची स्थापना .......... यांने केली.

अ) बाबर  ब) हुमायून  क) अकबर  ड) औरंगजेब

२) .......... हे पद मुघल प्रशासनातील सर्वोच्च पद मानले जात होते.

अ) सम्राट  ब) वजीर  क) दिवाण  ड) मीरबक्षी

३) बादशहा व मंत्री यांच्यामधील दुवा म्हणून .......... हा काम पाहत होता.

अ) खान-ए-सामा ब) दिवाण क) मीरबक्षी ड) वजीर

४) मुघल कालीन केंद्रीय प्रशासनात .......... हा जनतेचा सदाचार व निरीक्षक म्हणून काम पाहत होता.

अ) मुहतसिब ब) मीर-इ-तोजिह क) मीर-इ-बहर ड) मीर-इ-मुश्रिफ

५) अकबर काळात प्रांतप्रमुख हा ............ असे.

अ) सुभेदार ब) फौजदार क) मीरबक्षी ड) कोतवाल

६) अकबराच्या काळात एकूण ............ मंत्री होते.

अ) ८ ब) ९ क) १० ड) ११

७) अकबराच्या प्रशासनात अर्थखात्याची जबाबदारी सांभाळणारा ............. मंत्री होता.

अ) खान-ए-सामा ब) वजीर क) मीरबक्षी ड) दिवाण

८) अकबराच्या प्रशासनात सैन्यमंत्र्यास ............. म्हणत असत.

अ) खान-ए-सामा ब) मीर आतीवक क) मीरबक्षी ड) सदर-उस-सुदूर

९) अकबरकाळात जिल्ह्यातील अर्थविभागाचा प्रमुख ............. होता.

अ) अमलगुजार किंवा दिवाण ब) बितिकची किंवा जिल्हा हिशेबप्रमुक

क) पोतदार किंवा जिल्हा खजिनदार ड) फौजदार

१०) अकबराच्या ग्रामीण प्रशासनात गावचा प्रमुख अधिकारी ............. होता.

अ) पटवारी ब) पाटील क) चौकीदार ड) कोतवाल

### ३.२.२ जमीन महसुल व्यवस्था-अकबर व मलिक अंबर :

**अ) अकबराची जमीन महसुल व्यवस्था :**

शेरशहाने अकबराच्या पूर्वी प्रजेच्या व राज्याच्या हिताच्या दृष्टीने उत्तम जमीन महसुल पद्धती प्रस्थापित केली होती. शेरशहाचे जमीन महसुल प्रणालीतील अपूर्ण राहिलेले कार्य अकबराने आपल्य काळात पूर्ण केले. साम्राज्यातील जमीनीचे खालसा व जहागीर हे दोन प्रकार होते. खालसा म्हणजे बादशहाच्या प्रत्यक्ष मालकीची जमीन, जहागीर म्हणजे जहागीरदार, जमीनदार, सरदार व कुलीनवर्ग यांच्या मालकीची जमीन होय. जहागिरदार या जमिनीतील काही ठराविक हिस्सा सम्राटास देत असत.

**● सम्राट अकबराचे पाच महसुल प्रयोग (१५६३-८२)**

**१) पहिला प्रयोग (१५६३) :**

अकबराने इतमादखानास महसुलाचा पहिला प्रयोग करण्यास नियुक्त केले होते.

**२) दुसरा प्रयोग (१५६४) :**

दिवाण मुजफ्फरखान तुर्बती व त्याच्या सहाय्यास तोडरमल यांची अकबराने नियुक्ती केली होती.

**३) तृतीय प्रयोग (१५६९) :**

नवीन दिवाण शियाबुद्दीन अहमद याची या प्रयोगासाठी नियुक्ती केली.

**४) चतुर्थ प्रयोग (१५७०-७१) :**

प्रत्यक्ष पीक व स्थानिक परिस्थिती यांच्या आधारे सारा आकारणीचा अवलंब राजा तोडरमल याने केला. इ.स. १५७५ मध्ये जहागीरीचे रुपांतर सरकारी जमिनीत करण्यात आले.

**५) पाचवा प्रयोग (१५८२) :**

राजा तोडरमल याची अकबराने साम्राज्याच्या दिवाणपदावर नियुक्ती केली. त्याने इ. स. १५७० पासून जमीन महसूलाबाबत ज्या सुधारणा सुचविल्या होत्या त्याची संपूर्ण साम्राज्यात अंमलबजावणी करण्यात आली.

**● राजा तोडरमलची दशवार्षिक जमीन महसुल पद्धती :**

राजा तोडरमल याने गुजरातमध्ये इ. स. १५७३ सुरू केलेली जमीन महसुल पद्धती अकबराने संपूर्ण राज्यात लागू केली. राजा तोडरमलने केलेल्या कामगिरीमुळे अकबराने इ. स. १५८२ मध्ये दिवाण-ए-अशरफ या पदावर बढती केली.

जमीन मोजणीसाठी राजा तोडरमल यांने बांबूच्या सहाय्याने जमिनीची माजेणी केली. त्या जमिनीच्या उत्पादनाच्या क्षमतेनुसार चार प्रकार केले.

**१) पोलाज :**

ज्या जमिनीवर प्रत्येक वर्षी लागवड केली जाते अशा उत्तम जमिनीस पोलाज असे म्हणतात.

**२) परौती :**

थोड्या कालावधीसाठी पडून राहिलेल्या जमिनीस ज्या जमिनीतून कमी प्रमाणात उत्पादन निघते त्यास परौती असे म्हणतात.

**३) चाचर :**

पहिल्या वर्षी उत्पन्न घेतल्यानंतर तीन ते चार वर्षे जमिनीवर कोणतेही उत्पन्न घेतले जात नाही. अशा जमिनीस चाचर जमीन म्हणतात.

### ४) बंजर :

या जमिनीमध्ये पाच वर्षे किंवा पाच वर्षापेक्षा जास्त काळ पडीक असणाऱ्या जमिनीस बंजर जमीन असे म्हणतात.

वरील पोलाज, परौती, चाचर व बंजर या जमिनीचे उत्तम, मध्यम, कनिष्ठ असे वर्गीकरण केले जाते. १० वर्षाच्या कालखंडातील उत्पन्नाची सरासरी काढून त्यानुसार १/३ जमीन महसुल आकारण्यात आला. या सरासरी धान्याच्या प्रमाणाला पीकदर व सरासरी किंमतीच्या दराला रोख दर असे मानण्यात आले. पीकदरावरून महसुल किंवा सरकारी हिस्सा ठरवून त्याला रोख दराने गुणून महसूलाची रक्कम ठरविण्यात आली. या पद्धतीमुळे महसुल आकारणी सुलभ झाली. एखाद्या जमिनीचा महसुल ठरवायचा असल्यास त्या जमिनीचे क्षेत्र पाहून सरासरी पीक दराने त्याचे उत्पन्न निश्चित करण्यात येत असे. या उत्पन्नाचे सरासरी रोख दराने रकमेत रुपांतर केल्यानंतर सरकारी हिस्सा किंवा महसुल निश्चित केला जात असे. अकबराच्या काळात सर्व खालसा जमिनीचे चार महसुल मंडळात विभाजन करण्यात येऊन त्यावर एक स्वतंत्र अधिकाऱ्याची नियुक्ती केली जात असे. जमिनीचा महसुल धान्याच्या स्वरूपात व रोखीने भरण्याची सोय होती. त्यामुळे राज्याचे उत्पन्नही वाढले. शेतकरीही समाधानी झाला. या पद्धतीस 'रयतवारी पद्धत' किंवा 'राजा तोडरमलचा बंदोबस्त' असे ही म्हटले जाते. त्याचबरोबर शेतजमिनीचे उत्पदान वाढावे यासाठी शासनाकडून शेतकऱ्यांना कर्जपुरवठा केला जात होता. काही नैसर्गिक संकट उद्‌भवल्यास काही प्रमाणात साऱ्यात सूट दिली जात होती. सारा वसुल करणाऱ्या अधिकाऱ्यांना सर्व दस्ताऐवज दप्तरी नोंद करावी लागत असे. अकबराच्या काळात खालसा जमिनीतील महसूलातील वसुलीचे काम सरकारी महसुल अधिकारी करत असत. तर जहागिर जमिनीच्या बाबतीत महसुल वसुलीचे काम जहागीरदारांचे अधिकारी पाहत असत.

पोलाज व परौती जमिनीसाठी १/३ सारा आणि चाचर जमीन जास्तीत जास्त लागवडी योग्य तयार करण्यासाठी पहिल्या वेळी १/५ सारा व पुढे पुढे त्यात वाढ केली जात असे. बंजर जमिनीसाठी पहिल्यावर्षी १/२६ सारा घेतला जात असे. नंतर त्यात वाढ केली जात होती.

- **इतर जमीन महसुल पद्धती :**

### १) घल्ला (गल्ला) बक्षी पद्धती :

या पद्धतीत शेतकरी व सरकार यांच्या उत्पादनाची विभागणी केली जात असे. सिंध, काबूल व काश्मरीच्या काही प्रदेशात ही पद्धत चालू होती.

### २) नास्क पद्धती :

या पद्धतीत शेत जमिनीतून किती प्रमाणात उत्पन्न होईल याचा अंदाज घेऊन सारा घेतला जात. ही पद्धत विदर्भ, ओरिसा, बंगाल व काश्मीरच्या काही भागात सुरू होती.

**३) कानकुट पद्धती :**

या पद्धतीत जमिनीची मोजणी करून जमिनीतील उत्पन्नाचा अंदाज घेवून शेतकऱ्याचा हिस्सा बाजूला काढून उरलेला हिस्सा महसुल म्हणून घेतला जात असे.

अकबराने शेतकऱ्यावरील अनेक कर रद्द केले. शेतकऱ्यांना अनेक प्रकारच्या सवलती सम्राटाने दिल्या.

**● अकबराच्या महसुल प्रणालीचे मूल्यमापन :**

**गुण**

**१) जमिनीची बिनचूक मोजणी :**

अकबराने शेरशहाच्या काळात जो दोर वापरला जाता होता त्याऐवजी अकबराने बांबूच्या सहाय्याने जमिनीची माजेणी केली. याचे कारण दोर हा कालांतराने कमी जास्त होण्याची शक्यता असते.

**२) शेतीची वर्गवारी :**

शेतीची वर्गवारी पोलाज, परौती, चाचर व बंजर अशी केल्यामुळे साऱ्याचे प्रमाण निश्चित झाले. उत्पन्नावर सारा आकारला गेला. त्यामुळे शेतकऱ्यावर बसणारा अतिरिक्त कर कमी झाला.

**३) सारा आकारणी व तिचे कायम स्वरूप :**

अकबराने एकूण उत्पन्नाच्या १/३ टक्के सारा आकारला. अबूल फजल म्हणतो, की दरवर्षी सारा निश्चित करण्याची शेरशहाप्रणाली पद्धती नष्ट करून ठराविक काळानंतर उत्पन्नाच्या कमी अधिक प्रमाणावरून महसुल निश्चित केला जात होता.

**४) रयतवारी पद्धती :**

स्मिथच्या म्हणण्याप्रमाणे 'अकबराची महसुल पद्धती रयतवारी असून शेतसारा देण्याची जबाबदारी प्रत्यक्ष शेतकऱ्यावर होती. ब्रिटीशांनी केलेल्या व्यवस्थेप्रमाणे ग्रामप्रमुखास महसुलास जबाबदार धरण्यात येत नव्हते.

**५) कृषिसंवर्धन :**

बी-बियाणे, अवजारे इत्यादीसाठी तकाबी दिली जात असे.

**दोष :**

**१) भ्रष्टाचारी व अकार्यक्षम अधिकारी :**

कोणतीही योजना सुरू केल्यानंतर त्यासाठी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यांनी ती पूर्णत्वास आणणे आवश्यक आहे. स्मिथ म्हणतात, महसुल खात्याची माहिती असलेली माझ्यासारखी कोणतीही व्यक्ती याबाबतीत अकबराचे आदेश अगदी जसेच्या तसे पाळल्या जात असतील याबद्दल संशय व्यक्त करील. याबाबतीत भारतात सर्व सोयी उपलब्ध असून सुद्धा ब्रिटीशांनी हात टेकले तेथे अकबरासारख्या शिथिल प्रशासनाची काय चालणार?

२) प्राचीन काळापासून भारतीय शेतकऱ्यांचे येथील शासकांनी मोठ्याप्रमाणात शोषण करून घेतले. जास्त प्रमाणात शेतसारा वसूल केला जात होता. शेतकरी अफाट कष्ट करत होता. पण त्यांच्या प्रगतीसाठी कोणत्याही शासकाने पुढाकार घेतलेला नाही. याचे कारण म्हणजे भ्रष्टाचारी प्रशासक वर्ग होय.

**● अकबराच्या महसुल प्रणालीचे परिणाम :**

**१) शेतकऱ्यास झालेले लाभ :**

रयतवारीपद्धतीमुळे शेतकऱ्यावर मुकादम, जहागीरदार यांचा होणारा जांच कमी झाला. विशिष्ट कालावधीसाठी जमिन आपल्याकडे राहिल्यामुळे कुळांकडून जमिनीसाठी सुधारणा झाल्या. शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ झाली.

**२) राज्याचा फायदा :**

शेतकऱ्याच्या उत्पन्नात वाढ झाल्याने सरकारी खजिन्यातही वाढ झाली. त्यामुळे सैनिकांची संख्याही वाढली, साम्राज्यात वाढ झाली. पुरेसा पैसा उपलब्ध झाल्याने जहागीरदार व बादशहाच्यामुळे मुघल साम्राज्याचा विस्तार खूप मोठ्या प्रमाणात झाला. महसुलातील अन्याय आणि अकार्यक्षमता वाढताच मुघल साम्राज्याचे पतन झाले.

**ब) मलिक अंबरची जमीन महसुल व्यवस्था :**

मलिक अंबर हा मूळचा इराण देशातील होता. त्याने भारतात गनिमी कावा ही युद्ध पद्धत आणली. मलिक अंबर हा निजामशहाचा वजीर होता. त्याने निजामशाहीच्या काळात अहमदनगर या राजधानीच्या ठिकाणी आपली जमीन महसुल पद्धती राबविली होती. ही पद्धती त्याने सम्राट अकबराच्या काळात राजा तोडरमलची उत्तरेत राबविलेली महसुल व्यवस्था होती. तिच्यात स्थानिक परिस्थितीनुसार योग्य तो बदल करून त्याने निजामशाही राज्यात लागू केली. त्यामुळे आर्थिक उत्पन्नात भर पडली.

मलिक अंबर एक यशस्वी सेनापती होता. तसाच तो एक कुशल प्रशासकही होता. निजामशाहीच्या आर्थिक प्रशासनात मलिक अंबरने फार महत्त्वाची भूमिका बजावली होती. त्याने वापरलेल्या कल्याणकारी योजनेमुळे लोकांचे कल्याण तर झालेच परंतु राज्याचीही भरभराट झाली. राज्याच्या आर्थिक ज्या जमा व खर्च या दोन बाजू असतात. त्या दोन्ही बाजूंचा विचार करून मलिक अंबरने आपले प्रशासकीय धोरण आखले होते.

मध्ययुगीन काळात उत्पन्नाचे मुख्य साधन हे जमीन महसुल, सीमा शुल्क, स्थानिक कर, टोल, दंड, खंडणी, न्यायालयीन शुल्क इत्यादी होत. यामध्ये जमीन महसुल हा कर उत्पन्नाचे सर्वात महत्त्वाचे साधन होते. निजामशाहीच्या काळात जमीन महसुल व्यवस्था ही वजीर मलिक अंबर यांच्याकडे सुपूर्द केली होती. दक्षिण राज्याचा जमीन महसुल व्यवस्था निर्माण करण्यात निजामशहाचा वजीर मलिक अंबर याचे फार मोठे योगदान आहे. त्याने प्रथमच महसुल आकारणी व वसूल करण्यासाठी वैज्ञानिक पद्धती विकसीत केली. त्यावर मुघलकाळातील तोडरमल याच्या जमीन महसुलाच्या नियमांचा प्रभाव होता. त्यात त्याने थोडेफार बदल करून निजामशाहीच्या राज्यात ती जमीन महसुल पद्धत वापरली होती.

मलिक अंबर यानी जमीन महसुलाचा तोडगा काढण्यासाठी समाधानकारक पावले उचलली होती. त्याचा फायदा राज्याबरोबरच जनतेलाही झालेला होता. मलिक अंबर यांची दक्षिणेच्या इतिहासात जमीन महसुल यंत्रणा प्रसिद्ध होती. विविध प्रकारचे जमिनीचे वाद मिटविण्याबाबतची इतिवृत्त व अधिकृत नोंदी, न्यायालयीन निर्णय आणि खासगी पत्र लिहिणारे लेखक यांनी मलिक अंबरच्या जमीन महसुल व्यवस्थेचा उल्लेख केलेला आहे. ते म्हणतात की, मलिक अंबरने राज्याची जमीन मोजली आणि महसुल देयकाचे दर, वेगवेगळ्या खेड्यांच्या सीमा आणि बिघाच्या (जमीन) उपायांचे निराकरण केले. तेव्हापासून त्या भागात मलिक अंबरची पद्धती सुरू आहे. पुढे ब्रिटिश कागदपत्रातून असे स्पष्ट होते की, ब्रिटीश सरकारनेही त्यांच्या राज्याच्या प्रारंभीच्या काळात मलिक अंबरचा बंदोबस्त चालू ठेवला होता.

मलिक अंबरने महसुल योजना राबवत असताना प्रत्यक्ष पिकाऊ जमीन आणि त्या जमिनीतून मिळणारे उत्पन्न यावर आधारित महसुल आकारणी केली. त्याने जमिनीचे सर्वेक्षण केले नाही. कर आकारणी करताना प्रत्यक्ष पिकाऊ जमिनीवर आधारित त्या जमिनीचे मूल्यांकन केले. कराची आकारणी वंशपरंपरागत गावचे अधिकारी पाटील व देशमुख यांच्या मदतीने केली.

मलिक अंबरने जमिनीचे दोन भागात विभाजन केले. ते म्हणजे बागायत व जिरायत होत. जिरायत जमिनीची सुरूवातीच्या काळात चार श्रेणीत विभागणी केली. त्यावेळी पडीक जमिनीवर कर आकारला जात नव्हता. पुढे पडीक जमीन लागवडीखाली आणण्याचा प्रयत्न केल्यानंतर त्यावर टप्प्याटप्प्याने कर आकारणी करण्यास सुरूवात केली. मलिक अंबरने 'विकसीत कर आकारणी' ची व्यवस्था केली. निजामशाहीच्या राज्यात पडीक जमीन लागवडी योग्य बनविल्यावर पहिल्या दोन वर्षी महसुल कर आकारला जात नसे. परंतु तिसऱ्या वर्षी एकूण उत्पन्नातील अगदी कमी प्रमाणात का होईना पण महसुल घेतला जात होता. पुढे आठव्या वर्षापासून नियमितपणे पूर्ण महसुल घेतला जात असे.

● **महसुल कराची निश्चिती :**

मलिक अंबरने महसूलाची आकारणी ही एकूण उत्पन्नाच्या २/५ एवढी केली. पिकाच्या एकूण उत्पादनावर आधारित महसुल आकारला जात होता. तो धान्याच्या स्वरूपात वसुल केला जात असे. पुढे मलिक अंबरने महसुल रोख रकमेच्या स्वरूपात वसुल करण्यास सुरूवात केली. त्यावेळी त्याने महसुल १/३ एवढा केला होता.

● **महसुल वसुल करण्याच्या पद्धती :**

एकदा महसुल किती घ्यायचा हे निश्चित झाल्यावर तो वार्षिक किती महसुल जमा होईल याची माहिती घेतली जात होती. या पद्धतीस जमाबंदी असे म्हणत. त्यानंतर राज्याच्या एकूण अंदाजे जमा होणाऱ्या महसुलातून महसुल न आकारला जाणारी जमिन म्हणजेच इनाम जमीन यातून जमा होणारा महसुल वजा केला जात होता. याशिवाय राज्यातील अधिकाऱ्यांना वाटलेला जमिनीतील महसूलही वजा केला जात होता. यातून उरलेल्या जमिनीतून महसुल वसूल केला जात होता. वर्षातून दोन वेळा रब्बी व खरीप हंगामातील सुगीच्या

वेळी महसुल गोळा केला जात होता म्हणजेच मे व ऑक्टोबर महिन्यात हा महसुल गोळा केला जात होता.

हा महसुल गोळा करण्यासाठी सरकारकडून काही अधिकाऱ्यांची नियुक्ती केली जात होती. त्यांची माहिती पुढीलप्रमाणे -

- **खेडेगावातील अधिकारी :**

**पाटील व कुलकर्णी :**

हे खेड्यातील महसुल वसूल करण्याचे काम करीत असत. पाटील हा गावचा प्रमुख या नात्याने जमीन महसुल गोळा करीत असे. त्याच्या जोडीला महार जातीतील एक व्यक्ती असे. पाटील याने केलेल्या कामाच्या मोबदल्यात त्याने जमा केलेल्या महसुलातील ठराविक हिस्सा घेण्याचा अधिकार होता. त्यास सरकारकडून जमीन तोडून मिळत असे. या जमिनीवर त्याचा वंशपरंपरेने अधिकार असे. त्याने जमा केलेला महसुल परगण्याच्या ठिकाणी पोहचवावा लागत असे. पाटील याने जमा केलेल्या महसुलाचा हिशेब ठेवण्याचे काम कुलकर्णी करत असे. मात्र पाटील या अधिकाऱ्यापेक्षा त्याला थोडाफार कमी प्रमाणात जमा झालेल्या महसुलातील हिस्सा मिळत असे. कुलकर्णी पद हे वंशपरंपरेने दिले जात होते. त्याच्यावर लक्ष ठेवण्यासाठी एका मुसलमान अधिकाऱ्याची निवड केली जात होती.

- **परगण्यातील अधिकारी :**

**देशमुख व देशपांडे :**

परगण्यात देशमुख व देशपांडे हे जमीन महसुल वसूल करण्याचे काम करत असत. त्यांच्या मदतीस कारकून असत. जमीन महसुल वसूलीसाठी एक सशस्त्र दलही या अधिकाऱ्यांच्या मदतीस असे. देशमुखाने केलेल्या कामाच्या मोबदल्यात त्यांना एकूण जमा झालेल्या महसुलाच्या पाच टक्के महसुल घेण्याचा अधिकार होता. याशिवाय तो जमीन महसुल नसणाऱ्या जमिनीवर वंशपरंपरेने नियंत्रण ठेवत असे. देशमुखाच्या मदतीस जमा झालेल्या महसुलाची नोंद ठेवण्यासाठी देशपांडे किंवा देशकुलकर्णी असे. देशपांडे विविध कर, पिकाऊ जमीन, पेरणी केलेली जमीन याची नोंद ठेवण्याचे काम करत असत. त्याने केलेल्या या कामाच्या मोबदल्यात महसुलातील ठराविक हिस्सा त्याला मिळत असे. परंतु देशमुखापेक्षा त्याला मिळणाऱ्या महसुलाचे प्रमाण कमी होते. त्याला महसुल मुक्त असणारी जमीन मिळत असे. त्याचे पद हे वंशपरंपरागत होते. अनेक ठिकाणी हे पद ब्राह्मण या जातीकडे दिलेले होते. त्याच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी मुसलमान अधिकाऱ्याची नियुक्ती केली जात होती.

अशाप्रकारे मलिक अंबरने जमीन महसुल पद्धतीत जो प्रयोग केला होता त्यातून शेतकऱ्यांचे हित होवून त्याला संरक्षण प्राप्त झाले होते. शेतीतून उत्पन्न काढण्यासाठी प्रोत्साहन दिले. त्याने महसुल गोळा करण्यासाठी जो मध्यस्थ वर्ग होता तो त्याने दूर केला. परंतु त्याच्या पद्धतीत जो दोष होता तो म्हणजे शेतीतून मिळणाऱ्या महसूलाचा अंदाज व्यक्त करणे हा होय. त्यामुळे तो मिळणाऱ्या प्रत्यक्ष जमिनीच्या उत्पन्नावर अवलंबून नव्हता किंवा त्याचे चुकीचे मुल्यमापन केले जात होते.

● **स्वयं अध्ययन प्रश्न – २**

**योग्य पर्याय निवडून रिकाम्या जागा भरा.**

१) अकबराने .......... जमीन महसुल प्रयोग केले.

अ) २ ब) ३ क) ४ ड) ५

२) राजा तोडरमल याने .......... प्रांतात इ. स. १५७३ मध्ये जमीन महसुल पद्धती लागू केली.

अ) सुरत ब) मुंबई क) गुरात ड) मद्रास

३) पोलाज व परौती जमिनीसाठी .......... इतका सारा घेतला जात होता.

अ) १/३ ब) १/२ क) १/५ ड) १/४

४) मलिक अंबरने जमिनीचे .......... भागात विभाजन केले.

अ) २ ब) ३ क) ४ ड) ५

५) खेडेगावात प्रमुख अधिकारी .......... हा असे.

अ) देशमुख ब) पाटील क) देशपांडे ड) कुलकर्णी

६) राजा तोडरमल याने जमीन मोजणीसाठी .......... एकक वापरले.

अ) दोरी ब) काठी क) साखळी ड) बांबू

७) राजा तोडरमलचा बंदोबस्त म्हणजे .......... होय.

अ) जमीनदारी पद्धत ब) अमलगुजारी पद्धत क) रयतवारी पद्धत ड) सरंजामदारी पद्धत

८) सम्राट अकबराने दिवाण–ए–आशरफ या पदावर .......... ची बढती केली.

अ) इतमादखान ब) राजा तोडरमल क) मुजफ्फरखान ड) मलिक अंबर

९) विकसीत कर आकारणी .......... ने केली.

अ) राजा तोडरमल ब) शियाबुद्दीन अहमद क) मलिक अंबर ड) अकबर

१०) मलिक अंबरने एकूण उत्पन्नाच्या .......... जमीन महसुल कर आकारला होता.

अ) १/३ ब) १/२ क) १/५ ड) १/४

### ३.२.३ उद्योगधंदे व व्यापार :

भारतात प्राचीन काळापासून खेडी ही स्वयंपूर्ण होती. त्यामुळे खेड्यात अनेक प्रकारचे उद्योगधंदे प्रचलित होते. खेड्यातील प्रमुख व्यवसाय शेती हा होता. त्यामुळे शेतीशी संबंधित अनेक उद्योगधंदे खेडेगावात

अस्तित्वात होते. त्यामुळे सर्व प्रकारच्या वस्तूचे उत्पादन केले जात होते. यामध्ये अन्नधान्य, कापड व धातूंच्या वस्तू भारत देशात तयार होत असत. त्यामुळे या वस्तू भारतात आयात कराव्या लागत नव्हत्या. भारतातील प्रमुख उद्योग पुढीलप्रमाणे होते.

**अ) उद्योगधंदे :**

**१) कापड उद्योग :**

भारतात प्राचीन काळापासून हा उद्योग मोठ्या प्रमाणात सुरू आहे. शेती व्यवसायानंतर हा उद्योग भरभराटीस आल्याचे दिसून येते. मुघल काळात कापड हे ५० प्रकारचे तयार केले जात होते. त्या काळात कापड उद्योग हा भरभराटीस आलेला होता. कारण शासन व्यापारी वस्तूवरील जकात घेत नव्हते. तसेच व्यापारी मार्गात येणाऱ्या अडचणींचे निवारण केले होते. त्या काळात व्यापारी केंद्र व शहरांच्या संख्येत मोठ्या प्रमाणावर वाढ झाली होती. माल वाहतुकीसाठी व प्रवासासाठी लागणाऱ्या साधनातही वाढ झाली होती. भारतात शांतता व सुव्यवस्था असल्याने परकीय व्यापारीही भारतात मोठ्या प्रमाणावर आयात निर्यात करीत होते. राज्यकर्त्यांकडून व्यापारी मालास सुरक्षितता मोठ्या प्रमाणावर मिळत होती. भारतातील बंदरावर मुघल शासनाचे वर्चस्व होते. त्याचबरोबर मुघल राज्यकर्त्यांनी जरी साम्राज्य विस्ताराचे धोरण अवलंबले होते तरी उद्योगधंद्याकडे दुर्लक्ष केले नव्हते. त्यामुळे मुघल काळात कापड उद्योग मोठ्या प्रमाणात भरभराटीस आला होता.

कापड उद्योग हा सुती कापड, रेशमी कापड, लोकरी कापड व तागापासून तयार केलेले कापड या प्रमुख चार प्रकारात मोडत होता. यापासूनच जाडेभरडे, मलमल वगैरे प्रकारचे कापड तयार केले जात हेते.

**अ) कापड बनविण्याची प्रक्रिया :**

भारतात प्राचीन काळापासून ज्या पद्धतीने कापड बनविले जात होते तीच पद्धती मध्ययुगीन काळात टिकून होती. कापड तयार करण्यासाठी मानवी श्रम मोठ्या प्रमाणात लागत होते. कापड तयार करताना प्रथम कापसातील बिया बाजूला काढल्या जात होत्या. त्यानंतर तो कापूस चरख्यावर विणला जात होता. विणलेले कापड मागावर तयार केले जात होते. मागावर तयार झालेले कापड चुना, लिंबू व साबणाच्या मिश्रणात बुडविले जात होते. मग त्यास आपणास पाहिजे तो रंग दिला जात असे. अशाप्रकारे रंगाचे कापड तयार केले जात होते.

**ब) कापडाचे प्रकार :**

मुघलकाळात ज्याठिकाणी कापड तयार होत असे त्या ठिकाणच्या नावावरून त्या कापडास नाव दिले जात होते. यात रेशमी कापड, पांढऱ्या रंगाचे सुती, मलमली, जरीचे, चिटाचे, भरतकाम केलेले सुती, गालीचे, शाली, कॅलिको, मेंढ्या, तूस व अंगोरे यापासून तयार केलेले लोकरीचे कापडापासून ब्लँकेटस्, पागोटी, शाल, कमरपट्टे तयार केले जात असत. ताग, अंबाडीपासून तयार केलेले जाडे भरडे कापड, अंबाडी व घायपात भिजत घालून तयार केलेले कापड इत्यादी प्रकारचे कापड मुघल काळात तयार केले जात होते.

**क) कापड उद्योगाची केंद्रे :**

मुघल काळात अनेक कापड उत्पादनाची केंद्रे उदयास आली होती. सुती कापडासाठी लाहोर प्रसिद्ध होते. तेथे सात प्रकारचे सुती कापड तयार केले जात होते. भारताच्या पश्चिम किनारपट्टीवर दाभोळ व खंबायत, पूर्वेकडे विशाखापट्टणम, बंगालमध्ये हुगळी व सिंधू नदीकाठी असणारे लहरी बंदर इ. ठिकाणी कापड तयार केले जात होते. याशिवाय उत्तर भारतात दिल्ली, आग्रा, अवध, जैनापूर, लखनौ, सुरत, ढाक्का, बनारस, पाटणा, अलाहाबाद इ. ठिकाणी कापड उद्योगाची भरभराट झाली होती. लोकरी कापडासाठी पंजाब, राजस्थान, काश्मीर, लाहोर, गुजरात प्रसिद्ध होते. तसेच खेडेगावात अंबाडी, घायपात भिजत घालून त्यापासून धागे तयार केले जात असत.

**ड) मुघलकाळातील कापडाचे दरपत्रक :**

झेना प्रकारचे कापडाचा दर हा १ मोहोर होता. खासा कापडाचा एक तुकडा १५ मोहरास मिळत असे. चिकाटी कपड एक यार्डचा दर १ रुपया होता. मंदीलाची किंमत २ मोहोरा होती. सहान कापडाचा दर ३ मोहरा, बापत्ता कापड ५ मोहरास मिळत होते. चौतार प्रकारचे कापड ९ मोहरास मिळत होते.

**२) रंग उद्योग :**

मुघल काळात रंग उद्योग हा स्वतंत्र उद्योग होता. कापड उद्योगाबरोबरच याचा विस्तार झाला होता. कापडास विविध प्रकारचे रंग दिले जात असत. त्यामुळे या उद्योगाचीही भरभराट झाली होती. रंग तयार करण्याची कला परंपरेने चालत आली हेती. रंग तयार करण्यासाठी पुढील घटक वापरले जात होते. वनस्पतीमध्ये नीळ, बेहडा, डाळींब, बेलफळ, मेंदी, हिरडा, आले, हळद, कुसुंबा, लिंब, बाभूळ, कात, लोध इत्यादी. याशिवाय इतर घटकात तुरटी, चुना, फेरस, सल्फेट, लाख इ. चा वापर केला जात होता. याशिवाय विविध झाडांची पाने, फुले, साल, मुळे यापासूनही रंग तयार केला जात होता. मुघल काळात लाख उत्पादनासाठी लखनौ, बिहार, पंजाब व अवध, हळदीसाठी - अलाहाबाद, आल्यासाठी अवध, लाहोर निळीच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध होते. हा तयार झालेला रंग विशिष्ट पद्धतीने कापडास दिला जात होता. त्यावर लाकडी ठसे उमटविले जात होते.

**३) धातू उद्योग :**

मुघल काळात धातू उद्योग भरभराटीस आला होता. यामध्ये लोखंड, तांबे, पितळ, सोने-चांदी व हिरे-रत्ने इत्यादीच्या विपुल प्रमाणात खाणी भारतात होत्या. या खाणीतून अशुद्ध धातूपासून शुद्ध धातू तयार केला जात होता. या धातूपासून विविध वस्तू बनविण्याचा उद्योगही मोठ्या प्रमाणावर चालू होता.

- **लोखंड :**

लोखंड हे अशुद्ध स्वरूपात खाणीत सापडत होते. त्यापासून शस्त्रास्त्रे, लोखंडी तोफा, शेतीची औजारे, कुलुपे, लोखंडी भांडी तयार केली जात होती. भारतात लाहोर, अजमेर, ग्वाल्हेर, कालिंजर इत्यादी ठिकाणी

खाणी होत्या. खेडेगावात लोहार लोखंडापासून शेतीची औजारे तयार करत होता. मेवाड व बिकानेर येथे शस्त्रास्त्रे तयार केली जात होती. पंजाबात कुलपे तयार करत असत. महाराष्ट्रात लोखंडी तोफा तयार केल्या जात होत्या.

**● तांबे :**

तांबे या धातूच्याही खाणी महाराष्ट्रात मुबलक प्रमाणात होत्या. तांब्यापासून नाणी, वास्तूंचे घुमट, मूर्ती, दागदागिने, भांडी, बंदुका, तोफा, मंदिराचे कळस बनविले जात होते. तांब्यापासून बनविलेली भांडी मुस्लिम लोक मोठ्या प्रमाणावर वापरत असत. खेडेगाव व शहरात अशा प्रकारच्या वस्तू बनविणारे कारागिर होते. तांब्याची भांडी बनविण्यासाठी बनारस प्रसिद्ध होते.

**● पितळ :**

भांडी बनविण्यासाठी पितळ या धातूचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात होता. या धातूपासून तयार केलेली भांडी हिंदू लोक मोठ्या प्रमाणात वापरत असत. पितळी भांडी बनविण्याचा उद्योग बनारस येथे चालत असे.

**● सोने-चांदी :**

सोन्याच्या खाणी दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणावर होत्या. खाणीतून अशुद्ध स्वरूपातील सोने व चांदी शुद्ध स्वरूपात करण्याचे अनेक उद्योग दक्षिण भारतात अस्तित्वात होते. भारतात म्हैसूर प्रांतातील कोलार हे सोन्याच्या खाणीसाठी प्रसिद्ध होते. सोने व चांदी यापासून नाणी, मूर्ती, दागदागिने बनविले जात होते. सुवर्णतुला करण्यासाठी या धातूंचा वापर केला जात होता. विजयनगर साम्राज्यात सोने या धातूचा वापर मोठ्या प्रमाणावर केला जात होता.

**● हिरे-रत्ने :**

सोन्याच्या खाणीप्रमाणेच हिऱ्याच्या खाणी दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणावर होत्या. विशेषत: आंध्र प्रदेशात याच्या खाणी विपूल प्रमाणात सापडत होत्या. याशिवाय बुंदेलखंड व चंदेरी येथेही हिऱ्याच्या खाणी सापडत होत्या. गोवळकोंडा हिऱ्यासाठी प्रसिद्ध होते. ट्रॅव्हनियर या परकीय प्रवाशाने दक्षिण भारतातील हिऱ्याच्या खाणीविषयी माहिती लिहून ठेवलेली आहे. तो स्वत: हिऱ्याचा व्यापारी होता.

**४) साखर उद्योग :**

मुघल काळात साखर उद्योगाची केंद्रे मुबलक प्रमाणात होती. भारतात ऊसाचे उत्पादन घेतले जात असल्याने हा उद्योग भरभराटीस आला होता. ऊसापासून साखर तयार केली जात होती. त्यामुळे खांडसरी उद्योगही मोठ्या प्रमाणावर सुरू होता. साखरेचे उत्पादन हे मोठ्या प्रमाणावर होत असल्याने भारतातील लोकांची गरज भागवून उर्वरीत साखर निर्यात केली जात होती. साखर उत्पादनाची केंद्रे ही प्रामुख्याने दिल्ली, आग्रा, बनारस, गाझीपूर, लाहोर, साष्टी इत्यादी होती तर ऊसाचे पीक मोठ्या प्रमाणावर लाहोर व अलाहाबाद प्रदेशात घेतले जात होते.

**५) मीठ उद्योग :**

भारताच्या समुद्र किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात मीठाचे उत्पादन घेतले जात होते. विशेषत: महाराष्ट्रात कोकण किनारपट्टीवर मीठ उत्पादन उद्योग भरभराटीस आला होता. बंगाल, लाहोर व अजमेर येथेही मीठ उत्पादन केले जात होते. मुघल काळात अजमेर येथील सांभर सरोवरात मीठाचे उत्पादन केले जात होते. भारतात पहिले येणारे परकीय व्यापारी पोर्तुगीज हे आपल्या देशातून मीठ विक्रीसाठी भारतात आणत असत. त्या मीठाशी भारतीयांना स्पर्धा करावी लागत होती. मीठाचे दर हे वेगवेगळ्या भागात वेगवेगळे होते. त्यामध्ये सांभर भागात मीठाचा दर हा ५ मणास २० रुपये एवढा दर होता, तर आग्रा येथे एक रुपयास १७ मण मीठ मिळत होते.

**६) जहाज बांधणी उद्योग :**

मुघल काळात हा ही उद्योग भरभराटीस आला होता. समुद्र किनारपट्टीवर बंदराच्या ठिकाणी हा उद्योग मोठ्या प्रमाणावर चालत होता. याशिवाय जंगलातून मोठ्या प्रमाणावर लाकूड उपलब्ध होत असे. त्याच्या सहाय्याने जहाज बांधणी केली जात असे. ताड या वृक्षाचे बुंधे एकत्र करून मोठी जहाजे बनविली जात असत. याशिवाय जंगलातून सागाचे लाकूड वापरून अधिक मजबूत जहाज तयार केले जात असे. अशाप्रकारची जहाजे तयार करण्याचे उद्योग कोचीन, कलिकत व मालदिव बेटावर चालत असे. याशिवाय महाराष्ट्रात कल्याण, भिवंडी, अलिबाग, वसई, ठाणे इ. ठिकाणी भरभराटीस आला होता.

**७) कागद उद्योग :**

जगात कागद तयार करण्याची कला प्रथमत: चीनमध्ये विकसित झाली. ती १३ व्या शतकात भारतात आली. मुघल कालखंडात भारतात विविध ठिकाणी कागद उद्योग विकसित झाला. हा कागद बनविण्यासाठी बांबू, चिंध्या, तुतीच्या झाडाची साल यांचा वापर केला जात होता. कागद उत्पादनाची केंद्रे ही बिहार व सियालकोट ही होती. कागदाचे उत्पादन हे त्याच्या मागणीनुसार केले जात होते.

**८) काच उद्योग :**

प्राचीन काळापासून काच बनविण्याची कला भारतात होती. काचेचे विविध उपयोग केले जात असत. त्यानुसार त्यांचे उत्पादन घेतले जाई. मध्ययुगीन काळात काच बनविण्याचे उद्योग हे अहमदनगर, आग्रा, बिहार व गुजरात येथे होते. मागणीनुसार काच ही परदेशातूनही आयात केली जात होती. त्यामुळे युरोपिय व्यापारी यात मोठ्या प्रमाणावर भाग घेत असत.

**९) नारळाशी संबंधीत उद्योग :**

नारळाचे झाड हे कल्पवृक्ष मानले गेले आहे. त्यामुळे नारळापासून अनेकविध वस्तू तयार केल्या जात होत्या. नारळ हे कोकण किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणावर उत्पादित केले जात असत. त्यामुळे याठिकाणी नारळावर आधारित अनेक उद्योग विकसित झाले होते. नारळाच्या झाडापासून झाडू, काथ्या, दोर, तेल, नारळ, मद्यार्क,

चटया, बांधकामासाठी लाकूड बनविले जात होते. अशा प्रकारचे उद्योग महाराष्ट्राच्या पश्चिम किनारपट्टीवर प्रत्येक खेड्यापाड्यात विकसित झाले होते.

**१०) इतर उद्योग :**

वरील उद्योगाशिवाय अनेक लहानमोठे उद्योग मध्ययुगीन काळात विकसित झाले हेते. ते भारतातील खेडोपाड्यातही मोठ्या प्रमाणावर चालत होते. त्यामध्ये खाणकाम, मातीपासून भांडी तयार करणे, चर्मोद्योग, लाकडापासून खेळणी व फर्निचर तयार करणे, मासेमारी उद्योग, हस्तीदंती कलाकुसरीच्या वस्तू बनविणे, खेळणी बनविणे, खाद्य तेल तयार करणे इ. विविध उद्योग अस्तित्वात आले होते.

**ब) व्यापार :**

मध्ययुगीन काळात बलवान साम्राज्याची निर्मिती, सत्ताधिशांनी दिलेले संरक्षण, शांततामय जीवन, नवनवीन शहरांचा उदय झालेला होता. त्यामुळे मध्ययुगीन सत्ताधिशांनी व्यापारास उत्तेजन दिले होते. म्हणूनच व्यापारात प्रगती झालेली होती. या काळात परराष्ट्रीय व्यापारास मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली होती. हा परराष्ट्रीय व्यापार भारतातील पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील बंदरातून चालत होता. भारतातून परराष्ट्रीय व्यापारात प्रामुख्याने मलमल, सुती व रेशमी कापड, मसाल्याचे पदार्थ, मौल्यवान रस्ते, अत्तरे, सुगंधी तेले, साखर विविध प्राण्यांची कातडी इत्यादी वस्तू निर्यात केल्या जात होत्या, तर सोने, चांदी, केशर, घोडे व श्रीमंतांच्या चैनीच्या वस्तू आयात केल्या जात होत्या.

**अ) मुघलकालीन अंतर्गत व्यापार :**

या काळात अंतर्गत व्यापारास स्थैर्य प्राप्त झाल्याने मोठ्या प्रमाणावर प्रगती झाली होती. या व्यापारासाठी मुघल सत्ताधिशांनी संरक्षणाबरोबरच आवश्यक त्या सोयी सुविधा पुरविल्या होत्या. मुघलकाळातील व्यापार हा समुद्र किनारपट्टीच्या मार्गाने, नद्यामार्गे व खुष्कीच्या मार्गाने चालत असे.

**१) व्यापारी मार्ग :**

**अ) समुद्र किनारपट्टीवरून चालणारा व्यापार :**

मुघलकाळात खंबायतपासून ते कोचीनपर्यंत व्यापार चालत असे. त्यावेळी व्यापारी जहाजाना संरक्षण देणारे गलबतांचे तीन गट होते. पहिला गट खंबायत ते गोवा असा होता. येथून दरवर्षी ३ हजार टन वस्तू आयात निर्यात केल्या जात होत्या. दुसरा गट हा गोवा ते कोचीन हा होता. येथून सुमारे १ हजार टन वस्तूंचा व्यापार चालत असे, तर तिसरा गट हा नागपट्टणमपासून अेरीसा बंदरापर्यंत असे. अशा प्रकारे संरक्षण गट असल्याने व्यापार सुरळीतपणे चालत असे. त्यास कोणत्याही प्रकारचा चोर, लुटारू, दरोडेखोर व चाचे लोक यांच्यापासून धोका पोहचत नसे.

**ब) नदीमार्गे चालणारा व्यापार :**

मुघलकाळातील जलवाहतूकीचे नदीमार्ग हे सिंधु, गंगा, तापी व बंगालच्या त्रिभुज प्रदेशातील मार्ग असे

चार प्रमुख मार्ग होते. सिंधु नदीवरील मार्ग हा सिंध, मुलतान, लाहोर व काश्मीर इ. प्रदेशातील जात असे. दुसरा गंगा नदीचा मार्ग हा दिल्ली, आग्रा, अलाहाबाद, जोनपूर, ढाक्का, सोनारगाव यांना जोडणारा होता. तिसरा तापी नदीचा जलमार्ग हा सुरत खंबायत येथे चालणाऱ्या व्यापारी वस्तू खरेदी व विक्रीसाठी प्रसिद्ध होता. चौथा जलमार्ग हा बंगाल, बिहार, आसाम यांना जोडणारा बंगालच्या त्रिभुज प्रदेशातील होता.

**क) खुष्कीच्या मार्गाने चालणारा व्यापार :**

मुघल काळात आग्रा हे ठिकाण प्रमुख व्यापारी केंद्र होते. आग्रा शहरामधून प्रमुख पाच महामार्ग जात होते. त्यामध्ये पहिला मार्ग हा काबूलकडे, दुसरा कंदाहारकडे, तिसरा खंबायतकडे, चौथा बऱ्हाणपूर व पाचवा सोनारगावकडे जात होता. येथून जाणाऱ्या मार्गावर पूल बांधले होते. या रस्त्यावर व्यापाऱ्यांच्या निवाऱ्याची सोय व्हावी यासाठी धर्मशाळा किंवा सराया बांधलेल्या होत्या. शेरशहाने आपल्या काळात एकूण १७०० सराया बांधल्याचा उल्लेख आहे. सम्राट अकबराच्याही काळात अशा प्रकारच्या अनेक सराया बांधल्याचा उल्लेख सापडतो. याशिवाय रस्त्याच्या दुतर्फा झाडे लावली होती. रस्त्याच्या कडेला ठिकठिकाणी विहिरींची सोयही केली होती. व्यापाऱ्यांच्या संरक्षणासाठी स्वतंत्र अधिकाऱ्यांची नियुक्ती केली होती. त्यामुळे मुघल काळात व्यापार हा भरभराटीस आला होता.

**२) व्यापाराची साधने :**

मुघलकालीन अंतर्गत व्यपारात मालाची वाहतूक ही बैल, बैलगाड्या, घोडे, खेचर, उंट, पालखी व डोली इ. साधनाद्वारे केली जात होती. काही ठिकाणी थोड्याफार प्रमाणावर हत्तींचाही वापर मालाची वाहतूक करण्यासाठी केला जात होता. डोली व पालखी यांचा वापर अत्यल्प प्रमाणात केलेला दिसून येतो. मात्र बैले व बैलगाडी यांचा वापर मोठ्या प्रमाणावर केलेला दिसून येतो.

**३) व्यापारी जमाती :**

मुघल काळात बंजारा, नीया, बोहरी, पारसी व सौदागर इत्यादी व्यापारी जमाती व्यापार करीत असत. बंजारा व्यापारी हे राजपुताना येथून दूरवरच्या प्रदेशांशी बैल व बैलगाड्या या साधनांच्या द्वारे मालाची वाहतूक करून व्यापार करीत असत. गुजरातमधील बनिया या व्यापारी जमातीचेच गुजरातच्या समुद्रावरून चालणाऱ्या व्यापारावर वर्चस्व होते. बोहरी ही जमात अरबस्तान, इराण, इराक इ. प्रदेशातून विविध वस्तू आणून त्यांचा भारतात व्यापार करीत असत. या व्यापाऱ्यांना दलाल सहकार्य करत असत. शासनाकडूनही या वर्गास फार मोठे सहकार्य मिळत असे.

**४) अंतर्गत व्यापारातील वस्तू :**

मुघलकालीन व्यापारी वस्तूंमध्ये विविध प्रकारचे कापड, मीठ, मिरे हे मसाल्याचे पदार्थ, गुळ, धान्ये, साखर, कापूस, सोने, चांदी, इतर धातू इत्यादींचा समावेश होत असे.

**५) व्यापारी केंद्रे :**

मुघलकालीन अंतर्गत व्यापारी केंद्रे म्हणून व्यापारी मार्गावरील शहरे, राजधानीची ठिकाणे, तीर्थयात्रेची ठिकाणे, पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील प्रमुख बंदरे यांचा उदय झाला होता. यामध्ये प्रामुख्याने काबूल, कंदहार, मुलतान, लाहोर, दिल्ली, आग्रा, अलाहाबाद, जोनपूर, लखनौ, सिंधमधील ठठ्ठा, मक्कर, दक्षिण भारतातील बऱ्हाणपूर, एलीचपूर, ओरीसातील कटक, बंगालमधील सोनारगाव, ढाक्का इत्यादी ठिकाणांना व्यापारी केंद्र म्हणून प्रसिद्धी मिळाली होती. याशिवाय गुजरातमधील अहमदाबाद, बडोदा, चंपानेर, सुरत व खंबायत इत्यादी ठिकाणांनाही महत्त्व मिळाले होते.

**ब) परराष्ट्रीय व्यापार**

भारतात प्राचीन काळापासून परराष्ट्रीय व्यापाराची परंपरा सुरू आहे. ही परंपरा मध्ययुगीन काळात टिकून होती. त्याची सविस्तर माहिती पुढीलप्रमाणे -

**१) मुघलकालीन परराष्ट्रीय व्यापार :**

मुघलकाळात परराष्ट्रीय व्यापारास मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली होती. मुघलकालखंडात युरोपीय पोर्तुगीज, डच व इंग्रज तसेच भारतीय सत्ताधीश मुस्लिम यांच्यात संघर्ष होत असे. प्रारंभी मुस्लिमांचे सागरी व्यापारावर नियंत्रण होते. त्यानंतर पोर्तुगीजांनी व पुढे डच व इंग्रज यांनी व्यापारात आपले वर्चस्व निर्माण केले होते. परराष्ट्रीय व्यापारात समुद्रामार्गे हे व्यापारी व्यापार करीत असत. पश्चिम युरोपीय देश भारतातून मसाल्याचे पदार्थ मोठ्या प्रमाणावर आयात करत असत. मुघल काळात आयातीपेक्षा निर्यात मोठ्या प्रमाणावर होत असल्याने आर्थिक भरभराट झालेली होती.

मुघल काळात परराष्ट्रीय व्यापारासाठी सिंध, गुजरात व बंगाल प्रांतातील बंदरे प्रसिद्ध होती. सिंधु नदीतून येमेन, फ्रान्स मध्य आशिया व पाश्चिमात्य देशाबरोबर व्यापार चालत असे. येथून संत्री हस्तीदंत, उंट व पादत्राने इत्यादी वस्तूंची निर्यात होत असे. गुजरातमधील सुरत, भडोच व खंबायत या बंदरातून अरेबीया आफ्रीका व युरोप व पूर्वेकडील मलाक्काची सामुद्रधुनी येथे निर्यात केली जात होती. खंबायत येथून निर्यात होणाऱ्या वस्तूमध्ये रेशमी कापड, रजया, गालिचे, नीळ, कागद, चमड्याच्या वस्तू, साखर, लोखंड, विविध प्राण्यांची कातडी, हिरडे, हिंग व रत्ने यांचा समावेश होत असे. तर आयात मलालामध्ये मलमल, चंदनाचे लाकूड, चिनी रेशीम, हबशी गुलाम, सोने, चांदी व घोडे इत्यादी वस्तूंचा समावेश होत असे.

चीन, अरबस्तान, आर्मेनिया, इराण या देशांशी सातगाव, हुगळी व श्रीपुर या बंगालमधील बंदरातून व्यापार होत असे. येथून सुती व रेशमी कापड, आले, मिरे, हिरडे, लिंबे इत्यादी वस्तूंची निर्यात होत असे. तर हुगळी बंदरातून रेशीम, जोनपुरी, गालिचे, रजया, तंबूचे सामान, साखर, तांदुळ, नीळ मसल्याचे पदार्थ इ. ची निर्यात इराण, अरबस्तान, पश्चिमेकडील देश, मलाक्का व चीन या देशात होत असे. आयात वस्तूमध्ये सुती कापड, मलमल, सॅटिन, तांबे व कथिल, जहाजवाहिर, मोती, मसाल्याचे पदार्थ, चंदन, विविध लाकडी वस्तू या वस्तूंचा समावेश होत असे.

२) **व्यापारी मार्ग :**

मुघल काळात परराष्ट्रीय व्यापार हा खुष्कीच्या व समुद्राच्या मार्गाने होत असे. मलबार येथून इराण व सुएझच्या आखातात व्यापार केला जात होता. खुष्कीच्या मार्गाने कॉन्स्टॅंटिनोपल किंवा भूमध्य समुद्रातून युरोपीय राष्ट्राकडे भारतीय मालाची ने आण केली जात होती. तांबडा समुद्र, पूर्व आफ्रिकेचा किनारा, मलाक्का बेटे, चीन व प्रशांत महासागरावरील काही देश यांच्याबरोबर परराष्ट्रीय व्यापार केला जात होता. खुष्कीच्या मार्गाने मध्ययुगात परदेशाशी व्यापार केला जात होता. मुलतान, खैबरखिंड व काश्मीर या तीन मार्गाने परदेशीय व्यापार केला जात असे. मुख्यत्वे अफगाणिस्तान, तुर्कस्थान, पश्चिम आशियातील देश, बाल्कन देश व चीन इ. देशाबरोबर खुष्कीच्या मार्गाने व्यापार केला जात होता. वायव्य सरहद्द प्रदेशातून लाहोर ते काबूल व मुलतान ते कंदहार हे दोन मार्ग होते. अशाप्रकारे मुघलकाळात परराष्ट्रीय व्यापारी मार्गात खुष्कीच्या मार्गापेक्षा समुद्र मार्गाचा वापर व्यापार वहतुकीसाठी केला जात होता. सत्ताधिशांनी या व्यापारी मार्गात व्यापाऱ्यांना संरक्षण देण्याची यंत्रणा व सोयी उपलब्ध करून दिल्या होत्या.

३) **व्यापारी जमाती :**

मुघल काळात बंजारा, बनिया, बोहरी, पार्शी, सौदागर, इ. जमातीनी व्यापारात सहभाग घेतला होता. या जमातीकडे चिकाटी, धाडस व धीटपणा अंगी असल्याने त्यांनी व्यापारात यश मिळविलेले दिसून येते. यामध्ये राजपूतान्यातील बंजारा, गुजरातचे बनिया व्यापारासाठी प्रसिद्ध जमाती होत्या. अहमदाबादमध्ये बनियांच्या चौऱ्याऐंशी उपजाती होत्या.

४) **व्यापारी केंद्रे :**

मुघलकाळातील परराष्ट्रीय व्यापारी केंद्रे ही वायव्येकडील काबूल, कंदहार, मुलतान, लाहोर, मध्य भारतातील दिल्ली, आग्रा, आलाहाबाद, जोनपूर व लखनौ, सिंधमधील ठठ्ठा व भक्कर, दक्षिणेकडील बऱ्हाणपूर, एलीचपूर, उज्जैनी, ओरिसातील कटक व बालासोर, बंगालमधील सोनारगाव, ढाक्का ही प्रमुख व प्रसिद्ध व्यापारी शहरे म्हणून उदयास आलेली होती. गुजरातमधील खंबायत व सुरत हेही व्यापाराचे केंद्र म्हणून उदयास आले होते. दक्षिण भारतातील व्यापारी केंद्र म्हणून बऱ्हाणपूर हेही व्यापारी केंद्र म्हणून उदयास आलेले होते. याशिवाय बनारस, लखनौ, जोनपूर, पाटणा, ढाक्का इ. व्यापारी केंद्रे होती. बंदराच्या ठिकाणी, राजधानीच्या ठिकाणी व महामार्गावर, यात्रेच्या ठिकाणी व तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी मध्ययुगीन काळात अनेक व्यापारी केंद्रे ही उदयास आली होती. ही सर्व व्यापारी केंद्रे ही परस्परांशी, प्रमुख बंदरांशी किंवा राजधानीच्या ठिकाणांशी जोडली गेल्याने व्यापार करणे सुलभ झाले होते.

५) **व्यापारी वस्तू :**

भारतातून निर्यात होणाऱ्या वस्तूमध्ये सुती व रेशमी कापड, कार्नेलियन दगड इ. वस्तूंना पोर्तुगाल व इतर युरोपियन देशात पाठविले जात होते. मलाक्का व सुमात्रा येथे मसाल्याचे पदार्थ व रेशीम या वस्तूंना मागणी होती. भारताचा व्यापार हा अरबस्तान, इराण, सुमात्रा या देशांशी चालत असे. व्यापारी वस्तूमध्ये गहू, बाजरी,

तांदूळ, इतर धान्ये, साखर, कापूस, मसाल्याचे पदार्थ इ. वस्तूंना परदेशात मोठ्या प्रमाणावर मागणी होती. भारतातील आयात वस्तूमध्ये चांदी, घोडे, केशर व निरनिराळे धातू, जरीचे सामान, रेशीम, सोने, चांदी, तांबे, पारा, हिंगुळ, केशर, गुलाबपाणी इ. वस्तूंची आयात केली जात होती. मक्का व एडन येथून सोने, चांदी, तांबे, शिसे, तुरटी इ. वस्तू आयात केल्या जात होत्या. जातिवंत घोडे हे इराक, तुर्कस्थान, बल्ख, येमेन, इराण अरबस्तान इ. देशातून आयात केले जात होते. अशाप्रकारे मुघलकाळात आयातीपेक्षा निर्यात मोठ्या प्रमाणावर केली जात असल्याने भारताची आर्थिक भरभराट झाली होती.

● **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१) .......... शहरात सात प्रकारचे सुती कापड तयार केले जात होते.

अ) लाहोर ब) मुलतान क) हुगळी ड) अलाहाबाद

२) पितळेची भांडी .......... येथे तयार केली जात होती.

अ) आग्रा ब) बनारस क) गाझीपूर ड) लाहोर

३) आग्रा शहरामधून प्रमुख .......... महामार्ग जात होते.

अ) चार ब) पाच क) सहा ड) सात

४) विजयनगर शहरातून .......... मार्ग जात होते.

अ) तीन ब) सात क) बारा ड) पंधरा

५) बनिया हे .......... येथील व्यापारी होते.

अ) कर्नाटक ब) केरळ क) गुजरात ड) तामिळनाडू

६) मुघल काळात .......... प्रकारचे कापड तयार केले जात होते.

अ) २० ब) ३० क) ४० ड) ५०

७) कोलारमध्ये .......... खाणी मोठ्या प्रमाणात होत्या.

अ) हिऱ्याच्या ब) चांदीच्या क) सोन्याच्या ड) लोखंडाच्या

८) जहाज तयार करण्यासाठी .......... झाडाचा वापर केला जात होता.

अ) साग ब) बांबू क) आंबा ड) फणस

९) आग्रा शहरामधून .......... महामार्ग जात होते.

अ) तीन ब) पाच क) सात ड) बारा

१०) शेरशहाने आपल्या काळात .......... सराया बांधल्या.

अ) १५००　　ब) १६००　　क) १७००　　ड) १८००

### ३.३ सारांश :

मुघल सत्तेचा पाया सम्राट बाबर याने घातला असला तरी अकबराने खऱ्या अर्थाने मुघल साम्राज्याचा विस्तार केला. त्यामुळे या साम्राज्यास स्थिरता प्राप्त झाली. संपूर्ण हिंदूस्थानभर पसरलेले हे मुघल साम्राज्याचा राज्यकारभार सुव्यवस्थीतपणे चालावा यासाठी सम्राट अकबराने क्रेंद्रीय प्रशासन, प्रांतीय प्रशासन, जिल्हा प्रशासन व ग्रामीण प्रशासन असे विभाग केले. केंद्रीय प्रशासनाचे सर्वोच्च पद स्वत:कडे ठेवले. तसेच आठ मंत्र्याचे मंडळ बनविले.

अकबराने सत्तेवर येताच जमीन महसुल व्यवस्थेत अमूलाग्र बदल केला. शेरशहाने जी महसुल व्यवस्था अमलात आणली होती. त्यात असणारे दोष दूर करून नवीन जमीन महसुल व्यवस्था प्रस्थापित केली. सम्राट अकबराने जमीन महसुल पद्धतीत चार प्रयोग केले. ते विविध प्रदेशात राबविले. त्याने त्यासाठी राजा तोडरमल या स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक केली. जमिनीची मोजणी बांबूच्या सहाय्याने केली. जमिनीच्या क्षमतेनुसार चार प्रकार पाडले. त्यानुसार जमिनीतून महसुल गोळा केला. पिकाऊ जमिनीतून त्याने १/३ एवढा कर घेतला. सम्राट अकबराने जी जमीन महसुल पद्धती वापरली तिचे मूल्यमापन केले असता असे दिसून येते की, जमिनीची बिनचूक मोजणी, शेतीची वर्गवारी, सारा आकारणी व तिचे कायम स्वरूप, रयतवारी पद्धती व कृषिसंवर्धन इ. होत. या जमीन महसुल पद्धतीचा शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर लाभ झाला. राज्याचाही आर्थिक फायदा होण्यास मदत झाली. अकबराप्रमाणेच निजामशहाचा वजीर मलिक अंबर याने जी जमीन महसुल पद्धत अंमलात आणली तिचाही फायदा शेतकरी व सरकार यांना झालेला पहावयास मिळतो. मलिक अंबरने महसुल योजना राबवत असताना त्याने जमिनीचे सर्वेक्षण न करता केवळ पिकाऊ जमिनीवर कर आकारला. जमिनीचे दोन भागात विभाजन केले. महसुल कराची निश्चिती केली. एकूण उत्पन्नाच्या १/३ एवढा महसुल आकारला. महसुल गोळा करण्यासाठी मध्यस्थ अधिकारी न नेमता थेट सरकारपर्यंत सारा मिळेल अशी व्यवस्था केली.

मध्ययुगीन काळात बलवान साम्राज्याची निर्मिती, सत्ताधिशांनी दिलेले संरक्षण, शांततामय जीवन, नवनवीन शहरांचा उदय झालेला होता. त्यामुळे उद्योग व व्यापारास मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली. भारतात प्राचीन काळापासून खेडी ही स्वयंपूर्ण होती. त्यामुळे खेड्यात अनेक प्रकारचे उद्योगधंदे प्रचलित होते. खेड्यातील प्रमुख व्यवसाय शेती हा होता. त्यामुळे शेतीशी संबंधीत अनेक उद्योगधंदे खेडेगावात अस्तित्वात होते. त्यामुळे सर्व प्रकारच्या वस्तूंचे उत्पादन केले जात होते. यामध्ये अन्नधान्य, कापड व धातूंच्या वस्तू भारत देशात तयार होत असत. या काळात परराष्ट्रीय व्यापारास मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली होती. हा परराष्ट्रीय व्यापार भारतातील पूर्व व पश्चिम किनाऱ्यावरील बंदरातून चालत होता. भारतातून परराष्ट्रीय व्यापारात प्रामुख्याने मलमल, सुती व रेशमी कापड, मसाल्याचे पदार्थ, मौल्यवान रत्ने, अत्तरे, सुगंधी तेले, साखर, विविध प्राण्यांची कातडी इत्यादी वस्तू निर्यात केल्या जात होत्या, तर सोने, चांदी, केशव, घोडे व श्रीमंतांच्या चैनीच्या वस्तू आयात केल्या जात होत्या.

## ३.४ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

झरोका-ए-दर्शन : सम्राट हुजूर महलमधून सकाळी आपल्या प्रजेला दर्शन देतो ती जागा.

काझी : न्यायखात्याचा प्रमुख

सद्र-उस-सदर : धर्ममंत्री

दरोगा-ए-डाकचौकी : पत्रव्यवहार व गुप्तहेर खाते प्रमुख

खालसा : राखीव जमीन.

कोतवाल : पोलीसप्रमुख किंवा नगरप्रमुख

अमलगुजार : जिल्हा अर्थखाते विभाग प्रमुख

शिकदार : तहसिलदार

तकाबी : शेतीसाठी दिले जाणारे कर्ज

पोलाज : उत्तम प्रकारची जमीन.

परौती : मध्यम जमीन

चाचर : कनिष्ठ जमीन

बंजर : पडीक जमीन

बनिया : गुजरातमधील व्यापारी जमात

खुष्कीचा मार्ग : जमीनीचा मार्ग

## ३.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. १**

१) बाबर
२) सम्राट
३) वजीर
४) मुहतसिब
५) सुभेदार
६) ८
७) दिवाण
८) मीरबक्षी
९) अमलगुजार किंवा जिल्हा दिवाण
१०) पाटील

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. २**

१) ५
२) गुराज
३) १/३

४) २ ५) पाटील ६) बांबू

७) रयतवारी पद्धत ८) राजा तोडरमल ९) मलिक अंबर

९) १/३

**स्वयं अध्ययन प्रश्न क्र. ३**

१) लाहोर २) बनारस ३) पाच

४) सात ५) गुजरात ६) ५०

७) सोन्याच्या ८) साग ९) पाच

१०) १७००

## ३.६ सरावासाठी स्वाध्याय

**अ) टिपा लिहा :**

१) सरकार प्रशासन

२) परगणा प्रशासन

३) ग्राम प्रशासन

४) मलिक अंबरची जमीन महसुल व्यवस्था

५) मुघलकालीन अंतर्गत व्यापार

६) मुघलकालीन परराष्ट्रीय व्यापार

**ब) दिर्घोत्तरी प्रश्न :**

१) अकबराची केंद्रीय प्रशासन व्यवस्था स्पष्ट करा.

२) अकबराची प्रांतीय प्रशासन व्यवस्था स्पष्ट करा.

३) अकबराच्या काळातील जमीन महसुल व्यवस्था कशी होती ते सांगा.

४) मुघलकालीन अंतर्गत व्यापार स्पष्ट करा.

५) मुघलकालीन परराष्ट्रीय व्यापाराची माहिती लिहा.

## ३.७ संदर्भ ग्रंथ :

१) कोलारकर, श. गो., मध्ययुगीन भारताचा इतिहास (१२०६-१७०७), श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर, १९९४

२) मूरलँड, डब्ल्यू. एच्. (अनु.), अकबरकालीन हिंदुस्थान, ICHR, डायमंड प्रकाशन, पुणे, २००६.

३) चिटणीस, के. एन्., मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, खंड १ ते ४, पुणे, १९८२

४) सिद्धीकी, एन. ए., मोगलकालीन महसुल पद्धती, ICHR, डायमंड प्रकाशन, पुणे, २००६.

५) बारगळ व ढवळे, मध्यकालीन भारत, विद्या प्रकाशन, नागपूर, १९८७.

६) Satish Chandra, History of Medieval India (800-1700), Orient Longman, Hyderabad, 2007

७) B. G. Tamaskar, The Life and Work of Malik Ambar, Idarah - I, Adabiyat-I, Delhi, 1978.

❖❖❖

## घटक – ४

# धर्म, समाज आणि संस्कृती

**अनुक्रमणिका :**


४.० उद्दिष्टे

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

४.२.१ धार्मिक धोरण : अकबर व औरंगजेब.

४.२.२ समाज : हिंदू व मुस्लिम.

४.२.३ स्थापत्य : मुघल व आदिलशाही

४.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ.

४.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे.

४.५ सरावासाठी स्वाध्याय.

४.६ सारांश.

४.७ अधिक वाचनासाठी पुस्तके.


### ४.० उद्दिष्टे :

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास खालील घटक स्पष्ट करता येतील.

- मुघल बादशहा अकबर व औरंगजेब यांच्या धोरणाची सविस्तर माहिती सांगता येईल.
- तत्कालीन हिंदू व मुस्लिम समाजाचे सर्वांगिण चित्र स्पष्ट करता येईल.
- मुघल व आदिलशाही स्थापत्याची वैशिष्ट्ये समजावून घेता येतील.

मुघल व आदिलशाही स्थापत्य शास्त्राची माहिती सांगता येईल.

### ८.१ प्रास्ताविक :

बाबराने भारतात मुघल सत्तेची स्थापना केली. त्याचा पुत्र हुमायूनाने मुघल राज्य स्थिरस्थावर करण्यास फारशी उसंत मिळाली नाही. त्यानंतर राज्यारोहण केल्यानंतर साम्राज्याविस्तार व राज्य सुरळीतपणे चालविण्याकरिता

उदारमतवादी धार्मिक धोरणाचा पुरस्कार केला. बालपणापासूनच त्याच्यावर उदार विचारांचा प्रभाव होता, त्याचप्रमाणे तो स्वतः चिकित्सक वृत्तीचा होता. अकबराने सहिष्णू धार्मिक धोरणाचा अवलंब करून हिंदूवर लादलेले अपमानास्पद कर रद्द केले, राजपुतांशी मैत्रीचे धोरण स्विकारले, जात-धर्म-पंथ यानुसार भेदभाव न करता गुणवत्तेनुसार नेमणूका केल्या. इबादतखान्यात सर्व धर्मियांना प्रवेश देऊन त्या-त्या धर्माची मुलतत्वे व स्वरूप जाणून घेतले. अकबराच्या धोरणामुळे धार्मिक सलोखा निर्माण होण्यास मदत झाली, हिंदू-मुस्लिम ऐक्याचे नवे पर्व सुरू झाले.

औरंगजेबाने मात्र अतिरेकी धर्मवेडेपणाचे धोरण स्विकारून इस्लाम धर्मप्रसारावर भर दिला. स्वतः कट्टर सुन्नी पंथीय असणाऱ्या औरंगजेबाने इस्लाम धर्म स्विकारणाऱ्यांना सोई-सवलती, नोकऱ्या दिल्या, अकबराने बंद केलेला जिझिया सारखा अपमानास्पद कर हिंदूवर पुन्हा लादला, मंदिरे पाडून मूर्तीभंजन केले. मुस्लिमेतर धर्मियांवर लादलेल्या अनेक बंधनामुळे व नियंत्रणामुळे त्याचा हिंदू, शीख, ख्रिश्चन धर्मियांबरोबरच इस्लाम धर्मातील शिया पंथीयांशी देखील तीव्र संघर्ष झाला. औरंगजेबाचे असहिष्णू धोरणच मुघल साम्राज्याच्या पतनास कारणीभूत ठरले.

इस्लाम धर्मात सर्व समान मानली जातात पण भारतात मुस्लिम सत्ता स्थापन झाल्यावर अनेक वर्ग तयार झाले. त्यांची विभागणी सर्वसाधारणपणे दोन वर्गात केली जाते. हे वर्ग त्यांच्या हुद्यांवरूण ढोबळमनाने दोन वर्ग पाडले ते म्हणजे अहल-ए-दौलत व अहल-ए-सादत हे होय. हिंदू व मुस्लिम समाजातील स्त्रियांच्या स्थानामध्ये फारसा फरक नव्हता. समाजात व कुटूंबामध्ये स्त्रिला दुय्यम स्थान होते. त्याचप्रमाणे दोन्ही समाजामध्ये गुलामगिरीची प्रथा पूर्वीपासूनच अस्तित्वात होती.

मुघल राज्यकर्त्यांना स्थापत्याची आवड असल्याने या कालखंडात स्थापत्यकलेचा मोठ्या प्रमाणात विकास झाला. मकबरे, मशिदी, किल्ले, महाल इ. अनेक भव्य, कलात्मक वास्तूंची उभारणी या कालखंडात झाली. भारतीय व पर्शियन शैलीच्या वैशिष्ट्यांचा मिलाप होऊन स्थापत्यशैलीत इंडो-पर्शियन शैली विकसित झाली. आदिलशाही सुलतानांनी देखील अनेक कलात्मक वास्तूंची उभारणी केली.

## ८.२. विषय विवेचन :

### ८.२.१ धार्मिक धोरण : अकबर व औरंगजेब :

#### अ) अकबराचे धार्मिक धोरण :

अकबराने कालानौर येथे १४ फेब्रुवारी १५५६ रोजी राज्यारोहण केल्यानंतर त्याने अवलंबिलेल्या उदार धार्मिक धोरणामुळे राज्यविस्तार करण्यात त्याला यश मिळाले. हिंदूस्थानमध्ये अनेक धर्म व संप्रदाय असल्याने एका विशिष्ट धर्माचा पुरस्कार करून राज्य चालविणे अवघड असल्याने सर्वसमावेशक धोरण अकबराने स्विकारले. राज्य व धर्म यांच्यात फारकत करून जात, धर्म, संप्रदाय असा भेदभाव न करता गुणवत्तेनुसार राज्यकारभारात संधी दिल्या. राजपुतांप्रती उदार धोरणाचा पुरस्कार करून साम्राज्यविस्ताराकरिता त्यांचा उपयोग करून घेतला. जिझियासारखे धार्मिक भेदभाव करणारे कर रद्द केले. त्याचप्रमाणे महजर प्रसिद्ध करून धार्मिक प्रश्नांबाबत अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार स्वतःकडे घेऊन धर्मपंडितांचा प्रभाव कमी केला. हिंदू-मुस्लिमांच्यामध्ये सलोखा निर्माण

करून साम्राज्य स्थिर व बळकट केले. सर्व धर्मियांना त्यांच्या धर्मानुसार आचरण करण्याचे स्वातंत्र्य देणारा व सर्व धर्मसमभाव राज्यकारभार स्वतःही आचरणात आणणारा अकबर हा सहिष्णू राज्यकर्ता होता.

ब) **अकबराच्या धार्मिक धोरणाची पार्श्वभूमी :**

अकबर बादशहाला बालपणापासूनच धर्माचे सत्य जाणून घेण्याची जिज्ञासा होती. त्याच्यावर उदारमतवादी विचारांचा त्याच्यावर प्रभाव होता. अकबर स्वत: धर्म आणि आध्यात्म याबद्दल चिंतन करत असे. वडिल हुमायून हे सुन्नी पंथीय होते. त्यांच्यातील दार्शनिक उदारता आणि दानशूरतेचा वारसा अकबराला मिळाला होता. अकबराची आई हमीदाबानू ही शियापंथीय होती. त्याचे गुरू अब्दुल लतीफ व पालक बैरामखान हे देखील शिया पंथीय होते. अकबराबर शेख मुबारक आणि त्यांचे दोन पुत्र अबुल फैजी, अबुल फजाल यांच्या पुरोगामी विचारांचा ही प्रभाव होता. सुफी संप्रदायाच्या तत्वज्ञानाचाही त्याच्यावर प्रभाव होता. लहानपणापासून चिकित्सक वृत्ती असणाऱ्या अकबराने अनेक बाबींवर चिंतन करून उदार धार्मिक धोरणाचा स्विकार केला. आपल्या साम्राज्यात त्याचा अवलंब केला. इ. स. १५६२ मध्ये अकबराने युद्धकैद्यांना गुलाम बनविण्याची प्रथा बंद करण्याचे आदेश दिले. अशा रितीने गुलामांचे सक्तीने होणारे धर्मांतर थांबविण्याची त्याने दिलेली आज्ञा म्हणजे उदार धार्मिक धोरण राबविण्याची सुरूवात होय. पुढे इबादतखान्याची उभारणी करून सुरूवातीस इस्लाम धर्म पंडितांशी व नंतर सर्व धर्मातील पंडित-विद्वानांशी चर्चा करून अंतिमतः 'दीन-ए-इलाही' या धर्माची केलेली स्थापना यातून अकबराच्या सर्वसमावेशक उदार धार्मिक धोरणाची प्रचिती येते.

अकबराच्या धार्मिक धोरणाची चर्चा करताना येथे बहुसंख्येने असणाऱ्या हिंदूप्रती त्याने अवलंबिलेल्या धोरणाचा आढावा घेणे महत्वाचे आहे. सम्राट अकबराने हिंदूप्रती खालील निर्णय घेतले.

**क) हिंदूप्रती उदार धार्मिक धोरणाचा पुरस्कार करून घेतलेले निर्णय** :

अकबर राजपूतांशी वैवाहिक नातेसंबंध प्रस्थापित करून रक्तसंबंध निर्माण केले. इ. स. १५६२ मध्ये राजपूत राजा बिहारीमलची कन्या जोधाबाई हिच्याशी अकबराने विवाह केला. राजपूतांना दरबारात मानाच्या जागा व मनसबदारी देऊन त्यांच्याशी मैत्रीपूर्ण धोरण स्विकारले यामुळे साम्राज्यविस्ताराकरिता राजपूतांच्या शौर्याचा व निष्ठेचा उपयोग झाला.

हिंदूना द्यावा लागणारा तिर्थयात्रा कर इ. स. १५६३ साली रद्द केला. त्याचप्रमाणे हिंदूची मानखंडना करणारा जिझिया कर इ. स. १५६४ साली रद्द केल्याने अकबरास हिंदू प्रजेमध्ये लोकप्रियता मिळाली. हिंदूना धार्मिक स्वातंत्र्य देऊन त्यांचे सण-उत्सव करण्याची परवानगी दिली. अकबराने दरबाराच्या वतीने रक्षाबंधन, वसंतोत्सव, दसरा, महाशिवरात्र हे सण साजरे करण्यास सुरूवात केली. तो स्वतः या सण-उत्सवात सहभागी होत असे. सर्व धर्मियांना त्यांचे श्रद्धास्थान असणारी प्रार्थना मंदीरे बांधण्याची परवानगी देण्यात आली. त्यानुसार अनेक मंदीरांची उभारणी करण्यात आली.

राज्यकारभार करत असताना अकबराने प्रशासनात जात, धर्म, पंथ, संप्रदाय असा भेदभाव न करता गुणवत्ता व कर्तबगारी नुसार नोकऱ्या दिल्या. राजा मानसिंग, राजा भगवानदास, राजा तोडरमल इ.ना उच्चपदे बहाल केली.

सर्वांना समान संधीचे धोरण अवलंबिल्याने बुद्धिमान हुशार व कर्तबगार व्यक्ति पुढे आल्या. अकबराने आपल्या अनुपस्थितीत राजा भारमल याला दिल्लीचे प्रशासन सांभाळण्यासाठी नियुक्त केल्याचे उदाहरण ही अकबराच्या उदार धार्मिक धोरणाची साक्ष देते.

अकबराने सक्तीच्या धर्मांतरावर बंदी तर घातलीच पण त्यांना स्वधर्मात परत जाण्याची परवानगी देणारा वटहुकूम काढला. त्याचप्रमाणे गुलामांच्या खरेदी विक्रीवर कडक निर्बंध घालून गुलामगिरी प्रथेला पायबंद घातला. हिंदू धर्माचे ज्ञान व धर्मग्रंथांची माहिती सर्वांना व्हावी या उदार हेतूने त्याने रामायण, महाभारत, हरिवंश, योगवशिष्ट या हिंदू ग्रंथांचे भाषांतर फारसी भाषेत करवून घेतले. याकरिता सम्राट अकबराने स्वतंत्र भाषांतर विभागही स्थापन केला होता. गाय ही हिंदूधर्मात पवित्र मानली जात असल्याने गोहत्येस बंदी घालण्यात आली.

अशारितीने सम्राट अकबराने हिंदूप्रती सहिष्णू धार्मिक धोरणाचा पुरस्कार करून हिंदू प्रजेमध्ये आदराचे स्थान व लोकप्रियता मिळविली आणि राज्य कारभार सुरळितपणे चालविण्यासाठी त्यांचे सहकार्यही प्राप्त केले.

**ड) अकबराच्या धार्मिक कल्पना व विचार :**

अकबर बादशहा अशिक्षित असला तरी तो जिज्ञासू होता. एखाद्या बाबींवर सारासार विचार करून निर्णय घेणे त्यास आवडत होते. धर्माचे खरे स्वरूप व मुलतत्वे जाणून घेण्याची त्याची इच्छा होती. यासाठी इ. स. १५७५ मध्ये सम्राट अकबराने फत्तेपूरसिक्री येथे इबादतखान्याची उभारणी केली व या ठिकाणी बादशहा स्वतः दर गुरूवारी संध्याकाळी व शुक्रवारी संपूर्ण दिवसभर उपस्थित राहत असे. प्रारंभीच्या काळात या इबादतखान्यात शेख, सय्यद यांना प्रवेश होता. इबादतखान्यात धार्मिक चर्चेसाठी येणाऱ्या इस्लाम धर्मपंडितांत दोन वर्ग होते एक कट्टर सनातन विचारांचा व दुसरा पुरोगामी विचारांचा. सनातनी वर्गातर्फे अबुल फजल व मुबारक हैजी हे भाग घेत. इबादतखान्यातील दोन गटांमध्ये झालेला वादविवाद ऐकून दोन्ही गटांतील मतभेद पाहून अकबराचा इस्लाम धर्म–मार्तंडावरचा विश्वास नष्ट झाला. त्याला इतर धर्मियांची मते जाणून घ्यावे असे वाटू लागले. इतर धर्मांचे तत्वज्ञान जाणून घेण्याची जिज्ञासा अकबराच्या मनात जागृत झाली.

**इ) इबादतखान्यात सर्वधर्मियांना प्रवेश व चर्चा :**

इस्लाम धर्मातील पायाभूत तत्वाबाबत एकमत होत नाही हे पाहून अकबराने सर्व धर्म पंडितांना इ. स. १५७८ मध्ये इबादतखान्यात चर्चेसाठी बोलविण्यात आले. यामध्ये हिंदू धर्मातर्फे पुरूषोत्तम आणि देवी, जैन धर्माच्या वतीने हिरा, विजय सुरी, जिनचंद्र तर पारसी धर्मियांच्यावतीने दस्तुर मेहरजी राणा इत्यादी धर्मपंडित चर्चेसाठी आले. इ. स. १५७९ मध्ये गोव्याच्या धर्मगुरूंनाही चर्चेसाठी इबादतखान्यात आमंत्रित करण्यात आले.

अकबर बादशहाने या सर्व धर्मगुरूंच्याकडून आपापल्या धर्माची मुलतत्वे जाणून घेतली अकबराची ग्रहणशक्ती प्रचंड होती. सर्व धर्मातील सार व सत्य एकत्र आणून त्यांना एका सूत्रामध्ये आणण्याची आवश्यकता अकबरास वाटू लागली. भारतात अनेक धर्म असल्यामुळे राज्यवृद्धीसाठी या सर्वांना बरोबर घेऊन जाणे अकबरास आवश्यक वाटू लागले. तसेच इस्लाम धर्मातील अधिकाराबाबत ठोस निर्णय घेण्याची निकड वाटू लागली. या विचारातूनच अकबराने महजर घोषीत केला.

**ई) सम्राट अकबर महजरद्वारे इस्लाम धर्माचा सर्वोच्य काझी बनला :**

राज्यसत्तेवर वर्चस्व ठेवू पाहणाऱ्या इस्लाम धर्मगुरूंना शह देण्याचा विचार अकबराने केला. त्याने ९ मे १५७९ रोजी फत्तेपूरविक्री येथील धर्मगुरूस पदच्यूत करून स्वतःकडे सर्वोच्च धर्मप्रमुख म्हणून अधिकार घेतले. सम्राट अकबरास उलेमांचा प्रभाव कमी करून आपल्या हाती धार्मिक सत्ता घ्यावयाची होती. अबुल फझल व अबुल फैझी यांचे वडील शेख मुबारक यांना महजर (उद्‌घोषणा) तयार करण्यास सांगितले. सप्टेंबर १५७९ मध्ये इस्लाम धर्मातील वादविवादाबाबत अकबरास अंतिम अधिकार देण्याचा निर्णय घेऊन या महजरवर सर्व प्रमुख इस्लाम धर्मगुरूंच्या सह्या घेण्यात आल्या. या महजरला 'धार्मिक अत्युच्च अधिकाराचा हुकूम' असेही संबोधले जाते.

अकबराच्या 'खुतबा' वाचनामुळे व 'महजर'च्या घोषणेमुळे उलेमावर्ग असंतुष्ट झाला. इस्लाम धर्म धोक्यात आणण्याचा बादशहाचा हेतू आहे अशी उघड टीका ते करू लागले, बादशहाने सुन्नी पंथ सोडून शिया पंथचा स्विकार केला आहे, अशा प्रकारची टीकाही होऊ लागली. अकबराने या सर्व मतांचे खंडन केले. अबुल फजल म्हणतो की, ''बादशहावर होणारे आरोप हे निराधार असून बादशहाने इस्लाम धर्माचा कोणत्याही प्रकारे अनादर केला नाही.'' व्ही. ए. स्मिथ यांच्या मते, ''या महजरामुळे अकबर इस्लाम धर्माचा सर्वोच्च धर्मगुरू बनला. त्याच्या हाती राजसत्ता आणि धर्मसत्ता केंद्रित झाल्या.''

**फ) सुलह –इ–कुलची संकल्पना :**

'सुलह–ए–कुल' म्हणजे सर्वांशी सलोखा, सर्व धर्म मैत्री होय. सुफी संत ख्याजा मोईनुद्दीन चिश्ती याने सुलह–ए–कुल म्हणजेच सर्व धर्म मैत्रीची प्रतिपादन केलेली संकल्पना अकबराने आपल्या धार्मिक धोरणात आमलांत आणली. कट्टर व कडव्या धार्मिकतेला फाटा देऊन समन्वयवादी, सलोखा निर्माण करण्याऱ्या धार्मिक धोरणाचा पुरस्कार केला. इस्लाम धर्मांतर्गत असणारे वाद मिटावेत, धर्माधर्मात सलोखा निर्माणव्हावा, सर्व धर्मांचे तत्वज्ञान समजून घ्यावे याकरिता अकबराने इबादतखान्यात सर्वधर्मियांना चर्चेसाठी आमंत्रित केले. सर्व धर्मातील मुलतत्वे एकत्र आणून त्यांच्यात एकवाक्यता निर्माण करण्याची अकबराला आवश्यकता वाटू लागली. यातूनच 'दीन–ए–इलाही' या नवीन धर्माची अकबराने स्थापना केली.

१) **दीन–ए–इलाही :**

दीन–ए–इलाही हा धर्म नसून ती एक विचारधारा होती जिला कोणत्याही धर्माचे अनुयाची स्विकारू शकत होते. इबादतखान्यात सर्व धर्मीयांचे विचार ऐकून अकबराच्या मनामध्ये सर्वमान्य अशा एखाद्या नव्या धर्माची कल्पना आली. सर्व धर्मातील उत्कृष्ट तत्वे एकत्र केली तर संपूर्ण मानवजातीचे कल्याण होईल. भारतातील हिंदू आणि मुस्लिम हे दोन प्रमुख धर्म एकत्र येतील. भारतात बहुसंख्य हिंदू असल्याने इस्लाम हा राष्ट्रधर्म होऊ शकत नाही. याची जाणीव अकबराला होती. साम्राज्यात अनेक गट असणे ही राज्याच्या हिताचे नव्हते म्हणून इ. स. १५८२ मध्ये काबूलच्या स्वारीवरून परत आल्यावर सम्राट अकबराने आपले सर्व सरदार, अधिकारी विविध धर्मांचे प्रमुख यांना एकत्र बोलावून सर्वांना एकाच धर्मछत्राखाली आणण्याचा आपला मनोदय स्पष्ट केला व 'दीन–ए–

इलाही' या नवीन धर्माची घोषणा केली. या धर्माची आचारसंहिता सहजपणे सर्वांना आचरणात आणता येईल अशी होती. या नवीन धर्मानुसार ईश्वर हा एक असून अकबर हा त्याचा प्रेषित आहे असे समजण्यात आले होते.

**२) दीन-ए-एलाहीची वैशिष्ट्ये :**

१) दीन-ए-इलाही हा स्वतंत्र धर्म नसून सर्व धर्मांतील तत्वे एकत्र आणून तयार केलेला तौलनिक धर्म होय.

२) या धर्माचा संस्थापक हा कोणी ज्ञानप्राप्ती झालेला साधू-संन्यासी नव्हता, तर स्वतः अकबर या धर्माचा निर्माता होता.

३) हा धर्म प्रचारावर भर देणारा नव्हता. अकबराने धर्मप्रसारासाठी सत्तेचा उपयोग केला नाही आणि धर्म स्विकारण्याऱ्या लोकांना कोणत्याही सोई-सवलती दिल्या नाहीत.

४) या धर्माचे सभासद एकमेकांना अभिवादन करताना 'अल्ला हो अकबर' (ईश्वर महान आहे) आणि 'जल्ले जल्लालहू' ( मी त्याचा सेवक आहे) असे म्हणत.

५) हा धर्म स्विकारणाऱ्या व्यक्तीस अबुल फजल राजासमोर नेत असे. त्या व्यक्तीस राजाच्या चरणावर नतमस्तक व्हावे लागे. मग बादशहा त्याच्या डोक्यावर शिरस्त्राण (पागोटे) ठेवी व काही प्रसंगी अंगठीही देण्यात येई. पागोटे व अंगठी यावर 'अल्ला हो अकबर' हे शब्द कोरलेले असत.

**३) दीन-ए-एलाही धर्माची मुलतत्वे व आचारसंहिता :**

'दीन-ए-एलाही' या धर्माचे सिद्धांत(तत्वज्ञान) सर्वसामान्यांना समजतील असे होते व आचरण्यासही सोपे होते. अबूल-फझलच्या 'दीन-ए-अकबरी' या ग्रंथामध्ये दीन-ए-एलाही' या ग्रंथाचे स्वरूप देण्यात आले आले. त्यानुसार या धर्माची तत्वे व आचारसंहिता :-

१) ईश्वर एकच असून अकबर हा त्याचा प्रेषित आहे.

२) या धर्माच्या सभासदांनी एकमेकांस अभिवादन करताना 'अल्ला हो अकबर' व 'जल्ले जल्लालहू' असे म्हणावे.

३) सुर्य व अग्नी या देवतांची उपासना करावी.

४) या धर्माच्या अनुयायांनी सकाळ, दुपारी व संध्याकाळी प्रार्थना करावी.

५) अकबर हा धर्माचा प्रेषित असल्याने त्याच्यासमोर अनुयायांनी नतमस्तक व्हावे.

६) रविवारचा दिवस पवित्र मानावा.

७) १६ वर्षापूर्वी मुलाचा आणि १४ वर्षापूर्वी मुलीचा विवाह करू नये.

८) वृद्ध स्त्रिया व अज्ञान मुलींशी विवाह करू नयेत.

९) धर्माचा अंगीकार करणाऱ्या सदस्यांनी शक्यतो मांसाहार टाळावा. जन्म झालेल्या महिन्यात तो पूर्णपणे वर्ज्य करावा.

१०) वाढदिवसाच्या प्रसंगी मोठी मेजवानी द्यावी. तसेच दानधर्म करावा.

११) या धर्माच्या अनुयायांकडे उदारता, क्षमाशिलता व परोपकारीवृत्ती असावी. इतर धर्मबांधवांशी सौजन्याने वागावे.

बदायुनीच्या मतानुसार 'दीन-ए-इलाही' धर्म अनुयायांच्या चार श्रेणी करण्यात आल्या.

१) सम्राटाकरिता आपली संपत्ती अर्पण करणारी पहिली श्रेणी.

२) सम्राटाकरिता आपली संपत्ती व जिवीत दान करणारी दुसरी श्रेणी.

३) सम्राटाकरिता आपली संपत्ती, जिवीत व प्रतिष्ठा अर्पण करणारी तिसरी श्रेणी.

४) सम्राटाकरिता संपत्ती, जिवीत, प्रतिष्ठा व धर्म दान करणारी चौथी श्रेणी. अशा एकंदर चार श्रेण्या करण्यात आल्या.

सर्वधर्मातील उदात्त व तत्त्वाद्वारे निर्मिलेला हा धर्म तलवारीच्या जोरावर धर्मविस्तार करण्याची कल्पनाही अकबरास पटणारी नव्हती. त्यामुळे कोणावरही या धर्माची सक्ती करण्यात आली नाही. सम्राट अशोकाप्रमाणे राज्ययंत्रणेद्वारे धर्मप्रसार बादशहास शक्य होता पण तसा प्रयत्न त्याने केला नाही. अबुल फझलच्या अकाली मृत्यूमुळे अकबराचा उत्साह मावळला आणि बादशहाच्या मृत्यूबरोबरच दीन-ए-इलहीचाही लोप झाला.

**४) 'दीन -ए-इलाही'या धर्माबाबत विचारवंतांची मते :**

प्रो. एस. आर. शर्मा म्हणतात की, ''दीन-ए-इलाहीला नवीन धर्माची सज्ञा देणे चूक ठरेल. कारण या धर्माचा ना कोणता पवित्र ग्रंथ ना कोणी प्रेषित. अकबराच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने करण्यात आलेली ही एक अशी व्यवस्था होती की, जिला धर्माचा मुलामा चढविण्यात आला होता.''

डॉ. व्ही. ए. स्मिथ आपल्या "Akbar the Great Mughal" या ग्रंथात म्हणतात की, 'दीन-ए-इलाही' हा धर्म अकबराच्या शहाणपणाचे द्योतक नसून त्याच्या मुर्खपणाचे प्रतीक आहे.'

डॉ. ए. एल श्रीवास्तव यांच्या मते दीन-ए-इलाही अकबराच्या सार्वजनिक सहिष्णूता आणि राष्ट्रीय आदर्शवादाचे प्रतिक होते. एकंदरच सर्व धर्मातील उदात्त तत्वे एकत्र करून सर्वसमावेशक मानवतावादी दृष्टीकोन विकसित करण्याचा उद्देश 'दीन-ए-इलाही'या धर्माच्या स्थापनेमागे होता.

**५) सम्राट अकबराचे इतर धर्मीयांशी संबंध** :

इबादतखान्याच्या माध्यमातून अकबराने सर्व धर्मीयांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला. सर्व धर्मातील उदात्त तत्वांचे एकत्रीकरण करून मानवी कल्याण साधावे हा त्याचा दृष्टीकोण होता आणि म्हणून त्याने सर्व धर्मीयांशी चर्चा, विचारविनिमय केला होता.

**१) अकबर व हिंदू धर्म :**

अकबराची प्रजा ही बहुसंख्य हिंदू होती. ज्यांच्यावर आपण राज्य करतो त्या हिंदू धर्माचे स्वरूप समजून घेण्यासाठी अकबराने पुरूषोत्तम व देवी यांना चर्चेसाठी इबादतखान्यात बोलाविले. अनेक राजपूत राजकन्यांशी त्याचे विवाह झाले होते. त्या राण्यांना त्यांच्या धर्माप्रमाणे पूजा-अर्चा करण्यास परवानगी देण्यात आली होती. त्याने रक्षाबंधन, दसरा, दिवाळी इत्यादी हिंदू समारंभ साजरे करण्यास सुरूवात केली. गोहत्येवर निर्बंध आणले. एवढेच नव्हे तर अकबराने आपल्या आईच्या मृत्यूनंतर डोक्याचे मुंडन केले होते.

**२) अकबर व शीख धर्म :**

शीख गुरू रामदास, गुरू आमरदास, गुरू अर्जुनसिंग यांच्याबरोबर अकबराचा घनिष्ठ संबंध होता. गुरू अर्जुनसिंग यांच्या कार्याने अकबर प्रभावित झाला होता. यातूनच त्यास 'ग्रंथसाहेब' या शिखांच्या पवित्र ग्रंथाबद्दल आदर निर्माण झाला. अकबर ज्या ज्या वेळी पंजाबमध्ये जाई त्या त्या वेळी तो शीख धर्मगुरूंची भेट घेत असे व विचारविनिमय करत असे. शीख धर्मगुरूंच्या प्रभावाने अकबराने पंजाबमध्ये एक वर्ष शेतसारा माफ केला होता.

**३) अकबर व ख्रिश्चन धर्म :**

इ. स. १४९८ मध्ये पोर्तुगीजांनी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर आपल्या वखारी स्थापन केल्या. गोवा हे त्यांच्या व्यापाराचे केंद्र असले तरी इतर अनेक ठिकाणी त्यांनी आपला प्रभाव निर्माण केला. गुजरातमधून मक्केला जाणाऱ्या यात्रेकरूंना पोर्तुगीजांनी उपद्रव देऊ नये यासाठी अकबराने त्यांच्याशी मैत्रीचा करार केला. अकबराने इबादखान्यात सर्व धर्मियांशी विचारविनिमय सुरू केला. इ. स. १५७९ मध्ये गोव्याच्या पोर्तुगीजांना धर्मिक चर्चेसाठी बोलविण्यात आले. जेसुईट धर्मगुरूंना अकबराचे मतपरिवर्तन करण्यात यश आले नाही. यामुळे इ. स. १५९० मध्ये जेसुईट धर्मगुरूंचे दुसरे शिष्टमंडळ चर्चेसाठी आले आणि इ. स. १५९४ मध्ये जेसुईट धर्मगुरूंचे तिसरे शिष्टमंडळ अकबराबरोबर चर्चेसाठी आले. जेसुईटांनी अकबरास ख्रिस्ती धर्माची दीक्षा देण्याचा प्रयत्न चालविला होता. त्यात त्यांना यश मिळाले नाही. मात्र पोर्तुगीजांना ख्रिस्ती धर्म स्विकारण्याबाबत मोकळीक मिळाली.

**४) अकबर व जैन धर्म :**

अकबर बादशहाने इ. स. १५८२ मध्ये जैन धर्मगुरूंना निमंत्रित केलेले होते. यानुसार इबादतखान्यात होणाऱ्या चर्चेसाठी हिरा विजय सुरी आले होते. जैन धर्मामधील अहिंसा या तत्वाचा प्रभाव अकबरावर पडला. हिरा विजय सुरी, विजय सेन सुरी, जिनचंद्र या जैन धर्मगुरूंच्या व्रतस्थ जीवनाचा प्रभाव अकबरावर पडला. यानंतर अकबराने मांस खाणे वर्ज्य केले व पशुपक्षांची हत्या करणेही सोडून दिले. एवढेच नव्हेतर जैन धर्मियांच्या अहिंसेच्या प्रभावामुळे खाटिकखाने बंद केले. शिकार करण्यास मनाई करण्यात आली व त्यानेही शिकार करणे सोडून दिले.

**५) अकबर व पारशी धर्म :**

अकबराने धार्मिक चर्चेसाठी पारशी धर्मगुरू दस्तूर मेहरजी राणा यांना बोलाविले होते. अकबर आणि दस्तूर

मेहरजी राणा यांच्यात झालेल्या चर्चेत पारशी धर्माचा प्रभाव अकबरावर पाडण्यात त्यांना यश आले व पारशी धर्म तत्वज्ञानात सांगितल्याप्रमाणे अकबराने सुर्य, प्रकाश आणि अग्नी यांची पूजा करावयास सुरूवात केली. आपल्या महालात अखंड अग्नी प्रज्वलन यज्ञ सुरू केला. त्याचबरोबर पारशी धर्मगुरू दस्तूर मेहरजी राणा यास २०० बिघे जमीन दान देऊन सम्राट अकबराने त्यांना सन्मानित केले.

**६) अकबर आणि इस्लाम धर्म :**

अकबर हा इस्लाम धर्मातील सुन्नी पंथाचा होता. परंतु त्याची आई, गुरू, पालक या शिया पंथीयांच्यामुळे अकबराचा कल हा उदारमतवादाकडे वाढू लागला. त्याने इस्लामच्या कायद्यात काही बदल केले. त्यात विवाह व घटस्फोटाबाबतच्या त्याच्या सुधारणा महत्त्वपूर्ण होत्या. मुस्लिमांना चार विवाह करण्याची मान्यता असली तरी एकच विवाह करावा. चुलत, मावस अशा नातेसंबंधात विवाह करू नये. विवाहसाठी मुलाला १६ वर्षे व मुलीस १४ वर्षे ही वयोमर्यादा घालून देण्यात आली. सम्राट अकबराने आपल्या समान कायदा व समान न्याय यांचा विचार करून इस्लामी कायद्यात काही बदल घडवून आणले.

अशाप्रकारे सम्राट अकबराने अनेक धर्मातील वरिष्ठांशी चर्चा करून त्यांच्याकडून काही महत्वपूर्ण गोष्टी घेतल्या, मात्र कोणत्याही धर्माचे वर्चस्व अकबराने आपणावर लादून घेतले नाही.

● **अकबराच्या धार्मिक धोरणाचे महत्त्व :**

अकबर बादशहाच्या धार्मिक धोरणामुळे सामाजिक ऐक्याचे नवे पर्व सुरू झाले. हिंदू मुस्लीम यांच्यातील दरी कमी होण्यास मदत झाली. अकबराने आपल्या प्रशासनात धर्म, पंथ, जात असा भेदभाव केला नाही. व्यक्तीच्या गुणवत्तेनुसार निवडीचे धोरण त्यांनी अंगीकारले अनेक धर्मांतील उदात्त तत्वे एकत्र आणून 'दीन-ए-इलाही' या धर्माची स्थापना केली. याबाबत स्टॅन्ले लेनपूल म्हणतो की, 'दीन-ए-इलाही' ने हिंदू-मुस्लिमांमध्ये एकतेची भावना निर्माण करूण एक राष्ट्रीयत्वाच्या भावनेस जन्म दिला. 'सुलह-ए-कुल' संकल्पनेचा स्विकार करून हिंदूचे सहकार्य आणि निष्ठा प्राप्त केल्या. सम्राट अकबराने राबविलेल्या विविध उदार ध्येयधोरणामुळे धार्मिक सलोखा प्रस्थापित होण्यास सुरूवात झाली.

**ब) औरंगजेबाचे धार्मिक धोरण :**

अकबराने उदार धार्मिक धोरणाचा पुरस्कार केला. जहांगिरानेही आपल्या वडिलांच्या धोरणाचा अवलंब करित राज्यव्यवस्थेत हिंदूना समाविष्ट करून घेतले. पुढील काळात मात्र जहांगिराच्या धार्मिक धोरणात बदल होऊन तो कट्टर इस्लाम धर्मीय बनला. शहानजहानही अकबराच्या उदारमतवादी धोरणापासून दूर जात इस्लामचा पुरस्कर्ता झाला.

औरंगजेब कट्टर सुन्नीपंथीय होता. त्याला इस्लामच्या सिद्धांतानुसार राज्य करायचे होते आणि कुराण त्याच्या राज्यव्यवस्थेचा आधार होता. त्यानुसार इस्लामचा प्रचार करणे हे तो त्याचे कर्तव्य मानत असे. औरंगजेबाने प्रशासनातील आपल्या पूर्वजांच्या सहिष्णू धोरणाच्या विरोधी धोरण स्विकारले. कडव्या असहिष्णू धोरणाचा अवलंब केल्याने मुघल साम्राज्याच्या पतनास सुरूवात झाली. राज्य आणि धर्म एकत्र करून त्याने राज्याचा वापर

इस्लामच्या प्रसाराकरिता केला. इ. स. १६४४ मध्ये गुजरातचा सुभेदार असताना त्याने चिंतामणी मंदीराचा विध्वंस केला होता. व्ही. ए. स्मिथ यांच्यामते औरंगजेबाला धर्माधिष्ठित राज्यस्थापन करावयाचे होते. औरंगजेबाच्या असहिष्णू धार्मिक धोरणामुळे त्याचे इतर धर्मियांशी संघर्ष झाले, बंडे उद्‌भवली. राजसत्ता व धर्मसत्ता औरंगजेबाने एकत्र केल्याने राजसत्तेचा वापर सक्तीने इतर धर्मियांनां इस्लाम धर्म स्विकारावयास लावण्याचे धोरण मुघल साम्राज्याच्या ऱ्हासास कारणीभूत ठरले. दर-उल-हर्बला दर-उल-इस्लाम मध्ये परिवर्तित करणे त्याने आपले परमकर्तव्य मानले.

**अ) औरंगजेब व हिंदू धर्म :**

औरंगजेबाने हिंदू धर्म व हिंदू जनतेवर अन्याय केले. त्याने इ. स.१६५९ मध्ये बनारस येथील पुजाऱ्यास सांगितले होते की त्याचा धर्म नवीन मंदीरे बांधण्यास व जुनी मंदीरे नष्ट करण्यास परवानगी देत नाही. परंतु त्याने असे केले नाही. पुढे जावून अनेक मंदिरे नष्ट केली.

**१) मंदीरे उध्वस्त :**

औरंगजब सत्तेवर येण्यापूर्वी गुजरात प्रांताचा प्रमुख होता. तेथे त्याने अनेक हिंदू देवालये उद्‌ध्वस्त केली व धर्मवेड्या धोरणाचा पुरस्कार केला. त्याच्या भविष्यकालीन धार्मिक धोरणाची ती नांदी होती. त्याने आदेश देवून सोमनाथ मंदीर, बनारसचे विश्वनाथ मंदीर, मथूरा येथील केशवराय मंदीर नष्ट केले. मुघल साम्राज्याचे मित्र असलेले जयपूर राज्य येथील ही मंदीरे नष्ट करण्यात आली. हिंदूंना नवीन मंदीरे, धर्मस्थळे बांधण्याची परवानगी नाकारण्यात आली.

**२) जिझिया कर :**

जसवंत सिंगाच्या मृत्यूची बातमी कळताच औरंगजेबाने मारवाड मुघल साम्राज्याला जोडण्याचे आदेश दिले. तो जातीनिशी या मोहिमेवर थांबून त्याने मारवाड ताब्यात घेतले. मारवाड जिंकून १२ एप्रिल १६७९ रोजी तो दिल्लीस परतला त्याच दिवशी हिंदूवर त्याने जिझिया कर बसविला. त्यामुळे राज्याचे स्वरूप बदलले. मुघल साम्राज्य एक इस्लामी राज्य असल्याचे घोषित झाले त्यामुळे फक्त येथे मुस्लिमांनाच राहण्याचा अधिकार मिळाला. जिझिया कर देवून मुस्लिमेतर प्रजेला दुय्यम दर्जाच्या जनतेसारखे रहावे लागे. छत्रपती शिवाजी महाराजांनी औरंगजेबास जिझिया कराचा निषेध करणारे खरमरीत पत्र लिहिले. जिझियाबद्दल मनूची म्हणतो ''जे हिंदू हा कर देऊ शकत नसत ते अधिकाऱ्यांकडून होणाऱ्या अपमानापासून सुटका होण्यासाठी इस्लाम धर्म स्विकारत ते पाहून औरंगजेब आनंदी होत असे.'' औरंगजेबाने हिंदूवर यात्रा करही लादला.

**३) हिंदूवर आर्थिक दबाव :**

औरंगजेबाने हिंदू जनतेवर आर्थिक दबाव आणला. इ. स. १६६५ मध्ये मुस्लिम व्यापाऱ्यांवर २% तर हिंदू व्यापाऱ्यांवर ५% जकात बसविली. पुढे मुस्लिम व्यापाऱ्यांवरील जकात रद्द करून हिंदू व्यापाऱ्यांवरील जकात सुरू ठेवली.

**४) सरकारी पदांवरून बरखास्त केले :**

इ. स. १६७१ मध्ये एका आदेशाद्वारे राजस्व विभागातील सर्व अधिकारी मुस्लिम असले पाहिजेत असे जाहिर केले. इस्लाम धर्म स्विकारणाऱ्यांना नोकऱ्यांमध्ये संधी दिली गेली.

**५) सामाजिक प्रतिबंध लादले :**

इ. स. १६६८ साली हिंदूंच्या धार्मिक उत्सवांवर प्रतिबंध लावला. धार्मिक-सामाजिक चालीरिती कायद्याने बंद करण्यात आल्या. सतीप्रथा, नदी किनारी प्रेत दहन करणे, नदीमध्ये अस्थिविसर्जन, शोभायात्रा, दसरा-दिवाळी, होळी यात्रा इ. प्रथांवर निर्बंध लादले. राजा प्रजेला जे झराखा दर्शन देई ती प्रथा, राजाची सुवर्णतुला करण्याची हिंदू प्रथा बंद केली.

**६) हिंदू धर्मियांच्या जहागिरी, वतने जप्त करण्यात आली :**

जहागिर देतानाही भेदभाव केला जाई. न्यायालयीन बाबतीतही हिंदू-मुस्लिम असा भेदाभाव केला जाई त्यामुळे हिंदू-मुस्लिम दुरावा निर्माण झाला.

**७) औरंगजेबाने संगीत कलेचा राजाश्रय काढून घेतला :**

साकी मुस्तैदखान म्हणतो की ''बादशहाने हिंदू विद्या शिकविण्यावर व प्रार्थना म्हणण्यावर बंदी घातली.

**८) सक्तीने धर्म परिवर्तन करावयास लावण्याची निती अवलंबिली :**

जुझारसिंह बुंदेला, गोकुलदास जाट यांच्या परिवारास सक्तीने इस्लाम धर्म स्विकारायला लावला.

औरंगजेबाच्या धर्मांध आणि असहिष्णू धोरणामुळे त्याचा हिंदू धर्मियांशी संघर्ष सुरू झाला. औरंगजेबाने राजपूतांविषयी स्विकारलेल्या कट्टर धोरणामुळे राजपुतांनी औरंगजेबाविरूद्ध लढा सुरू ठेवला. त्याने राजपुतांविरूद्ध धर्मयुद्ध पुकारून राजपूत राज्य नष्ट करण्याचे धोरण स्विकारले. जोधपूरच्या जसवंतसिंगच्या मृत्यूनंतर राजा जसवंतसिंगच्या कर्तबगार मुलाने म्हणजे दुर्गादासने अल्पवयीन राजपुत्र अजितसिंग यास गादीवर बसविले व औरंगजेबाबरोबरचा लढा सुरू ठेवला. मेवाडचे राज्य जिंकण्यासाठी औरंगजेबाने राजपुत्र अकबराची नेमणूक केली. अकबराने वडिलांच्या प्रतिगामी धोरणाच्या विरोधात मेवाडच्या राजा रायसिंगचा मुलगा जयसिंग व दुर्गादास राठोड यांच्याशी मैत्री केली व औरंगजेबाविरूद्ध बंड पुकारले. औरंगजेबाने हे बंड मोडण्यासाठी कुटनितीचा अवलंब केला पण त्याचा फारसा उपयोग झाला नाही. अकबर व दुर्गादास राठोड हे दक्षिणेत छत्रपती संभाजी महाराजांच्या आश्रयास आले. औरंगजेब यानंतर दक्षिणेत मराठ्यांचा पराभव करून स्वराज्याचा नाश करण्यासाठी आणि बंडखोर अकबराला शिक्षा करण्यासाठी दक्षिण मोहिमेवर आला. अकबराचे बंड मोडण्यात त्यास यश मिळाले असले तरी मराठ्यांचे राज्य त्यास अखेरपर्यंत जिंकता आले नाही. छत्रपती संभाजी, छत्रपती राजाराम आणि महाराणी ताराबाई यांनी प्राणपणाने स्वराज्याचे रक्षण केले. हिंदवी स्वराज्याचा नाश करण्यासाठी त्याने पंचवीस वर्षे प्रयत्न केले. मात्र यामध्ये त्यास यश आले नाही. निराश अवस्थेत अहमदनगर येथे २० फेब्रुवारी १७०७ रोजी औरंगजेबाचा मृत्यू झाला.

**ब) औरंगजेब व शीख धर्म :**

औरंगजेबाच्या असहिष्णू धार्मिक धोरणामुळे शीख संप्रदाय मुघल सत्तेच्या विरोधात उभा राहिला. बादशहाच्या शीख धर्मस्थळे नष्ट करण्याच्या मोहिमेमुळे शीखांचे नववे गुरू तेगबहाद्दल यांनी बंड पुकारले. मुघल सामर्थ्यापुढे त्यांचा टिकाव लागला नाही. औरंगजेबाने तेगबहाद्दरला पकडले व इ. स. १६७५ मध्ये त्यांना ठार मारण्यात आले. त्यानंतर तेगबहाद्दर यांचा पुत्र गोविंदसिंग गुरूपदी आले त्यांनी शीख समाज संघटित केला त्यांना क्षात्र धमाची दीक्षा दिली. खालसा पंथाची स्थापना करून शीख धर्मामध्ये नवचैतन्य निर्माण केले. लष्कार उभारले. औरगजेबाने गुरू गोविंदसिंगविरूद्ध लाहोरच्या सुभेदारास पाठविले. त्याने आनंदपूरवर स्वारी केली पण शिखांनी त्याचा पराभव केला. असा मुघल-शीख संघर्ष दीर्घकाळापर्यंत सुरू राहिला.

**क) औरंगजेब व ख्रिश्चन धर्म - इंग्रज :**

औरंगजेबाच्या कालखंडात इंग्रजांनी ज्या-ज्या ठिकाणी वखारी होत्या त्यांना संरक्षक तटबंदी करून घेतल्या. इंग्रजांचे व्यापारातच बस्तान बसू शकत नसल्याने त्यांनी धर्मप्रसारावर भर दिला नाही. इ. स. १६८५ मध्ये बंगालच्या सुभेदारपदी असणाऱ्या शाहिस्तेखानाने इंग्रजांच्या व्यापारावर स्थानिक कर आकारले. इंग्रजांनी या स्थानिक कराला विरोध केला. औरंगजेबाने इंग्रजांचा बंदोबस्त करण्याचे ठरविले व इंग्रजांच्या सुरत, हुगळी, मच्छलीपट्टण येथील वखारीवर ताबा मिळविला. इंग्रजांचा नाइलाज होऊन त्यांनी नमते धोरण घेऊन बादशहाशी मैत्रीचे धोरण स्वीकारले.

**ड) पोर्तुगीज :**

चितगावच्या चाचे लोकांनी मुघल साम्राज्याला धोका निर्माण केला होता. या लुटारू लोकांच्या बंदोबस्तासाठी मीरजुमला याची नियुक्ती केली होती. त्याच्या आकस्मित मृत्यूमुळे या कामी इ. स. १६६४ मध्ये शाहिस्तेखानाची नियुक्ती करण्यात आली त्याने चितगावच्या पोर्तुगीज चाचांचा बीमोड केला. औरंगजेबाच्या कट्टर धार्मिक धोरणामुळे पोर्तुगीजांनी आपल्या धर्मप्रसारास मुरड घातली व मुघलांशी नम्रतेचे धोरण स्विकारले.

**इ) औरंगजेब व इस्लाम धर्म :**

औरंगजेब स्वतः सुन्नी पंथीय होता. त्याने उलेमांना महत्वपूर्ण स्थान दिले. व सुन्नी पंथाला बलिष्ठ बनविण्याचा प्रयत्न केला. इस्लाम धर्मप्रसारावर भर दिला. धर्म स्विकारणाऱ्या लोकांना सोई-सवलती देऊ केल्या. मानाच्या जागा देऊ केल्या. इस्लामची आचारसंहिता त्याने अमलात आणण्याचा प्रयत्न केला. नवीन चालीरीती, वेशभूषा, केशभूषा इत्यादींवरही नियत्रण ठेवण्यात आले. औरंगजेबाच्या या धार्मिक धोरणामुळे इस्लामी धर्मगुरूंचे अवाजवी महत्व वाढले. कुराणामधील नियमांचे काटेकोर पालन होण्यासाठी मुहतसीब या अधिकाऱ्याची नेमणूक केली.

**ई) औरंगजेब व शिया पंथ :**

औरंगजेबाच्या कडवर धार्मिक धोरणाचे परिणाम शिया पंथियांनाही भोगावे लागले. शिया पंथीयांवर ईश्वर निंदेचा आरोप ठेवण्यात आला व त्या पंथाच्या साधूंना शिक्षा ठोठावण्यात आली. सरमद हा या धोरणाचा पहिला

बळी ठरला. सरमद प्रमाणेच महंमद ताहीर याच्यावरही पाखंडीपणाचा आरोप ठेवून त्यास मृत्यूदंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. या शिया पंथीय साधूंच्या हत्येबरोबरच या पंथीयांवर अनेक निर्बंध लादले. शिया पंथीय साधूंच्या कबरीवर दिवा लावण्यास मनाई करण्यात आली. मोहरम या शिया पंथीयांच्या उत्सवामध्ये हिंदूही समरस होतात म्हणून हा सण साजरा करण्यास बंदी घालण्यात आली.

औरंगजेबाने इस्लाम धर्मियांवर अनेक बंधने लादून त्यांचे जीवन असह्य केले. नाणी काफरांच्या(हिंदूंच्या) हाती जातात व त्यावरील कलिमाची अवहेलना होते म्हणून बादशहाने नाण्यांवरील कलिमा काढून टाकण्याचा निर्णय घेतला. नमस्कार करून अभिवादन करण्याच्या पद्धतीस बंदी घालण्यात आली. पुढे तर कोणतीही प्रतिमा निषिद्ध मानली जाऊ जागली. या धोरणामधूनच आग्रा किल्याच्या प्रवेशद्वारापाशी उभारलेले हत्तीचे पुतळे हलविण्याचा आदेश औरंगजेबाने दिला.

**● औरंगजेबाच्या धार्मिक धोरणाचे मूल्यमापन :**

अकबर बादशहाने स्वीकारलेल्या उदार धार्मिक धोरणाच्या विरोधी जाऊन औरंगजेबाने कट्टर धार्मिक धोरणाचा अंगीकार केला. यामुळे सुन्नी पंथाचे वर्चस्व वाढीस लागले. धार्मिक मागण्यांनी जोर केला. राजसत्ता धर्मसत्तेच्या वर्चस्वाखाली जाऊ लागली. शिया पंथीयांनाही कट्टर इस्लामी धोरणाचे चटके बसले. हिंदू, शीख व ख्रिश्चन यांना औरंगजेबाच्या धार्मिक धोरणाचा प्रचंड त्रास झाला. त्यांनी राजसले विरूद्ध लढे सुरू केले. औरंगजेबाच्या कट्टर सुन्नी पंथीय धोरणामुळे शियापंथीय कुतूबशाही आणि आदिलशाही राज्यांचाही त्याने शेवट केला.

अकबराने हिंदू-मुस्लिमांत निर्माण केलेले ऐक्य भंग पावले. औरंगजेबाच्या काळातच बादशहाच्या विरोधात उठाव होवू लागले. हिंदू-मुस्लिमांमध्ये दंगे होऊ लागले. मुसलमान हिंदूंना 'काफर' समजू लागले. तर हिंदू मुस्लिमांना 'म्लेंच्छ' असे संबोधू लागले. औरंगजबाच्या कठोर धार्मिक धोरणाबाबत डॉ. एस. आर. शर्मा म्हणतात की, 'औरंगजेबाच्या कडव्या धर्मांतराचे धोरण हे शहाजहानप्रमाणे देवळे नष्ट करण्याची क्षणिक लहर नव्हती तर जाणीवपूर्वक व पद्धतशीरपणे ठरवून ते अमलात आणले होते.' थोडक्यात, औरंगजेबाच्या कठोर धार्मिक धोरणामुळे मुघल सत्ता खिळखिळी झाली व मुघल साम्राज्याच्या पतनास सुरूवात झाली.

**● स्वयं अध्ययन प्रश्न -१.**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) अकबराने .......... साली यात्रा कर रद्द केला.

अ) १५६२ ब) १५६३ क) १५६४ ड) १५६५

२) दीन-ए-एलाहीच्या .......... श्रेणी असत.

अ) दोन ब) तीन क) चार ५) पाच

३) .......... धर्माचे स्वरूप समजून घेण्यासाठी दस्तूर मेहरजीणा यांना अकबराने चर्चेकरिता बोलाविले.

अ) जैन ब) हिंदू क) ख्रिश्चन ड) पारशी

४) औरंगजेबाने .......... येथील केशवराय मंदीर पाडले.

अ) मथुरा ब) वाराणसी क) सौराष्ट्र ड) मेवाड

५) औरंगजेबाने .......... साली जिझिया कर लादला.

अ) १६७८ ब) १६७९ क) १६८० ड) १६८१

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

अ) अकबराची आई हमीदाबानू कोणत्या पंथाची होती?

ब) अकबराने इबादखान्याची स्थापना कोठे केली?

क) 'महजर' कोणास तयार करण्यास सांगण्यात आले?

ड) मुघलांविरूद्ध लढण्याकरिता गुरू गोविंदसिंग यांनी कोणत्या पंथाची स्थापना केली?

इ) औरंगजेबाचा मृत्यू कोठे झाला?

## ४.२.२ समाज हिंदू आणि मुस्लिम :

१३ व्या शतकात भारतात तुर्कांनी आपली सत्ता निर्माण करणे ही केवळ भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासातील ही अत्यंत महत्वाची घटना होती. पण त्यापूर्वीच ८ व्या आणि ९ व्या शतकात अरबी व्यापारी भारतात आले होते. पश्चिम किनाऱ्यावर त्यांनी आपल्या वसाहती स्थापन केल्या होत्या. दोन स्वतंत्र धर्म आणि संस्कृती एकमेकांच्या सहवासात आल्यानंतर त्यांचा एकमेकांवर परिणाम होणे अपरिहार्य होते. १३ व्या शतकात मुस्लिमांची सत्ता स्थापन झाल्यानंतर मुस्लिम देशातून अनेकजण नशीब आजमावण्यासाठी भारतात येऊ लागले. परदेशातून आलेल्या या मुस्लिमांचे राजकीय आणि धार्मिक तत्वज्ञान भारतीय राजकीय आणि धार्मिक तत्वज्ञानापेक्षा पूर्णपणे भिन्न होते. भारतात येणाऱ्या परकियांवर इस्लामिक तत्वज्ञानाचा पगडा होता. किंबहूना ते फक्त इस्लामी तत्वज्ञानालाच मानणारे होते. सुलतानशाहीच्या काळात तर सर्व राज्यकारभार इस्लामी तत्वज्ञानाप्रमाणेच चालत असे. मुघल काळात मात्र ही परिस्थिती बदलत गेली. भारतात स्थिर झाल्यानंतर मुघलांनी भारत हाच आपला देश मानला. कित्येक भारतीयांना बाटवून मुसलमान केल्यामुळे मुस्लिमांची संख्याही वाढली होती. तसेच बहुसंख्य असलेल्या हिंदूंचा पाठिंबा मिळविणे त्यांना आवश्यक वाटत होते. या सर्व कारणामुळे त्यांच्या विचारातील कडवेपणा कमी झाला आणि येथील परिस्थितीशी जुळते घेऊन त्यांनी आपल्या राजकीय तत्वज्ञानातही बदल घडवून आणले.

मुघल काळात परिस्थितीत बराच बदल झाला होता. खिलाफतीचे अस्तित्व आणि महत्व नष्ट झाले होते. त्यामुळे भारतातील मुघल सत्तेवर खलिफाने वर्चस्व गाजविण्याचा प्रश्न नव्हता. तसेच आदर्श मुस्लिम राज्याची तत्वे मुघल राज्याला लागू करणे शक्य नव्हते. आदर्श मुस्लिम राज्य धर्मसत्ताक असते. शासनव्यवस्थेला दुय्यम स्थान असते. राजा हा फक्त विश्वस्थ असून स्वधर्मीयांच्या हिंतसंबंधाची जबाबदारी त्याच्यावर असते. तसेच

मुस्लिम शासनव्यवस्थेत राज्यकर्त्यांचे पद निवडलेले आहे पण मुघल राज्यामध्ये यामधील कोणतेच तत्व लागू केलेले आढळत नाही. खलिफाने नियंत्रण ठेवण्याचा प्रश्नच नव्हता. बाबराने सार्वभौम सत्तेची स्थापना केली आहे हे दर्शविण्यासाठी बादशहा हा किताब घेतला. त्यांच्या घराण्यात तीनशे वर्षे बादशहाचे पद वंशपरंपरेने चालत आलेले दिसते. संपूर्णपणे केंद्रीभूत असलेली ही स्वयंसत्ता होती. तिथे राजाच्या निवडीचा प्रश्नच नव्हता. इथे राजा हा खलिफांचा नायब नव्हता. राज्याचा सार्वभौम राजा म्हणून प्रजेने त्याच्याशी एकनिष्ठ राहावयाचे होते. मुघल काळात विशेषतः अकबराच्या काळापासून मुघल शासनव्यवस्था या कल्पनेपासून बरीच दूर गेलेली दिसते. अकबराने हिंदूंना मानाचे स्थान दिले. हिंदू राजकन्यांशी विवाह करून हिंदूंशी विवाहबंधन जोडले. दरबारात अनेक हिंदूंना मानाच्या जागा दिल्या. दसरा, होळी यासारखे हिंदू सण तो साजरे करीत असे. जिझिया कर त्याने रद्द केला. जाणीवपूर्वक हिंदूंना शासनामध्ये सामील करून घेण्याचे धोरण त्याने स्विकारले होते. जहांगीरनेही हिंदू स्त्रियांशी विवाह करून अकबराचेच धोरण पुढे चालविले. हिंदूंना त्यांच्या धर्माचे पालन करण्याची मुभा देण्यात आली. अशा प्रकारे इस्लामने दिलेल्या आदेशाचा त्यांनी भंगच केला होता.

याचा अर्थ मुघल शासनव्यवस्था इस्लामी प्रभावापासून पूर्णपणे मुक्त होती असा नव्हे. मुघलांच्या राजपदाच्या संकल्पना, दरबारी शिष्टाचार, समारंभातील थाटमाट या गोष्टी फारसी दरबारातून घेतलेल्या होत्या. स्थानिक परिस्थितीनुसार काही बदल केले असले तरी करपद्धतीची तत्वे अरबांकडून स्विकारलेली होती. मुघलांनी स्विकारलेली कायदा आणि न्यायपद्धती कुराण आणि हदीस मध्ये सांगितलेल्या तत्वांनुसार रचण्यात आली होती. मुघल काळात एखाद्या सरदाराच्या मृत्यूनंतर त्यांची सर्व मालमत्ता सरकार जमा होत आहे. असे कुराणामध्ये खाजगी मालमत्तेच्या पावित्र्याचे जे नियम आहेत त्यानुसार वंशपरंपरेने मालमत्ता पित्याकडून पुत्राकडे जात नाही. मुघलांच्या रक्तामध्ये मंगोल, तुर्की, इराणी आणि हिंदू वंशांचे मिश्रण झाले होते. त्यामुळे त्यांच्या राजपदाच्या व सामाजिक संकल्पनामध्येही या वेगवेगळ्या संस्कृतीमधील संकल्पनांचे मिश्रण झालेले आढळते. त्यामुळे डॉ. रायचौधरींच्या मते, 'मुघल धर्माने मुसलमान संस्कृतीने पर्शियन आणि वारशाने हिंदूस्थानी होते.'

**अ) सामाजिक वर्ग :**

इस्लाम धर्मामध्ये सर्व समान मानले जातात. पण तरीही भारतात मुस्लिमांची सत्ता स्थापन झाल्यानंतर समाजात अनेक वर्ग तयार झाले. त्यामध्ये अमीर, उमराव, मनसबदार, जमीनदार, काझी, उलेमा, व्यापारी, शेतकरी, वैद्य, कारागीर आणि सावकार असे विविध वर्ग होते. त्यांची विभागणी अगदी काटेकार नसली तरी साधारण दोन वर्ग पाडले जात.

१) अहल-ए-दौलत (सत्ताधारी वर्ग)

२) अहल-ए-कलम किंवा अहल-ए-सादत (बुद्धीजीवी वर्ग)

**१) अहल-ए-दौलत (सत्ताधारी वर्ग) :**

प्रत्यक्ष राज्यकर्ते आणि त्यांचे सहकारी मिळून सत्ताधारी वर्ग बनत असे. भारतातील मुस्लिम सत्तेची स्थापना तुर्क आणि अफगाण यांनी केली होती म्हणून जे तुर्क आणि अफगाण उमराव, सरदार आणि प्रशासनातील उच्च

पदावर होते त्यांचा सलाधारी वर्गात समावेश होत असे. केंद्रातील, प्रांतातील आणि स्थानिक प्रशासनातील सर्व अधिकारीपदे त्यांनाच मिळत असत. सर्व राजकीय सत्ता त्यांच्या हातात होती. मिन्हाजच्या मते दिल्लीमध्ये न्यायाधीश, सय्यद, मलिक, अमीर आणि सदर या हुद्यावर बरेच लोक नोकरी करीत होते. त्यांना वंशश्रेष्ठत्वाचा अत्यंत गर्व होता. इतरांना विशेषतः भारतीय मुस्लिमांना ते कमी लेखत. तुर्क सोडून इतरांना उच्च पदे मिळवून स्वतःची प्रगती करून घेण्याची संधी मिळत नसे. सर्व सत्ता हा सत्ताधारी वर्ग कसोशीने स्वतःच्या हाती ठेवीत असे.

मुघल काळात सत्ताधारी वर्गात महत्वाच्या सरकारी हुद्यांवर असलेले बादशहाचे नातेवाईक, मोठ्या हुद्यांवर असलेले नुराणी, इराणी अफगाण आणि काही सय्यद यांचा समावेश होता. तुराणी मुळचे ऑक्सस नदीपलीकडे असलेल्या तुराण प्रांतातील होते. ते राजघराण्याच्या वंशातील होते. काटक आणि निर्भयतेसाठी ते प्रसिद्ध होते. मुघल काळात त्यांचा अतिशय प्रभावी वर्ग निर्माण झाला होता. सुलतानशाहीच्या काळापासून इराणी लोक भारतात येत होते. भारतात स्थायिक झालेले असूनही आपली मातृभूमी इराणबद्दल त्यांना आतिशय प्रेम होते. सुलतानशाहीच्या काळापासून भारतीय मुस्लिम समाजावर त्यांचा सांस्कृतिक प्रभाव होता. बल्बनच्या काळापासून इराणी दरबाराचे अनुकरण भारतीय मुस्लिम दरबारांमध्ये केले जात असे तर साहित्य, कला क्षेत्रात इराणी परंपरांना अतिशय महत्वाचे स्थान होते. बर्नियरच्या मते, राज्यातील महत्वाचे हुद्दे त्यांच्या ताब्यात असून मुघल दरबारात त्यांचे अत्यंत वजन होते; अफगाण मुघलांच्या आधी सत्ताधारी होते. मुघल काळात त्यांना दुय्यम स्थान मिळालेले दिसते. या वर्गात सय्यद लोकांचाही मोठा विभाग होता. अल्तमशच्या काळात त्यांच्यापैकी बरेचजण हिंदूस्थानात येऊन स्थायिक झाले होते. त्यांना प्रेषित मुहंम्मदांचे वंशज मानण्यात येत असल्यामुळे समाजात त्यांना मानाचे स्थान होते.

- **उमराव :**

उमरावांचा समावेश सत्ताधारी वर्गातही होत असे. उमराव वर्गात अधिकारी आणि त्यांचे दुय्यम यांचा समावेश असे. या वर्गातील सभासदांचा सामाजिक दर्जा त्यांच्या लष्करी पदावरून ठरत असे. सरखेल, सिपाहसालार, अमीर, मलीक आणि खान अशी ही पदे होती. स्वतःचे कर्तृत्व आणि सुलतानांची मर्जी याच्या जोरावर अगदी कनिष्ठ पदावर असलेला सैनिकही उच्चपदावर पोहोचत असे. ते स्वतःच्या सत्तेचे आणि समृद्धीचे प्रदर्शन करीत त्यांच्यापैकी फार थोडे जण उच्च विद्याविभूषित असले तरी संस्कृती आणि गुणांची त्यांना पारख होती. त्यामुळे गुणी विद्वान आणि कलाकारांना त्यांच्याकडून उदार आभय मिळत असे. मुघल कालखंडात अकबराने सुरू केलेल्या 'मनसब' देण्याच्या पद्धतीनुसार मनसबदार हे देखील मुस्लिम उमरावांमध्येच या सत्ताधारी या वर्गात येत. उमरावांपेक्षा वेगळा आणखी एक सामान्य उमरावांचा वर्ग होता. त्यांच्या हातामध्ये वरील उमरावांप्रमाणे मुलकी किंवा लष्करी सत्ता नव्हती. इस्लामी न्यायाशास्त्रज्ञ, साहित्यीक, काझी, सय्यद, धर्मशास्त्रज्ञ यांचा या दुसऱ्या वर्गामध्ये समावेश असे. या वर्गाचाही समाज आणि सरकारवर प्रभाव होता.

सुलतानशाहीच्या काळात भारतात परदेशातून आलेल्या अरब, अफगाण, तुर्की, मंगोला, तार्तर इत्यादी वंशियांचा एक मोठा वर्ग मुघल काळात उमरावशाहीत निर्माण झाला होता. त्याशिवाय बाटून मुसलमान

झालेल्यांचाही समावेश होता. राज्याच्या सर्व सुखसोयी आणि अधिकार त्यांना प्राप्त होते. शौर्य, साहस, दानशूरपणा, औदार्य, विद्याभिरूची आणि कलाप्रेम हे त्यांचे गुण होते. त्यांची राहणी अत्यंत विलासी आणि थाटामाटांची होती. गायन, वादन, नृत्य, शिकार ही त्यांच्या करमणुकीची साधने होती. श्रीमंती अहंकारामुळे कनिष्ठ वर्गाला कमी लेखण्याची प्रवृत्ती त्यांच्यात जास्त होती. एखादा सरदार अथवा अमीर उमराव मरण पावल्यास त्याची धनसंपत्ती सरकारजमा होत असे. त्यामुळे धनसंचय करण्याऐवजी मिळालेला पैसा भोगविलासात उधळण्याची त्यांची प्रवृत्ती असे. त्यांचे जीवन नैतिकदृष्ट्या भ्रष्ट होते. मदिरा, जुगार आणि स्त्रिसमागम सर्व अवगुण त्यांच्यामध्ये होते. पण असे असले तरी विद्वान, पंडित आणि कलाकारांच्या गुणांची कदर करण्याचे औदार्य त्यांच्यामध्ये होते. मध्ययुगीन मुस्लिम राजवटीत उमरावांचा हा वर्ग महत्वपूर्णस्थान मिळवून होता.

● **जहागीरदार आणि जमीनदार :**

मध्ययुगीन समाजव्यवस्थेमध्ये जहागीरदार आणि जमीनदार यांचे महत्वपूर्ण स्थान होते. कनौजच्या गुर्जर – प्रतिहारांच्या काळापासून हिमालयापासून ते नर्मदेपर्यंतच्या संपूर्ण उत्तर भारतभर हे वंशपरंपरागत जहागीरदार पसरलेले होते. गावेच्या गावे त्यांच्या मालकीची होती. त्या छोट्याशा प्रदेशाचे ते राजेच असत. राजपूत राजांनी त्यांना मांडलिक बनविले आणि खंडणी वसूल केल्यानंतर त्यांच्या कारभारात हस्तक्षेप केला नाही. राजपूत सत्ताधिशांनी त्यांना बरेच अंतर्गत स्वातंत्र्य दिले होते. ते आपल्या प्रदेशातून जमीन महसून गोळा करीत. परंपरेने त्यांना हे अधिकार मिळाले होते. त्याचा त्यांना विलक्षण अभिमानही होता.

मुस्लिम सत्तेच्या स्थापनेनंतरही या परिस्थितीत फारसा बदल झाला नाही. मुस्लिम राज्यकर्त्यांनी त्यांच्या जहागीरी त्यांच्याकडेच राहू दिल्या. राजकीय सत्ता मुस्लिमांची असली तरी बहुतेक जमिनी या जहागीरदारांच्या ताब्यात होत्या. त्या जहागीरदारांची छोटीशी सेनाही असे. ठराविक खंडणी मध्यवर्ती सत्तेला त्यांनी द्यावी अशी अपेक्षा असे. खंडणी देण्यामध्ये त्यांची नेहमीच चुकवाचुकवी चालत असे. मध्यवर्ती सत्ता जरा दुबळी आहे असे त्यांच्या लक्षात आले की ते बंड करीत असत. दिल्लीच्या सुलतानांनी कधी शस्त्राचा वापर करून तर कधी सामोपचाराने त्याच्यावर वर्चस्व निर्माण केले होते. पण बऱ्याच वेळा खुद्द सुलतानच जहागीरदारांच्या सैन्यावर अवलंबून असत. या सैन्याच्या जोरावर ते बंडखोर बनत आणि मध्यवर्ती सत्तेची डोकेदुखी बनत. या जहागीरदारांमध्ये बहुसंख्य हिंदू जहागीरदार होते. मुस्लिम सत्ता स्थिर झाल्यावर मुस्लिम जहागीरदारही निर्माण झाले हे मुस्लिम जहागीरदारही वेळप्रसंगी बंड करीत असत. काहीवेळा एखादा बंडखोराला आपली जहागीरदारी गमवावी लागत असे.

हे मोठे जहागीरदार जमीन महसुल गोळा करण्याचे काम स्वतः करीत नसत. त्यांच्या हाताखाली अनेक जमीनदार असत. तेच महसुल गोळा करण्याचे काम करीत. काही वेळा मध्यवर्ती सत्ता लहान जहागीरदारांना सरकारी अधिकाऱ्यांबरोबर महसुल वसुलीच्या कामावर नेमत असत. त्यांना खोत किंवा मुकादम असे म्हटले जाई. या जमीनदारांनी ग्रामीण शासनव्यवस्थेमध्ये महत्वाची भूमिका बजावली. कारण लहान शेतकरी किंवा कूळ यांच्याशी त्यांचा प्रत्यक्ष संबंध असे. कुळांचा मध्यवर्ती सत्तेशी प्रत्यक्ष फारसा संबंध येत नसते. हे जमीनदार किंवा जहागिरदार यांचा बरोबरच त्यांचा प्रत्यक्ष संबंध असल्यामुळे मध्यवर्ती सत्ता आणि जहागीरदार यांच्यामध्ये संघर्ष

निर्माण झाल्यास ते जहागीरदाराशी निष्ठा ठेवीत असत. शेतकरी वर्गावर त्यांचे चांगलेच वजन होते. मुघलकाळात अकबराने शेरशहाच्या महसूल पद्धतीवर आधारीत महसुल पद्धती निर्माण केली. ज्यामध्ये जमीनदार जमिनीचे मालक राहिले तरी महसुल वसुलीचा अधिकार त्यांच्याकडून काढून घेण्यात आला. पण तरीही अकबराच्या काळात जी सरंजामशाहीची पद्धती बनविण्यात आली. सरंजामदारांना जे राजकीय अधिकार देण्यात आले त्यामध्ये त्यांना विशिष्ट महसुलाचा प्रदेश सोपविण्यात आला. यातून पुन्हा नवे जहागिरदार निर्माण झाले.

**२) अहल–ए–कलम किंवा अहल–ए–सादत (बुद्धीजीवी वर्ग) :**

या वर्गामध्ये उलेमा, काझी, सय्यद, साहित्यिक आणि धार्मिक नेते यांचा समावेश होत असे. मुस्लिम सत्तेच्या काळात सामाजात या वर्गालाही मानाचे स्थान होते. त्यांच्यामध्येही काही वेळा सत्ताधारी वर्गातील लोक असत. उदा. सय्यद पण तरीही त्या वर्गापेक्षा हा वर्ग वेगळा होता. पहिल्या वर्गाच्या हातात सर्व राजकीय सत्ता होती. या दुसऱ्या वर्गाच्या हाती राजकीय सत्ता मुळीच नव्हती तरीही समाजावर बराच प्रभाव होता. सय्यद, अरब आणि इराणी लोकांची काझी आणि इमाम या जागांवर नेमणूक केली जात असे.

**१) काझी :–**

साधारणपणे न्यायदानाचे काम करणाऱ्या न्यायाधिशाला काझी असे म्हटले जाई. काझी म्हणून काम करणाऱ्यांना मुस्लिम कायद्याची चांगली माहिती असणे आवश्यक होते. मुस्लिम कायद्याचे त्यांचे ज्ञान मान्य करण्याशिवाय इतरांना पर्याय नसे. त्यामुळे ते सांगतील तो न्याय अशी परिस्थिती होती. धार्मिक खात्याचा प्रमुख म्हणून मुख्य काझीच्या हातात तसेच इतर काझींच्या हातातही बरीच सत्ता होती. त्यामुळे लोक त्यांना वचकून असत. राज्यकर्त्यावरही त्यांचा प्रभाव असे. मुघल काळात धार्मिक न्यायालये इतर न्यायालयापासून वेगळी करण्यात आली. फक्त धार्मिक न्यायालयांवरच काझीची न्यायाधीश म्हणून नेमणुक केलेली असे. काझी शरीयत किंवा धार्मिक विधिनियमानुसार न्यायदान करीत. धार्मिकसंस्था कुटूंब कायदा, वारसा कायदा अशा धर्मशास्त्रांशी संबंधित दाण्यांचा निवाडाच फक्त धार्मिक न्यायालयात होत असे. इतर सर्वसामान्य खटले किंवा राजकीय खटल्यांसाठी वेगळी न्यायालये असत. त्यामुळे काझींचे अधिकार कमी झाले आणि मुस्लिम समाजामध्ये जरी त्यांना मानाचे स्थान होते तरी त्यांचे राजकीय वजन आणि महत्व पूर्वीप्रमाणे राहिले नाही.

**२) उलेमा :–**

मुस्लिम समाजातील हा अत्यंत महत्वाचा वर्ग होता. मुस्लिम धर्मगुरूंना उलेमा असे म्हटले जाई. समाजामध्ये त्यांना मानाचे स्थान होते. उलेमांमध्ये उलेमा–ए–अखिरत आणि उलेमा–ए–दुनिया असे दोन प्रकार होते. पैकी उलेमा–ए–अखिरत अतिशय धार्मिक, एकांतप्रिय आणि सर्वसंग परित्याग करून पवित्र जीवन जगणारे विद्वान असत. याउलट उलेमा–ए–दुनिया सर्व व्यवहारिक गोष्टींमध्ये रस घेत. काझी, मुफ्ती(कायदेशिर सल्लागार) सद्र–ए–जहान, खेख–उल–इस्लाम अशी अधिकारपदे मिळवीत.

मुघलकाळात सुन्नी आणि शिया यांच्यातील मतभेद उफाळून आले. मुघल बादशहा सुन्नी पंथीय होते तर दक्षिणेतील बहामनी राज्यातून निर्माण झालेल्या पाच शाह्यांचे सुलतान शिया पंथीय होते. सुन्नी अधिक कडवे

आणि वंशाभिमानी होते तर शिया त्यामानाने मवाळ होते. दक्षिणेतील सुलतानांनी आपल्या दरबारी अनेक हिंदू सरदार नेमले होते. त्यामुळे आपोआपच उलेमांची सत्ता तिथे कमी झाली होती. मुघल बादशहांमध्ये बाबर आणि हुमायून यांना फारसे स्वास्थ लाभले नाही. खऱ्या अर्थाने अकबराच्या काळात मुघल सत्ता स्थिर झाली. अकबराचे लहानपण राजपूत दरबारात गेले होते. हुमायूनच्या पडत्या काळात त्याचा शिक्षक पालक आणि नंतर त्याला गादीवर आणण्यात कारणीभूत ठरलेला बैरामखान शियापंथीय होता. त्यामुळे अकबराची मते मवाळ बनली होती. हिंदूकडे पाहण्याचा त्यांचा दृष्टीकोन उदारतेचा होता. तसेच अकबर मुत्सद्दी राजकारणी होता. बहुसंख्य हिंदू प्रजेवर यशस्वी राज्य करावयाचे असेल तर त्यांना सन्मानाने वागविले पाहिजे हे त्याने ओळखले होते. त्यामुळे त्याने अनेक हिंदूना आपल्या दरबारात सरदार नेमले होते. त्यामध्ये राजा मानसिंग, राजा तोरडमल यासारख्या मुत्सद्यांचा समावेश होता. राजकारणातील उलेमांची ढवळाढवळ तर त्याने बंद केलीच पण धार्मिक बाबतीतही दीन-ए-इलाही या पंथाची स्थापना करून उलेमांच्या धार्मिक वर्चस्वाला शह दिला. या पंथामध्ये तो स्वतःच प्रमुख धर्मगुरू होता आणि त्यामुळे धार्मिक सर्वोच्च अधिकारही त्याचेच होते. त्याच्या या धोरणामुळे उलेमांचे समाजतील वर्चस्व कमी झाले. औरंगजेबासारख्या कट्टर धार्मिक बादशहाच्या काळातही त्यांचे गेलेले स्थान मिळविणे त्यांना शक्य झाले नाही. त्यांचे महत्व कमी होत गेले.

- **अर्थव्यवस्थेशी संबंधित वर्ग (व्यापारी आणि सावकार)**

मध्ययुगीन भारतात अर्थव्यवस्थेशी संबंधीत व्यापारी आणि सावकारांचा एक विशिष्ट वर्ग होता. मध्ययुगीन भारतामध्ये व्यापार मोठ्या प्रमाणात वृद्धींगत झाला होता. अर्थव्यवस्थेची सर्व सूत्रे हातात असल्यामुळे व्यापारी आणि सावकार वर्गाला समाजात मानाचे स्थान होते. राज्यकर्त्यांवरही त्यांचा प्रभाव होता.

**१) व्यापारी वर्ग :**

सर्व देशाची आर्थिक सूत्रे आती असलेला असा हा वर्ग होता. भारताचा अंतर्गत आणि परकीय व्यापार मोठा होता. परकीय व्यापाराबरोबर अंतर्गत व्यापारात अनेक अडचणी आणि धोके होते. तरीही एवढ्या मोठ्या प्रमाणात व्यापार चालू होता. व्यापारी वर्गामध्ये प्रामुख्याने बंजारा, बनिया, मुलतानी आणि खुरासानींचा समावेश असे. त्यांना भाट, दलाल किंवा अडते, साहू आणि महाजन यांची मदत असे. मुघलकाळात व्यापार वाढल्याने बंजारा आणि बनिया यांच्याबरोबरच बोहरा, पारशी आणि सौदागर यांचाही व्यापारी वर्गात समावेश झाला. व्यापाऱ्यांच्या दृष्टीने अडत्यांचा(दलालांचा) वर्ग ही आवश्यक बाब होती. ते व्यापाऱ्यांना सर्व तऱ्हेची मदत करीत असत. दक्षिण भारतातील व्यापाराचे एक खास वैशिष्ट्य म्हणजे तिथे काम करणाऱ्या व्यापारीश्रेणी, श्रेणी म्हणजे संघटना त्या श्रेणींचे दोन प्रकार होते, एक प्रादेशिक, दुसरी व्यावसायिक श्रेणी. मराठ्यांच्या राज्यात मालाची ने-आण करणाऱ्यामध्ये मुख्यतः लमाणांचा समावेश होता. हे लमाण दहा ते पंधरा हजारांचया संख्येने प्रवास करीत असत. आर्मेनियम, डच, फ्रेंच, इंग्रज, पोर्तुगीज हे पाश्चात्य व्यापारीही पश्चिम किनाऱ्यावर स्थिर झाले होते. त्यांनी आपल्या व्यापारी वखारी स्थापन केल्या होत्या.

**२) सावकार :**

कोणत्याही अर्थव्यवस्थेत व्यापाऱ्याबरोबरच महत्त्वाचा असणारा दुसरा वर्ग म्हणजे कर्ज किंवा भांडवल

पुरवठा करणाऱ्या सावकारांचा मुघल काळामध्ये बहुतेक लहान गावातून सराफ किंवा श्रॉफ या नावाने ओळखले जाणारे सावकार असत. ते चलन बदलून देत व तसे हमीपत्र किंवा प्रमाणपत्र देत असत. टांकसाळीचे अधिकारी म्हणून ते काम करीत असत. धातूंची पारख करणे हे त्यांचे प्रमुख काम असे. व्यापारासाठी विशेषतः परकीय व्यापारासाठी हुंडी लिहून देणे ही नेहमीची गोष्ट होती. माल किती दूर पाठवायचा आहे त्यावर हुंडावळीचा दर ठरत असे. काही पतपेढ्याही शाखा असत. त्यांच्या नावे हुंडी लिहून देण्याची प्रथा होती. मुघलकाळात या पतपेढ्यांना 'कोठी' असे म्हटले जाई. निळीचा व्यापार एवढा फायदेशीर होता की निळीचा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांनी आपल्या पतपेढ्या स्थापन केल्या होत्या. दुरदूरच्या बाजारपेठेत त्यांच्या शाखा असल्यामुळे त्यांना हुंडी देणे सोईचे होते. अशा पेतपेढ्यांना 'निलकोठी' असे म्हटले जाई.

मुघलकाळातील 'सावकार' एवढे श्रीमंत होते की ते सरकारलाही कर्जपुरवठा करीत असत. औरंगजेबाच्या काळात माणिकचंद हा प्रसिद्ध सावकार होता. सरकारच्या दृष्टीने त्याचे महत्व एवढे मोठं होते की औरंगजेबने त्याला 'सेठ' अशी पदवी दिली होती. त्याचे सर्व कुटूंब सावकारी करीत होते. त्यामध्ये त्याचे वडील त्याचे सहा भाऊ आणि पुतण्या फत्तेचंद सर्वजण सावकारी करीत. फत्तेचंद सेठ आणि माणिकचंद दत्तक गेला होता. मुर्शिदाबादला त्याची पेढी होती. फरूखसियर बादशहाला अडचणीच्या वेळी त्याने पैसा पुरविला होता. त्यामुळे फरूखसियरने त्यास 'जगतसेठ' अशी पदवी दिली होती.

अशा तऱ्हेने व्यापाऱ्यांचा आणि सावकारांचा वर्ग आर्थिक सूत्रे हाती असल्यामुळे समाजात मानाचे स्थान मिळवून होता. वरील वर्गाव्यतिरिक्त समाजात लहान शेतकरी, कारागिर, मजूर, शेतमजूर, छोटे दुकानदार, दास-दासी, सेवक इ. घटकांचा समावेश असणारा आर्थिकदृष्ट्या कनिष्ठ वर्ग समाजात होते.

हिदू समाजात वर्ण व्यवस्थेचे जाती व्यवस्थेत परिवर्तन झाले होते. समाजात अनेक जाती, अपजाती व पोटजाती अस्तित्वात होत्या. जातीभेद, जाती संस्था बळकट बनल्या होत्या. समाजात अंधश्रद्धा, अस्पृश्यता, गुलामगिरी यासारख्या कुप्रथा अस्तित्वात होत्या.

● **स्त्रियांची स्थिती :**

हिंदू आणि मुस्लिम स्त्रियांच्या सामाजिक स्थानामध्ये फारसा फारक नव्हता. हिंदू स्त्रियांप्रमाणेच मुस्लिम स्त्रियांनाही पुरूषांच्या मानाने दुय्यम स्थान दिलेले होते. स्त्रियांच्या शारिरिक पावित्र्यावर विशेष भर दिलेला असे. त्यामानाने पुरूषांच्या अनितीने वागण्याकडे कानाडोळा केला जात असे. अमीर खुस्त्रोच्या लेखनावरून एखाद्या कुमारिकेच्या चारित्र्यावर शिंतोडे उडविले गेले तर तिचा काहीही दोष नसला तरी तिला योग्य वर मिळणे कठीण होत असे. समाजामध्ये तिची बदनामी होई.

**अ) मुस्लिम स्त्रीजीवन :**

एका बाबतीत मात्र हिंदू स्त्रियांपेक्षा मुस्लिम स्त्रियांची स्थिती चांगली होती, पित्याच्या इस्टेटीत तिला भावाबरोबरच समान वाटा मिळत असे. विवाहाच्या बाबतीत मात्र त्यांना दुय्यम स्थान दिलेले होते. घरामध्ये मुलीचा जन्म म्हणजे तिच्या माता-पित्यांना संकट वाटत असे. लहान असताना त्यांना माता-पित्याचे प्रेम मिळत

असे, पण त्या वयात आल्यानंतर त्यांचा विवाह ही एक समस्या बनत असे. लग्नामध्ये मुलीला भरपूर हुंडा देणे सर्वच वधूपित्यांना शक्य नसे. काही वेळा त्यासाठी लग्न पुढेही ढकलले जात असे. लहान वयातच मुलींचा विवाह करण्याकडे कल असे. आपल्या आयुष्याचा जोडीदार निवडण्याचे त्यांना स्वातंत्र्य नव्हते. विवाह हा दोन व्यक्तींमधील दुवा नव्हता तर दोन कुटूंबांना जोडण्याचे बंधन होते. त्यामुळे वधू पित्याला योग्य कुटूंबातील वर मिळेपर्यंत वाट पाहावी लागत असे. त्यामुळे काही वेळा वधू-वराच्या वयामध्ये बराच फरक असे. काही जमातीमध्ये आपापसात विवाह करण्याची पद्धत होती. वंशशुद्धत्वाची कल्पना त्यामागे होती. नुरजहाँ अनेक गरीब मुलींचे विवाह लावून देत असे.

इस्लाममध्ये विवाह हा एक करार होता. हिंदू धर्मियांप्रमाणे संस्कार नव्हता. त्यामुळे हिंदूपेक्षा मुस्लिमांमध्ये घटस्फोट घेणे सोपे होते. घटस्फोटाचा आणि पुनर्विवाहाचा अधिकार यामुळे मुस्लिम स्त्रियांची स्थिती हिंदू स्त्रियांपेक्षा चांगली होती. स्त्रियांचे स्थान घराच्या चार भिंतीमध्ये मर्यादित मानले जात असे. स्त्री-पुरूष सामाजिकरीत्या एकमेकांत मिसळत नसत. मुघल काळामध्ये मुस्लिम स्त्रियांमध्ये पडदा पद्धती पाळली जात असे. स्त्रियांच्या शिक्षणाची स्वतंत्र सोय केलेली नव्हती. मुलींना बहूधा घरीच शिक्षण दिले जाई व त्यामध्ये प्रामुख्याने धार्मिक विषयांचाच समावेश असे.

मुस्लिम समाजामध्ये असलेल्या बहुपत्नीत्वाच्या पद्धतीमुळे मुस्लिम स्त्रिचा दर्जा अधिकच खालावला होता. कुराणानेच काही विशिष्ट परिस्थितीत पुरूषाला चार स्त्रियांशी विवाह करण्याचा अधिकार दिला होता. पण त्यामुळे कुटूंबातील शांतता नष्ट होत असे. पती-पत्नींमध्ये जवळकीचे नाते निर्माण होत नसे. बादशहा तर अनेक स्त्रियांशी विवाह करीत. एकपत्नीत्वाचा पुरस्कार करणाऱ्या अकबराने तीनशे स्त्रियांशी विवाह केला होता. त्याचा सावत्र भाऊ मिर्झा अझीम याने अनेक स्त्रियांशी विवाह करण्याचे समर्थन करताना काढलेले उद्गार तत्कालीन समाजाच्या वृत्तीचे दर्शन घडवितात. तो म्हणतो, माणसाने बालसंगोपनासाठी हिंदूस्थानी स्त्रीशी विवाह करावा, गृहकृत्यासाठी खुरासानी स्त्रीशी विवाह करावा, सहवास आणि संभाषण यासाठी इराणी स्त्रीशी विवाह करावा आणि या सर्वांवर नियंत्रण ठेवून घरात शांतता स्थापन होण्यासाठी ट्रान्स आक्सीयाना स्त्रीशी विवाह करावा. या स्त्रिया आपल्या मुलाला गादी मिळावी यासाठी प्रयत्नशील असत. यामधून अनेक दरबारी कट कारस्थाने निर्माण होत. अलतमशच्या मृत्यूनंतर आपला मुलगा रुकनुद्दीन फिरोझ यास गादी मिळावी यासाठी त्याची आई शाह तुर्कन हिने अनेक कारस्थाने करून मुलाला गादी मिळवून दिली होती.

सर्वसाधारण मुस्लिम स्त्रिया राजकारणात भाग घेत नसल्या तरी सुलतानशाहीच्या काळात रझिया सुलतानाने सत्ता मिळविण्यात यश मिळविले होते. मुघलकाळात तर अशा अनेक स्त्रियांची उदाहरणे सापडतात. हूमायूनला गादी मिळावी यासाठी त्याच्या आईने प्रयत्न केले होते. अकबराची दाई माहम अनघा हिचाही बराच प्रभाव अकबरावर होता. व्यसनाच्या आहारी गेलेल्या जहांगीरची पत्नी नुरजहाँनने ११ वर्षे अत्यंत कार्यक्षमतेने राज्यकारभार सांभाळला होता. सर्व शत्रूंना नामोहरण केले होते. मुमताज महलचा शहाजहानवर असलेला प्रभाव प्रसिद्ध आहे. शहाजहान नंतर झालेल्या वारसायुद्धात त्याची कन्या रोशनआरा हिने महत्वाची भूमिका बजावली होती. तर औरंगजेबाच्या दोन कन्या झैबुन्निसा आणि झैनुतिन्नीसा यांचाही आपल्या धर्मवेड्या पित्यावर प्रभाव होता. त्यामुळेच शाहू आणि यूसूबाई यांचे प्राण वाचविण्यात झैबुन्निसाला यश आले. पण ही सर्व राजघराण्यातील

स्त्रियांची उदाहरणे आहेत. सर्वसामान्य स्त्रिया राजकारणात भाग घेत नसत. त्या आपल्या पुरूष नातलगांच्या पुर्ण वर्चस्वाखाली असत. त्यांना फारसे स्वातंत्र्य नव्हते.

ब) **हिंदू स्त्रियांची स्थिती** :

हिंदू स्त्रियांची स्थिती मुस्लिम स्त्रियांपेक्षा फार वेगळी किंवा चांगली होती असे मुळीच नव्हते. मुलगी म्हणजे मातापित्यांना एक जबाबदारी आणि ओझे वाटत होते. मुलीच्या जन्माचे स्वागत होत नसे. त्यामुळेच मुलींना लहानपणीच मारण्याचे प्रमाणही अधिक होते. मुलींवर अनेक बंधने घातली जात असत. बालविवाहाची प्रथा सर्वमान्य होती. धर्मशास्त्रानुसार मुलीचे लग्नातील वय ८ ते १२ वर्षे असे होते. स्वतःचा जिवनसाथी निवडण्याचे त्यांना स्वातंत्र्य नव्हते. हिंदूधर्मामध्ये विवाह हा संस्कार मानला असल्यामुळे एकदा विवाह झाल्यानंतर ते बंधन कायमचे मानलेले असे. विवाह बंधन तोडणे शक्य नसे. ते एक सामाजिक आणि धार्मिक ऋण होते आणि ते ऋण फेडण्यासाठी पती-पत्नींवर अनेक जबाबदाऱ्या टाकण्यात आल्या होत्या. विवाह हा केवळ दोन व्यक्तींमधील संस्कार मानलेला होता. विवाहानंतर मुलीला आपल्या सासू-सासऱ्यांच्या मर्जीप्रमाणे वागावे लागे. त्यामुळे विवाहानंतरही तिला स्वातंत्र्य नव्हते.

मुलीचा जन्म माता-पित्यांना नकोसा वाटे त्याचे प्रमुख कारण म्हणजे हुंडापद्धती, मुलीला योग्य स्थळ मिळावे यासाठी माता-पित्यांना बराच खर्च करावा लागे. त्यामध्ये अनेक गरीब आणि कनिष्ठ मध्यमवर्गीय कुटुंबे धुळीला मिळत. हिंदूमध्ये विशेषतः राजघराण्यातील व्यक्ती सरदार, दरबारी श्रीमंत यांच्यामध्ये बहुपत्नीत्वाची पद्धत रूढ होती. अधिक स्त्रिया असणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जाई. काही वेळा प्रथम पत्नीला पुत्र झाला नाही म्हणूनही एकापेक्षा अधिक स्त्रियांशी विवाह केला जात असे. ज्या पत्नीला पुत्रप्राप्ती होत असे तिला कुटुंबात मानाचे स्थान मिळत असे. अशा घरात प्रत्येक पत्नीला आपल्या पतीचे लक्ष फक्त आपल्याकडेच असावे असे वाटत असे. त्यामुळे सवती-सवतीमध्ये असुयेचे वातावरण असे. अशा विवाहात स्त्री हे एक उपभोगाचे साधन आहे असेच मानले जात असे.

मध्ययुगातील विधवा हिंदू स्त्रियांची अवस्था तर अत्यंत केविलवाणी होती. उत्तर भारतात व दक्षिण भारतातही तिच्यावर अनेक सामाजिक बंधने लादलेली होती. वैधव्य आले तर तिची परिस्थिती अधिकच वाईट होत असे. समाजात तिला कोणतीही प्रतिष्ठा नसे. कष्टमय, अपमानित लाचारीचे जीवन तिला जगावे लागे. पतीच्या मालमत्तेमध्ये वाटा मिळत नसे. सर्व संपत्ती फक्त पुरूष वारसदारांनाच मिळत असे. तिने अलंकार घालू नयेत, चांगली वस्त्रे नेसू नयेत, सौंदर्य प्रसाधने वापरू नयेत, इतरांमध्ये मोकळेपणाने मिसळू नये आणि महत्वाचे कारण असल्याशिवाय सार्वजनिक ठिकाणी इतरांच्या नजरेस पडू नये. तिने स्वतःला पतीच्या चितेवर जाळून घेऊन मृत्यूनंतरही त्यास साथ द्यावी. सती जाणाऱ्या स्त्रिचा मान-सन्मान केला जात असे. आदर्श हिंदू स्त्रीचे ते लक्षण मानले जाई. ती सती गेली नाही तर तिला अत्यंत लाचार जीवन जगावे लागत असे. तिचे केशवपन केले जाई. तिने जाडेभरडे कपडे वापरावेत आणि जमिनीवर जाडेभरडे वस्त्र टाकून झोपावे. सण उत्सव प्रसंगी किंवा धार्मिक प्रसंगी विधवा स्त्रीचे दर्शन अशुभ मानले जाई. बालविवाह रुढ असल्यामुळे बालविधवांचे प्रमाणही मोठे होते. घटस्फोटाला बंदी, केशवपन, सती, विधवा पुनर्विवाहाला बंदी या गोष्टी वरिष्ठ वर्णांमध्ये अधिक प्रचलित होत्या. त्या मानाने श्रमजीवी कनिष्ठ वर्गामध्ये एवढी बंधने पाळली जात नसत.

वेश्याव्यवसाय एक सामाजिक गरज म्हणून मान्य झाला होता. काही वेळा सार्वजनिक आणि धार्मिक समारंभाच्या वेळी वेश्यांना गायन आणि नृत्य करण्यासाठी बोलाविले जाई. या स्त्रिया संगीत, काव्य, चेटूक, हेरगिरी यामध्ये निपुण असत. काही स्त्रिया आपल्या सौंदर्याच्या जोरावर आणि कलानिपुण्याच्या जोरावर राजकुमारांचे लक्ष आपल्याकडे वेधून घेण्यात यशस्वी होत. हे राजपुत्र त्यांचा समावेश आपल्या जनानखान्यात करीत असत. तिथे त्या रखेलीचे जीवन जगत असल्या तरी त्यांना बऱ्याच सवलती मिळत असत. काही जणी राजाशी इतक्या निष्ठेने वागत की, त्यांच्याबरोबर सतीही जात असत. दक्षिणेत गणिकांचाही एक वर्ग होता. त्यांच्यामध्ये दोन वर्ग होते.

१) देवळात वाहिलेल्या देवदासी २) स्वतंत्र गणिका, त्यांना समाजात मानाचे स्थान होते. देवदासींना रोज देवाच्या पुजेच्या वेळी नृत्य करून आणि गाऊन देवाची सेवा करावी लागे.

● **सती आणि जोहार** :

मुस्लिमांच्या आक्रमणामुळे पुरूषांना सतत सावध आणि शस्त्रबद्ध राहावे लागत असे. विजयी सेना सर्व गावाला किंवा शहराला कैदी बनवीत असे. अशा वेळी स्त्रियांवर अत्याचार होत असत. या अपमानापासून वाचण्यासाठी अनेक स्त्रिया पतीच्या चितेवर सती जात असत. पती जिवंत असताना आणि लढत असताना त्याचा पराभव होईल असे वाटल्यास स्त्रिया जोहार करीत.

एकूणच मध्ययुगीन भारतातील स्त्रियांची स्थिती दुय्यम व अत्यंत दयनीय होती. अकबरासारख्या राज्यकर्त्यांनी त्यामध्ये सुधारणा करण्याचा प्रयत्न केला पण त्याला फारसे यश आले नाही.

● **गुलामगिरी** :

प्राचीन काळापासून भारतामध्ये गुलामगिरीची पद्धती होती. मध्ययुगात गुलामगिरी संस्थेला बरेच विस्तृत स्वरूप प्राप्त झाले. पाश्चिमात्य राष्ट्रांमध्ये गुलामगिरीमध्ये वर्णाला बरेच महत्व होते. गोऱ्या लोकांनी काळ्या निग्रो लोकांना गुलाम बनविले होते. भारतामध्ये कातडीच्या रंगाला महत्व नव्हते. युद्धकैदी वंशपरंपरेने किंवा स्वतःच स्वतःला गुलाम म्हणून विकल्यामुळे गुलामांची निर्मिती होत असे.

● **मुस्लिम समाजातील गुलामगिरी** :

मुस्लिम समाजाचे गुलाम हे अविभाज्य अंग होते. विशेषतः उमराव आणि धनिक वर्गात गुलाम बाळगणे हे प्रतिष्ठेचे लक्षण मानले जात असे. सरदार युद्धामध्ये नाही तर ऐषआरामात मशगुल असत. कष्टाची कामे करणे त्यांना कमीपणाचे वाटत असे. त्यामुळे त्यांना गुलामांची अत्यंत आवश्यकता होती. गुलामांमध्ये स्त्री-पुरूष दोन्ही गुलाम असत. बऱ्याच युद्धकैद्यांना गुलाम बनविले जात असे. काही वेळा एखाद्या खेड्यावर हल्ला करून गावातील स्त्री-पुरूषांना गुलाम बनविले जाई. दुष्काळासारख्या आपत्तीच्या काळात माता-पिता नाइलाजास्तव आपल्या मुलांना गुलाम म्हणून विकत असत. सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी किंवा इतर आपत्तीच्या वेळी लोक स्वतःला गुलाम म्हणून विकत असत. तुर्कस्थान आणि मलायाच्या गुलामांचा परदेशातुन आणलेल्या गुलामांमध्ये प्रामुख्याने समावेश होता. प्राचीन काळाप्रमाणे मध्ययुगातही गुलामांचा बाजार भरत असे. पुरूष गुलामांची किंमत त्यांची

काम करण्याची ताकत व त्यांचे सौदर्य यावरून ठरत असे. स्त्री गुलामांची किंमतही काम करण्याची क्षमता व सौंदर्य यावरून ठरत असे. स्त्री गुलामांचे दोन प्रकार असत. पहिल्या प्रकारात कष्ट करण्याऱ्या स्त्री गुलामांचा तर दुसऱ्या प्रकारात उपभोगासाठी वापरल्या जाणाऱ्या स्त्री गुलामांचा समावेश असे.

मुघल कालखंडात अकबर बादशहाने युद्धकैद्यांना गुलाम बनविण्याच्या प्रथेला पायबंद घातला. त्याचप्रमाणे गुलामांच्या खरेदी विक्रीवर कडक निर्बंध लादून गुलामगिरी प्रथेला काही प्रमाणात आळा घातला.

- **मालक–गुलाम संबंध** :

सुरूवातीस मुस्लिम समाजातील गुलाम मुस्लिमच होते. त्यामुळे स्वतंत्र माणसांसारखेच त्यांचे स्थान होते. मालकांनी गुलामांशी प्रेमाने वागावे असे कुराणामध्ये सांगितले आहे. युसूफ गदा आणि हमदानी यांच्या मते, मालकाने स्वतःइतक्याच सुखसोयी गुलामाला उपलब्ध करून दिल्या पाहिजेत. हमदानींच्या मते, धार्मिक शिक्षण घेणे, ठराविक तास काम करणे नमाजाच्या वेळी सुट्टी, माणुसकीची वागणूक, शरीयत विरोधी कामाला नकार इत्यादी सात अधिकार गुलामाला मालकाकडून परंपरेने मिळत असतात. हे तत्वतः खरे असले तरी प्रत्यक्षात मालकाला सर्वाधिकार असत. बरेच गुलाम युद्ध कैदी असल्यामुळे ते पूर्णपणे त्यांना पकडणाऱ्यांच्या दयेवर अवलंबून असत. मालक त्यांचे काहीही करू शकत असे. त्यांना कसेही वापरू शकत असें. गुलाम विकत घेतलला असेल तर घरातल्या एखाद्या वस्तूएवढी किंमत किंवा गुराढोराइतकीही किंमत त्याला नसे. एखाद्या गुलामाला राजाने स्वातंत्र्य दिले तर त्या राजाला त्या गुलामाच्या मालकाला त्याची किंमत द्यावी लागे. एखाद्या कनिष्ठ वर्गीय हिंदूने गुलाम बनल्यानंतर इस्लाममध्ये प्रवेश केला असेल तर त्याची परिस्थिती बरी असे.

गुलामही आपल्या धन्याशी प्रामाणिक असत. धन्याची सर्व तऱ्हेची सेवा ते करीत असत. धन्याचे संरक्षक म्हणूनही ते काम करीत. काही वेळा मालकाची आर्थिक स्थिती हलाखीची बनल्यास गुलामांनी त्यांना मदत केल्याचीही उदाहरणे आहेत. चांगले गुलाम त्यांच्या शैर्यासाठी, सौंदर्यासाठी, आकर्षकतेसाठी, विश्वसनीयतेसाठी आणि वेगवेगळ्या कलांचे ज्ञान असल्यांमुळे प्रसिद्ध असत. कारागीर म्हणूनही गुलाम सरकारी कारखान्यात काम करीत असत. त्यांना रोज किंवा महिन्यातून एकदा धान्य, मांस, कपडे किंवा पैशाच्या स्वरूपात पगार दिला जात असे. अफीफच्या मते, काही गुलामांना शिष्यवृत्या देण्यात आल्या होत्या. तर काहींना गावे जहागीर देण्यात आली होती. बहुतेक वेळा गुलामांकडून काही काळ काम करून घेतल्यानंतर त्यांना स्वातंत्र्य दिले जात असे. त्यांना चांगला सामाजिक दर्जाही मिळत असे.

- **हिंदूमधील गुलामगिरीची पद्धत** :

मध्ययुगीन कालीन हिंदूंच्यामध्ये गुलामगिरीची पद्धत रूढी झालेली होती. महाराष्ट्रात पुरूष गुलामाला 'पोरगा' तर स्त्री गुलामाला 'कुणबीण' किंवा 'बटिक' असे म्हटले जात असे. गुलामांची खरेदी–विक्री होत असे. तसेच त्यांना गहाणही ठेवता येत असे. काम करण्याची क्षमता, शरीरप्रकृती, रंग इत्यादी गोष्टींवरून गुलामांची किंमत ठरत असे. स्त्री गुलामांचा व्यापार मोठ्या प्रमाणात चालत असे. त्यामध्ये शुद्रवर्णीय हिंदू स्त्रिया आणि काही वेळा मुस्लिम स्त्रियांचा समावेश असे. या स्त्रिया बहुतेक अविवाहीत असत. एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतर

त्याच्या इतर संपत्तीबरोबर त्याच्या गुलामांचीही वाटणी होत असे. सरकारकडेही काही गुलाम असे असत की त्यांना भाड्याने दिले जाई. चारण गुजरात आणि खानदेशामधून गुलाम आणून त्यांची विक्री करीत असत. याशिवाय बुंदेलखंड, कराड, सातारा, सिन्नर आणि तेलंगणातूनही पेशव्यांकडे गुलाम पाठविले जात. त्यामध्ये प्रामुख्याने शुद्रवर्णीय गुलाम असले तरी काही मुस्लिम आणि सिद्दी गुलामही असत. शिंदे, होळकर, नारोशंकर आणि इतरही सरदार पेशव्यांकडे गुलाम पाठवित असत.

मध्यकाळात मालक आणि गुलाम यांचे संबंध बरेच सलोख्याचे आणि माणुसकीचे होते. हिंदू शास्त्रात गुलामांना माणुसकीची वागणूक मालकांनी द्यावी यावर कटाक्ष असलेला दिसतो. गुलामांची विक्री करताना पती-पत्नी, आई आणि मुले अशा जवळच्या नात्यांची ताटातूट होणार नाही याकडे लक्ष दिले जात असे. विशेषतः आई आणि मूल यांची ताटातूट होऊ नये याकडे लक्ष दिलेले असे. त्यांची एकाच खरेदीदाराकडे विक्री केली जाई. पाश्चिमात्य गुलामगिरीमध्ये नात्यातील लोकांची ताटातूट हा सगळ्यात मोठा शाप होता. महाराष्ट्रात तर माता आणि तिची मुले एकत्रित विकल्याची अनेक उदाहरणे सापडतात.

मध्ययुगात हिंदू आणि मुस्लिम समाजात गुलामगिरीची पद्धत रूढ होती. पाश्चात्य राष्ट्रांमध्ये गुलामांना अमानुष वागणूक दिली जात असे. त्यामानाने भारतामध्ये गुलामांना बरेच माणूसकीने वागविले जात असे. सरकारने अनेक नियमही केलेले होते. भारतामध्ये गुलामगिरीतून मुक्तता मिळविणे सोपे होते. खरेदी-विक्रीमध्ये जवळच्या नातेवाईकांची ताटातूट होत नसे. पण असे असले तरी गुलामगिरीमध्ये काही मुलभूत दोष असतात. गुलामगिरी असमानतेवर आधारीत असल्यामुळे माणूसकीच्या दृष्टीने ही पद्धत अयोग्य व अमानवी होती. मालक जर क्रूर असेल तर गुलामांना अतिशय वाईट वागणूक मिळत असे. त्यामुळे गुलाम त्याच्यावर चिडलेले असत. गुलाम करीत असलेल्या कामांना कमीपणाचे मानले जाई. त्यांना समाजात कायमचे कनिष्ठ स्थान दिलेले असे आणि त्यांच्याकडे तुच्छतेने पाहिले जाई.

● **सण आणि उत्सव :**

मध्ययुगीन हिंदू आणि मुस्लिम दोन्ही समाजात अनेक सण उत्सव साजरे केले जात. थोड्या बहुत फरकाने संपूर्ण देशात साजरे होणारे सण आणि उत्सव समानच असत. मात्र प्रत्येक प्रदेशात स्थानिक लोकांच्या पद्धतीप्रमाणे कमी जास्त फरक होत असे. सण-समारंभाच्या निमित्ताने घरे-रस्ते सजविले जात, रोषणाई केली जाई, आतषबाजी केली जाई. मिरवणुका काढल्या जात. या निमित्ताने लोक चांगले चांगले कपडे आणि अलंकार घालीत. भारतातील हिंदू समाजाच्या सहवाससाने मुस्लिम समाजातील लोकही आपले सण समारंभ उत्साहात साजरे करीत. अकबर आणि जहांगीर सारख्या सम्राटांनी आपल्या दरबारात हिंदूंचे काही सण साजरे करण्यास सुरूवात केली होती. हिंदूमध्ये असणारा तुलादानाचा कार्यक्रम हुमायून करीत असे. जहांगिर आणि शहाजहानने ही ही पद्धत चालू ठेवली. औरंगजेबाने मात्र सर्व हिंदू समारंभ साजरे करण्यावर बंदी घातली. मुस्लिम समारंभाचे झालेले हिंदूकरण कमी करण्याचा प्रयत्न केला.

मुघलकाळात शिवरात्रीचा सणही मोठ्या उत्साहाने साजरा केला जाई. त्या दिवशी सर्व साधूंचे संमेलन भरत असे. त्यामध्ये अकबर सामील होत असे. त्यांच्या सोबत भोजन घेत असे. हिंदूमध्ये तीर्थयात्रा करण्याची पद्धती

होती. हरिद्वार, प्रयाग, मथुरा, गढमुक्तेश्वर, गया, काशी, कुरूक्षेत्र, उजैनी व नाशिक इत्यादी पवित्र ठिकाणी अनेक वेळा मेळे भरत. त्यामध्ये देशातील लक्षावधी लोक सामील होत. याशिवाय गावोगावी ग्रामदेवताची जत्रा भरत असे. त्यावेळी प्राण्यांच्या शर्यती, कुस्त्यांचे फड, गाणे-बजावणे अशा गोष्टी उत्साहाने केल्या जात.

मुघलकाळात शब-इ-बरात, ईद-उल-फितर, ईद-उल-जुहा हे सण भक्तिभावाने साजरे केले जाते. मोहरम हा सण प्रामुख्याने शिया पंथियांचा असे. मुघल सम्राट सुन्नी पंथीय होते पण मोहरम सण साजरा करण्यास त्यांनी कधी आडकाठी केली नाही. औरंगजेबाने मात्र मोहरमच्या मिरवणुकीवर बंदी घातली. मोरमच्या निमित्ताने ताजियाची मिरवणूक काढली जात असे. याशिवाय नवरोझ (पारसी नववर्षदिन) सम्राटांचे आणि राजपुत्रांचे वाढदिवस हे समारंभही साजरे केले जात. नवरोझच्या निमित्ताने मीना बझार भरविले जात. राजधानीच्या शहरातील सार्वजनिक ठिकाणे मखमली आणि जरतारी पडद्यांनी सजविली जात. औरंगजेबाने नवरोझ साजरा करण्यावरही बंदी घातली.

मुघलकाळात बादशहांचे वाढदिवस मोठ्या दिमाखात आणि डामडौलात साजरे केले जात. अकबर तर स्वतःचे चंद्रवर्षाप्रमाणे आणि सौरवर्षांप्रमाणे दोन वाढदिवस साजरे करीत असे. हुमायून हिंदू पद्धतीप्रमाणे त्या दिवशी स्वतःची मौल्यवान धातूंमध्ये आणि इतर पदार्थांची तुला करून ते दान करीत असे. नंतर अकबर, जहांगीर आणि शहाजहानही असे तुलादान करीत असत.

हिंदूप्रमाणे मुस्लिमांमध्येही तीर्थयात्रा करण्याची पद्धत असत. हिंदूमध्ये काशीयात्रा करणे अत्यंत पवित्र मानले जाई. तसेच मुस्लिमांमध्ये हाज यात्रा (मक्का आणि मदिना या पवित्र मुस्लिम स्थळांना भेट) अत्यंत पवित्र मानली जात असे. अनेक लोक हाज यात्रेसाठी जात असत. सम्राट त्यांना शक्यतो सर्व सोयी उपलब्ध करून देत असत. मुख्यतः सुरत बंदरातून हाज यात्रेसाठी जहाजे जात असत. हाज यात्रा करून येणाऱ्यास हाजी असे म्हटले जाई.

भारतातही अजमेर, पानिपत, सरहिंद, अजोधन इत्यादी मुस्लिमांच्या तीर्थक्षेत्री मेळे भरत असत. मुस्लिम संत आणि फकीरांच्या दरग्यावर दरवर्षी मेळे भरविले जात. ऊरूस साजरे केले जात. मुस्लिम फकीर यावेळी सर्वांना सदाचाराचा उपदेश करीत असत. विशेषतः सुफी संतांच्या दरग्यांवर असे उरूस भरविले जात. काही हिंदूही या मेळ्यांमध्ये सामील होत. विशेष म्हणजे हिंदू संतांच्या स्मारकांना मुस्लिम राज्यकर्त्यांनी दान दिल्याचे उल्लेख सापडतात तर मुस्लिम पवित्र स्थानांचा आदर हिंदू राखीत असत. कुराणाचा अपमान करणाऱ्या सैनिकांना शिवाजी महाराजांनी शिक्षा दिल्याची उदाहरणे आहेत. हिंदू आणि मुस्लिम दोघेही उत्सवप्रिय असल्यामुळे एकमेकांच्या मेळाव्यांमध्ये आणि उत्सवांमध्ये उत्साहाने सहभागी होत असत.

**● स्वयं अध्ययन प्रश्न –२**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) अहल-ए-दौलत या वर्गात .......... येत असत.

अ) उलेमा ब) काझी क) उमराव ड) सय्यद

२) .......... चा व्यापार करणाऱ्या व्यापाऱ्यांच्या पतपेढ्यांना निलकोठी म्हटले जाई.

अ) मिरी ब) निळ क) कापड ड) नारळ

३) .......... बादशहाने गुलामांच्या खरेदी-विक्रीवर कडक निर्बंध लातले.

अ) बाबर ब) हुमायून क) अकबर ड) जहांगिर

४) .......... हा सण प्रामुख्याने इस्लाममधील शिया पंथीयांचा असे.

अ) ईद-उल-जुहा ब) ईद-उल-फितर क) शब -इ- बारात ड) मोहरम

५) नवरोझ हा .......... धर्मीयांचा नववर्षदिन आहे.

अ) पारशी ब) शिख क) हिंदू ड) मुस्लिम

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) अहल-ए-कलम म्हणजे कोणता वर्ग असे?

२) औरंगजेबाने 'सेठ' पदवी कोणाला दिली?

३) बहामनी साम्राज्यातून फुटून निघालेल्या पाच शाह्यांचे सुलतान इस्लाम मधील कोणत्या पंथाचे होते?

४) मुस्लिम धर्मगुरूंना काय म्हटले जाई?

५) कोणत्या धर्मामध्ये विवाह हा एक करार होता?

## ८.२.३ स्थापत्य : मुघल व आदिलशाही :

### अ) मुघल स्थापत्य :

मुघल कालखंडात स्थापत्याचा विकास झाला. उत्तुंग वास्तू, पारंपारिक भारतीय कला व इराणी कला यांचा सुरेख संगम मुघलकालीन शिल्पकलेत आढळतो. सर्वच मुघल राज्यकर्त्यांनी स्थापत्य कलेला भरीव योगदान दिले. अकबर व शहाजहान बादशहाच्या कालखंडात या कलेची मोठी भरभराट झाल्याचे दिसून येते. मुघल सत्ताधीशंनी अनेक शिल्पांच्या उभारणीत भारतीय कारागिरांचा उपयोग करून घेतला. इस्लामी कलेचा भारतावर प्रभाव पडण्याऐवजी भारतीय कलेनेच इस्लामी कलेस प्रभावित केले. असे मत प्रसिद्ध स्थपत्यतज्ज्ञ हॉवेल यांनी मांडले आहे. शेरशहाने सहसराम येथे उभारलेला मकबरा म्हणजे हिंदू मुस्लीम शैलीचा एक उत्कृष्ट नमुना होय.

मुघलांनी उभारलेल्या वास्तुमध्ये घुमट अतिशय महत्त्वपूर्ण घटक मानला जातो. याचबरोबर कमान, मिनार, जाळीदार नक्षी, लाल दगड व संगमरवरी दगड हे या वास्तुरचनेतील महत्त्वपूर्ण बाबी होत. सर्वच मुघल सम्राटांनी वास्तूशिल्पात आपले योगदान दिले असले तरी शहाजहानचा कालखंड स्थापत्यकलेच्या उत्कर्षाचा परमोच्च बिंदू ठरला. मुघल काळातील वास्तूमधून भव्यता, प्रमाणबद्धता, साधेपणा, कलावैभव, सौंदर्य, भक्कमपणा इत्यादी

विशेष जाणवतात. या काळातील हिंदू, इराणी व मध्ये आशियाई यांच्या मिश्रणातून तयार झालेल्या या शैलीस 'मुघल शैली' असे म्हणतात. यास इंडो-पर्शियन शैली असेही म्हटले जाते.

मुघलस्थापत्याची वैशिष्ट्ये खालीलप्रमाणे सांगता येतील.

१) वास्तूंची प्रमाणबद्धता, भव्यता व नाजूकपणा यांचा समन्वय.

२) उंच चौथऱ्यावर इमारतींचे बांधकाम.

३) इमारत बांधकामासाठी लाल व संगमरवरी दगडांचा वापर.

४) पानाफुलांची कलाकूसर व नक्षीदार जाळ्या.

५) वास्तूवरील घुमटांची उभारणी व उंच मिनार.

६) इमारती भोवतालची तटबंदी.

७) वास्तूभोवती विस्तीर्ण उद्याणे व कारंजे.

**१) बाबरकालीन स्थापत्य :**

पानिपतच्या युद्धानंतर लोदी घराण्याची सत्ता संपवून बाबराने मुघल सत्तेची स्थापना केली. इ. स. १५२६ मध्ये त्याने इब्राहीमखान लोदी याचा पराभव केला व दिल्लीवर आपले वर्चस्व प्रस्थापित केले. आपली सत्ता स्थिर करण्यामध्येच त्याचा फार वेळ गेला. बाबर हा कलाप्रेमी होता. आपल्या पाच वर्षाच्या अल्प कालखंडात त्याने महत्वपूर्ण वास्तू उभ्या केल्या. या वास्तूंच्या उभारणीसाठी पर्शिया व कॉन्स्टॅटिनोपल येथील कारागिर भारतात आणण्यात आले. त्यांच्या मदतीने अनेक मशिदींचे बांधकाम हाती घेण्यात आले. 'बाबरनामा' या आपल्या आत्मचरित्रात बाबर म्हणतो, ''एकट्या आग्रा शहरात ६८० आणि सिक्री, बियाना, ग्वाल्हेर येथे १४९९ पाथरवट माझ्या इमारतींवर काम करीत होते.'' बाबराच्या कालखंडामध्ये उभ्या राहिलेल्या वास्तू रचना, कौशल्य व सौंदर्याच्या दृष्टीकोणातून दुय्यम दर्जाच्या आहेत. बाबर हा पहिला मुघल सत्ताधीश असल्याने त्याने आपल्या अल्प कारकीर्दीतही वास्तूशिल्प रचनेस सुरूवात करण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. बाबराने उभ्या केलेल्या वास्तू म्हणजे पानिपत येथील काबुली बागमधील मशीद, संभळ येथील सामा मशीद व अयोध्या येथील मशीद या होय.

**२) हुमायूनकालीन स्थापत्य :**

बाबरानंतर त्याचा पुत्र हुमायून सत्तेवर आला. त्याला शेरशहाबरोबर सतत संघर्ष करावा लागला. यामध्येत याला अपयश आले. सत्ता पुन्हा प्रस्थापित करण्यामध्ये त्याचा बराच कालखंड गेला. या अस्थिर परिस्थितीमध्ये त्याने ज्या काही वास्तू बांधल्या त्या सुलतानी वास्तूरचनेपेक्षा भिन्न आहेत. त्यात फारशी कलाकुसर दिसत नाही. बाबर आणि हुमायून यांना सतत संकटांशी मुकाबला करावा लागला. निवांत असा वेळ त्यांना मिळू शकला नाही. हुमायूनने दिल्ली येथील दिनपनाह महाल, आग्रा येथील मशीद आणि फत्तेबाद येथील मशीद या वास्तू उभारल्या.

### ३) शेरशहाकालीन स्थापत्य :

शेरशहाची कारकीर्द ही स्थापत्य कलेच्या दृष्टीने महत्वाची आहे. त्याने परदेशातील स्थापत्यशैली भारतात आणली. शेरशहाने बांधलेल्या वास्तूत हिंदू आणि मुसलमान वास्तुकल्पनांचा संगम आढळतो. बिहारमधील सहसराम येथे त्याने बांधलेला मकबरा(थडगे) अप्रतिम व कलात्मक आहे. सहराम येथील शेरशहाचा मकबरा हा तलावाच्या मध्यभागी उंच चबुतऱ्यावर बांधलेला आहे त्याचे पायाभूत बांधकाम ३० फुट आहे. तर शिखराची उंची ७१ फुट आहे. शेरशहाची ही कबर पर्शियन शैलीचा उत्कृष्ट नमुना आहे. प्रो. स्थिम यांच्या मतानुसार ''सहसराम येथे तलावाच्या मध्यभागी चतुतऱ्यावर बांधलेला शेरशहाचा मकबरा हे एक श्रेष्ठ डिझाईन तर आहेच परंतू भारतातील श्रेष्ठ इमारतीत तिची गणना होते.'' दिनपनाह या हुमायूनने बांधलेल्या इमारतीच्या अवशेषावर शेरशहाने पुराना किल्ला ही इमारत बांधली होती. शेरशहा सूरी याने कलात्मक व सौंदर्यपूर्ण वास्तू जशा बांधल्या आहेत त्याचप्रमाणे त्याने लोकोपयोगी कामे खूप केली आहेत. सार्वजनिक इमारती मकतब आणि मदरसा, दवाखाने, सराई, पूल व रस्ते आपल्या साम्राज्यात बांधलेले दिसतात. शेरशहाने चार राष्ट्रीय महामार्ग बांधले, जुना ग्रँड ट्रंक रोड सोनारगाव (बंगाल) ते अटक, दुसरा आग्रा ते मंडू, तिसरा आग्रा ते जोधपूर व चौथा लाहोर ते मुलतान यांचा त्यात समावेश होता. त्याने रस्त्याच्या कडेने झाडे लावली व १७०० सरायांचे बांधकाम केले. या सरायांमधून खाणे-पिणे व निवासाची उत्तम सोयही होती. त्याने अनेक लोकोपयोगी व सार्वजनिक इमारतीही बांधल्या. शेरशहाच्या कालखंडात १७०० सरायांचे बांधकाम, ४ हमरस्त्यांची उभारणी, यमुनेच्या काठावरील पुराना किल्ला आणि सहसराम येथील शेरशहाची कबर ही महत्वाची बांधकामे झाली.

### ४) अकबरकालीन स्थापत्य :

अकबराच्या काळात मुघल साम्राज्याचा विस्तार झाला आणि शांतता व स्थैर्य लाभले. त्यामुळे या काळात मुघल वास्तुकलेला बहर येण्यास सुरूवात झाली. अकबराच्या काळात वास्तू बांधकामात इराणी व भारतीय शैलीचे मिश्रण झालेले दिसते. त्याच्या काळात अनेक शहरे वसवली गेली व सुंदर वास्तू, बागबगिचे, सराया, विहिरी, पूल, कालवे, रस्ते बांधले गेले. अकबराच्या कला प्रेमासंबंधी अबुल फजलने लिहिले आहे की ''सम्राट सुंदर भवनों की योजना बनाता है और अपनी इन योजनाओं को पत्थर एवं मिट्टी का जामा पहनाता है''।

अकबराच्या कालखंडात अनेक सुंदर व कलात्मक वास्तू बांधल्या.

### १) हुमायूनचा मकबरा :

मुघल कालखंडातील ही पहिली सुंदर वास्तुकला होती. अकबराची सावत्र आई हाजी बेगम हिने दिल्ली येथे इ. स. १५६४ ते १५६९ या काळात 'हुमायूनचा मकबरा' ही इमारत बांधली. मुघल काळातील हा मकबरा (कबर) म्हणजे स्थापत्याचा एक कलात्मक अविष्कार आहे. मकबरा बांधकामात इराणी प्रभाव अधिक आहे. या मकबऱ्याला घुमटाबरोबरच छत्रीचा वापर केलेला आहे. डॉ. चोबे यांनी लिहिले आहे की, ताजमहाल को हम यदि एक वफादार आशिक का खिराज कहते है तो हूमायूँ के मकबरे को एक वफादार बीबी की महबूबाना पेशकश कहना पडेगा।

**२) आग्राचा किल्ला :**

अकबराच्या काळातील स्थापत्यकलेचा हा एक उत्कृष्ट नमना आहे. हा किल्ला इ. स. १५८० मध्ये बांधून पूर्ण झाला. त्या काळात त्याच्या बांधकामासाठी पस्तीस लाख रुपये खर्च झाला. हा बांधण्यासाठी चार हजार कारागीर १५ वर्षे परिश्रम घेत होते. शाही कारागीर कासिम खाँ याच्या देखरेखीखाली त्याचे बांधकाम झाले. त्याला चार दरवाजे असून बांधकामासाठी संपूर्ण लाल दगड वापरण्यात आला आहे. त्याच्या चारी बाजूला खंदक खोदले आहेत. अबुल फझलच्या मतानुसार किल्ल्यात लाल दगडाच्या जवळ जवळ ५०० इमारती अकबराने बांधल्या असाव्यात या किल्ल्याचा साचा ग्वालियरच्या हिंदू किल्ल्याप्रमाणे आहे.

**३) जहांगीर महल :**

आग्रा किल्ल्यातील महत्वाचा प्रमुख महाल आहे. अकबराने आपला लाडका मुलगा सलीम (जहांगीर) याच्यासाठी हा बांधला आहे. हा महाल गोलाकार असून त्याच्या चारी कोपऱ्यावर छत्र्या आहेत. हा लाल दगडांनी बांधलेला असून सौंदर्य वाढविण्यासाइी संगमरवर दगडाचा वापर केला आहे. आतमध्ये हंस, हत्ती, मोर, पोपट इत्यादींची चित्रे खोदली आहेत. डॉ. रामनाथ यांच्या मतानुसार, ''हा महाल हिंदू मंदिराप्रमाणे दिसून येतो आणि हा अकबरकालीन स्थापत्यकलेचे वास्तविक स्वरूप आहे.'' या जहांगीर महालाशेजारीच 'अकबरी महाल' आहे परंतु तो विशेष कलात्मक व सुंदर नाही.

**४) फत्तेपूर विक्री :**

अकबराने शेख सलीम चिश्ती या सुफी संताची आठवण म्हणून इ. स. १५६९ मध्ये आग्र्यापासून ४० किलोमीटरवर हे शहर वसविले आहे. असे सांगितले जाते की, सुफी संत सलीम चिश्तीच्या आशिर्वादाने अकबरास मुलगा झाला. अकबराने त्या मुलाचेही नाव सलीम असेच ठेवले. (जहांगीरचे मूळ नाव सलीम होते) अकबराने या ठिकाणी अनेक सुंदर इमारती, बागा व महाल बांधले. त्यापैकी दिवाण-इ-आम, दिवाण-इ-खास, जामा मशीद, इबादतखाना, बुलंद दरवाजा, पंच महाल, शेख सलीम चिश्तीची समाधी, जोधाबाई महाल, मरियम महाल, बिरबल महाल व तुर्की सुलतानाचा महाल इत्यादी इमारती विशेष उल्लेखनीय आहेत. बहुतेक इमारती लाल दगडात बांधलेल्या असून त्यावर जागोजागी पांढऱ्या संगमरवरी दगडाचे जडावाचे काम केलेले आहे. आज येथील बऱ्याच इमारती भग्नावस्थेत आहेत.

- **फत्तेपूर सिक्री येथील इमारती :**

**१) दिवाण-ए-आम व दिवाण-ए-खास :**

दिवाण-ए-आम ही इमारत उंच चबुतऱ्यावर आयताकार बांधलेली आहे. या इमारतीच्या व्हरांड्यात प्रशस्त असे सज्जे बांधण्यात आले आहेत. यांच्या जवळच दप्तरखाना ही इमारत होती.

दिवाण-ए-खास ही इमारत गोलाकार आहे. या इमारतीत मध्यभागी नक्षीदार खांब आहे. त्या खांबापासून कडेच्या सज्यापर्यंत दगडी पूल बांधलेले आहेत. या बांधकामासाठीही संपूर्ण लाल दगड वापरला आहे.

**२) पंच महाल :**

पंच महाल या इमारतीचा उपयोग उत्सवप्रसंगी केला जात असे. यातील खांब कलात्मक आहेत. या इमारतीतील पहिल्या मजल्यावर मोठा हॉल आहे व त्यात ४८ खांब आहेत. वरील मजल्यांचे काम लहान लहान होत गेले आहे. त्याच्या खांबावर घंटी, फुले, कलश व रूद्राक्ष माळा कोरलेल्या आहेत. या बांधकामावर हिंदू शैलीचा प्रभाव आहे.

**३) शाहजादाचे मकतब :**

पंचमहालच्या खालील बाजूस ही वास्तू आहे. या ठिकाणी राजकुमार व राजकुमारी यांना शिक्षण देण्याचे काम चालत असे. ही इमारतसुद्धा दुमजली असून त्याच्या छतावर नक्षीकाम कोरलेले आहे.

**४) तुर्की सुलतानाची कोठी :**

ही इमारत बादशहाच्या जनानखाना विभागात आहे. या वास्तूत कोरीव काम व शिल्पकलेचे सुंदर खोदकाम आहे. आतील भागात पशू, पक्षी, फळे, झाडे इत्यादींच्या आकृती कोरलेल्या आढळतात. पर्सी ब्राऊन या वास्तूला 'कलात्मक रत्न' म्हणतो.

**५) खास महाल :**

बादशहा अकबर याचा राहण्याचा हा महाल आहे. त्याच्या चारी कोपऱ्यावर चार छत्र्या  उभारल्या आहेत. याची बाहेरची भिंत लाल ग्रेनाइट दगडाची असून त्यात संगमरवरी जाळी बसवली आहे. या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर बादशहा झरोका दर्शन देत असे.

**६) जोधाबाईचा महाल :**

ही इमारत हिंदू शैलीनुसार बांधलेली आहे. काहींच्या मते, अकबराची रजपूत पत्नी जोधाबाई हिच्यासाठी हा महाल बांधण्यात आला होता. ती हिंदू असल्यामुळे या बांधकामावर हिंदू शैलीचा प्रभाव असावा. पर्सी ब्राउन व हॉवेल यांच्या मतानुसार, हे बांधकाम गुजरातच्या कारागिराकडून केल्यामुळे या महालाच्या शैलीवर हिंदू कलेचा प्रभाव आढळतो. ही वास्तू आयताकृती असून चारी बाजूंनी ३२ फुट उंचीच्या भिंतीने परिवेष्टीत आहे. हा महाल एखाद्या मंदिराप्रमाणे दिसतो.

**७) मरियमची कोठी :**

जोधाबाईच्या महालाशेजारीच मरियमची कोठी आहे. अनेक इतिहासकारांनी अकबराच्या ख्रिश्चन राणीचा हा महाल मानला आहे. काही इतिहासकारांच्या मते, अकबराने कोणत्याही ख्रिश्चन महिलेशी विवाह केला नव्हता. या महालाच्या आतील भागात युद्ध, शिकार, जुलूस यांची सुंदर चित्रे आहेत. तसेच येथे हिंदू देवदेवता, पऱ्या यांचीही चित्रे आहेत.

**८) राजा बिरबलचा महाल :**

अकबर बादशहाच्या दरबारी असलेल्या नऊ रत्नांपैकी बिरबल हा एक सदस्य होता. त्यांच्या नावे हा महाल बांधलेला आहे. ही दोन मजल्याची इमारत आहे. त्यात चार विभाग आहेत. वर चपटे घुमट आहेत. यातील खुदाईकाम अतिशय सुंदर आहे.

**९) जामा मशीद :**

अबुल फझलच्या निवासस्थानाच्या मागे ही आयताकार इमारत आहे. या मशिदीवर तीन घुमट आहेत. त्यापैकी मधला घुमट मोठा आहे. याचे रंगकाम व खुदाईचे काम खूप सुंदर आहे. डॉ. श्रीवास्तव यांच्या मते, सिक्रीची जामा मशिदीची योजना पूर्ण अरबी किंवा इराणी नमुन्यातील आहे. परंतु या मशिदीची बनावट भारतीय आहे. यात इराणी इमारतीचे अंग स्विकारलेले आहे परंतु त्याची नक्कल पूर्ण केली नाही. या मशिदीचे खांब व छत पूर्ण हिंदू शैलीतील आहेत. याचा मुख्य घुमट चम्पानेरच्या जामा मशिदीच्या घुमटाशी मिळताजुळता आहे. याच्या जवळपास मौलवीच्या राहण्याच्या हेतूने लहान लहान कोठ्या बांधल्या आहेत.

**१०) शेख सलीम चिश्तिचा मकबरा :**

जामा मशिदीच्या आतील पटांगणात सफेद संगमरावरने हा मकबरा बांधलेला आहे. पर्सीब्राऊन यांच्या मते, अकबरानंतरच्या राज्यकर्त्यांनी हा लाल दगड बदलून संगमरवरी बसविलेला आहे. यात कबरीचा व्यास पाच मीटर आहे. तर इमारतींवर सुंदर घुमट आहे. कबरीच्या सर्व बाजूंनी नक्षीदार संगमरवरी जाळ्या आहेत. एस. आर. शर्मा यांच्या मते, सिक्रीतील शेख सलीम चिश्तीची मकबरा येथील सर्व मुघल वास्तुत सर्वश्रेष्ठ आहे. या मकबऱ्याजवळच इस्लाम खाँ चा मकबरा बांधलेला आहे. तोही अतिशय सुंदर आहे.

**११) बुलंद दरवाजा :**

हे भारतातील सर्वात उंच प्रवेशद्वार मानले जाते. जमिनीपासून १७६ फूट उंच असलेल्या चतुतऱ्यावर १३४ फूट उंच असा हा दरवाजा आहे. म्हणजे जमिनीपासून एकूण ३१० फूट उंच आहे. अकबराने बंगाल व गुजरातवर विजय मिळविल्यानंतर किंवा दक्षिण विजय मिळविल्यानंतर हा बांधला असावा. डॉ. श्रीवास्तव यांच्यामते, बुलंद दरवाजा हीच एक स्वंयपूर्ण इमारत आहे. यात मोठे हॉल तसेच लहान लहान कोठ्याही आहेत. या प्रवेशद्वाराचा अग्रभाग इराणी शैलीचा आहे. परंतु बनावट स्पष्ट भारतीय आहे. याचे बांधकामही लाल दगडांनी बनविले आहे. हा दरवाजा आकर्षक व भव्य दिसतो.

**अकबरकालीन अन्य वास्तू :**

अकबराने आपल्या काळात अनेक इमारती बांधल्या. त्याने लाहोरचा किल्ला, इबादतखाना, इफ्तरखाना, मस्जिद शाहकुली नौबतखाना, लंगरखाना, हमाम बारहदरी, कबूतखाना, मस्जिद शाहकुली, राजा तोरडमलचा महाल, अजमेर ख्वाजा दरगाहची मशीद, आमेर मशीद, मेहता मशीद इत्यादी शेकडो इमारती त्याने बांधल्या असे म्हणतात की त्याने जवळजवळ ५०० इमारती बांधल्या होत्या.

● **जहांगीरकालीन स्थापत्य :**

जहांगिरला स्थापत्य कलेपेक्षा चित्रकलेची आवड होती त्याच्या काळात अकबराची सिकंदरा येथील कबर, ऐतुमातुद्दौलाचा मकबरा या दोन वास्तू महत्वपूर्ण आहेत.

**१) अकबराची सिकंदरा येथील (कबर) मकबरा :**

जहांगीरने सिकंदरा येथे अकबराचा मकबरा उभारला. या मकबऱ्याची लांबी रूंदी ३३९ फूट एवढी असून उंची १०० फूट आहे. कमबऱ्याभोवती २४ फूट उंचीची संरक्षक भिंत आहे. प्रवेशद्वार दक्षिण दिशेस असून मुख्य दरवाजा शेजारी मनोरे असून ते शुभ्र संगमरवरामध्ये उभे केले आहेत. त्याचबरोबर या मकबऱ्याभोवती १५० एकरांचा बगीचा निर्माण केला आहे. यामुळे या वास्तूच्या सौंदर्यात भर पडते. डॉ. ए. एल. श्रीवास्तव या कमबऱ्याबद्दल म्हणतात, ''हा कमबरा म्हणजे अकबराच्या उदार व सहिष्णू धोरणाचे प्रतिक आहे. हा मकबरा ना शुद्ध इस्लामी आहे ना शुद्ध हिंदू शैलीचा. यात हिंदू, बौद्ध, मुस्लीम आणि ख्रिश्चन स्थापत्यशैलीचा सुंदर समन्वय घडवून आला आहे.

**२) ऐतमातुद्दौलाचा मकबरा :**

आग्रा येथे इ. स. १६२६ मध्ये नुरजहानचे पिता ऐतमातुद्दौलाला याच्या स्मरणार्थ नूरजहानने हा मकबरा बांधला. त्याचे संपूर्ण बांधकाम संगमरवरामध्ये असून रंगीत खड्यांचा वापर, नक्षीकाम व लाळीकामामुळे हा मकबरा विलोभनीय वाटतो. ५४० फूट लांबी रूंदी असणाऱ्या या मकबऱ्याच्या चारीही बाजूंना तलाव आहे. अनेक ठिकाणी कारंज्यांची निर्मिती केली आहे. ऐतमातूद्दौलाचा मकबरा म्हणजे जहांगिरकालीन स्थापत्याचा उत्कृष्ट नमुना होय.

**३) अनेक कबरी व उद्यानांची निर्मिती :**

जहांगीरला उद्यानांचा बादशहा म्हणून ओळखले जाते. त्यास बागबगिचांची फार आवड होती. सिकंदरा, फत्तेपूरसिक्री, लाहोर येथील उद्यानांची निर्मिती जहांगिरने केली. त्याने श्रीनगर येथील तयार केलेली शालिमार बाग प्रसिद्ध आहे. नूरजहानने लाहोरच्या वायव्येत तीन मैल अंतरावर शहादरा येथे रावी नदीच्या काठी जहांगिरची कबर (मकबरा) बांधली. नूरजहान व आसफखान यांच्या लाहोर येथील कबरीही महत्वपूर्ण आहेत.

● **शहाजहानकालीन स्थापत्य :**

मुघल स्थापत्यकलेत शहाजहानचा कालखंड हा अत्यंत महत्वाचा आहे. शहाजहानच्या कालखंडात मुघल स्थापत्यकलेने उत्कर्षाचे शिखर गाठले. शहाजहान वास्तूकलेचा जाणकार होता. प्रत्येक वास्तूमधील बारकावे त्याने अत्यंत दक्षतेने टिपले आहेत. वास्तूचा नकाशा तो काळजीपूर्वक पाही. आपली अंतिम मान्यता देण्यापूर्वी तो वास्तूरचनाकाराबरोबर तपशीलवार चर्चा करत असे. शहाजहानने बांधलेल्या वास्तूमध्ये घोटीव संगमरवरी दगड, अर्धवर्तुळाकार मेहराब, उंच मिनारे, भव्य कारंजी, सुबक नक्षी, रंगीत दगडाचे जडाऊ काम, वेलबुट्या, लहान लहान घुमट व कियॉस्क इत्यादी त्याच्या इमारतीची महत्त्वपूर्ण वैशिष्ट्ये होती. सौंदर्य, भव्यता व आल्हाददायकता

हे या इमारतीचे गुणवैशिष्ट्य होते. ताजमहाल, लाल किल्ला, जामा मशीद, मोती मशीद, दिवाण-ए-आम, दिवाण-ए-खास, शिशमहाल इत्यादी एकाहून एक सरस.

● **ताजमहाल :**

शहाजहानने आपली प्रिय पत्नी अर्जूमंद बानू म्हणजेच मुमताजमहलच्या स्मृतीप्रित्यर्थ अत्यंत भव्य व चिरस्मरणीय अशा ताजमहालची उभारणी केली. मुमताजमहल चा मृत्यू इ. स. १६३१ साली झाल. आग्रा येथे यमुना नदीच्या काठी उभारलेल्या या वास्तूचे बांधकाम १७ वर्षे सुरू होते. ताजमहालचे बांधकाम शुभ्र अशा संगमरवरामध्ये केले ओ. इ. स. १६४७ ला पूर्णत्वास आलेल्या या वास्तूच्या उभारणीस तीन कोटी रूपये खर्च झाले तर वीस हजार मजूर या काम करित होते. जमिनीपासून २२ फूट उंच अशा चतुतऱ्यावर ताजमहालची उभारणी करण्यात आली आहे. पाच घुमट असलेल्या या वास्तूच्या मुख्य घुमटाची उंची १८७ फूट आहे. ताजमहालच्या चार कोपऱ्यात चार मिनार उभारले असून त्यांची उंची १३७ फूट इतकी आहे. वास्तूच्या समोर सुंदर बगिचा, कारंजे यामुळे ताजमहालच्या सौंदर्यांत अधिकच भर पडली आहे.

फ्रेंच प्रवासी थावीनॉट यांच्या मते ''ताजमहाल हे कालत्मक अभिरूची चे प्रतीक असून प्रत्येक जण ही वास्तू सुंदर आहे असेच म्हणेल.'' उस्ताद ईसा खान याने या वास्तूचा आराखडा बनविला होता. ताजमहालचे कमानदार प्रवेशद्वारही वास्तूकलेचा उत्कृष्ट नमुना आहे. एल्फिस्टन म्हणतो की ''शहाजहानचे सर्वोत्तम वैभव त्याच्या स्थापत्यातून स्पष्ट होते.'' जगातील सात आश्चर्यांपैकी एक आश्चर्य म्हणून गणना होणाऱ्या ताजमहालबद्दल फर्ग्युसन म्हणतो की ''ताजमहाल या वास्तूत निसर्गसौंदर्य व कलासौंदर्य यांचा अप्रतिम मिलाप आहे.'' स्मिथच्या मते ताजमहालची उभारणी युरोपीय व आशियाई कलाकारांनी केली आहे. पण पर्सी ब्राऊन, बी. हवेल, सर जॉन मार्शल यांनी हे मत खोडून काढले आहे.

मुमताज महलची कबर असणारी ताजमहाल ही वास्तू म्हणजे दुःखी सम्राटाच्या अमर अश्रुंचे थेंब होय असे रविंद्रनाथ टागोर म्हणतात. ताजमहालच्या वास्तूशास्त्रबाबत, खर्चाबाबत, उभारणी केलेल्या जागेबद्दल इतिहासकारांमध्ये मतभेद दिसून येतात. पातशहानामाचा कर्ता अब्दुल हमीद लाहोरी याच्या मते शहाजहान बादशहाने राजा जयसिंगाकडून मोकळी जागा न घेता राजवाडा घेऊन तेथे ताजमहाल बांधला. प्रा. पु. ना. ओक ताजमहालबद्दल असे म्हणतात ''ताजमहाल ही सुंदर इमारत शहाजहानने बांधली नसून तो हिंदूंचा राजवाडा होता आणि त्यापूर्वी तेथे शंकराचे देवालय होते.''

**२) शहाजहानाबाद शहराची उभारणी :**

सम्राट शहाजहानने दिल्लीजवळ यमुनेच्या काठी स्वतःच्या नावे शहाजहानाबाद या नगराची उभारणी केली. शहाजहानाबाद उभारणीस इ. स. १६३८ मध्ये सुरूवात झाली. १६५८ पर्यंत या नगर उभारणीचे काम चालू होते. या नगरामध्ये लाल किल्ला, दिवाण-इ-आम, दिवाण-इ-खास, मोती मशीद, जामा मशीद यासारख्या महत्त्पूर्ण इमारती ओत. अकबराने फत्तेपूरसिक्री या शहराची उभारणी केली. त्याच प्रकारे शहाजहानने शहाजहानाबाद या नगराची उभारणी केली. आज हे नगर म्हणजे दिल्लीचाच एक भाग बनले आहे. या वास्तू भव्य असून शहाजहानकालीन वैभवाच्या त्या साक्षीदार आहेत.

**३) मयुरासन :**

दिल्लीच्या लाल किल्ल्यामधील दिवाण-इ-खास मध्ये हे मयूरासन ठेवण्यात आले होते. हे मयूर सिंहासन १५ फूट उंच, ९ फूट लांब व ७.५ फूट रूंदीचे बनविले होते. याचे छत सुवर्णाचे असून १२ रत्नजडित स्तंभावर ते उभारण्यात आले आहे. या सिंहासनास हिरे, माणिक, मोती इत्यादी उंची रत्न जडविण्यात आली होती. या सिंहासनासाठी १ लक्ष तोळे शुद्ध सोने वापरण्यात आले होते. या सिंहासनासाठी तीन पायऱ्या असून त्याही अनमोल रत्नांनी मढविलेल्या होत्या. मुघल कालखंडाच्या सुवर्णयुगाचा महत्त्वपूर्ण भाग असलेल्या या मयूर सिंहासनावर शहाजहानने १२ मार्च १६३५ रोजी प्रथम आरोहण केले.या सिंहासनाची १ कोटी रूपये किंमत होती. इ.स. १७०७ नंतर मुघल सत्ता दुबळी झाली. अशा परिस्थितीत इ.स. १७३९ मध्ये नादिरशहाने दिल्लीवर आक्रमण करून मयूरसिंहासन इराणला नेले.

**४) जामा मशीद :**

शहाजहानने वसविलेल्या शहाजहानाबाद या नगरात सार्वजनिक प्रार्थनेसाठी एक भव्य, सुंदर व शाही मशीद बांधली. जिला जामा मशीद असे संबोधतात. इ.स. १६४४ ते १६५८ या कालखंडात हे काम पार पडले. या बांधकामासाठी ५ लक्ष रुपये खर्च आला. दिल्लीच्या लालकील्ल्याजवळ ही मशीद आहे. आग्रा येथेही इ.स. १६४८ मध्ये जामा मशीद बांधण्यात आली. पर्सी ब्राऊन यांच्या मतानुसार, स्थापत्यदृष्ट्या ही मशीद दिल्लीच्या जामा मशिदीहून अतिशय भव्य व कलात्मक आहे.

**५) मोती मशीद :**

आग्राच्या किल्ल्यातील सर्वांद सुंदर वास्तू म्हणून मोती मशीदीचे वर्णन केले जाते. इ. स. १६४५ ते १६५३ या कालखंडामध्ये या मशीदीचे बांधकाम करण्यात आले. या वास्तूची लांबी २३४ फूट तर रूंदी १८७ फूट आहे. या बांधकामसाठी ३ लक्ष रूपये खर्च आला. यावरून एखादा किल्ला अगर नगर वसवताना प्रार्थनास्थळाकडे सम्राटांनी लक्ष दिल्याचे दिसते. आग्राची मोती मशीद म्हणजे स्थापत्यकलेचा एक उत्कृष्ट नमुना होय.

**६) दिवाण-इ-खास :**

शहाजहानने शहाजहानाबाद (दिल्ली शहराचा एक भाग) या शहराची उभारणी केली. या शहरामध्ये ज्या अनेक वास्तू उभ्या केल्या त्यातील अतिभव्य वास्तू म्हणून 'दिवाण-इ-खास' चा उल्लेख करावा लागे ही वास्तू अतिशय विलोभनीय असून बाह्य सजावटीने तर तिच्या सौंदर्यात आणखीनच भर पडते. आपल्या या वास्तूचा शहाजहानला अत्यंत अभिमान होता. दिवाण-इ-खासच्या भिंतीवर त्याने पुढील ओळी कोरून ठेवल्या आहेत, ''अगर फिरदौस बररूए जमीनस्त, हमीनस्त, हमीनस्त, हमीनस्त'' ( या भूतलावर जर स्वर्ग कोठे असेल तर तो इथे आहे, इथे आहे इथेच आहे.)

**७) दिवाण-इ-आम :**

शहाजहानने आग्रा किल्ल्यात दिवाण-इ-आम ही इमारत बांधली आहे. ही विशाल इमारत तिन्ही बाजूंनी खुली असून आतमध्ये अनेक खांब आहेत. या ठिकाणी शाही दरबार भरत असे. आतील स्तंभांची रचना अशी

आहे की, कोठूनही प्रवेश केला तरी तख्तावर बसलेला बादशहा दिसत असे. याचे बांधकाम लाल दगडांनी केलेले आहे. तसेच काही ठिकाणी चुन्याचे प्लॅस्टर करून त्यात चित्रे व रंगकाम केले आहे. बादशहा बसण्याच्या ठिकाणी पिटर ज्युरा पद्धतीने जडाऊ कामाची सजावट केली आहे.

**८) लाल किल्ला :**

शहाजहानने शहाजहानाबाद शहराची उभारणी केली. या शहरातील मुख्य वास्तू म्हणजे 'लाल किल्ला' होय. हाच प्रसिद्ध दिल्लीचा लाल किल्ला होय. या किल्ल्यातील मोती महाल, रंगमहाल, हिरा महाल प्रसिद्ध आहेत. त्याचबरोबर यातील दिवाण-इ-आम, दिवाण-इ-खास या वास्तू अतिशय भव्य आहेत. किल्ल्यातील या वास्तूंचा आढावा घेता लाल किल्ल्याची भव्यता आपल्या लक्षात येते. आपले राष्ट्रीय उत्सव या किल्ल्याच्या परिसरात साजरे केले जातात.

● **औरंगजेबकालीन स्थापत्य :**

औरंगजेब बादशहाला वास्तूकलेत एवढी आवड नव्हती. औरंगजेबाला वास्तूशिल्प ही अनावश्यक बाब वाटत होती. त्याने कधीही कलापूर्ण, वैभवसंपन्न वास्तू बांधकामास प्रोत्साहन दिले नाही किंवा तशा वास्तू बांधलेल्या नाहीत. त्यांच्या काळात वास्तूकलेचे पतन घडून आले तरीही त्याच्या काळात काही मशीदी व मकबरे बांधले गेले आहेत.

**१) बिबी का मकबरा :**

हा मकबरा औरंगाबाद येथे बांधलेला आहे. औरंगजेबाची पत्नी रबीया-उल-दुरानी हिच्या स्मृतीप्रीत्यर्थ तिचा पुत्र आझम याने हे बांधकाम केले आहे. पर्सी ब्राऊन असे मानतो की, ''मकबऱ्याची शैली ताजमहालाशी मिळती-जुळती आहे किंवा यास दुसरा ताजमहाल मानले जाऊ शकते.'' परंतु खरे पाहता ही वास्तू रचनेची कलात्मकता व योजनापूर्ण दृष्टीने ताजमहालाच्या तुलनेने शुन्य आहे. तरी ही वास्तू कलात्मक आहे. कबरीच्या चारी बाजूला केलेले शिल्पकारी सुंदर आहे. या मकबराच्या लोखंडी दरवाजावर पानाफुलांचे नक्षीकाम केलेले आहे. औरंगजेबाच्या काळात मुघल वास्तूकलेचा किती झपाट्याने ऱ्हास होऊ लागला हे या इमारतीवरून लक्षात येते. ताजमहालची प्रतिकृती असूनही ताजमहालचे सौंदर्य व नजाकत यात आढळत नाही.

**२) बादशाही मशीद :**

औरंगजेबाच्या काळात ही मशीद लाहोर येथे इ.स. १६७४ मध्ये बांधलेली आहे. मशीदीचे मिनार खूप उंच आहेत.

**३) मथुरेतील मशीद :**

विरसिंह बुंदेला याने मथुरा येथे श्रीकृष्णाचे सुंदर मंदिर बांधले होते. औरंगजेबाने ते नष्ट करून त्या ठिकाणी लाल दगडाची एक विशाल मशीद बांधलेली आहे. आजही ती तेथे आहे.

### ४) बनारस मशीद :

औरंगजेबाने इ. स. १६६० मध्ये बनारस (काशी) येथील मूळ विश्वनाथाचे मंदिर पाडून त्या ठिकाणी मशीद बांधलेली आहे. त्याचे मिनार खूप उंच आहेत. आज या मशीदी शेजारीच अहिल्याबाई होळकर यांनी बांधलेले दुसरे विश्वनाथाचे मंदिर आहे. तसेच औरंगजेबाने दिल्लीच्या किल्ल्यात स्वतःच्या प्राथनेसाठी एक लहान मशीद बांधली. त्यास मोती मशीद असे म्हणतात. औरंगजेबाच्या काळात ऱ्हासाला लागलेली वास्तूकला त्याच्या मृत्यूनंतर पूर्ण ऱ्हास पावली.

### ● आदिलशाही कालीन स्थापत्य :

बहामनी साम्राज्याचे विघटन होऊन ज्या पाच शाह्या अस्तित्वात आल्या त्यातील एक महत्वाचे राज्य म्हणजे विजापूरची आदिलशाही होय. आदिलशाही सुलतानांनी इस्लामी वास्तूशिल्पाची प्रादेशिक शैली निर्माण केली. १६ व्या आणि १७ व्या शतकात उभारलेल्या वास्तू भव्य व प्रेक्षणीय होत्या. विजापूरच्या सभोवती प्रचंड आकाराचा दगडी तट व त्या भोवती खोल व रूंद खंदक खण्यात आले होते. या तटबंदीत बालेकिल्ला व त्याभोवती ही भक्कम तट होते. यामध्ये मोठे बुरूज उभारून मोठ्या आकाराच्या आणि लांब पल्ल्याच्या तोफा बसविलेल्या होत्या. विजापूरात महाल, मशिदी, उद्याने, कारंजी, दग्रे, कबरी, जलाशये व इतर अनेक इमारतींचे बांधकाम झाले. येथील आंदुमशीद, झांजिरीमशीद, शहापूरची सुनेहरी मशीद, लक्ष्मणेश्वर येथी कालीमशीद तसेच गोल घुमट, इब्राहीम रोजा, ताजबावडी, गगन महाल, जामा मशीद, नौरसपूर हैदरी बुरूज, मलिक जहान मशीद इ. अनेक प्रेक्षणीय वास्तू प्रादेशक शैलीमध्ये उभारल्या गेल्या.

### १) गोल घुमट :

विजापूरच्या आदिलशहाच्या काळातील कलापूर्ण व वैभवशाली वास्तू म्हणजे गोल घुमट व इब्राहिम रोजा या होत. महंमद आदिलशहाने सन १६२७ ते १६५५ या काळात गोल घुमट बांधला. प्रथम चार चौकोनाकृती स्तंभ उभे करून त्यांना जोडणारी भिंत बांधून मध्यभागी मोठा हॉल तयार करण्यात आला. या चारही स्तंभांना वर्तुळाकृती जिने तयार करून हा हॉल सात मजले उंच केलेला आहे. प्रत्येक मजल्यावर स्तंभ व जिन्याच्या बाजूला सज्जा असून विश्रांतीसाठी जागा केलेली आहे. इमारतीच्या मध्यभागी एक भव्य आकाराचा घुमट असून त्याच्या चारी बाजूस चारमिनार जोडले आहेत. त्यामुळेच या वास्तूला कलात्मकता व भव्यता प्राप्त झाली आहे. भिंतीच्या आतल्या बाजूस चार मीटर रूंदीची गोलाकृती गॅलरी आहे. त्याला प्रतिध्वनी सज्जा किंवा व्हिस्परिंग गॅलरी म्हणतात. येथे एकदा केलेल्या आवाजाचा सात वेळा स्पष्ट प्रतिध्वनी ऐकू येतो व अस्पष्ट ध्वनी अनेकदा ऐकू यतो. खालच्या बाजूचा हॉल सुमारे ६११५ मीटर आहे. घुमटाचा परीघ सुमारे ४२ मीटर असून तळापासून त्याची उंची ७२ मीटर आहे. तळघरात जाण्यासाठी मार्ग असून तेथे महम्मदशहाच्या कुटूंबियांच्या समाध्या आहेत. गोल घुमटाच्या बाजूस एक भव्य तलाव व कारंजी आहेत. समोर नगारखाना आहे. वास्तुकलेच्या दृष्टीने गोल घुमट हे एक आश्चर्य मानले जाते.

### २) इब्राहिम रोजा :

इब्राहिम आदिलशहा दुसरा याची कबर असणारी अशी ही वास्तू विजापूर शहराच्या पश्चिमेस दोन

किलोमीटर अंतरावर इब्राहिम रोजा ही ही वास्तू बांधलेली आहे. पहिला घुमट सुमारे १४ चौरस मीटरच्या हॉलवर बांधला आहे. हॉलच्या चारी बाजूस दरवाजे व खिडक्या आहेत. दरवाजे व खिडक्या नक्षीकामानी परिपूर्ण आहेत. भिंतीवर सोनेरी रंगात कुराणातील वचने लिहिलेली आहेत. दगडी छतावरील कोरीव काम कलापूर्ण आहे. त्यासमोरच्या मशिदीचे दगडी मनोरे, कठडे व दगडात कोरलेल्या साखळ्या व नक्षीकाम प्रेक्षणीय आहे. इब्राहिम आदिलशहा दुसरा याची कबर व तिच्यासमोरील संबद्ध मशीद अशा या दोन स्वतंत्र अशा इमारती आहेत. दोन्ही इमारती उंच अशा पीठावर उभारल्या आहेत. आणि दोन्हीच्या मध्यभागी प्रशस्त असा हौद आहे. रोझा मध्ये उद्यान होय. विस्तीर्ण अशा उद्यानाच्या मधोमध या दोन इमारती बांधल्या गेल्या आहेत. खरे तर इब्राहिमने आपली राणी ताज सुलताना हिच्याकरिता ती बांधली होती पण तिच्या आधी त्याचा मृत्यू झाल्याने त्याला तेथे पुरण्यात आले. पुढे तिचा मृत्यू झाल्यानंतर तिलाही तेथेच पुरले. सुलतानाच्या घराण्यातील आणखी चौघांनाही तेथेच दफन करण्यात आले. या वास्तूच्या उभारणीस १ लाख ५० हजार ९०० होन इतका खर्च आला.

**३) नौरसपूर :**

इब्राहिम आदिलशहा दुसरा याने स्थापन केलेल्या नव्या शहराला नौ(नऊ)रसपूर असे नाव देण्यात आले. नऊ रसांमधील रचली जाणारी काव्ये व गीते यांचा अविष्कार व्हावा अशी सुलतानाची इच्छा होती. येथे सुलतानासाठी भव्य महाल बांधला होता. येथे लहान-मोठ्या इमारती उभारल्या गेल्या, त्यात सुंदर संगीत महाल, प्रेक्षणीय महाल व इतर इमारती बांधल्या गेल्या. पुढे हे मोठे शहर म्हणून विकसित झाले.

**४) सात मंझिल :**

ही वैशिष्टपूर्ण इमारत सात खणी महाल या नावाने देखील ओळखली जात असे. राजघराण्यातील व बड्या मंडळींना आनंद घेता यावा या हेतूने उभारलेली ही सात मजली वास्तू इ. स. १५८३ साली बांधली. गाण्यांच्या मैफिलीसाठी या इमारतीचा वापर होत असून या इमारतीच्या भिंतीवर सुंदर चित्रे काढलेली व पाणी खेळवलेले होते.

याशिवाय प्रेक्षणीय आंदूमशिद, वैशिष्टपूर्ण असा मेहतर महाल, इब्राहीमने आपल्या राणीच्या नावाने बांधलेली ताज बावडी, मलिकजहान मशीद इ. अनेक इमारती इब्राहिम आदिलशहा दुसरा याच्या कारकिर्दीत उभारल्या होत्या.

**● स्वयं अध्ययन प्रश्न - ३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) शेरशहाचा मकबरा .......... येथे स्थित आहे.

अ) दिल्ली  ब) आग्रा  क) सहसराम  ड) कनौज

२) दिनपनाह ही वास्तू .......... याने बांधली.

अ) बाबर  ब) हुमायून  क) शेरशहा  ड) अकबर

३) अकबराने फत्तेपूर सिक्री हे शहर .......... साली वसविले.

अ) १५६९ ब) १५७० क) १५७१ ड)१५७२

४) .......... यास उद्यानांचा बादशहा म्हणून ओळखले जाते.

अ) अकबर ब) जहांगिर क) शहाजहान ड) औरंगजेब

५) .......... या सुलतानाने गोल घुमट बांधला.

अ) अली आदिलशहा ब) युसूफ आदिलशहा

क) महंमद आदिलशहा ड) इब्राहिम आदिलशहा दुसरा

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) फत्तेपूरसिक्री हे शहर अकबराने कोणत्या सूफी संताच्या स्मृतीप्रित्यर्थ बांधले?

२) ताजमहाल कोणत्या नदीकाठी स्थित आहे?

३) 'रोझा' म्हणजे काय?

४) नौरसपूर कोणी वसविले?

५) ऐतमादउद्दौलाची कबर कोठे आहे?

## ८.३ पारिभाषिक शब्द व शब्दार्थ :

१) सुलह-ए-कुल - सर्वांशी सलोखा, सर्वधर्म मैत्री.

२) इबादतखाना - प्रार्थनागृह.

३) प्रेषित - ईश्वराचा प्रतिनिधी, देवदूत.

४) कलम - लेखणी.

५) सराया - धर्मशाळा.

६) बावडी - विहिर.

७) फतेह - विजय.

## ८.४ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न - १**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) १५६३ २) चार ३) पारशी ४) मथुरा ५) १६७९

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) शिया २) फत्तेपूर सिक्री ३) शेख मुबारक ४) खालसा ५) अहमदनगर.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – २**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) उमराव २) निळ ३) अकबर ४) मोहरम ५) पारशी.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) बुद्धिजिवी वर्ग २) माणिकचंद ३) शिया ४) उलेमा ५) मुस्लिम.

- **स्वयं अध्ययनासाठी प्रश्न – ३**

**अ) योग्य पर्याय निवडा.**

१) सहसराम २) हुमायून ३) १५६९ ४) जहांगिर ५) महंमद आदिलशहा.

**ब) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) शेख सलीम चिश्ति २) यमुना ३) उद्यान ४) इब्राहिम आदिलशहा दुसरा ५) आग्रा.

**८.५ सरावासाठी प्रश्न :**

**अ) खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१) अकबराच्या धार्मिक धोरणाची सविस्तर चर्चा करा.

२) औरंगजेबाचे हिंदूविषयक धोरण स्पष्ट करा.

३) मुघलकालीन मुस्लीम व हिंदू स्त्रियांच्या परिस्थितीचा आढावा घ्या.

४) अर्थव्यवस्थेसंबंधीत वर्गाची माहिती लिहा.

५) शहाजहानकालीन स्थापत्याची चर्चा करा.

६) आदिलशही कालखंडातील स्थापत्यावर निबंध लिहा.

**ब) टीपा लिहा.**

१) दीन–ए–इलाही.

२) औरंगजेब व शीख संबंध.

३) अहल–ए–दौलत (सत्ताधारी वर्ग)

४) गुलामगिरी प्रथा.

५) सण-उत्सव.

६) अकबरकालीन स्थापत्य.

७) ताजमहाल.

८) गोल घुमट.

## ८.६ सारांश :

मध्ययुगीन भारताच्या इतिहासातील मुघल कालखंड हा अत्यंत महत्वाचा व दूरगामी परिणाम करणारा आहे. बाबराने पानिपतच्या लढाईत इब्राहिम लोदीचा पराभव करून इ. स. १५२६ मध्ये भारतात मुघल सत्तेची सत्ता प्रस्थापित केली. येथील धर्म, समाज आणि संस्कृतीवर मुघल राज्यकर्त्यांच्या धोरणाचा खोलवर परिणाम झाला असे दिसून येते. बाबर राज्य स्थिर करण्यात गुंतला होता. हुमायूनलाही स्थैर्य लाभले नाही.

सम्राट अकबरसाने मात्र राज्याला स्थैर्य मिळवून दिले आणि साम्राज्य विस्तारही करण्यात यश मिळविले येथील बहुसंख्य प्रजा हिंदू असल्याने त्यांचे सहकार्य मिळवून राज्य सुरळीत चालविण्याकरिता त्याने सलोख्याचे धोरण स्विकारले. अकबराला पुरोगामी व उदारमतवादी विचारांची पाश्वभूमी बालपणांपासून लाभली होती आणि तो स्वतः ही चिकित्सक वृत्तीचा होता. त्याने यात्रा कर व जिझिया कर रद्द केला. आपल्या प्रशासनात त्याने हिंदूना समाविष्ट करून घेतले. राजपूतांशी विवाह संबंध प्रस्थापित करून त्यांची मैत्री संपादन केली. एकंदरच अकबराने अवलंबिलेल्या सुलह-ए-कुल च्या उदारमतवादी धार्मिक धोरणामुळे त्याला लोकप्रियता व आदराचे स्थान मिळाले त्याचे हे धोरण जहांगिर व शहाजहानने पुढे सुरू ठेवले पण नंतर त्यांचे धोरण बदलले. औरंगजेब बादशहाने तर अकबराच्या विरोधी धार्मिक धोरणाचा पुरस्कार केला. कट्टर सुन्नी पंथीय असणाऱ्या औरंगजेबाने असहिष्णू धार्मिक धोरणाचा पुरस्कार करून राजसत्ता आणि धर्मसत्ता एकत्र केल्या. अकबराने रद्द केलेला जिझिया व यात्रा कर औरंगजेबाने पुन्हा लादला, मंदीरांचा नाश केला., सक्तीने धर्मांतरे केली. औरंगजेबाच्या या धर्मवेड्या धोरणामुळे त्याच्या राज्यात अनेक बंड झाली. राजपूत, मराठे, शीख, सतनामी, जाट यांनी त्याच्या कट्टर धार्मिक धोरणाविरूद्ध लढे दिले. औरंगजेबाच्या असहिष्णू धोरणामुळे मुघल साम्राज्याच्या ऱ्हासास सुरूवात झाली.

तत्कालीन हिंदू समाजात जाती व्यवस्था होती त्याचप्रमाणे ग्रामीण भागात वतनदारी पद्धत अस्तित्वात होती. इस्लाम धर्मात जाती नसल्या तरी पंथ व उद्योग-व्यवसायानुसार अनेक वर्ग तयार झाले होते. समाजात ढोबळमानाने सत्ताधारी वर्ग व बुद्धिजीवी वर्ग त्याचप्रमाणे आर्थिक व्यवस्थेशी संबंधितवर्ग, कनिष्ठ वर्ग अस्तित्वात होते. दोन्ही समाजात स्त्रियांचा दर्जा दुय्यम होता. तसेच हिंदू आणि मुस्लिम समाजात गुलामगिरी प्रथा होती. विविध सण उत्सव साजरे केले जात असत.

मुघल राज्यकर्त्यांनी स्थापत्यशास्त्रात भरीव योगदान दिले. भारतीय स्थापत्य शैली आणि पर्शियन शैली यांच्या वैशिष्ट्यातून मुघल शैली विकसित झाली. या कालखंडात अनेक महाल, किल्ले, राजवाडे, मशीदी, कबरी,

दर्गे, जलाशये, रस्ते, सराया इ. वास्तू उभारल्या गेल्या. शहाजहान बादशहाच्या काळात स्थापत्यकला परमोच्च शिखरास पोहोचली. आजही अनेक इमारती तात्कालीन इतिहासाची साक्ष देतात. त्याचप्रमाणे विजापूरच्या आदिलशाही सुलतानांनीही स्वतंत्र अशी प्रादेशिक शैली विकसित करून अनेक वास्तू उभारल्या.

## ८.७ अधिक वाचनासाठी पुस्तके :


१) के. एन. चिटणीस, मध्ययुगीन भारतीय संकल्पना व संस्था, खंड १ ते ४, पुणे, १९८२.

२) जदुनाथ सरकार, औरंगजेब, डायमंड प्रकाशन, पुणे,२००६.

३) बी. डी. महाजन, मध्यकालीन भारत (१०००-१७६१), एस. चांद. ॲण्ड कंपनी, नवी दिल्ली, २०१३.

४) बारगळ व ढवळे, मध्ययुगीन भारत, विद्या प्रकाशन, नागपूर, १९८७.

५) श. गो. कोलाटकर, मध्ययुगीन भारताचा इतिहास १२०६ ते १७०७, श्री मंगेश प्रकाशन, १९९४.

६) आचार्य कृ. अ., आपटे भा. कृ.; मध्ययुगीन भारत (१२०६-१७६१) महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती महामंडळासाठी साहित्यप्रसार केंद्र, नागपूर, १९७८.

७) Satish Chandra, History of medieval India [800-1700] Orient Longman Hydrabad, 2007.

८) N. Jayapalan, Social and Cultural Histrory of India Since 1556, Atlantic Publication, 2000.

९) R. N. Chitnis, Glimpses of Medieval Indian ideas and institutions, Pune, 1974.

१०) Shiram Sharma, The religious policy of the Mughal Emperors, Bombay, 1962.


❖❖❖